कविकुलगुरू - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय ग्रंथालय
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. M450 विषय अ. तत्वज्ञान
नांव श्री गुरुचरित्र
लेखक / लिपीकार केशवभट्ट
पृष्ठ 540. काळ शके 1787. पूर्ण / ~~अपूर्ण~~

॥अथ श्रीगुरुचरित्र प्रारंभ॥

शु॰ १ अ॰

२

श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ श्रीकुलदेवतायैनमः॥ श्री
पादनृ[illegible]भायनमः॥ श्रीनरसिंहसरस्वत्यैनमः॥ ॥ॐनमोजीविघ्नहरा॥ गजाननागिरिजा
कुमर[illegible]॥ जयजयलंबोदरा॥ एकदंताशूर्पकर्णा॥१॥ हालविशीकर्णयुगुलें॥ तेथोनिजोवारा
उसळे॥ त्याचेनिवातें विघ्नपळे॥ विघ्नांतकम्हणतीतुज॥२॥ तुझेंशोभेआननें॥ जेसेंतप्त
कांचनु॥ किंवाउदितप्रभानु॥ तेसेंतेजफाकतसे॥३॥ विघ्नकाननछेदनासी॥ हातींफरशधा
रि[illegible]ी॥ नागबंदकटासी॥ उरगयज्ञोपवीता॥४॥ चतुर्भुजदिससीनिका॥ दिशाळाक्षविनाथ १
[illegible]तिपाळिसीतिभ्वलोका॥ निर्विघ्नकरूनी॥५॥ तुझेंचिंतनजेकरिती॥ तयांविघ्नेंनबाध

१३१

ता॥ अधिकार जाणा शारदेसी॥ तियेवंदितां विश्वासी॥ ज्ञान होय अवधारा॥१९॥ ऐक माझी
विनंती॥ द्यावी आतां अवलीलामती॥ विस्तार करावया गुरुचरित्रीं॥ मति प्रकाशा करीं मज
२०॥ जयजय जगन्माते॥ तूंचि विश्वीं वाग्देवते॥ वेदशास्त्रें तुझीं लिखितें॥ नांदविन्द्री येणें प
री॥२१॥ मातें तुझिया वाणी॥ उत्पत्ति वेदशास्त्र पुराणीं॥ वदतां साही दीन रजनी॥ त्यातें अत्र
क्य प्रकाशिसी॥२२॥ गुरुचे नामीं तुझी स्तुती॥ म्हणती नरसिंहसरस्वती॥ याकारणें मजवरि प्री
ती॥ नाम आपुलें म्हणू॥नी॥२३॥ खांबसूत्रीं बाहुलीं जैसीं॥ खेळती तया सूत्रासरसीं॥
तैसें तंत्र बुद्धि नाहीं त्यांसी॥ वर्त्तती आणिकाचेनि मतें॥२४॥ तैसें तुझेनि अनुमतें॥ माझे जिव्हे
[illegible] पु
॥ [illegible]

॥ नीत॥ कृपानिधी वाग्देवते॥ म्हणोनि विनवीतुम्हा बाँकू॥ २५॥ म्हणोनि नमिलें तुम्हेंस्वर
॥ व्हावें स्वामिणी प्रसन्न॥ द्यावें मातें वरदान॥ ग्रंथीं रिघू करवीं आतां॥ २६॥ आतां वं
दूं त्रि[illegible]र्तीसी॥ ब्रह्माविष्णू शिवासी॥ विद्या मागें मी तयासी॥ अनुक्रमें करूनी॥ २७॥
चार मुखें असती ज्यासी॥ कर्त्ता जो का सृष्टीसी॥ वेद झाले बोलें ज्यासी॥ त्याचे चरणी
मन माझें॥ २८॥ आतां वंदूं हृषीकेशी॥ जो नायक या विश्वासी॥ लक्ष्मीसहित अहि
र्शयी॥ क्षीरसागरीं असे जाणा॥ २९॥ चतुर्बाहू नरहरी॥ शंखचक्र गदा करीं॥ पद्मह
स्त मुरारी॥ पद्मनाभ परियेसा॥ ३०॥ पीतांबर असे कासिला॥ वैजयंती माळा गळां॥

रणा एतां अभीष्ट सकळा ॥ देता होय कृपाळू ॥ ३१ ॥ नमन समस्त सुरवरां ॥ सिद्ध साध्य
अवधारा ॥ गंधर्व यक्ष किन्नरां ॥ ऋषेश्वरां नमन माझें ॥ ३२ ॥ वंदूं आतां कविकुळासी
पाराशरादि व्यासासी ॥ वाल्मिकादि सकळिकांसी ॥ नमन माझें परियेसा ॥ ३३ ॥ नेणें क
वित्व असे कैसें ॥ म्हणोनि तुम्हां विनवीतसें ॥ ज्ञान द्यावें जी भरवसें ॥ आपुला दास
म्हणूनी ॥ ३४ ॥ न कळे ग्रंथ प्रकार ॥ नेणें शास्त्रांचा विचार ॥ भाषा नये महाराष्ट्र ॥
म्हणोन विनवीं तुम्हांसी ॥ ३५ ॥ समस्त तुम्ही कृपा करणें ॥ माझिया वचना साह्य होणें
पत्तिहीन नेणें ॥ कविकुळ तुम्ही मतिपाळा ॥ ३६ ॥ ऐसें सकळिकां विनऊनी ॥ म

अ०

॥ मातृके पूर्वज मनीं॥ उभयपक्षजननी॥ महात्मपुण्यपुरुषाचें॥ ३७॥ आपस्तंभसूत्राखेसी १
॥ कौंडण्य महाऋषी॥ साखरनाम ख्यातीसी॥ सायंदेवापासाव॥ ३८॥ तयाहूनि नाग
नाथ॥ देवरावतयाचासुत॥ सदांसद्गुरूचरणध्यात॥ गंगाधर जनक माझा॥ ३९॥ न
मनकरितां जनकचरणीं॥ मातापूर्वज ध्याय मनीं॥ जोकां पूर्वजनामंधारिणी॥ आश्वला
यनसूत्राखेसी॥ ४०॥ कश्यपाचे गोत्रीं॥ चौंडेश्वर नाम धारी॥ रागजे साजन्हूभवधारी॥
अथवा जनक गंगेचा॥ ४१॥ त्याचीकन्या माझीजननी॥ निश्चयें जैसीभवानी॥ चंपाना २
तिजलागोनी॥ स्वामिणी माझी परियेसा॥ ४२॥ नमितां जनकजननीसी॥ नंतर नमूं श्रीगु

रूसी ॥ झाली मती प्रकाशी ॥ गुरुचरणस्मरावया ॥ ४३ ॥ गंगाधराचे कुशी ॥ जन्म झाला प
रियेसीं ॥ सदां ध्याय श्रीगुरूसी ॥ येकाभावें निरंतर ॥ ४४ ॥ म्हणोनि सरस्वतीगंगाधर ॥ करी
संतांसि नमस्कार ॥ श्रोतयां विनवी वारंवार ॥ क्षमा करणें बाळकासी ॥ ४५ ॥ वेदाभ्यासी सं
न्यासी ॥ यती योगेश्वर तापसी ॥ सदां ध्याती जे श्रीगुरूसी ॥ तयांसि माझा नमस्कार ॥ ४६ ॥
विनवीतसें समस्तांसी ॥ आत्ममती आपणासी ॥ माझे बोबडे बोलासी ॥ सकळ नुसी अंगिका
र ॥ ४७ ॥ तावन्मात्र माझी मती ॥ नेणों काव्युत्पत्ती ॥ जेसें श्रीगुरू निरूपिती ॥ तेणें परी सांग
ों ॥ ४८ ॥ पूर्वापार माझे वंशीं ॥ गुरुप्रसन्न अहिर्निशी ॥ निरोप देती मातें परियेसीं ॥ चरित्र आ

[illegible]त्रें विस्तारावया ॥ ४९ ॥ ह्मणे ग्रंथ कथन करीं ॥ अमृत घटस्त्रवि कारीं ॥ तुझे वंशापरःपरीं ॥ लाधती
चारी पुरुषार्थ ॥ ५० ॥ गुरुवाक्य मज कामधेनू ॥ मनीं नाहीं अनुमानु ॥ सिद्धी पावे विणार आपणु
नृसिंहसरस्वती ॥ ५१ ॥ त्रैमूर्तीचा अवतार ॥ झाला नृसिंहसरस्वती नर ॥ कवण जाणे याचा पार
चरित्र कवणा वर्णवे ॥ ५२ ॥ चरित्र असे श्रीगुरूचें ॥ वर्णून शाके मी वाचे ॥ आज्ञा असे श्रीगुरूचे ॥
ह्मणोनि वाचे बोलतसे ॥ ५३ ॥ ज्यास पुत्रपौत्रीं असे चाड ॥ त्यासि कथा हे अती गोड ॥ लक्ष्मी असे
उद्दंड ॥ तयाभुवनीं परियेसा ॥ ५४ ॥ ऐशी कथा जयाचे घरीं ॥ वाचिती नित्य मनोहरी ॥ श्रीया
युक्त नीरंतरीं ॥ नांदती पुत्र कलत्रें त्यातें ॥ ५५ ॥ रोग नाहीं तयाभुवनीं ॥ न होती गुरुकृपे करुनी ॥ नि

क्षदेह सात दिनी ॥ ऐकतां बंधन स्फुटे जाणा ॥ ५६ ॥ ऐसी पुण्य पावन कथा ॥ सांगेन ऐक विस्ता
रता ॥ सायासावीण साध्य ता ॥ सद्यः फल प्राप्त होय ॥ ५७ ॥ निधान लाभे अप्रयासीं ॥ तरि कां क
ष्ट सायासीं ॥ विश्वास माझिया बोलासी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ५८ ॥ आत्मा साक्षी ऐसें घडलें
म्हणोनि निविनवीत असें बोलें ॥ श्रीगुरुस्मरण असे भलें ॥ अनुभवा हो सकळिका ॥ ५९ ॥ तृप्ती
झालिया वरी ढेकर ॥ देती जैसे जेवणार ॥ गुरुमहिमेचा उद्गार ॥ बोलतसें अनुभवोनी ॥ ६० ॥
मी सामान्य म्हणोनी ॥ उदास कराल माझे वचनीं ॥ मक्षिकेच्या मुखानी ॥ मधु केवि ग्राह्य होय
[illegible]ं शिंपलें मुक्ताफळ ॥ अथवा कर्पूर कर्दळ ॥ विचारीं पां अश्वत्थ मूळ ॥ कवणापासावरुंस

[illegible]॥ ६२॥ येथें कराल उदास॥ वांकुडा दूषणा दिसे फांस॥ अमृत निघेल्याचा रस॥ दृष्टी द्यावीत
यावरी॥ ६३॥ तैसें माझें बोलणें॥ ज्यासि चाड गुरुस्मरणें॥ अंगिकार करणार शाहाणे॥
अनुभविती एकचित्तें॥ ६४॥ ब्रह्मरसाची गोडी॥ अनुभवितां फळें रोकडीं॥ या बोलाची
आवडी॥ ज्यासि संभव अनुभवा॥ ६५॥ गुरुचरित्र कामधेनु॥ ऐकतां होय महाज्ञानु॥ श्रो
तीं करोनि सावध मनु॥ एकचित्तें परियेसा॥ ६६॥ श्रीगुरू नृसिंहसरस्वती॥ होते गाणगपु
रीं ख्याती॥ महिमा त्याचा अद्भुती॥ सांगेन ऐका येकचितें॥ ६७॥ तया ग्रामीं वसती गुरु॥
म्हणोनि महिमा असे थोरु॥ जाण लोक चहूं राष्ट्रु॥ समस्त जातीयात्रेसी॥ ६८॥ तेथें राहोनि आ

त॥ सकळाभीष्ट साधती॥ अविलंबेंसी॥ ६॥ सकळमंगळकार्यासीः प्रथम वंदिजे तुम्हासी
॥ चतुर्दशविद्येसी॥ स्वामी तूंचि लंबोदरा॥ ७॥ वंद शास्त्रें पुराणें तुझेंचि असे लेखनें॥ ब्रह्मा
दिकीं या कारणें॥ स्तविला असे स्मरवरी॥ ८॥ त्रिपूरसाधन करावयासी॥ ईश्वरें अर्चिलें तुम्हासी
॥ संव्हार करूनि दैत्यासी॥ पहिलें तुम्हासी स्तविलें॥ ९॥ हरिहरब्रम्हादि गणपती॥ कार्यारंभीं
वंदिती॥ सकळाभीष्ट साधती॥ तुझेनि प्रसादें॥ १०॥ कृपानिधी गणनाथा॥ स्मरवरादिकां वि
घ्नहर्ता॥ विनायका अभयदाना॥ मतिप्रकाश करीं मज॥ ११॥ समस्त गणांचा नायक॥ तूंचि वि
[illegible]चा अंतका॥ तूं तें वंदिती जे लोक॥ कार्य साधे तयांचें॥ १२॥ सकळ कार्याचा आधारू॥

[illegible] कृपेचा सागरू ॥ करुणानिधी गौरीकुमरू ॥ मति प्रकाश करीं मज ॥ १३ ॥ माझे मनीचीं
वासना ॥ तुवां पुरवावी गजानना ॥ साष्टांग करितों नमना ॥ विद्या देईं मज आतां ॥ १४ ॥ नेण
ता होतों मतिहीन ॥ म्हणोनि धरिले तुझे चरण ॥ चवदा विद्यांचें निधान ॥ शरणांगत वरप्र
दा ॥ १५ ॥ माझिया अंतःकरणीचें व्हावें ॥ गुरुचरित्र कथन करावें ॥ पूर्णदृष्टीनें पाहावें ॥ ग्रं
थ सिद्धी पाववीं दातारा ॥ १६ ॥ आतां वंदू ब्रम्हकुमरी ॥ जीचें नाम वागेश्वरी ॥ पुस्तकवी
णा तिचे करीं ॥ हंसवाहिनी असे देखा ॥ १७ ॥ म्हणोनि नमितों तिचे चरणीं ॥ प्रसन्न व्हा
वीं मज स्वामिणी ॥ राहोनियां माझिये वाणी ॥ ग्रंथारिघू करीं आतां ॥ १८ ॥ विद्या वेदशास्त्रां
प्रण

काधिती ॥ त्वरित होय फळप्राप्ती ॥ पुत्रदाराधनसंपत्ती ॥ जेजें इंछिलें होय जना ॥ ६९ ॥ लाधोनि
यां संतान ॥ नाम ठेविलें नामकर्ण ॥ संतोषरूपें येउन ॥ पावती चारी पुरुषार्थ ॥ ७० ॥ ऐसें अस
तां वर्तमानीं ॥ भक्त एक नामकरणी ॥ कष्टतसे अती गहनीं ॥ सदां ध्याय श्रीगुरूसी ॥ ७१ ॥ ऐ
सें मनीं व्याकुळीत ॥ चिंतनें वेष्टिला बहुत ॥ गुरुदर्शना जाऊं म्हणत ॥ निर्वाण मानस निघाला
॥ ७२ ॥ अतिनिर्वाण अंतःकरणीं ॥ लय लावोनि गुरुचरणीं ॥ जातो द्विज्यशिरोमणी ॥ विस
रोनियां क्षुधातृषा ॥ ७३ ॥ निर्धार करोनि मानसीं ॥ म्हणे पाहीन श्रीगुरूसी ॥ अथवा सांडी
देहासी ॥ जडस्वरूप काय मज ॥ ७४ ॥ ज्याचें नाम स्मरण करितां ॥ दैन्य हानी होय त्वरिता

गु॰च॰ अ॰ १

६

आपणतैसानामांकिता॥ किंकरह्मणतसे॥ ७५॥ देवअसेआपुलेंऊणें॥ तरिकांभजावेश्रीगुरु
चरण॥ परिसलागतांलोहजाण॥ सुवर्णकेविहोतसे॥ ७६॥ तैसेंतुझेंनामपरिस॥ माझे
हृदयींसदांवस॥ मातेंकष्टसायास॥ होतांलाजकवणासी॥ ७७॥ याबोलाचियाहेवा॥ मनीं
धरोनिपाहावा॥ गुरुमूर्तीसिदाखवा॥ कृपाळुवासर्वभूंती॥ ७८॥ अतिव्याकूळअंतःकर
णी॥ निंदास्तुतीआपुलेवाणी॥ कष्टलाभक्तनामकरणी॥ करिनाहोयपरियेसा॥ ७९॥
रागस्वेच्छावोवीबध्यह्मणावें॥ आजीपाहुणेपंढरीचेराणे॥ वंदूंविघ्नहराभावें॥ नमूंते
सुंदराशारदेसी॥ ८०॥ गुरूचित्रैमूर्ती॥ ह्मणतीवेदश्रुती॥ सांगतीदृष्टांतीं॥ कलियुगांत: ८१॥

६

कलियुगांतं ख्याती॥ नृसिंहसरस्वती॥ भक्तांसी सारथी॥ कृपासिंधू॥ ८२॥ कृपासिंधु भक्तका
वेदवाखाणिता॥ त्रयमूर्ती गुरुनाथा॥ म्हणोनियां॥ ८३॥ त्रयमूर्तीचे गुण॥ तूं येक निधा
न॥ भक्तांसी रक्षण॥ दयानिधी॥ ८४॥ दयानिधी यती॥ विनवितों श्रीपती॥ नेणे भाव भ
क्ती॥ अंतःकर्णी॥ ८५॥ अंतःकर्णी स्थिरू॥ नके बा श्रीगुरु॥ तूं कृपासागरु॥ पाव वेगीं॥ ८६॥
पाव वेगीं आतां॥ नरहरी अनंता॥ बाळालागीं माता॥ केवी टाकी॥ ८७॥ तूं माता तूं पिता
॥ तूंचि सखा भ्राता॥ तूं कुळदेवता॥ पारंपरीं॥ ८८॥ वंशापरंपरी॥ धरूनि निर्धारी॥ भज
तें मीं नरहरी॥ सरस्वतीसी॥ ८९॥ सरस्वती नरहरी॥ दैन्य माझें हरी॥ म्हणूनि मी निरंतरीं॥ सदा

शें ॥ १० ॥ सदाकष्टचिंता ॥ कांहोदेत्रिआतां ॥ कृपासिंधुभक्ता ॥ केवीहोसी ॥ ११ ॥ कृपासिंधुभ
क्ता ॥ कृपाळूअनंता ॥ त्रयमूर्त्तीजगन्नाथा ॥ दयानिधी ॥ १२ ॥ त्रयमूर्त्तीतूंहोसी ॥ पाळिसी
विश्वासी ॥ समस्तदेवांसी ॥ तूंचीदाता ॥ १३ ॥ समस्तदेवांसी ॥ तूंचिदाताहोसी ॥ मागोंमीकवणा
सी ॥ तुजवांचूनी ॥ १४ ॥ तुजवांचोनिआतां ॥ असेकवणदाता ॥ विश्वासीपोषीता ॥ सर्वज्ञतुं ॥
१५ ॥ सर्वज्ञाचिरवूण ॥ असेहेंलक्षण ॥ समस्तांतेंजाणे ॥ कवणकैसा ॥ १६ ॥ सर्वज्ञम्हणोनी ॥
॥ वानितीपुराणीं ॥ माझेंअंतःकर्णी ॥ नयेसाक्षी ॥ १७ ॥ कवणकेशापरी ॥ असतीभूमि
वरी ॥ जाणिजेचितरी ॥ सर्वज्ञतो ॥ १८ ॥ बाळकताम्हयें ॥ नेणेबापमाये ॥ कृपाकेविहोय ॥ म

तापिल्या ॥ ९९ ॥ दिल्हे या वांचोनी ॥ न देवे ह्मणोनी ॥ असेल तुझे मनीं ॥ सांग मज ॥ १०० ॥ समस्त
महित कीं ॥ तुह्मा दिल्ही बळी ॥ त्यानें हो पाताळीं ॥ बैसविलें ॥ १ ॥ सुवर्णाची लंका ॥ तुवां दि
ल्ही एका ॥ तेणें पूर्वीं लंका ॥ कवणा दिल्ही ॥ २ ॥ अढळ ध्रुवासी ॥ दिल्हे हृषिकेशी ॥ त्याणें
हो तुह्मासी ॥ काय दिल्हें ॥ ३ ॥ निक्षेत्र करूनी ॥ विप्रांतें मेदिनी ॥ देतां तुह्मा कवणीं ॥ काय दिल्हें
॥ ४ ॥ सृष्टीचा पोषक ॥ तूंची देव एक ॥ तूं तें मी मनुष्यक ॥ काय देऊं ॥ ५ ॥ नाहीं तुह्मा जरी
श्रीमंत नरहरी ॥ लक्ष्मी तुझे घरी ॥ नांदतसे ॥ ६ ॥ याहोनी आह्मासी ॥ तूं काय मागसी ॥
सांग हृषीकेशी ॥ काय देऊं ॥ ७ ॥ मातेचे वोसंगा ॥ बैसोनिया बाळ ॥ पसरी मुखकमळ ॥

८

नकांक्षेसी ॥ ८ ॥ बाळापाशीं मानां ॥ कायमागेनाता ॥ ऐक श्रीगुरुनाथा ॥ काय देऊं ॥ ९ ॥ घेऊ
नियां देतां ॥ नावनाहीं दाता ॥ दयानिधी ह्मणतां ॥ बोल दिसे ॥ १० ॥ देऊं तूं नशकसी ॥ ह्मणे मी
मानसीं ॥ चौदाही भुवनासी ॥ तूंची दाता ॥ ११ ॥ तुझे मनी पाहीं ॥ वसे आणिक काहीं ॥ सेवा केलि
नाहीं ॥ ह्मणोनियां ॥ १२ ॥ सेवा घेऊनियां ॥ देणें हें सामान्य ॥ नाम नसे जाण ॥ दात्त्वासी ॥ १३ ॥
तळीं बावी विहिरी ॥ असती भूमीवरी ॥ मेघ तो अंबरीं ॥ वर्षतसे ॥ १४ ॥ मेघाचीहि सेवा ॥ न क
रितां स्वभावा ॥ उदक पूर्ण सर्वां ॥ केवी करी ॥ १५ ॥ सेवा अपेक्षितां ॥ बोल असे दाता ॥ दयानि
धी ह्मणतां ॥ केविं साजे ॥ १६ ॥ नेणे सेवा केसी ॥ स्थिर होय मानसीं ॥ माझे वंशोवंशीं ॥ तुझे

दास ॥ १७ ॥ माझे पूर्वजवंद्रीं ॥ सेविलें तुह्मासी ॥ संग्रह बहुवसीं ॥ तुझे चरणीं ॥ १८ ॥ बापाचे ठेवे
सी ॥ पाळिती पुत्रासी ॥ तेवि त्वां आह्मासी ॥ प्रतिपाळावें ॥ १९ ॥ माझें पूर्वधन ॥ तुह्मि द्यावें ऋण ॥
कां बा नये करुणा ॥ कृपासिंधू ॥ २० ॥ आमुचें आत्मां देतां ॥ कां बा नयेचि ता ॥ मागेन मी सन्ता ॥
घेइन आतां ॥ २१ ॥ आतां मज जरी ॥ नेदिसि नरहरी ॥ जिंतो निवेव्हारीं ॥ घेईन जाणा ॥ २२ ॥ दि
सतसे आतां ॥ कठीणता गुरुनाथा ॥ दास मीं अंकिता ॥ सनातन ॥ २३ ॥ आपुले समान ॥ असेल
कवण ॥ तयासवें मन ॥ कठीण कीजे ॥ २४ ॥ कठिण कीजे हरी ॥ तुवां दैत्यांवरी ॥ प्रल्हाद केवा
लि ध्रोवकासी ॥ २५ ॥ ध्रोवका बाळकासी ॥ करूं नये ऐसी ॥ कठिणता परियेसीं ॥ बरवें न दि

२६॥ माझीया अपराधीं॥ धरोनियां बुधी॥ अंतःकर्ण क्रोधी॥ पाहासी जरी॥ २७॥ बाळकम
ती॥ बोले निष्ठुरेंसी॥ अज्ञानें मायेसी॥ मारी जरी॥ २८॥ माता त्या कुमरासी॥ कोपन धरि कैशी
॥ आलिंगोनि हर्षी॥ संबोखी पां॥ २९॥ कवण्या अपराधेंसी॥ न घालसी आह्मासीं॥ अहो ह
षीकेशी॥ सांगा मज॥ ३०॥ माता हो कोपेंसी॥ बोले बाळकासी॥ जावोनी पितयासी॥ सांगे बा
ळ॥ ३१॥ माता कोपे जरी॥ एकादे अवसरी॥ पिता कृपा करी॥ संबोखूनी॥ ३२॥ तूं माता तूं
पिता॥ कोपसी गुरुनाथा॥ सांगों कवणा आतां॥ क्षमा करीं॥ ३३॥ तूंचि स्वामी एसा॥ जगीं
झाला ठसा॥ दास तुझा भलतसा॥ प्रतिपाळावा॥ ३४॥ अनाथ रक्षका॥ ह्मणती तुज लोक

मी तुझा बाळक ॥ प्रतिपाळावें ॥ ३५ ॥ कृपाळू म्हणोनी ॥ वानिती पुराणीं ॥ माझे बोल कानीं
न घालिसीच ॥ ३६ ॥ नायकसी गुरुराणा ॥ माझे करुणावचना ॥ कायदुश्चितपणा ॥ तुम्हा
असे ॥ ३७ ॥ माझें करुणावचन ॥ न ऐकती तुझे कान ॥ ऐकोनी पाषाण ॥ विघुरतसे ॥ ३८ ॥
करुणाकरी ऐसें ॥ वानिती तुज पिसें ॥ अजुनी तरी कैसें ॥ कृपा न ये ॥ ३९ ॥ ऐसें नामांकित ॥
विनवीतां त्वरित ॥ कृपाळू श्रीगुरुनाथ ॥ आले वेगीं ॥ ४० ॥ वत्सालागीं धेनू ॥ जैशी ये
धांवोनु ॥ तैसें श्रीगुरू आपणु ॥ आले जवळी ॥ ४१ ॥ येतांचि गुरुमुनी ॥ वंदी नामकरणी ॥
मस्तक टेकूनी ॥ चरणयुग्मीं ॥ ४२ ॥ केशातो मोकळी ॥ झाडी चरणधुळी ॥ आनंदाचे

त्रळी॥ आं घ्रीक्षाळी॥ ४३॥ हृदय मंदिरांत॥ बैसवोनि भक्त॥ पूजाउपचारित॥ षोडशाविधी
४४॥ आनंदभरीत॥ झाला नामांकीत॥ हृदयीं श्रीगुरुनाथ॥ स्थिरावला॥ ४५॥ भक्तां
च्या हृदयांत॥ राहे श्रीगुरुनाथ॥ संतोषबहूत॥ सरस्वतीसी॥ ४६॥ इति श्रीगुरुचरित्र प
रमकथा कल्पतरू श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधारकसंवादे प्रथमोऽध्या
यः॥ १॥ श्रीदत्तात्रयार्पणमस्तु॥ ओव्या॥ १४६॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥

श्रीगुरूचरणारविंदाय नमः॥ त्रैमूर्ति राजा गुरू तूंचि माझा॥ कृष्णातिरीं वास करोनि वोजा
॥सू भक्त तेथें करिती आनंदा॥ ते सूरस्वर्गीं पाहाती विनोदा॥१॥ ऐसे श्रीगुरूचरण ध्यात॥ जा
तां विष्णू नामांकित॥ अति श्रमला चालत॥ राहिला एक वृक्षातळीं॥२॥ क्षण एक निद्रि
स्त॥ मनी श्रीगुरू चिंतित॥ कृपानिधी अनंत॥ दिसे स्वप्नीं परियेसा॥३॥ रूप दिसे सुषुप्ती
तं॥ जटाधारी भस्मांकित॥ व्याघ्रचर्म परिधानित॥ पीतांबर वास देखा॥४॥ येऊनि यो
गेश्वर जवळी॥ भस्म लाविलें कपाळीं॥ अश्वासूनि तया वेळीं॥ अभयकर देतसे॥५॥
कौतुकें देखोनि सुषुप्तींत॥ चेतन झाला नामांकित॥ चारी दिशा अवलोकित॥ विस्मयक

न या वेळीं ॥ ६ ॥ मूर्त्ती देखिली सुषुप्तींत ॥ तेचि ध्यातसे मनांत ॥ पुढें निघाला मार्गक्रमित ॥ त्यक्ष देखे तैसाची ॥ ७ ॥ देखोनियां योगीशातें ॥ करिता झाला दंडवतें ॥ कृपाभावी करुणावचनें ॥ मातापिता तूं म्हणतसे ॥ ८ ॥ जयजय योगाधीशा ॥ अज्ञानतमविनाशा ॥ तूं ज्योतिप्रकाशा ॥ कृपानिधी सिद्धमुनी ॥ ९ ॥ तुझे दर्शनमात्रेंसी ॥ गेले माझें दुरितदोषी ॥ तूं तारक आम्हांसी ॥ म्हणोनि आलासि स्वामिया ॥ १० ॥ कृपेनें भक्तां लागुनी ॥ येणें झालें कोठुनी ॥ तुमचें नाम कवण मुनी ॥ कवणे स्थानीं वास तुम्हां ॥ ११ ॥ सिद्ध म्हणे आपण योगी ॥ हिंडों तीर्थें भूमी स्वर्गी ॥ प्रसिद्ध आमुचा गुरु जगीं ॥ नृसिंहसरस्वती विख्यात ॥ १२ ॥ ज्यां

चेंस्थान गाणगापुर ॥ मरजासंगमभीमातीर ॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥ नरसिंहसरस्व
ती ॥ १३ ॥ भक्त तारावयालागीं ॥ अवतार त्रयमूर्ती जगीं ॥ सदा ध्यानी अभ्यास योगी ॥
भवसागर तरावयासी ॥ १४ ॥ ऐसा श्रीगुरु कृपासिंधू ॥ भक्तजनां सदा वरदू ॥ अखिल
सौख्यश्रियानंदु ॥ देता होय द्रिव्यवर्गां ॥ १५ ॥ त्याचे भक्तां कैचें दैन्य ॥ अखंड लक्ष्मीप
रिपूर्ण ॥ धनधान्यादि गोधन ॥ अष्टैश्वर्येंनांदती ॥ १६ ॥ ऐसें ह्मणे सिद्धमुनी ॥ ऐको
विनवी नामकरणी ॥ आह्मी असतों सदा ध्यानीं ॥ तया श्रीगुरूयतीचें ॥ १७ ॥ ऐसी की
र्ति श्रीदख्याती ॥ सांगतसे सिद्धयती ॥ वंदोवंदीं करितों भक्ती ॥ कष्ट आह्मा केवि पाहे ॥ १८ ॥

गु० च०

२

तूंतारकआह्मासी॥ म्हणोनि मातें भेटलासी॥ संहार करोनि संशयासी॥ निरोपावें स्वामिया
॥१९॥ सिद्ध म्हणे तया वेळीं॥ ऐक शिष्या नाममोळी॥ गुरुरूपा सूक्ष्म स्थळीं॥ भक्तवत्स
लपरियेसा॥२०॥ गुरुरूपा होय ज्यासी॥ दैन्य दिसे कैचें त्यासी॥ समस्त देव त्याचे वंदीं॥ क
ळिकाळासि जिंकेनरू॥२१॥ ऐसी वस्तू पूजोनी॥ दैन्य वृत्ती सांगसी झणी॥ नसेल तुझे
निश्चय मनीं॥ म्हणोनि कष्ट भोगितोसी॥२२॥ नयमूर्ति श्रीगुरु॥ म्हणोनि जाणिजे नि
र्धारु॥ देऊं शके अखिल वरु॥ एकाभावें भजावें॥२३॥ एकादे समयीं श्रीहरी॥ अथ
वा कोपे त्रिपुरारी॥ राखेल श्रीगुरू निर्धारी॥ आपुले भक्तजनासी॥२४॥ आपण कोपे

अ०

२

२

एकाद्यासी ॥ रक्षूंनशकेव्योमकेशी ॥ अथवाविष्णूपरियेसीं ॥ रक्षूंनशकेअवधारीं ॥
॥२५॥ ऐसेंऐकोनिनामकरणी ॥ लागेसिष्याचियाचरणीं ॥ विनवीतसेकरजोडुनी ॥ भाव
भक्तीकरोनियां ॥२६॥ स्वामीऐसानिरोपदेती ॥ संदेहहोतामाझेचित्तीं ॥ गुरुकेविझाले
त्रिमूर्ती ॥ ब्रह्माविष्णूमहेश्वर ॥२७॥ आणिकतुम्हीनिरोपिलेती ॥ विष्णूरुद्रजरी
कोपती ॥ राखोंशकेगुरुनिश्चिती ॥ गुरुकोपलियानराखेकोणीं ॥२८॥ हाबोलअसे
कवणाचा ॥ कवणशास्त्रपुराणींचा ॥ संदेहफेडींगामनाचा ॥ जेणेंमनदृढहोय ॥२९॥
येणेपरीनामकरणी ॥ सिष्यासिपुसेवंदुनीं ॥ कृपानिधीसंतोषोनी ॥ सांगतसेपरियेसा ॥

॥३०॥ सिद्ध ह्मणे शिष्यासी ॥ तुवां पुशिलें आह्मासी ॥ वेदवाक्य साक्षीसी ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥
॥३१॥ वेद च्यारी उत्पन्न ॥ झाले बह्मया मुखें करून ॥ त्यापासाव पुराण ॥ अष्टादश विख्यात ॥
॥३२॥ तया अष्टादशांत ॥ ब्रह्मवाक्य असंख्यात ॥ पुराण ब्रह्मवैवर्त ॥ प्रख्यात असे त्रिभुवनीं ॥
॥३३॥ नारायण विष्णूमूर्ती ॥ व्यास झाला द्वापारांतीं ॥ प्रकाश केला या क्षितीं ॥ ब्रह्मवाक्य विस्तारें ॥
॥३४॥ तू या व्यासापासूनी ॥ ऐकिजे समस्त ऋषीजनीं ॥ तेचि कथा विस्तारोनी ॥ सांगेन ऐकचित्तें ॥
॥३५॥ चतुर्मुख ब्रह्मयासी ॥ कलियुग पुसे हर्षी ॥ गुरुमहिमा विस्तारेंसी ॥ ब्रह्मदेवें निरूपिली ॥
॥३६॥ ऐसें ह्मणतां नामकरणी ॥ पुनरपी शिष्या सिद्धमुनी ॥ विनवीतसे करद्वय जोडूनी ॥ भावभ

कीकरूनियां ॥ ३७ ॥ म्हणे सिद्धा योगेश्वरा ॥ अज्ञानतिमीरछेदका भास्करा ॥ तूं तारक भ
वसागरा ॥ भेटलासि कृपासिंधू ॥ ३८ ॥ ब्रह्मदेव कलियुगासी ॥ सांगणें केवि कार्यासी ॥ आ
द्यंत विस्तारेंसी ॥ निरोपिजे स्वामिया ॥ ३९ ॥ ऐक कलि ध्यायेकचित्ता ॥ जधीं प्रळय झाला होता
आदिमूर्ति निश्चिंता ॥ होते वटपत्रशायनीं ॥ ४० ॥ अव्यक्तमूर्ती नारायण ॥ होते वटपत्रशाय
न ॥ बुद्धिसंभवे चेतन ॥ आणीक सृष्टी रचावया ॥ ४१ ॥ प्रपंचत्मक जे सृष्टिरचना ॥ कर
णें म्हणोनि आलें मना ॥ जागृत न होय या कारणा ॥ आदिपुरुष तये वेळीं ॥ ४२ ॥ जागृत
होवूनि नारायण ॥ बुद्धिसंभवे चेतन ॥ कमळ उपजवी नाभीहून ॥ त्रैलोक्याचें रचनाव

र ॥ ४३ ॥ तया कमळामधून ॥ उदयो झाला ब्रह्मा आपण ॥ च्यारी दिशा पाहोन ॥ चतुर्मु
ख झाला देखा ॥ ४४ ॥ ह्मणे ब्रह्मा तथे वेळीं ॥ समस्तां हूनि आपण बळी ॥ मजे हूनि आणी
क वळी ॥ कवण नाहीं ह्मणे तसे ॥ ४५ ॥ हां सोनियां नारायण ॥ बोले वाचे शब्दवे चतु ॥ आ
पण असे महाविष्णु ॥ भजा ह्मणे तये वेळीं ॥ ४६ ॥ देखूनि या श्रीविष्णूसी ॥ नमस्कारी ब्र
ह्मा हर्षी ॥ स्तुती केली बहु वसीं ॥ अनेक काळ परियेसा ॥ ४७ ॥ संतोषोनि नारायण ॥
निरोप दिधला अति महन ॥ सृष्टि रचीं गा ह्मणोन ॥ आज्ञा दिधली तयावेळीं ॥ ४८ ॥
ब्रह्मा ह्मणे विष्णूसी ॥ नेणे सृष्टी रचावयासी ॥ देखिली नाहीं कैशी ॥ केवि रचूं ह्मणतसे ॥ ४९

ऐको नि ब्रह्मयाचें वचन ॥ निरोपील्यासि महाविष्णू आपण ॥ वेद असती दोघे ह्मणून ॥ देता झाला तये वेळीं ॥ ५० ॥ सृष्टीरचाव याचा विचार ॥ असे वेदांत सविस्तार ॥ तेणेचि परी रचूनि स्थीर ॥ प्रकारा करीं ह्मणितलें ॥ ५१ ॥ अनादि वेद असती जाण ॥ असे सृष्टीचें लक्षण ॥ जैसा आरसा असे खुण ॥ सृष्टीरचावी तयापरी ॥ ५२ ॥ या वेदमार्गें सृष्टीसी ॥ रचीं गा ब्रह्म्या अहिर्निशी ॥ ह्मणोनि सांगे हृषीकेशी ॥ ब्रह्मा रचीं सृष्टि तेथें ॥ ५३ ॥ सृजी प्रजा अनुक्रमे ॥ विविध स्थावर जंगमें ॥ श्वेदज अंडज नामे ॥ जारज उद्भिज उपजविले ॥ ५४ ॥ श्रीविष्णूचे निरोपानं ॥ त्रिजग रचिलें ब्रह्मयानें ॥ ज्यापरी सृष्टीक्रमण ॥ व्यासें ऐसें कथियेलें ॥ ५५ ॥

सिद्ध ह्मणे शिष्यासी ॥ नारायण वेद आसी ॥ विस्तार केला पुराणासी ॥ अष्टादश विख्यात
॥ ५६ ॥ तथा अष्टादशांत ॥ पुराण वैवर्त प्रख्यात ॥ ऋषेश्वरासि सांगे स्फुत ॥ तेचि परी सांगतसे ॥ ५७
सनकादिकांतें पूजोनी ॥ ब्रह्मनिष्ठ निर्गुणी ॥ मरीच्यादि ब्रह्म सगुणी ॥ उपजवी ब्रह्मा तयावेळीं
॥ ५८ ॥ तेथोनि देव दैत्यांसी ॥ उपजवी ब्रह्मा परियेसीं ॥ सांगतों विस्तारेंसी ॥ ऐकें शिष्योत्तमा ॥ ५९ ॥
कृत त्रेत द्वापारयुग ॥ उपजवी मग कलियुग ॥ एकेकांत निरोपी मग ॥ भूमीवरी प्रवर्त करीं ॥ ६० ॥
आपण बोलाऊनि कृतायुगासी ॥ निरोपी ब्रह्मा परियेसीं ॥ तुवां जाऊनि भूमीसी ॥ प्रकाशा
करीं आपणातें ॥ ६१ ॥ ऐकोनि ब्रह्म्याचें वचन ॥ कृतायुग आलें संतोषोन ॥ सांगेन त्याचें ल

क्षण॥ ऐका श्रोते एकचित्तें॥ ६२॥ असत्य नेणे कधीं वाचे॥ वैराग्य पूर्ण ज्ञानी साचें॥ यज्ञोप
वीत आभरण त्याचें॥ रुद्राक्षमाळा करकंकणें॥ ६३॥ येणें रूपें युग सत्य॥ ब्रह्मयासि असे वि
नवित॥ मातें निरोप देत॥ केवि जाऊं भूमीवरी॥ ६४॥ भूमीवरी मनुष्यलोक॥ असत्य निंदा
अपवादक॥ मातें न साहे तें ऐका॥ कवणे परी वर्तावे॥ ६५॥ ऐको निसत्याचें वचना॥ निरोपि
तो ब्रह्मा आपण॥ तुवां वर्तावें सत्वगुण॥ कलिकाळ येणे परी॥ ६६॥ न करी जड तूतें
आण॥ आणीक युग पाठवीन॥ तुवां राहावें सावध होऊन॥ म्हणूनि पाठवी भूमीवरी॥
६७॥ वर्ततां येणे परी ऐका॥ झाली आवधी सत्वाधिका॥ बोलाऊनि त्रेतायुगा देखा॥

निरोपदेत ब्रह्मदेवो ॥ ६८ ॥ त्रेतायुगाचें लक्षण ॥ ऐक शिष्या सांगेन ॥ असत्याचें स्थूळ तन
हातीं असे यज्ञसामग्री ॥ ६९ ॥ त्रेतायुगाचें कारण ॥ यज्ञ करिती सकळ जन ॥ धर्मशास्त्र प्रवर्त
न ॥ कर्ममार्ग ब्राह्मणासी ॥ ७० ॥ हातीं असे कुश समिधा ऐसें ॥ धर्मप्रवर्तक सदा वसे ॥ ऐसें
युग गेलें हर्षें ॥ निरोप घेऊनि भूमीवरी ॥ ७१ ॥ बोलाऊनि ब्रह्मा हर्षीं ॥ निरोप देत द्वापारा
सी ॥ सांगेन तयाचे रूपासी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ७२ ॥ खड्ग खट्वांग धरोनि हातीं ॥ धनुष्य
बाण ये गती ॥ लक्षण उग्र असे त्यांतीं ॥ निष्ठुर दया दोनी असे ॥ ७३ ॥ पुण्य पाप समान दे
खा ॥ स्वरूपें द्वापार असे निका ॥ निरोप घेऊनि कौतुका ॥ आला आपण भूमीवरी ॥ ७४ ॥

त्याचे दिवस पुरल्यावरी ॥ कलियुगातें पाचारी ॥ जावें त्वरीत भूमीवरी ॥ म्हणूनि सांगे ब्रह्मादेवा
॥७५॥ ऐसें कलियुग देखा ॥ सांगे नलक्षणें एका ॥ ब्रह्मयाचे सन्मुखा ॥ केवि गेलें परियेसा
॥७६॥ विचारहीन अंतःकरणीं ॥ पिशाचासारिखें वदनीं ॥ तोंड खालतें करूनी ॥ ठायीं ठायीं पडतसे
॥७७॥ द्वंद्व आपण विराराहीन ॥ कलहद्वेषसंगें घेऊन ॥ वाम हातीं धरोनि शिश्न ॥ येतो ब्रह्मयास
न्मुख ॥७८॥ जिव्हा धरोनि उजवे हातीं ॥ नाचे कली अती प्रीती ॥ द्वेषउन्नरें करी स्तुती ॥ पुण्य
पापासमिश्रित ॥७९॥ हांसे रडे वांकुल्या दावी ॥ वांकुडे तोंड मुखीं शिवी ॥ ब्रह्मयापुढें उभा
राही ॥ काय निरोप म्हणोनियां ॥८०॥ देखोनि तयाचें लक्षण ॥ ब्रह्मा हासे अति गहन ॥ पुस

गु॰ च॰
७

अ॰
२

तसेअतिविनयान ॥ लिंगजिव्हाकांधरिलें ॥ ८१ ॥ कलियुगह्मणेब्रह्मयासी ॥ जिंकी
नसमस्तलोकांसी ॥ लिंगजिव्हारक्षणासी ॥ हारिअसेआपणासी ॥ ८२ ॥ याकारणें
लिंगजिव्हा ॥ धरोनिनाचेंब्रह्मदेवा ॥ जेथेंमीजाईनस्वभावा ॥ आपणनभियेंकव
णातें ॥ ८३ ॥ ऐकोनिकलिचेंवचन ॥ निरोपदेतब्रह्माआपण ॥ भूमीवरीजाऊन ॥
प्रकाराकरींआपुलेगुणें ॥ ८४ ॥ कलिह्मणेब्रह्मयासी ॥ मजपाठविताम्हीसी
आपुलेगुणआहेकेवी ॥ सांगेनएकस्वामिया ॥ ८५ ॥ छेदनकरीनधर्मासी ॥ आ
पणअसेनिरंकुशी ॥ निरानंदपरियेसीं ॥ निद्राकलहमाझेनी ॥ ८६ ॥ परद्रव्यहारक

७

परस्त्रीरत ॥ हे दोघे माझे भ्रात ॥ प्रपंच मत्सर दंभक ॥ प्राण सखे माझे असती ॥ ८७ ॥
बकासारिखा संन्यासी ॥ तोचि माझा प्राण परियेसी ॥ छळण करोनि उदरासी ॥
मिळविलें तोचि आपण ॥ ८८ ॥ तोचि माझा सखा प्राण ॥ आणीक असतील पुण्य
जन ॥ तेचि माझे वैरी जाण ॥ म्हणोनि नवी ब्रह्मयासी ॥ ८९ ॥ ब्रह्मा म्हणे कलि
युगासी ॥ सांगेन तुज उपदेशी ॥ कलियुगीं आयुष्य नरासी ॥ सत्य असे एक
शत ॥ ९० ॥ पूर्वयुगायुगीं देखा ॥ आयुष्य बहु मनुष्य लोकां ॥ तप अनुष्ठानरे
का ॥ करी अनेका दिवसांवरी ॥ ९१ ॥ मग होयते यासि मती ॥ आयुष्य असे अखंड

गु०च०

८

ती॥ याकारणें क्षिती कष्टती॥ बहू दिवसपर्यंत॥ १२॥ ऐसें नव्हे विजाण॥ सत्यआयु
ष्य मनुष्यपण॥ करितीत पअनुष्ठान॥ शीघ्र पावती परमार्थी॥ १३॥ तेजन असती
ल ब्रह्मज्ञानी॥ पुण्य करितील जाणोनी॥ त्यासतुवां साह्य होउनी॥ वर्तत असें स
ने ब्रह्मा॥ १४॥ ऐको नि ब्रह्म याचें वचन॥ कली ह्मणतसे न मोन॥ स्वामीनीं निरो
पिले जे जन॥ तेचि माझे वैरी असती॥ १५॥ ऐसे वैरी जेथें असती॥ के विजाऊं त
या क्षिती॥ ऐकदां होय मज भीती॥ केवि पाहूं त यांसी॥ १६॥ पंचत्रात भूमंडळीं तें
भरतखंडीं पुण्य बहूत॥ मज मारितील देखात॥ केसा जाऊं ह्मणतसे॥ १७॥ ऐ

अ०
२

८

कोनि कलीचें वचन ॥ ब्रह्मा निरोपी हांसोन ॥ काळात्मयातें मिळोन ॥ तुवां जावें भूमी
सी ॥ ९८ ॥ काळात्म्याचे ऐसे गुण ॥ धर्मवासना करील छेदन ॥ पुण्यात्म्याचें अंतःक
रण ॥ उपजेल बुद्धी पापविषयीं ॥ ९९ ॥ कली ह्मणे ब्रह्मयासी ॥ वैरी सांगेन मज के
ही ॥ वसताति भूमंडळासी ॥ सांगेन स्वामी ऐकावें ॥ १०० ॥ उपद्रविती मातें बहुत ॥ के
पा न ये मज देखत ॥ जे जन त्रिवहरीध्यानतत ॥ धर्मरत मनुष्य देखा ॥ १ ॥ आणीक अ
सती माझे वैरी ॥ वास करिती गंगातीरीं ॥ आणीक वाराणशीपुरीं ॥ जाऊनि धर्म करिती दे
खा ॥ २ ॥ तीथैं हिंडती जे चरणें ॥ आणीक ऐकती पुराणें ॥ जे जन करिती सदां दानें ॥

ते चि माझे वैरी जाणा ॥ ३ ॥ ज्याचे मनीं वसे शांती ॥ ते चि माझे वैरी ख्याती ॥ अदांभी
१ कपणें पुण्य करिती ॥ त्यांसि देखतां भीत असें ॥ ४ ॥ नासाग्रीं दृष्टी देउनी ॥ जप करि
ती अनुष्ठानीं ॥ त्यांसि देखतां चि नयनीं ॥ प्राण माझा जातसे ॥ ५ ॥ स्त्रिया पुत्रां वरी प्री
ती ॥ माया पात्रीं आचरती ॥ त्यांवरी माझी बहू प्रीती ॥ परम इष्ट माझे जाणा ॥ ६ ॥ वेद
शास्त्रातें निंदिती ॥ हरिहरातें भेद पाहाती ॥ अथवा शिवविष्णू दूषिती ॥ ते परम आ
प्त माझे जाणा ॥ ७ ॥ जीतेंद्रिय असतील जे नर ॥ सदां भजती हरीहर ॥ रागद्वेषविव १
र्जित धीर ॥ त्यासि देखोनि मज भय ॥ ८ ॥ ब्राह्मणें कलियुगासी ॥ तुझे प्रकारें ब

हुवत्रीं ॥ तुवां जातां चि भूमीसी ॥ तुझेइछे राहाटतील ॥ ९ ॥ येरवादा विरळागत ॥ होईल न
रपुण्यवंत ॥ त्यातें तुवां साह्य होत ॥ वर्ततसें म्हणे ब्रह्मा ॥ १० ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन ॥
कलियुग करीतसे नमन ॥ करसंपुट जोडून ॥ विनवीतसे परियेसा ॥ ११ ॥ माझा दुष्ट स्व
भावेंसी ॥ केवि साह्य व्हावें धर्मासी ॥ सांगा स्वामी उपाव यासी ॥ कवणे परी राहाटावें ॥
१२ ॥ कलिचें वचन ऐकोनी ॥ ब्रह्मा हांसे अति गहनीं ॥ सांगतसे विस्तारोनी ॥ उपाय क
ळीसि राहाटावया ॥ १३ ॥ काळ कली असती दोनी ॥ तुज साह्य होउनी ॥ येत असती निर्गु
णीं ॥ ते चि दाविती तुज मार्ग ॥ १४ ॥ निर्मळ असती जे जन ॥ ते चि तुझे वैरी जाण ॥ मळमुत्रें जं

यासि वेष्टण ॥ तेतुझे इष्ट परियसें ॥ १५ ॥ याकारणें विरक्तागत ॥ होईल नर पुण्यवंत ॥
तेचि जिंकितील निश्चित ॥ बहुतेक तुज वश्य होती ॥ १६ ॥ ऐकोन ब्रह्मदेवाचें वचन ॥ क
लियुग करीतसे प्रश्न ॥ कैसे साधू अंतःकरण ॥ कवण असें निरोपावें ॥ १७ ॥ ब्रह्मा म्ह
णे तये वेळीं ॥ एकचित्तें ऐक कली ॥ सांगेन ऐका श्रोते सकळी ॥ सिद्ध म्हणे शिष्यासी
॥ १८ ॥ धैर्य धरोनि अंतःकरण ॥ शुद्ध बुद्ध वर्त्तती जन ॥ दोष न लगती कधीं जाण
॥ लोभवर्जीत नरासी ॥ १९ ॥ जे नर भजती हरिहरासी ॥ अथवा असती काशीनिवासी
गुरु सेविती निरंतरेंसी ॥ त्यांसि तुझा न लगे दोष ॥ २० ॥ मातापितासेवकासी ॥ अथवा

सेवी ब्राह्मणासी ॥ गायित्री कपिलाधेनूसी ॥ भजणारांसि न लगे दोष तुझा ॥ २१ ॥ वैष्ण
व अथवा शैवासी ॥ जे सेविती नित्य तुळशीसी ॥ आज्ञा माझी आहे ऐशी ॥ बाधूं न कोत
यासी ॥ २२ ॥ गुरुसेवक असती नर ॥ पुराणश्रवण करणार ॥ सर्वसाधन धर्मपर ॥ त्या
तें तुवां न बाधावें ॥ २३ ॥ स्मृ श्रुती शास्त्र पारायणासी ॥ गुरूतें सेविती वंशोवंशी ॥
विवेकें धर्म करणारांसी ॥ त्यातें तुवां न बाधावें ॥ २४ ॥ कलि ह्मणे ब्रह्मयासी ॥ गुरुम
हिमा अहे कैशी ॥ कवण गुरुस्वरूपें कैशीं ॥ विस्तारावें मज प्रती ॥ २५ ॥ ऐकोनि कली
चें वचन ॥ ब्रह्मा सांगतसे आपण ॥ गुकार ह्मणजे सिद्ध जाण ॥ रेफः पापस्य दाहकः ॥ २६ ॥

११ उकार विष्णुरव्यक्ता ॥ तृतीयात्मा श्रीगुरु सत्य ॥ ब्रह्मा गुरु निश्चित ॥ म्हणोनि सांगे कली
सी ॥ २७ ॥ गणेन्द्रातें म्हणती गुरु ॥ तैसाच असे वैश्वानरु ॥ ऐसाचि जाण शारंगधरु ॥ गु
रुद्राब्द वर्तें इतुके ठायीं ॥ २८ ॥ गणेन्द्रो विघ्ननाथ ॥ श्च विष्णुश्च सविता तथा ॥ वर्णद्वया
त्मको मंत्रो चतुर्मुक्ति प्रदायकः ॥ २९ ॥ गुरु आपुला मातापिता ॥ गुरु शंकरु निश्चिता
ईश्वरु होय जरी कोपता ॥ गुरु रक्षील परियेसा ॥ ३० ॥ गुरु कोपेल एकाद्यासी ॥ ईश्वर
नु राखे परियेसी ॥ ईश्वर कोपतां भरवसीं ॥ श्रीगुरु रक्षील निश्चयें ॥ ३१ ॥ श्लोक ॥ गुरु ११
ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुरेक परं तत्वं तस्माद्गुरु समाश्रयेत् ॥ ३२ ॥ टीका

गुरू ब्रह्मास सृजापूं॥ तोचि रुद्र महाविष्णू॥ गुरूचि तत्व कारणू॥ म्हणोनि गुरू आश्रा
वा॥ ३३॥ श्लोक॥ हरि प्रसन्नेपि च वैष्णवोजनाः संप्रार्थयंते गुरुभक्तिमव्ययां॥ गुरु प्र
सन्ने जगदीश्वरः सदा जनार्दनो तुष्यति सर्वसिद्धिदः॥ १३४॥ टीका॥ ईश्वर जरी प्रसन्न
होता॥ त्यासि गुरु होय ओळखता॥ गुरू आपण प्रसन्न होतां॥ ईश्वर होय आधीन आ
पुल्या॥ ३५॥ श्लोक॥ गुरुः सदा दर्शयिता प्रवृत्तिं तीर्थ॥ व्रतं योग तपादि धर्मान्॥ आ
चारवर्णादिविवेकयत्नां ज्ञानं पराभक्ति विवेकयुक्तं॥ ३६॥ टी०॥ याकारणें श्रीगुरूसी
भजावें म्हणस्लमार्मासी॥ तीर्थव्रत योग तपासी॥ ज्योतिस्वरूप असे जाणा॥ ३७॥ आम्वा

रू धर्मवर्णाश्रमासी ॥ विवेक धर्ममार्गासी ॥ भक्ती विरागयुक्तासी ॥ गुरूचि मार्गदाविणार
१२ ॥३८॥ इतुकें ऐकोनि कली आपण ॥ विनवीतसे कर जोडुन ॥ गुरु सर्वदेवांस मान ॥ कैवि
झाला सांग मज ॥३९॥ ब्रह्मा म्हणे कलीसी ॥ सांगेन तुज विस्तारेंसी ॥ येकचित्तें परिये
सीं ॥ गुरुवीण पर नाही ॥४०॥ श्लोक ॥ गुरोर्विनानश्रवणो भवेत्कस्यापि कस्यचित् ॥
विना कर्णेन शास्त्रस्य श्रवणं तत्कुतो भवेत् ॥ ४१ ॥ टीका ॥ गुरूवीण समस्तासी ॥ श्र
वण कैंचें परियेसी ॥ श्रवण होतां मनुष्यासी ॥ समस्त शास्त्रें ऐकती ॥ ४२ ॥ शास्त्र ऐ १२
कतां परियेंसी ॥ तरतील संसाराशी ॥ या कारणें गुरूचि प्रकाशी ॥ ज्योतिस्वरूप जाणावा ॥

॥४३॥ गुरुसेवितां सर्वसिद्धी ॥ होती पर्येसा नवनिधी ॥ कथा वर्तली अनादी ॥ अपूर्व तु
ज सांगेन ॥ ४४ ॥ पूर्वी गोदावरीचे तिरीं ॥ आंगिरस ऋषीचा आश्रम थोरी ॥ वृक्ष अ
सती नानापरी ॥ पुण्यनामें भगवसती ॥ ४५ ॥ ब्रह्मऋषी आदिकरुनी ॥ तप करिती त
यास्थानीं ॥ तयांत वेदधर्म म्हणूनी ॥ पैल पुत्र होता द्विज ॥ ४६ ॥ तया शिष्य बहू अ
सती ॥ वेदशास्त्र अभ्यासिती ॥ त्यांत दीपक म्हणोनि ख्याती ॥ शिष्य होता परियेसा
॥४७॥ होता शिष्य गुरुपरायण ॥ केला अभ्यास शास्त्रपुराण ॥ झाला असे अतिनि
पुण ॥ सेवा करितां श्रीगुरूची ॥ ४८ ॥ वेदधर्म एके दिनी ॥ समस्त शिष्यांसि बोलाउ ॥

नी॥ प्रसनसे संतोषोनी॥ ऐकाश्रोते एकचित्तें॥ ४९॥ बोलाऊनि त्रिष्यांसी॥ बो
लेगुरू परियेसीं॥ प्रीती असेल जरि आह्मासी॥ तरि माझें वाक्य परियेसा॥ १५०॥
त्रिष्य स्मरण तो गुरूसी॥ जेजें स्वामी निरोपिसी॥ तूं तारक आह्मासी॥ अंगिकारूं हा
भरवसा॥ ५१॥ गुरुचें वाक्य जो न करीं॥ तोचि पडे रौरव घोरीं॥ अविद्यामाया सा
गरीं॥ बुडोनि जाय तो नरू॥ ५२॥ मग तया कैंची गती॥ नरकीं पडे तो सततीं॥ गुरु
तारक हे ख्याती॥ वेदपुराणें बोलती॥ ५३॥ ऐकोनि त्रिष्याची वाणी॥ संतोषला वेद
धर्मसुनी॥ संदीपकातें बोलाऊनी॥ सांगतसे परियेसा॥ ५४॥ ऐका त्रिष्य सकलि

क॥ आमुचें पूर्वार्जीत असे एक॥ जन्मांतरी सहस्राधिक॥ केलीं होतीं महापातकें॥ ५५॥
आमुचें अनुष्ठान करितां॥ बहूत गेंले प्रक्षाळितां॥ काहीं शेष असे आतां॥ भोगिले या
वांचूनि न सुटे जाण॥ ५६॥ तया सामर्थ्यें उपेक्षा करितों॥ पाप मोक्षा आड रिघतो॥ या
विकारणें निष्कृती करितें॥ तया पाप घोराशी॥ ५७॥ न भोगितां आपुल्या देहीं॥ आ
पुलें पापा निष्कृती नाहीं॥ हा निश्चय जाणो निपाहीं॥ भोगावें आह्मी परियेसा॥ ५८
या पापाचे निष्कृतीसी॥ जावें आह्मी वाराणशीसी॥ जाईल पाप शीघ्रेंसी॥ प्रख्या
त असे अखिल शास्त्रीं॥ ५९॥ याकारणें आत्मासी॥ न्यावें पुरी वाराणशीसी॥ पाप

भोगीनस्वदेहासी ॥ मातेंनुस्रीसांभाळावें ॥ ६० ॥ यासमस्तस्त्रियांत ॥ कवणअसे
लसामर्थ्यवंत ॥ अंगिकारावेंचरित ॥ ह्मणोनिपुसेस्त्रियासी ॥ ६१ ॥ तयास्त्रियां
मध्येएक ॥ नामअसेसंदीपक ॥ बोलतसेअतिविवेक ॥ तयागुरुप्रतिदेखा ॥ ६२ ॥
दीपकह्मणेगुरूसी ॥ पापकरितांदेहनासी ॥ नकरावासंग्रहोदुःखासी ॥ शीघ्र
कराप्रतीकारु ॥ ६३ ॥ वेदधर्मह्मणेतयासी ॥ दृढदेहअसतांमनुष्यासी ॥ क्षाल
नकरावेंपापासी ॥ पुढतीवाढेविषापरी ॥ ६४ ॥ अथवातीर्थीप्रायश्चित्तें ॥ आपु
लेदेहींभोगोनिखरितें ॥ पापावेगळेंनव्हतांनिरुतें ॥ मुक्तीनव्हेआपणासी ॥ ६५ ॥

देवअथवाऋषेश्वरासी॥ मनुष्यादिज्ञानवंतासी॥ क्षालनहोयपापासी॥ आपुलेंआ
पणभोगितां॥ ६६॥ दीपकह्मणेगुरूसी॥ स्वामीनिरोपावेंआपणासी॥ सेवाकरीतसेंस्व
रात्रीसी॥ नकरितांअनुमानसांगिजे॥ ६७॥ ऐकोनिदीपकाचेंवचन॥ वेदधर्मह्मणेआप
ण॥ कुष्ठैंहोईलआंगहीन॥ अंधकपांगूळपरियेसा॥ ६८॥ संवत्सरएकविंशात॥ मातेंसां
भाळावेंबहुतू॥ जरअसेलदृढव्रत॥ अंगिकारावीतुह्मीसेवा॥ ६९॥ दीपकह्मणेश्रीगु
रूसी॥ कुष्टीहोईनआपणहर्षी॥ अंधत्वएकवीसवर्षी॥ पापनिष्कृतीकरावी॥ ७०॥
तुमचीसेवानिगुती॥ मीकरीनानिश्चिती॥ स्वामीनिरोपावेंत्वरिती॥ ह्मणूनिचरणासिलाग

ला ॥ ७१ ॥ ऐकोनि शिष्याचीवाणी ॥ संतोषला वेदधर्ममुनी ॥ सांगतसे विस्तारोनी ॥ तयापा
पलक्षणें ॥ ७२ ॥ आपुलें पापच आपणासी ॥ नव्हती पुत्र शिष्यासी ॥ नभोगितों स्वदेहासी ॥
नवेंचे पाप परियेसा ॥ ७३ ॥ याकारणें आपण देखा ॥ भोगीन आपुले पापदुःखा ॥ सांभाळीं
मज तूं संदीपका ॥ एकवीस वरुषें पर्यंत ॥ ७४ ॥ जे पीडती रोगें देखा ॥ प्रतिपाळणारासि क
ष्ट अधिका ॥ मजहूनि संदीपका ॥ तूतें कष्ट अधीक जाणा ॥ ७५ ॥ याकारणें आपुले देहीं ॥
भोगीन पाप निश्चयीं ॥ तुवां प्रतिपाळावें पाहीं ॥ काशीपुरा नेऊनियां ॥ ७६ ॥ तयाको
शीपुरीं जाण ॥ पापावेगळा होऊन ॥ आपण शाश्वतपद पावेन ॥ तुज करितां शिष्योत्तमा ॥ ७७ ॥

दीपकह्मणेगुरूसी॥ अवश्ययेईनपुरीकाशी॥ सेवाकरीनएकवीसवर्षीं॥ विश्वनाथसमक्षु
म्वी॥७८॥ ब्रंह्मदेवह्मणेकलियुगासी॥ कैसाहोताशिष्यत्यासी॥ कुष्ठहोतांचिगुरुसी॥ ने
लेंकाशीमणिकर्णिके॥७९॥ एकाउत्तरदेशी॥ कमळेश्वरसंनिधेसी॥ राहिलेतेथेंपरियेसीं॥
गुरुशिष्यदोघेजण॥८०॥ स्नानकरूनिमणिकर्णिकेसी॥ पूजाकरितीविश्वनाथासी॥
प्रारब्धभोगत्यागुरूसी॥ भोगीनहोतातयास्थानी॥ कुष्ठरोगझालाबहुत॥ अक्षिहीन
अतिदुःखित॥ संदीपकसेवाकरित॥ अतिभक्तीकरूनियां॥८२॥ व्यापिलादेहकुष्ठेंबहुत॥
पूकृमीपडेरक्त॥ दुःखेंव्यापलाअत्यंत॥ अपस्मारीझालाजाणा॥८३॥ भीक्षामागोनिसं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दीपक॥ गुरूसि आणूनि देत नित्येक॥ करीं पूजा भावें एक॥ विश्वनाथस्वरूप म्हणतसे॥ ८४॥ रोगें

करूनि पीडितां नरू॥ साधूजन न होती क्रूरु॥ तोचि द्वीज द्विजवरु॥ होय क्रूर एकादे वेळीं॥ ८५॥ भीक्षा

आणितां एकादे दिवसीं॥ न जेवी श्रीगुरू कोपेंसी॥ स्वल्प आणिलें म्हणोनि क्लूत्रीं॥ सांडूनि देत

भूमीवरी॥ ८६॥ येरे दिवसीं जाऊनि त्रिष्य॥ आणि अन्नें बहू वस॥ मिष्टान्न न आणी म्हणोनि

क्लूनू॥ करिता आला परियेसा॥ ८७॥ परोपरीचें पक्वान्न॥ कां नाणि त्रीस म्हणे जाण॥ कोपें म

रूये आपण॥ ह्याका परोपरी मागतसे॥ ८८॥ जितुकें आणी मागोनियां॥ सर्वस्विं करीतसे वा

यां॥ कोपें देत त्रिविया॥ परोपरी परियेसा॥ ८९॥ एकादे समयीं त्रिष्यासी॥ म्हणे तात ज्ञान रा

सी॥ मजनिमित्य कष्टलासी॥ शिष्यराया शिखामणी॥१०॥ सवेंचि म्हणत वचनें क्रूर॥ माते
गांजिलें अपार॥ तूं आमुचें विष्टामूत्र॥ क्षणक्षणा धूत नाहीं॥११॥ खाताति मज मक्षिका॥ कों
न निवारिशी संदीपका॥ सेवा करितां म्हणे ऐका॥ भीक्षा नाणिशी म्हणतसे॥१२॥ याकारणें
पापगुण॥ ऐसेचि असती जाण॥ वोखट वाक्य निर्गुण॥ पाप म्हणोनि जाणावें॥१३॥ पाप
असेल जेथें बहुत॥ दैन्य मागें सेवा करित॥ शुभाशुभ नेणे क्वचित॥ पापरूप जाणावें॥१४॥
एकादे दैन्य काशी॥ दुःख प्राप्त होती कैशी॥ अपस्मारी होय सहशी॥ पापरूप तोचि जाणा
॥१५॥ समस्त रोग असती देखा॥ कुष्ट सोळा भागनक्ती कां॥ वेद धर्म द्विज ऐका॥ कष्टतसे ये

णेपरी ॥ १६ ॥ ऐसे गुरूचे गुणदोष ॥ मनांत न आणी तो शिष्य ॥ सेवा करी एक मानस ॥ तो
चि ईश्वर म्हणतसे ॥ १७ ॥ जैसें जैसें मागे भजू ॥ आणूनि देतसे परिपूर्ण ॥ जैसा विश्वेश्वर
कां विष्णू ॥ तैसा गुरू म्हणतसे ॥ १८ ॥ काशीक्षेत्र थोर असतां ॥ न करी कदा तीर्थयात्रा ॥ न जा
य देवदर्शना सर्वथा ॥ गुरुसेवे वांचुनी ॥ १९ ॥ श्लोक ॥ न तीर्थयात्रा न च देवयात्रा न देहया ॥
त्रा न च अन्ययात्रा ॥ अहिर्निशी ब्रह्महरिःस्वबुध्यो गुरू ॥ प्रसन्नो न हि सेव्यमानतू ॥ २०० ॥
ढीण ॥ आपुलें देह संरक्षण ॥ कधीं न करी शिष्य जाण ॥ लयलाउनि श्रीगुरूचरण ॥ कव
णासवें न बोलेची ॥ १ ॥ अहोरात्र येणेपरी ॥ ब्रह्मा शीव म्हणे हरी ॥ गुरूचि होय निर्धारी ॥

ह्मणोनि सेवा करीतसे ॥ २ ॥ गुरू बोले निष्ठुरेंसी ॥ आपण मनीं संतोषी ॥ जेजें त्याचे मानसीं ॥ पाहि
जे तैसें वर्ततसे ॥ ३ ॥ वर्ततां येणे परी देख ॥ प्रसन्न होऊनि विनायक ॥ उभा येवोनि सन्मुख ॥ वर मा
ग ह्मणतसे ॥ ४ ॥ अहो गुरुभक्त संदीपका ॥ महाज्ञानी कुळदीपका ॥ तुष्टलों तुझे भक्तीसि ए
का ॥ प्रसन्न झालों माग आतां ॥ ५ ॥ दीपक ह्मणे ईश्वरासी ॥ हे मृत्युंजय व्योमकेशी ॥ न पुस
तां आह्मी गुरूसी ॥ वर नेघों सर्वथा ॥ ६ ॥ ह्मणोन गेला गुरूपासीं ॥ विनवीतसे तयासी ॥ वि
श्वनाथ आज्ञासी ॥ प्रसन्न व्हावया आला असे ॥ ७ ॥ निरोप झालिया स्वामीचा ॥ मागेन उप
शम व्याधीचा ॥ वर होतां सदाशिवाचा ॥ बरवें होईल ह्मणतसे ॥ ८ ॥ ऐकोनियां द्विज्याचें व

चन॥ बोले गुरू कोपायमान॥ माझे व्याधीनिमित्त जाण॥ न को प्रार्थूं ईश्वरासी॥ ९॥ भोगिल्या
वांचोनि पातकासी॥ निवृत्ति नव्हे गा परियेसीं॥ जन्मांतरीं बाधिती निश्चयेंसी॥ धर्मज्ञा स्त्रीं असे
जाणा॥ १०॥ मुक्तीअपेक्षा ज्याचे मनीं॥ तेणें करावी पायाधुणी॥ दोष राहाता निर्गुणी॥ विघ्न
करितील मोक्षासी॥ ११॥ ऐसे द्विजा यापरी शिष्यासी॥ गुरु सांगे परियेसी॥ निरोप मागोनि त्वरेसी॥
गेला ईश्वरासन्मुख॥ १२॥ जाऊनि सांगे ईश्वरासी॥ न लगे वर आपणासी॥ न ये गुरूचे मा
नसीं॥ केवि घेऊं म्हणतसे॥ १३॥ विस्मयो करोनि व्योमकेशी॥ गेला निर्वाणमठापासीं॥ बोला
ऊनि समस्त देवांसी॥ सांगे वृत्तांत विष्णुपुढें॥ १४॥ श्री विष्णु म्हणे शंकरास॥ ऐसा कोण असे

शिष्य ॥ कोठें त्यांचा रहिवास ॥ सांगावें मज विस्तारें ॥ १५ ॥ सांगे ईश्वर विष्णूसी ॥ आश्चर्य देखि
लें परियेसी ॥ दीपक शिष्य निश्चयेंसी ॥ गुरुभक्त असे जाणा ॥ १६ ॥ गोदावरी तीरवासी ॥ वेदधर्म
ह्मणिजे तापसी ॥ त्याची सेवा अहिर्निशी ॥ करितो भावें एकचित्तें ॥ १७ ॥ नाहीं त्रिलोकीं देखिला
कोणी ॥ गुरुभक्ती करणार निर्गुणी ॥ त्यातें देखोनि माझे मनीं ॥ अती प्रीती वर्ततसे ॥ १८ ॥ वरदे
ईन ह्मणे आपण ॥ गेलों होतों तयाजवळी जाण ॥ गुरुचा निरोप नाहीं ह्मणोन ॥ न घे वर परिये
सा ॥ १९ ॥ अनेक दिव्य सहस्र वर्षी ॥ तप करिती महाऋषी ॥ वर मागती अहिर्निशी ॥ नानाकष्ट
करोनियां ॥ २० ॥ तैशा तापसी योगियासी ॥ न के मन वर द्यावयासी ॥ बलात्कारें देतां तयासी ॥ व

गु॰च॰ अ॰ २

१७ रने घेतो दीपक ॥ २१ ॥ तनमन समर्पूनि श्रीगुरूसी ॥ सेवा करितो संतोषीं ॥ त्रयमूर्ती ह्मणूनि त
यासी ॥ निश्चयो केला असे देखा ॥ २२ ॥ समस्त देव मातापिता ॥ गुरूचि असे तत्वता ॥ निश्चयो
केला असे चित्ता ॥ गुरु परमात्मा ह्मणोनी ॥ २३ ॥ किती ह्मंणूनि वर्णूं त्यासी ॥ अविद्या अंधका
रासी ॥ छेदिता दीपक परियेसीं ॥ कुळदीपक नाम सत्य ॥ २४ ॥ धर्मज्ञान सर्व एका ॥ गुरुचि ह्म
णो कुळदीपक ॥ चरणसेवा मनःपूर्वक ॥ करितो गुरूचि भक्तीनें ॥ २५ ॥ इतुकें ऐकोनि ज्ञा
ईं धरू ॥ पाहावया शिष्य गुरू ॥ त्यांचा भक्ति प्रकारु ॥ पाहत येवेळीं ॥ २६ ॥ सांगीतलें विश्व १७
नाथें ॥ त्याहूनि दिसे अधीक तेथें ॥ संतोषोनि दीपकातें ॥ ह्मणे विष्णू परियेसा ॥ २७ ॥ बाला

ऊनि दीपकासी ॥ ह्मणतसे हृषीकेशी ॥ तुष्टलों तुझे भक्तीसी ॥ वर माग ह्मणतसे ॥ २८ ॥ दीपक
ह्मणे विष्णूसी ॥ काय भक्ती देखोनि आह्मासी ॥ वर देतोसि परियेसी ॥ कवण कार्या
सांग मज ॥ २९ ॥ लक्ष कोटी सहस्र वरुषीं ॥ तप करिती अरण्यवासी ॥ त्यासि करितोसि
उदासी ॥ वरु न देशी नारायणा ॥ ३० ॥ मीं तरि तुज भजत नाहीं ॥ तुझें नाम स्मरत नाहीं
बळात्कारें येवोनि पाहीं ॥ केवि देशी वर मज ॥ ३१ ॥ ऐकोन दीपकाचें वचनु ॥ संतोषला
महाविष्णु ॥ सांगतसे विस्तारूनु ॥ तया दीपकाप्रति देखा ॥ ३२ ॥ गुरुभक्ती करिशी निर्वाणेंसी ॥ ह्मणोनि आह्मी जाहालों संतोषी ॥ जे भक्ती केली त्वां गुरूसी ॥ तेचि आह्मासी पा

२०

वळी॥ ३३॥ जो नर असेल गुरुभक्त जाण॥ तोचि माझा जीवप्राण॥ त्यासि वश्य झालें
आपण॥ जें मागेल तें देतों तया॥ ३४॥ सेवा करी मातापिता॥ ते पावे मज तत्वता॥ पति
सेवा स्त्रिया करितां॥ तेही मज पावतसे॥ ३५॥ एकाद्या भल्या ब्राह्मणासी॥ यती यो
गेश्वर तापसी॥ करिती नमन भक्तीसी॥ तेंचि मज पावे जाण॥ ३६॥ ऐसें ऐकोनि दी
पक॥ नमिता जाहला आणिक॥ विनवीतसे देख॥ ह्मणे सिद्ध नामधारका॥ ३७
ऐक विष्णू हृषीकिशी॥ निश्चयो असा माझे मानसीं॥ वेद शास्त्र मिमांसादिकासी
देणार गुरु आह्मासी॥ ३८॥ गुरुपासूनि सर्व ज्ञान॥ त्रयमूर्तीहि ती आह्मा आधी

न॥ आमुचा गुरू त्रिदेव जाण॥ अन्यथा नाहीं जाणपां॥ ३९॥ सर्वदेव सर्वतीर्थ॥ गु
रू त्रि आत्मा असे सत्य॥ त्या चेनि आत्मा परमार्थ॥ काय दूर असे सांगा॥ ४०॥ स
मस्त योगीसि ध्यजन॥ गुरु वांचूनि न होती सज्ञान॥ त्याने होतो ईश्वर आपण॥
केवि दूर असे सांगा॥ ४१॥ जो वर द्याल तुम्ही मज॥ श्रीगुरू देतो काय वोज॥
या कारणें श्रीगुरुराज॥ भजतसें परियेसा॥ ४२॥ संतोषोनि नारायण॥ म्हणे ध
न्य धन्य माझा प्राण॥ तूं त्रिविध्य त्रिसेरत्न॥ बाळक तूं त्रि आमुचा॥ ४३॥ का
हीं तरी माग आतां॥ वर देयीन तत्वता॥ आला होता विश्वनाथा॥ दुसरेन वर द्यावया

गु० च०

२१

अ०
२

समीआलों ॥ ४४ ॥ आमुचे मन संतोषी ॥ वर माग जो तुझे मानसीं ॥ तुज वश्य झालों
निर्धारेंसी ॥ जें पाहिजे तें देईन आतां ॥ ४५ ॥ दीपक ह्मणे विष्णूसी ॥ जरी वर तूं आह्मां देसी
॥ भक्ती श्रीगुरुची अधीक होय मानसीं ॥ ऐसे ज्ञान मज द्यावें ॥ ४६ ॥ गुरूचे रूप आ
पण वोळखवें ॥ ऐसें ज्ञान देईं स्करवें ॥ यापरतें नु मागें निकें ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥
४७ ॥ दिधला वर त्या ईं पाणी ॥ संतोषोनि बोले वाणी ॥ अरे दीपका शिरोमणी ॥ तूं मा
झा प्राण सखा होसी ॥ ४८ ॥ तुवां बळखिलें गुरूसी ॥ देखिलें दृष्टी परब्रह्मासी ॥ आ
णीक जरी आह्मा पुससी ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ४९ ॥ लौकीक स्वबुद्धी होय जे

२१

शी ॥ धर्माधर्मस्त्र मनें तैं त्रुटीं ॥ उच्छिष्टाहूनि उच्छिष्टेंसी ॥ स्तुती करी गो अहिर्निशी ॥
५० ॥ जे जे समयीं श्रीगुरूसी ॥ तूं भक्तीनें स्तुती करीसी ॥ तेणें आह्मी होऊं संतोषी ॥ ते
चि आमुची स्तुती जाणा ॥ २५१ ॥ वेद वाचिती सांगेसी ॥ वेदांत भाष्य अहिर्निशी ॥
वाचिती जन उच्छिष्टेंसी ॥ आज्ञा पावेनि धरीं ॥ ५२ ॥ बोलती वेदसिद्धांत ॥ गुरू
चि ब्रह्म असें ह्मणत ॥ याच कारणें गुरु भजतां सत्य ॥ सर्व देवता तुज वश्य ॥ ५३ ॥
गुरू ह्मणिजे अक्षरें दोन ॥ अमृताचा समुद्र जाण ॥ तया मध्यें बुडतां क्षण ॥
केवि होय परियेसा ॥ ५४ ॥ जयाचे हृदयीं गुरुस्मरण ॥ तोचि त्रयलोकीं पूज्य जा

ण॥ अमृतपान सदां गुण॥ तोचि शिष्य अमर होय॥ ५५॥ श्लोक॥ यदा मम शिव
स्यापि ब्रह्मणो ब्राह्मणस्य हि॥ अनुग्रह भवेन्नृणां सेव्यते सद्गुरुस्तदा॥ ५६॥ टीका
आपण अथवा ईश्वरू॥ ब्रह्मा जरी देता वरू॥ तद्वतु फलदाता गुरू॥ गुरू त्रयमूर्ती
याचि कारणें॥ ५७॥ ऐसा वरे दीपकासी॥ दिधला विष्णूने परियेसी॥ ब्रह्मा सांगे क
लीसी॥ एकचित्तें परियेसा॥ ५८॥ वर लाधोनि दीपक॥ गेला गुरूचे सन्मुख॥ पुस
तसे गुरू ऐक॥ तया शिष्या दीपकासी॥ ५९॥ ऐक शिष्या कुळदीपका॥ काय दिधले
वेकुंठनायका॥ विस्तारेनि सांगेनि का॥ माझें मन स्थीर होय॥ ६०॥ दीपक म्हणे गु

रूसी ॥ वर दिधला हृषीकेशी ॥ म्या मागीतलें तयासी ॥ गुरुभक्ती व्हावी ह्मणोनियां ॥ ६१ ॥
गुरूचीसेवा तत्परें सी ॥ अंतःकर्ण दृढें सी ॥ वर दिधला संतोषीं ॥ दृढ भक्ती माझी तुमचे च
रणीं ॥ ६२ ॥ संतोषोनि श्रीगुरु ॥ प्रसन्न झाला साक्षात्कारु ॥ जीवित्वें होय तूं स्थीरू ॥ का
शीपुरीं वास करीं ॥ ६३ ॥ तुझे वाक्यें सर्व सिद्धी ॥ तुझे घरीं नवनिधी ॥ विश्वनाथ तुझे
स्वाधी ॥ म्हणे गुरू संतोषोनी ॥ ६४ ॥ तुझें स्मरण जे करिती ॥ त्यांचे कष्ट निवारण
होती ॥ श्रियायुक्त नांदती ॥ तुझे स्मरण मात्रें सी ॥ ६५ ॥ येणेपरी शिष्यासी ॥ प्रसन्न
झाला परियेसीं ॥ दिव्यदेह झाला तत्क्षणें सी ॥ झाला गुरु वेदधर्म ॥ ६६ ॥ शिष्याच्या

पाहावयावास ॥ कष्टी झाला महाक्लेशा ॥ तो तापसी अति विशेष ॥ त्यासि कैंचें पापरा
हे ॥ ६७ ॥ लोकानुग्रह करावयासी ॥ गेला होता तापसी ॥ काशीक्षेत्र महिमा ऐशी ॥
पाप जाय सहस्र जन्मीचें ॥ ६८ ॥ नया काशीनगरांत ॥ धर्म अथवा अधर्मरत ॥ वास
करिती कवचित ॥ पूर्वजन्म नाहीं जाण ॥ ६९ ॥ स्कत म्हणे ऋषेश्वरासी ॥ येणे प्रकारें क
लीसी ॥ सांगे ब्रह्मा परियेसीं ॥ शिष्य दीपक आख्यान ॥ ७० ॥ सिध्य म्हणे नामकरणी
॥ दृढ मन असावें याचि गुणी ॥ तरीच तरे भवार्णी ॥ गुरुभक्ति असे येणे विधी ॥ ७१ ॥
श्लोक ॥ यत्र यत्र दृढा भक्तिर्यदा कस्य महात्मनः ॥ तत्र तत्र महोदेवो प्रकाशमुपग

च्छति ॥ ७२ ॥ ठी० ॥ जरि भक्ती असे दृढदेंसी ॥ त्रिकरणसह मानसीं ॥ तोचि लाधे ई
श्वरासी ॥ ईश्वर होय तयावश्य ॥ ७३ ॥ गंगाधराच्चा नंदन ॥ श्रोतयांसि करीनम
न ॥ न म्हणावे न्यून पूर्ण ॥ माझे बोबडे बोलसी ॥ ७४ ॥ इति श्री गुरुचरित्र परम
कथाकल्पतरु श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधारकसंवादे त्रिव्यदी
पकाख्यानन्नाम द्वितीयोध्यायः ॥ २ ॥ श्रीदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७

श्रीगणेशायनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ यापरीसिध्यमुनी॥ सांगताझालाविस्तारोनी॥
संतोषोनिनामकरणी॥ विनवीतसेमागुती॥ १॥ जयजयाजीसिध्यमुनी॥ तारकतूंआ
म्हांलागुनी॥ संदेहहोतामाझेमनीं॥ आजितुवांकडेकेलों॥ २॥ तुझेनिसर्वखेळाधलें
आनंदजळींबुडालें॥ परमतत्वजोडलें॥ आजिचेनी॥ ३॥ ऐसेंश्रीगुरुमहिमान॥
निरोपिलेंतुवांज्ञान॥ आनंदमयमाझेंमनु॥ तुझेनिधर्मेंस्वामिया॥ ४॥ कवणेठायीं
तुमचावास॥ नित्यतुम्हांकोठेंग्रास॥ होईनआतांतुझादास॥ म्हणोनिचरणालाग
ला॥ ५॥ कृपानिधीसिध्धमुनी॥ तयाशिष्याआलिंगोनी॥ आशीर्वचनदेऊनी॥ सांगे

आपुलावृत्तांत॥६॥जेजेस्थानींहोतेगुरु॥तेथेंअसतोचमत्कारु॥पुसन्नीजरीआलाआहारु॥
गुरुस्मरणनित्यजाण॥७॥श्रीगुरुचरित्रमहिमान॥तेंचआत्माअमृतपान॥सदांसेवितोंयाचे
गुण॥ह्मणूनिपुस्तकदाविलें॥८॥भुक्तिमुक्तीपरमार्थ॥जेजेंवांछिजेमनांत॥तेतेंसाध्यहोयत्व
रिता॥गुरुचरित्रऐकतां॥९॥धनार्थीयासिअक्षय्यधन॥पुत्रपौत्रादिगोधन॥कथाऐकतां
होयजाण॥ज्ञानसिंधीतत्काळ॥१०॥जेभक्तीनेंनेमस्तएक॥पढतीऐकतीभक्तलोक॥काम्य
होयतत्काळिक॥निपुत्रिकांपुत्रहोती॥११॥ग्रहरोगादिपीडण॥नहोतव्याधीकधींजाण॥जरी ॥१॥
मृत्युच्याअसेलबंधन॥त्वरितसुटेऐकतां॥१२॥ज्ञानवंतज्ञातायुषी॥ऐकतांहोयभरवसीं॥

ब्रह्महत्यादि पापें नासी ॥ एकचित्तें ऐकतां ॥ १३ ॥ इतुकें ऐकोनिया अवसरी ॥ नामधारक नम
स्कारी ॥ स्वामी मातें तारिं तारीं ॥ कृपानिधे सिद्धमुनी ॥ १४ ॥ साक्षात्कारें गुरुमूर्ती ॥ भेटलासि तूं
जगज्जोती ॥ हो तीवासना माझे चित्तीं ॥ गुरुचरित्र ऐकावें ॥ १५ ॥ एकादा तृषेनें पीडित ॥ जात
असतां मार्गस्त ॥ त्यासि आणून देती अमृत ॥ तयापरी तूं मज भेटलासी ॥ १६ ॥ गुरुचा महिमा
ऐकौं कानीं ॥ सांगिजे स्वामी विस्तारोनी ॥ अंधःकार असतां रजनी ॥ सूर्योदया परि करीं ॥ १७ ॥
इतुकिया अवसरी ॥ सिद्ध योगी अभय करीं ॥ धरोनियां सवे करीं ॥ घेवोनि गेला स्वस्थाना ॥
१८ ॥ असे ठाव ज्ञानपंथीं ॥ कल्पवृक्ष अश्वत्थीं ॥ बैसोनि सांगे ज्ञानज्योती ॥ ऐकत्रि ध्यानामधा

रका॥१९॥नेणसीसोयगुरुदास्यका॥याचिकारणेंउपबाधका॥होतीतुजअनेका॥चिंताकुळा
घडतीतुजा॥२०॥वोळखावयागुरुमूर्त्तीसी॥आपलाआचारपतियेसीं॥दृढभक्तीधरोनिमान
सीं॥वोळखिजेमगश्रीगुरु॥२१॥ऐकोनिसिध्याचेंवचन॥संतोषेनामधारकसगुण॥क्षणक्ष
णाकरीनमन॥करुणावचनेंकरुनियां॥२२॥मीसंसारसागरींबुडालों॥तापत्रयाग्नितपो
ळलों॥क्रोधादिजळचरींनाडलों॥अज्ञानजाळेंवेष्ठनियां॥२३॥ज्ञानतारवींबैसउनी
कृपेचावायूपालाणुनी॥देहतारककरुनी॥तारींवेंमातेंस्वामिया॥२४॥ऐसियाकरुणा
वचनीं॥विनवीतसेनामकरणी॥मस्तकसिध्याचियाचरणीं॥ठेविताझालापुनःपुनः॥२५॥

तव बोलिला सिद्धमुनी ॥ न धरीं चिंता अंतःकरणीं ॥ उठवीन तसे अश्वासोनी ॥ सांकडें फेडीन
तुझें आतां ॥२६॥ ज्यांसि नाहीं दृढ भक्ती ॥ सदां दैन्यें कष्टती ॥ श्रीगुरुवरी बोल ठेविती ॥ अवि
द्यामायावेष्टुनीं ॥२७॥ संन्नाय धरोनि मानसीं ॥ श्रीगुरु काय देईल लस्मणत्री ॥ त्ते पोंगु पोंह्वाभो
गभोगित्री ॥ नानाकष्टें आकुळित ॥२८॥ सांडोनि संन्नाय निर्धारी ॥ गुरुमूर्त्ति देईल अपारी
ऐसा देव कृपासागरी ॥ तुज न उपेक्षी सर्वथा ॥२९॥ गुरुमूर्त्ती कृपासिंधु ॥ मख्यात असे
वेदांतबोधु ॥ तुझे अंतःकरणीं वेधू ॥ असे तयाचरणावरी ॥३०॥ तो दातार अखिल म
ही ॥ जैसा मेघास्वा गुण पाहीं ॥ पर्जन्य पडतो सर्वा ठायीं ॥ कृपासिंधु ऐसा असे ॥३१॥

यांतचिपात्रानुसार॥सांगेनसाक्षीएकथोर॥सखोलभूमीउदकस्थीर॥उन्नतीउद
कनाहींजाणा॥३२॥दृढभक्तीजाणासखोलभूमी॥दांभीकओळखाउन्नततुम्ही॥या
चिकारणेंमनोकर्मी॥निश्चयावेंश्रीगुरूसी॥३३॥म्हणोनिश्रीगुरुउपमा॥ऐसोकव
णाअसेमहिमा॥प्रंपंचहोयपरब्रह्मा॥हस्तमस्तकेंकरूनियां॥३४॥कल्पतरूसिद्धा
वीउपमा॥कल्पिलेंलाभेत्यांच्यामहिमा॥नकल्पितांपुरवीकामा॥कामधेनूश्रीगु
रू॥३५॥ऐसाश्रीगुरूपरब्रह्ममूर्ती॥ख्यातीअसेश्रुतीस्मृती॥संदेहसांडूनियेक
चित्तीं॥ध्यायपदांबुजश्रीगुरूचे॥३६॥ऐतुकेंपरिसोनिनामधारक॥नमनकेलेंनिक्ष

णेका ॥ करसंपुट जोडूनि ऐका ॥ विनवीतसे सिद्धासी ॥ ३७ ॥ श्रीगुरू सिद्धयोगेश्वरा ॥
कामधेनू रूपा सागरा ॥ विनवीतसे अवधारा ॥ सेवक तुमचा स्वामिया ॥ ३८ ॥ स्वामीनीं
निरूपिलें सकळ ॥ झालें माझें मन निर्मळ ॥ वेधला गला असे केवळ ॥ चरित्र श्रीगुरू
चें ऐकावया ॥ ३९ ॥ गुरुत्रय मूर्ती ऐकोंकानीं ॥ कां अवतरले मनुष्ययोनी ॥ सर्व सां
गावें विस्तारोनी ॥ म्हणोनि चरणीं लागला ॥ ४० ॥ मग काय बोले योगेंद्रू ॥ बारे शि
ष्या तूं पूर्णचंद्रा ॥ माझा बोधसमुद्रा ॥ केसा तुवां उत्साहविला ॥ ४१ ॥ तूतें महासुख
लाधलें ॥ गुरुदास्यत्व फळलें ॥ परब्रह्म अनुभविलें ॥ आजिचेनि तुज आतां ॥ ४२ ॥

हिंडत आलोसि सकळ क्षिती॥ कवणा न व्हे ऐसी मती॥ गुरुचरित्र न पुससी॥ तूतें दोखिलें
आजि आली॥ ४३॥ ज्यासि ईह परत्रीं चीचाड॥ त्यासि हे कथा असे गोड॥ त्रिकरणें करोनि
या दृढ॥ एकचित्तें ऐकिजे॥ ४४॥ तूं भक्त केवळ श्रीगुरूचा॥ म्हणोनि भक्ती जाहाली ऊं
चा॥ निश्चयो मानी माझिया वाचा॥ लाधसी चारी पुरुषार्थ॥ ४५॥ धनधान्यादि संप
ती॥ पुत्रपोत्र श्रुती स्मृती॥ इह सौख्य आयुष्य गती॥ अंतीं गती असे जाणा॥ ४६॥ गु
रुचरित्र कामधेनु॥ वेदशास्त्रसंमत जाणू॥ अवतरला त्रयमूर्ती आपणू॥ धरोनि न
र वेषा कलियुगीं॥ ४७॥ कार्याकारण अवतार॥ होऊनि येती हरिहर॥ उतरावया भूमी

भारा॥ भक्तजनानें तारावया॥ ४८॥ ऐको निसिद्धाचें वचना॥ प्रश्न करी शिष्यराणा॥ त्रय
मूर्त्ती भवतार किंकारणा॥ देह धरोनि मानुषी॥ ४९॥ विस्तारूनि तें आह्मासी॥ सांगा स्वा
मी हृपेसी॥ ह्मणोनि लागल्याचरणासी॥ करुणावचनें करोनियां॥ ५०॥ सिध्द ह्मणे नाम
धारका॥ त्रयमूर्त्तीचि तीन गुण ऐका॥ आदि वस्तू आपण येका॥ प्रपंच मूर्त्ती तीन जाणा॥
५१॥ ब्रह्मयाचा रजोगूण॥ सत्वगूण विष्णू जाण॥ तमोगूण उमारमण॥ मूर्त्ती एक
चि अवधारा॥ ५२॥ ब्रह्मा सृष्टी रचनेसी॥ पोषक विष्णू परियेसी॥ रुद्र मूर्त्ती प्रळया
सी॥ त्रयमूर्त्तीचि तीन गुण॥ ५३॥ येका वेगळे एक न होती॥ कार्या कारण अवतार होती॥

भूमीचाभारफेडिती॥प्रख्यातअसेपुराणीं॥५४॥सांगेनसाक्षआतांतुज॥अंबऋषीम्हणिजेद्विज
एकादशीव्रताचियेकाय॥विष्णूसिअवतारकरविले॥५५॥अवतारव्हावयाकारण॥सांगेनतु
जलाविस्तारून॥मनकरोनिसावधान॥येकचित्तेंपरियेसा॥५६॥द्विजकरीएकादशीव्रत॥
पूजाकरीअभ्यागता॥निश्चयोकरीदृढचित्ता॥हरिच्चिंतनसार्वकाळ॥५७॥असोत्याचियाव्र
तासी॥भंगकरावयाआलाऋषी॥अतीतहोऊनिहटेंसी॥पावलामुनीदुर्वास॥५८॥तेदिव
सींसाधनद्वादशीघडीएक॥आलाअतीतकारणीका॥अंबऋषीसपडलाधाक॥केविघडेम्ह
णोनियां॥५९॥ऋषीआलेदेखोनी॥अंबऋषीनेंअभिवंदोनी॥अर्घ्यपाद्यदेवोनी॥पूजाकें

ळी उपचारें ॥ ९० ॥ विनवीतसे ऋषेश्वरांसी ॥ शीघ्र जावें स्नानासी ॥ साधन आहे घटका द्वादशी
यावें अनुष्ठान सारोनियां ॥ ९१ ॥ ऋषी जाऊनि नदीसी ॥ अनुष्ठान करिती विधीसी ॥ विलंब ला
गतां तयासी ॥ आली साधन घटिका ॥ ९२ ॥ व्रतभंग होईल म्हणोनी ॥ पारणें केलें तीर्थ घे
ऊनी ॥ नाना प्रकार पक्कान्नीं ॥ पाक केला ऋषीतें ॥ ९३ ॥ तव आले दुर्वास देखा ॥ पाहूनि
अंबऋषीच्या मुखा ॥ म्हणे भोजन केलें सिकां ॥ अतिथी वीण दुरात्मया ॥ ९४ ॥ शाप देतां
ऋषेश्वर ॥ द्विजें स्मरला शारंगधर ॥ करावया भक्ताचा कैवार ॥ हाकून आला पतियेसा ॥
९५ ॥ भक्तवत्सल नारायण ॥ शरणागताचें रक्षण ॥ बिरुद बोलती पुराणें जाण ॥ धांवे धे

तुवसासि जेत्री ॥ ६६ ॥ शापिलें ऋषीनें द्विजासी ॥ जन्मावें गा अखिलयोनिसी ॥ तव पावला हृषी
केशी ॥ येऊनि जवळी उभा ठेला ॥ ६७ ॥ मिथ्या नोहे ऋषीचें वचन ॥ द्विजें धरिले श्रीविष्णूचे चरण
भक्तवत्सल श्रीदजाण ॥ तया महाविष्णूचें ॥ ६८ ॥ विष्णू म्हणे दुर्वासासी ॥ तुवां शापिलें अंबऋ
षीसी ॥ राखीन आपुल्या दासासी ॥ शाप आम्हासि तुम्ही द्यावा ॥ ६९ ॥ दूर्वास ज्ञानी ऋषेश्वर ॥
केवळ ईश्वर अवतार ॥ फेडावया भूमीभार ॥ कारण असे पुढें म्हणतसे ॥ ७० ॥ जाणोनि ज्ञा
नी शिरोमणी ॥ म्हणे तप करितां युगें क्षोणी ॥ भेटी न व्हो हरीच्चरणीं ॥ भूमीवरी दुर्लभ ॥ ७१ ॥
शापसंबंधें अवतरोनी ॥ येईल लक्ष्मी घेऊनी ॥ तारावयालागोनी ॥ भक्तजनां समस्तां ॥ ७२ ॥

परोपकारसमंधेंसी॥ शापद्यावाविष्णूसी॥ भूमीभारफेडावयासी॥ कारणअसेम्हणोनि
यां॥७३॥ ऐसेंविचारोनिमानसीं॥ दूर्वासम्हणेविष्णूसी॥ अवतारत्निभूमीसी॥ नानास्था
नींजन्मावें॥७४॥ प्रसिद्धहोसीवेळेदाहा॥ उपअवतारपूर्णपाहा॥ सहजतूंविश्वात्मामह
हा॥ स्थूळसूक्ष्मींवसतीतूं॥७५॥ ऐसाकार्यकारणरूप॥ अंगिकारीजगाचाबाप॥ दु
ष्टांवरीअसेकोप॥ स्रष्टप्रतिपाळकरावया॥७६॥ ऐसेदाहाअवतारझाले॥ असेतुवांक
र्णींऐकीले॥ महाभागवतींविस्तारिलें॥ अनंतरूपीनारायणा॥७७॥ कार्याकारणअवता
रहोती॥ क्वचित्प्रगटक्वचितगुप्त॥ तेब्रह्मज्ञानीजाणती॥ मूढमतीकायजाणे॥७८॥ आ

णीकसांगेनतुज॥ विनोदझालासेसहज॥ अनुसयाअत्रिऋषीचीभाज॥ पतीव्रताशिरो
मणी॥७९॥ तिचेगर्भीजन्मजाहाले त्रयमूर्तीअवतरले॥ कपटवेषधारीनिघाले॥
पुत्रजाहालेतियेचे॥८०॥ इतिश्रीगुरुचरित्रेपरमकथाकल्पतरुश्रीनृसिंहसर
स्वत्योपाख्यानेसिद्धनामधारकसंवादेअंबर्षीनामतृतीयोध्यायः॥३॥ श्रीदत्तात्र
यार्पणमस्तु॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥॥

श्रीगुरुचरणाभ्यांनमः॥ ऐसीशिष्याचीविनंती॥ ऐकोनिसिद्धकायबोलती॥ साधु
साधुतुझीभक्ती॥ प्रीतिपावोगुरुचरणीं॥ १॥ ऐकेशिष्याचूडामणी॥ धन्यधन्यतुझीवाणी
आठवतसेतुझ्याप्रश्नीं॥ आदिमध्यवसानकें॥ २॥ प्रश्नकेलाबरवानिका॥ सांगेनआतां
तुजविवेका॥ अत्रिऋषीचापूर्विका॥ सृष्टीपासोनिसकळ॥ ३॥ पूर्वींसृष्टीनव्हतीकाहीं॥
जळमयहोतेंसर्वही॥ आपोनारायणम्हणोनिपाहीं॥ वेदबोलतीयाचिकारणें॥ ४॥ उद
कआपोनारायण॥ सर्वाठायींवासपूर्ण॥ बुद्धिसंभवप्रपंचगुण॥ हिरण्यगर्भअंडनिर्मिलें
पातेंचिब्रह्मांडनामजाहालें॥ रजोगुणब्रह्मयासनिर्मिलें॥ हिरण्यगर्भनामपावलें॥ देवताव

र्ष एक होतें ॥ ६ ॥ तेंचि ब्रह्मांड देखा ॥ फुटोनि शकलें झालीं एका ॥ एक शकल भूमिका ॥ होऊनि
ठेलीं शकलें दोनी ॥ ७ ॥ ब्रह्मा तेथें उपजोन ॥ रचिले चौदाही भुवन ॥ दाही दिशा मानसवच
न ॥ काळ काम क्रोधादि सकळ ॥ ८ ॥ पुढें सृष्टी रचावयासी ॥ सप्तपुत्र उपजवी मानसीं ॥ ना
में सांगेन परियेसीं ॥ सात जण ब्रह्मपुत्र ॥ ९ ॥ मरीची अत्री आंगीरसा ॥ पुलस्त्य पुलह क्र
तू वसिष्ट ॥ सप्तपुत्र झाले श्रेष्ट ॥ सृष्टिकर्ता ब्रह्मा जाण ॥ १० ॥ सप्त ब्रह्मपुत्रामधील अत्री
तेथूनि पीढ गुरु संतती ॥ सांगेन ऐका एकचित्तीं ॥ सभाग्य नाम धारका ॥ ११ ॥ ऋषी अत्रीची भा
र्या ॥ नाम तीचें अनुसया ॥ पतीव्रता शिरोमणी या ॥ जगदंबा तेचि जाणा ॥ १२ ॥ तीचें सौंद

र्यलक्षण॥ वर्णूं त्या के ऐसा कोण॥ जीचा पुत्र चंद्र आपण॥ तीचें रूप काय सांगों॥ १३॥ पतीसे
वा करी बहुत॥ समस्त सुरवर भयाभीत॥ स्वर्गैश्वर्य घेईल त्वरित॥ ह्मणोनि चिंतिती मानसीं
॥ १४॥ इंद्रादि सुरवर मिळूनी॥ त्रयमूर्तीपाशीं जाऊनी॥ विनविनाति प्रकारोनी॥ आचार अत्री
ऋषीचा॥ १५॥ इंद्र ह्मणे स्वामिया॥ पतीव्रता स्त्री अनुसया॥ आचार तीचा सांगों काया॥ तु
ह्मा प्रती विस्तारोनी॥ १६॥ पतीसेवा करी भक्तीसी॥ मनोवाक्काय मानसीं॥ अतिथीपूजा महाह
र्षी॥ विन्मुख न व्हे कवण्याकाळीं॥ १७॥ तिचा आचार देखोनी॥ सूर्य भीतसे गगनीं॥ उष्णा ति
जळा होईल ह्मणोनी॥ मंद मंद तपतसे॥ १८॥ अग्नी झाला भयाभीत॥ शीतळ असे वर्तत॥ वा

योजाहा लाभ याचकिन ॥ मंद मंद वर्ततसे ॥ १९ ॥ भूमी आपणा भिऊनि द्रेरवा ॥ न लज्जा हाली
पादुका ॥ शापदेईल ह्मणोनि ऐका ॥ समस्त आह्मी भीतसों ॥ २० ॥ नेणो घेइल कवण स्थान
कोणा देवाचें हिरोन ॥ एकाद्यातें वरदेतां जाण ॥ तोंहि आह्मुतें माहूं शके ॥ २१ ॥ यासि करावा उ
पाय ॥ तूं जगदात्मा देवराय ॥ जाईल आह्मुचा स्वर्गठाय ॥ ह्मणोनि आलों तुह्मा सांगों ॥ २२ ॥
न कराल जरी उपाय यासी ॥ सेवा करूं आह्मी तिसी ॥ तिचे द्वारीं अहिर्निशी ॥ राहूं चित्त धरो
नियां ॥ २३ ॥ ऐसें ऐकोनि त्रयमूर्ती ॥ महाक्रोधें कांपती ॥ चला जाऊं पाहूं कैशी सती ॥ ह्म
णती आहे पतीव्रता ॥ २४ ॥ व्रतभंग करूनि तिसी ॥ ठेवूनि येऊं भूमीसी ॥ ऐथ वावे वस्ताल

यासी॥ पाठऊं म्हणोनि निघाले॥ २५॥ वास पाहावया सतीचे॥ त्रयमूर्त्ति विप्र भिक्षुकाचे॥ आ
श्रमा आले अत्रीचे॥ अभ्यागत घेऊनियां॥ २६॥ ऋषी करूं गेला अनुष्ठान॥ मागें आले त्र
यमूर्त्ती आपण॥ अनुसयेसि अश्वासून॥ अतिथी आपण आलों म्हणती॥ २७॥ क्षुधे बहू
पीडेन॥ आम्ही आलों ब्राह्मण॥ त्वरित द्यावें सती अन्न॥ अथवा जाऊं आणिका ठाया॥ २८॥
सदां तुमचे आश्रमांत॥ संतर्पण अभ्यागत॥ ऐकों आली कीर्त्ति विख्यात॥ म्हणोनि आलों अ
नुसये॥ २९॥ इत्साभोजन दान तुम्ही॥ देतां म्हणोनि ऐकिलें आम्हीं॥ ढंकोनि आलों याचि
कामी॥ इत्साभोजन मागावया॥ ३०॥ इतुकें ऐकोनि अनुसया॥ नमन केलें तत्क्षणया॥ बैस

गु०च०
३

कारकरूनियां ॥ क्षालन केलें चरणत्यांचे ॥ ३१ ॥ अर्घ्यपाद्य देऊनि त्यासी ॥ गंधाक्षता पुष्पेंसी
॥ सवें चम्हणात सेहर्षी ॥ आरोगण सारिजे ॥ ३२ ॥ अतिथी म्हणे तये वेळीं ॥ करोनि आलों वो आंघो
ळी ॥ क्षुधी येती बहुता वेळीं ॥ त्वरित आम्हा भोजन द्यावें ॥ ३३ ॥ वास पाहूनि सतीनें ॥ काय केलें
पतीव्रते ॥ ठाय घातले त्वरितें ॥ बेसकार केला देखा ॥ ३४ ॥ बेसोनियां पाटावरी ॥ घृतेंसि
पात्र अभिघारी ॥ घेऊनि आली आपण क्षिरी ॥ शाक पाक तये वेळीं ॥ ३५ ॥ तिसी म्हणती अ
वो नारी ॥ आम्ही अतिथी आलों दुरी ॥ देखोनि तुझें स्वरूप सुंदरी ॥ अभिष्ट मानेसीं आ
ली कवसे ॥ ३६ ॥ नग्न होऊनि आम्हासी ॥ अन्न वाढावें परियेसीं ॥ अथवा काय निरोप दे

अ०
४

२

रीतिः आह्मी जाऊं नाहीं तरी ॥ ३७ ॥ ऐकोनि द्विजांचें वचन ॥ अनुसया करी चिंतन ॥ आले
विप्र पाहावया मन ॥ कारणी पुरुष होतील ॥ ३८ ॥ पतीव्रता शिरोमणी ॥ विचार करी अंतः
करणीं ॥ अतिथी विन्मुख तरी हानी ॥ निरोप केवि उल्लंघूं ॥ ३९ ॥ माझें मन असे निर्मळ ॥
काय करील मन्मथ खळ ॥ प्राप्ती चें असे तपफळ ॥ तारील मज ह्मणतसे ॥ ४० ॥ ऐसें विचा
रोनि मानसीं ॥ तथास्तु ह्मणे तयांसी ॥ भोजन करावें स्वस्थ चित्तेंसी ॥ नग्न वाढीन ह्मण
तसे ॥ ४१ ॥ पाकस्थाना जाऊनि आपण ॥ चिंतन करी पतीचे चरण ॥ वस्त्र फेडूनि झा
ली नग्न ॥ ह्मणे अतिथी बाळ माझे ॥ ४२ ॥ नग्न होऊनि सती देखा ॥ घेऊनि आली

गु॰च॰ ४

अन्तोदका॥ तवनेझालेबाळका॥ ठायापुढें लोळती॥ ४३॥ बाळदेखूनिअनुसया॥
भयचकीतहोऊनियां॥ पुनरपींवस्त्रनेसोनियां॥ आलीतयाबाळकाजवळी॥ ४४॥
रुदनकरितीतीनिबाळा॥ अनुसयाराहावीवेळोवेळ॥ क्षुधार्थजाहालींकेवळ॥
म्हणोनकडियेघेतसे॥ ४५॥ कडियेघेऊनिबाळकांसी॥ स्तनपानकरवीअतिहर्षी॥
येकासांडोनियेकासी॥ क्षुधानिवारणकरीतसे॥ ४६॥ पाहेंपांनवलकायघडलें॥
त्रयमूर्तीचिबाळझालें॥ स्तनपानमात्रेंतोषलें॥ तपफळऐसेंपतीव्रतेचें॥ ४७॥ अज्या
चे [illegible] दरींचौदाभुवनं॥ सप्तसमुद्रवडवाग्नीजाण॥ त्यासीक्षुधानिवारण॥ पतीव्रता

अ॰ ४

४

नपानीं ॥ ४८ ॥ चतुर्मुखब्रह्मयासी ॥ सृष्टीकरणें अहिर्निवृत्ती ॥ त्याचीक्षुधा स्तनपा
नेंसी ॥ केविझाली निवारण ॥ ४९ ॥ भाळाक्ष कर्पूरगौर ॥ पंचवक्त्र काळाग्निरुद्र ॥ स्तन
पान करवी अनुसया कंदर ॥ तपसामर्थ्यें अत्रि ऐसा ॥ ५० ॥ अनुसया अत्रीरमणी ॥
नव्हती मागौरे स्त्री कोणी ॥ त्रयमूर्ती झाली जननी ॥ ख्याती प्रगटली त्रिभुवनांत
५१ ॥ कडिये घेउनि बाळकासी ॥ खेळवीतसे तिघांसी ॥ घालोनियां पाळण्यासी ॥ प
र्यंद गायतयावेळीं ॥ ५२ ॥ पर्यंद गाय नानापरी ॥ उपनिषदार्थ अतिकुसरी ॥ अति
उल्हासें सप्तस्वरीं ॥ संवोखितसे त्रिमूर्तीसी ॥ ५३ ॥ इतुकें होतां तयेवेळीं ॥ माध्या

५

न्हवे वेळ अतिथी काळीं ॥ अत्रिऋषी अति निर्मळी ॥ आला आपुले आश्रमा ॥ ५४ ॥ घरा ४
माजी अवलोकितां ॥ नवदेखिली अनुसया गातां ॥ कैंचीं बाळकें ऐसें ह्मणतां ॥ पुसत
सो स्त्रियेसी ॥ ५५ ॥ तिणें सांगीतला वृत्तांत ॥ ऋषी ज्ञानी असे पाहात ॥ त्रयमूर्ती याचि
ह्मणत ॥ नमस्कार करीतसे ॥ ५६ ॥ नमस्कारितां अत्री देखा ॥ संतोष विष्णूपिनायका ॥
आनंद झाला चतुर्मुखा ॥ प्रसन्न झाले तये वेळीं ॥ ५७ ॥ बाळ राहिले पाळणेंसी ॥ नि
जमूर्ती ढोंकले सन्मुखेंसी ॥ साधु साधु अत्रिऋषी ॥ अनुसया सत्य पतीव्रता ॥ ५८ ॥ तुष्ट ५
लों तुझे भक्तीसी ॥ माग मनीं वर जो इछिसी ॥ अत्री ह्मणे सतीसी ॥ जें वांछिसी माग आतां ॥

५९॥ अनुसया म्हणे ऋषीसी॥ प्राणेश्वरा तूंचि हासी॥ देव पावले तुझे भक्तीसी॥ पुत्र मागा
तुम्ही आतां॥ ६०॥ ति घे बाळक माझे घरीं॥ राहावें माझे पुत्रा परी॥ हेंचि मागतों निर्धारी
त्रिमूर्त्ती आपण एकरूप॥ ६१॥ ऐसें वचन ऐकोनी॥ वर दिधला मूर्त्ती तिन्ही॥ राहाती बा
ळकें म्हणोनी॥ आपण गेले निजालयासी॥ ६२॥ त्रिमूर्त्ती राहिले त्यांचे घरीं॥ अनुस
या पोसी बाळका परी॥ नामें ठेविलीं प्रीतिकरीं॥ त्रिवर्गांचीं परियेसा॥ ६३॥ ब्रह्मा
मूर्त्ती चंद्र झाला॥ विष्णुमूर्त्ती दत्त केवळा॥ ईश्वर तो दूर्वास नाम पावला॥ ति घे पुत्र
अनुसयेचे॥ ६४॥ दूर्वास आणि चंद्र देखा॥ उभे राहोनि मातेसन्मुखा॥ निरोप मा

गती कौतुका ॥ जाऊं त पानिजस्थाना ॥ ६५ ॥ दूर्वास ह्मणे अहो जननी ॥ आह्मी ऋषी अ
नुष्ठानी ॥ जाऊ तीर्थें आचरोनी ॥ ह्मणोनि निरोप घेतला ॥ ६६ ॥ चंद्र ह्मणे अहो माते ॥ नि
रोप द्यावा आह्मा त्वरितें ॥ चंद्रमंडळीं वास मातें ॥ नित्य दर्शन तुमचें चरणीं ॥ ६७ ॥ ति
सरा दत्त विष्णुमूर्ती ॥ असेल तुमचे धरोनि चित्तीं ॥ त्रयमूर्ती तो चिहें निश्चिती ॥ ह्मणोनि
सांगती तियेसी ॥ ६८ ॥ त्रयमूर्ति जाणा तो चिदत्त ॥ सर्व विष्णुमयं जगत ॥ राहिला तुमचें
धरोनि चित्ता ॥ विष्णुमूर्ती दत्तात्रय ॥ ६९ ॥ त्रयमूर्ती ऐक्य होउन ॥ दत्तात्रये राहिला
शाप पण ॥ दूर्वास चंद्र निरोप घेउन ॥ गेले स्वस्थळा अनुष्ठानासी ॥ ७० ॥ अनुसयेचे

घें देखा ॥ त्रयमूर्ती राहिली मूर्ती एका ॥ नाम दत्तात्रय ऐका ॥ मूळपीठ श्रीगुरूचे ॥
७१ ॥ ऐशापरी सिद्ध देखा ॥ कथा सांगे नामधारका ॥ संतोषें प्रश्न करी अनेका ॥ पुस
तसे सिद्धासी ॥ ७२ ॥ जय जया सिद्ध योगेश्वरा ॥ भक्तजनमनोहरा ॥ तारकसंसा
रसागरा ॥ ज्ञानमूर्त्तीकृपासिंधू ॥ ७३ ॥ तुझेनि प्रसादें मज ॥ ज्ञान उपजलें सहज
तारक आमुचा योगीराज ॥ विनंती माझी परियेसा ॥ ७४ ॥ दत्तात्रयाचा अवतारु ॥
सांगीतला पूर्वापारु ॥ पुढें अवतार जाहाले गुरु ॥ कवणे परी निरूपिजे ॥ ७५ ॥ विस्ता
रोनि आम्हासी ॥ सांगा स्वामी कृपेसी ॥ अवतार त्रिमूर्त्तीसी ॥ अनुक्रमें निरोपावे ॥ ७६ ॥

यणेसरस्वतीगंगाधरू॥पुढीलकथेचाविस्तारू॥ऐकताहोयमनोहरू॥सकळा
भीष्टेंसाधती॥७७॥इतिश्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरूश्रीन्रसिंहसरस्व
त्योपाख्यानेसिद्धनामधारकसंवादेअनुसयापाख्यानोन्नामचतुर्थोध्या
यः॥४॥श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥ओव्या॥७७॥ ७ ॥ ७ ॥ ६ ॥ ६ ॥

श्रीगणेशाय नमः॥ नामधारक भक्तासी॥ सांगे सिध्द विस्तारेंसी॥ अवतार झाला मानु
षी॥ भक्तजनां तारावया॥ १॥ ऐक भक्ता नामधारका॥ अंबऋषीकारणें विष्णु देखा
॥ अंगिकारिलें अवतार ऐका॥ मानुषी नाना रूप घेतसे॥ २॥ मत्स्य कूर्म वराह देख
नराचा देह सिंहाचें मुख॥ वामन रूप झाला भिक्षुका॥ झाला ब्राह्मण क्षेत्रकर्मी
३॥ दशरथाचे कुळीं जन्म॥ प्रख्यात अवतार श्रीराम॥ राजा होऊनि मागुती जन्म
गोळियाघरीं गुरें राखे॥ ४॥ वस्त्रें फेडूनि झाला नग्न॥ बोध्ये रूपी जाहाला आ
पण॥ होऊनि कलंकी अवतार जाण॥ तुरंगारूढ कायआवडी॥ ५॥ नाना प्रकार

२

नानावेशा। अवतार धरी हृषीकेशा॥ तारावया भक्तजनांसा। दुष्टहनन करावया॥ ६॥ द्वा
पारांतीं झाला कळी॥ अज्ञान लोक ब्राह्मणकुळीं॥ आचारहीन होऊनि म्रबळी॥ वर्त
र्ती महिमा कलियुगीं॥ ७॥ भक्तजन तारणार्था॥ अवतार धरी श्रीगुरुनाथा॥ सगराकारणें
भगीरथा॥ आणी गंगा भूमंडळीं॥ ८॥ तैसें एक विप्रवनिता॥ आराधी श्रीविष्णुदत्ता॥ तिचे
उदरीं अवतार धरितां॥ आश्चिर्य झालें परियेसा॥ ९॥ पीठापूर पूर्वदेशीं॥ होता ब्राह्मण उ
त्तमवंशीं॥ आपस्तंब शाखेसी॥ नाम आपळराजा जाणा॥ १०॥ तयाची भार्या सुमता॥ असे
आचार पतीव्रता॥ अतीता आणि अभ्यागता॥ पूजा करी भक्तिभावें॥ ११॥ ऐसें असतां वर्तमा

१

नी ॥ पतीसेवा एकामनीं ॥ अतिथी पूजा सगुणी ॥ निरंतर करीतसे ॥ १२ ॥ वर्ततां असें एके दिवसीं ॥ आला
दत्त अतिथी वेषीं ॥ श्राद्ध होतें अमावास्येसी ॥ विप्राघरीं तै देखा ॥ १३ ॥ जेवितां ब्राह्मणघरीं ॥ दत्ता भी न
क्षा घाली ते नारी ॥ दत्तात्रय साक्षात्कारी ॥ प्रसन्न झाला तयावेळीं ॥ १४ ॥ त्रयमूर्तीच्चें रूप घेऊनी ॥
स्वरूप दाविलें अति गहनीं ॥ पतीव्रता धांवोनि चरणीं ॥ नमन करी मनोभावें ॥ १५ ॥ दत्तात्रय ह्मणे ति
येसी ॥ माग माते जें इच्छिसी ॥ जे जे वासना तुझे मानसीं ॥ पावसी त्वरित ह्मणतसे ॥ १६ ॥ ऐकोनि
स्वामीच्चें वचन ॥ विप्रवनिता करी चिंतन ॥ विनवीतसे करद्वय जोडुन ॥ नाना परी स्तवोनियां ॥
१७ ॥ ह्मणे जय जय जगंनाथा ॥ तूं तारक भवासित त्वता ॥ माझे मनीं असे जे आर्ता ॥ पुरवावी ते दे

वराया ॥ १८ ॥ तूं कृपाळू सर्वभूतीं ॥ वेदपुराणें वाखाणिती ॥ के विवर्णावी तुझी कीर्ती ॥ भक्तवत्स
ला कृपानिधी ॥ १९ ॥ मिथ्या नोहे तुझा बोल ॥ जे कां ध्रुवासि दिधलें पद अढळ ॥ बिभीषणासि
लंकास्थळ ॥ देऊनि राज्य समर्पिलें ॥ २० ॥ भक्तजनां तूं आधार ॥ तयांलागीं धरिशी अवतार
ब्रीद असे चराचर ॥ चौदा भुवनां माझारी ॥ २१ ॥ आतां मातें वर देईं ॥ वासना असे माझे मान
सीं ॥ न व्हावें अन्यथा बोलासी ॥ कृपानिधी देवराया ॥ २२ ॥ माझे मनींची वासना ॥ पुरवावी
जगज्जीवना ॥ अनाथतारका नारायणा ॥ म्हणोनि चरणा लागतसें ॥ २३ ॥ ऐकोनि तयेचें
करुणावचना ॥ संतोषला त्रयमूर्ती आपण ॥ केरू धरिला अभ्यासोन ॥ सांग जननी म्हणतसे ॥

२४॥ तव बोलि स्त्री पतीव्रता॥ स्वामी जें निरोपिलें आतां॥ जननी नाम मज ठेवितां॥ करा नि
धार याच बोला॥ २५॥ मज पुत्र झाले बहुत॥ न व्हेति स्थीर रुपजत मरत॥ जेवांचले आतां
असत॥ अक्षहीन पादहीन॥ २६॥ योग्य झाले नाहीं कोणी॥ काय करावे मूर्ख प्राणी॥ असो
नि नसती येणें गुणीं॥ पुत्राविण काय जन्म॥ २७॥ व्हावा पुत्र मज ऐसा॥ ज्ञानवंत परम पुरुषा
जगद्वंद्य वेदसद्रा॥ तुझ्यासारिखा दातारा॥ २८॥ ऐकोनि तियेचें वचन॥ प्रसन्न झाला द
त्त आपण॥ पुढें असे कार्यकारण॥ दीक्षार्थ भक्तजनासी॥ २९॥ तापसी ह्मणे तियेसी॥ पुत्र हो
ईल तुज परियेसीं॥ उद्धरील तुझे वंशासी॥ ख्यातिवंत कलियुगीं॥ ३०॥ असावें तु स्त्री साचे

गु॰च॰ अ॰

३ बोली॥ येरवीं नेंराहे तुह्माजवळी॥ ज्ञानमार्गीं अनुर्वळी॥ तुह्मचें दैन्य हारील॥२१॥ इतुके ५
सांगोनि तापसी॥ अदृश्य झाला परियेसीं॥ विस्मयो करीत से मानसीं॥ विप्रवनिता तयावे
ळीं॥२२॥ विस्मयो करोनि मनांत॥ पतीसि सांगे वृत्तांत॥ दोघें हर्षें निर्भर होता॥ ह्मणती दत्तात्र
य होईल॥२३॥ माध्यान्हसमयीं अतिथी काळीं॥ दत्त येताति तयावेळीं॥ विमुख न होतां
तये काळीं॥ भिक्षामात्र घालिजे॥२४॥ दत्तात्रयाचें स्थान॥ माहूर करवीरक्षेत्र खुण॥ त
याचा वास सदां जाण॥ पांचाळेश्वर नगरांत॥२५॥ नानावेषें भिक्षुकरूप॥ दत्तात्रय येती २
साक्षेप॥ नपुसतां मज निरोप॥ भिक्षा घालीं ह्मणतसे॥२६॥ विप्रस्त्री ह्मणे पतीसी॥ आ

जिभवस्त्रा केली तुह्मासी ॥ ब्राह्मण न जेवितां आपण त्यासी ॥ भीक्षा घालीं ह्मणतसे ॥ ३७ ॥
ऐकोन सतीच्या बोला ॥ विप्र मनीं संतोषला ॥ ह्मणे पतीव्रते लाभ झाला ॥ पितर झाले तृप्त मा
झे ॥ ३८ ॥ करावें कर्म पित्रांचा नामीं ॥ समर्पावें विष्णूसि आह्मी ॥ साक्षात्कारें येउनि स्वामी ॥
भीक्षा केली आह्मा घरीं ॥ ३९ ॥ कृतार्थ झाले पितृगण समस्त ॥ निधारिं झाले स्वर्गस्त ॥ सा
क्षांत विष्णू भेटेल दत्तात्रय मूर्ती अवतारा ॥ ४० ॥ धन्य तुझा माता पिता ॥ जे वरा लाधलीस
मुख्य आतां ॥ पुत्र होईल निभ्रांता ॥ न धरीं चिंता मानसीं ॥ ४१ ॥ हर्षें निर्भर होऊनी ॥ रा
हिली दोघें निश्चिंत मनीं ॥ होती जाहाली गर्भिणी ॥ विप्रस्त्री परियेसा ॥ ४२ ॥ ऐसे नव मास क्र

मोनी॥ प्रसूत झाली शुभ दिनी॥ विप्रें स्नान करूनी॥ केलें जातकर्म तयावेळीं॥ ४३॥ मिळ
नि समस्त विप्रकुळी॥ जातक वर्तविती तयावेळीं॥ ह्मणती तपस्वी होईल बळी॥ दीक्षाक
र्ता जगद्गुरू॥ ४४॥ ऐकोनि ह्मणती मातापिता॥ होको आमुचा कुळउद्धरिता॥ आह्मा
वरू दिधला दत्ता॥ ह्मणोनि ठेविती तया नाव॥ ४५॥ श्रीपाद ह्मणोनि याकारण॥ ना
म ठेविती ब्राह्मण॥ अवतार केला त्रिमूर्ती आपण॥ भक्तजनां तारावया॥ ४६॥ वर्ततां अ
सतां त्याचे घरीं॥ झाली सात वर्षे पुरी॥ मौंजीबंधन तेभवसरी॥ करिता झाला द्विजो
त्तम॥ ४७॥ बांधितां मौंजी ब्रह्मचारी॥ ह्मणता झाला वेद चारी॥ मिमांसतर्क अति विस्ता

रीं ॥ ह्मणों लागल्ला तयावेळीं ॥ ४८ ॥ ऐकोनि समस्त नंगर लोक ॥ विस्मयो करिती सकळिक ॥
होईल अवतार कारणिक ॥ ह्मणोनि बोलती आपणांत ॥ ४९ ॥ आचार व्यवहार प्रायश्चित्त
समस्तांसि आपण बोलत ॥ वेदांत भाष्य वेदार्थ ॥ सांगतसे द्विजवरांसी ॥ ५० ॥ वर्ततां ऐसें त
यासी ॥ झालीं वर्षें षोडशी ॥ विवाह करूं ह्मणती पुत्रासी ॥ मातापिता अवधारा ॥ ५१ ॥ वि
चार करिती पुत्रासवें ॥ बरें लग्न तुवां करावें ॥ श्रीपाद ह्मणे ऐका भावें ॥ माझी वांछा सां
गेन ॥ ५२ ॥ कराल विवाह माझा तुह्मी ॥ सांगों ऐका विचार आह्मी ॥ वैराग्य स्त्री संगें अ
सेन मीं ॥ काम्य आमुचें तियेजवळी ॥ ५३ ॥ त्या स्त्रियेवांचून आणीक नारी ॥ समस्त जाणा

मातेसरी ।। जरी आणाल ते सुंदरी ।। वरी न ह्मणे तये वेळीं ।। ५४ ।। आपण तापसी ब्रह्मचारी ।।
योगस्त्रिये वांचोनि नारी ।। बोल धरा निर्धारी ।। श्रियावल्लभ नाम माझें ।। ५५ ।। श्रीपाद श्रि
यावल्लभ नाम ऐसें ।। झालें त्रिमूर्त्ती कैसें ।। पितयातें ह्मणतसे ।। जाऊं उत्तरपंथासी ।। ५६ ।।
ऐकोनि पुत्राचें वचन ।। आठवलें पुत्रसूचन ।। भिक्षुकें सांगीतली जे खुण ।। सत्य झा
ली ह्मणतसे ।। ५७ ।। आतांच्च या बोलासी ।। मोडा घालितां पदियेसी ।। विघ्न होईल त्वरि
तेंसी ।। ह्मणोनि विचारिती तये वेळीं ।। ५८ ।। न ह्मणावें पुत्रयासी ।। अवतारपुरुष ताप
सी ।। जैसें याचें वसे मानसीं ।। तैसें करावें ह्मणती दोघें ।। ५९ ।। निश्चय करूनि आपुले मनीं

पुत्राभिमुख जनक जननी ॥ होती आज्ञा आम्हा लागोनी ॥ प्रतिपाळिशी म्हणोनियां ॥ ६० ॥ ऐशीं मनीं व्याकुळिता ॥ डोळां निघती अश्रुपात ॥ माता पडली मूर्छागत ॥ पुत्र त्ने हें करूनियां ॥ ६१ ॥ देखोनि मातेचें दुःख ॥ संबोखीत परमपुरुष ॥ उठवूनि स्वहस्तें देख ॥ अश्रुपात धूतसे ॥ ६२ ॥ न करी चिंता अहो माता ॥ जें मागशी तें देईन आतां ॥ दृढ करूनि स्वचित्ता ॥ राहा सुखें म्हणतसे ॥ ६३ ॥ बा रे तुज करितां आपण ॥ दुःख विसरलें संपूर्ण ॥ रक्षिसी आम्हां वृद्धांलागुनी ॥ दैत्या वेगळें करोनी ॥ ६४ ॥ पुत्र असती आपणां दोन ॥ पाय पांगूळ अक्षहीन ॥ त्यांतें पोशील आतां कोण ॥ आम्हा कवण रक्षीला ॥ ६५ ॥ ऐकोन जननीचें वचन ॥ अव

गु० च०
६

लोकी अमृत दृष्टी करून ॥ पुत्र दोघे हि झाले सगुण ॥ आली दृष्टी चरणादिक ॥ ६६ ॥ वेदशा
स्त्रादि व्याकर्ण ॥ सर्व म्हणती तत्क्षण ॥ दोघे येवून धरिती चरण ॥ कृतार्थ झालों म्हणोनि
यां ॥ ६७ ॥ चिंतामणीचा होतां स्पर्श ॥ सुवर्ण करी लोहास ॥ तेसे महा अदृष्टीने तयांस
योग्यता आली तत्काळी ॥ ६८ ॥ अश्वासून तया वेळीं ॥ दिधला वर तत्काळी ॥ पुत्रपौ
त्रीं नांदा सबळी ॥ श्रियायुक्त सनातन ॥ ६९ ॥ सेवा करा जनकजननी ॥ पावा सु
ख माहात्म्यानी ॥ इह सौख्य पावोनी ॥ कालं मुक्त हें निश्चयें ॥ ७० ॥ ऐसें बोलोनि त
यांसी ॥ संतोषित से मातेसी ॥ पाहोनि यां दोघां पुत्रासी ॥ राहातां सुख पावाल ॥

अ० ५
६

॥७१॥ पुत्र दोघे शतायुषी॥ निश्चय धरीं वो मानसीं॥ कन्या पुत्र होतील यांसी॥ तुम्ही नेत्रीं देखाला॥७२॥ अखंड लक्ष्मी यांचे घरीं॥ यांचे वंशापरंपरीं॥ कीर्त्तिवंत सचराचरीं॥ प्रसन्न होती वेदशास्त्रें॥७३॥ आमुची अवज्ञा न करितां॥ निरोप द्यावा॥ आत्मा त्वरिता॥ जाणें असे उत्तर पंथा॥ दीक्षा द्यावया साधूजनां॥७४॥ सांगोनि माता पित्यासी॥ अदृश्य झाला परियेसीं॥ पावला त्वरीत पुरी काशी॥ गुप्तरूपें होता तेथें॥७५॥ निघाला तेथूनि बदरीवना॥ भेटी घेऊनि नारायणा॥ अवतार असे आपणा॥ कार्यकारण मनुष्य देहीं॥७६॥ दीक्षा करावया भक्तजना॥ तीर्थे हिंडणें आपणा॥ मनोवेगें मार्गक्रमणा॥ आले तीर्थ गो

कर्णासी ॥ ७७ ॥ ऐकोनि सिध्दमुनीचें वचना ॥ विनवी नामधारक आपण ॥ तें परिसा श्रोते
जन ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ ७८ ॥ इति श्री गुरुचरित्र परमकथाकल्पतरु श्रीनृ
सिंह सरस्वत्योपाख्याने सिद्ध नामधारक संवादे दत्तात्रय अवतार कथनो नाम पंच
मोध्यायः ॥ ५ ॥ श्री गुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ओवी ॥ ७८ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

श्रीदत्तात्रयजगद्गुरवेनमः॥ नामधारकम्हणेसिद्धासी॥ स्वामीतूंज्योतिअंधकारासी॥ प्र
काशकेलाआम्हासी॥ गुरुपीठआद्यंत॥१॥ त्रयमूर्तीहोउनिआपण॥ तीर्थेंकरावींकिं
कारण॥ विशेषअसेकायगोकर्णा॥ म्हणोनिगेलेतयास्थाना॥२॥ तीर्थेंअसतीअपरं
परीं॥ समस्तसांडूनिप्रीतीकरीं॥ कैसापावलादत्तात्री॥ अवतारीश्रीपादश्रियावल्ल
भा॥३॥ ऐकशिष्याशिरोमणी॥ तुवांपुशिलेंजेकांप्रश्नी॥ संतोषझालाअंतःकरणी
सांगेनचरित्रश्रीगुरूचें॥४॥ विस्तारोनिआम्हासी॥ सागास्वामीकृपेसी॥ म्हणोनि
लागलाचरणासी॥ नामधारकप्रीतिकारें॥५॥ ऐकोनिनामधारकाचेंवचन॥ संतोष

लें सिद्धाचें मन ॥ सांगतसे विस्तारोन ॥ गुरुचरित्र परियेसा ॥ ६ ॥ तुज करितां आह्मासी ॥
लाभ झाला असे मानसीं ॥ गुरुचरित्र सांगावयासी ॥ उत्कंठा मानसीं होयते ॥ ७ ॥ ह्मणे त्र
यमूर्ती अवतरोन ॥ तीर्थें हिंडे केवि आपण ॥ विशेष पावला गोकर्ण ॥ ह्मणोनि पुसती आ
ह्मातें ॥ ८ ॥ दत्तात्रय आपण ॥ तीर्थें हिंडत याचि कारण ॥ भक्तजन हितार्थ दीक्षेस्तक जा
णा ॥ उपदेश करावया ॥ ९ ॥ विशेष तीर्थ आपुलें स्थान ॥ गोकर्णीं शंकर असे जाण ॥ यास्व
कारणें निर्गुण ॥ त्रयमूर्ती वसती तया ठायीं ॥ १० ॥ गोकर्णींचें महात्म ॥ सांगतसे अनुप
म ॥ एकचित्त करूनि नेमा ॥ ऐके शिष्या नामधारका ॥ ११ ॥ त्या तीर्थाचे आदि अंतीं ॥ सांग

नगु ~~सा~~ विस्तृती ॥ जे पूर्वीं वर लाधले असती ॥ अपूर्व असे ऐकता ॥ १२ ॥ महाबळेश्वरालि
ग देखा ॥ स्वयंभू शिव असे एका ॥ आख्यान त्याचें ऐका ॥ लंबोदरें प्रतिष्ठिलें तों ॥ १३ ऋ
षी म्हणे सिष्यासी ॥ तीर्थ महिमा वानिसी ॥ विघ्नेश्वरें प्रतिष्ठिलें तयासी ॥ विस्तारूनि सांग
मज ॥ १४ ॥ ऐसें शिष्य विनविता ॥ ऐकोनि बहू संतोषता ॥ निरोपीत आद्यंता ॥ महाबळेश्व
र चरित्र ॥ १५ ॥ पुलस्त्य ब्राह्मणाची भार्या ॥ नाम मतिचें कैकया ॥ ईश्वरभक्ती अति प्रिया ॥
शिव पूजा सार्वकाळा ॥ १६ ॥ नित्य करी शिव पूजन ॥ पूजेवीण न घे अन्न ॥ ऐसें करितां ए
क दिन ॥ न मिळे लिंग पूजेसी ॥ १७ ॥ व्रतभंग होईल म्हणोनी ॥ मृत्तिका लिंग करूनी ॥ पूजी

अतिसंतोषोनी॥ भक्तिपूर्वक अवधारा॥१८॥ तिचा पुत्र अतिक्रूर॥ नाम तया दशशीर॥ आ
ला तेथें वेगवक्त्र॥ माता दर्शन करावया॥१९॥ नमिता झाला मातेसी॥ पुसे पूजा काय करि
सी॥ माता सांगे विस्तारेंसी॥ लिंग पूजिलें मृत्तिकेचें॥२०॥ रावण म्हणे जननीसी॥ मझी मा
ता तूं म्हणविसी॥ मृत्तिकेचें लिंग पूजेसी॥ अभाग्य आपण म्हणतसो॥२१॥ मागुती म्हणे ति
येसी॥ पूजितां फळ काय यासी॥ कैकया सांगे पुत्रासी॥ कैलासपद पाविजे॥२२॥ राव
णा म्हणे मातेसी॥ कैलास आणूनि तुज पाशीं॥ देईन हें निश्चयेंसी॥ सायास कां वो करि
तेसी॥२३॥ ऐसें बोलें तो रावण॥ मातेसवें करी पण॥ आणीन त्वरित उमारमण॥ कै

नास महिनलें केसी ॥ २४ ॥ पूजा करी वो स्वस्थ चित्तेंसी ॥ मत्ति कालिंगकाकारत्री
ह्मणोनि निघाला त्वरितेंसी ॥ मनोवेगें निशाचर ॥ २५ ॥ पावला त्वरें त्रिवपुरासी ॥ शुभ्र
रम्य पर्वतासी ॥ धरोनि हालवी क्रोधेंसी ॥ वीस बाहू भुजाबळें ॥ २६ ॥ आंदोळलें कै
लास भुवन ॥ उपटीतसे तो रावण ॥ दाही शिरें टेकून ॥ उचलीन ह्मणे उल्हासें ॥ २७ ॥ त्रि
रलाउनि पर्वतासी ॥ करटेंकूनि मांडिसी ॥ उचलितां झाला त्राणेंसी ॥ सप्त पाताळ आं
दोळलें ॥ २८ ॥ फणा चुकवी शेष आपण ॥ कूर्म भ्याला कांपोन ॥ भयचकीत देवगण ॥
अमरपूर कांपतसे ॥ २९ ॥ कंप झाला स्वर्गभुवना ॥ सत्यलोक विष्णुभुवना ॥ मेरु पडतसे

घडबडोन॥ म्हणती प्रळयो मांडला॥ ३०॥ कैलासपुरीचे देवगण॥ भयाभीत झाले कं
पायमान॥ भयाभीत गिरिजा आपण॥ होऊनि गेली शिवापाशीं॥ ३१॥ पार्वती विनवी
शिवासी॥ काय झालें कैलासासी॥ आंदोळतसे सभेसी॥ पजें पाहातां निर्धारीं॥ ३२
नगरांत झाला आकांत॥ बैसलेति तुम्ही स्वस्थ॥ करा प्रतिकार त्वरित॥ म्हणोनि
चरणा लागली॥ ३३॥ ईश्वर म्हणे गिरिजेसी॥ न करीं चिंता मानसीं॥ रावण मा
झा भक्त परियेसीं॥ खेळतसे भक्तीनें॥ ३४॥ ऐसें वचन ऐकोनी॥ विनवी गिरिजा
नमोनी॥ रक्ष रक्ष शूळपाणी॥ समस्त देवगणां तें॥ ३५॥ ऐकोन उमेची विनंती॥

शंकरें चेपिला वामहस्तीं॥ दाहीशिरें भुजासहिती॥ दडपलासे गिरीतळीं॥ ३६॥ चिंताक
रीमनीं बहुत॥ शिवशिव ऐसें उच्चारित॥ ध्यातसे स्तोत्र करित॥ शरणागता रक्षस्व म्हणोनी॥
३७॥ त्राहि त्राहि पिनाकपाणी॥ जगद्रक्षका शिरोमणी॥ शरण आलों तुझे चरणीं॥ म
रण केंचें भक्तासी॥ ३८॥ शंकर भोळा चक्रवर्ती॥ ऐकोनि त्याची विनंती॥ चेपिलें होतें
वामहस्तीं॥ काढिलें त्वरित न हूपेनें॥ ३९॥ स्फटला तेथूनि लंकेश्वर॥ स्तोत्र करीतसे
अपार॥ स्वशरीर छेदोनि परिकर॥ तंतू लाविले निजअंत्रें॥ ४०॥ वेद सहस्र एक वच
नीं॥ वर्णक्रमादि विस्तारोनी॥ सामवेद अति गायनीं॥ सप्तस्वारंगें गातसे॥ ४१॥ गणत्र

षेश्वर्‍युक्त॥ गायन करी लंकनाथा॥ तयाच्चीं नामें विख्यात॥ सांगेन ऐका एकचित्तें॥
४२॥ भौठ गण प्रख्यात॥ उच्चारीतसे लंकानाथ॥ मग ब्राह्मण विख्यात॥ नगण
क्षत्री विर्नयेंसी॥ ४३॥ भगण वैश्य ध्यानेंसी॥ गणू मुद्र वमेसी॥ जे गण दैत्यपरि ये
सी॥ रगणें प्रत्यक्ष व्यू नगुणें॥ ४४॥ सगण तुरंगरूपेंसी॥ ओट गणपरि येसी॥ विस्ता
रितां गायनेंसी॥ लंकापती रावण॥ ४५॥ गायन करीत नवरसेंसी॥ नामें सांगेन
परियेसीं॥ शांत भयानक अद्भुतेंसी॥ श्रृंगार हास्य करुणा रस॥ ४६॥ रुद्र वीर वि
भछेंसी॥ गायन करी अति उल्हासीं॥ वेणू वाजवी सप्तस्वरेंसी॥ ध्यानपूर्वक

वि रीनें॥४७॥ जंबूद्वीपवासज्यासी॥ आउस्वनामपरियेसीं॥ कंठींहूनउपजज्या
सी॥ मयुरस्वर अलापिता॥४८॥ उन्मवंशींउपजज्यासी॥ गीर्वाणकुळीं ब्रह्मवंशी
तप्तकांचनवर्णपरियेंसीं॥ वन्हीदेंवताश्रृंगाररस॥४९॥ द्वितीयस्वरऋषभासी॥
जन्मग्राहिपकासी॥ उपजहृदयस्थानेंसी॥ चत्विरेश्वरआजिपीतुरी॥५०॥ ब्रह्मा
ननामक्षेत्रवंशी॥ विराजवर्णयमदेवतेंसी॥ क्रीडाअद्भुतरसऐश्री॥ वीणावाज
वीरावण॥५१॥ तृतीयस्वरगांधारेंसी॥ गायनकरीरावणपरियेसीं॥ कुशद्वीपवा
सज्यासी॥ नासीकस्वरअवधारा॥५२॥ आजस्वरवर्णत्यासी॥ गीर्वाणवैश्यवंशीं

स्फवर्णवर्णकांतीसी॥ चंद्रदेवताअद्भुतरसें॥ ५३॥ मध्यभंश्वर चातुर्थक॥ क्रौंचद्वीपवा
सरेक॥ उरस्थानउक्तचारीस्फरव॥ क्रौंचस्वरअलापित॥ ५४॥ गीर्वाणकुळब्रह्मवंशा
कुंदवर्णरूपस्फरसा॥ ध्यानकरीलंकाधीशा॥ लक्ष्मीदेवताकरुणारसा॥ ५५॥ शाल्मल
द्वीपभूमीसी॥ जन्मपंचमस्वरासी॥ कंठींउपजो निनादासी॥ कोकिळास्वरगानसे॥ ५६॥
ध्यानकरीतयास्वरांसी॥ उपजझालापित्तवंशीं॥ कृष्णवर्णरूपत्यासी॥ गणनाथदे
वहास्यरसें॥ ५७॥ श्वेतद्वीपजन्मख्यात॥ स्वरअसेनामदेवता॥ ललाटस्थाननादव्य
क्तोदर्दूरस्वरअलापीदेखा॥ ५८॥ ऐसाधैर्यवंतस्वरासी॥ विभक्षीख्यातीउल्हासी॥

न गायें रावण परियेसीं ॥ ईश्वराप्रति भक्तीने ॥ ५९ ॥ पुष्करद्वीपउपजे त्यासी ॥ निषादस्वर ना
म परियेसीं ॥ उत्पत्ती अलाप संधीसी ॥ हस्तस्वर गानसे ॥ ६० ॥ अस्करवंद्रावे नूपकुळीं ॥ क
ल्मष्शूद्रवर्ण पाटली ॥ तुंबर मुनी देवतांस कळी ॥ सर्व देवता अवधारी ॥ ६१ ॥ भयानक
स्कर देखा ॥ चर्विष्याकुण असेनिका ॥ येणे परीस स्वरिका ॥ गायन करी लंकनाथ ॥
६२ ॥ रागें सहीनरागिणीसी ॥ गायन करी सामवेदासी ॥ श्रीरागादि वसंतासी ॥ अलाप
करी दशाग्रीर ॥ ६३ ॥ भैरवादि पंचम रागी ॥ नट नारायण मेघरागी ॥ गायन करी अ
भ्यास योगी ॥ लंकनाथ शिवाप्रती ॥ ६४ ॥ गोड कोल्हाळ कादाळी ॥ द्राविड रागीकौ

गु० च०

६

त्रिकमाळी ॥ देवगांधार आनंदलिळी ॥ गायन करी लंकनाथ ॥ ६५ ॥ धनश्री यावराजि
सी ॥ रामश्री कहिलु मंजिरेंसी ॥ गौडाक्री देशगा किहारिसी ॥ गायन करी लंकेश्वर ॥ ६६ ॥
भैरवी गुर्जरी सहिता ॥ वेळाउळी राग ललित ॥ कर्णाटकी हंसयुक्त ॥ गायन करी दशशि
रा ॥ ६७ ॥ त्राटकी मोटकी देखा ॥ ढकाक्षी क्षुधानाटका ॥ सैंधवा माळाक्री एका ॥
गायन करी लंकनाथ ॥ ६८ ॥ बगळी राग सोरटीसी ॥ कामबोध मधुमाधवीसी ॥
देवाक्रिया भूपाळीसी ॥ गायन करी दशानन ॥ ६९ ॥ राग वल्लभ माधुरीसी ॥ राव्हे
री राग हर्षी ॥ विहंरा दाशी चंडीशी ॥ वसवी जादि रागानें ॥ ७० ॥ शीर कापून आपुलें

अ०

६

६

देखा॥ जंत्र केलें करकमळिका॥ नरा काढून तंतुका॥ रावणेश्वर गातसे॥ ७१॥ समया
समयीं आलापणें॥ करी द्रूणाच्छी र आपण॥ प्रातःकाळीं करी गायन॥ अष्टराग परिये
सा॥ ७२॥ मध्यम रागवेळ वेळीं॥ द्रूणाक भैरवी करी भुपाळी॥ मल्हार धनाश्री बंगा
ळी॥ प्रातःकाळीं गातसे॥ ७३॥ वराडी ललिता गुर्जरें सी॥ गौडाक्री आहिरी कोल्हि
कें सी॥ माध्यान्हसमयीं गायनासी॥ रावण करी परियेसा॥ ७४॥ कुरंजी तुंडी माल
स्त्रियेसी॥ द्रूणाक पंचम परियेसीं॥ अपराण्हवेळ अतिहर्षी॥ ईश्वरा प्रती गातसे॥ ७५॥
चारी प्रकार गोडियेसी॥ रामक्रीया श्रीरागासी॥ देवीक्री फळमंजिरें सी॥ वसंत राहे ऋतु

काळीं ॥७६॥ ऐसे छत्तीस रागें सी ॥ गायन करी सामवेदासी ॥ निर्वाणरूप भक्तीसी ॥ चंद्रमौ
ळी सांबाच्चिये ॥७७॥ रावणाचे भक्तीसी ॥ प्रसन्न ईश्वर त्वरित तेंसी ॥ निजरूप अति हर्षी ॥ उ
भा राहिला सन्मुख ॥७८॥ पंचवक्त्र त्रिनेत्रेंसी ॥ उभा राहोनि संतोषीं ॥ काय इच्छा तुझे मा
नसीं ॥ मागवर म्हणतसे ॥७९॥ म्हणे रावणन्निवासी ॥ काय मागावें तुजपासीं ॥ लक्ष्मी माझे
घरचीदासी ॥ आठ निधी माझे घरीं ॥८०॥ चतुरानन माझा जोतिषी ॥ तेतीस कोटी देव हर्षी
सेवा करिती अहिर्निशी ॥ सूर्य चंद्र वरुण वायु ॥८१॥ अग्नि सारिखा सेवा करी ॥ वस्त्रें धूत
अति कुसरी ॥ यम माझा आज्ञाधारी ॥ निरोपावेगळ नदंजी कवणा ॥८२॥ इंद्रजि नासारि

७

रवा।पुत्र॥कुंभकर्णा ऐसा भ्रात्रा॥स्थान समुद्रामाजी पवित्र॥कामधेनु माझे घरीं॥८३॥सह
स्त्रकोटीआयुष्य मजा॥हें सांगणें नलगे तुजा॥आलों असें जे काजा॥केलासनेईनलंकेसी
८४॥व्रतअसेजननीसी॥नित्यपूजन तुम्हासी॥मनोरथ पुरवावे भक्तीसी॥कृपासिंधु
दातारा॥८५॥ईश्वरम्हणे रावणासी॥जरी चाड असे पूजेसी॥करीं गायन सामवेदासी॥
चंद्रमौळीचें भक्तीनें॥८६॥जे जे मनीचीवासना॥पुरेल त्वरित एक जाणा॥लिंगअसे प्रा
ण आपणा॥म्हणोनि दिधलें रावणासी॥८७॥पूजा करीं वेळ तिनी॥अष्टोत्तर एक जप क
रुनी॥रुद्राभिषेकें अभिषेकोनी॥पूजा करावी एकचित्तें॥८८॥वर्षें तीन जे पूजिती॥तेचि मा

सें स्वरूप होती ॥ जें जें मनीं इछिती ॥ तें तें पावती अवधारा ॥ ९ ॥ हें लिंग असे जयापासीं ॥ म
त्क नाहीं गा परियेसीं ॥ दर्शन मात्रें महादोषी ॥ उध्धरतील अवधारा ॥ १० ॥ ठेऊंन को भू
मीवरी ॥ जंवरी पावे तुझी नगरी ॥ वृषैं तीन पूजा करीं ॥ तूंचि ईश्वर होवील ॥ ११ ॥ वरल
धोनि लंकेश्वर ॥ निरोप देत कर्पूर गौर ॥ करूनि साष्टांग नमस्कार ॥ निघाला त्व
रित लंकेसी ॥ १२ ॥ इतुका होतां अवसर ॥ नारद होता ऋषेश्वर ॥ निघोनि गेला वे
वगत्र ॥ अमरपुरा इंद्रभुवना ॥ १३ ॥ नारद म्हणे इंद्रासी ॥ कायस्वस्थ चितें बैसला
सी ॥ अमरत्व दिल्हें रावणासी ॥ लक्ष्मी नेली आजि तुम्ची ॥ १४ ॥ चिरायु झाला लं

८

केश्वरा॥ प्राणलिंग देत कर्पूरगोरा॥ आणी कदि धला असे वरा॥ तूं चिरंजीव होसील॥ ९५॥
वर्षें तीन पूजिलें यासी॥ तूंचि माझें स्वरूप होसी॥ तुझें नगर केलासीं॥ मृत्यु नाहीं कदां तुज
९६॥ ऐसा वर लाधोनी॥ गेला रावण संतोषोनी॥ तेतीस कोटी देव कोंढोनी॥ म्हणट नी आतां
तुह्मासी॥ ९७॥ जावें त्वरित तुह्मी आतां॥ सेवा करावी लंकानाथा॥ उर्वशी रंभा मेनिका
त्वरिता॥ भेटीस न्याव्या रावणाचे॥ ९८॥ ऐसें वचन ऐकोनी॥ इंद्र भयाभीत मनीं॥ ना
रदा विनवी कर जोडोनी॥ काय करावें ह्मणतसे॥ ९९॥ नारद ह्मणे इंद्रासी॥ उपाय करा
त्वरितेंसी॥ जावें तुह्मी ब्रह्मयापासीं॥ उपाय करील तयासी॥ १००॥ इंद्र नारद समवे

ता॥ गेले ब्रह्मलोका त्वरित॥ विस्तारेनियां वृत्तांत॥ सांगे इंद्र ब्रह्मयासी॥ १०२॥ ब्रह्मा ह्म
णे इंद्रासी॥ जावें त्वरीत वैकुंठासी॥ दैत्यवैरी हृषीकेशी॥ उपाय करील निर्धारिं॥ ह्म
णोनि निघाले तिघेजण॥ पावले त्वरीत वैकुंठभुवन॥ भेटला तत्काळ नारायण॥ सांगे
ती वृत्तांत त्या रावणाच्या॥ ३॥ विरिंची ह्मणे विष्णूसी॥ प्रतिकार करावा वेगेंसी॥ कारण असे
तुह्मासी॥ रामअवतारीं परियेसा॥ ४॥ तेतीस कोटी देवासी॥ घातलें असे बंदीसी॥ याचि का
रणें तुह्मासी॥ करणें असे अवधारा॥ ५॥ ईश्वराचें प्राणलिंग॥ घेऊनि गेला राक्षस सां
गा॥ आतां रौणा नाहीभंग॥ तोचि होईल ईश्वरा॥ ६॥ त्वरित करावा उपाय यासी॥ पुढें जड हो

ईल तुह्मासी॥ निर्दाळावया राक्षसासी॥ अवतारोनि तुह्मीच यावें॥ ७॥ ऐसें विनवी चतु
रानन॥ मग कोपोनि ह्मणे नारायण॥ कार्य नासेल ह्मणुन॥ निघालाऽउ कर केला सा
८॥ विष्णू आला ईश्वरापासीं॥ ह्मणे शंकरा परियेसी॥ प्राणलिंग रावणासी॥ द्यावया
कारण तुह्मा काय॥ ९॥ रावण क्रूर महादैत्य॥ सुरवर सकळ त्याचे भृत्य॥ कारागृहीं अ
मती समस्त॥ केवि सुटती सांग आह्मा॥ १०॥ ऐसें दुराचारियासी॥ वर देतां तुह्मासीं
दैव लगेलें त्याचे घरासी॥ घेईल स्वर्ग निर्धारें तो॥ ११॥ ईश्वर ह्मणे विष्णूसी जुंए
लोंत याचे भक्तीसी॥ विसर पडला आह्मासी॥ संतोषें दिधलें प्राणलिंग॥ १२॥ आपुलें

शिर छेदोनि देखा॥ वीणा केला स्वहस्तका॥ सप्तस्वर वेदादिका॥ गायन केलें संतोषें॥
१३॥ जरी मागता पार्वतीसी॥ देतों सत्य परियेसीं॥ भुली पडली भक्तीसी॥ लिंग नेलें प्राणमा
झा॥ १४॥ विष्णू म्हणे उमाकांता॥ तुम्ही ऐसा वर देता॥ आम्हां सायास होय तत्वता॥ देत्यउ
न्मत होतासी॥ १५॥ देवद्विजलोकांसी॥ पीडा करिती बहुवसी॥ याचि कारणें आम्हासी॥
अवतार घेणें घडतें देखा॥ १६॥ कधीं दिल्हें लिंग त्यासी॥ नेलें असेल लंकेसी॥ शं
कर म्हणे विष्णूसी॥ पांच घटिका झाल्या आतां॥ १७॥ एकतां चिद्रीव वचन उपाय
करी नारायण॥ धाडिलें चक्र सुदर्शना॥ सूर्या आड व्हावयासी॥ १८॥ बोलाउनि ना

रदासी॥ सांगतसे हृषीकेशी॥ तुह्मी जावें त्वरितेंसी॥ रावण जातो लंकेसि देखवा॥ १९॥ मा
र्गी जाउनि तयासी॥ विलंब करावा परियेसीं॥ जाउं न द्यावे लंकेसी॥ त्वरित जावे ह्म
णतसे॥ २०॥ चक्र झालें सूर्या आड॥ स्नान संध्या रावणाचा आड॥ तुह्मी जाउनि यांह
ढ॥ विलंब करावा तयासी॥ २१॥ ऐकोनियां श्रीविष्णूचे बोला॥ नारद त्वरित निघो
नि गेला॥ मनोवेगें पातला॥ मार्गक्रमितां लंकानाथ॥ २२॥ नारदातें पाठऊनी॥ वि
ष्णू विचारी आपुल्या मनीं॥ गणेशातें बोलाउनी॥ पाठऊं ह्मणे विघ्नासी॥ २३॥
बोलाउनि गणेशासी॥ सांगे विष्णू परियेसीं॥ कैसा रावण तुजसी॥ सदा उपेक्षीतो॥ २४

सकळदेवतुजवंदिती॥ त्याचेमनोरथपुरती॥ तुजजेकांउपेक्षिती॥ विघ्नेंवाधितीत
यासी॥ २५॥ तुजनेणतांरावणदेखा॥ घेउनिगेलानिधानएक॥ प्राणलिंगअ
तिविशेखा॥ नेलेंशिवाचावळउनी॥ २६॥ आतांत्वांकरावेंएक॥ रावणापाशीं
जाऊनिदेख॥ कपटरूपव्हावेंकुअकं॥ बाळवेषाधरोनियां॥ २७॥ वाटे
सिहोईलअस्तमान॥ रावणकरीलसंध्यावंदन॥ नारदगेलायाचिकारण॥
विलंबकरावयाराक्षसासी॥ २८॥ आज्ञाशिवाचीरावणासी॥ नठेवींलिंगभूमि
सी॥ शौचाचमनसमयासी॥ आपणाजवळीनठेविजे॥ २९॥ बाळवेषातुवांजावें॥

त्रिध्य रूपक रुणाभावें॥ सूक्ष्म रूप दाखवावें॥ लिंग ध्यानें विश्वास्करुनी॥२०॥ संध्या
समयीं तुं स्नेहातीं॥ लिंग देईल विश्वासरीती॥ तुवां ढेवावें तत्काळ क्षिती॥ लिंगगु
हील तेथेंची॥२१॥ येणे परी गणेशासी॥ त्रिकवी विष्णू परियेसीं॥ सूतो बोलि तये
हेषीं॥ भानुकें मागे नये वेळीं॥२२॥ लाडु तिळवे पंचखाद्य॥ इक्षु खोबरें दाळि
मेआद्य॥ शार्करा घृत क्षीर सद्य॥ द्यावें त्वरित आपणासी॥२३॥ चणे भिजऊनि
आपणासी॥ तंदूळ लाह्या साखरेंसी॥ त्वरीत भक्षण करावयासी॥ द्यावें स्वामी
ह्मणतसे॥२४॥ जें जें मागीतलें विघ्नेश्वरें॥ त्वरित दिधलें शारंगधरें॥ भक्षीत

निघाला वेगवत्रें ॥ ब्रह्मचारी वेष धरूनी ॥ ३५ ॥ गेला होता नारद पुढें ॥ ब्रह्मऋ-
षी महात्म्य गाढें ॥ उभा देखला रावणापुढें ॥ कवण कोठूनि आलासी ॥ ३६ ॥ रावण म्ह-
णे नारदासी ॥ गेलों होतों कैलासासी ॥ केलें उत्कृष्ट तपासी ॥ तोषविलें तया शिवा ॥
३७ ॥ तेणें प्रसन्न होऊनि आम्हासी ॥ लिंग दिधलें परियेसीं ॥ आणी कू सांगीत-
लें संतोषीं ॥ लिंग महिमा अपार ॥ ३८ ॥ नारद म्हणे लंकनाथा ॥ देव थोर तुझें
आतां ॥ लिंग लाधलोसि अद्भुता ॥ जाणों आम्ही आद्यंता ॥ ३९ ॥ दाखवीं लिंग
आम्हासी ॥ खुणे ओळखूं परियेसीं ॥ लिंगलक्षण विस्तारेंसी ॥ सांगूं आम्ही तुजला

गी॥ ४०॥ नारदाचिया वचनासी॥ नकरी विश्वास परियेंसी॥ दाखवीतसे दुरोनि लिं
गासी॥ भक्त करी नित्यासमयीं॥ ४१॥ नारद म्हणे लंकेश्वरा॥ लिंग महिमेंचा प्रका
रु ऐसा॥ सांगेन तूज बहु स्फुरसा॥ बैसोनि ऐकें स्वस्थचित्तें॥ ४२॥ लिंग उपज
लें कवणे दिवसीं॥ जाणों आली पूर्वेसी॥ एकचित्तें परियेसी॥ कथा असे अ
ति अपूर्व॥ ४३॥ गिळनि सकळ सोरभासी॥ मृग एक काळाग्नि समेंसी॥ ब्र
ह्मांड खंड परियेंसी॥ पडिला होता तो मृग॥ ४४॥ ब्रह्मा विष्णू महेश्वरें सी॥
गेले होते पारधियेसी॥ मृग मारिले परियेसीं॥ भक्षिलें मेद तयावेळीं॥ ४५॥

तयासि होतीं तीन श्रृंग ॥ खालीं असती तीन लिंग ॥ तिघीं घेंतले तीन भाग ॥ प्राणलिंगें
परियेसा ॥ ४६ ॥ लिंग महिमा एक कानीं ॥ जे पूजिती वर्ष तीनी ॥ तेचि ईश्वर होती निर्गुणी
वेदमूर्ती तोचि होय ॥ ४७ ॥ लिंग असे जये स्थानीं ॥ तेंचि कैलास जाण मनीं ॥ महत्व अ
से याच्या गुणीं ॥ ब्रह्मा विष्णू महेश्वरासी ॥ ४८ ॥ असे आणीक एक वरवे ॥ सांगेन ऐ
क एका भावें ॥ रावण म्हणे आम्हा जावें ॥ असे त्वरित लंकेसी ॥ ४९ ॥ म्हणोनि निघा
ला महाबळी ॥ नारद म्हणे तया वेळीं ॥ सूर्यास्त आहे जवळी ॥ संध्याकाळ ब्राह्मणा
सी ॥ १५० ॥ सहस्रवेळ आचरसी ॥ संध्याकाळीं मार्ग क्रमिसी ॥ वाटे सहोईल तुजनि

त्री ॥ संध्यालोप होईला ॥ ५१ ॥ आह्मी जाऊं संध्यावंदनासी ॥ ह्मणोनि नारद विनयेंसी ॥
पुसोनियां रावणासी ॥ गेला नारद नदीसी ॥ ५२ ॥ इतुकिया अवसरीं ॥ पातला गणेश ब्र
ह्मचारी ॥ रावणापुढें चांचरी ॥ समिधा तोडी कवतुकें ॥ ५३ ॥ रावण चिंती मानसीं ॥ व्रतभं
ग होईल आपणासी ॥ संध्या करावी त्रिकाळेंसी ॥ संदेह घडला ह्मणतसे ॥ ५४ ॥ ईश्व
रें सांगीतलें आह्मासी ॥ लिंग न ठेवावें भूमीसी ॥ संध्यासमयो झाली निशी ॥ काय क
रूं ह्मणतसे ॥ ५५ ॥ तंव देखिला ब्रह्मचारी ॥ अति सुंदर बाळकापरी ॥ हिंडतसे न
दीतीरीं ॥ देखिला रावणें तयावेळीं ॥ ५६ ॥ मनीं विचारी लंकानाथ ॥ ब्रह्मचारी कुमा

र दिसत॥ न करी आमचा विश्वासघात॥ लिंग देऊं तया हातीं॥५७॥ संध्या करूं स्वस्थचित्तें मी
लिंग असेल तयापासीं॥ बाळक असे हें निश्चयेंसी॥ म्हणोनि गेला तयाजवळी॥५८॥ दे
खोनियां द्वादशाब्दिरा॥ पळ तसें लंबोदरा॥ रावण झाला द्विजवर॥ अभय देऊनि गेला ज
वळी॥५९॥ रावण म्हणे तयासी॥ तूं कवणाचा सांग आम्हासी॥ मातापिता कवण तुज
सी॥ कवणकुळीं जन्म तुझा॥६०॥ ब्रह्मचारी बोले रावणा॥ इतकें पुसतसी कवण्या
कारणा॥ आमुच्या बापें तुझ्या रुणा॥ काय द्यावें सांग मज॥६१॥ हांसोनियां लंके
श्वर॥ लोभें धरिला याचा कर॥ सांग बाळका कवणाचा कुमर॥ प्रीतिभावें पुसतों मी

६२॥ ब्रह्मचारी ह्मणे रावणासी॥ आमुचा पिता काश्यपु ऋषी॥ जटाधारी भस्मांगासी॥ रु
द्राक्षमाळा असती देखा॥ ६३॥ शंकर ह्मणती तयासी॥ भीक्षा मागणें अहिर्निशी॥ वृ
षभारूढ उमासरसी॥ जननी तें जगन्माता॥ ६४॥ इतुकें आह्मा पुसतोसी॥ तुज देखतां
भय मानसीं॥ बहूत वाटे परियेसीं॥ सोडें हा तुजा छंदे॥ ६५॥ रावण ह्मणे ब्रह्मचा
री॥ तुझा पिता असे दरिद्री॥ भीक्षा मागे घरोघरीं॥ सौख्य तुज काही नसे॥ ६६॥ आ
मुचे नगर लंकापुर॥ रत्नखचीत असे सुंदर॥ आह्मासवें चाल सत्वर॥ देवपूजा
करीत जायीं॥ ६७॥ जें जें मागसी आह्मासी॥ सकळ देईन परियेसीं॥ सुखें राहावें म

जपासी॥ ह्मणेरावणतेवेळीं॥ ६८॥ ब्रह्मचारीह्मणेत्यासी॥ लंकेसिबहूतराक्षसी॥ आ
ली बाळकअरण्यवासी॥ खातीलतेथेंजतांची॥ ६९॥ नयेऊं तुझियानगरासी॥
सोडजाऊंदेघरासी॥ क्षुधेपीडितोबहुवसीं॥ ह्मणोनिभक्षितोभातुकें॥ ७०॥ इतुकें
ऐकोनिलंकनाथ॥ त्याबाळकासंबोखित॥ लिंगधरीं रे ऐसें ह्मणत॥ मी संध्या
करीनतंवरी॥ ७१॥ बाळकविनवीतयासी॥ नधरीलिंगपरियेंसी॥ मी ब्रह्मचारीअ
रण्यवासी॥ उपद्रवूंनकोह्मणतसे॥ ७२॥ जझेंलिंगअसेजड॥ आपणबाळअसें
वाड॥ नेघेंलिंगजाऊंदेसोड॥ धर्मघडेलतुजलागीं॥ ७३॥ नानापरीसंबोखित

लिंग देत लंकानाथ॥ संध्या करावया आपण त्वरित॥ समुद्रतीरीं बैसला॥ ७४॥ ब्रह्म
चारी तयासी॥ उभा विनवीतसे रावण्णासी॥ जड झालिया आपणासी॥ ठेवीन त्वरित
भूमीवरी॥ ७५॥ वेळ तीन परियेसीं॥ बोलावीन तुम्हासी॥ वेळ लागलिया परियेसी
आपण ठेवीन भूमीवरी॥ ७६॥ ऐसा निर्धार करूनी॥ उभा गणेश लिंग घेऊनी॥ सम
स्त देव विमानीं॥ बैसोनि पाहाती कवतुक॥ ७७॥ अर्घ्यसमयीं रावणासी॥ बोला
वी गणेश परियेसीं॥ जड झालें लिंग आम्हासी॥ सत्वर घे गा म्हणतसे॥ ७८॥ न्या
स पूर्वक अर्घ्य देखा॥ रावण करी अति विवेका॥ हातीं दाखवी बाळका॥ ये तों राहें म्हणे॥

नी॥७९॥ आणी कक्षणभर राहोनी॥ गणेश बोलले वेळ दोनी॥ जड जाह्लें ह्मणोनी॥ त्री
घ्रयावें ह्मणतसे॥८०॥ नयेरावण ध्यानस्त॥ गणेश असेंउ चारित॥ समस्त देवांतेंसा
क्षी करीत॥ लिंग ठेवीन भूमीवरी॥८१॥ श्रीविष्णूतें स्मरोनी॥ लिंग ठेविलें स्थापोनी॥
संतोष झाला गगनीं॥ पुष्पें वर्षती सुरवर॥८२॥ अर्घ्य देवोनि लंकेश्वर॥ निघोनि आ
ला वेगवस्त्र॥ तव देखिलें लिंग स्वतन्त्र॥ भूमी सहीत हालतसे॥८३॥ अवेशोनि रा
वण देखा॥ ठोंसे मारी गणनायका॥ हास्यवदनें रडे तो ऐका॥ भूमीवरी लोळतसे॥८४॥
ह्मणे माझिया पित्यासी॥ सांगेन आतां त्वरितेंसी॥ कां मारिलें मज बाळकासी॥ ह्मणो

निरउननि घाला देखा ॥ ८५ ॥ मग रावण काय करी ॥ लिंग धरोनियां दृढ करीं ॥ उचलूं गे
ला नाना परी ॥ भूमीसहीत हालतसे ॥ ८६ ॥ कांपे धरणी तये वेळी ॥ रावण उचली म
हाबळी ॥ न ये लिंग शिर आफळी ॥ महाबळी राहिला ॥ ८७ ॥ नाम पावला याचि का
रणे ॥ महाबळेश्वर लिंग जाण ॥ मुरडोनि वोढितां रावण ॥ गोकर्णाकार जाहाला ॥
८८ ॥ ऐसें करितां लंकनाथ ॥ मागुती गेलात पार्था ॥ ख्याती झाली गोकर्णांता ॥ सम
स्त देव तेथें आले ॥ ८९ ॥ आणीक असे अपार महिमा ॥ सांगतसे अनुपमा ॥ स्कंदपु
राणीं वर्णिली शिमा ॥ प्रख्यात असे परियेसा ॥ ९० ॥ ऐकोनि सिधाचें वचन ॥ नामधा

रकसंतोषोन॥ पुनरपी चरणा लागे जाण॥ म्हणे सरस्वती गंगाधरु॥९१॥ इति श्री
गुरुचरित्र परमकथाकल्पतरु श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने नामधारकसं
वादे गोकर्णप्रतिष्ठानो नाम षष्टोऽध्यायः॥६॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु॥ ओव्या
१९२॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥छ॥

श्रीदत्तात्रयजगद्गुरवे नमः॥ नामधारक म्हणे सिद्धासी॥ गोकर्ण महिमा आम्हासी॥
निरोपिजे स्वामी ह्ळ. पैसी॥ पूर्वीं कोणा साक्ष झाली॥ १॥ समस्त तीर्थें सांडूनी॥ श्रीपाद गे
ले किं कारणीं॥ पूर्वीं आधार केला कवणी॥ पुराण कथा सांगा मज॥ २॥ ज्यावरी असे
गुरूची प्रीती॥ तीर्थ महिमा ऐकणें चित्तीं॥ वांछा होतसे ज्ञानज्योती॥ कृपासिंधू
गुरुराया॥ ३॥ सिद्ध म्हणे नामधारकासी॥ गोकर्ण महिमा मज पुससी॥ सांगेन तुज
विस्तारेंसी॥ एकचित्तें परियेसा॥ ४॥ पूर्वींयुक्ष्वाकुवंशीं॥ मित्रसह राजा परियेसी
प्रतापवंत क्षत्रराशी॥ सर्वधर्मरत देखा॥ ५॥ राजा सकळ शास्त्रज्ञ॥ विवेकी असे

श्रुतीनिपुण ॥ बलाढ्य शूर महाभीम ॥ नित्योद्योगी दयानिधी ॥ ६ ॥ असतां राजा एके
दिवसीं ॥ विनोदें निघाला पारधीसी ॥ प्रवेशला महावनासी ॥ वसतीशार्दूळसिंह जे
थें ॥ ७ ॥ निर्मनुष्य अरण्यांत ॥ राजा पारधी खेळत ॥ भेटला तेथें अद्भुत ॥ दैत्य महाभ
यानक ॥ ८ ॥ राजा देखोनि तयासी ॥ वधें शर कोपेंसी ॥ मूर्छना येऊ धरिणीसी ॥
पडला दैत्य तयावेळीं ॥ ९ ॥ होता तयाचा बंधू जवळी ॥ आक्रंदनसे प्रबळी ॥ पाषा
णहाणी कपाळीं ॥ बंधूशोकें करोनियां ॥ १० ॥ प्राणत्यजितां निशाचर ॥ बंधूसि म्ह
णे नरि तूं होसी माझा सहोदर ॥ तया रायाचा निर्धार ॥ सूड घेईं माझा तूं ॥ ११ ॥

ऐसे बोलूनि बंधूसी ॥ दैत्य पावला पंचत्वासी ॥ अनेक माया तयापासीं ॥ नररूप
धरिलें तया वेळीं ॥ १२ ॥ रूप धरोनि मानवाचें ॥ सौम्य वाणी बोले वाचे ॥ सेवकत्व क
री राजयाचें ॥ अति नम्रत्व बोंलोनियां ॥ १३ ॥ सेवा करी नाना प्रकारी ॥ सेवकाचे
सारिखें मन धरी ॥ ऐसा केचितू दिवसवरी ॥ वनांतरीं राजा होता देखा ॥ १४ ॥ स
मस्त मृग जिंकूनी ॥ दुष्ट जीवातें वधोनी ॥ राजा आला परतोनी ॥ आपुले नगरा
पति येसा ॥ १५ ॥ ऐसें असतां एके दिवसी ॥ पित्रश्राद्ध आलें परियेंसीं ॥ आमं
त्रण सांगे ऋषींसी ॥ वसिष्ठादिकां परियेसा ॥ १६ ॥ ते दिवसीं राजा स्वयपाक ॥ क

रवीराजा सविवेका ॥ कापट्य होता जो सेवका ॥ तया स्थानी ठेविला ॥ १७ ॥ रा
जा ह्मणे तयासी ॥ पाकस्थानी तूं वससी ॥ जेजें मागेल भाणेसी ॥ सर्व आणूनि
तां द्यावें ॥ १८ ॥ अंगिकारोनि तो सेवका ॥ नरमांस आणोनि देखा ॥ कापट्यभा
वे करवी पाक ॥ केली शाक तयावेळीं ॥ १९ ॥ ठाय घालितां ऋषेश्वरासी ॥ प
हिलेंचि वाढिलें मांसासी ॥ पाहातां कोप आला वसिष्ठासी ॥ दिधला शाप त
यावेंळी ॥ २० ॥ वसिष्ठ ह्मणे रायासी ॥ नरमांस आह्मा वाढिसी ॥ त्वरित ब्र
ह्मराक्षस होसी ॥ ह्मणोनि शाप दीधला ॥ २१ ॥ शाप देतां तयेकाळीं ॥ राजा को

पळात्तत्काळीं ॥ अपराध नसतां प्रबळी ॥ वायां मज कां श्रापिलें ॥ २२ ॥ नेणों
मांस पाक कोणी केला ॥ माझा निरोप नाहीं झाला ॥ वृथा आमुते श्रापदि
धला ॥ आपण श्रापी नत्स पा तसे ॥ २३ ॥ उदक घेउनी अंजुळी ॥ श्रापावयां
सिध्द झाला तये काळीं ॥ नवरोज पत्नी येउनि जवळी ॥ वर्जी आपुले पतीतें ॥ २४ ॥ पती
स म्हणे ते नारी ॥ गुरूसि श्रापितां दोष भारी ॥ वंदूनि तयाचे चरण धरी ॥ भवसागरीं तर
शील ॥ २५ ॥ मदयतीसतीचे वंचन ॥ मानिता झाला राजा आपण ॥ अंजुळीचें उदक जा
ण ॥ टाकी आपुले चरणावरी ॥ २६ ॥ श्राप देनां कल्मषपाणी ॥ पडलें राजयाचे चरणीं

कल्मषपाद नाम म्हणोनी ॥ ब्रह्मराक्षस झाला तो राव ॥२७॥ राजपत्नी परियेसीं ॥ लाग
ली वसिष्ठचरणासी ॥ उद्धरीं स्वामी बाळकासी ॥ येवढा कोप काय काज ॥२८॥ करुणावच
न ऐकोनी ॥ शांत झाला वसिष्ठ मुनी ॥ वर्षें बारा क्रमोनी ॥ पुनरपी राजा होईल ॥२९॥ उःशाप दे
ऊनि वसिष्ठ ऋषी ॥ गेला आपुले स्थानासी ॥ ब्रह्मराक्षस राजा परियेसी ॥ होऊनि गेला
वनांतरा ॥३०॥ निर्मनुष्य अरण्यांत ॥ राजा राहिला प्रख्यात ॥ भक्षीतसे अनेक जंता ॥ पशु
मनुष्यादि करुनी ॥३१॥ ऐसें क्रमितां तये वनी ॥ मार्गस्थ दंपत्यें दोनीं ॥ ब्राह्मण जातां मार्ग
क्रमुनी ॥ देखिला राक्षस भयासुर ॥३२॥ येऊनि धरी ब्राह्मणासी ॥ व्याघ्र जैसा पशूसी ॥

३

घेऊनि गेला भक्षावयासी ॥ विप्रस्त्री समागमें ॥ ३३ ॥ अति शोक करी ब्राह्मणी ॥ जा
ई नि लागे राक्षसचरणीं ॥ राखें मज ला अहेवपणी ॥ प्राणेश्वरा नें सोडीं पितया ॥ ३४ ॥
न भक्षीं गा माझा पती ॥ माझी न यावरि अति प्रीती ॥ मज भक्षीं गा स्कमती ॥ वल्लभा
तें सोडुनी ॥ ३५ ॥ पतीवीण राहातां नारी ॥ जन्म वृथा चि दगडापरी ॥ पहिलें मानें स्वि
कांरी ॥ प्राण राखें पतीचे ॥ ३६ ॥ पति लावण्य पूर्ववयसी ॥ वेदशास्त्रपारगासी ॥ याच्या
प्राण जरि तूं रक्षिसी ॥ जगीं होईल तुज पुण्य ॥ ३७ ॥ कृपा करीं गा आह्मावरी ॥ हो
ईन तुझी कन्याकुमरी ॥ मज पुत्र होतील जरी ॥ नाम वाढवीन तुझें मी ॥ ३८ ॥ ऐसें ना

नापरी देखा॥ विप्रस्त्री करी महा दुःखा॥ बोलन मानोनि राक्षसें ऐका॥ त्या ब्राह्मणा
तें भक्षिलें॥ ३९॥ पतीतें भक्षिलें देखोनी॥ शाप वदली ते ब्राह्मणी॥ ह्मणे राक्षसा ऐक
कानीं॥ शाप माझा निर्धारीं॥ ४०॥ तूं राजा सूर्यवंशीं॥ शापास्तव राक्षस झालासी॥ पु
न्हा मागुता राजा होसी॥ द्वादश वर्षानंतर॥ ४१॥ रमतां तूं स्त्रियेसवें॥ प्राण जाईल स्व
भावें॥ आह्मां अनाथां भक्षिलें दुष्टभावें॥ दुरात्मया राक्षसा॥ ४२॥ शाप देऊनि त
यावेळीं॥ पतीच्या अस्थी मिळऊनि जवळी॥ काष्ठें घालूनियां प्रबळी॥ अग्नी प्र
वेशा केला तिणें॥ ४३॥ ऐसें असतां राजा देखा॥ क्रमिलीं तेथें बारा वरिखा॥ पुनरपीं

राजा होऊनि रेका ॥ आला आपुले नगरासी ॥ ४४ ॥ विप्रस्त्रियेचें शापवचन ॥
स्त्रियेसि सांगीतली खुण ॥ ह्मणे संग करिता क्षण ॥ मृत्यु असे आपणासी ॥ ४५ ॥ ऐ-
कोनि पतीचें वचन ॥ मदयंती दुःख करी आपण ॥ मन करूनि निर्वाण ॥ त्यजावया
प्राण पाहातसे ॥ ४६ ॥ मदयंती ह्मणे रायासी ॥ संतान नाहीं तुमचे वंशासी ॥ आ-
तां कष्टलों बारा वर्षीं ॥ आपुलें कर्म न चुकेची ॥ ४७ ॥ ऐकोनि सतीचें वचन ॥ शोकें
दाटला अती गहन ॥ अश्रु आले नेत्रांतुन ॥ काय करूं ह्मणतसे ॥ ४८ ॥ मंत्री वृद्ध पु-
रोहितासी ॥ बोलाविलें परियेसी ॥ ब्रह्महत्या घडली आह्मासी ॥ विमोचन होय क-

वणेपरी॥ ४९॥ मंत्रीवृद्धपुरोहित॥ तयांसिह्मणती ऐकामान॥ तीर्थें आचरावींसम
स्त॥ तेणेंपुनीत व्हाल तुह्मी॥ ५०॥ करोनि ऐसा विचार॥ राजानिघे तीर्थासाचार॥ सर्व
तीर्थेंपरिकर॥ विधीपूर्वककरीतसे॥ ५१॥ ज्याज्यातीर्थाजाय आपण॥ अनेकपुण्यक
रीजाण॥ यज्ञादिकर्मब्राह्मणादान॥ अन्नसंतर्पणकरीतसे॥ ५२॥ ऐसीं नानातीर्थें
करित॥ परी ब्रह्महत्यासवेंयेत॥ अघोररूपीअसेदिसत॥ कवण्यापरीनजायची
५३॥ कष्टोनिराजा बहुतापरी॥ निर्वाणहोऊनिमनाभीतरी॥ हिंडतआलामिथु
ळापुरी॥ चिंताग्रस्तहोऊनियां॥ ५४॥ नगराबाह्यप्रदेशीं॥ श्रमोनिराजापरिये

सीं॥ चिंता करी मानसीं॥ वृक्षछाये बैसलासे॥ ५५॥ ऋषेश्वरांसमवेन जैसा रुद्रप्र
काशित॥ गौतमऋषी अवचित॥ तयास्थानासि पातला॥ ५६॥ राजा देखोनि गौतमा
सी॥ चरणीं लोळे संतोषीं॥ नमन करी साष्टांगेंसी॥ भक्तिभावें करोनियां॥ ५७॥ अ
श्वासूनि तये वेळीं॥ गौतम पुसे करुणा बाहाळी॥ क्षेमसमाधान सकळी॥ पुस
ता जाहला वृत्तांत॥ ५८॥ काय झालें तुझें राज्य॥ अरण्यवासाचें काय काज॥ चिंता
कुळित मुखांबुज॥ कवण कार्य घडलें असे॥ ५९॥ ऐकोनि ऋषीचें वचन॥ राजा
सांगे विस्तारोन॥ श्राप जाहाला ब्रह्मवचन॥ ब्रह्महत्या घडली मज॥ ६०॥ प्रायश्चि

त्त सकळिक ॥ यज्ञादि सर्वधर्मादिक ॥ स्कक्षेत्रें अपार तीर्थें देख ॥ आपणसक
ळ आचरलों ॥ ६१ ॥ त्रा मन होय महादोष ॥ सवेंचि येत अघोर रूप ॥ व्रतें आचर
लों कोटी शत ॥ न जाय दोष परियेसा ॥ ६२ ॥ आजिचेनि माझें सफळ जन्म ॥ दर्शन
जाहालें जी तुमचें चरण ॥ होतील माझे कष्टनिवारण ॥ म्हणोनि चरणा लागला ॥
६३ ॥ ऐकोनि रायाचें वचन ॥ करुणायुक्त सांगे गौतम ॥ भय सांडीं गा निर्वाणवचन
तारील त्र्यंकर मत्यंजयो ॥ ६४ ॥ तुझे पापनिवारणासी ॥ सांगेन तीर्थ विशेषीं ॥ म
हापातकसंहारावयासी ॥ गोकणक्षेत्र असे भलें ॥ ६५ ॥ स्मरण करितां गोकर्णासी

ब्रह्महत्यादिपापनाशी ॥ जेथें ईश्वर सदा निवासी ॥ मृत्यंजय सदाशिव ॥ ६६ ॥ जैसें
कैलासाचे शिखर ॥ अथवा मूर्धानी मंदिर ॥ निश्चय वास कपूर्गौरा ॥ गोकर्णक्षे
त्रीं परियेसा ॥ ६७ ॥ जेवीं अंधःकार रजनी ॥ प्रकाशाशावया जे कि अग्नी ॥ चंद्रो
दय जरि होय निर्वाणी ॥ तरि सूर्यप्रकाशावीण गती नव्हे ॥ ६८ ॥ तैसें समस्त ती
र्थांनीं ॥ पापन वजाय याचिगुणें ॥ सूर्योदयीं तम हरणें ॥ तैसें गोकर्णदर्शनें हो
य ॥ ६९ ॥ सहस्त्र ब्रह्महत्या जरी ॥ घडल्या असती या शरीरीं ॥ प्रवेश होतां गोक
र्णक्षेत्रीं ॥ शुधात्मा होय परियेसा ॥ ७० ॥ रुद्रोपेंद्रविरिंचीदेखा ॥ जावूनि तया

गु० च०
८

स्थानीं ऐका ॥ तप केलें सकळिका ॥ कार्यसिद्धी होय त्यांप्रती ॥ ७१ ॥ भक्तिपूर्वक त
या स्थानीं ॥ जपव्रत करी जाणोनी ॥ फळ होय त्या लक्षगुणी ॥ असे पुण्यक्षेत्र ऐसें ॥ ७२
जेथें ब्रह्माविष्णू देखा ॥ इंद्रादि देवां सकळिकां ॥ साध्य झालें तप ऐका ॥ या वेगळें
काय सांगूं ॥ ७३ ॥ जाणतो साक्षांत ईश्वर ॥ गोकर्णक्षेत्र कैलासपुर ॥ प्रतिष्ठा क
री विघ्नेश्वर ॥ विष्णू निरोपें विनयार्थ ॥ ७४ ॥ समस्त देव तेथें येती ॥ पुण्यक्षेत्रीं
वास करिती ॥ ब्रह्माविष्णू इंद्रासहिती ॥ विश्वेदेव मरुद्गण ॥ ७५ ॥ चंद्र सूर्य वसू
वादिका ॥ पूर्वद्वारीं राहिले ऐका ॥ प्रीती करीं भक्तीपूर्वक ॥ बैसले असती तये स्थानीं ॥

अ०
८

८

७६॥ अग्नियम चित्रगुप्त॥ एकादश रुद्र पवित्र॥ दक्षिण द्वारीं वास करिता॥ संतोषें राहि
ले असती॥ ७७॥ वरुणादि गंगा सकळी॥ राहाती पश्चिम द्वारस्थळी॥ प्रीतीकर चंद्र
मौळी॥ वास केला परियेसा॥ ७८॥ कुबेर वायु भद्रकाळी॥ मातृदेवता चंडी सक
ळी॥ उत्तर वास त्रिकाळीं॥ पूजा करिती महाबळेश्वराची॥ ७९॥ चित्ररथादि वि
श्वावसू परियेसीं॥ चित्रसेन गंधर्वस्करसीं॥ पूजा करिती सदाशिवाली॥ सदां
व सोनित याठायीं॥ ८०॥ घृताचीरंभा मेनिका॥ तिळोत्तमा उर्वशी ऐका॥ नि
त्य नृत्य करिती देखा॥ महाबळेश्वराचे सन्मुखा॥ ८१॥ वसिष्ठ कश्यप कण्व

ऋषी॥ विश्वामित्र महातापसी॥ भारद्वाज जैमिनी जांबाल ऋषी॥ पूजा करिती
संदा तथें॥ ८२॥ कृतायुगीं ब्रह्मऋषी॥ आचार करिती महातापसी॥ महाबळ च
भक्तीसी॥ राहिला गोकर्णक्षेत्रांत॥ ८३॥ मरीची नारद अत्रि ऋषी॥ दक्षादि ब्रह्मऋषी
परियेसीं॥ सनकाद्यादि तापसी॥ उपनिषदार्थे उपासिती॥ ८४॥ अनेक
सिद्धसाध्य जाणा॥ मुनीश्वर अजीन धारण॥ दंडधारी सन्यासी निर्गुण
ब्रह्मचारी तेथें वसती॥ ८५॥ अस्थिमात्र शरीरें सी॥ अनुष्ठिती महातापसी॥ पूजा
करिती भक्तीसी॥ चंद्रमौळीची परियेसा॥ ८६॥ गंधर्वादि अष्ट देव॥ पितरा सिद्ध

अष्टवसवा॥ विद्याधरकिंनरसर्व॥ सेवेजातीनिरंतरा॥ ८७॥ गुह्यककिंन्नर स्वर्गलो
क॥ शेषादिनागतक्षका॥ पिशाचवेताळसकळिक॥ जातीपूजेसितयास्थानीं॥ ८८॥
नानाशृंगारकरुनी॥ अनेकभूषणेंविराजमानी॥ सूर्यचंद्राग्नीविमानी॥ वहनींयेतीव
ळघेोनियां॥ ८९॥ स्तोत्रेंगायनकरितीदेखा॥ नमितीनृत्यकरितीऐका॥ पूजेका
रणेंयेतीसकळदेखा॥ महाबळेश्वरलिंगासी॥ ९०॥ जेजेइछितीमनकामना
पावतीत्वरितनिर्धारिंजाणा॥ समाननाहीक्षेत्रगोकर्णा॥ याब्रह्मांडमंडपांत॥
९१॥ अगस्त्यादिसनत्कुमार॥ प्रियव्रतादिराजकुमर॥ अग्निदेवदानवादिवर॥

ळाधलेसर्वतयाठायीं॥९२॥श्रुश्रुमारीभद्रकाळी॥ पूजाकरितीत्रिकाळी॥नागातें
गरुडनगिळी॥ महाबळेश्वरदर्शनें॥९३॥रावणादिराक्षसकुळीं॥कुंभकर्णयि
दूसकळी॥ वरलाधलेयेस्थळीं॥ बिभीषणपूजीतसे॥९४॥ ऐसींअनेकदेवकु
ळें॥सिधदानवादिसकळें॥गोकर्णक्षेत्रींजाऊनिप्रबळें॥आराधितीनानाप
री॥९५॥लिंगस्थापिलेंआपुलेनामीं॥असेख्यातीतयानामीं॥वरलाधलेअ
नेककामीं॥चतुर्विधपुरुषार्थ॥९६॥ब्रह्माविष्णूआपणदेखा॥त्रिविधविना
यका॥ आपुलेनामींलिंगदेखा॥प्रतिष्ठाकेलीतयेठायीं॥९७॥धर्मक्षेत्रपा

ळादी ॥ दुर्गादेवी शक्ति स्वंदी ॥ लिंग स्थापिलें आपुले नामीं ॥ तया गोकर्णक्षेत्रांत ॥ ९८
गोकर्णक्षेत्र असे गहन ॥ लिंगतीर्थें असंख्य जाण ॥ पदोपदीं असे निर्गुण ॥ ऐसें क्षेत्र
अनुपम्य असे ॥ ९९ ॥ सांगों किती विस्तारोन ॥ असंख्यात तीर्थें जाण ॥ पाषाण समस्त
देव हे खुण ॥ समस्त उदक जाणावीं तीर्थें ॥ १०० ॥ कृतायुगीं महाबळेश्वर श्वेत ॥ त्रे
तायुगीं दिसे लोहित ॥ द्वापारीं स्कृवर्ण पीत ॥ कलियुगीं कृष्णावर्ण जाहला असे ॥
१ ॥ सप्तपाताळ खोल जावोन ॥ उभें असे लिंग आपण ॥ कलियुगीं मृदु होऊन ॥ दि
से सूक्ष्मपानें ॥ २ ॥ पश्चिमसमुद्रतीरासी ॥ गोकर्णक्षेत्र विख्यातीं ॥ ब्रह्महत्यादि पात

केंनाशी ॥ काय आश्चिर्य परियेसा ॥ ब्रह्महत्यादि महापापें ॥ परिहरती निःशेष
महातपें ॥ दुःशीळ दुराचारी पापें ॥ जाती गोकर्णदर्शनें ॥ ४ ॥ दर्शनमात्रें पुनीत
होती ॥ समस्त काम्यार्थ साधती ॥ अंतीं होय तयांसि गती ॥ गोकर्णलिंगदर्शनीं ॥
५ ॥ तये स्थानीं पुण्यदिवसीं ॥ जे जे अर्चिती भक्तीसी ॥ तेचि जाणा रुद्रअंशी ॥ रा
यासि म्हणे गौतम ॥ ६ ॥ एकादे समयीं गोकर्णासी ॥ जाय भक्तीनें मानुषी ॥ पूजा
करितां सदाशिवासी ॥ शिवपद निश्चयें पावे जाणा ॥ ७ ॥ आदित्यसोमबुध
वारीं ॥ अमावास्यादि पर्वणीभीतरी ॥ स्नान करूनि समुद्रतीरीं ॥ दानधर्म करावा

पा। शिवपूजा व्रत होम॥ व्रत ब्राह्मणसंतर्पण॥ किंचित करितां अनंत पुण्य॥ गोतम
म्हणे रायासी॥ ९॥ प्रतिपातादि पर्वणीसी॥ सूर्यसंक्रांतिचे दिवसीं॥ महाप्रदोष त्र
योदशी॥ पूजितां पुण्य अगाध॥ १०॥ काय सांगों त्याचा महिमा॥ निवाडा होय
अखिल कर्मा॥ ईश्वर भोळा अनंत महिमा॥ पूजनमात्रें तुष्टतसे॥ ११॥ असीत
पक्ष मासीं॥ शिवरात्री चतुर्दशीसी॥ बिल्वपत्र वाहिले यासी॥ दुर्लभ असे
त्रिभुवनांत॥ १२॥ ऐसें अनुपम्य स्थान असतां॥ न जाती मूर्ख लोक तीर्था॥ शिव
तीर्थ असे दुर्लभता॥ नेणती मूढ बधीर जन॥ १३॥ उपोषणादि जागरण॥ लिं

गसंनिध गोकर्ण ॥ स्वर्गासि जावें यापासून ॥ पस्यती असे परियेसा ॥ १४ ॥ ऐसें या
गोकर्णस्थानासी ॥ जे जाती यात्रेसी ॥ चतुर्विध पुरुषार्थासी ॥ लाधती लोक अव
धारा ॥ १५ ॥ स्नान करूनि समस्त तीर्थां ॥ महाबळेश्वर लिंगार्था ॥ पूजा करावी भ
क्तार्थां ॥ पातकाअतिरिक्त होय जाणा ॥ १६ ॥ ऐशा परी गोकर्ण महिमा ॥ प्रकाशिली
ऋषी गोतमा ॥ राजा ऐकोनि अतिप्रेमा ॥ पुसता झाला तेवेळीं ॥ १७ ॥ राजा म्हणे
गोतमासी ॥ गोकर्णस्थान निरोपिलें सी ॥ पूर्वी पावला कोण पापासी ॥ साक्ष ज
हाली असेल ॥ १८ ॥ विस्तारोनि तें आम्हासी ॥ सांगावें स्वामी परियेसीं ॥ म्हणोनि

गु॰च॰
१२

लागला चरणासी॥ अतिभक्ती करोनियां॥१९॥ ह्मणे गौतम तये वेळीं॥ गोकर्ण
क्षेत्र महाबळी॥ जाणों आह्मी बहुकाळीं॥ अपार साक्षी देखिली असे॥१२०॥
गेलों होतों आह्मी यात्रे॥ देखिलें दृष्टांत विचित्र॥ आले होते तेथें जनमात्र॥
यात्रारूपे करूनी॥२१॥ माध्यान्हकाळीं आह्मी तेथें॥ बैसलों होतों वृक्षछा
येतें॥ दुरोनि देखिलें चांडाळीतें॥ वृद्ध अंध महारोगी॥२२॥ शुष्कमुखी नि
राहारी॥ कुष्ट सर्वांग गळा रीरीं॥ कृमी पीडित से अघोरी॥ पूश्रोणीत दुर्गंधा॥२३
कुक्षरोगी गंडमाळा॥ कफ दाटला असे गळां॥ दंतहीन अतिविकळा॥ वस्त्र

अ॰
७
१२

नाहीं परिधाना ॥२४॥ चंद्रसूर्य कीर्ण पडतां ॥ प्राण जाय कंठगता ॥ शोच
व्याधी असे बहुता ॥ सर्वांग मूळ महा दुःखी ॥१२५॥ वैधव्य आपण केश
वपनी ॥ दिसे जैसी मुखरमणी ॥ क्षण क्षण पडे धरणी ॥ प्राण त्याग क
रूं पाहे ॥२६॥ ऐसी अवस्था चांडाळिसी ॥ आली वृक्षछायेसी ॥ देहटा
किलां धरणीसी ॥ त्यजूं पाहे प्राण आपुला ॥२७॥ प्राण त्यजितां तये
वेळीं ॥ विमान आलिं तत्काळीं ॥ शिवदूत अति बळी ॥ त्रिशूळ खड्ग घे
ऊनियां ॥२८॥ टकायुध चंद्रभाळीं ॥ तैसीच दिव्यकांती मिरविली ॥ कि

रीडकुंडलें मंडीत सरळी ॥ चतुर्वर्गयेणे परी ॥ २९ ॥ विमाना सूर्यासारिखें तेज ॥ अ
तिविचित्र दिसे विराजा ॥ आले चांडाळिये काज ॥ अपूर्व वर्तलें तये वेळीं ॥ ३० ॥ आली
पुसिलें शिवदूतांसी ॥ आलेति कवण्या कार्यासी ॥ दूत म्हणती आम्हासी ॥ न्यावया
आलों चांडाळीतें ॥ ३१ ॥ ऐकोनि दूतांचें वचन ॥ विस्मीत झालें आमुचें मन ॥ पुन
र्पीं केला त्यांसि प्रश्न ॥ ऐक राया तूं एकचित्तें ॥ ३२ ॥ ऐशिया चांडाळ पापिणीसी
कैसें योग्य विमान इसी ॥ नेऊनियां स्थानासी ॥ सिंहासनीं कैसें योग्य ॥ ३३ ॥ जन्मा
दारभ्य इसी ॥ पापें पापसंग्रह हासी ॥ ऐसी पापीण दुर्जनीसी ॥ कोविन्याल केला

सलोका॥३४॥नाहीं इश्रीशिवध्यान ज्ञान॥ न करी चहेतपसाधन॥ दयासत्यक
दानेपें॥ इशीकेसेंन्यालनुसी॥३५॥पशुमांसआहार इसी॥ सदा करीजीवहिंसी॥
ऐशिया दुष्टकुष्टपापिणीसी॥ केविनेतास्वर्गभुवना॥३६॥अथवा कधीं शिवपू
जन॥ न करी पंचाक्षरीजपन॥ नाहीं केलें शिवाचें स्मरण॥ ईसिकेसेन्यालनु
सी॥३७॥शिवरात्रीउपोषण॥ नाहीं केलें आपण॥ यज्ञयागादिकसाधन॥ ना
हीं केलें इपेंकधीं॥३८॥ न करी स्नान सार्वकाळी॥ नेणे तीर्थ कवणे वेळीं॥ अथ
वाव्रतादिसकळी॥ केलें नाहीं इणेंकधीं॥३९॥सर्वंगीं पूश्रोणित॥ दुर्गंधिवास

असे बहुत ॥ ऐसी चांडाळी हे दुर्वृत्त ॥ कैसी विमानी बैसवाला ॥ १४० ॥ आर्जवजन्मांतरी
चें ह्मणा ॥ कुष्ट सर्वांगते चिखुणा ॥ कृमी निघती मुखीं जाणा ॥ पूर्वार्जित केवि होय ॥ ४१ ॥
ऐसी पापीण दुराचारी ॥ केविनेना कैळासपुरी ॥ योग्य नव्हे चराचरीं ॥ तुह्मी केवि न्या
लइतों ॥ ४२ ॥ गौतम ह्मणे रायासी ॥ ऐसें पुसीलें दूतांसी ॥ त्यांणीं सांगीतलें आह्मा
सी ॥ आद्यंत निये चांडाळिचा ॥ ४३ ॥ ह्मणे गौतम ऋषेश्वर ॥ चांडाळीचें पूर्वापर ॥
सांगेन तुह्मास विस्तर ॥ असे आश्चिर्य परियेसा ॥ ४४ ॥ पूर्वीं द्रूवेंजनस्थान ॥ ब्रा
ह्मणकन्या असे जाण ॥ सोमनी नाम असे पूर्ण ॥ सोमबिंबासारिखें मुख ॥ ४५ ॥ अति

सुंदर रूप पइसी ॥ उपवर जाहली पितृगृहासी ॥ न मिळे वर रतियेसी ॥ चिंता करिती माता
पिता ॥ ४६ ॥ न मिळे वर सुंदर तिसी ॥ उन्मत्त झाली दाहा वरुषी ॥ मिळऊनि एक द्विज
सी ॥ गृह्योक्तें सि लग्न केलें ॥ ४७ ॥ विवाह जाहालियावरी ॥ होती तया पतीचे घ
री ॥ क्वचित्काळ येणेपरी ॥ होती नारी परियेसा ॥ ४८ ॥ वर्ततां असें पुढें देख ॥ ति
चे पतीस झालें दुःख ॥ पंचत्व पावला तत्काळिक ॥ विधीलेखें करूनी ॥ ४९ ॥
ऐकोनि तिचा मातापिता ॥ कन्येतें घरा आणिती तत्वता ॥ पतीचे दुःखें दुखिता ॥ खे
द करी ते नारी ॥ ५० ॥ अति सुंदर पूर्ववयसी ॥ मदें व्याप्त प्रतिदिवसीं ॥ चंचळ होय मा

नसीं ॥ परपुरुषातें देखोनियां ॥ ५१ ॥ गुप्तरूप एकचित्काळीं ॥ जारमार्ग करीते बाळी
प्रगट जाह्लें तात्काळीं ॥ गोप्य न व्हे पातका ॥ ५२ ॥ आपण विधवा असे नारी ॥
पूर्ववयसी अतिसुंदरी ॥ विषयीं प्रीति असे भारी ॥ स्थीर नोहे तिचें मन ॥ ५३ ॥
ऐसें तिचिया पातकासी ॥ विदित जाह्लें सर्वांसी ॥ वाळीत केले तयांसी ॥ मा
तापिता बंधुवर्ग ॥ ५४ ॥ मातापिता बंधूजन ॥ तीतें त्यजिती निर्भिसोन ॥ आप
ण प्रायश्चित्त घेऊन ॥ शुध झाले परियेसा ॥ ५५ ॥ शंका होती पहिली तिसी ॥
निःशंक झाली व्यभिचारासी ॥ प्रगटरूप अहिर्निशी ॥ रमों लागली नरातें ॥ ५६

तियेनगरीं एक वाणी ॥ रूपें होता अतिलावण्यरुपी ॥ त्यासि तिणे पूर्ववयस देखोनी ॥
झाली त्याची कुलस्त्रिया ॥ ५७ ॥ तया शूद्राचिया घरीं ॥ वर्तत असे ते नारी ॥ ऐसी पापीण
दुराचारी ॥ कुकवैरीण बेचाळिस ॥ ५८ ॥ श्लोक ॥ स्त्रियः कामेन नश्यंती ब्राह्मणो
हीनसेवया ॥ राजानो ब्रह्मदंडेन यत्रयो भोगसंग्रहानू ॥ ५९ ॥ टीका ॥ स्त्रियांनास
ति कामत्वें ॥ ब्राह्मण नासे हीनसेवे ॥ राज्य जाय द्विजक्षोभें ॥ नाश होय यतिघांचा ॥ ६० ॥
शूद्रासवें अहिर्निशी ॥ रमत होती अतिहर्षी ॥ पुत्र जाहाला तियेसी ॥ शूद्रगृहीं असतां ॥
६१ ॥ नित्य मांस आहार तिसी ॥ मद्यपान उन्मत्तेंसी ॥ होउनि तथा शूद्रमाहिषी ॥ होती पापि

गु०च०
१६

पीदुराचारी॥९२॥ वर्ततां एके दिवसीं॥ उन्मत्त होऊनि परियेसीं॥ छेदिलें वासरूं आहारासी
मेष म्हणोनि पापिणीनें॥९३॥ छेदूनि वत्स परियेसी॥ पाक केला विनयेंसी॥ क्षीर ठेविलें शि
केयासी॥ दुसरे दिवसीं भक्षावया॥९४॥ आपण भ्रमीत मद्यपानी॥ जाग्रत झाली अस्तमा
नीं॥ वासरूं पाहे भोंवोनी॥ धेनू दोहावयालागीं॥९५॥ वत्सस्थानीं असे मेष॥ भ्रमीत जा
हाली अती क्रुद्धा॥ घरांत पाहातसे शिमस॥ मस्तक दिसे वासरूं॥९६॥ अनुतप्त होऊनि त
यावेळीं॥ शिव शिव म्हणे चंद्रमौळी॥ अज्ञानें ऐशीं पापें घडलीं॥ म्हणोनि चिंती दुरा
त्मनी॥९७॥ तया वत्सशिरासी॥ निक्षेप केला भूमीसी॥ पति कोपेल म्हणोनि परियेसीं॥

अ०
७

१६

अस्थिचर्म निक्षेपिलें ॥ ६८ ॥ जाऊनि सांगे त्रोजार लोका ॥ व्याघ्रें वत्स नेलें एका ॥ भक्षिलें स
वोनिरडे देखा ॥ पतीपुढें येणेपरी ॥ ६९ ॥ ऐसे कितीएक दिवसांवरी ॥ नांदत होती शूद्रा घरीं
पंचत्व पावली ते नारी ॥ नेलीं दूतीं यमपुरा ॥ ७० ॥ घातलें तियेसि नरकांत ॥ भोगभोगी अति
दुःखित ॥ पुनरपीं जन्मे चांडाळी जाता ॥ उपजली नारी परियेसा ॥ ७१ ॥ उपजतांचि जाहाली
आंधळी ॥ विद्रूप वर्ण जैसी काजळी ॥ मातापिता कष्टचिंतू काळीं ॥ प्रतिपाळिती मायामोहें
७२ ॥ उछिष्टान्न घालिती तोंडा ॥ स्वजन तयेचे अखंडा ॥ बाळपणीं तियेसि विघडा ॥ पोषि
ता तियेणेपरी ॥ ७३ ॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ सर्वांग झालें कुष्टवर्णी ॥ पंचत्व पावली पि

१७ ताजननी॥दरिद्रीझालीनिराश्रय॥७४॥सर्वांगकुष्टवर्णपीडित॥त्यजितीतियेसिस्वजनभ्रात
भीक्षामागोनिउदरभरिना॥रक्षणकरीशरीरआपुलें॥७५॥येणेपरीतेचांडाळी॥वर्ततअसेब
हुकाळीं॥क्षुधेनेपीडितसर्वकाळीं॥आपणआधळीकुष्टदेहीं॥७६॥नमिळेतिसीवस्त्रअन्न
दुःखकरीतअतीगहन॥ऐसेंतिचेंपूर्वकर्म॥झालीवृद्धअतिकुष्टें॥७७॥भीक्षामागेजनासी॥मा
र्गीपडोनिअहिर्निशी॥कधींनभरेउदरतिसी॥दुःखेंविलपेअपार॥७८॥व्याधीअसेशरी
रासी॥शोणीतपूपरियेसीं॥दुर्गंधीतेमहादोषी॥सर्वांगकुष्टेंगळतसे॥७९॥ऐसेंअसतांमा
घमासी॥लोकनिघालेयात्रेसी॥महास्थानगोकर्णासी॥कलत्रपुत्रसहितदेखा॥८०॥

शिवरात्रीचे यात्रेसी ॥ येती लोक देशोदेशीं ॥ चतुर्वर्ण आसपासीं ॥ हरुषें येती परियेसा ॥ ८१ ॥
देशोदेशींचे राजे देखा ॥ हस्ती रथादि सहित ऐका ॥ येती समस्त भूमंडळिका ॥ महाबळेश्वर द
र्शनासी ॥ ८२ ॥ ब्राह्मण क्षेत्री वैश्य शूद्र ॥ येती यात्रेसि अगाध ॥ समारंभ वाद्यनाद ॥ अमि
त लोक परियेसा ॥ ८३ ॥ किती हांसती गायन करिती ॥ धांवती नृत्य करीत येती ॥ शिवस्म
रणें गर्जना करिती ॥ यात्रा प्रसंगी जन देखा ॥ ८४ ॥ ऐसे महाजनासमवेत ॥ चांडाळी
गेली तेथें त्वरित ॥ सवें भीक्षक बहूत ॥ तयासवें जात असे ॥ ८५ ॥ येणेपरी गोकर्णासी ॥
चांडाळी पातली सायासी ॥ कर वोळेंबूनि महाजनांसी ॥ भीक्षा मागे करुणावचनें ॥ ८६ ॥

१८

लोक घालितां मार्गस्त ॥ स्तायन करी आक्रंदत ॥ कर ओढवोनि मागत ॥ महाजनलोकांसी
८७ ॥ पूर्वजन्मीं पापी आपण ॥ मागतसें याचिकारण ॥ भिक्षा घाला क्षुधानिवारण ॥ म्ह
णोनि मागे सकळिकां ॥ ८८ ॥ नेसे वस्त्र प्रावर्ण ॥ धुळींत लोळे आपण ॥ क्षुधाक्रांत तसे
मरण ॥ धर्म करा सकळिकांसि म्हणे ॥ ८९ ॥ सर्वांग कुष्ठ असे गळत ॥ वस्त्रें वीण बा
धेसी ता ॥ अन्न नाहीं क्षुधाक्रांत ॥ धर्म करा सकळांसि म्हणे ॥ ९० ॥ पूर्वीजन्मज्ञातां
तरीं ॥ नाहीं केलें पुण्य येरी ॥ याचि कारणे पीडित भारीं ॥ धर्म करा सकळिकां ॥ ९१ ॥ येणे
परी मागंती ॥ चांडाळ की असे याचित ॥ ते दिवशीं असे शिवरात्री व्रत ॥ कोणीं न घालिती

१८

भीक्षा तिसी ॥ ९२ ॥ येरी विहुक क्षुधाक्रांत ॥ जठराग्नी मंदी स असे बहुत ॥ ध
र्मकरा ऐसें म्हणत ॥ पडली असे मार्गांत ॥ ९३ ॥ पूजेसि जाती सकळजन ॥ त्यां
सि मागे आक्रंदोन ॥ एक म्हणती हांसोन ॥ उपवास आजि अन्न कैंचें ॥ ९४
हातीं होती बिल्वमंजिरी ॥ घालिती तियेच्या करीं ॥ आघ्राणोनि पाहे येरी
भक्षणवस्तू न व्हे म्हणे ॥ १९५ ॥ कोपोनि टाकी ते अवसरीं ॥ जाऊनि पडलें लिं
गावरी ॥ रात्री असतां अंधारीं ॥ अलभ्य पूजा घडली देखा ॥ ९६ ॥ कोणी न घा
लिती भीक्षा तिसी ॥ उपास घडला ते दिवसीं ॥ पूजा पावली त्या शिवासी ॥ बिल्व

मंजिरी शिवमस्तकीं ॥१७॥ इतुकें पुण्य घडलें तिसी ॥ प्रयत्न न करितां परियेसीं ॥
तुष्टला ईश्वर हर्षी ॥ भवार्णवा कडे केलें ॥१८॥ येणे परी चांडाळिसी ॥ उपवास
घडला अनायासीं ॥ तेथूनि उठली दुसरे दिवसीं ॥ भिक्षा मागावया कारणें ॥१९॥
पहिली चकुष्ट रोगी असे ॥ अन्नाकेसाली उपवासें ॥ चक्षुहीन मार्ग न दिसे ॥
मंदमंद जातसे ॥२०॥ सूर्यरश्मी करूनि तिसी ॥ दुःख होय आसमासीं ॥ पूर्वा
र्जित कर्में ऐसीं ॥ म्हणती दूत तया वेळीं ॥१॥ ऐसी चांडाळी कष्टत ॥ आली वृ
क्ष छायेसमीपत ॥ त्यजूं पाहे प्राण त्वरित ॥ म्हणोनि आलों धावोनी ॥२॥ पुण्य

घडलें इत्री आजी ॥ उपवास शिवतिथी काजीं ॥ बिल्वपत्रें ईश्वर पूजी ॥ घडलें
रात्रीजागरण ॥ ३ ॥ तया पुण्यें करूनि इचें ॥ पाप गेलें सातजन्माचें ॥ हें प्रीति पात्र
ईश्वराचें ॥ म्हणोनि पाठविलें आह्मासी ॥ ४ ॥ ऐसें म्हणती शिवदूत ॥ तियेवरी
तें शिंपूनि अमृत ॥ दिव्यदेह पावूनि त्वरित ॥ गेली ऐका शिवलोका ॥ २०५ ॥ ऐ
सें गोकर्ण असे स्थान ॥ गोतम मसा गेविस्तारोन ॥ रायासि म्हणे तूं निघोन ॥ त्वरि
त जायीं गोकर्णासी ॥ ६ ॥ जातां त्विंतुसीं पापें जाती ॥ इहसौख्य परत्र उत्तम मग
ती ॥ संशय न धरीं गा चित्तीं ॥ म्हणोन निरोपी रायासी ॥ ७ ॥ परिसोनि गोतमाचें

वचन ॥ राजा मनीं दृढ संतोषोन ॥ त्वरित पावला क्षेत्र गोकर्ण ॥ पापा वेगळा
जाहाला तो ॥ ८ ॥ ऐसें पुण्य पावन स्थान ॥ ह्मणोनि राहिले श्रीपाद आपण ॥
सिष्य ह्मणे एक कथन ॥ नामधारका एकचित्तें ॥ ९ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगा
धरु ॥ सांगे गुरुचरित्र विस्तारु ॥ श्रोते नेकते निनिर्धारु ॥ एकचित्तें परिसापं
१० ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने सिध्दनामधारकसंवादे गोकर्णम
हिमानो नाम सप्तमोध्यायः ॥ ७ ॥ श्रीगुरुदेवदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ओव्या
२१० ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ ॥

श्री॥ ॥ दश्रीवल्लभायनमः॥ नामधारकह्मणेसिधासी॥ गोकर्णमहिमानिरोपि
लासी॥ श्रीगुरूराहिलेकितीदिवसीं॥ वर्तलेंपुढेंकायसांग॥ १॥ श्रीगुरुमूर्त्तीकृ
पासिंधु॥ माझेमनींलागलावेधू॥ चरित्रऐकतांमहानंदु॥ अतिउल्हासहोतसे
परिसोनिशिष्याचेंवचन॥ संतोषेसिधअतीगहन॥ सांगताझालाविस्तारोन॥ श्रो
तेजनीअवधारा॥ ३॥ गोकर्णक्षेत्रीं श्रीपादयती॥ राहिलेवर्षेतीनगुप्ती॥ तेथो
निश्रीगिरीपर्वतायेती॥ लोकानुग्रहाकारणें॥ ४॥ जयाचेंकरितांचरणदर्शन॥
समस्ततीर्थांसमानजाण॥ चरणंपवित्रंविततंपुराण॥ वेदश्रुतीऐसेंबोलतसे॥ ५॥

समस्ततीर्थें श्रीगुरुचरणीं ॥ तो कां हिंडे तीर्थभुवनीं ॥ लोकानुग्रहालागुनी ॥ जात असे
परियेसा ॥ ५ ॥ मास चारी क्रमोनि तेथें ॥ आले निवृत्तिसंगमातें ॥ दर्शन देती साधुभक्तांतें ॥
पातला तया कुरवपुरा ॥ ७ ॥ कुरवपूर महाक्षेत्र ॥ कृष्णागंगा वाहे नीर ॥ महिमा तेथील सां
गतां अपार ॥ भूमंडळीं तदुर्लभ ॥ ८ ॥ तेथील महिमा सांगतां ॥ विस्तार होईल बहुत क
था ॥ पुढें असे चरित्र अमृता ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ९ ॥ श्रीपाद राहिले कुरवपुरीं ॥
ख्याती जाहाली भूमीवरी ॥ प्रगट महिमा अपरंपारी ॥ सांगतां विस्तार असे देखा ॥ १० ॥
जे जन भजती भक्तीसी ॥ सौख्य पावती अप्रयासीं ॥ कन्यापुत्र लक्ष्मीसी ॥ चिंतिले फळ

पावती॥११॥ समस्त महिमा सांगावयासी॥ विस्तार होईल बहुवसीं॥ नामधारका स्वस्थ
परियेसी॥ सांगेन किंचित तुज आतां॥१२॥ पुढें अवतार व्हावया गती॥ सांगेन ऐकें एक
चित्तीं॥ श्रीपाद कुरवपुरा असती॥ कार्याकारण मनुष्यदेही॥१३॥ अवतार व्हावयाचें
कारण॥ सांगेन त्याचें पूर्वकथन॥ वेदशास्त्रसंपन्न॥ ब्राह्मण होता तया ग्रामीं॥१४॥
त्याची भार्या होती देखा॥ नाम तियेचें अंबिका॥ स्त्री कुळआचार पतीसेवका॥ महा
पुण्यसती देखा॥१५॥ तियेसि पुत्र होऊनि मरती॥ पूर्वकर्मफळ आर्जिती॥ अनेक ती
र्थें आचरती॥ तिणें केली परियेसा॥१६॥ ऐसें असतां जे होणार गती॥ पुत्र झाला मंदम

ती॥ माता स्नेह करी भक्ती॥ अपूर्व आपणासि ह्मणोनी॥ १७॥ वर्धतां माता पित्या घरीं॥ वि
प्रात्मज वाढला प्रीति करीं॥ व्रतबंध करिती कुळाचारीं॥ वेदाभ्यास करावया॥ १८॥
विद्या न ये तया कुमरा॥ मंद मती अज्ञान बधिरा॥ चिंता वर्तें त्या द्विजवरा॥ ह्मणे पुत्र मंद
मती॥ १९॥ अनेक देव आसधोनी॥ पुत्र लाधलों कष्टोनी॥ प्राचीन कर्म न सुटे ह्मणोनी॥
चिंता करी तदिवस रजनी॥ २०॥ अनेक प्रकारें शिकवी त्यासी॥ नाउन करी बहुवसीं
दुःख होतसे जननिसी॥ कर्जी आपुले पती तें॥ २१॥ पतीस ह्मणे ते नारी॥ पुत्र नाहीं तआ
ह्मा घरीं॥ कष्ट करोनि नाना परी॥ पोहिलें एका बाळका त्रीं॥ २२॥ विद्या न ये चि वेद त्या

सी॥वायांमारूनकाकष्टेंसी॥प्राचीनकर्मअसेययासी॥कींमूढहोऊनिउपजावें
२३॥आतांजरीतुम्हीयासी॥ताडनकरालअहिर्निशी॥प्राणत्यजीनमीभरवसीं॥
म्हणोनविनवीपतीसी॥२४॥स्त्रियेचेंवचनऐकोनिकानीं॥विप्रराहिलानिश्चिं
तमनीं॥ऐसाकाहींकाळक्रमोनी॥होतींतयाग्रामांत॥२५॥वर्ततांऐसेंतयास्था
नीं॥विप्रपडलाअसमाधानीं॥दैववशेंकरूनी॥पंचत्वपावलापरियेंसा॥२६॥म
गपुत्रासहीततेनारी॥होतीतेथेंकुरवपुरी॥यांचूनिआपुलेंउदरभरी॥येणेपरीजी
वित्वरक्षी॥२७॥विप्रस्त्रियेचापुत्रदेखा॥विवाहायोग्यजाहालाऐका॥निंदाकरिती

गु० च०
३

सकळिका॥ मतीहीन ह्मणोनियां॥ २८॥ कन्या न देती तयासि कोणी॥ ह्मणती क
ष्टें हा वाहातो पाणी॥ समस्त ह्मणती असे दूषणी॥ उदर भरी येणे विद्ये॥ २९॥ स
मस्त ह्मणती त्यासी॥ तूं दगडापरी व्यर्थ जन्मलासी॥ लांछन लाविलें सिवंशा
सी॥ अरे मूर्खा कुळनाशका॥ ३०॥ तुझ्या पित्याचा आचार॥ ख्याती असे चा
रीराष्ट्र॥ जाणे धर्म वेदशास्त्र॥ त्याचे पोटीं अवतरलासि तूं॥ ३१॥ बोल आणि
लासि तुवां पितरासी॥ घातलें तया अधोगतीसी॥ भीक्षा मागोनि उदर भरि
सी॥ लाज कैसी तुज न वाटे॥ ३२॥ जन्मोनियां संसारी॥ काय व्यर्थ पशूचिये

अ०
८
३

परी॥ अथवा गंगेत प्रवेशा करीं॥ कायजन्मोनि सार्थक॥ ३३॥ ऐसें ऐकोनि ब्रह्म
चारी॥ दुःख करीत नाना प्रकारी॥ मातेसि म्हणे ते अवसरी॥ प्राण त्यागीन मी आ
तां॥ ३४॥ निंदा करिती सर्वही मज॥ असोनि देह कवण काज॥ पोसूंन को मातेम
ज॥ जायीन अरण्यवासासी॥ ३५॥ ऐकोनि पुत्राचें वचन॥ माता करी चिंता गह
न॥ शोक दुःखें करुना॥ विलाप करी ते नारी॥ ३६॥ मातासून दुःख करिता॥ गेलीं गं
गा प्रवाहांता॥ तेथें देखिले जगद्गुरिता॥ श्रीपादयोगी स्नान करितां॥ ३७॥ जाऊनि
दोघें लागती चरणीं॥ विनविताति कर जोडूनी॥ वासना असे आमुचे मनीं॥ प्राणत्यजावा

गंगेंत॥३८॥निरोपद्यावाजीआह्मासी॥सद्गतीकारणव्हावयासी॥आत्महत्यामहादोषी
ह्मणूनविनवितोंकृपासिंधु॥३९॥ऐकोनिविप्रसतीचेंवचन॥पुसतीश्रीपादकृपयामा
न॥कायसंकटींतुमचेंमन॥त्यजिताप्राणकायनिमित्य॥४०॥विप्रस्त्रीत्यावेळां॥सांग
तसेदुःखासकळा॥ह्मणेस्वामीभक्तवत्सला॥तारावेंआह्माबाळकांतें॥४१॥पुत्रा
वीणकष्टल्येंभारीं॥अनेकतीर्थेंपादचारी॥केलेंव्रतपूजाजरी॥सकळदेवआरा
धिले॥४२॥व्रतेंउपवाससांगूंकिती॥करितीझाल्येंअपरमिती॥झालापुत्रहादुर्म
ती॥निंदाकरितीसकळजन॥४३॥वेदशास्त्रसंपन्न॥पतीमाझाहोताप्राण॥त्याचियें

णो गीं झाला हीन ॥ मंद मती दुरात्मा हा ॥ ४४ ॥ कृपा करीं गा श्रीपाद यती ॥ जन्मोजन्मी
दैव गती ॥ पुत्र न व्हावा मंद मती ॥ ऐसा प्रकार सांगावा ॥ ४५ ॥ कृपासागर दैन्यहरण
म्हणोनि धरिले तुझे चरण ॥ शरणागताचें करावया रक्षण ॥ आलास आजि कृपा
सिंधु ॥ ४६ ॥ जन्मोनियां संसारीं ॥ कष्ट केले नानापरी ॥ न देखें चि सौख्य कुसरी ॥ प
रि झाले पुत्र न राहाती ॥ ४७ ॥ वांचोनियां हा एक सुत ॥ झोळीचें गळां स्तन लोंब
त ॥ वृथा जन्मला म्हणता ॥ विनवीतसे ते श्रीगुरुसी ॥ ४८ ॥ देवा आतां ऐसें करणें ॥
पुढील जन्मीं मनुष्यपणें ॥ पूज्यमान पुत्र पावणें ॥ जैसा पूज्य तूं जगत्रयांसी ॥ ४९ ॥ स

कळलोक त्यासि वंदिती॥ ऐसा पुत्र व्हावा म्हणती॥ उपाय सांगा श्रीगुरु यती॥ म्हणो
नि चरणा लागली॥ ५०॥ त्याचेनि मातें उद्धार गती॥ मागुती न होय पुनरावृत्ती॥
पितरां सकळां स्वर्गप्राप्ती॥ लाधे ऐसें निरोपावें॥ ५१॥ वासना असे माझे मनीं॥ पु
त्र व्हावा ब्रह्मज्ञानी॥ बाळपणींच पाहेन नयनीं॥ पूज्यमान समस्तांसी॥ ५२॥ ऐ
कोनि तियेचे वचन॥ सांगती कृपा भक्तिवचन॥ करी हो ईश्वर आराधन॥ पुत्र हो
ईल श्रीहरी ऐसा॥ ५३॥ गोळियाचे घरी देखा॥ कृष्ण उपजला कारणीका॥ व्र
त केले गौळी एका॥ ईश्वराची आराधना॥ ५४॥ तैसा तूं आराधीं ईश्वरा॥ पुत्र पाव

त्री लहा निर्धार॥ तुझा मनोरथ साचार॥ पावेल सिद्धी श्रीपाद ह्मणती॥ ५५॥ विप्रस्त्री
ह्मणे ते वेळीं॥ कैसे व्रत आचरले गोळी॥ कैसा पूजिला चंद्रमोळी॥ विस्तारावें मज प्रती
५६॥ तैसेच व्रत करीन आपण॥ ह्मणोन धरी सद्गुरू चरण॥ कृपामूर्ती सद्गुरू जाण
सांगता झाला ते वेळीं॥ ५७॥ ह्मणती श्रीपाद यती तियेसी॥ ईश्वर पूजी हो तूं प्रदोषीं
मंदवारीं तूं विशेषीं॥ पूजा करी भक्तीनें॥ ५८॥ पूजा करीजे गोळणी॥ विस्तार असे
स्कंदपुराणीं॥ कथा सांगेन ऐक कानीं॥ ह्मणती गुरु तियेसी॥ ५९॥ ऐकोन श्रीगुरु
चे वचना॥ संतोषली विप्रांगना॥ पुढती घाली लोटांगणा॥ नया श्रीपाद गुरु प्रती॥ ६०

विप्र स्त्री ह्मणे स्वामीसी ॥ अभिनव मातें निरोपिलेंसी ॥ देखतां पूजा प्रदोषीं ॥ पु
त्र झाला कृष्णा ऐसा ॥ ६१ ॥ आपण केलिया पूजा जरी ॥ फळ पावेन निर्धारीं ॥ पूर्वी
झाली कवणपरी ॥ विस्तारावें दातारा ॥ ६२ ॥ श्रीगुरु सांगती तियेसी ॥ सांगेन ऐ
क एक चित्तेंसी ॥ उज्जनी नामनगरीसी ॥ जाहालें विचित्र परियेसा ॥ ६३ ॥ तया न
गरी चंद्रसेन ॥ राजा होता धर्मज्ञ ॥ त्याचा सखा असे प्राण ॥ माणिभद्र नामे परिये
सा ॥ ६४ ॥ सदां ईश्वरभक्ती करी ॥ नाना प्रकारें अपारीं ॥ भोळा देव प्रसन्न करीं ॥
दिधला चिंतामणी एक ॥ ६५ ॥ कोटी सूर्याचा प्रकाश ॥ माणीक शोभे महास्कुरस ॥

कंठीं घालितां महाहर्षा। तया मणिभद्ररायासी॥ ६६॥ तया मणीचें लक्षणा। सुवर्ण
होय लोह पाषाण। तेज फांकलें ज्यावरी जाण। तें कनक होय परियेसा॥ ६७॥ जेजें
चिंतीत मानसीं। तें तें पावत त्वरितेसी। ऐशी ख्याती माणिकासी। समस्त राजे कांक्षा
करिती॥ ६८॥ इष्टत्वें मागती कितीएक। मागों पाठविती ते माणिका। बलात्कारें घि
तीएक। राजे वांछिती परियेसा॥ ६९॥ म्हणती विक्रय करूनि देखा। आपण द्यावें
माणिका। जरी न देशी स्वभाविका। तरी युद्धा लागी येऊं म्हणती॥ ७०॥ राजे स
मस्त मिळोनी। पातले नगरा ते उज्जनी। अपार सैन्य मेळऊनी। वेढिलें तया नगरासी

७१॥ ते दिवशीं शनिवार त्रयोदशी॥ राजा बैसला पूजनासी॥ शंका न धरितां मानसीं
एकचित्तें पूजीतसे॥ ७२॥ महांकाळेश्वरलिंगासी॥ पूजा करीतो राजा हर्षी॥ गोळि
याचा कुमर पाहावयासी॥ आला तया शिवालया॥ ७३॥ पूजन पाहोनि शिवा
चें॥ मूळ ह्मणती गोळियाचे॥ खेळूं आह्मी या परीसाचे॥ लिंग करूनि पूजूं आ
तां॥ ७४॥ ह्मणोनि विनोदें करुनी॥ आपुले गृहसंनिधानीं॥ एकवटोनि पाषा
णीं॥ कल्पिले तेथें शिवालया॥ ७५॥ पाषाणाचें करूनि लिंग॥ पूजा करीत बा
ळक चाग॥ नानापरिची पत्री सांग॥ कल्पिली तेथें पूजेसी॥ ७६॥ षोडशोपचा

रे पूजा करित ॥ उदकें नैवेद्य समर्पित ॥ ऐसे कवतुके खेळत ॥ गोपकुमर कत येवेळीं
७७ ॥ गोपिका स्त्रिया येउनी ॥ पुत्रा तेने ती बोलाउनी ॥ भोजनाकारणें ह्मणोनी ॥ गे
ले सकळहि बाळक ॥ ७८ ॥ त्यांतील एक गोपसुत ॥ लिंग भुवन न सोडित ॥
त्याची माता जवळी येत ॥ मारीत आपुले पुत्रासी ॥ ७९ ॥ ह्मणे कुमरा भोजना
सी ॥ चाल घरासि झाली निशी ॥ काही केल्या न जाय परियेसी ॥ तो गोपकुमर
क ॥ ८० ॥ कोपे करुनी ते गोळणी ॥ मोडी पूजा खेळांगणी ॥ पाषाण दूर टाकुनी ॥
गेली आपुले सदनासी ॥ ८१ ॥ पूजा मोडितां तो बाळका ॥ प्रलाप करी अनेक ॥ मू

छीयेर्ई निक्षपेक॥ पडिला भूमी अवधारा॥८२॥ लय लाऊन लिंगस्थानीं॥ प्रा
णत्यजूं पाहे निर्वाणी॥ प्रसन्न झाला भूळपाणी॥ तया गोपसुताकारणें॥८३॥
त्रिबाळयरत्नखचित॥ सूर्यासमान प्रभावंत॥ लिंग दिसे रत्नखचित॥ जागृ
त झाला तो बाळ॥८४॥ निजरूप धरी गौरीरमण॥ उठवी बाळ करीं धरु
न॥ वर माग ह्मणे मी तुज झालो प्रसन्न॥ देईन जें वांछिसी तें॥८५॥ बाळ
कें नमिले ईश्वरासी॥ कोप न करावा मातेसी॥ पूजा बिघडिली ते प्रदोषीं॥
क्षमा करणें ह्मणतसे॥८६॥ ईश्वर भोळा चक्रवर्त्ती॥ वर दिधला बहू प्रीती॥ प्र

दोय समयीं पूजा देखती ॥ गोळणी होय देवजननी ॥ ८७ ॥ तिचे पोटीं होईल सु
न ॥ तोचि विष्णू अवतार खान ॥ न करीं पूजा पहिली ह्मणत ॥ पोषीं आपुले पुत्रा
सी ॥ ८८ ॥ जेजें मानसी तूं इछिसी ॥ पावेल तेतें घरी मानसीं ॥ अखिल सोख्य जु
झिया वंशासी ॥ पुत्र पौत्रेंसी नांदशीला । ८९ ॥ प्रसन्न होऊनि गिरिजापती ॥ गे
ले लिंगालयीं गुप्त ॥ लिंग राहिले रत्नखचिती ॥ गौळिया घरी याचि परी ॥ ९०
कोटी सूर्य प्रकाश ॥ शिवालय दिसे अतिसुरस ॥ लोक ह्मणती काय प्रकाश ॥ उ
दयो झाला दिनकरा ॥ ९१ ॥ आले होते परराष्ट्र राजे ॥ विस्मय करिती ह्मणती चोज ॥

सांडूनिद्वेषबोलतीसहज ॥ भेटूंम्हणतीरायासी ॥ १२ ॥ पाहेंयापवित्रनगरांत ॥ सूर्यजा
हालाअसेउदित ॥ राजाअसेहाबहुपुण्यवंत ॥ ऐशियासिविरोधनकरावा ॥ १३ ॥ म्ह
णोनिपाठवितीसेवकासी ॥ भेटूंम्हणतीरायासी ॥ राजाबोलावीततयासी ॥ आपुले
गृहासिनगरांत ॥ १४ ॥ इतुकेंहोतांतेअवसरी ॥ राजापुसतसेप्रीतिकरी ॥ रात्रीअ
सतांअंधकारी ॥ उदयोजाहालाकेविसूर्य ॥ १५ ॥ राजाइंद्रसेनसहित ॥ पाहावयाये
तीकौतुकार्थ ॥ दिसेविचित्ररत्नखचित ॥ शिवालयअनुपम्य ॥ १६ ॥ येणेचिपरीगो=
व्याचेसदन ॥ अतिरम्यविराजमान ॥ पुसताझालाआपण ॥ तयागोवळीकुमरकातें ॥

९७॥ सांगीतला सकळ वृत्तांत॥ संतोष करिती राजे समस्त॥ गोळियां नराजा नूं ह्मणत
देती नाना देश संपदा॥ ९८॥ नि घोन गेले राजे सकळ॥ राहिला चंद्रसेन निर्मळ॥ शनि
प्रदोष पूजा सफळ॥ भय कैंचें तया राया॥ ९९॥ गौळी कुमर येऊनि घरा॥ सांगे मा
तेसि सविस्तारा॥ येईल रूप दें तुझिया उदरा॥ नारायण अवतरोनी॥ १००॥ ऐसा ई
श्वरें दिधला वर॥ संशायन करी तूं निर्धारा॥ संतोषला कर्पूरगौरा॥ देखिली पूजा प्रदो
षाची॥ १॥ मोडली पूजा ह्मणोनी॥ म्या विनविला शूळपाणी॥ क्षमा करूनि घेतले ह्म
णोनी॥ सांगे वृत्तांत मातेसी॥ २॥ ऐसा ईश्वर प्रसन्न झाला॥ प्रदोष पूजनें तयां फळें

१० ला ॥ श्रीपाद सांगती तया वेळा ॥ विप्रस्त्रियेकारणे ॥३॥ तुझे मनी असेल जरी ॥ होईल पु
त्र मजसरी ॥ संशय सांडूनि निर्धारी ॥ शनिप्रदोषी पूजी शंभू ॥ ४ ॥ ऐसें ह्मणोनि श्री
पाददेव ॥ चक्रवर्ती भोळा शिव ॥ विप्रस्त्रियेचा पाहोनि भाव ॥ प्रसन्न होते तया वेळीं ॥
५ ॥ बोलाऊनि तिचे कुमरासी ॥ हस्त ठेविती मस्तकेंसी ॥ ज्ञान जाहालें तत्काळेसी ॥ त्रि
वेदी झाला तो ब्राह्मण ॥ ६ ॥ वेद शास्त्रादि तर्क भाषा ॥ ह्मणतो झाला अति प्रकाशा
॥ विस्मय जाहाला असे सहसा ॥ विप्र ह्मणती आश्चर्य ॥ ७ ॥ विस्मयो करोनि विप्र १०
वनिता ॥ ह्मणे ईश्वर हाचि निश्चिता ॥ कार्याकारण अवतार होता ॥ आला नरदेह धरोनी

८॥ पूर्वजन्मीचे पुण्यार्जित॥ जोडला आम्हा हा निश्चित॥ भेटला असे श्रीगुरुनाथ॥
म्हणोनि नमिती क्षणक्षणा॥ ९॥ म्हणे ईश्वर तूंचि होसी॥ पूजा करीन तुम्ही मी प्रदोषी
मिथ्या न व्हे तुझे वाक्यासी॥ पुत्र व्हावा तुज ऐसा॥ १०॥ ऐसा निश्चय करुनी॥ पूजा
करिती नित्य येउनी॥ प्रदोष पूजा अति गहनी॥ करी श्रीपाद रायासी॥ ११॥ पुत्र ति
चा झाला ज्ञानी॥ वेदशास्त्रार्थ संपन्नी॥ पूज्य जाहाला सर्वांहुनी॥ ब्रह्मवृंद मानि
त॥ १२॥ विवाह जाहाला मग तयासी॥ पुत्र पौत्री नांदे हर्षी॥ श्रीगुरुकृपा होय ज
यासी॥ ऐसे होय अवधारा॥ १३॥ ऐसा श्रीगुरु कृपावंत॥ भक्तजना असे संरक्षि

त॥ ऐकशिष्या एकचित्त॥ नामधारक श्रीमंता॥१४॥ नामधारक भक्तासी॥ सांगे
सिद्ध विस्तारेसी॥ परियेसा समस्त अहिर्निशी॥ ह्मणे सरस्वती गंगाधरु॥१५॥ इति
श्रीगुरुचरित्र परमकथाकल्पतरु श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधा
रकसंवादे अष्टमोध्यायः॥ श्रीदत्तात्रयार्पणमस्तु॥ अं॥ ओ॥ ११५॥ छ॥ छ॥॥॥

श्रीगणेशायनमः॥ श्रीपादश्रीवल्लभगुरवेनमः॥ ऐकोनिसिध्याचेवचन॥ नाम
धारककरीनमन॥ विनवीतसेकरजोडुन॥ भक्तिभावेंकरोनियां॥१॥ श्रीपाद
कुरवपुरीअसतां॥ पुढेंवर्तलीकैसीकथा॥ विस्तारकरूनिसांगआतां॥ कृपामू
र्तीदातारा॥२॥ सिद्धम्हणेनामधारका॥ पुढेंकथाअपूर्वदिखा॥ तयाग्रामीरज
कएका॥ सेवकझालाश्रीगुरूचा॥३॥ भक्तवत्सलश्रीगुरुराव॥ जाणोनिशिष्या
चाभाव॥ विस्तारकरोनिभक्तीस्तव॥ निरूपितगुरुचरित्र॥४॥ नित्यश्रीपादगंगे
सियेती॥ विधीपूर्वकस्नानकरिती॥ लोकवेव्हारसंपादिती॥ त्रयमूर्तीआपण॥५॥

ज्याचे दर्शन गंगास्नान ॥ त्याचें काय सें आचरण ॥ लोकानुग्रहा कारण ॥
स्नान करीत परियेसा ॥ ६ ॥ वर्ततां ऐसे एके दिवसीं ॥ श्रीपाद यती येती स्नाना
सी ॥ गंगा वाहातसे दक्षादिशी ॥ मध्ये असती आपण ॥ ७ ॥ तया गंगातटाकांत
रजक असे वस्त्रें धूत ॥ नित्य येई निअसेन मीत ॥ श्रीपाद गुरूमूर्तीसी ॥ ८ ॥ नि
नित्य त्रिकाळ येवोनियां ॥ दंड प्रणाम करोनियां ॥ नमन करी अति विनया ॥
मनोवाकायवाकर्मे ॥ ९ ॥ वर्ततां ऐसें एके दिवसी ॥ आला रजक नमस्कारासी ॥
श्रीपाद म्हणती तयासी ॥ एक चित्ते परियेसा ॥ १० ॥ श्रीपाद म्हणती रजकासी ॥

कांरेनित्यकष्टतोसी ॥ तुष्टलोंतुझेभक्तीसी ॥ सुखेंराज्यकरींआतां ॥ ११ ॥ एकतांश्री
गुरूचेंवचना ॥ गांठीबांधीपल्लवींशकुन ॥ विनवीनसेकरजोडून ॥ सत्यसंकल्प
गुरूमूर्ती ॥ १२ ॥ रजकसांडीसंसारचिंता ॥ सेवकजाहालाएकचित्ता ॥ दुरोनिकरी
दंडवता ॥ मठागेलियायेणेंचिपरी ॥ १३ ॥ ऐसेबहुतादिवसावरी ॥ रजकमगसेवा
करी ॥ आंगणझाडीप्रोक्षीवारी ॥ नित्यनेमेंयेणेंविधी ॥ १४ ॥ असतांएकेदिवशीं
देखा ॥ वसंतऋतुवैशाखा ॥ क्रीडाकरीतनदीतटाका ॥ आलाराजाम्लेंछएक
१५ ॥ स्त्रियांसहितराजाआपण ॥ आळंकृतआभरण ॥ क्रीडाकरीतस्त्रियाआप

ण॥ गंगेमधून येत असे॥ १६॥ सर्वदळ येत दोनी थडी॥ अमीत असती हस्ती घोडीं॥
मिरवताति रत्नकोडी॥ आळंकृत सेवक जन॥ १७॥ ऐसा गंगेचे प्रवाहांत॥ राजा आ
ला खेळत॥ अनेक वाद्यनाद असे गर्जतु॥ कृष्णावेणी थडियेसी॥ १८॥ रजक होता न
मस्कारित॥ त्राबे झाला तो दुश्चित॥ असें गंगेत अवलोकितु॥ समारंभ राजयाचा॥
१९॥ विस्मय करी बहु मानसीं॥ जन्मोनियां संसारासी॥ जरी न देखिजे सौख्यासी॥ प
पसुसमान देह आपुला॥ २०॥ धर्मराजयाचें जिणें॥ ऐसे सौख्य भोगणें॥ स्त्रियाव
स्त्र अनेक भूषणे॥ कैसा भक्त ईश्वराचा॥ २१॥ कैसें याचें आर्जव फळलें॥ कव

एमा देवा आराधिले ॥ कैसे श्रीगुरू असती भेटले ॥ मग पावला ऐश्रीदत्ता ॥ २२
ऐसे मनी चिंतित ॥ करीतसे दंडवत ॥ श्रीपादराव कृपावंत ॥ वळखिली वासनात
याची ॥ २३ ॥ भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ती ॥ जाणोनि अंतरीं त्याची स्थिती ॥ बोलाउनि
यापुसती ॥ कायचिंतिसी मनात ॥ २४ ॥ रजक ह्मणे स्वामीसी ॥ देखिलें दृष्टीने रा
यासी ॥ संतोष झाला मानसीं ॥ केवळ दास श्रीगुरूचा ॥ २५ ॥ पूर्वी आराधोनि देवा
सी ॥ पावला आतां या पदासी ॥ ह्मणोनि चिंतितो मानसी ॥ कृपासिंधू दातारा ॥ २६ ॥
ऐसे अविद्यासंबंधेसी ॥ नाना वासना इंद्रियांसी ॥ चाड नाही या भोगासी ॥ वर

णी असे मज सौख्य ॥ २७ ॥ श्रीपाद म्हणती रजकासी ॥ जन्मादारभ्य कष्टलासी ॥ वा
छं असे भोगावयासी ॥ राज्यभोग ते मोव्हती ॥ २८ ॥ निवावीं इंद्रियें सकळ ॥ नातरी
मोक्ष न व्हे निर्मळ ॥ बाधा करिती पुढें केवळ ॥ जन्मांतरी परियेसा ॥ २९ ॥ तुष्टावया
इंद्रियासी ॥ तुवां जावें म्लेछवंशासी ॥ आवडी जाहाली तुझे मानसीं ॥ राज्यभो
गी जाय त्वरित ॥ ३० ॥ अंतरतील तुझे चरण ॥ द्यावें मातें पुनर्दर्शन ॥ तुझा अनु
ग्रह असे कारण ॥ ज्ञान द्यावें दातारा ॥ ३१ ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ वैदूरानगरी
जन्म घेसी ॥ भेटी देऊं अंतकाळासी ॥ कारण असे येणें आह्मा ॥ ३२ ॥ ऐकोनि स्वा

मीच्चेवचन॥विनवीरजककरजोडून॥कृपासागरामजलागुन॥उपेक्षूनकोल्ल
णनसे॥३३॥भेटीहोतांचिआह्मासी॥ज्ञाननहोईलतुझेमानसीं॥नकरीच्चिंताभरवसी
आह्मायेणेघडेला॥३४॥आणीककार्यकारणासी॥अवतारघेउंपरियेसी॥वेषध
रोनिसंन्मासी॥नामनृसिंहसरस्वती॥३५॥ऐसेंतयासबोखुनी॥निरोपदेतीजां
यह्मणोनी॥रजकलागलाचरणी॥नमस्कारीतयेवेळीं॥३६॥देखोनिश्रीगुरूकृ
पामूर्ती॥रजकासिजवळीपाचारिती॥इहभोगिसीकीपुढती॥राज्यभोगसंगम
ज॥३७॥रजकविनवीतश्रीपादासी॥झालेंआपणअपरवयसी॥भोगनभोगूनि

गु० च०
४

बाळाभ्यासी ॥ योवन गोड राज्यभोग ॥ ३८ ॥ ऐकोनि रजकाचे वचन ॥ निरोप देती श्रीगु
रु आपण ॥ त्वरित जाई रे ह्मणोन ॥ जन्मांतरीं भोगीं ह्मणती ॥ ३९ ॥ निरोप देतां तये वेळीं
त्यजिला प्राण तत्काळीं ॥ जन्मता झाला म्लेछकुळीं ॥ वैदुरा नगरी विख्यात ॥ ४० ॥ ऐ
सी राजयाची कथा ॥ पुढें सांगेन विस्तारता ॥ सिद्ध ह्मणे नामधारका आतां ॥ कैसें चरित्र झा
ले परिसे पुढें ॥ ४१ ॥ ऐसे झालिया अवसरी ॥ श्रीपाद राव कुरवपुरी ॥ असतां महिमा अ
परंपारी ॥ प्रख्यात असे परियेसा ॥ ४२ ॥ महिमा सकळ सांगतां ॥ विस्तार होईल बहु
ग्रंथा ॥ पुढील अवतार असंख्याता ॥ सांगेन एक नामधारका ॥ ४३ ॥ महिमा न वर्णवि

अ०
९

४

याश्रीगुरुचे ॥ शक्ती कैची यावाचे ॥ नवलाव अमृत दृष्टीचें ॥ स्थान महिमा ऐसी ॥ ४४ ॥
॥ श्रीगुरू राहाती जे स्थानी ॥ अपार महिमा ते भुवनी ॥ विचित्र जयाची करणी ॥ दृष्टांते तु
ज सांगेन ॥ ४५ ॥ स्थान महिमा प्रकार ॥ सांगेन ऐक एकाग्र ॥ प्रख्यात असे कुरवपूर ॥ मन
कामना पुरती तेथे ॥ ४६ ॥ ऐसे कितीक दिवसवरी ॥ श्रीपाद होते कुरवपुरी ॥ कारण असे पु
ढें अवतारी ॥ म्हणोन अदृश्य होती तेथे ॥ ४७ ॥ अश्विन वद्य द्वादशी ॥ नक्षत्र मृगराज प
रियेसी ॥ श्रीगुरु बैसले निजानंदेंसी ॥ अदृश्य झाले गंगेत ॥ ४८ ॥ लौकिकी दिसती अ
दृश्य जाण ॥ कुरवपुरीं असती आपण ॥ श्रीपाद राव निर्धारि जाण ॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥

४९ ॥ अद्वयपहोकुनितयेस्थानी ॥ श्रीपादराहिलेनिर्गुणीं ॥ अवतारक्रावयाकारणी ॥ ह्मणोनिक
वणानदिसती ॥ ५० ॥ श्रीपादअसतीतयास्थानीं ॥ दृष्टांतसांगेनविस्तारोनी ॥ एकाभावीकहोश्र
वणीं ॥ ह्मणेसरस्वतीगंगाधरू ॥ ५१ ॥ जेजनअसतीभक्तकेवळ ॥ त्यासिदिसतीनिर्मळ ॥ कुरवपू
रक्षेत्रअपूर्वस्थळ ॥ असेप्रख्यातभूमंडळी ॥ ५२ ॥ सिद्धसांगेनामधारकासी ॥ तेचिकथाविस्ता
रेसी ॥ सागतसेसकळिकासी ॥ गंगाधराचाआत्मज ॥ ५३ ॥ इतिश्रीगुरुचरित्रपरमक
थाकल्पतरूश्रीनृसिंहसरस्वत्योपाख्यानेसिद्धनामधारकसंवादेरजकवरप्रदानोना
मनवमोऽध्यायः ॥ ९ ॥ श्रीदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ओव्या ॥ ५३ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

श्रीगुरुदत्तात्रयायनमः॥ ऐकोनि सिद्धाचे वचन॥ नामधारक विनवी जाण॥ कुरपुरी
चे महिमान॥ केवि जाहाले परियेसा॥१॥ ह्मणती श्रीपाद नाही गेले॥ आणीक वदसी अ
वतार झाले॥ विस्तार करूनियां सगळे॥ निरोपावे ह्मणतसे॥२॥ सिध्द सागे नामधार
कासी॥ श्रीगुरुमहिमा काय पुससी॥ अनन्तरूप होता परियेसी॥ विश्वव्यापक परमा
त्मा॥३॥ पुढें कार्यकारणासी॥ अवतार झाले परियेसी॥ राहिले आपण गुप्तेसी॥ त
या कुरवक्षेत्रांत॥४॥ पाहे पां भार्गवराम देखा॥ अद्यापवरी भूमिका॥ अवतार जाहा
ले अनेका॥ त्याचेचि एकी अनेका॥५॥ सर्वाठायी वास आपण॥ मूर्त्ती एक नारायण॥ त्रि

१ मूर्त्तींचि तीन गुण ॥ उत्पत्ती स्थिती आणि प्रळये ॥ ६ ॥ भक्तजनाना तारावयासी ॥ अवतरतो हृषी १०
केशी ॥ शाप देत दुर्वास ऋषी ॥ कारण असे तयाचि ॥ ७ ॥ त्रयमूर्त्तींचा अवतार ॥ याचा कव
णा न कळे पार ॥ निधान तीर्थ कुरवपुर ॥ वसे तेथे गुरुमूर्त्ती ॥ ८ ॥ जे जें चिंतावे भक्तजनि ॥
तें तें पावावे गुरुदर्शनि ॥ श्रीगुरु वसावयाची स्थाने ॥ कामधेनु असे जाण ॥ ९ ॥ श्री पा
द वल्लभ स्थान महिमा ॥ वर्णावया अनुपमा ॥ अपार असे सागतो तुम्हा ॥ दृष्टांतेसि अवधा
रा ॥ १० ॥ तुज सांगावया कारण ॥ गुरुभक्ति वृथा न कळे जाण ॥ सर्वथा न करी तो निर्वाण ॥ पाहे १
वा सभक्तांची ॥ ११ ॥ भक्ति करावी दृढतर ॥ गंभीरपणे असावे धीर ॥ तरीच उतरि जैपैलपा

राउहपरत्रीसुखपावे ॥१२॥ याचिकारणेंदृष्टांतेतुज ॥ सांगेनऐकवर्तलेसहज ॥ कश्यपगो
त्रीहोताद्विज ॥ नामतयावल्लभेस ॥१३॥ सुशीळद्विजआचारवंत ॥ उदीमकरूनिउदरभ
रित ॥ प्रतिसंवत्सरीयात्रेसयेत ॥ तयाश्रीपादक्षेत्रासी ॥१४॥ असतांपुढेंवर्तमानी ॥ उदिम
निघालातोधणी ॥ नवसकेलाअतिगहनी ॥ संतर्पविब्राह्मणासी ॥१५॥ उदीमुआलिया
फळासी ॥ यात्रेसियेईनविशेषी ॥ सहस्त्रवर्णब्राह्मणासी ॥ इसाभोजनदेईनम्हणे ॥१६॥ नि
श्चयकरोनिमानसीं ॥ निघालाद्विजउदिमासी ॥ चरणध्यानसेमानसी ॥ सदांश्रीपादवल्ल
भाचे ॥१७॥ जेजेठायीजायदेखा ॥ अनंतसंतोषपावेनिका ॥ शतगुणेलाभझालाऐका ॥ प

र मानंद प्रवर्तला ॥ १८ ॥ लयलाऊनि श्रीपादचरणी ॥ यात्रेसि निघाला तेक्षणी ॥ वेचावया
ब्रह्मसंतर्पणी ॥ द्रव्य घेतले समागमे ॥ १९ ॥ द्रव्य घेऊनि द्विजवर ॥ निघतां देखती तस्कर ॥
कापट्यवेषे सत्वर ॥ तेहि तस्कर निघाले ॥ २० ॥ दोन तीन दिवसवरी ॥ तस्कर असतीसं
गिकारी ॥ एके दिवशी मार्गी रात्री ॥ जात असतां मार्गस्त ॥ २१ ॥ तस्कर म्हणती द्विजवरा
सी ॥ आह्मी जाऊं कुरवपुरासी ॥ श्रीपादवल्लभ दर्शनासी ॥ प्रतिवर्षी नेम असे ॥ २२
ऐसे बोलत मार्गासी ॥ तस्करी मारिले द्विजासी ॥ शिर छेदूनि यांपरियेसी ॥ द्रव्य घे
तले सकळिक ॥ २३ ॥ भक्तजनाचा कैवारी ॥ श्रीपादराव कुर्वपुरीं ॥ पातला त्वरित

वेत्राधारी॥ जटामंडीतभस्मांकित॥२४॥ त्रिशूळखड्ग घेउनि हाती॥ उभा ठेला तस्क
रांपुढती॥ वधिता झाला तया प्रती॥ त्रिशुळेकरूनि ताकाळ॥२५॥ समस्त तस्करांसि
मारितां॥ एक तस्कर होय विनविता॥ कृपाळुवा जगन्नाथा॥ निरापराधी आपण असे॥
२६॥ नेणें यातें वधितील ह्मणोनी॥ आलो आपण संगी होउनी॥ तूं सर्वोत्तमा जाण
ती मनी॥ विश्वाची मनवासना॥२७॥ ऐकुनि तस्कराची विनती॥ श्रीपाद तयातें बोल
विती॥ हाती देउनिया विभूती॥ विप्रावरी प्रोक्षी ह्मणे॥२८॥ मानलाउनि तया वेळा
मंत्रोनि लाविती विभूती गळां॥ सजीव जाहाला ताकाळा॥ ऐक वत्सा एकचित्ते॥२९॥

इतुकेवर्तता परियेसी॥उदयआलादिनकरासी॥श्रीपादजाहालेगुप्तेसी॥राहिलात
स्करद्विजाजवळी॥३०॥विप्रपुसेतस्करासी॥म्हणेतूं मातेकाधरिलेसी॥कवणेवधिले
तस्करासी॥म्हणोनिपुसेतयावेळी॥३१॥तस्करसांगेद्विजासी॥आलाहोताएकता
पसी॥जाहालेअभिन्नवपरियेसी॥वधिलेतस्करत्रिशुळे॥३२॥मजरक्षिलेतुज
निमित्ते॥धरोनिबैसविलेस्वहस्तें॥विभूतीलाऊनिमगतूते॥सजीवकेलातवदे
हो॥३३॥उभाहोताआतांजवळी॥अदृश्यझालातत्काळी॥नकळेकवणमुनीब
ळी॥तुझाप्राणरक्षिला॥३४॥होईलईश्वरत्रिपुरारी॥भस्मांगीहोयजटाधारी॥

तुझी भक्ती निर्धारी ॥ ह्मणोनि आला ढांकोनियां ॥ ३५ ॥ ऐकोनि तस्कराचें वचन ॥ विश्वा
सला तो ब्राह्मण ॥ तस्करांजवळील द्रव्य घेऊन ॥ गेला यात्रेसि कुरवपुरा ॥ ३६
नाना परी पूजा करी ॥ ब्राह्मणभोजन सहस्त्र चारी ॥ अनंत भक्ती प्रीति करी ॥ पु
जा करी श्रीपादुकांसी ॥ ३७ ॥ ऐसे अनंत भक्तजन ॥ मिळुन सेविती श्रीपादचरण
कुरवपूर प्रख्यात जाण ॥ अपार महिमा परियेसा ॥ ३८ ॥ सिद्ध ह्मणे नामधार
कासी ॥ संशय न धरी तू मानसी ॥ श्रीपाद आहेति कुरवपुरासी ॥ अदृश्य रूप
होऊनी ॥ ३९ ॥ पुढें अवतार असे होणे ॥ गुप्त असती याचि गुणे ॥ ह्मणा अनंत

गु० च०

४

रूपी नारायण ॥ परिपूर्ण सर्वांठायीं ॥ ४० ॥ ऐसी श्रीपाद श्रीवल्लभमूर्ती ॥ लौकि
कीं प्रगटली ख्याती ॥ झाला अवतार पुढती ॥ न्रसिहसरस्वती विख्यात ॥ ४१ ॥
म्हणोन सरस्वती गंगाधरु ॥ सागत कथेचा विस्तारु ॥ ऐकता भावे मनोहरु
सकळाभीष्टे साधती ॥ ४२ ॥ इति श्रीगुरुचरित्र परमकथाकल्पतरू श्रीन्र
सिहसरस्वत्योपाख्याने दशमोऽध्याय समाप्तः ॥ १० ॥ श्रीदत्तात्रयार्पण
मस्तु ॥ ओव्या ॥ ४२ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

अ०

१०

४

श्रीगणेशायनमः॥ नामधारक ह्मणे सिद्धातें॥ पुढें अवतार झाले केउते॥ विस्तारो
नियां आह्मातें॥ सांगा स्वामी कृपामूर्ती॥ १॥ सिद्ध ह्मणे ऐक वत्सा॥ अवतार झाले श्री
पाद हर्षा॥ पूर्वी वृत्तांत ऐकिला ऐसा॥ कथा सांगीतली विप्रस्त्रियेसी॥ २॥ शनीप्र
दोषीस वैश्वरासी॥ पूजीन होती गुरुउपदेशीं॥ देहवासना असतां तियेसी॥ पंचत्व
पावली तत्काळ॥ ३॥ जन्म झाला पुढें तिसी॥ कारंजनगर उत्तरदेशीं॥ वाजसनीय
शाखेसी॥ विप्रकुळीं जन्मली॥ ४॥ ज्ञातकर्म वर्तलें तियेसी॥ नाम अंबाभवानी ऐसीं
आरोपिले स्नेहासी॥ मातापिता परियेसा॥ ५॥ वर्ततां मातापितयागृहीं॥ वाढली कन्या

अती स्नेही ॥ विवाह करिती महोत्साहीं ॥ देती विप्रासि याच्चि ग्रामीं ॥ ६ ॥ शिवव्रतऊ असे
तो ब्राह्मण ॥ नाम तया माधव जाण ॥ तयासि दिधली कन्यादान ॥ अति प्रीती करोनि
या ॥ ७ ॥ तया माधव विप्रा घरी ॥ शुभाचार होती नारी ॥ वासना तीची पूर्वापरी ॥ ईश्व
र पूजा करीतसे ॥ ८ ॥ पूजा करी ईश्वरासी ॥ दंपत्य उभे मनोमानसीं ॥ प्रदोषपूजा अ
ती हर्षी ॥ करिती भक्तिपुरस्कर ॥ ९ ॥ मंदवारीं त्रयोदशीसी ॥ पूजा करिती अति विशे
षीं ॥ सत्वर झाली षोडशी तिसी ॥ अतर्वत्नी झाली ऐका ॥ १० ॥ तृतीय होय पांचवे मासी १
॥ उत्साह करिती बहू हर्षी ॥ उत्तम डोहळे होती तियेसी ॥ ब्रह्मज्ञान बोलतसे ॥ ११ ॥ उ

त्साह करिती मास साती ॥ द्विजवर करीसी मंती ॥ अक्षय वाणें वीवोळी आरती ॥ सुवासिनी मिळूनियां ॥ १२ ॥ ऐसे करितां नव मासी ॥ प्रसूत जाहाली शुभ दिवसी ॥ पुत्र जाहाला म्हणून हर्षी ॥ निर्भर झाली माता पिता ॥ १३ ॥ जन्म होताच तो बाळक ॥ ओंकार शब्द ल्लेण तसे ऐक ॥ पाहूनि झाले तटस्थ लोक ॥ अभिनव म्हणती ते वेळी ॥ १४ ॥ जातकर्म करी ब्राह्मण ॥ विप्रांसि दक्षणा वाटी आपण ॥ ज्योतिषी सांगती तयाचे लक्षण ॥ लग्न सत्वर पाहोनियां ॥ १५ ॥ सांगती ज्योतिषी त्या द्विजासी ॥ मुहूर्त वरवा असे विशेषी ॥ कुमर होईल कारणेसी ॥ गुरु सकळांचा निश्चयें ॥ १६ ॥ याचा अनुग्रह होईल ज्यासी

तोवंद्यहोईलविश्वासी॥ याचेवाक्यप्रमाणेसी॥ चिंतामणीयाचेचरण॥१७॥अष्ट
महासिद्धीयाचेद्वारी॥ वोळंगतीनिरंतरीं॥ नवनिधीयाचेघरी॥ राहातीएकद्विजो
त्तमा॥१८॥ नहोतयासिग्रहणीकृत॥ पूज्यहोयीलत्रिभुवनात॥ याचेदर्शनमात्रे
पतीत॥ पुनीतहोतीपरियेसा॥१९ होईलअवतारीपुरुष॥ आह्मासिदीसनसेस
त्य॥ संदेहनधरावामनांत॥ ह्मणोनिकरितीनमस्कार॥२०॥ ह्मणतीसमस्तद्विज
वर॥ सांगतीजनकासिउत्तर॥ याचेनिमहादैन्यहरे॥ भ्यावेनलगेकळिकाळा॥२१
जेजेवासनातुमचेमनी॥ सर्वसाधेलयाचेनी॥ याचयापालनपोषणीं॥ निधानअ

सेलुमचे घरा ॥ २२ ॥ ऐसे जातक वर्तउनी ॥ सांगता झाला ब्राह्मणस्तोमी ॥ जनक
जननी संतोषोनी ॥ देती वस्त्रें आभरणें तया ॥ २३ ॥ सांगोनि गेला ब्राह्मण ॥ मातापिता
आनंदघन ॥ दृष्टी लागेल ह्मणून ॥ निबलोण वोवाळिती ॥ २४ ॥ वार्ता गेली नगरात
अभिनव आजि देखिले ह्मणत ॥ उपजत बाळ ओंकार ह्मणता ॥ आश्चिर्य करिती
सकळ जन ॥ २५ ॥ नगरलोक इष्टमित्र ॥ पाहावया येती विचित्र ॥ दृष्टी लागेल ह्म
णोनि पळमात्र ॥ नदाविती कवणा पुढे ॥ २६ ॥ माया मोहे जनक जननी ॥ बाळासि दृ
ष्टी लागेल ह्मणोनी ॥ अंगारा लाविती मंत्रोनी ॥ रक्षा बांधिती हृष्णास्कते ॥ २७ ॥ परमा

गु॰ च॰
३

त्माअवतरो॥ दृष्टीकेविसंचरो॥ लौकीकधर्मचमत्कारो॥ मातापितासंरक्षिती॥ २८॥ वर्ते
तांबाळयेणेपरी॥ दिवसदाहाझालियावरी॥ नामकरणपरस्परी॥ करीजनकद्विजो
त्तम॥ २९॥ झालिग्रामदेवम्हणत॥ जन्मनावविख्यात॥ नामनरहरीऐसेंप्रख्यात॥
उच्चारकेलाधर्मकर्मे॥ ३०॥ ममत्वथोरबाळकावरी॥ प्रतिपाळितीप्रीतिकरी
माताम्हणतेअवसरी॥ नपुरेक्षीरबाळकासी॥ ३१॥ पतीसिम्हणेतेवेळा॥ स्तनी
दुग्धथोडेबाळा॥ मेळवाएकादीअबळा॥ स्तनपानद्यावया॥ ३२॥ अथवा
आणाअजाएका॥ आपुलेस्तनेनन्हामेभुक॥ ऐकोनिहांसेबाळक॥ स्पर्शेस्तनसव्य

अ॰
११

२

करे ॥ ३३ ॥ स्तनासि स्पर्शतां कर ॥ बत्तीस धारा वाहे क्षीर ॥ वस्त्रे भिजोनि विचित्र ॥ वा
हो लागले भूमीवरी ॥ ३४ ॥ विस्मय करिती जनकजननी ॥ प्रगट न करी गोप्य गुणी
नमन करिती बाळकाचरणी ॥ माता होय खेळविती ॥ ३५ ॥ पाळणां घालोनि बा
ळकासी ॥ पर्यंद गाय अति हर्षी ॥ न राहे कुमर पाळणेसी ॥ सदा खेळे भूमीवरी ॥ ३६
वर्ततां बाळ येणे परी ॥ माता पिता नमस्कारी ॥ बाळ झाला संवत्सरी ॥ न बोले भा
तां काय करूं ॥ ३७ ॥ माता बोलवी कुमरासी ॥ बोले शब्द ओकारेसी ॥ चिंता करी
तसे मानसी ॥ मुके झाले दैवयोगे ॥ ३८ ॥ पुसती जाण जोशियासी ॥ या बाळका बो

लावयासी ॥ काय उपाय विशेषी ॥ ह्मणोनि पुसती वेळोवेळां ॥ ३९ ॥ जोशी सांगतीत
यासी ॥ आराधावे कुळदेवतेसी ॥ अर्कवारी अश्वत्थपर्णेसी ॥ अन्न घालिती तीन वे
ळा ॥ ४० ॥ एक ह्मणती होईल मुके ॥ यासि शिकवावें विवेकें ॥ बाळ बोल बोलती नि
के ॥ परि तो बाळ न बोलेची ॥ ४१ ॥ हासोनि ओंकार उच्चारी बाळ ॥ आणीक नेणे
बोल केवळ ॥ विस्मय करिती लोक सकळ ॥ ओंकार शब्द ऐकोनियां ॥ ४२ ॥ एक
ह्मणती नवल झाले ॥ सर्वज्ञान असे भले ॥ श्रवणी ऐकतां बोल सगळे ॥ जाणूनि
बोले काय गुणे ॥ ४३ ॥ काही केल्या न बोले सत्ता ॥ चिंता करिती मातापिता ॥ वर्षे स

तन्मालीन तत्वता ॥ मुका झाला दैवयोगे ॥ ४४ ॥ सात वरुषे कुमरासी ॥ योग्य झाला
मुजिसी ॥ पुसते जाहाले ब्राह्मणांसी ॥ के विकरावे ह्मणोनियां ॥ ४५ ॥ विप्र ह्मणती
तया वेळा ॥ संस्कारावे ब्राह्मणकुळा ॥ उपनयनावेगळ केवळा ॥ अष्टवर्षे होउ
न ये ॥ ४६ ॥ मातापीता चिंता करिती ॥ उपदेशावे कवणे रीती ॥ मुका असे हा निश्चि
ती ॥ कैसे अदृष्ट झाले आह्मा ॥ ४७ ॥ कैसे अदृष्ट आपुले ॥ ईश्वर गोरी आराधि
ले ॥ त्रयोदशीस शिव पूजिले ॥ वायां झाले ह्मणतसे ॥ ४८ ॥ ईश्वरे तरि दिधला
बहु ॥ स्फलक्षण झाला कुमरु ॥ न बोले आता काय करुं ॥ ह्मणोनि चिंती शिवासी ॥ ४९

५ एक चि बाळ आमुचे कुशी ॥ आणीक न देखो स्वप्नेसी ॥ वेष्टिलो होतो आम्ही आशी ॥
आमुते रक्षील लक्ष्मणोनी ॥ ५० ॥ नक्वेचि मनीची वास ॥ पुत्र झाला निर्वाण वेळा ॥ काय
वर देत महेशा ॥ ज्ञानि प्रदोष पूजिता मा ॥ ५१ ॥ ऐसे नाना परी देख ॥ जननी करी महा दुः
ख ॥ जवळी येऊनि बाळका ॥ संबोखित से मातेसी ॥ ५२ ॥ घरात जाऊनि ते वेळा ॥ घेऊ
नि आणी लोखंड सबळा ॥ हाती धरि ना चि निर्मळा ॥ झाले सुवर्ण बावन्न कशी ॥ ५३ ॥
आणोनि देत से मातेसी ॥ विस्मय करी बहु वसी ॥ बोलाऊनिया पतीसी ॥ दाविती झाली ५
ते वेळीं ॥ ५४ ॥ गोप्य करूनि तया वेळा ॥ गृहांत नेले तया बाळा ॥ पाहाती तयाची बाळ

लीला॥ आणिक लोह देती हाती॥५५॥ अमृतदृष्टी पाहातां॥ लोह सुवर्ण होय तत्व
ता॥ विश्वासूनि म्हणती हा सर्वथा॥ होईल पुरुष कारुणीक॥५६॥ मग मपुत्रोते आलिं
गोनी॥ विनविता तिजनक जननी॥ तूं तारक वाद्गिरोमणी॥ कारणीक पुरुषकुळदी
पका॥५७॥ तुझेनि सर्वस्व लाधलो॥ मुका म्हणोनि निर्बुजलो॥ अज्ञान आवरणे
वेष्टलो॥ जनी मुका म्हणती तुज॥५८॥ आम्हुचे मनीची वासना॥ तुवां पुरवावी नंदना॥
तुझे बोबडे शब्द आपणा॥ ऐकावे वाटे पुत्रराया॥५९॥ हास्यवदन करी बाळा॥ दृ
वीय यज्ञोपवीत गळां॥ कटी दावी मोजी मेखळा॥ खूण दाखवी मातेसी॥६०॥ संज्ञा करी

निमातेसी॥ बाळदाखवी संतोषी॥ मौंजीबांधितां आपणासी॥ येती लक्षणे बोळस
कळ॥६१॥ मातापितासंतोषती॥ विवाहासि ज्योतिषी पाचारिती॥ ब्रतबंध लग्नमु
हूर्त पाहाती॥ सर्व आइती करिते झाले॥६२॥ केली सामग्री बहुतापरी॥ रत्नखचि
त अळकारी॥ मायामोहे प्रीतिकरी॥ समारभ करितातीं॥६३॥ चतुर्विध ब्राह्मण ये
ती॥ शाखापरत्वे वेद पढती॥ इष्ट सोयरे दाइजगोती॥ समस्त आले तया भुवना
॥६४॥ नानापरिचे शृंगार॥ उभारिले मंडप विचित्र॥ आनंद करीतसे द्विजवर॥ अ
पार द्रव्य वेंचिता होय॥६५॥ नगरलोक विस्मय करिती॥ मूर्खपुत्रासि येवढी आइती

द्विजा लागी असे भ्रांती॥ द्रव्य वेची यथा आपुले॥ ६६॥ ऋतु केवेचूनि पुत्रासी॥
व्रतबंध करील परियेसी॥ गायत्री केवि उपदेशी॥ करील आचार कवणे परी॥
६७॥ एक म्हणती हो कां भलते॥ मिष्टान्न स्वेच्छा आम्हा मिळते॥ देकार देईल हिरण्यव
स्त्रे॥ चाड नाही त्याच्या मंत्रा॥ ६८॥ ऐसे नाना परी लोक॥ विचार करिती अनेका॥ मा
तापित्यास अत्यंत सुख॥ देवदेव करिताती॥ ६९॥ चौलकर्म येरे दिवसी॥ भोजन
चौल मणिसी॥ पुनरपी अभ्यंग करूनि हर्षी॥ यज्ञोपवीत धारण केले॥ ७०॥ मंत्र
पूर्वक यज्ञोपवीत॥ धारण करविती समस्त॥ सह भोजन माया करित॥ घेउनि

॥

गेली घरांत ॥ ७१ ॥ भोजन करी माते सवे ॥ निरोप घेता एकभावे ॥ मौंजी बंधन असे करा
वे ॥ म्हणोनि आला पित्याजवळी ॥ ७२ ॥ गुह्योक्त मार्ग मौंजी देखा ॥ बंधन केलें त्या बा
ळका ॥ सुमुहूर्त आला तत्काळिका ॥ मंत्रोपदेश करिता झाला ॥ ७३ ॥ गायत्री मंत्र
अनुक्रमेसी ॥ उपदेश देतां परियेसी ॥ बाळ उच्चारी मनोमानसी ॥ व्यक्त न बोले
कवणापुढे ॥ ७४ ॥ गायत्री मंत्र कुमरासि होतां ॥ भीक्षा घेऊनि आली माता ॥ वस्त्रे
आभरणे रत्नखचिता ॥ देती झाली तया वेळी ॥ ७५ ॥ पहिली भीक्षा घेउनि करी
आशिर्वचन देती नारी ॥ बाळक ऋग्वेद उच्चारी ॥ आचार धर्म वर्ततसे ॥ ७६ ॥ पहि

ली भीक्षा येणे परी ॥ देती जाहाली प्रीती करी ॥ अग्निमीळे ह्मणो निउच्चारी ॥ ब्रह्मचारी तया
वेळी ॥ ७७ ॥ दुसरी भीक्षा देत माता ॥ उच्चार केला यजुर्वेद इषेत्वा ॥ लोक समस्त तटस्ता
माथा तुकिती तये वेळी ॥ ७८ ॥ तिसरी भीक्षा देत माता ॥ होय सामवेद पढता ॥ अग्न आया
हि गान करिता ॥ वेद तीन ह्मणतसे ॥ ७९ ॥ सभा समस्त विस्मय करी ॥ पिता हर्षनिर्भरी ॥ मु
का बोले वेद चारी ॥ ह्मणती होईल कारणीका ॥ ८० ॥ या ते ह्मणो नये नर ॥ होईल देवाचा
अवतार ॥ ह्मणूनि करिती नमस्कार ॥ जगद्गुरू सि ते समयी ॥ ८१ ॥ इतुक्या वरी तो बाळ
क ॥ माते सि ह्मणतसे एका ॥ तुवा उपदेशु केला एक ॥ भीक्षा माग ह्मणोनी ॥ ८२ ॥ नव्हे

चिबोलतुझामिथ्या ॥ निरोपद्यावाआह्मा त्वरिता ॥ निर्धारझालामाझियाचिता ॥ जाउँती
र्थेआचरावया ॥ ८३ ॥ आह्माआचारब्रह्मचारी ॥ भीक्षाकरावीघरोघरी ॥ वेदाभ्यासम
नोहरी ॥ करणेअसेपरियेसा ॥ ८४ ॥ ऐकोनिपुत्राचेवचन ॥ दुःखेदाटलीअतिगहन ॥ बा
ष्पोंदकेलोचन ॥ आलीमूर्छनातयावेळी ॥ ८५ ॥ निर्जीवहोऊनिक्षणेक ॥ करितीझा
लीमहाशोक ॥ पुत्रामाझातूंरक्षक ॥ केलीआशाबहूमनी ॥ ८६ ॥ आनुतेरक्षिसीह्मणो
नी ॥ होतीआह्माफारमती ॥ नबोलसीआमुचियागुणी ॥ मुकेह्मणविसीआपणासी ॥ ८७
नायकोंकधीतुझियाबोला ॥ आताऐकतासंतोषझाला ॥ पूजनेईश्वरफळला ॥ ह्म

गेः निविश्वासकेलासेआस्ती ॥ ८८ ॥ ऐसेनानापरीदेखा ॥ पुत्रासिह्मणतसेबालिका
आलिगेनियांकुमरका ॥ हृपाभक्तीतेवेळीं ॥ ८९ ॥ ऐकोनिमातेचेवचन ॥ बाळक
सांगेब्रह्मज्ञान ॥ नकोदुखकूं अंतःकरण ॥ आत्माकरणेतेचिअसे ॥ ९० ॥ तूंतेआणी
कुपुत्रचोरी ॥ होतीलमातेनिर्धारी ॥ तुह्मींसेवापरीपरी ॥ करितीमनोभावेसी ॥ ९१ ॥ तुवा
आराधिलाशंकर ॥ जन्मांतरीपूर्वापर ॥ ह्मणोनिठेविलामस्तकीकर ॥ मगस्मृतीहोती
झाली ॥ ९२ ॥ पूर्वजन्मीचावृत्तात ॥ स्मरतांझालाविस्मित ॥ श्रीपादवल्लभस्वरूपत ॥ दि
सतसेतोबाळ ॥ ९३ ॥ देखोनिमातापितातयावेळा ॥ नमनकेलेचरणकमळा ॥ श्रीपादे

मु॰च॰ अ॰

९ उढऊनिअवलीला ॥ सांगतीगोप्यअवधारा ॥ ८४ ॥ ऐकमातेज्ञानवंती ॥ हाबोलकरीं ११
होगुह्मी ॥ संन्यासीआम्हीयती ॥ आलिप्तअसोसमारी ॥ ८५ ॥ यास्त्विकारणेआम्हीआतां
हिंडूंसमस्ततीर्थयात्रा ॥ कारणअसेपुढेआतां ॥ म्हणोनिनिरोपमागुती ॥ ८६ ॥ येणेप
रिजननीसी ॥ गुरुमूर्त्तीसांगतीविनयेसी ॥ मातेबोलनपुत्रासी ॥ श्रोतेसावधप
रियेसा ॥ ८७ ॥ पुत्रासिविनवीतयेवेळे ॥ आम्हासांडूनिजाशील ॥ आणीकुडोळांन
देखोबाळा ॥ केविवांचूंपुत्रराया ॥ ८८ ॥ धाकुटपणीतुम्हातापस ॥ कोणधर्मअसेह ९
र्ष ॥ धर्मशास्त्रीख्यातीसरस ॥ आश्रमचारीआरावे ॥ ८९ ॥ ब्रह्मचर्यवर्षेबारा ॥ गृह

स्थाश्रम तदनंतरा ॥ घडती पुण्ये अपरंपारा ॥ गृहस्थाश्रमी सुख असे ॥ १०० ॥ मुख्य
आश्रम असे गृहस्थ ॥ आचरता होय अति समर्थी ॥ समास घ्यावा मग मुख्यार्थी ॥ ध
र्मशास्त्रा येणे परी ॥ १ ॥ ब्रह्मचर्य मार्ग आइका ॥ पठण करावे वेदादिका ॥ विवाह
होतां गृहस्थ निका ॥ पुत्रादिक लाधावे ॥ २ ॥ यज्ञादिकर्म साधोनिया ॥ तंदनंत
र संन्यास न्याया ॥ येणे विधी आचरोनियां ॥ अग्रास्य समास बाळपणी ॥ ३ ॥ स
मस्त इंद्रिये संतोषवावी ॥ मनीची वासना पुरवावी ॥ नंतर तपाची वाट धरावी ॥
संन्यास घेता मुख्य असे ॥ ४ ॥ ऐकोनि मातेचे वचना ॥ गुरू सांगती तत्वज्ञान ॥ नाम

धारकाशुध्यमन ॥ करूनिऐकल्षणेसिष्या ॥ ५ ॥ गंगाधराचानंदन ॥ श्रोतयांसांगेनमृन ॥ परिसातुह्मीसमस्तजन ॥ गुरुचरित्रविस्तार ॥ ६ ॥ पुढेंवर्तलेंअपूर्वऐका ॥ सिध्यसांगेनामधारका ॥ महाराष्ट्रभाषाकरूनिटीका ॥ सांगतसेसरस्वती ॥ ७ ॥ इतिश्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरुश्रीनृसिंहसरस्वत्योपाख्यानेसिध्यनामधारकसंवादेबाळचरित्रंनामएकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ श्रीदत्तात्रयार्पणमस्तु

ओवी ॥ १०८ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरू म्हणे मातेशी ॥ आत्माऐसा निरोपदेशी ॥ अनित्यश
रीर तूं जाणशी ॥ काय भरवसा जीवाचा ॥ १ ॥ श्लोक ॥ अनित्यानि शरीराणि वैभवं नै
व शाश्वतम ॥ नित्यं संनिहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ॥ २ ॥ टीका ॥ येकदां असेल
चिरंजीवी ॥ त्यासि तुझी बुद्धी बरवी ॥ अनित्य देह वैभव विभवी ॥ पुढे कोण भरवसा
श्र ॥ देह तो क्षणभंगूर ॥ नाहीं राहिले कवण स्थीर ॥ जोवरी दृढ शरीर ॥ पुण्यमार्ग रा
हा दावे ॥ ४ ॥ जो मृत्यूसी जिंकितो ॥ त्यानिश्चये पावे शरीरनित्य ॥ त्यासि तवोपदेश
सत्य ॥ म्हणे धर्म करी पुढें ॥ ५ ॥ अहोरात्र आयुष्य उणे ॥ होतसे क्षणक्षणें ॥ करावा ध

र्मयात्विकारणे॥पूर्ववयासी॥६॥जैसासूर्यरथचाले॥निमिष्यहोताशीघ्रकाकें॥बा
वीससहस्त्रगांवबको॥तैसें आयुष्यक्षीणहोय॥७॥अल्पोदकीजेसेमत्स्य॥
तैसामनुष्यअल्पायुष्य॥जोवरीप्राणस्फुरस॥धर्मकरावापर्येसा॥८॥पर्जन्यपड
तावृक्षावरी॥उदकराहेपर्णाग्रीं॥स्थीरनकेनिर्धारी॥कलेवरेतैसीनासती॥९॥
तेवीशरीरनव्हेस्थीर॥जीवित्वयौवनाएग्चार॥जरामरणानिर्धार॥केधवां
पडेनकळेची॥१०॥यात्विकारणेदेहासी॥विश्वासनयेपर्येसी॥मृत्युअसेदे
हासी॥धर्मकरावेतात्काळी॥११॥येस्वादानरकलत्रेसी॥द्रव्यदेतांपर्येसी॥दि

वसगणनाकरीकैसी॥ तैसायमरात्रंदिवस॥ १२॥ जैशासमस्तनदीदेखा॥ समुद्रा
सीघेऊनीउदका॥ जातीपरतोनीनयेतीजन्मभूमिका॥ तैसेआयुष्यनपरते॥ १३॥
अहोरात्रीजातीपळोन॥ ऐसेंनिश्चयेजाणोन॥ पुण्यनकरितीजेजन॥ पशुसमानप
रियेसा॥ १४॥ ज्यादिवसीपुण्यनाही॥ वृथागेलेदीनपाहीं॥ त्यायमाकरुणानाहीं॥
करावीपुण्येतात्काळी॥ १५॥ पुत्रदाराधनगोधन॥ आयुष्यगृहयेणेगुण॥ जेजेन
निश्चयम्हणोना॥ जाणपशुसमपर्येसा॥ १६॥ जैसीक्तसरीमनुष्यासी॥ भक्षितीहोय
परियेसी॥ तैसेशरीरासी॥ वृद्धापभक्षणपरियेसा॥ १७॥ याकारणेतारुण्यपणी॥

कराके पुण्य विद्धजनी॥ आम्हा कां वर्जिसी जननी॥ काय बुध्धी बरवी असे॥१८॥ जोय
माचा असेल इष्ट॥ त्याणे करावा हा हढ॥ अमरत्वे असे जो स्पष्ट॥ त्याणे पुढे धर्म करणें
१९॥ संसार म्हणजे स्वप्नापरी॥ जैसे पुष्प मोगरी॥ सवेचि होय शुष्क परी॥ तयापरी देह
जाण॥२०॥ जैसी विजू लवत॥ सवेचि होय गुप्त॥ त्याचि परी देह होत॥ स्थीर नव्हे
पर्यै॥२१॥ ऐसे नाना परी देखा॥ बोधितो झाला जननीजनका॥ विस्मय करिती सभा
लोका॥ बालत्व केवी सांगा॥२२॥ ऐकोनी पुत्राचे वचन॥ माता करितसे नमन॥ देवानि
रोपिले ज्ञान॥ विनंती माझी पर्येसा॥२३॥ त्वां निरोपिले आत्माशी॥ पुत्र चौघे होती कुशी

विश्वासनकेगामानशी॥ कुळदेवतापुत्रराया॥ २४॥ जोवरीहोययेकक्षन॥ त्यांराहावें
मायिपत॥ निरोपनेदीतोवरीसत्य॥ म्हणोनीविनवीतेवेळी॥ २५॥ माझेवचनलंघुनी॥
जरीजाशीलनिघोन॥ मीप्राणदेईन॥ हानिश्चयअवधारा॥ २६॥ पुत्रनकेतूंआम्हांशी॥
आमुचाकुळदैवतहोशी॥ सत्यकरीवंचनासी॥ बोलआपुलेदातारा॥ २७॥ ऐकोनीमा
तेचेवचन॥ श्रीगुरूबोलतीहांसोन॥ आमुचाबोलअसत्यजाण॥ नववाक्यनिर्धारतों
२८॥ तूनेहोतीपुत्रदोनी॥ निरोपद्यावासंतोषोनी॥ मगनराहेएकजननी॥ बोलआपु
लेसत्यकरी॥ २९॥ संबत्सरयेकतवघरीं॥ राहोनीमातेनिर्धारी॥ वासनापुरविलीत्यावरी॥

गु० च०
२

मग मज आज्ञा देणें ॥ २० ॥ ऐसे बोलोनी निगुती ॥ राहिले श्रीशंकर मूर्ती ॥ वेदाभ्या
से ख्याती ॥ केली शिष्यवर्गेंशी ॥ २१ ॥ नगरलोक विस्मय करिती ॥ नवल झालें बां
ळती ॥ बाळ पहा वर्षे साती ॥ वेद चारी सांगतसे ॥ २२ ॥ विद्वज्जन विद्यार्थी ॥ तीन
वेळां पढों येती ॥ सकल शास्त्रीं जे ह्मणविती ॥ तेही येती शिकावया ॥ २३ ॥ येणेप
रीत्या घरीं ॥ राहिले ते ब्रह्मचारी ॥ माता झाली गरोदरी ॥ महा आनंद करीतसे ॥ २४ ॥
नित्य पूजिती पुत्राशी ॥ देव मानोनी मानसी ॥ निधान लाधले एकाध्यासी ॥ का
य सांगू संतोष त्याचा ॥ २५ ॥ नवमास होतांचि त्वरित ॥ माता झाली प्रसूत ॥ पुत्र जा

अ०
१२

२

लेयुगमख्यात ॥ अतिसुंदर परियेसा ॥ ३६ ॥ पुत्र झाले उल्हास थोर ॥ मातापितासंतो
ष फार ॥ आशीर्वचन निर्धार ॥ असत्य नव्हे देवाचें ॥ ३७ ॥ याकारणे गुरूवचन ॥ सत्य
माना हो द्विजजना ॥ जैसे असेल अंतःकरण ॥ तैसें होईल परियेसा ॥ ३८ ॥ ऐशा परी
वर्षयेका ॥ मित्रांसी झालें ते बालक ॥ खेळवीत माता हरीख ॥ आला श्रीगुरू त्यां
जवळी ॥ ३९ ॥ जननी ऐकावें वचना ॥ झाली तब मनकोमना ॥ दोघे पुत्र निधाना
पूर्णायुषी जन्मले ॥ ४० ॥ आणीक होती दोघे सुत ॥ त्यानंतर कन्या येक ॥ असाना
दतां सुख ॥ पावले तुह्मी ॥ ४१ ॥ आतां आह्मा ते निरोप द्यावे ॥ जातो आह्मी स्वभा

वे॥ सतोषरूपी असावें॥ म्हणोनी निरोप घेती॥ ४२॥ संतोषोनि मातापिता॥ चरणाव
री ठेविती माथा॥ स्वामी आमुची कुळदेवता॥ अशक्य आम्ही बोलाया॥ ४३॥ नक
ळे आम्हा स्वरूपज्ञान॥ काय ओळखावें पूणं॥ माया मोहें वेष्टोन॥ आम्ही नेणों
महिमा॥ ४४॥ माया प्रपंचें वेष्टोनी॥ तूतें म्हणो स्कन म्हणोनी॥ निष्ठुर बोले एके
समयीं॥ क्षमा करणें स्वामियां॥ ४५॥ सहभोजन शयनासनी॥ तूतें गांजो कोडो
नी॥ केउेन घेवो उगवोनी॥ क्षमा करीं स्वामियां॥ ४६॥ तारक आमचे वंशासी॥
बापा तूं अवतरलाशी॥ प्रदोषपूजा सफळांसी॥ आली मातें स्वामियां॥ ४८॥ आ

तां आम्हां काय गती ॥ सांगा स्वामि श्रीमूर्ती ॥ पावेन जनन वृत्ती ॥ कृपा करी देवराया ॥
४९ ॥ सागरावरी जैसी गंगा ॥ तो आळशावरी आली वेगा ॥ पावन केले ममांगा ॥ उ
भय कुळवे चाळीस ॥ ५० ॥ आम्हा ठेविसी कवणे परी ॥ महाधुरंधर संसारीं ॥ तव दर्शि
न होय जरी ॥ तरीच वाचों आत्मजै ॥ ५१ ॥ ऐकोनी ऐसे वचन ॥ गुरू बोलती जाण ॥
जे जे समयी तुमचे मन ॥ स्मरण करीलु आमुचें ॥ ५२ ॥ स्मरण करितां तुम्हा जवळी
न करी चिता वेळोवेळी ॥ येईन भीता काळी ॥ म्हणोनि भाक देतसे ॥ ५३ ॥ आणीक
कन्या पुत्र तीनी ॥ होतील ऐक भवानी ॥ दैन्य नाहीं त्रिभुवनी ॥ सदा श्रीमंत नादाला ॥ ५४

गु॰च॰ ५

अ॰ १२

जन्मांतरीईश्वरासी॥पूजाकेलीप्रदोषीं॥याचीमहिमाऐसी॥जन्मोजन्मीश्रीयुक्त॥५५
इहजन्मीसौख्यऐका॥देहांतीपरलोक॥पूजाकरितांपिनाक॥पूर्वजन्मनसेकीं॥५६
त्वांआराधिलाशंकर॥आम्हाकरविलेअवतार॥वासनापुरविलीतुझीजर॥आं
ह्मासिनिरोपदेआतां॥५७॥पुन्हादर्शनतुम्हासी॥होईलएकावर्षासी॥जावोनी
बदरीवनासी॥सिद्धदर्शनमीघेतों॥५८॥निरोपघेवोनीतयेवेळां॥श्रीगुरूनिघा
लेअवलीळा॥नगरलोकयेतीसकळां॥मातापिताबोलविती॥५९॥म्हणतीसमस्त ५
नरनारी॥तापसीनिघालाब्रह्मचारी॥होयपुरूषअवतारी॥मनुष्यदेहीनव्हे॥६०॥ए

क म्हणती नवल ॥ तापसीनि घाला बाळ ॥ पिता माता सकळ ॥ निरोप देती ॥ ९० ॥ कैसें
याचे अंतःकरण ॥ जैसा होय कां पाषाण ॥ मन करोनी निर्वाण ॥ बोलला विती पुत्रासी
॥ ९१ ॥ येक सणतीन करे बाळ ॥ वंध्याशिवजास्वनीळ ॥ अनुमान न करे केवळ ॥ निश्च
येशीं ॥ ९२ ॥ सात वर्षांचे बाळ देखा ॥ वेद म्हणत अखिल शाखा ॥ मनुष्यमात्र न करे
लेखा ॥ ऐसे बोलती ॥ ९३ ॥ ऐसें त्याला बोलोन ॥ करिती साष्टांग नमन ॥ नाना परी
स्तोत्र वचन ॥ करिताती ॥ ९४ ॥ नमन करोनि सकळिकां ॥ आले आपुले गृहांतिका ॥ पु
ढें जाती जनक जननीका ॥ पुत्रास बोलवीत ॥ ९५ ॥ निजरूप जननीसी ॥ दाविता झाला

मातेसी ॥ श्रीपादवल्लभदत्तात्रयाशी ॥ देखते जाले ॥ ६६ ॥ त्रीमूर्तिचा अवतार ॥ जाला
नरहरीनर ॥ निजरूपी कर्पूरगोर ॥ पहातां नमी चरणासी ॥ ६७ ॥ जयजय जगद्गुरू
त्रिमूर्तिचा अवतारू ॥ आमुचे पुण्य थोरू ॥ म्हणोनी देखिले चरण ॥ ६८ ॥ तूं तारक वि
श्वासी ॥ आम्हा उद्धरिलें विशेषीं ॥ पुन्हा दर्शन आम्हासी ॥ वारंवार देईजे ॥ ६९ ॥ ऐ
से म्हणोनी मातापिता ॥ चरणी ठेविला माथा ॥ आलिंगिती श्रीगुरूनाथा ॥ स्नेहभा
वें ॥ ७० ॥ संतोषोनि गुरुमूर्ती ॥ अश्वासित प्रीती ॥ पुनर्दर्शन होनिश्चिती ॥ देईं म्ह
णती तये वेळा ॥ ७१ ॥ ऐसे तयास बोलोनी ॥ निरोप घेतला तयेक्षणी ॥ परतोनि गेले

ज्ञानकज्जननी ॥ ७२ ॥ वरदमूर्ति गुरुराणा ॥ निघाला जावया बदरीवना ॥ पातला
आनंदवना ॥ वाराणशीक्षेत्राशी ॥ ७३ ॥ अविमुक्त वाराणशीपुरी ॥ क्षेत्र थोर चरा
चरी ॥ विश्वेश्वर अवधारी ॥ अनुपम्य त्रिभुवनी ॥ ७४ ॥ राहोनियां त्यास्थानी ॥ अ
नुष्ठान करिती शिरोमणी ॥ विश्वेश्वराचे दर्शनी ॥ करिती आत्माराम ॥ ७५ ॥ येणेप
रीत्यास्थानी ॥ क्वचित काळक्रमांनी ॥ अष्टांगा योगे करुनी ॥ तप करिती ॥ ७६ ॥
त्या काशीनगरांत ॥ तपस्वी असती बहुत ॥ संन्यासी येती अवधुत ॥ तप करिती
दारुण ॥ ७७ ॥ त्यामाजी ब्रह्मचारी ॥ योगमार्गी धुरंधरी ॥ देखोनियां परोपरी ॥ न

वळकरिती॥ ७८॥ ह्मणती हा ईश्वरी॥ नपकरितो नानापरी॥ कैसे वैराग्य उदरी॥ ठसा
वलें॥ ७९॥ शरीर स्वार्थ न व्हेयाशी॥ योगी होय संन्यासी॥ स्नान करी त्रिकाळेंशी॥ म
नकर्णिकि माझारीं॥ ८०॥ ऐसें नित्य स्तविती॥ सकळ संन्यासी॥ दर्शन घेती॥ वृद्ध
होता एक यती॥ नाव कृष्ण सरस्वती॥ ८१॥ तो केवळचि ज्ञानी॥ महा तपस्वी मुनी
तो देखोनी नयनी॥ अत्यंत स्नेह करी॥ ८२॥ ह्मणे सकळ यतीश्वरासी॥ न म्हणा ब्र
ह्मचारीयासी॥ अवता[illegible]पुरुष तापसी॥ विश्ववंद्य॥ ८३॥ वार्धक्यपणे आम्हा
शी॥ वंदिता दुषण सकळांशी॥ विशेष आम्हा हा संन्यासी॥ मूर्खजन निंदिती॥ ८४

वय धाकुटे जाणोनी ॥ न मन करी काय मुनी ॥ प्रख्यात मूर्ति त्रिभुवनी ॥ आम्हा वं
द्य ॥ ८५ ॥ याकारणे आम्ही याशी ॥ विनऊं परोपकाराशी ॥ संन्यास देतां समस्तां
शी ॥ मतिस्थीर होईल ॥ ८६ ॥ लोकानुग्रहानिमित्त ॥ हा होय गुरू समर्थ ॥ याचे
दर्शन मात्रें ॥ आम्ही पुनीत पर्येसा ॥ ८७ ॥ याकारणे बाळकांशी ॥ विनवीं
आम्ही विनयेशी ॥ आश्रम द्यावा संन्याशी ॥ पूजा करोनी एकभावें ॥ ८८ ॥
म्हणोनी आले त्याजवळी ॥ विनविता तीसकळ मुनी ॥ ऐक तापसां तूं मोळी
विनंती असे परियेसा ॥ ८९ ॥ लोकानुग्रहाकारणे ॥ तुम्ही आम्हास संन्यास

देणें ॥ आम्हालागीं उद्धारणें ॥ पूजा घ्यावी आम्हा करी ॥ ९० ॥ कलियुगीं संन्यास
म्हणोन ॥ निंदा करिती सकळजन ॥ स्थापना करणार कवण ॥ भूमीवरी दिसताती ॥ ९१
श्लोक ॥ अग्निहोत्रं गवालंबं संन्यासं पलकं तथा ॥ देवराच्च सुतोत्पत्तिः कलौ पंच
विवर्जयेतू ॥ ९२ ॥ टीका ॥ यज्ञदान गवालंबन ॥ संन्यास घेतां दूषण ॥ पलपैत्र घेभ्रा
तरांगना ॥ करूं न ये म्हणताती ॥ ९३ ॥ करितां कलियुगांत ॥ निषिद्ध बोलती जन सम
स्त ॥ संन्यास मार्ग सिद्धांत ॥ वेद समस्त विख्यात ॥ ९४ ॥ पूर्वी ऐसे वर्तमानी ॥ निषि
द्ध केले सकळजनीं ॥ शंकराचार्य अवतारोनी ॥ स्थापना केली ॥ ९५ ॥ त्यावरी दत्तके दिव

स॥ चालत आले मार्ग समस्त॥ कली प्रबळ होता नाश॥ पुनरपी निद्रा करिताती॥ ९६॥
आश्रमाचा उद्धार॥ सकळजना उपकार॥ करावया कृपासागर॥ म्हणती एका मुनीव
र॥ ९७॥ ऐकोनी त्याची विनंती॥ गुरुमुनी आश्रम घेती॥ वृद्ध कृष्ण सरस्वती॥ तया पा
सोनी पर्येसा॥ ९८॥ ऐसे म्हणती सिद्धमुनी॥ विनवीत नामकरणी॥ संदेह होतां माझे म
नी॥ कृपामूर्ति गुरुराया॥ ९९॥ म्हणती श्रीजगद्गुरू॥ यातें जाले आणीक गुरु॥ त्रिमू
र्तिचा अवतारू॥ कोणे परी दिसतसे॥ १००॥ सिद्ध म्हणे शिष्यासी॥ सांगेन त्याची स्थि
रघु ती कैसी॥ पूर्वी श्रीगुरुनाथाशी॥ जाला वशिष्ट जेसा की॥ १॥ आठवा अवतार कृष्णाशी

संदीपनगुरूपर्येशी॥ अवर्तीचिमानशी॥ तयापरीराहाठावे॥२॥याकारणेगुरुमूर्ती
गुरूकेलाब्रह्मसरस्वती॥ बहुकाळींचेयती॥ म्हणोनीत्यातेमानिले॥३॥शिष्यम्हणे
सिद्धासी॥ स्वामीकथानिरोपिलीसी॥ वृद्धकृष्णसरस्वतीसी॥ गुरूकेलेम्हणोनी
४॥समस्तयतीश्वरांहून॥ त्यादिधलाबहुमान॥ कृष्णासरस्वतीपूर्वीकोण॥कोणगु
रूमूळपीठ॥५॥विस्तारोनीआम्हाशी॥ निरोपावेकृपेशी॥ येणेमाझेमानसी॥स
तोषहोयस्वामियां॥६॥ ऐसेशिष्येविनवितां॥ सांगेसिद्धविस्तारतां॥ मूळपीठआ
द्यंतां॥गुरूसंततीपर्येसा॥७॥पूर्वपीठशंकरू॥ त्यानंतरविष्णुगुरू॥ त्यावरीच्चतुर्व

त्कु॥ गुरुपीठ॥ ८॥ त्यापासूनी वसिष्ठ॥ तेथोनि पराशर शक्तिसुत॥ त्याचा शिष्य वसि
ष्ठ॥ जो अवतार ब्रह्माचा॥ ९॥ शक्तिसुताचा व्यास जाण॥ त्यापासोनी शुक पूर्ण॥ गौ
डपाद आचार्य सद्गुण॥ आचार्य गोविद्पे॥ १०॥ शंकराचार्य अवतरलीया॥ पुढे ज्ञान
बोधनगिरिया॥ त्याचा शिष्य सिद्धगिरिया॥ ईश्वरतीर्थ पुढे झाले॥ ११॥ तदनंतर नृ
सिंहतीर्थ॥ पुढें शिष्य विद्यातीर्थ॥ शिवतीर्थ भारतीतीर्थ॥ गुरूसंतती अवधारा॥ १२॥
मग त्यापासोनी॥ विद्यारण्य श्रीपाद मुनी॥ विद्यातीर्थ म्हणोनी॥ पुढें झाला पर्येसी॥ १३॥
त्याचा शिष्य मलियानंद॥ देवतीर्थ सरस्वती वृद्ध॥ तेथोनी सरस्वती यादवेंद्र॥ गुरूपीठ य

णेपरी ॥ १४ ॥ याद्वेद्रमुनीचा शिष्य ॥ कृष्णसरस्वती विशेष ॥ बहुकाळीचा सन्यास
तेणे विशेष मानिती ॥ १५ ॥ येणेंपरी श्रीगुरूनाथ ॥ आश्रम घेती चतुर्थ ॥ संन्यासमार्ग
स्थापनार्थ ॥ न्रसिंहसरस्वती ॥ १६ ॥ समस्त देवाच्याभर्था ॥ सांगता जाला गुरुनाथ ॥ म्ह
णोनि वंदिती समस्त ॥ तया काशीपुरी ॥ १७ ॥ ख्याति जाली गहनी ॥ त्या वाराणसी भु
वनी ॥ येती समस्त देखोनी ॥ सेवा करिती गुरूची ॥ १८ ॥ मग निघाले तेथोनी ॥ ब
हुशिष्य सवे घेवोनी ॥ उत्तरपथ बदरीवनी ॥ अनंद तीर्थे पहावया ॥ १९ ॥ सव्य घालो
नि मेरूशी ॥ तीर्थें नवखंड क्षितीशी ॥ सांगताति विस्तार बहुवशी ॥ ऐक शिष्या नामकरण ॥

२०॥ समस्ततीर्थे अवलोकित ॥ सर्वेशिष्य येती बहुत ॥ भूमी प्रदक्षणा करीत ॥ आले गं
गासागराशी ॥ २१ ॥ शिष्य म्हणे नामांकिता ॥ समस्ततीर्थे सांगतां ॥ विस्तारे होईल बहु
कथा ॥ तावन्मात्र सांगतों ॥ २२ ॥ सकळ महिमा सांगावयासी ॥ शक्ति कैंची आम्हासी ॥
अनंत महिमा त्रिमूर्तिसी ॥ गुरूचरित्र पर्येसा ॥ २३ ॥ गंगासागरापासाव ॥ तटाकयात्राक
रितीं देव ॥ प्रयागस्थानी गुरुराव ॥ येते झाले परियेसा ॥ २४ ॥ तयास्थानी असतां गुरू ॥ आ
ला एक द्विजवरू ॥ माधवनामे विप्र थोरू ॥ श्रीगुरूशी भेटला ॥ २५ ॥ ब्रह्मज्ञान तयासी ॥ उ
पदेश केला पर्येसी ॥ चतुर्थाश्रम त्यासी ॥ देता झाला ॥ २६ ॥ नाव माधवसरस्वती ॥ तयासि

ष्पाटेविती ॥ त्यावरीबहुप्रीती ॥ शिष्यांमध्येंं ॥ २७ ॥ सिद्धम्हणेनामकरणी ॥ शिष्यझाले
बहुतगुणी ॥ अखिलपतीनामकरणी ॥ पुढेंक्विचारणीहोईल ॥ २८ ॥ गंगाधराचानंदनु
सांगेगुरुचरित्रकामधेनु ॥ ऐकतांहोयमहाज्ञानु ॥ लाधेचारीपुरुषार्थ ॥ २९ ॥ इतिश्री
गुरुचरित्रामृत ॥ गुरुपरंपराविख्यात ॥ सांगितलानिश्चितार्थ ॥ द्वादशप्रश्निश्रोतेया
सी ॥ ३० ॥ इतिश्रीगुरुचरित्रेश्रीनरसिंहसरस्वत्योपाख्यानेसिद्धनामधारकसंवा
देश्रीगुरुपीठकथनंनामद्वादशोध्यायः ॥ १२ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ १३०
श्रीरामचंद्रप्रसन्न ॥ ओंमा ॥ १३० ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः॥ नामधारकशिष्यराणा॥ लागेसिद्धाचियाचरणा॥ करसंपुटजोडो
निजांगणा॥ विनवितसें॥१॥ जयजयासिद्धमुनी॥ तूंतारकभवारण्यीं॥ सांगितलेंज्ञा
नप्रकाशोनी॥ परिसोनीमनसुखझालें॥२॥ गुरुचरित्रअमृत॥ सेवितांतुष्टअधिक
होत॥ शमनकर्णेसमर्था॥ तूंचिऐककृपानिधी॥३॥ गुरुचरित्रकामधेनु॥ सांगीतले
विस्तारोनु॥ तुष्टनकेमाझेंमनु॥ आणिकआपेक्षाहोतसे॥४॥ क्षुधेनेंपिडीलेंदोर॥ ते
पावेत्टणबिढार॥ त्यातेंहोयमनोहर॥ नवचेतेथोनिपर्येसा॥५॥ नदेखेचितकसप्भीं
त्यासमिकेक्षीरवरणी॥ नकेसाचेंमनधरणी॥ केविसाऊनोढावो॥६॥ तैसाआपणस

सज्ञानी॥ नेणत होतो गुरु निर्वाणी॥ अविद्या मायावेष्टोनी॥ कष्टत होतो स्वामिया॥ ७
अज्ञान तिमिर रजनीसी॥ जोतिस्वरूप तूंचि होसी॥ प्रकाश केला गा आह्मासी॥ निज
स्वरूप श्रीगुरूचें॥ ८॥ वाकेलें उपकारासी॥ उत्तीर्ण काय होऊं सरसी॥ केल्पव्रक्ष दिल्ही
यासी॥ प्रत्योपकार काय द्यावा॥ ९॥ एका दादेतां चिंतामणी॥ त्यासि उपकार ये धरणी
नाही दिल्हे न ऐकों कानी॥ रूपा मूर्ती सिध्धराणा॥ १०॥ ऐशा तवोपकाराशी॥ उत्तीर्ण
न्हावें वंशोवशीं॥ ह्मणोनि लागतसे चरणाशी॥ एक भावें करोनियां॥ ११॥ स्वामी नि
रोपिले धर्मार्थी॥ अधिक जाले मज स्वार्थ॥ उपजला मज परमार्थ॥ गुरुभजनीं निरंतर॥ १२

प्रयागीं असतां गुरूमूर्ती ॥ माधवसरस्वती दिक्षा देती ॥ पुढें काय वर्तली स्थिती ॥ तें आह्मा विस्ता
रिजे ॥ १३ ॥ ऐकोनि शिष्याचे वचन ॥ सिद्धमुनी संतोषोन ॥ मस्तकी हस्त ठेवोन ॥ आश्वासित
त्यावेळीं ॥ १४ ॥ धन्य शिष्या सगुण ॥ तुज लाधले गुरुचरण ॥ संसार तारक भवार्ण ॥ तूं
चि एक परियेसा ॥ १५ ॥ त्वां ओळखिली गुरु सोय ॥ ह्मणोनि बोलती गुरुराय ॥ संतोषे
आनंदमय ॥ तव प्रश्न ऐकोनी ॥ १६ ॥ सांगेन ऐक येकचित्तें ॥ चरित्र गुरूचे विख्यातें ॥ उ
पदेशोनी माधवातें ॥ होते येकचित्काळ ॥ १७ ॥ असतां तेथें वर्तमानी ॥ प्रख्यात झाली म
हिमा सगुणी ॥ शिष्य झाले अपार मुनी ॥ मुख्य माधवसरस्वती ॥ १८ ॥ त्या शिष्याची नामे सा

गतां ॥ विस्तारेल बहुतकथा ॥ प्रख्यातनामें निश्चितां ॥ सांगतो कीं ॥ १९ ॥ बाळकृष्णसरस्वती ॥ उपेंद्र माधव सरस्वती ॥ पहावयाआणिकयेती ॥ सदानंद सरस्वती देखा ॥ २० ॥ ज्ञानज्योति सरस्वती एका ॥ सातवा सिध्ध आपण एका ॥ अपार होते शिष्ये आणिका ॥ येका होनी येक श्रेष्ठ पै ॥ २१ ॥ त्यासि ब्यासमवेत गुरुलंघित दक्षिणपंथ ॥ समस्तक्षेत्र पावन करित ॥ आले करंजनगरासी ॥ २२ ॥ भेटजाली जनकजननी ॥ येवोनि लागती चरणी ॥ चतुर्वर्गभ्राताभगिनी ॥ समस्त भेटलीती ॥ २३ ॥ देखोनि गुरुमूर्तीसी ॥ नगरलोक अत्यंत हर्षी ॥ आले सकळ भेटीसी ॥ पुजा करिती परोपरी ॥ २४ ॥ घरोघती श्रीगुरुशी ॥ पाचारिती भिक्षेसी ॥ जाले स्वरूप

बहु यशी ॥ घरोघरी घेती पुजा ॥ २५ ॥ समस्त विस्मय करिती ॥ अवतार हा निश्चिती ॥ वेषधारी
दिसे मती ॥ परमपुरुष होय जाणा ॥ २६ ॥ याते नर जे बोलती ॥ ते जाती नरका प्रती ॥ कार्यका
रण अवतार होती ॥ ब्रह्मा विष्णू महेश ॥ २७ ॥ जननी जनक येणे रिती ॥ पूजा करिती भावभक्ती
॥ श्रीगुरु झाले श्रीपाद यती ॥ जाली स्मृती जननी ॥ २८ ॥ जेननी देखोनी तये वेळी ॥ माथां ठे
वी चरणकमळी ॥ सत्य सत्व चंद्रमौळी ॥ अवतरले हो ॥ २९ ॥ सती ससांगे तये वेळी ॥ पूर्व
जन्मचरित्र सकळी ॥ विश्ववंद्य पुत्र बळी ॥ कावे ह्मणोनि आराधिलें ॥ ३० ॥ त्या श्रीपाद ई
श्वराची ॥ पुजा केली मनोवाची ॥ प्रसिद्ध जाली जन्मे आमुची ॥ सफळ केले पर्येसा ॥ ३१ ॥

म्हणोनिनमितीदोघेंचरणी ॥ विनवितीकरुणावचनी ॥ उध्दरावयाभवार्णवजीवनी ॥ जगंना
थायतिराया ॥ ३२ ॥ गुरुम्हणतीत्यांशी ॥ येकादियाकाळीपरियेशी ॥ पुत्रहोयसन्यासी ॥ उध्दरी
कुळेवेताळिस ॥ ३३ ॥ त्यासिशाश्वतब्रम्हलोक ॥ अचळपदऐसेंयेक ॥ त्याचेकुळीउपजतां
देख ॥ ब्रम्हपदशाश्वतत्यासिपैं ॥ ३४ ॥ यमाचेदुःखेंभयाभीत ॥ नकेत्याचेसंततींत ॥ पूर्वज
जरीनर्कीअसत ॥ त्यांसशाश्वतब्रम्हलोक ॥ ३५ ॥ त्याकारणेंआम्हीदेखा ॥ घेतलाआश्रम
विशेषा ॥ तुम्हानाहींयमाचीशंका ॥ ब्रम्हपदअसेसत्य ॥ ३६ ॥ एसेंसागोनीत्यासी ॥ अशाश्व
तबहूवर्षी ॥ तुमचेपुत्रशतायुषी ॥ अष्टैश्वर्यनांदती ॥ ३७ ॥ त्यापुत्रांतुम्हीधनीं ॥ पहालस्व

२

खेनयनी ॥ पावाल क्षेत्र काशीभुवनी ॥ अंतकाळीं पै ॥ ३८ ॥ मुक्तास्थान काशीपुर ॥ प्रख्यात अ
से वेदशास्त्र ॥ न करी चिंता अणुमात्र ॥ म्हणोनी सांगती ॥ ३९ ॥ त्याची कन्या असे एक ॥ नाम
सनाई निशंक ॥ श्रीगुरूतें नमोनि ऐक ॥ विनवीतसे ॥ ४० ॥ स्वामी मातें तारी तारीं ॥ बुडतें मी
भवसागरीं ॥ संसार मायेमाझारी ॥ नको बुडवूं ॥ ४१ ॥ निर्लेप करीं मजसी ॥ मग मी जाईन
त पासी ॥ ऐकोनि यां वचनासी ॥ गुरू निरोपिती ॥ ४२ ॥ पतीसेवा करावी ॥ तेणेच बरवी मोक्षपद
वी ॥ पावेल यांत न धरावी ॥ अन्यवृत्ती ॥ ४३ ॥ येणे या भवार्णवीसी ॥ किडे पडती पर्येसी ॥ जे
से जैसे भावयासी ॥ तेसे होय ॥ ४४ ॥ उतरावया पैलपार ॥ स्त्रियांस सर्वभ्रतार ॥ मनी ठेवीनि

गु०च०
४

धीरा ॥ भजावा पुरुष शिवसम ॥ ४५ ॥ त्याहोय उद्धारगती ॥ वेदपुराणे वर्णिती ॥ अंतरी न करी[illegible]
खंती ॥ तुज गती होईल ॥ ४६ ॥ ऐकोनी गुरूचे वचन ॥ विनवीतसे कर जोडुन ॥ गुरुमूर्ति ब्रह्मज्ञा
न ॥ विनवीतसे अवधारा ॥ ४७ ॥ तू जाणसी भविष्यभूत ॥ कैसे मोते प्राप्त ॥ माझे प्रारब्ध कवण गत
विस्तारीते ॥ ४८ ॥ श्रीगुरू म्हणती तियेसी ॥ तव वयास नातापसी ॥ संचित पापदोषी ॥ भोगणे अ
से ॥ ४९ ॥ पूर्वजन्मी तू पतियेसी ॥ चरणी त्रासिले धेनूसी ॥ शेजारी स्त्रीपुरुषांसी ॥ विरोध ला
विला कलहपे ॥ ५० ॥ त्यादोषास्तव देखा ॥ तुज बाधा अनेका ॥ गायत्रीस लातिले ऐका ॥
सर्वांगी कुष्टी होसी ॥ ५१ ॥ विरोध केला स्त्रीपुरुषांसी ॥ तव पुरुष होईल तापसी ॥ तू तें स्वजि

अ०
१२

४

लुभरवशी॥ अर्चिततवएसे॥ ५२॥ ऐकोनी दुःखावेबहुता॥ गुरूचरणीलोळता॥ उद्धरीगा
गा गुरुनाथा॥ म्हणोनी चरणी लागली॥ ५३॥ श्रीगुरू म्हणती ऐक बाळे॥ क्वचितू काळेंअ
साल भेला॥ अपरवयसा होतां काळा॥ पतीतुझायति होईला॥ ५४॥ तदनंतर तुझा देह॥ क
ष्टदेहासी अवेवा॥ भोगुनी शुद्ध देह॥ मग होईल तूज गती॥ ५५॥ नासतां तुझा देह जाण॥ भे
टी होईल माझी पूर्ण॥ तव पाप होईल दहन॥ सांगेन क्षेत्र ऐकपां॥ ५६॥ भीमातीर दक्षिण दे
शा॥ तेथे तीर्थ पापविनाशा॥ जायतेथें निःशेष॥ अवस्था तूज घडलिया॥ ५७॥ याभूमंडळी
तीर्थ॥ असे अतिसमर्था॥ गंधर्वपूर प्रखात॥ मरजासंगम प्रसिद्ध पैं॥ ५८॥ ऐसे सांगोनी तीसी॥

गुरू निघाले दक्षिण दिशीं ॥ त्र्यंबक नामक क्षेत्रासी ॥ आले उद्भवी गोतमीच्या ॥ ५९ ॥ शिष्यां
सह गुरुमूर्ती ॥ आले नासिक क्षेत्राप्रती ॥ तीर्थमहिमा विख्याती ॥ पुराणांत प्रसिद्ध ॥ ६१ ॥
त्या गोतमीचें महिमान ॥ अपार सांगतां पूर्ण ॥ बहिरार्णव उदक नाम ॥ ब्रह्मांडाव्यतिरिक्त
जटामुकुटीं सर्वेश्वर ॥ धरीतसे निरंतर ॥ मिळोनी सकळ ऋषेश्वर ॥ उपाय केला पै ॥ ६२ ॥
ब्रह्मऋषी गोतम देखा ॥ तपस्वी असे विशेषा ॥ बीज पेरिलें वृत्ती एका ॥ अनुष्ठानस्था
नाजवळी ॥ ६३ ॥ पूर्वी ऋषी मुनी सकळी ॥ नित्यापिकविती साळी ॥ ऐसी त्यांची मंत्राव
ळी ॥ महातपी पुरुष ॥ ६४ ॥ समस्त ऋषी मिळोनी ॥ विचार करिती मनी ॥ गोतमऋषीज्ञा

नी॥ मुखदासईश्वराचा॥ ६५॥ त्यासि घालितां साकडें॥ गंगा आणि ती आपुले चाडें॥ समस्तां
आम्हा पुण्य घडे॥ गंगा आणुनी भूमंडळी॥ ६६॥ श्लोक॥ यागतिर्योगयुक्तानां मुनीनामू
र्ध्वरितसांमू॥ सागतिः सर्वजंतूनां गौतमीतीरवासिनाम्॥ ६७॥ टीका॥ ऊर्ध्वरितमुनीसी॥
कोटी वर्षे तापसी॥ जगती होय पर्येसी॥ स्नानमात्रे गौतमीया॥ ६८॥ त्याकारणे गौतमीसी
आणावी यत्ने भूमंडळासी॥ सागंडे घालावे गौतमासी॥ गंगा आणितां आम्हा लाभ॥
६९॥ म्हणोनी रचिली माया एक॥ दुर्गा गायत्री स्वच्छ एक॥ करोनी पाठविले एक॥ गौत
म श्री ही भक्षणार्थ॥ ७०॥ ऋषी होता अनुष्ठानी॥ देखतां धेनु नयनी॥ निवारायाततक्षणी॥

दर्भपवित्र सांडिला ॥ ७१ ॥ तो चि दुर्वार शास्त्र ॥ धेनूसी लागलें वज्रास्त्र ॥ पंचत्व पावली त्वरि
त ॥ घडली हत्या गोतमा ॥ ७२ ॥ मिळोनि सर्व ऋषीजन ॥ प्रायश्चित्त देती जाण ॥ गंगा भूमंडळी
आणि त्या जाण ॥ तुज नाहीं शुद्धी की ॥ ७३ ॥ त्याकारणे गोतम ऋषी ॥ तप केलें सहस्रवर्षी ॥
गंगा द्यावी भूमंडळाशी ॥ वर मागतसे ॥ ७४ ॥ गोतम म्हणे सर्वेश्वरा ॥ मज प्रसन्न जाला दाता
रा ॥ उद्धरावया चराचर ॥ गंगा द्यावी ॥ ७५ ॥ गोतमाचे विनयवृत्तीशी ॥ निरोप दिधला गंगेशी
घेवोनी आले भूमंडळाशी ॥ पापक्षालन मनुष्याचे ॥ ७६ ॥ ऐशी गंगा भागीरथी ॥ कोणाव
र्णवि समर्थी ॥ याची कारणें गुरुमूर्ती ॥ आले नामधारका ॥ ७७ ॥ ऐसी गोतमी तठाकयाच्या

श्रीगुरू आचरती पवित्रा ॥ पुढे लोक अनुग्रह मात्रा ॥ आपण हिंडत ॥ ७८ ॥ तटाक यात्रा क
रिता देखा ॥ आले श्रीगुरू मंजरिका ॥ तेथे होता मुनी एका ॥ विख्यात माधव ॥ ७९ ॥ सदां
मानसपूजा त्यासी ॥ नृसिंह मूर्ति परियेसी ॥ देखतां श्रीगुरूसी ॥ मानसमूर्ति परी ॥ ८० ॥ न
मीतसे तळपायेसी ॥ स्तोत्र करी बहुवसी ॥ विस्मय होवोनी मानसी ॥ अतिभक्ती करोनियां
८१ ॥ श्लोक ॥ यद्विप्रपाद द्वयमेव लक्षितं देवैर्न दृष्टं तदिदं समीपे ॥ यदुत्तरे तीरनिवा
समानं ॥ लक्ष्मीसमीपे निवसद्धि नित्यम् ॥ १ ॥ टीका ॥ येणेपरी श्रीगुरूसी ॥ विनवी मा
धवारण्य हर्षी ॥ श्रीगुरू म्हणती संतोषीं ॥ नया माधवासी देखा ॥ ८२ ॥ श्लोक ॥ अत्यंत

मार्गस्थितिमार्गरूपमत्यंतयोगैरधिगम्यतत्त्वमू॥मार्गप्रदं मार्गविचिन्वते मे मार्गोदयं मा
धवदर्शनंच॥८४॥टीका॥ऐसें गुरूचे स्वरूप॥देखोनीतयासि सुख अमूप॥अश्वासो
निनिजरूप॥दावितेझाले॥८५॥देखोनिसंतोषमनी॥विनवीतसेकरजोडुनी॥नानाप
रीस्तवनी॥तोषवीतसे॥८६॥जयजयजगद्गुरू॥त्रिमूर्तिअवतारू॥लोकासीसंतो
षवीनरू॥परमपुरुषाजगज्ज्योती॥८७॥तूंतारकविश्वासी॥म्हणोनिभूमीअवत
रलासी॥कृतार्थकेलेआम्हासी॥दर्शनदेवोनीचरणाचे॥८८॥ऐसेपरीश्रीगुरूसी
स्तुतीकरितोतापसी॥संतोषोनिअहर्निशी॥आश्वासिलेत्यावेळी॥८९॥म्हणतीश्री

७

गुरु त्यासी ॥ सिद्धि झाली तव मंत्रासी ॥ तूं सद्गती भरवसी ॥ ब्रह्मलोक होय ॥ १० ॥ नित्य
पूजा मानसी ॥ करसी नरसिंह मूर्तिसी ॥ प्रत्यक्ष होईल पर्येसी ॥ न करी संशय मना ॥ ११ ॥
ऐसे सांगोनि त्यासी ॥ श्रीगुरू निघाले परियेसी ॥ आले वामरब्रम्हेश्वरासी ॥ गंगाति
ती ॥ १२ ॥ त्या गंगातढाकांत ॥ श्रीगुरू महिमा समर्थ ॥ स्नान करितां गंगेत ॥ आला वि
प्र त्यां स्थळी ॥ १३ ॥ कुशीव्यथा असे बहुत ॥ न ठाकी असे लोळत ॥ उदरव्यथा अत्यं
त ॥ त्यजो पाहे प्राण देखा ॥ १४ ॥ पोढव्यथा बहु त्यासी ॥ नित्य करितां परियेसी ॥ भो
जन केलिया दुःख ऐसो ॥ प्राणांतक होतसे ॥ १५ ॥ या कारणे द्विजवर ॥ सदां करी फळा

हार ॥ अन्नासी त्यासी वैर ॥ जेवितां प्राणत्यजो पाहे ॥ ९६ ॥ पक्षे मासें भोजन करी ॥ परम अथरु
द्री ॥ ऐसे कितीदिवस वरीष ॥ कष्टत होता तो द्विज ॥ ९७ ॥ पूर्वदिनी त्या ग्रामी ॥ आलासपामहांन
वमी ॥ जेविला मिष्टान्ने नेमी ॥ मासी एक पारणे ॥ ९८ ॥ भोजन केले बहुत ॥ त्याणे पोट दुखत
गंगातिरी लोळत ॥ प्राण वरि तत्यजो पाहे ॥ ९९ ॥ दुःख करी द्विज अपार ॥ तो म्हणे गंगेत घा
लोन शरीर ॥ नको आतां संसारु ॥ पापरूपे वर्तती ॥ १०० ॥ अन्न प्राण अन्न जीवन ॥ कोण
असेल अन्ना विण ॥ अन्न वैरी झाले जाण ॥ मरण बरवे आतां मज ॥ १ ॥ मनी निर्धार क
रूनी ॥ गंगाप्रवेश करितो म्हणोनी ॥ पोटी पाषाण बाधोनी ॥ गगे मध्ये निघाला ॥ २ ॥ मनीस्म

रेकर्पूरगौर॥उपजलोआपणाभूमिभार॥केलानाहीपरोपकार॥अन्नदानादिकदेखा॥अ
नकरीपुण्यइहजन्मात॥जन्मांतरीपूर्वशत॥पुण्यफळनदिसत॥मगकष्टभोगितसें॥४॥म्यां
मारिलेब्राम्हणांचे॥किंवाधेनुकपिलेचे॥घातकेलियाविश्वासियाचे॥महाकष्टभोगित
से॥५॥अभूतीपूजाईश्वराची॥केलीनिंदागुरूची॥अवज्ञाकेलीमातापित्यांची॥मजहेकष्ट
भोगितो॥६॥अथवामारिलेपशूंसी॥अग्नीघातलारानाशी॥वेगळेसांडोनीजनकजननी
सी॥पतिस्त्रियेवेगळेकेले॥७॥अथवापूर्वजन्मीकेलेआपणा॥जिवातेघातकरणा॥अ
तिथीसीनघालीअन्ना॥वैश्वदेवसमयासी॥८॥मातापितात्यजोनियां॥होतोस्वैरेजावोनि

यां॥ पूर्वार्जवापासोनियां॥ मग हे कष्ट भोगितो॥९॥ ऐसी पापे आटवित॥ विप्र जातो गंगेतें॥ तं
व देखिले गुरुनाथे॥ म्हणती बोलावा ब्राम्हणाशी॥१०॥ आणा आणा तयासी॥ आत्महत्या
महादोषी॥ प्राणत्यजितो मूर्खेसी॥ पुसो कोण कवणाचा॥११॥ श्रीगुरुवचन ऐकोनी॥
गेला शिष्य धांवोनी॥ द्विजवराका ढोनी॥ आणिती गुरु सन्मुख॥१२॥ अनाथासी कल्प
तरू॥ दुःखियांस कृपासागरू॥ पुसतसे श्रीगुरू॥ तया विप्रनरासी॥१३॥ श्रीगुरु ह्मणती
तयासी॥ प्राण कां त्यजूं पाहासी॥ आत्महत्या महादोषी॥ काय वृत्तांत सांग आम्हां॥१४॥
विप्र म्हणे मायतिराया॥ कोय करालपुसोनियां॥ उपजोनी जन्म वांया॥ भूमीभार झाले

१५॥ मासपक्षभोजनकरितो॥ उदरव्यथेनेकष्टतो॥ साहोनशकेप्राणदेतो॥ कायसांगावेस्वा
मियां॥ १६॥ आपणासिअन्नवैरिअसता॥ केवींवांचावेगुरुनाथा॥ शरीरअन्नमयतत्वता
केवींवांचेजगद्गुरू॥ १७॥ श्रीगुरूम्हणतीब्राह्मणासी॥ तुझीव्यथागेलीपरियेसी॥ औ
षधअसेआम्हापासी॥ क्षणयेकेसांगोतुज॥ १८॥ संशयनधरीआपुलेमनी॥ भिऊन
कोअंतःकरणी॥ व्याधीगेलीपळोनी॥ भोजनकरीपोटभरी॥ १९॥ श्रीगुरूवचनऐको
नी॥ स्थीरझालाअंतःकरणी॥ माथाठेवोनीश्रीगुरूचरणी॥ नमनकेलेत्यावेळी॥ २०
इतकियाअवसरी॥ त्याग्रामीचाअधिकारी॥ विप्रएकअवधारी॥ आलागंगेस्नानासी॥ २१

इतक्यावरीदेखिलेगुरुश्रींयेवोनीलागलाचरणासी॥ नमनकेलेंभक्तीसी॥ मनोवा
क्कायकर्मे॥२२॥ ऐकोनीश्रीगुरुवचना॥ सांगतसेतोब्राह्मण॥ गोत्रआपलेकौंडण्य॥ आप
स्तंभशाखेसी॥२३॥ नामसायदेवऐसे॥ वासकाचींतराहातसें॥ उदरपूर्तिझालोअसे॥
सेवाकरितोयवनाची॥२४॥ अधिकारपणेंयाग्रामी॥ असोसंसारीएकस्वामी॥ ध
न्यधन्यजालोआम्ही॥ तवदर्शनमात्रें॥२५॥ तूंतारकविश्वासी॥ दर्शनदिधलेआम्हा
सी॥ कृतार्थझालोभरंवसी॥ जन्मांतरीचेदोषगेले॥२६॥ नवानुग्रहहोयज्यासी॥ तर
तीलयाभववार्णवासी॥ अभयतेआम्हासी॥ दर्शनादिधलेस्वामिंया॥२७॥ श्लोक॥

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ॥ पापं तापं च दैन्यं च सद्यः साधुसमागमः ॥१
टीका ॥ गंगा देखतां पापे जांती ॥ चंद्र दर्शनि ताप जाती ॥ कल्पतरूची ऐसी गती ॥ दैन्या वे
गळें करी जाण ॥ २८ ॥ तैसे नव्हती तुमचे गुण ॥ पापतापदैन्य हरण ॥ देखिले आज
तुमचे चरण ॥ चतुर्वर्ग फळ पावलों ॥ २९ ॥ ऐसी स्तुती करोनी ॥ पुनरपि लागे श्रीगु
रूचरणी ॥ जगद्गुरूनी अश्वासोनी ॥ निरोप देती तये वेळी ॥ ३० ॥ श्रीगुरू म्हणती
त्यासी ॥ आमुचै वाक्य परियेसी ॥ जठरव्यथा विप्रासी ॥ प्राणत्याग करितसे ॥ ३१ ॥ उप
शमत्या व्याधीसी ॥ सांगों औषध तुम्हासी ॥ नेवोनि आपले मंदिरासी ॥ भोजन करवी मिष्टा

न॥ ३२॥ अन्न जेवितां याची व्यथा॥ व्याधि न राहे सर्वथा॥ घेवोनि जाय त्वरितां॥ क्षुधाक्रांत
विप्र असे॥ ३३॥ ऐकोनी श्रीगुरूचें वचना॥ विनवीतसे कर जोडुन॥ प्राणत्याग करितां भोजन॥
ऐसी व्यथा होतसे॥ ३४॥ जेविलों काल मासें एक॥ त्याणें प्राण त्यजितसे ऐका॥ अन्न देतां
आह्मासी हत्या॥ घडेल देखा त्वरितें पै॥ ३५॥ श्रीगुरू ह्मणती तयासी॥ आह्मी औषध देतो
यासी॥ अनुपम अन्न असे त्यासी॥ क्षीरमिश्रित परमान्न॥ ३६॥ अन्न जेवितां त्वरेसी
व्याधी जाईल परियेसी॥ संशय न धरावा मानसी॥ त्वरित गृहासी नेई वेगे॥ ३७॥ अंगिका
रोनी तये वेळीं॥ माथां टेवी चरणकमळीं॥ विनवीतसे करुणास्वरी॥ यावे स्वामी भिक्षेसी॥

३८ ॥ अंगिकारोनीश्री गुरुनाथ ॥ निरोपदेती होकांतरित ॥ सिद्धम्हणे एकमात ॥ अरेनाम
धारका ॥ ३९ ॥ आम्हीहोतोनयेवेळी ॥ समवेतशिष्यसकळी ॥ जठरपीडानिवारणवरी ॥ क
रू गेलेतयाघरा ॥ ४० ॥ विचित्रझालेत्याचेघरीं ॥ पूजाकरितीपरोपरी ॥ पतिव्रतात्याची
नारीजारवाई परियेसा ॥ ४१ ॥ तेपूजितीगुरूसी ॥ षोडशोपचारेंपरियेसी ॥ त्याचीरितीआ
म्हासी ॥ शिष्यांसकळीपरियेसा ॥ ४२ ॥ गुरुपूजेचेविधान ॥ विचित्रकेलेअतिगहन ॥
मंडळकेलेंरक्तवर्ण ॥ येकाएकासीपरियेसा ॥ ४३ ॥ पद्मरचोनीअष्टदळी ॥ नानापरी
रंगमाळी ॥ पंचवर्णचित्रमेळी ॥ रचलीतियेपरियेसा ॥ ४४ ॥ संकल्पोनिविधीसी ॥ न

मन केले साष्टांगेसी ॥ माथां ठेवी चरणासी ॥ पादसेवा ही अष्टांगी ॥ ४५ ॥ चित्रासनु गुरूसी
पंचामृतादि परियेसी ॥ रूद्र सूक्त मंत्रासी ॥ चरण स्थापिले त्यावेळी ॥ ४६ ॥ श्रीगुरूचर
णी अतिहर्षी ॥ पूजा करिती षोडशी ॥ तयाचि प्राज्ञान केसी ॥ चरणतीर्थ धरिता झाला ॥ ४७
तयाचरणतीर्थासी ॥ पूजा करिती भक्तीसी ॥ गीत वाद्य आनंदेसी ॥ करिती आरती नीरांज
न ॥ ४८ ॥ अनुक्रमें गुरू पूजा ॥ करिता झाला तेवीं द्विजा ॥ षोडशोपचार समजा ॥ पूजा
करिती भक्तीने ॥ ४९ ॥ अक्षय्य वाणे आरती ॥ श्रीगुरूसी ओंवाळिती ॥ मंत्रघोष अतिभ
क्ती ॥ पुष्पांजळी करिता झाला ॥ ५० ॥ अनेकापरी गायन करी ॥ नमस्कारी प्रीति करी ॥ प

पतिव्रता असे नारी॥ पूजा करिती उभयवर्गें॥५१॥ ऐशा परी श्रीगुरूसी॥ पूजा केली परिये
सी॥ येणे विधी शिष्यांसी॥ समस्तांसी वंदिलें॥५२॥ संतोषोनी श्रीगुरूमूर्ती॥ वर देती अ
तिहर्षीं॥ तव संतती व्याती॥ गुरुभक्ती वंशोवंशीं॥५३॥ तूं जाणसी गुरूस॥ अभिवृद्धी वं
शास॥ पुत्रपौत्रां हर्ष॥ गुरुभक्ती ने घडे॥५४॥ ऐसें बोलोनी द्विजासी॥ आश्वासीत ह
र्षी॥ नमन करोनि श्रीगुरुसी॥५५॥ नाना परी-चीं पक्वान्ने॥ अमुपदि धलीमिष्टान्ने॥
अष्टविध परमानंदो॥ शार्करासहित निवेदिलीं॥५६॥ शाकापाक नाना परी॥ वाढिताती
सविस्तारी॥ भोजन करिती प्रियकरी॥ श्रीगुरूमूर्ति परियेसा॥५७॥ उदरमध्येचा ब्रा

म्हणे ॥ भोजन केले परिपूर्ण ॥ व्याधी गेली तत्क्षणे ॥ श्रीगुरूचे कृपादृष्टी ॥ ५८ ॥ परीस ला
गतां लोहासी ॥ सुवर्ण होय परियेसी ॥ दर्शन होतां श्रीगुरूशी ॥ व्याधि कैंची सांग मज ॥ ५९ ॥
उदय होतां दिनकरासी ॥ संहार होय अधःकारासी ॥ श्रीगुरु कृपा होय ज्यासी ॥ दैन्य कैचे
तया घरीं ॥ ६० ॥ ऐसे परी श्रीगुरुनाथें ॥ भोजन केले शिष्यासहित ॥ आनंद झाला ब
हुत ॥ विस्मय करिती सकळ जन ॥ ६१ ॥ अभिनव करिती सकळ जन ॥ द्विजासि होते अ
न्नवैरी जाण ॥ औषध झाले ते पूर्ण ॥ व्याधी गेली निघोनि ॥ ६२ ॥ सिद्ध म्हणे नामधा
रकासी ॥ गुरु कृपा होय ज्यासी ॥ जन्मांतरीचे अति दोषी ॥ व्याधी कैची त्याचे देही ॥ ६३ ॥

[illegible]ाधराचा नंदनु ॥ सरस्वती सांगे विस्तारोनु ॥ गुरुचरित्र कामधेनु ॥ ऐका श्रोते ए
कचित्तो ॥ ६४ ॥ जे ऐकती भक्तीनी ॥ आधीन सतीत यां भवनी ॥ अखिल सौख्य पावो
नी ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ६५ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते ॥ गुरुचरित्र वर्णन येथ ॥ ब्रा
ह्मण व्याधी निरसोन खरितं ॥ स्तुरवी केला श्रीगुरुने ॥ ६६ ॥ इति श्रीगुरुचरित्रे श्री
नृ० विप्रउदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्प
णमस्तु ॥ १६६ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

श्री [illegible]णयनमः॥ नामधारकशिष्यदेखा॥ विनवीसि ह्मासि कोंतुका॥ प्रसन्नाकारविशेषा
एकचित्तेपरियेसा॥ १॥ जयजयायोगेश्वरा॥ सिद्धमूर्तिज्ञानसागरा॥ तुझीकृपाझालि
यादातारा॥ ज्ञानहोयआह्मासी॥ २॥ उदरपथेन्याब्राह्मणासी॥ प्रसन्नजालेकृपेसी
पुढेंकृपाकेलीकैसी॥ विस्तारावेंआह्माप्रती॥ ३॥ ऐकोनिशिष्याचेवचना॥ संतोषोंसि
द्धआपण॥ गुरुचरित्रजाण॥ सांगताझालाविस्तारोनी॥ ४॥ ऐकशिष्याशिरोमणी
भिक्षाकेलीत्याचेभवनी॥ तयावरीसंतोषोनी॥ प्रसन्नझालेपरियेसा॥ ५॥ गुरुभक्ती
च्याप्रकार॥ पूर्णझालाद्विजवरा॥ पूजाकरीविचित्र॥ ह्मणोनीआनंदेपरियेसा॥ ६॥

तयासांगतीद्विजासी ॥ श्रीगुरू बोलती संतोषीं ॥ भक्त व्हावे वंशोवंशीं ॥ माझी प्रीति तुम्हाव
ती ॥ ७ ॥ ऐकोनी श्रीगुरूचे वचना ॥ साष्टांग नमन करून ॥ माथा ठेवोनि यांचरण ॥ नमिता
झाला पुनः पुनः ॥ ८ ॥ जयजयाजी सद्गुरू ॥ त्रिमूर्तिचा अवतारू ॥ अविद्यामय दिससी न
रू ॥ वेदा अगोचरू तुझा महिमा ॥ ९ ॥ विश्वव्यापक तूंचि होसी ॥ ब्रह्मा विष्णू व्योमकेशी ॥
धरिलें स्वरूप तू मानसी ॥ भक्तजन तारावया ॥ १० ॥ तव महिमा वर्णावयासी ॥ शक्ति के
वी आम्हाशी ॥ मागतो एक तुम्हाशी ॥ कृपा करणें गुरुमूर्ती ॥ ११ ॥ माझे वंशपरंपरीं ॥ भ
क्ति द्यावी निर्धारीं ॥ इह सौख्य पुत्रपौत्रीं ॥ अंतीं द्यावी सद्गती ॥ १२ ॥ ऐसी विनंती करूनी ॥

[illegible]र पि विनवी करुणा वचनी ॥ सेवा करि द्वारीं यवनी ॥ महाक्रूर असे तो ॥ १३ ॥ प्रति संव
त्सरी ब्राम्हणासी ॥ घात करितो जिवांसी ॥ याचीकारणें आम्हासी ॥ बोलावीतसे पर्येसा ।
१४ ॥ जातीत याजवळी आपण ॥ निश्चयें घेईल आपला प्राण ॥ भेटी जाली तुमची
म्हणोन ॥ मरण केन्चें आम्हासी ॥ १५ ॥ संतोषोनी श्रीगुरूमूर्ती ॥ अभय देतीत या प्रती
विप्र मस्तकीं हस्त ठेविती ॥ चिंता न करीं म्हणोनियां ॥ १६ ॥ अभय सांडुनी त्वां जावें ॥ क्रू
र यवनातें भेटावें ॥ संतोषोनी प्रिय भावें ॥ पुनरपि पाठवील आम्हासी ॥ १७ ॥ जोंवरी प
रतोनि तूं येसी ॥ असों आम्ही भरवशीं ॥ तूं आलिया संतोषोनी ॥ जाऊं मग येथोनियां ॥

गु० च०
२

१८ ॥ निजभक्त आमुचा ॥ तूंचि होशील साचा ॥ अस्तिलाभिष्टांचा ॥ धनी होसी तूं ॥ १९ ॥ तु
झे वंशपरंपरीं ॥ सुखें नांदती पुत्रपौत्रीं ॥ अखंड लक्ष्मी तुझे घरीं ॥ निरोगी शतायुनांदा
ळ ॥ २० ॥ ऐसा वर लाधोनी ॥ निघे सायंदेव ब्राम्हण ॥ जेथे होता तो यवन ॥ गेला त्वरित त्या
जवळी ॥ २१ ॥ कालांतक यम देखा ॥ यवन दुष्ट परियेसा ॥ ब्राम्हणातें पहातां कैसा ॥ सर्पपरी
झाला ॥ २२ ॥ विमुख होवोनी ग्रहांत ॥ गेला यवन कोपत ॥ विप्र झाला भयचकित ॥ मनी
श्रीगुरू ध्यातसे ॥ २३ ॥ कोप आलिया ओळंबयासी ॥ केवीं स्पर्शे अग्निसी ॥ श्रीगुरू कृपा
ासी ॥ काय करील यवन दुष्ट ॥ २४ ॥ गरुडाचिया पिलियांसी ॥ सर्प कैसा डंसी ॥ तैसा

अ०
१४
२

[illegible]न पासी ॥ असे कृपा श्रीगुरूची ॥ २५ ॥ कां एखादे सिंहासी ॥ ऐरावत केवीं ग्रासी ॥ श्री
गुरुकृपा ज्यासी ॥ कळिकाळाचें भय नाहीं ॥ २६ ॥ ज्या हृदयीं गुरुस्मरण ॥ भय केचें तया
दारुण ॥ काळ मृत्यु न बाधी जाण ॥ अपमृत्यु काय करील ॥ २७ ॥ ज्यासि नाहीं मृत्यूचें भ
य ॥ त्यासि यवन काय ॥ श्रीगुरुकृपा ज्यासि होय ॥ यमाचें भय नाहीं तया ॥ २८ ॥ ऐसियाप
रीतो यवन ॥ म्नहीं निजलाभ मेंकरुन ॥ दृढ निद्रा लागतां जाण ॥ शरीरस्मरण नाहीं त्या
सी ॥ २९ ॥ हृदयज्वाळा होवोनि त्यासी ॥ जागृत होवोनि परियेसी ॥ प्राणांतक व्यथेसी
कष्टतसे तये वेळीं ॥ ३० ॥ स्मरण असे नसे कांहीं ॥ म्हणे शस्त्र मारितो घाई ॥ छेदन करि

तो अवयव पाहीं ॥ बिप्र एक आपणासी ॥ ३१ ॥ स्मरण झालें तये वेळीं ॥ धांवत गेला ब्राम्ह
णाजवळी ॥ लोळतसे चरणकमळीं ॥ म्हणे स्वामी तूंचि माझा ॥ ३२ ॥ तूतें पाचारिलें कव
णें ॥ जावें त्वरित परतोन ॥ वस्त्रें भूषणें देवोन ॥ निरोप देती तये वेळीं ॥ ३३ ॥ संतोषोनी द्वि
जवर ॥ आला ग्रामी सत्वर ॥ गंगातिरी जाई लवकर ॥ श्रीगुरूचे दर्शनासी ॥ ३४ ॥ देखो
नियां श्रीगुरूसी ॥ नमन करी भावेसीं ॥ स्तोत्र करी बहु वशी ॥ सांगे वृत्तांत आद्यंत ॥ ३५
संतोषोनी श्रीगुरूमूर्ती ॥ तया द्विजा आश्वासिती ॥ दक्षिणा दिशी जाऊं म्हणती ॥ स्नाने
तिर्थयात्रेसी ॥ ३६ ॥ ऐकोनि श्रीगुरूचे वचन ॥ विनवीतसे कर जोडुन ॥ नेविसरे आता

२

[illegible] व चरण ॥ आपण येईन समागमें ॥ ३७ ॥ तुमचे चरणावीण देखा ॥ राहूं न शके क्षण
एक ॥ संसार सागर तारका ॥ तूंचि देवा कृपासिंधू ॥ ३८ ॥ उद्धरावया सगरासी ॥ गंगा
आली भूमीसी ॥ तैसे स्वामी आम्हांसी ॥ दर्शनें उद्धार आपुल्या ॥ ३९ ॥ भक्तवत्सल तुझी
ख्याती ॥ आम्हां सोडणें काय नीती ॥ सवें येवो हे निश्चिती ॥ म्हणोनि चरणी लागला ॥
४० ॥ येणे परी श्रीगुरूसी ॥ विनवी विप्र भावंशीं ॥ श्रीगुरू म्हणती तये वेळीं ॥ ४१ ॥ का
ण असे आम्हां जाणें ॥ तीर्थें असती दक्षिणे ॥ पुनरपि तुम्हा दर्शन देणे ॥ संवत्सर पंचदशी
४२ ॥ मी असे तुमचे ग्रामांत ॥ वास असे निश्चित ॥ कलत्र पुत्र इष्ट भ्राता ॥ तुम्ही आम्हा

॥ संतोषोनी वीनयसी ॥

भेटावें ॥ ४३ ॥ न करी चिंता असा सुखें ॥ सकळ अरिष्टें गेली दुःखें ॥ म्हणोनि हस्त ठेवी म-
स्तकें ॥ भाक देती नयेवेळीं ॥ ४४ ॥ ऐसें परी सांगोनि ॥ श्रीगुरू निघाले तेथोनि ॥ जेथें
असे आरोग्यभवानी ॥ वैजनाथक्षेत्र ते ॥ ४५ ॥ समस्त शिष्यांसमवेत ॥ श्रीगुरू आले
तेथे पहात ॥ प्रख्यात असे वैजनाथ ॥ तेथे राहिले गुप्तरूपें ॥ ४६ ॥ नामधारक विनवी
सिद्धासी ॥ कारण काय गुप्त व्हावयासी ॥ होते शिष्य बहुवर्शी ॥ त्यासि कोठे ठेविलें ॥
४७ ॥ गंगाधराचा नंदन ॥ गुरुचरित्र वर्णन ॥ सिद्ध म्हणे विस्तारोन ॥ सांग नामधा- ४
रकासी ॥ ४८ ॥ पुढील कथेचा विस्तारु ॥ सांगतसे अपरंपारु ॥ मन करूनि एकाग्रु ॥

रे कांश्रांतेसकळिक ॥४९॥ वाससरस्वतीचेतिरीं ॥ सायदेवासाचारी ॥ तयागुरूने
निर्धारीं ॥ वस्त्रेभूषणेदिधलीं ॥५०॥ गुरुचरित्रअमृत ॥ सायंदेवआख्यानपी
त ॥ यवनभयरक्षित ॥ थोरभाग्यतयाचें ॥५१॥ इतिश्रीन्ह॰दु॰ यवनशासनंना
मचतुर्दशोऽध्यायः ॥१४॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ । छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ । छ ॥ छ ॥

गी०-वृ०
५

अ०
१४

५

श्री[illegible]रायनमः॥ ऐकशिष्याशिरोमणी॥ धन्य धन्य तुझी वाणी॥ भक्ती तुझी गुरुचरणी
लीन झाली परियेसा॥ १॥ नूं माते पुसतोसी॥ होतो संतोष मानसी॥ गोप्य झाले कवूण का
र्यासी॥ सांगेन ऐका एकचित्ते॥ २॥ महिमा प्रकट झाला बहुत॥ तेणें भजनी लोक
समस्त॥ कामार्थी ति अमित॥ येती गुरूदर्शनासी॥ ३॥ साधूअसाधूधूर्त सकळी
समस्त येती गुरूजवळी॥ वर्तमानी खोटा कळी॥ अवघे शिष्य होऊं म्हणती॥ ४॥
भार्गवराम अवतारोनी॥ निःक्षेत्र केली मेदिनी॥ राज्य विप्रासी देऊनी॥ गेला पश्चि
मसमुद्रासी॥ ५॥ पुनरपी जाती तयापासीं॥ तो हि ठाव मागावयासी॥ याकारणे विप्रा

सीं॥ काक्षानस्फुटे सर्वथा॥ ६॥ ऊबगोनी भार्गव देखवा॥ गेला सागर मध्योदका॥ गोष्प
रूपें असएका॥ आणिक मागती म्हणोनियां॥ ७॥ तैसे श्रीगुरूमूर्तिं ऐका॥ गु
प्त राहिले कारणिका॥ वर मागती सकळलोका॥ नानायाती येवोनियां॥ ८॥ विश्व
व्यापक जगदीश्वर॥ तो कायदेऊं न शके वर॥ पाहोनि पात्रानुसार॥ प्रसन्न होय
परियेसा॥ ९॥ या कारणें तये स्थानीं॥ श्रीगुरू राहिले गोप्य गुणी॥ शिष्य सकळ बो
लावोनी॥ निरोप देती यात्रेसी॥ १०॥ सकळ शिष्य बोलावोनी॥ निरोप देती नृसिं
हमुनी॥ समस्त तीर्थे आचरोनी॥ यावे भेटी श्रीशैल्या॥ ११॥ ऐकोनी गुरूचें वचन॥

म[illegible]तां शिष्य धरिती चरण ॥ कृपामूर्ति गुरुराणा ॥ कां उपेक्षी आम्हासी ॥ १२ ॥ तुमच्या
दर्शनमात्रेसी ॥ समस्त तीर्थें आम्हासी ॥ आम्हीं जावें कवण ठायासी ॥ सांडोनि चरण
श्रीगुरूचे ॥ १३ ॥ समस्त तीर्थें श्रीगुरूचरण ॥ ऐसें बोलती श्रुतिपुराण ॥ शास्त्रीं हें चि
विवरण ॥ असें प्रख्यात परियेसा ॥ १४ ॥ जवळि असतां निधान ॥ कां हिंडावें रानोरा
न ॥ कल्पवृक्ष सोडून ॥ केवीं जावे देवराया ॥ १५ ॥ श्रीगुरु ह्मणती शिष्यासी ॥ आम्ही
आश्रम संन्यासी ॥ राहूं नये पांचवे दिवसीं ॥ एके ठाईं वास करुनी ॥ १६ ॥ चतुर्था
श्रम घेवोनी ॥ हिंडावें तीर्थ भुवनी ॥ तेथे मन स्थीर करोनी ॥ मग राहावें एके स्थानी ॥ १७

२ विशेष आमचे वाक्य ऐका ॥ अंगिकारणे अधिक ॥ तीर्थें हिंडोनी सकळिका ॥ मग यावे आम्हा
पाशी ॥ १८ ॥ बहुधान्य नाम सवत्सरासी ॥ आम्ही येऊं श्रीशैल्यासी ॥ तेथें आमचे भेटीसी ॥ यावें
तुम्ही सकळिकां ॥ १९ ॥ ऐसे परी शिष्यासी ॥ सांगती श्रीगुरु परियेसी ॥ समस्त लागती चर
णासी ॥ ऐक शिष्या नाम करणी ॥ २० ॥ शिष्य विनविती श्रीगुरुसी ॥ तुमचे वाक्य प्रमाण आ
म्हासी ॥ जावे आम्ही भरवशीं ॥ करू तीर्थें भूमीवरी ॥ २१ ॥ श्रीगुरुवाक्य न करी ॥ तो पडे रौर
व घोरी ॥ त्याचे घर यमपुरी ॥ अखंड नरक भोगिजे ॥ २२ ॥ जावे आम्ही कवण तीर्था ॥ नि
रोपावे जी समर्था ॥ तुझे वाक्य दृढ चित्ता ॥ धरुनि जाऊं स्वामियां ॥ २३ ॥ जे जे स्थानी निरो २

पदेरा ॥ जावोतेथेभरवशी ॥ तुझेवाक्यआम्हाशी ॥ सिधुहोयस्वामियां ॥ २४ ॥ ऐकोनि
शिष्याचेवचन ॥ श्रीगुरूमूर्तिप्रसन्नवदन ॥ निरोपदेतीसाधारण ॥ तीर्थयात्राक
रावया ॥ २५ ॥ याब्रह्माडगोळात ॥ तीर्थराजकाशीविख्यात ॥ तेथेजावेंतुम्हीत्वरित ॥
गंगांभागीरथीसेवा ॥ २६ ॥ भागीरथीतटाकयात्रा ॥ साटयोजनेपवित्रा ॥ साटक्षे
ग त्रफळपवित्रा ॥ प्रयांगंगाद्वारींद्विगुण ॥ २७ ॥ यमुनानदीतटाकेशी ॥ पंचवी
सगांवेपरियेसी ॥ क्षेत्रफळतेथेविशेषीं ॥ एकचित्तेअवधारा ॥ २८ ॥ सरस्वतीम्ह
णेजेजेगंगा ॥ भूमीवरीश्रेष्टपेगा ॥ चतुर्विशतिगावेजागा ॥ स्नानकरावेंतटाकी ॥ २९ ॥

इतकेनी फळत्यासी॥ यज्ञाचे फळ परियेसी॥ ब्रह्मलोक शाश्वतेसी॥ राहे नर पित्रांसहि
त॥३०॥ वरुणानदी कुशावती॥ ऋतकृष्णा विणशख्याती॥ विस्तार नदी सेशरावती॥ अ
सतीनदी मनोह्वारे॥३१॥ यरुद्विधानदी थोरु॥ असतीक्रमा मधुमती येर॥ पयस्वती ध्य
तवतीतीर॥ तटाक यात्रा तुम्ही करा॥३२॥ देवनदी मुख्य एक॥ असे ख्याती मंडळिक
पंधरा गावे तटाक॥ यात्रा तुम्हीं करावी॥३३॥ जितके गांव तितके कृच्छ्र॥ स्नान मा
त्रें पवित्र॥ जाती ब्रह्महत्या स्वतंत्र॥ मनोभावें आचरावे॥३४॥ चंद्रभागा रेवतीसी॥
शरयू आणि गोतमीरी॥ वेदिका नदी कौशिकीसी॥ नित्य जाय मंदाकिनी॥३५॥ सह

स्वके नदी थोर ॥ परणा पुण्य नदी थोर ॥ बहूधा नदी वरुणा प्रस्वर ॥ षोडशमावेत टाक
यात्रा ॥ ३६ ॥ जेथे नदी संगम असती ॥ तेथील स्नाने पुण्य अयिती ॥ त्रिवेणी स्नानत फळे
असती ॥ संगम नदी स्नान करा ॥ ३७ ॥ श्वेतबंध भीमेश्वरी ॥ श्रीरंग पद्मनाभे सरी ॥ पु
रुषोत्तम मनोहरी ॥ नैमिषारण्यी तीर्थ असं ॥ ३८ ॥ पुष्करतीर्थ वैरोचनी ॥ संन्निहि
त असे स्नानी ॥ नदी तीर्थ असे गुणी ॥ गंगातीर्थी स्नान करा ॥ ३९ ॥ बदरी तीर्थ नाराय
ण ॥ नदी तीर्थ पुण्य पावन ॥ कुरुक्षेत्री करा स्नान ॥ श्रीशैल्य यात्रेसी ॥ ४० ॥ महाल
य तीर्थ देखा ॥ पितृप्रती तर्पणे एका ॥ द्वि चत्वारी कुळे निका ॥ स्वर्गा जाती भरवशी ॥ ४१

केदारतीर्थ पुष्करतीर्थ ॥ कोटितीर्थ नर्मदातीर्थ ॥ मात्रकेश्वर कुब्जातीर्थ ॥ कोकामुखी विशे
ष असे ॥ ४२ ॥ प्रसादतीर्थ विजयीतीर्थ ॥ पुरींद्र चंद्रनदीतीर्थ ॥ गोकर्ण शंखकर्ण ख्यात ॥
स्नाना बरवें मनोहर ॥ ४३ ॥ अयोध्या मथुरा कांतीशी ॥ द्वारावती गयेसी ॥ शालिग्राम
तीर्थासी ॥ सबळ ग्राम मुक्तिक्षेत्र ॥ ४४ ॥ गोदावरीतटाकेशी ॥ योजनें साहा पर्येशी ॥ तेथी
ल महिमा आहे ऐशी ॥ वाजपेय यज्ञसम पुण्य ॥ ४५ ॥ सव्यापसव्य वेळां तीनी ॥ तटाक
यात्रा एकाग्रपणी ॥ स्नान करितां होय ज्ञानी ॥ महापातकी शुद्ध होय ॥ ४६ ॥ आणीक ४
दोनी तीर्थे असती ॥ प्रयागसमान असे ख्याती ॥ भीमेश्वरतीर्थ म्हणती ॥ कुंजरासंग

मन नख्यान ॥ ४७ ॥ कुशातर्पण तीर्थ बरवे ॥ तटाकयात्रा द्वादश गांवें ॥ गोदावरी समुद्रसं
गमा जावे ॥ षट्‌त्रिगुणेशी कृच्छ्र फळ ॥ ४८ ॥ पूर्णनदीत तटाकेशी ॥ चारी गावे आचारा
हर्षी ॥ कृष्णावेणी तीराशी ॥ पंधरा गांवें तटाकयात्रा ॥ ४९ ॥ तुंगभद्रा तीर बरवे ॥ तटा
केयात्रा वीस गांवे ॥ पंपासरोवर स्वभावे ॥ अनंत महिमा पर्येसा ॥ ५० ॥ हरिहर क्षेत्र
महाख्याती ॥ समस्त दोषपरिहरती ॥ तैशीच असे भीमरथी ॥ दाहा गांव तटाकया
त्रा ॥ ५१ ॥ पांडुरंग मातुलिग ॥ क्षेत्र बरे पूरी गाणगा ॥ तीर्थे असती तेथे चाग ॥ अष्टती
र्थे मनोहर ॥ ५२ ॥ अमरजासंगमात ॥ कोठि तीर्थ असे तेथे ॥ वृक्ष तेथे असे अश्वत्थ ॥ क

ल्पवृक्ष तो चि जाण ॥५३॥ तया अश्वत्थासन्मुखेसी ॥ नरसिंहतीर्थ परियेसी ॥ तया उत्तरभा
गेशी ॥ वाराणशी तीर्थ असे ॥५४॥ तया पूर्वभागेसी ॥ तीर्थ पापविनासी ॥ तदनंतर पारि
येसी ॥ रुद्रपद तीर्थ असे ॥५५॥ चक्रतीर्थ असे एक ॥ केशवदेव विनायक ॥ कोटितीर्थ
विशेष ॥ मन्मथतीर्थ पुढें असे ॥५६॥ कल्लेश्वर देवस्थान ॥ असे तेथे गांधारभुवन ॥
ठाव असे अनुपम्य जाण ॥ सिद्धमुनी माणगापुर ॥५७॥ तेथे जे जन अनुष्ठान करि
ती ॥ त्वरित कामना सर्व पावती ॥ कल्पवृक्ष असे यती ॥ काय नोहे मनकामना ॥५८॥
कोंकिणी संगम असे बरवें ॥ भीमातीरक्षेत्र नावे ॥ अनंततीर्थ पुण्य स्वभावे ॥ प्रयाग

समान असे देखा ॥ ५९ ॥ तुंगभद्रा वरदा नदी ॥ संगमस्नान तपोनिधी ॥ मलप्रहारा संग
मी आदीं ॥ पापें जाती शतजन्माचीं ॥ ६० ॥ निवृत्तीसंगमीं असे ख्याती ॥ ब्रह्महत्या नाश
होती ॥ जावें तुम्ही तेथें त्वरितीं ॥ श्रीगुरु म्हणती शिष्यांसी ॥ ६१ ॥ सिंहराशी बृहस्पती ॥
येतां तीर्थें संतोषती ॥ समस्तां ठायीं भागीरथी ॥ येऊनि ऐक्य होतसे ॥ ६२ ॥ कन्यागतीं
कृष्णेसी ॥ त्वरित येती भागीरथी ॥ तुंगभद्रा तूळागतीं ॥ स्फार नदी प्रवेशा ॥ ६३ ॥ कर्करा
शी सूर्य येतां ॥ मल्ला प्रहार कृष्णासंयुता ॥ सर्वजन स्नान करितां ॥ ब्रह्महत्यापापें जा
ती ॥ ६४ ॥ भीमा कृष्णा संगमेशी ॥ स्नान करितां पर्येशी ॥ साठ जन्मा विप्रवेशीं ॥ ऊपजे

नरपरियेसा ॥ ६५ ॥ तुंगभद्रासंगमदेख ॥ त्याहुनि फक्तत्रिगुणी अधिक ॥ निवृत्ती
संगम ऐक ॥ चतुर्गुण तयाहुनी ॥ ६६ ॥ पाताळगंगेच्चिये स्नानी ॥ मल्लिकार्जुनदर्शनी
पुण्य षडगुण तयाहुनी ॥ पुनरावृत्ती तयासि नाहीं ॥ ६७ ॥ लिगालयी पुण्य द्विगुण ॥
समुद्रकृष्णोसंगमी अगण्य ॥ कावेरीसंगमी पंधरागुण ॥ स्नान करा मनोभावे ॥ ६८
ताम्रपर्णीयेणेपरी ॥ पुण्य असे स्नानमात्री ॥ कृतमाला नदीतीरीं ॥ सर्वपापपरिहरे ॥
६९ ॥ पयस्विनी आणिक ॥ भवनाशनी अतिविशेष ॥ सर्व पापे हरती ऐक ॥ समुद्रस्कं
धंदर्शने ॥ ७० ॥ शेषाद्रींक्षेत्र श्रीरंगनाथ ॥ पद्मनाभ श्रीमदनंत ॥ पूजा करोनी जावें

त्वरित ॥ त्रपामहत्क्षेत्रासी ॥ ७१ ॥ समस्ततीर्थेसमान ॥ असेआणि ककुंभकोण ॥ कन्याकु
मारीदर्शन ॥ मच्छतीर्थी स्नानकरा ॥ ७२ ॥ पक्षतीर्थअसे बरवें ॥ रामेश्वर धनुष्यकोटी
नामे ॥ कावेरीतीर्थबरवें ॥ रंगनाथसंन्निध ॥ ७३ ॥ पुरुषोत्तमचंद्रकुडेसी ॥ कोटितीर्थ
परियेसी ॥ महालक्ष्मीकोल्हापुरासी ॥ दक्षिणकाशीकरवीर ॥ ७४ ॥ तयासंन्निधअसे
बरवे ॥ कोल्हग्रामीनरसिंहदेव ॥ परमात्मासदाशिव ॥ तोचिअसे प्रत्यक्ष ॥ ७५ ॥ भिल्ल
वडीकृष्णातिरीं ॥ शाक्तीअसेभुवनेश्वरी ॥ तेथेतपकरितीजरी ॥ तोचिईश्वरीं ऐक्यहोय
७६ ॥ वरुणासंगमीअसेबरवें ॥ तेथेतुम्हीमनोभावें ॥ स्नानकरामार्कंडेयनावें ॥ संगमे

श्वर पूजावा ॥ ७७ ॥ ऋषेश्वरांचे आश्रम ॥ कृष्णातिरी असती उत्तम ॥ स्नानें लाभे ज्ञानोत्त
म ॥ तयासन्निध कृष्णेच्या ॥ ७८ ॥ पुढें कृष्णा प्रवाहांत ॥ अमरापूर प्रख्यात ॥ पंचगंगासं
गमी स्नान ॥ प्रयागाहुनी अधिक पुण्य ॥ ७९ ॥ अखिल तीर्थ तयास्थानी ॥ तप करिती स
कळमुनी ॥ सिद्ध होती त्वरित ज्ञानी ॥ अनोपम्य क्षेत्र परियेसा ॥ ८० ॥ ऐसें प्रख्यात त
ये स्थानी ॥ अनुष्ठितां दिवस तीनी ॥ अखिलाभीष्ट पावोनी ॥ पावती त्वरित परमार्थ
८१ ॥ युगालय तीर्थ बरवें ॥ दृष्टी पडतां मुक्त व्हावें ॥ भूपालय तीर्थ नावें ॥ पुढें असे प
रियेसा ॥ ८२ ॥ विश्वामित्र ऋषी ख्याती ॥ तपस्थान भगवती ॥ तेथें समस्त दोष जाती ॥

मह्लं महारासंगमी ॥ ८३ ॥ कपिलऋषी विष्णुमूर्ती ॥ प्रसन्न तयासी गायत्री ॥ श्वेत
शृंगीं प्रख्याती ॥ उत्तरवाहिनी कृष्णा असे ॥ ८४ ॥ तयास्थानी स्नान करिता ॥ काशी
हुनी अधिकता ॥ एक मंत्र तेथें जपतां ॥ कोटीगुण फळ असे ॥ ८५ ॥ आणिक असे
तीर्थ बरवे ॥ केदारेश्वर पाहावें ॥ त्रिपुरी दत्तात्रय बरवें ॥ वास केला सनातनें ॥ ८६ ॥ का
यसांगूं तीर्थ थोरी ॥ प्रख्यात असे मणिगीरी ॥ सप्तऋषी प्रीति करी ॥ तप केलें बहुत दि
वस ॥ ८७ ॥ वृषभाद्रीकल्याणनगर ॥ तीर्थे असती अपरंपार ॥ न हो संसार येरझार
तयाक्षेत्रा आचरावें ॥ ८८ ॥ अहो महाबळाचें दर्शन ॥ साठ यज्ञपुण्य जाण ॥ श्रीगिरी

चे पहातां चरणा ॥ नाहीं जन्म मागुती ॥ ८९ ॥ समस्त तीर्थें भूमीवरी ॥ आचरावीं परिवा
रीं ॥ रजस्वला सरिती होतां जरी ॥ स्नान करितां दोषें होय ॥ ९० ॥ संक्रांती कर्कटक ध
रूनी ॥ त्यजावें तुम्ही मास दोनी ॥ नदीतीरीं वास करोनी ॥ राहतां त्यांसी दोष नाहीं ॥
९१ ॥ त्यांमध्यें विशेष ॥ त्यजावे तीन दिवस ॥ रजस्वला नदी होतसे ॥ महानदी येणें परी
॥ ९२ ॥ भागीरथी गौतमीसी ॥ चंद्रभागा सिंधुनदीसी ॥ नर्मदा शरयू पतियेसी ॥ वर्जा
वे तुम्ही दिवस तीन्ही ॥ ९३ ॥ ग्रीष्मकाळीं सर्व नदीस ॥ रजस्वला दोष दाहा दिवस ॥
वापी कूप तढाकासं ॥ एक रात्र वर्जावें ॥ ९४ ॥ नवें उदक ज्या दिवसीं ॥ तया ओळखा

रजस्वला ऐसी ॥ स्नान करितां महां दोषी ॥ येणे परी वर्जावें ॥ १५ ॥ साधारण तुम्हासी
सांगितलीं तीर्थें परियेसी ॥ जे जे पहाल दृष्टीसी ॥ विधिपूर्वक आचरावे ॥ १६ ॥ ऐ
कोनि श्रीगुरूचें वचन ॥ शिष्य सकळ करिती नमन ॥ गुरु निरोप घेऊन ॥ निघंती
शिष्य सकळिक ॥ १७ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ निरोप घेऊनि श्रीगुरूपासी
शिष्य गेले यात्रेसी ॥ राहिले श्रीगुरू गोप्यरूपे ॥ १८ ॥ म्हणे सरस्वती गंगाधर
पुढील कथेचा विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें साधती ॥ १९ ॥ ब्रम्ह
रसाची गोडी ॥ सेविती जे घडोघडी ॥ ज्यांसि होईल आवडी ॥ साधे त्वरित परमार्थ ॥ २० ॥

गु० च०
९

अ०
१५

गुरुचरित्र कामधेनु ॥ श्रोते होवो निसावधानु ॥ जे एकती भक्तजनु ॥ लाधती चा
री पुरुषार्थ ॥ १०१ ॥ इतिश्री गुरुचरित्रे नृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधार
क संवादे तीर्थयात्रानिरोपणं नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्प
णमस्तु ॥ शुभं भवतु ॥

९

श्रीगणेशायनमः॥ विनवीशिष्यनामांकित॥ सिद्धयोग्यातें पुसत॥ सांगा स्वामी वृत्तांत॥
गुरुचरित्रविस्तारोनी॥१॥ श्रीगुरू गेले यात्रेसी॥ राहिले कोण गुरूपाशीं॥ पुढील क
थावर्तलीकैसी॥ विस्तारोनीसांगपां॥२॥ ऐकोनी शिष्याचीवाणी॥ संतोषी झाले सि
द्धमुनी॥ धन्यशिष्यशिरोमणी॥ गुरुभक्तनामधारका॥३॥ अविद्यामायासुषुप्तींत
॥ निजलें होतें माझेंचित्त॥ तुजलागी झालें जागृत॥ ज्ञानज्योती हृदय मज॥४॥ तूं
चि माझा प्राणसखा॥ ऐक शिष्या नामधारका॥ तुज करितां जोडलो सुखा॥ गुरुच
रित्र आठवलें॥५॥ अज्ञानतिमिररमिरतृष्णांत॥ पीडोनि आलों कष्टत॥ सुधाअमृत

सागरांत ॥ त्वां मातें ळोटिलें ॥ ६ ॥ त्वां केलें उपकारासी ॥ संतुष्ट झालों मानसीं ॥ पुत्रपो
षीं तूं नादसी ॥ दैन्य नाहीं तुझे द्वारीं ॥ ७ ॥ गुरुकृपेचा तूं बाळका ॥ तुज मानिती सकळ
ळोका ॥ संदेह न धरितां घे कां भाक ॥ अष्टैश्वर्ये नादसी ॥ ८ ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥
सांगेन तुज विस्तारोन ॥ श्रीगुरू राहिले गौप्य गुण ॥ वैजेश्वरासंन्निधानी ॥ ९ ॥ स
मस्त शिष्य तीर्थासी ॥ स्वामी निरोपिलें परियेसी ॥ होतो आपण गुरुमूर्तिपासी ॥ से
वा करून अनुश्रुते ॥ १० ॥ संवत्सर एक तयास्थानी ॥ अंबा आरोग्यभवानी ॥ होते श्री
गुरू गौप्य होवोनी ॥ स्थान वरवें मनोहर ॥ ११ ॥ असतां तेथे वर्तमानी ॥ आला ब्राह्म

ण एक मुनी॥ श्रीगुरू तें देखोनी॥ नमन केलें भक्तिभावें॥ १२॥ माथा ठेवोनी चरणा
वरी॥ स्तोत्रें करी परोपरी॥ स्वामी मातें तारीं तारीं॥ अज्ञान सागरीं बुडालों॥ १३॥ तप
करितों बहु दिवस॥ स्थीर न व्हेचि मानस॥ याचि कारणें ज्ञानास॥ न दिसे मार्ग आ
म्हासी॥ १४॥ ज्ञानाविणें तापस॥ वृथा होती सायास॥ तुम्हा देखतां मानस॥ संतो
षलें स्वामियां॥ १५॥ गुरूसेवा बहु दिवस॥ केली नाही सावकाश॥ याचि कारणें
मानस॥ स्थीर नोहे स्वामियां॥ १६॥ तूं तारक विश्वासी॥ म्हणून मातें भेटलासी॥ उ
पदेश करावा आम्हासी॥ ज्ञान होईल खचित मज॥ १७॥ ऐकोनि मुनीचें वचन॥

श्रीगुरू पुसती हांसोन ॥ पातलें केवीं मुनीपण ॥ गुरूविणें सांग मज ॥ १८ ॥ ऐसें पु-
सतां श्रीगुरूमूर्ती ॥ मुनीच्या डोळां अश्रु येती ॥ दुःखें दाटला अमित चित्तीं ॥ ऐ-
कें स्वामी गुरुराया ॥ गुरू होतां आपणासी एक ॥ अतिनिष्ठुर त्याचें वाक्य ॥ मातें
गांजिलें अनेक ॥ अकृत्य सेवा सांगे मज ॥ २० ॥ न सांगे वेद शास्त्राध्ययन ॥ तर्क
भाष्यादि व्याकर्ण ॥ म्हणे तुझें अंतःकरण ॥ स्थीर नोहे अद्यापी ॥ २१ ॥ म्हणोनी
सांगे आणीक कांहीं ॥ आपुलें मन स्थीर नाहीं ॥ न ऐके त्याचें वाक्य कांहीं ॥ आ-
णिक कोपे मजवरी ॥ २२ ॥ या कारणें बहु दिवसीं ॥ होतों तया गुरूपासीं ॥ बोले

मनें निष्ठूरेसीं ॥ कोपोनि आलों तयावरी ॥ २३ ॥ ऐकोनि त्याचें वचन ॥ श्रीगुरू मूर्ति हा
स्यवदन ॥ म्हणती कैसा ब्राह्मण ॥ आत्मघातकी तूं होसी ॥ २४ ॥ एखादा मूर्ख आ
पले घरीं ॥ मळ विसर्जी देहावरी ॥ आपुलें अदृष्ट असे परी ॥ म्हणोनि सांगे सकळि
कां ॥ २५ ॥ तैसें तुझें अंतःकरण ॥ आपलें नासीक छेदोन ॥ पुढिल्यातें अपशकु
न ॥ करणार होसी तूंचि एक ॥ २६ ॥ न विचारसी आपले गुण ॥ तू तें होय कैचें ज्ञान
गुरुद्रोही तूंचि जाण ॥ आत्मबुद्धी परियेसा ॥ २७ ॥ आपले गुरूचे गुणदोष ॥ स
दां उच्चारें करिसी हर्ष ॥ ज्ञान कैचें होय मानसीं ॥ स्थीर केवीं होय आतां ॥ २८ ॥ जव

३ ळीअसतांनिधान। कांहिंडावेंरानोरान। गुरूअसतांकामधेनू॥ वंचुनीआलांआम्हा १६
पाशीं॥ २९॥ गुरुद्रोहीकवणनर। त्यासीनाहींइहपर। ज्ञानकैंचेंतोपामर। दिवाभी
तासारिखाची॥ ३०॥ जोजाणेगुरूचीसोय। वेदशास्त्रादिख्यातिहोय॥ तोसर्वज्ञशी
धहोय। गुरूसंतुष्टहोतांची॥ ३१॥ संतोषहोताश्रीगुरुसी॥ अष्टसिद्धीत्याच्यादासी॥
क्षणनलागतांपरियेसीं॥ वेदशास्त्रेंत्यासिसाध्य॥ ३२॥ ऐसीऐकोनिगुरूवाणी॥
माथाठेवीत्याचेचरणी॥ विनवीतसेकरजोडोनी॥ करुणावचनेंकरोनियां॥ ३३॥ ज ३
यजयाजीश्रीजगद्गुरू॥ निर्गुणतूंचिनिर्विकारू॥ ज्ञानसागरअपरांपरू॥ उद्धरा

वें आपणातें ॥ ३४ ॥ अज्ञान मायावेष्टीन ॥ नेणों गुरू असे कवण ॥ सांग स्वामी प्रकाशो
न ॥ ज्ञान होय आपणासी ॥ ३५ ॥ कैसा गुरू ओळखावा ॥ कोणेपरी आहे सेवा ॥ प्रका
शकरूनि सांग देवा ॥ विश्ववंद्या गुरुमूर्ति ॥ ३६ ॥ जेणे माझें मन स्थीरू ॥ होवोनी ओ
ळखें श्रीगुरू ॥ ऐसा करणें उपकारू ॥ म्हणोनी चरणी लागला ॥ ३७ ॥ करुणाव
चन ऐकोनी ॥ श्रीगुरू म्हणती ऐक मुनी ॥ तूतें सांगेन विस्तारोनी ॥ गुरुसेवावि
धानु ॥ ३८ ॥ श्रीगुरू म्हणती ऐक मुनी ॥ गुरु म्हणजे जनक जननी ॥ उपदेश
कर्ता आहे कोणी ॥ तोचि जाणा परमगुरू ॥ ३९ ॥ गुरू हरिहर विरंची जाणा ॥ स्वरू

पतोच्चिनारायण ॥ मनकरूनि निर्वाण ॥ सेवा करावी भक्तीनें ॥ ४५ ॥ एतदर्थ कथा एक
सांगेन तें सर एक ॥ आदिपर्वीं असे देख ॥ गुरुसेवा भक्तिभावें ॥ ४१ ॥ द्वारावती तीर्थ प
रियेसी ॥ विप्र एक धौम्यऋषी ॥ तिघे शिष्य होते त्यासी ॥ वेदाभ्यास करावया ॥ ४२ ॥
एक अरुणा पंचाळ ॥ दुसरा वेद केवळ ॥ तिसरा उपमन्यु बाळ ॥ सेवा करिती विद्ये ॥
लागीं ॥ ४३ ॥ पूर्वीं गुरूची ऐसी रिती ॥ शिष्यकरीं सेवा घेती ॥ अंतःकरण त्याचें पहा
ती ॥ केसें निर्वाण शिष्याचें ॥ ४४ ॥ पाहोनि यां अंतःकरण ॥ असे भक्ती निर्वाण ॥ रूपा
करिती तत्क्षण ॥ मनकामना पुरवीती ॥ ४५ ॥ ऐसा धौम्यऋषी भला ॥ तया अरुणा पा

[illegible]ारिला ॥ एके दिवसीं निरोप दिल्हा ॥ ऐक द्विजा एकचित्ते ॥ ४६ ॥ शिष्यासी म्हणे धौ
म्यमुनी ॥ आजि त्वां जावो निरांनीं ॥ क्षेत्रीं सद्यावें तठाग पाणी ॥ जंवरी भूमि तृप्तासि होय
४७ ॥ असे वचनी तळेखाली ॥ तेथे पेरिली असे साळी ॥ उदक नेवोनी तेथे घाली ॥ शी
घ्रपणे शिष्योंसी ॥ ४८ ॥ ऐसा गुरू निरोप होतां ॥ गेला शिष्य धांवतां ॥ झाला तटाका
तें पहातां ॥ काळवा थोर वाहातसे ॥ ४९ ॥ जेथे उदक वाहात ॥ अति दरारां गर्ज
त ॥ क्षेत्रीं भूमी उन्नत ॥ उदक केवीं चढो पाहे ॥ ५० ॥ म्हणे आतां काय करूं ॥ कोपती
आतां मातें गुरू ॥ उदक जातसे दरारा ॥ केवीं बांधूं म्हणतसे ॥ ५१ ॥ आणोनियां शि

५ व्हाद गड ॥ बांधितां होय उदका आड ॥ पाणि जातसे धडाड ॥ जाती पाषाण वां १६
होनियां ॥ ५२ ॥ प्रयत्ने करितां नापरी ॥ कांहीं केल्या न चडे वारी ॥ म्हणे देवा श्रीगु ना
रु हरी ॥ काय करूं ह्मणतसि ॥ ५३ ॥ मग आपण मनी विचारी ॥ गुरूचे शेतीं नव
ठेवोरी ॥ प्राण त्यजीन निर्धारीं ॥ गुरूचे वृत्ती निमित्त ॥ ५४ ॥ निश्चय करूनि
मानसीं ॥ मनी ध्यात श्रीगुरूसी ॥ ह्मणे आतां उपाय यासी ॥ योजुनी प्रयत्न क
रावा ॥ ५५ ॥ उदकाच्या प्रवाहांत ॥ घालितां पाषाणजाती वाहात ॥ आपण आ ५
पटो ह्मणत ॥ निर्धारिले तये वेळीं ॥ ५६ ॥ हातीं दरडी धरी दृढो ॥ पाय ठेवी दुसरे क

डे ॥ झाला आपण उदका आड ॥ मनी श्रीगुरू ध्यातसे ॥ ५७ ॥ ऐसा शिष्यशिरोमणी
निर्वाण करीत तूक्षणी ॥ वृत्तीकडे गेलें पाणी ॥ प्रवाहाचे अर्ध देखा ॥ ५८ ॥ अर्धे पा
णी जेसे तैसें ॥ वाहातसे नित्य सरिसें ॥ तयामध्ये शिष्ये कैसें ॥ बुडविले आंग आपुलें
५९ ॥ ऐसा शिष्य तेया स्थानी ॥ बुडाला असे प्रवाहपाणी ॥ गुरूची वृत्ती झाली ध
णी ॥ उदकें पूर्ण परियेसा ॥ ६० ॥ त्याचा गुरू धौम्य मुनी ॥ विचार करी अंतःकरणी
दिवस गेला अस्तमानी ॥ अद्यापि शिष्य न येची ॥ ६१ ॥ ऐसें आपण विचारीत ॥ गेला
आपण वृत्तींत ॥ झाले असे उदक बहुत ॥ संतोषितसे बहु मुनी ॥ ६२ ॥ न देखे शिष्य तये

वेळीं॥ ह्मणोनि मारितसे आरोळी॥ किंवा भक्षिलें व्याघ्रव्याळीं॥ कोठें आहेसी म्हणतसे॥
६३॥ ऐसे मनी विचारित॥ उंच स्वरें बोभाटत॥ अरे शिष्या ऐसें ह्मणत॥ प्रेमभावें बोला
वी॥ ६४॥ येणें परी करुणावचनी॥ पाचारितसे धौम्यमुनी॥ शब्द पडे शिष्यकानी॥ मग
तेथोनि निघाला॥ ६५॥ येवोनियां श्रीगुरुसी॥ नमन केलें भावेसी॥ धौम्यमुनी म
हाऋषी॥ आलिंगोनि आश्वासिला॥ ६६॥ वर दिधला तये वेळीं॥ एक शिष्यास्तं भ
मोळी॥ तूतें सकळविद्या आली॥ वेदशास्त्रादि व्याकर्ण॥ ६७॥ ऐसें ह्मणतां तत्क्ष
णी॥ झाला विद्यावंत ज्ञानी॥ लागतसे गुरुचरणी॥ भक्तिभावें करोनियां॥ ६८॥ कृपा

निधी धौम्यमुनी ॥ आपुल्या आश्रमात नेवोनी ॥ निरोप दिधला संतोषोनी ॥ विवाह आ
तां कुरी म्हणे ॥ ६९ ॥ निरोप घेवोनि शिष्यराणा ॥ गेला आपुल्या स्वधामा ॥ आणीक
दोघे शिष्य जाणा ॥ होते तया गुरुजवळी ॥ ७० ॥ दुसरा शिष्य वेद जाणा ॥ गुरुचि
करी शुश्रूषणा ॥ त्याच्या पहावया अंतःकरणा ॥ धौम्य गुरू म्हणतसे ॥ ७१ ॥ धौम्य
म्हणे शिष्यासी ॥ सांगेन एक तुम्हासी ॥ तुवां जावोनी अहर्निशी ॥ वृत्ती आश्रमाची
रक्षावी ॥ ७२ ॥ रक्षानियां वृत्तीशी ॥ आणावे धान्य घरासी ॥ म्हणतां शिष्य अतिह
र्षी ॥ गेला तया वृत्तीकडे ॥ ७३ ॥ वृत्ति पिके जो वरी ॥ अहोरात्री कष्ट करी ॥ राशी

होतां अवसरीं ॥ आला आपल्या गुरू पासीं ॥ ७४ ॥ सांगता झाला श्री गुरू पासीं ॥ ह्मणे
वृत्ती भरली राशी ॥ आतां आणावया घरासी ॥ काय निरोप ह्मणतसे ॥ ७५ ॥ मग ह्मणे
धौम्यमुनी ॥ बारे शिष्या शिरोमणी ॥ कष्ट केले बहुरांनी ॥ आतां धान्य आणावे ॥ ७६ ॥
ह्मणोनि देती एक गाडा ॥ तया जुपोनियां रेडा ॥ येणें परी घेवोनि गाडा ॥ आला शेता
जवळिक ॥ ७७ ॥ दोन खंडी साळीसीं ॥ भरिली शिष्यें गाडियासी ॥ एकेक कडे रेडे यांसी
जुंफोनी भोडी आपण देखा ॥ ७८ ॥ रेडा चाले शीघ्रेशी ॥ न ओढवे तयासरसी ॥
मग आपले कंठासी ॥ बांधिता झाला जूं देखा ॥ ७९ ॥ सत्राणे तयासरसी ॥ चालता

स्रा ला मार्गासी ॥ रेडा रुंतला चिखलासी ॥ आपले बळें ओढीतसे ॥ ८० ॥ चिखलीं रुंत
ला रेडा म्हणोनी ॥ चिंता करी बहु मनी ॥ आपण ओढी सत्राणी ॥ गळां फांस पडे तैसा ॥ ८१ ॥
सोडोनियां रेडियासी ॥ काढिला गाडा बाह्य प्रदेशीं ॥ ओढितां आपण गळां फांशीं ॥ प
डोनि प्राण त्यजूं पाहे ॥ ८२ ॥ इतुकें होतां निर्वाणी ॥ सौम्य पातला धौम्यमुनी ॥ त्याशि
ष्यातें पाहोनी ॥ कृपा अधीक उपजली ॥ ८३ ॥ सोडोनियां शिष्यातें ॥ आलिंगोनि
करुणा बहुतें ॥ वर दिधला अभिमतातें ॥ संपन्न तूं चिवेदशास्त्रीं ॥ ८४ ॥ वर देतां त
त्क्षणासी ॥ सर्व विद्या आलीत यासी ॥ निरोप घेउनी गेला घरासी ॥ शिष्य वेद पारि

येसा ॥ ८५ ॥ तिसरा शिष्य उपमन्यू जाण ॥ सेवेविषयीं बहु गुण ॥ गुरुसेवा शुश्रूषण ॥
बहुत करी परियेसा ॥ ८६ ॥ त्यासि बहुत आहार ॥ म्हणोनि विद्या नाहीं स्थीर ॥ त्यासि वि
चारी गुरुवर ॥ काय उपाय करावा ॥ ८७ ॥ त्यासि म्हणे धौम्य मुनी ॥ तूं ते सांगेन ऐकें
कानी ॥ नित्य गोधनें नेवोनी ॥ रक्षण करीं तृणामध्यें ॥ ८८ ॥ ऐसे म्हणतां तत्क्षणी ॥ न
मन केलें त्याचे चरणी ॥ गुरें नेवोनि या रानी ॥ तीं चारिलीं बहुत दिवस ॥ ८९ ॥ क्षुधा ला
गली आपणासी ॥ शीघ्र आणिली घरासी ॥ कोपे गुरू तयासी ॥ म्हणे शीघ्र येतोसि कां ॥
९० ॥ सविता जाय अस्तमानी ॥ तंववरी गुरें रानी ॥ येणे परी प्रतिदिनी ॥ वर्तावें त्वां म्हणतसे

११॥ अंगिकारोनी शिष्यराणा ॥ गुरें घेवोनी गेला वना ॥ क्षुधाकांत होवोनी जाणा ॥ चिंतीत
असे श्रीगुरूसी ॥ १२ ॥ चरती गुरें नदीतिरीं ॥ आपण तेथे स्नान करी ॥ तयाजवळी घरें चा
री ॥ असती विप्र आश्रम तेथें ॥ १३ ॥ जाउनियां तया स्थानासी ॥ भिक्षा मागोनि करी भो
जनासी ॥ मग रक्षी गोधनासी ॥ प्रतिदिवसीं यापरी ॥ १४ ॥ नित्य करी येणेपरी ॥ रक्षुनी
आणि गुरें घरीं ॥ वर्तत असतां निरंतरी ॥ धौम्य मुनी पुसतसे ॥ १५ ॥ गुरू म्हणे शिष्या
सी ॥ तूं नित्य कां उपवासी ॥ तुझा देह दिसे पुष्टीसी ॥ कवण्या गुणे होतसे ॥ १६ ॥ ऐको
नी गुरूचें वचन ॥ सांगे शिष्य उपमन्ये ॥ भिक्षा करुनि भोजन ॥ विप्राघरी तेथे देखा ॥ १७

भोजन करोनि प्रतिदिवसी ॥ गुरें चारोनि येतों निशी ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ आम्हासां
डोनि केवीं मुक्ती ॥ ९८ ॥ भिक्षा मागोनि प्रतिदिवसी ॥ आणोनि द्यावी घरासी ॥ मागुती जावे
गुरापाशी ॥ घेवोनि यावे निशीकाळी ॥ ९९ ॥ गुरू निरोपे येरे दिवसी ॥ नेली गुरे रानासी ॥ मा
गे भिक्षा नित्य जैसी ॥ दिधली ठेवोनि घरांत ॥ १०० ॥ धरी तयाते भोजन ॥ कधीं न होय प
रिपूर्ण ॥ पुन्हा जावोनि आपण ॥ भिक्षा करुनि जेवितसे ॥ १ ॥ नित्य भिक्षा वेळ दोनी ॥ पहिली
देवोनि सदनी ॥ दुसरी आपण भक्षोनी ॥ काळ ऐसा कंठीतसे ॥ २ ॥ येणे परी क्वचित्काळ ॥ व
र्तता झाला महास्थूळ ॥ एके दिवसी गुरू कृपाळ ॥ पुसतसे शिष्यातें ॥ ३ ॥ शिष्य सांगे व

तांत ॥ जेणे आपली क्षुधा क्षमत ॥ नित्य भिक्षा मागत ॥ वेळ दोनी ह्मणतसे ॥ ४ ॥ एक वेळ
देतों घरासी ॥ आणोनि देतों प्रतिदिवसी ॥ दुसरी भिक्षा खेपेसी ॥ करितो भोजन आपण ॥ ५
ऐसें ह्मणतां धौम्यमुनी ॥ त्या शिष्यावरी कोपोनी ॥ ह्मणे भिक्षा वेळ दोनी ॥ आणोनि घ
रीं देई पां ॥ ६ ॥ गुरू निरोपी येणे परी ॥ दोनि भिक्षा देवोनी घरी ॥ कैसा शिष्य निर्धारी ॥ म
नी क्लेश न करीच ॥ ७ ॥ गुरें सहित रानांत ॥ असे शिष्य क्षुधाक्रांत ॥ गोवत्स असे स्तन
पीतां ॥ देखतसे तयासी ॥ ८ ॥ स्तनें पीत वासरासी ॥ उच्छिष्ट गळे संधिसी ॥ वायां जातसे
भूमीसी ॥ ह्मणोनि जवळे पैं गेला ॥ ९ ॥ आपण असे क्षुधाक्रांत ॥ ह्मणोनि गेला धांवत ॥

पसरोनियां दोनि हात ॥ धरी उच्छिष्ट क्षीर देखा ॥ १० ॥ ऐसें क्षीर पान करी ॥ तेणें आपण उदर भ
री ॥ दोनि वेळां भिक्षा घरीं ॥ देतसे भाव भक्तीनें ॥ ११ ॥ अधिक पुष्ट झाला आपण ॥ ह्मणे गुरू अवलो
कुन ॥ पाहे याचे शरीर रक्षण ॥ केसा स्थूळ होतसे ॥ १२ ॥ मागुतीं पुसे तयासी ॥ कवणे पुष्ट परि
येसी ॥ सांगे आपुल्या वृत्तांतासी ॥ उच्छिष्ट क्षीर पान करीतों ॥ १३ ॥ ऐक म्हणे शिष्यासी ॥ म
तिहानि होय उच्छिष्टेंशी ॥ दोष असे बहु वसी ॥ भक्षून को ह्मणतसे ॥ १४ ॥ भक्षून को ह्मणे
गुरू ॥ नित्य नाहीं तया आहारू ॥ दुसरे दिवसीं क्षुधित येरू ॥ काय करूं ह्मणतसे ॥ १५ ॥ येणें प
रीं गुरें सहित ॥ जात होता रानांत ॥ गळत होतें क्षीर बहुत ॥ एक रुईच्या झाडासी ॥ १६ ॥ म्हणे ब

रें असे क्षीर ॥ उच्छिष्ट न के निर्धार ॥ पानें करूंत्र ह्मोदर ॥ ह्मणोनि तेथे बैसला ॥ १७ ॥ पाने तो
डोनि द्रोण करी ॥ तयामध्ये क्षीर भरी ॥ घेतल्ही ता धणीवरी ॥ तंव भरले जे व्यांत ॥ १८ ॥ तेपीं गे
ल्या दृष्टि दोनी ॥ हिंउतसे रानोरानी ॥ गुरे नेदिसती नयनी ॥ ह्मणोनि चिंता करितसे ॥ १९ ॥ काष्ट
नाहीं अक्षहीन ॥ चिंता करितसे गोधन ॥ गुरे पाहों जातां रान ॥ पडुला एका आडांत ॥ २० ॥
पडोनियां आडांत ॥ चिंता करी अत्यंत ॥ गुरे गेलीं आतां सत्य ॥ गुरु बोलेल मज आतां ॥ २१ ॥
पडला शिष्य तये स्थानी ॥ दिवस गेला अस्तमानी ॥ चिंता करी धौम्य मुनी ॥ अजोन शिष्य न
येची ॥ २२ ॥ ह्मणोनि गेला रानासी ॥ देखे तेथे गोधनासी ॥ शिष्य नाही ह्मणोनि क्लेशी ॥ दी

धैस्वरें पाचारी ॥ २३ ॥ पाचारितां धौम्यमुनी ॥ ध्वनी पडली शिष्यकानीं ॥ प्रत्योत्तर देतां क्ष
णी ॥ जे वेळी गेला कृपाकू ॥ २४ ॥ ऐकोनियां वृत्तांत ॥ उपजे कृपा अत्यंत ॥ अश्विनौदेव
स्तवी म्हणत ॥ निरोप दिधला तये वेळीं ॥ २५ ॥ गुरू निरोपें तये वेळीं ॥ अश्विनौदेवां ध्याय
मनी ॥ दृष्टी आली दोनी नयनी ॥ आला गुरू सन्मुख ॥ २६ ॥ येवोनिया श्रीगुरूसी ॥ नम
न करी भक्तीसी ॥ स्तुती करी बहुवसी ॥ शिष्योत्तम तये वेळीं ॥ २७ ॥ संतोषोनि धौम्यमु
नी ॥ तया शिष्यातें आलिंगोनी ॥ म्हणे शिष्या शिरोमणी ॥ तुष्टलों तुझिया भक्तीसी ॥ २८
प्रसन्न होवोनी शिष्यासी ॥ हस्तस्पर्श मस्तकासी ॥ वेदशास्त्र तत्क्षणेंसी ॥ आली तया शि

११

ष्यासी ॥ २९ ॥ गुरु म्हणे शिष्यासी ॥ जावें आपुल्या घरासी ॥ विवाह करूनि सुखेसी ॥ नांदत
असा म्हणतसे ॥ ३० ॥ होईल तुझी बहु कीर्ती ॥ शिष्य होती बहु जगतीं ॥ उत्तंक नाम विख्या
ती ॥ शिष्य तुझा परियेसा ॥ ३१ ॥ तो चितुनि ये दक्षिणेसी ॥ आणील कुंडलें परियेसी ॥ जिंको
नि यांशेषासी ॥ कीर्तिवंत होईल ॥ ३२ ॥ जन्मेजय रायासी ॥ तो चिकरील उपदेशासी ॥
मारवील सर्पासी ॥ याग करूनि परियेसा ॥ ३३ ॥ तो उत्तंक जाऊन ॥ पुढें केला सर्पयज्ञ ॥
जन्मेजयातें प्रेरून ॥ समस्त सर्प मारविले ॥ ३४ ॥ ख्याती झाली त्रिभुवनांत ॥ तक्षक आ
णिला इंद्रासहित ॥ गुरुकृपेचें सामर्थ्य ॥ ऐसें असे परियेसा ॥ ३५ ॥ जो असे गुरुदोष

न का ॥ त्यासी कैंचा परलोक ॥ अंति होयर्कुभीपाक ॥ गुरुद्रोह पातकासी ॥ ३६ ॥ संतुष्ट करितां
गुरूसी ॥ काय न साधे तयासी ॥ वेदशास्त्र तापसी ॥ साधे क्षण न लगतां ॥ ३७ ॥ ऐसा जाणोनी
मानसीं ॥ वृथा हिंडे अविद्येसी ॥ जाईं आपल्या गुरुपासी ॥ तो चि तुज तारील ॥ ३८ ॥ त्याचें
मन संतुष्ट भूत ॥ तुज मंत्र साध्य त्वरित ॥ मनकरूति निश्चित ॥ त्वरित जाय स्मरणतीदेखा
३९ ॥ ऐसा श्रीगुरू निरोप देतां ॥ विप्र झाला अति ज्ञाता ॥ चरणावरी ठेविला माथा ॥ विन
वीत से तये वेळीं ॥ ४० ॥ जय जयाजी गुरुमूर्ती ॥ तूंचि साधन परमार्थी ॥ मातें निरोपिलें श्री
ती ॥ तत्वबोधरूपेनें ॥ ४१ ॥ गुरुद्रोही आपण सत्य ॥ अपराध घडला मज अमित ॥ गु

रूचें दुखविलें चित्त ॥ आतां केवी संतुष्ट ॥ ४२ ॥ सुवर्णादि लोह सकळ ॥ भिन्न होतां साध
वेळ ॥ होतां भिन्न मुक्ताफळ ॥ केवी पुन्हा ऐक्य होय ॥ ४३ ॥ अंतःकरण भिन्न झालें अस
तां ॥ प्रयास असे ऐक्य करितां ॥ असे माझें मन असतां ॥ काय उपयोग वांचूनी ॥ ४४ ॥
ऐसें शरीर माझें द्रोही ॥ काय उपयोग वांचून ही ॥ जीवित्वाची आशा नाही ॥ प्राण त्य
जीन गुरूपासी ॥ ४५ ॥ ऐसेपरी श्रीगुरूसी ॥ विनवी ब्राह्मण अतिहर्षी ॥ नेमुनी निघे
वैराग्येसी ॥ निश्चय केला प्राण त्यजूं ॥ ४६ ॥ अनुतप्त झाला तो ब्राह्मण ॥ निर्मळ झा
लें अंतःकरण ॥ अग्नि लागतां जैसें तृण ॥ भस्म होय तत्क्षणी ॥ ४७ ॥ जैसी कार्पास

रासी ॥ वन्ही लागतां परियेसी ॥ जळोनि जाय त्वरितेसी ॥ तैसे तयासि झालें ॥ ४८ ॥ याका
रणें पापासी ॥ अनुतप्त होतां परियेसी ॥ क्षालन होईल त्वरितेसी ॥ शतजन्मीचे पाप जाय ॥
४९ ॥ निर्वाणरूप द्विजवेरा ॥ निर्वाणरूप द्विजवरा ॥ निघाला त्यजूं कलेवरा ॥ ओळखिलें
गुरुवरा ॥ पाचारिलें तयासी ॥ ५० ॥ बोलावोनियां विप्रासी ॥ निरोप देती कृपेसी ॥ न करी
चिंता तूं मानसी ॥ गेले तुझे दुरितदोष ॥ ५१ ॥ वैराग्य उपजलें तुझे मनी ॥ दुष्कृत गेलें ज
ळोनी ॥ एकचित्तें करोनी ॥ स्मरति आपुले गुरुचरण ॥ ५२ ॥ तये वेळीं श्रीगुरूसी ॥ नमन के
लें चरणासी ॥ जगद्गुरु तूंचि होसी ॥ त्रयमूर्ति अवतार ॥ ५३ ॥ तुझी रूपा होय जरी ॥ पाप

केचे या शरिरीं॥ उदय होतां तमारी॥ अंधःकार केविं राहे॥ ५४॥ ऐसियापरी श्रीगुरूसी॥ स्तु
ती करी भक्तीसी॥ रोमांच उठले आंगासी॥ सद्गदीत कंठ झाला॥ ५५॥ निर्मळ मत्ते सी तये
वेळीं॥ विनवीतसे करुणा बाहाळीं॥ तारीं तारीं श्रीगुरूराया॥ ५६॥ निर्वाण देखोनी अंतः
करणी॥ मस्तकीं टेंवी दक्षिणपाणी॥ ज्ञान झालें तत्क्षणीं॥ तया ब्राम्हणासी परियेसा॥
५७॥ वेदशास्त्र तात्काळ॥ मंत्रास्त्रें आलीं सकळ॥ प्रसन्न झाला गुरु दयाळ॥ काय न्यू
नत्या विप्रासी॥ ५८॥ परीस लागतां लोहासी॥ होय सुवर्ण बावनकसी॥ तैसें तया ब्राह्मणा
सी॥ ज्ञान झालें परियेसा॥ ५९॥ आनंद झाला ब्राह्मणासी॥ श्रीगुरु निरोपिती तयासी॥

॥ग्रा धाटेउनीचे१५
॥ पंक्ती:

आमुचें वाक्य परियेसी ॥ जाय त्वरित गुरु जवळी ॥ ६० ॥ जावोनियां गुरु पासी ॥ नमन करी भावे
सी ॥ संतोष होईल भरवसीं ॥ तोचि आपण सत्य मानी ॥ ६१ ॥ ऐसे परी गुरुमूर्ती ॥ तया ब्राह्मणासं
बोधिती ॥ निरोप घेवुनियां त्वरिती ॥ गेला आपुल्या गुरु पासीं ॥ ६२ ॥ निरोप देउनी ब्राह्मणां
सी ॥ श्रीगुरू निघाले परियेसीं ॥ आले भिल्लवडी ग्रामासी ॥ भुवनेश्वरी संन्निध ॥ ६३ ॥ कृष्णा
पश्चिमतटाकेसीं ॥ औदुंबर वृक्ष परियेसीं ॥ श्रीगुरू स्वामी राहिले गुप्तेसीं ॥ एकचित्तें
परियेसा ॥ ६४ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ राहिले श्रीगुरु भिल्लवडीसी ॥ महिमा वाढली १४
बहुवसीं ॥ प्रख्यात गेले सांगोन ॥ ६५ ॥ म्हणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे श्रीगुरुचरि

त्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ६६ ॥ इति श्रीगुरुचरित्र
विवेकबोधें शिष्य पवित्र ॥ गुरुभजनें पवित्र ॥ सर्वविद्या पावले ॥ ६७ ॥ इति श्रीगु
रुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधारकसंवादे गुरुशुश्रूषणं
नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ १६७ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ

श्री। गणेशायनमः॥ ऐक शिष्या नामकरणी॥ तूं गुरुभक्त शिखामणी॥ तुझी भक्ती गुरुचरणी
लीन होय निर्धारा॥१॥ पर्जन्य येतां पुढारा॥ जैसा येतो सुचिन्ह वारा॥ सद्गुरू कृपा दैन्यहरा॥
ऐकें श्रीगुरुचरित्रा॥२॥ ऐसें चरित्र कामधेनु जाण॥ सांगतों तुज विस्तारोन॥ एकचित्तें क
रूनि मन॥ ऐक शिष्या नामधारका॥३॥ कृष्णावेणी तटाकासी॥ भुवनेश्वरी पश्चिमेसी॥
औदुंबर वृक्षापासी॥ राहिले गुरू परियेसा॥४॥ गौप्यरूपें असती गुरू॥ ठाव असे अगो
चरू॥ अनुष्ठान धुरंधरू॥ चातुर्मास्य येणे परी॥५॥ सिद्धस्थान असे गहन॥ भुवनेश्व
रीसन्निधान॥ विशेष गुरु राहिले म्हणून॥ उत्कृष्ट महिमा वाढला असे॥६॥ ऐकोनी सि

द्वा-च्यावचना॥ नामधारककरीनमना॥ श्रीगुरूपरमात्माजाणा॥ कांराहिलेगोस्वरूपें॥ ७॥
कायत्यासीनपोद्देशा॥ भिक्षामागणेंकायहर्ष॥ हासंदेहमाझामानसीं॥ यातेनिवारींदातारा
८॥ ऐकुशिष्यानामधारका॥ भिक्षामागणेंपिनाका॥ आणिकसांगेनऐका॥ दत्तात्रेयागु
रुमूर्तिसी॥ ९॥ कृपासागरदत्तात्रयमूर्ती॥ भिक्षुकरूपेंअसेदिसती॥ भक्तजनसंग्रहार्थी
तीर्थयात्रेसीहिंडती॥ १०॥ अनुपमतीर्थेमहीवरु॥ असतीगोप्यअपारु॥ श्रीगुरुमूर्तिप
रोपकार॥ प्रगटकरीभक्तांलागीं॥ ११॥ भक्तजनउद्धारार्थ॥ तीर्थेहिंडेश्रीगुरुनाथ
गोप्यव्हावयाकारणार्थ॥ समस्तयेतीनिमागती॥ १२॥ लपवितांदिनकरासी॥ केवील

पेते जो रासी ॥ कस्तुरी ठेवितां गोप्येसी ॥ गंध केवी गोप्य होय ॥ १३ ॥ आणिक सांगे तुज प्रती
कल्पवृक्ष जें त्रिजगती ॥ जेथें राहे तया क्षिती ॥ कल्पिलें फळ देतसे ॥ १४ ॥ या कारणें तया
स्थानी ॥ सांगेन तुज विस्तारोनी ॥ प्रगट झाले गुरुमुनी ॥ एकचित्तें परियेसा ॥ १५ ॥ करवीर
क्षेत्र नगरांत ॥ ब्राह्मण एक वेदरत ॥ शास्त्रपुराण विख्यात ॥ सांगे सकळ द्विजना ॥ १६
आद्यवेदी असे आपण ॥ जाणे तर्क व्याकर्ण ॥ अन्हिका प्रमाणें आचरण ॥ कर्ममार्गीं स्त
असे ॥ १७ ॥ त्यासी झाला एक सुत ॥ मतिमंद असे उपजत ॥ मातापिता समस्त ॥ गेलीं म
रोनि तयाची ॥ १८ ॥ दिवस मास वर्द्धतां बाळ ॥ वर्षे सात झाली केवळ ॥ व्रतबंध करिती

निश्चळ ॥ तयाद्विजकुमरासी ॥ १९ ॥ नयेस्नानसंध्यातयासी ॥ गायत्रीमंत्रपरियेसी ॥ वे
दकैचामूर्खासी ॥ पशूसमानझालासे ॥ २० ॥ जेसांगतीअध्ययन ॥ आपणनशिकेजाऊन
तावन्मात्रशिकताजाण ॥ लोकनिंदेप्रवर्तलो ॥ २१ ॥ तयाग्रामीचेद्विजजन ॥ निंदाकरिती
आपण ॥ विप्रकुळींजन्मोन ॥ विद्यानयेतुजलागीं ॥ २२ ॥ तुझापिताज्ञानवंत ॥ वेदशास्त्र
अभिज्ञात ॥ त्याच्यापोटींकैसाकृत ॥ उपजलासीदगडापरी ॥ २३ ॥ जळोजळोतुझेंजि
णें ॥ पित्याच्यानावांआणिलेंउणें ॥ पोटींबांधोनीपाषाणे ॥ बावीतळींरिघेनोकां ॥ २४ ॥
जन्मोनियांसंसारीं ॥ वृथाझालासीपशूपरी ॥ तुजगतीयमपुरीं ॥ आचारहीनवर्तसी ॥ २५ ॥

ज्याती असे विद्या एक ॥ तोचि मनुष्या माजी अधिक ॥ जेसा चिंतामणी देख ॥ तैसी विद्या परि
येसा ॥ २६ ॥ ज्याचे हृदयीं असे विद्या ॥ त्यासि सकळ भोग सदा ॥ यशस्वी होय सुख संपदा ॥ स
मस्तां मध्यें पूज्य तोची ॥ २७ ॥ येकाद्या समयीं विदेशासी ॥ जाई नर विद्याभ्यासी ॥ पूजा क
रिती त्यासी ॥ विदेश होय स्वदेश ॥ २८ ॥ श्रेष्ठ असेल वय थोर ॥ विद्या नाहीं अपूज्य नर ॥
अश्रेष्ठ असेल येखादा जर ॥ विद्या असतां पूज्य होय ॥ २९ ॥ ज्यासि नाहीं सहोदर ॥ तयासि
विद्या भ्रातर ॥ सकळिकां वंद्य होय नर ॥ विद्या गुण ऐसा असे ॥ ३० ॥ जयासि असे विद्या ब
हुत ॥ तोचि होय ज्ञानवंत ॥ ज्याचिया देही दैवत ॥ पूजा घेई सकळांपासीं ॥ ३१ ॥ एक विद्या ॥

ज्याधिपतीसी॥ समस्त वंदिती तयासी॥ राजा ही आपण हर्षी॥ विद्यावंता पूजितसे॥ ३२॥ ज्या
चे घरीं नाहीं धन॥ त्यासि विद्या असे धन॥ विद्यासि कावयाचें कारण॥ हें चि असे जाणपां
३३॥ ऐकोनि तयाचे वचन॥ ब्रह्मचारी करीन मन॥ स्वामी निरोपिलें ज्ञाना॥ विद्याभ्यास कराव
या॥ ३४॥ जन्मांतरीं पूर्वी आपण॥ केलें नाहीं विद्यादान॥ न ये विद्या याचि कारण॥ काय करूं
म्हणतसे॥ ३५॥ ऐसा आपण दोषी॥ जरी असेल उपाय यासी॥ उद्धारावें जी कृपेसी॥ नि
रोपावें दातारा॥ ३६॥ परिसोनि सकळ ब्राह्मण॥ सांगती तयासि बहु जन॥ होईल पुढे जन
न॥ तधीं येईल विद्या तूतें॥ ३७॥ तुज केंचा विद्याभ्यास॥ पशु केवळ नर विशेष॥ भिक्षा

मागोन उदर पोष ॥ असें रे मूर्खा कुळनाशका ॥ ३८ ॥ ऐसे नीचोत्तरेंसी ॥ बोलती द्विजलो
कत्यासी ॥ वैराग्य धरोनि मानसीं ॥ निघाला असे अरण्यांत ॥ ३९ ॥ मनी झाला खेदें खि
न्न ॥ म्हणे आतां त्यजीन प्राण ॥ समस्त ठेविती दूषण ॥ काय उपयोग वांचोनियां ॥ ४० ॥ ज
न्मो जन्मो आपुलें जिणें ॥ पशु झालों मतिहीनें ॥ आतां वांचोनि काय कारण ॥ म्हणोनि नि
घाला वैराग्यें ॥ ४१ ॥ भिह्नवडी ग्रामासी ॥ आला तो नर पर्येसी ॥ अन्न न घेउ पवासी
पातला निशी दैववशें ॥ ४२ ॥ जेथें असे जगन्माता ॥ भुवनेश्वरी विख्याता ॥ तेथें पा
वला त्वरिता ॥ करी दर्शन देवीचें ॥ ४३ ॥ न करी स्नान संध्या देख ॥ अपार करितसे दुःख

देवद्वारासन्मुख ॥ धरणें घेतलें तयानें ॥ ४४ ॥ येणे परी दिवसतिन्ही ॥ निर्वाण मन करूनी ॥
अन्नोदक त्यजूनी ॥ बैसला होता तो द्विज ॥ ४५ ॥ नो हे स्वप्न त्यालागोनी ॥ म्हणोनि कोपे तो ब
हु मनी ॥ म्हणे अंबे भवानी ॥ कां उपेक्षिसी मजलागीं ॥ ४६ ॥ आक्रंदोनि तये वेळीं ॥ शस्त्रें घे
वोनि प्रबळीं ॥ अपली जिव्हा तात्काळी ॥ छेदोनि वाहे तिचे चरणीं ॥ ४७ ॥ जिव्हा वाहोनि
अंबेसी ॥ मागुती म्हणे परियेसी ॥ जरीं तूं मज उपेक्षिसी ॥ वाहीन शीर तुझे चरणी ॥ ४८ ॥
ऐसें निर्वाण मानसीं ॥ क्रमितां झाली सप्तनिशी ॥ स्वप्न झालें तयासी ॥ एकाग्र समस्त श्रोते ॥ ४९ ॥
ऐका बाळा ब्रह्मचारी ॥ आक्रोशसी आह्मावरी ॥ असे कृष्णा पश्चिम तिरीं ॥ त्वरित जाय तये स्थानीं ॥

॥ ॥ ओदुंबराचे वृक्षातळीं ॥ असेतापसी महाबळी ॥ अवतारपुरुषचंद्रमोळी ॥ तुझी वांछापुर
वील ॥ ५१ ॥ ऐसें स्वप्न तयासी ॥ झालें अभिनव परियेसी ॥ जाग्रत होतां तत्क्षणेसी ॥ निघाला तेथो
नि ब्राह्मण ॥ ५२ ॥ निघाला विप्र त्वरिता ॥ पळत गेला प्रवाहांता ॥ सादर लक्षितां चितें तेथ ॥ देखिता श्र
ला श्रीगुरूसी ॥ ५३ ॥ चरणावरी ठेवोनि माथा ॥ अत्यंत स्तोत्र झाला करिता ॥ श्रीगुरूमूर्ति संतोष
तां ॥ आश्वासीत तये वेळीं ॥ ५४ ॥ श्रीगुरूमूर्ती संतोषती ॥ माथां हस्त ठेविती ॥ ज्ञान झालें तयाप्र
ती ॥ जिव्हा आली तात्काळिक ॥ ५५ ॥ जेसा मानससरोवरासी ॥ वायस जाय परियेसी ॥ तो होय राज
हंसी ॥ तैसें झालें विप्रास ॥ ५६ ॥ चिंतामणीसंपर्केसी ॥ सुवर्णत्व येई लोहासी ॥ मृत्तिका पडतां जांबुन

दासी ॥ स्कवर्पकेवी होय ऐका ॥ ५७ ॥ तैसें तया ब्राह्मणासी ॥ स्पर्शतां गुरुचरणासी ॥ आलीस
कळविद्या त्यासी ॥ वेदशास्त्रतर्कभाष्य ॥ ५८ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ श्रीगुरुमहिमा ऐकनि
का ॥ जेजे स्थानीं वास देखा ॥ तेथें महिमा ऐसी असे ॥ ५९ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधरा ॥ सांगे
गुरुचरित्रविस्तारा ॥ ऐकतां होय मनोहरा ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ६० ॥ इति श्रीगुरुच
रित्रे ॥ मूर्खासि झालें ज्ञान प्राप्त ॥ तेचि कथा वर्णिली येथ ॥ श्रीगुरुप्रसादें ॥ ६१ ॥ इ
ति श्रीगुरुचरित्रे सिद्धनामधारकसंवादे द्विजोध्धारणं नाम सप्तदशोऽध्याय
॥ १७ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

श्री[illegible]रायनमः ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूं तारक भवार्णवीं ॥ सूधारस ॥ आमुचे श्रवणी पूर्ण केला दातारा ॥ १ ॥ गुरुचरित्र कल्पतरु वन ॥ ऐकतां न धाये माझें मन ॥ कांक्षा पावे अंतःकरण ॥ कथामृत ऐकावया ॥ २ ॥ ध्यान लागले श्रीगुरुचरणी ॥ तृप्ती नोहे अंतःकरणी ॥ कथामृत संजीविनी ॥ आणिक निरोपी दातारा ॥ ३ ॥ यणेपरी सिद्धासी ॥ विनवी शिष्य भक्तीसी ॥ मस्तक ठेवी चरणासी ॥ कृपा भक्ती तये वेळीं ॥ ४ ॥ शिष्यवचन ऐकोनी ॥ संतोषले सिद्धमुनी ॥ सांगतसे विस्तारोनी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ५ ॥ ऐका शिष्या शिखामणी ॥ धन्य धन्य तुझी वाणी ॥ तुझी भक्ती गुरुचरणी ॥ तल्लीन झाली निश्चयें ॥ ६ ॥ तुज करितां आ

त्यासी ॥ एक झालें परियेसी ॥ गुरुचरित्र आद्यंतेसी ॥ स्मरण झालें अवधारा ॥ ७ ॥ भि
ल्लवडी स्थान महिमा ॥ निरोपिलें अनुपमा ॥ पुढील चरित्र उत्तमा ॥ सांगेन एकएक
चित्तें ॥ ८ ॥ क्वचित्काळ तये स्थानी ॥ गुरु होते गोप्य होवोनी ॥ प्रगट झाले म्हणोनी ॥ पु
ढें निघाले परियेसा ॥ ९ ॥ वरुणा संगम असे विख्यात ॥ दक्षिणवाराणसी म्हणत ॥ श्री
गुरु आले अवलोकित ॥ भक्तानुग्रह करावया ॥ १० ॥ पुढें कृष्णातटाकांते ॥ श्रीगु
रु तीर्थे पावन करित ॥ पंचगंगासंगम ख्यात ॥ तेथें राहिले द्वादशाब्दें ॥ ११ ॥ अनुपम ती
[illegible]नोहर ॥ जैसें अविमुक्त काशीपुर ॥ प्रयाग मानस तीर्थ मनोहर ॥ म्हणोनि राहिले

परियेसा ॥१२॥ कुरवपुर महा गहन ॥ कुरुक्षेत्र तें कि जाण ॥ पंचगंगा कृष्णासंगम ॥ अ
तिउत्तम परियेसा ॥१३॥ कुरुक्षेत्रीं जितकें पुंण्य ॥ तयाहोनी अधिक गुण ॥ तीर्थ असे
अगम्य ॥ म्हणोनि राहिले श्रीगुरू ॥१४॥ पंचगंगा नदी तीर ॥ प्रख्यात असे पुराणां
तर ॥ पंचगंगा आहे थोर ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥१५॥ शिवा भद्रा भोगावती ॥ कुंभी
नदी सरस्वती ॥ पंचगंगा नामें ख्याती ॥ महापापें संहारक ॥१६॥ ऐसी प्रख्यात पंचगंगा
आल्या कृष्णोचियासंगा ॥ प्रयागाहुनी असे चांगा ॥ संगमस्थान मनोहर ॥१७॥
अमरपूर म्हणोनि ग्राम ॥ स्थान असे अनुपम ॥ जैसा प्रयाग संगम ॥ तैसें स्थान मनोहर

१८॥ वृक्ष असे औदुंबरु ॥ प्रख्यात जाण कल्पतरू ॥ देव असे मरेश्वरु ॥ तया संगमी जा
णपां ॥ १९ ॥ जैसी वाराणसीपुरी ॥ गंगाभागीरथीतिरीं ॥ पंचनदीसंगम थोरी ॥ तत्समान
परियेसा ॥ २० ॥ अमरेश्वरसनिधानी ॥ आहेत चौसष्ट योगिनी ॥ शक्तितीर्थ निर्गुणी
प्रख्यात असे परियेसा ॥ २१ ॥ अमरेश्वरलिंग बरवें ॥ तयासि वंदोनि स्वभावे ॥ पूजितां
नरे अमर व्हावें ॥ विश्वनाथ तोचि जाणा ॥ २२ ॥ प्रयागीं करितां माघस्नान ॥ जे पुण्य
होय साधन ॥ शतगुण होय त्याहून ॥ एक स्नाने परियेसा ॥ २३ ॥ सहजनदीसंगमां
त [illegible]यागासमान विख्यात ॥ अमरेश्वर परब्रह्म सत्य ॥ तया स्थानी वसत से ॥ २४ ॥

[illegible]र जे तयास्थानी ॥ कोठि तीर्थे असती न्निर्गुणी ॥ कृष्णावेण्या दक्षिणवाहिनी ॥ त्यां
सहित निरंतर ॥ २५ ॥ अमित तीर्थे तयास्थानी ॥ सांगतां विस्तार होय पुराणीं ॥ अष्टती
र्थे असती गुणी ॥ तया कृष्णाप्रवाहांत ॥ २६ ॥ उत्तरदिशे असे देखा ॥ वाहे कृष्णा प
श्चिमाभिमुखा ॥ शुक्लतीर्थ नाम ऐका ॥ ब्रह्महत्या पापें जाती ॥ २७ ॥ औदुंबर सं
न्निधे सी ॥ तीन तीर्थे परियेसी ॥ एकाहूनि एके अधिकेसी ॥ तीर्थे असती मनोह
र ॥ २८ ॥ पापविनासी काम्यतीर्थ ॥ तिसरें सिद्धवरद तीर्थ ॥ अमरेश्वर संन्निधार्थ ॥
अनुपमतीर्थे असती पैं ॥ २९ ॥ पुढें संगम शक्तकुलांत ॥ प्रयागतीर्थ असे ख्यात ॥ श

क्तितीर्थ अमरतीर्थ ॥ कोटितीर्थ परियेसा ॥ ३० ॥ तीर्थे असती अपारी ॥ सांगतां ग्रंथ विस्ता
री ॥ याकारणे श्रीगुरू त्यापुरी ॥ राहिले तेथे द्वादशाब्दें ॥ ३१ ॥ कृष्णा वेणी नदी दोनी ॥ पंच
गंगा मिळोनी ॥ सप्तनदी समागम गुणी ॥ काय सांगो महिमा त्यांचा ॥ ३२ ॥ ब्रह्महत्यादि
पातकें ॥ जळोनि जाती स्नाने एकें ॥ ऐसें सिद्धस्थान निकें ॥ सकळां अभीष्ट होती तेथे
३३ ॥ काय सांगो त्याचा महिमा ॥ आणीक द्यावया नाही उपमा ॥ दर्शनमात्रे पूर्णकामा
स्नानफळ काय वर्णू ॥ ३४ ॥ भक्तजन तारणार्थ ॥ असे तीर्थ प्रख्यात ॥ राहिले तेथे श्रीगु
नाथ ॥ म्हणोनि प्रगट झाला ॥ ३५ ॥ साक्षात असे कल्पतरू ॥ स्वयंभू वृक्ष असे औदुं

८७५४-९-८

ता॥ नाव्य होतां अगोचरू ॥ राहिले श्रीगुरू तये स्थानी ॥ ३६ ॥ भक्तजनतारावे हा हेत
म्हणोनि तीर्थें प्रख्यात करित ॥ राहिले तेथें श्रीगुरूनाथ ॥ म्हणोनि प्रगट झाले जाणा
३७ ॥ असतां पुढें वर्तमानी ॥ भिक्षा करावया प्रतिदिनी ॥ झाली असतां माध्यान्ही ॥ जा
ति श्रीगुरू परियेसा ॥ ३८ ॥ तया ग्रामी द्विज एक ॥ असे वेदाभ्यासक ॥ त्याची भार्या प
तीसेवक ॥ पतिव्रताशिरोमणी ॥ ३९ ॥ सुशीळ असे ब्राम्हण ॥ शुष्क भिक्षा करी आप
ण ॥ कर्ममार्ग आचरण ॥ असे सात्विक वृत्तीनें ॥ ४० ॥ तया विप्रमंदिरांत ॥ असे वे
ल उन्नत ॥ शेंघा निघती घेवड्यासी बहुत ॥ त्याणें उदरपूर्ती करितसे ॥ ४१ ॥ एरवा

त्या दिवसीं ब्राह्मणासी ॥ वरून मिळे परियेसी ॥ तया शेंगा ते राधोनि हर्षी ॥ दिवस क्रमि
तीयेणें परी ॥ ४२ ॥ ऐसा ब्राह्मण दरिद्री ॥ याचकवृत्तीं उदर भरी ॥ पंच महायज्ञ कुसरी ॥
अतिथी पूजी भक्तीनें ॥ ४३ ॥ भक्तिपूर्वक श्रीगुरूसी ॥ पूजा करी नेमासी ॥ घेवड्याच्या शें
गा परियेसी ॥ केवी होती परिशाखा ॥ ४४ ॥ वर्ततां श्रीगुरू एके दिवसी ॥ तया विप्रमंदि
रासी ॥ गेले आपण भिक्षेसी ॥ नमिले विप्रें भक्तीनें ॥ ४५ ॥ भिक्षा करूनी ब्राह्मणास ॥
आश्वासिती अति संतोष ॥ गेले तुझे दरिद्रदोष ॥ म्हणोनि निघती तये वेळीं ॥ ४६ ॥ त
[illegible]पगहांत ॥ जो होता दरिद्रोन्नतत ॥ घेवडा नामे विख्यात ॥ आंगण सर्व वेष्टिले से ॥

[illegible] वेलीचें बूड मूळ ॥ श्रीगुरू छेदिती तात्काळ ॥ टाकोनि देती समूळ ॥ गेले आपण संगमासी ॥ ४८ ॥ विप्रवनिता तये वेळीं ॥ दुःख करिती पुत्रसकळीं ॥ म्हणती पहा हो दैवबळी ॥ कैसें दैवें केलें आम्हां ॥ ४९ ॥ आम्ही तया यतीश्वरासी ॥ काय उपद्रव केला त्यासी ॥ छेदिलें आमुच्या ग्रासासी ॥ टाकोनी दिल्हें भूमिवरी ॥ ५० ॥ ऐशापरी ती नारी ॥ दुःख करी अनिवारी ॥ गुरू कोपती येणेपरी ॥ म्हणे प्रारब्ध प्रमाण ॥ ५१ ॥ भ्रतार म्हणे तये वेळीं ॥ जे होणार जया काळीं ॥ निर्माण करी चंद्रमौळी ॥ तयाआधीन विश्व जाण ॥ ५२ ॥ विश्वव्यापक नारायण ॥ उत्पत्तिस्थितिलयकारण ॥ पिपीलिकादि स्थूळ

गु० चं०
५

जीवन॥ समस्त आहार पुरवीतसे॥ ५३॥ आयुरन्नं प्रयच्छंती॥ ऐसें बोले वेदश्रुती॥ पं
चानना आहार हस्ती॥ केवीं करितसे प्रत्यहीं॥ ५४॥ चौऱ्हाशीं लक्ष जिवांसी॥ स्थूळसू
क्ष्म समस्तांसी॥ निर्माण केले आहारासी॥ उत्पन्नी केली तदनंतर॥ ५५॥ निराकाराची
एकदृष्टी॥ करुनी पोसितो हे सृष्टी॥ आमचे प्रारब्धीं असे वो खुटी॥ करीतसे आ
पणासी॥ ५६॥ पूर्वजन्मी विक्षेपणा॥ सुकृत दुष्कृत असे जाण॥ भोगणे आपुले आ
पण॥ पुढिलियावरी काय बोल॥ ५७॥ आपुले दैव असतां उणें॥ पुढिल्या बोलती मू
र्खपणें॥ जे प्रेरिले ते भक्षणें॥ कवणा बोल सांगे मज॥ ५८॥ बोल ठेविती ईश्वरासी

अ०
१८

५

आपुलें आर्जव न विचारिसी ॥ ग्रास घेतला ह्मणसी ॥ अविद्यामायावेष्टोनी ॥ ५९ ॥ तो
तारक आह्मासी ॥ ह्मणोनि आला भिक्षेसी ॥ नेले आमुच्या दरिद्रासी ॥ तोचि तारील
अंती आह्मा ॥ ६० ॥ यणे परी स्त्रियेसी ॥ संबोधित परियेसी ॥ काटोनि वेल शास्त्रेसी
टांकिता झाला गंगेत ॥ ६१ ॥ तया वेलाचें मूळ जरी ॥ जे कां होतें आपुल्या द्वारीं ॥ का
ढोनि ह्मणे द्विजवरी ॥ खणिता झाला त्याकाळीं ॥ ६२ ॥ काढितां वेलमूळासी ॥ ला
ण ॥ द्विजांते करूनि यादूषण ॥ राजे म्हणविती आपण ॥ तया यवनराज्यांत ॥ २८ ॥ ऐसे एक
तावर्तमानी ॥ विप्र मदांधे आपुनी ॥ राजापुढे जावोनी ॥ विनविताती परियेसी ॥ २९ ॥ विप्र म्ह
णती रायासी ॥ आम्हा योग्य ना बहुवसी ॥ न मिळे एक वादासी ॥ वृथा झाले शिकोनी ॥ ३० ॥

२

आमुचे मनी बहु आर्ती ॥ करणे वाद शास्त्रीर्थी ॥ निरोप देईजाऊं म्हणती ॥ विचारूनु य्यारा
ष्ट्रात ॥२१॥ जरी मिळेल एखादा नर ॥ तयासवे चर्चा करूं ॥ न मिळे तें सा द्विजवरू ॥ जयपत्र घेऊ
ब्राम्हणाचे ॥२२॥ राजा म्हणे तयासी ॥ जावे राष्ट्रीं त्वरितेंसी ॥ पराभवावे ब्राम्हणासी ॥ म्हणोनि
निरोप देता झाला ॥२३॥ यवनाचे आज्ञेसी ॥ निघाले द्विज दुरतामसी ॥ पर्यटण करितां रा
ज्यासी ॥ गांवो गांवी विचारिती ॥२४॥ गांवो गांवी हिंडती ॥ जयपत्रे लिहून घेती ॥ अशी कव
णा असे शक्ती ॥ तयासन्मुख उभे राहावया ॥२५॥ समस्त नगरे हिंडत ॥ पुढे चालती दक्षिणपंथ
भीमातिरी असे विख्यात ॥ कुमसी ग्राम उत्तम ॥२६॥ तेथे होता महामुनी ॥ त्रिविक्रमभारती म्हणू

२

नी॥ त्यासियेतीवेदतिनी॥ अनेकशास्त्रीअभिज्ञता॥३७॥ महामुनीकीर्तिवत॥ म्हणोनि
सागतीजनसमस्त॥ ऐकतीद्विजमदोन्मत्त॥ गेलेतयामुनीपासी॥३८॥ जावोनिम्हणतीत
यासी॥ त्रिवेदीऐसेम्हणविसी॥ चर्चाकरावीआह्मासी॥ अथवाद्यावेहारिपत्र॥३९॥ विप्रव
चनऐकोनी॥ म्हणतसेत्रिविक्रममुनी॥ आह्मीनेणोवेदतिन्ही॥ अथवानयेवेदएक॥४०
जरीजाणतोवदेशास्त्र॥ तुरीकाहोतोअरण्यपात्र॥ वंदनकरितेराजेसर्वत्र॥ तुह्मासारिखे
भोगकरितो॥४१॥ नेणोम्हणोनिअरण्यवासी॥ वेषघेतलामीसंन्यासी॥ आह्मीभिक्षुकता
पसी॥ तुह्मासमाननव्हेजाणा॥४२॥ हारीअथवाजितूना॥ नाहीतयाचाअभिमान॥ तुह्मी

उद्धटविद्वज्जन ॥ आम्हासवेकायवाद ॥ ४३ ॥ ऐकोनिमुनीचेवचन ॥ तंवकांआलेतेब्राम्ह
णा ॥ आम्हासवेंवादकवण ॥ घालीऐसात्रिभुवनी ॥ ४४ ॥ हिडतआलोअवघेराष्ट ॥ आम्हा
समाननाहीनर ॥ म्हणोनिदाखवितीजयपत्रे ॥ असंख्यातपरियेसा ॥ ४५ ॥ येणेपरीआप
णासी ॥ जयपत्रेघ्यावेविशेषी ॥ अभिमानअसल्यामानसी ॥ करीविवादम्हणताती ॥ ४६ ॥ अ
नेकपरीब्राम्हणासी ॥ सागेमुनीविनयेसी ॥ ऐकतीद्विजमहादोषी ॥ मागतीजयपत्रआपले
४७ ॥ त्रिविक्रममहामुनी ॥ आपलेविचारीअंतःकरणी ॥ यांतेमावेगापगाभुवनी ॥ शिक्षा
करणेद्विजांते ॥ ४८ ॥ विप्रमदांधेव्यापिले ॥ अनेकब्राम्हणधिःकारिले ॥ त्यातेंउपायक

श्री

रणे भले ॥ म्हणोनि योजिले मनांत ॥ ४९ ॥ त्रिविक्रम म्हणे विप्रांसी ॥ चला गाणगाभुवनासी ॥ तेथे देईन तुम्हासी ॥ जयपत्र विस्तारे ॥ ५० ॥ तेथे असती आपले गुरू ॥ तयापुढे देईन पत्र निर्धारू ॥ अथवा तुह्या मनीचा भारू ॥ शमन करूं म्हणे देखा ॥ ५१ ॥ ऐसा निश्चय करूनी ॥ निघाला विक्रम महामुनी ॥ सवे येती विप्र दोनी ॥ आदोलिके बैसोनियां ॥ ५२ ॥ पुढे ब्राम्हण अज्ञानी ॥ यतीश्वरा चालवूनी ॥ आपण बैसले सुखासनी ॥ म्हणोनि अल्पायुषी झाले ॥ ५३ ॥ पावले तया गाणगापुरा ॥ जे कां स्थान गुरुवरा ॥ रम्य स्थान भिमातिरा ॥ वास नरसिंहसरस्वती ॥ ५४ ॥ नमन करूनि श्रीगुरूसी ॥ विनवी मुनी वि

५
ग्रासी ॥ रूपामूर्ति व्योमकेशी ॥ भक्तवत्सल परमपुरुषा ॥ ५५ ॥ जयजयाजी जगद्गुरु
निर्गुण तू विनिर्विकारु ॥ त्रयमूर्तीचा अवतारु ॥ अनाथांच्या रक्षका ॥ ५६ ॥ दर्शन होतां
तुझ्या चरणा ॥ उद्धरे संसार भवार्णा ॥ नेणती मूढ अज्ञानजन ॥ अधोगतीचे तेइष्ट ॥
५७ ॥ सद्गदीत कंठ झाला ॥ रोमांच वळ आंगी उदला ॥ नेत्री वाष्प आनंदजळा ॥ माथा ठे
विला चरणावरी ॥ ५८ ॥ नमन करितां मुनीश्वराते ॥ उठविले श्रीगुरुनाथे ॥ आलिंगो
नि करुणावक्के ॥ पुसताती वृत्तांता ॥ ५९ ॥ श्रीगुरु पुसतीत यांसी ॥ आलेत कवण कार्यासी ५
विस्तारोनि आम्हासी ॥ निरोपावे मुनिवरा ॥ ६० ॥ श्रीगुरूचे वचन ऐकोनि ॥ सांगतसे त्रिवि

क्रममुनी ॥ मदोन्मत्त विप्र दोनि ॥ आले असती चर्चेसी ॥ ६१ ॥ वेदशास्त्रादि मीमांसे ॥ म्हण
ती चर्चा करूं हर्षे ॥ वेद चारी जिव्हाग्री वसे ॥ म्हणती मूढ विप्र दोनी ॥ ६२ ॥ जरी न करा चंर्चे
सी ॥ पत्र मागती हारीशी ॥ अनेकापरी तयासी ॥ सांगतां न ऐकती उन्मत्त ॥ ६३ ॥ म्हणोनि
आलों तुम्हा जवळी ॥ तुम्ही श्रीगुरु चंद्रमौळी ॥ तुझे वाक्य असे बळी ॥ तेणें परी निरोपा
वे ॥ ६४ ॥ मुनी वचन ऐकोनी ॥ श्रीगुरु म्हणती हास्यवदनी ॥ आले होते विप्र दोनी ॥ त्या
ते पुसती वृत्तांत ॥ ६५ ॥ श्रीगुरु म्हणती विप्रांसी ॥ आलेत कवण कार्यासी ॥ वाद काय
सा तुम्हासी ॥ लोभ काय येणे परी ॥ ६६ ॥ आम्ही तापसी संन्यासी ॥ आम्हा हारि कायसी ॥ का

६

यथोरीतु म्हासी ॥ जय होतां यती सवे ॥ ६७ ॥ श्रीगुरू वचन ऐकोनी ॥ बोलताती विप्र दोनी
आलो पृथ्वी हिंडोनी ॥ समस्त विप्र जिंकित ॥ ६८ ॥ नके कोणी सन्मुख ॥ वेदचर्चा पराङ्मु
ख ॥ म्हणोनि पत्रें अनेक ॥ काढोनिया दाखविलीं ॥ ६९ ॥ येणे परी आम्हासी ॥ पत्र देतां को
सायासी ॥ कोप आला त्रिकिक्रमासी ॥ घेवोनि आला तुम्हा जवळी ॥ ७० ॥ जरीं असा
ल साभिमान ॥ तुम्हा सहित दोघे जण ॥ वेदशास्त्रादि आकर्ण ॥ चर्चा करू म्हणती विप्र
७१ ॥ आम्ही जाणो वेद चारी ॥ न होति कोणि आम्हा सरी ॥ तुम्ही दोघे यतीश्वरी ॥ काय जा
णाल वेदांत ॥ ७२ ॥ श्रीगुरू म्हणती विप्रांसी ॥ गर्व नाश समस्तांसी ॥ देव दानवादिकांसी ॥ गर्वे

६

रसुला धला जाणा ॥ ७३ ॥ गर्वें बळीसी काय झाले । बाणासुरासी फळ आले ॥ लंका
नाथ कौरव गेले ॥ वैवस्वत क्षेत्रासी ॥ ७४ ॥ कवण जाणे वेदांत ॥ ब्रह्मादिकां न कळे अंत
वेद असती अनंत ॥ गर्व वायां तुम्ही करितां ॥ ७५ ॥ विचाराल आपुले हित ॥ तरीच सांडा
गर्वभ्रांत ॥ काय जाणता वेदांत ॥ चतुर्वेदी म्हणवितां ॥ ७६ ॥ गुरूचें वचन ऐकोनी ॥
जाणो आम्ही वेद तिन्ही ॥ भाष्य तर्क व्याकर्णी ॥ सांग संहिता पदि येसा ॥ ७७ ॥ येणे परी
श्रीगुरुसी ॥ बोलती ब्राह्मण पर्येसी ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ अपूर्व पुढें वर्तलें ॥ ७८ ॥
वेद चारी आदिअंतीं ॥ श्रीगुरु ब्राह्मणा निरोपिती ॥ सांगेन ऐका एकचित्ती ॥ म्हणे सर

स्वती गंगाधर ॥ ७९ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत विक्रमसुनी विख्यात ॥ विप्रजयपत्रमाग
त ॥ तें चरित्र वर्णिलें ॥ ८० ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्वि
जप्रशंसानाम पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ अध्याय ॥ २५ ॥
समाप्त ॥ ओवीसंख्या ॥ ८० ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरू म्हणती ब्राम्हणासी ॥ नको भ्रमू युक्तीसी ॥ वेदांत न क
ळे ब्रह्म्यासी ॥ अनंत वेद आसती ॥ १ ॥ वेदव्यासासारिखे मुनी ॥ नारायण अवतरोनी
वेदव्यास स्तव करोनी ॥ व्यास नाम पावला ॥ २ ॥ तेणेहि नाही पूर्ण केले ॥ साधारण
सांगितलें ॥ शिष्य होते चौघे भले ॥ प्रख्यात नामे अवधारा ॥ ३ ॥ शिष्याची ना
मे देखा ॥ सांगेन विस्तारे एका ॥ पैल वैशंपायन निका ॥ तिसरा नामे जयमिनी
४ ॥ चौथा सुमंतु शिष्य ॥ करी म्हणे वेदाभ्यास ॥ त्यासि म्हणे वेदव्यास ॥ अशक्य
तुम्ही शिकतां ॥ ५ ॥ एक वेद शिकतां युक्त ॥ पाहि जे दिन कल्पांत ॥ चारी वेद केवी वा

१ चित ॥ अनंत वेदाची महिमा ॥ ६ ॥ ब्रम्ह कल्प तीनी फिरले ॥ वर्षोवर्षैं वांचले ॥ ब्रम्हच
र्य आचरले ॥ नल्हे पार वेदांसी ॥ ७ ॥ या वेदांचे आद्यंत ॥ सांगेन एक एकचित्त ॥
पूर्वी भारद्वाज विख्यात ॥ ऋषी अभ्यास करितां ॥ ८ ॥ लवलेश आले त्यासी ॥
पुनरपी करीत पासी ॥ ब्रम्हा प्रसन्न झाला परियेसी ॥ काय मागशील म्हणोनी
९ ॥ भारद्वाज म्हणे ब्रह्मयासी ॥ स्वामी मज प्रसन्न होसी ॥ वेद शिकेन आद्यंतेसी
ब्रम्हचर्य आश्रनी ॥ १० ॥ वेदांत मज दावावे ॥ सर्व मातें शिकवावें ॥ ऐसे वरदान द्या १
वें ॥ म्हणोनि चरणी लागला ॥ ११ ॥ ब्रम्हा म्हणे भरद्वाजासी ॥ मिती नाही वेदांसी ॥

सर्व केसा शिको म्हणसी ॥ आम्हासी वेद अगोचर ॥ १२ ॥ तुज दावितों पहा समकाळ ॥ क
रोनि मन निर्मळ ॥ शक्ति झालिया सर्वकाळ ॥ अभ्यास करी भरद्वाजा ॥ १३ ॥ ऐसें म्ह
णोनि ऋषीसी ॥ ब्रम्हा दावी वेदांसी ॥ दिसताती तीन राशी ॥ गिरिरूप होवोनी ॥ १४ ॥
ज्योतिर्मय कोटि सूर्य ॥ पाहातां ऋषीस वाटे भय ॥ वेदराशी गिरिमय ॥ केवी शिकूं
म्हणतसे ॥ १५ ॥ तीन्ही ब्रम्हकल्पावरी ॥ आचरले आश्रमचारी ॥ वेद शिकले ता
वन्मात्रीं ॥ एवढे गिरी केवी शिकों ॥ १६ ॥ म्हणोनि भयभीत झाला ॥ ब्रम्ह्यांचे च
रणी लागला ॥ म्हणे स्वामी अशक्य केवळा ॥ क्षमा करणे म्हणतसे ॥ १७ ॥ या वेदांच्या

अंत॥ आपणपाहावयाअशक्त॥ तूंचि जाण श्रीजगन्नाथ॥ जे देशी ते घेइन॥ १८॥ तु
जशरणांगतदातार॥ माझी वासना थोर॥ वेद शिकावे अपार॥ म्हणोनि आलो तुजपासी
१९॥ वेद देखोनि अमित॥ भय पावले चित्त॥ जे कराल उचित्त॥ तेचि घेऊं परियेसा॥ २०
ऐसें वचन ऐकून॥ ब्रंम्हदेव संतोषून॥ देता झाला मुष्टि तीन॥ अभ्यासावया॥ २१॥
तीन वेदांचे मंत्र झाले॥ वेगळे केले नाळेकाळें॥ ऐसे चारी वेद प्रबळें॥ अभ्यासी भार
द्वाज॥ २२॥ अजनू परते नाही त्यासी॥ केवी शिकावे वेदांसी॥ सांगा तुम्हा परियेसी॥ चा
रीवाच्या चारी वेद॥ २३॥ पूर्ण एक एक वेदांसी॥ शिकतां प्रयत्न मोठा त्यासी॥ सांगेन थो

डेतु म्हासी ॥ ऋक्करावया अभ्यास ॥ २४ ॥ शिष्य म्हणती व्यासासी ॥ एक एक वेद अ
भ्यासी ॥ विस्तारावें आद्यंतेसी ॥ शक्त्यनुसार अभ्यास करूं ॥ २५ ॥ ऐसे विनवितां चौ
घेजण ॥ नमूनि व्यासचरण ॥ कृपा करावी जाण ॥ आम्हालागी व्यासमुनी ॥ २६ ॥ करु
णावचन ऐकोनी ॥ व्यास सांगे संतोषोनी ॥ पहिला शिष्य बोलावीनी ॥ ऋग्वेद निरो
पित ॥ २७ ॥ ऐक पैल शिष्योत्तमा ॥ सांगेन ऋग्वेद महिमा ॥ पठण करीगा धर्मकर्मो
ध्यानपूर्वी करोनी ॥ २८ ॥ पैल शिष्य म्हणे व्यासासी ॥ बरवे विस्तारावे आम्हासी ॥ ध्या
नपूर्वक लक्षणेसी ॥ भेदाभेद निरोपावे ॥ २९ ॥ त्यांत जें अशक्य आम्हासी ॥ तेच्वि शि

कोभक्तीशी॥ तूं कामधेनू आम्हासी॥ कृपा करी गा गुरुमूर्ती॥३०॥ व्यास सांगे पैलशि
ष्यासी॥ ऋग्वेदे ध्यान परियेसी॥ वर्णरूपव्यक्ती कैसी॥ भेदाभेद सांगेन॥३१॥ ऋग्वे
दाचा रूप वेद॥ असे प्रख्यात आयुर्वेद॥ अत्रिगोत्र असे शुद्ध॥ ब्रम्हा देवता जाणा
वी॥३२॥ गायत्री छंदाशी॥ रक्तवर्ण परियेसी॥ नेत्र पद्मपत्रे सदृशी॥ विस्तीर्ण ग्री
वा कंबुकंठ॥३३॥ कुर्चकेशी श्मश्रु प्रमाणा॥ प्रथम द्विरत्नी दीर्घ जाण॥ ऋग्वेद अ
से रूप धारणा॥ मूर्ती ध्यावी येणे परी॥३४॥ आता भेद सांगेन ऐका॥ प्रथम चर्चा श्रा
वणानिका॥ द्वितीय चर्चा श्रवण ऐका॥ पराक्रमी दोनी शाखा॥३५॥ षट्क्रम शाखा दो

नी॥ सातवादंड म्हणोनी॥ भेद सघनिर्गुणी॥ पांचभेद आणीक असती॥ ३६॥ आश्वलायन
शाखा दोनी॥ शाकल बाष्कला दोनी॥ पांचवी मांडुक्य म्हणोनी॥ असे भेद द्वादश
॥ ३७॥ श्रीगुरू म्हणती ब्राह्मणासी॥ ऐसें सांगितलें शिष्यांसी॥ ऐशिया ऋग्वेदासी॥
द्वादश भेद विस्तारे॥ ३८॥ या कलियुगाभीतरी॥ म्हणाविशि वेद चारी॥ कीर्ति मिरवा
लोकांतरीं॥ अध्यापक म्हणोनि॥ ३९॥ तया द्वादश भेदांत॥ एक शाखा असे विख्यात॥
ऋक्‌लक्षण रूप व्यक्त॥ कोण जाणे सांग मज॥ ४०॥ नारायण व्यासमुनी॥ शाखा द्वादश
विस्तारोनी॥ सांगितल्या निरोपोनी॥ पेल शिष्यासी॥ ४१॥ ऋग्वेदाचे भेद ऐसे॥

सांगीतले वेदव्यासें ॥ श्रीगुरु म्हणती हर्षें ॥ मदोन्मन द्विजासी ॥ ४२ ॥ यजुर्वेदविस्तार
॥ सांगेन ऐक अपार ॥ वैशंपायन शिष्य थोर ॥ अभ्यास केला पुरियेसा ॥ ४३ ॥ व्यास
म्हणे शिष्यासी ॥ ऐके एकचित्तेसी ॥ सांगतो यजुर्वेदासी ॥ उपवेद धनुर्वेद ॥
४४ ॥ भारद्वाज गोत्र जाणा ॥ आधिदैवत रुद्र जाणा ॥ त्रिष्टुप् छंदासी तुम्ही म्हणा
आता ध्यान सांगेन ॥ ४५ ॥ कुंचित स्थूळ केशी निर्धारी ॥ कपाल धरिले असे करी
॥ कांचन वर्ण मनोहारी ॥ नेत्र असती पिंगट ॥ ४६ ॥ शरीर ताम्र श्वेत वर्ण ॥ पांचारत्नी
स्थूळ जाण ॥ यजुर्वेदा ऐसें ध्यान ॥ वैशंपायना निर्धारी ॥ ४७ ॥ ऐसीया

यजुर्वेदासी ॥ असती भेद शायशी ॥ म्हणे व्यास शिष्यासी ॥ सांगेन ऐका या विपरी ॥
४८ ॥ प्रथमम्चरका ॥ अव्हेरका ॥ तिसरा नाम कठा ऐका ॥ प्राच्याकठा चतुर्थिका ॥ क
पिछला पांचवी पैं ॥ ४९ ॥ साहावी असे नारायण ॥ वर्तत असे सातवी खुण ॥ श्वेत म्ह
णिजे आठवी जाण ॥ श्वेततर पा नवमी ॥ ५० ॥ मैत्रायणी असे नाम ॥ शाखा असे हो
दशम ॥ तिसी भेद उत्तम ॥ असती सात परियेसा ॥ ५१ ॥ मानवा दुंदुभी दोनी ॥ तिसरे
ऐकेय म्हणोनी ॥ वराह नाम चतुर्थ पणी ॥ भेद असे परियेसा ॥ ५२ ॥ हरिद्रव जाण
पांचवा ॥ शाम म्हणिजे साहावा ॥ सातवा शामायणी जाणावा ॥ दशम शोस्वा परियेसा ।

५३ ॥ वाजसनीय शाखेसी ॥ भेद असती अष्टादशी ॥ नामे सांगेन परियेसी ॥ श्रीगु
रु म्हणती तयासी ॥ ५४ ॥ वाजसनीय नाम एका ॥ द्वितीय नाम्‌जावालिक ॥ वोध्य
नामें तृतीयका ॥ चतुर्थ कण्व परियेसा ॥ ५५ ॥ मध्यंदिन पांचवेसी ॥ शावीय नामष
ष्ठेसी ॥ स्थापायनी सप्तमेसी ॥ कापालाष्टम विख्यात ॥ ५६ ॥ पौंड्रवत्स विख्यात ॥
कोटिक नामे उन्नतू ॥ एकादश भेद विख्यात ॥ परमवादिका परम्‌ प्रीत ॥ ५७ ॥ पा
राशर द्वादशी ॥ वैधेय नामें त्रयोदशी ॥ चतुर्दशा भेद पुससी ॥ वेनतेय म्हणती
तयाते ॥ ५८ ॥ औख्य नाम विशेषी ॥ जाणशाखा पंचदशी ॥ गालव म्हणिजे षोडशी

बैजरानामसप्तदशी ॥ ५९ ॥ वैजनामविशेषी ॥ जाणशाखाअष्टादशी ॥ वाजसनीय
शाखेशी ॥ भेद असतीअष्टादश ॥ ६० ॥ तैत्तिरीयशाखाभेददोनी ॥ व्याससांगे
विस्तारोनी ॥ औख्यखांडीकम्हणोनी ॥ यासीभेद पांचअसती ॥ ६१ ॥ आपस्तं
बीअसेथोर ॥ शाखाअसे मनोहर ॥ यज्ञादिककर्मेआचार ॥ विद्याअसेतयांत
६२ ॥ दुसराजाणावाबुहुधायनी ॥ सत्याशाढीअघनाशनी ॥ हिरण्यकेशी म्ह
णोनी ॥ चौथाभेदपरियेसा ॥ ६३ ॥ औखेयम्हणोनिनाम ॥ भेदउख्यंतपांचवा
अनुक्रमेंपढावा ॥ म्हणेव्यासशिष्यांसी ॥ ६४ ॥ षडंगेंअसतीविशेषा ॥ नामेंतयां

गु० च०
६

अ० २६

चीं सांगेन ऐक ॥ शिक्षा व्याकर्ण कल्प ॥ निरुक्त छंद ज्योतिष ॥ ६६ ॥ यातें उपांगें असती
आणिक ॥ आणि त्यांचीं नावें तूं ऐक ॥ प्रतिपद अनुपद देख ॥ छंद सति सरा परियेसा ॥ ६७
भाषा धर्म पंचम ॥ मीमांसा न्याय सप्तम ॥ कर्म संहिता अष्टम ॥ उपांगें ही जाणावी ॥ ६७ ॥ प
रिशिष्टें अष्टादश ॥ असती एकाविशेष ॥ विस्तार करूनि परियेस ॥ व्यास सांगे शिष्या
सी ॥ ६८ ॥ पूर्वीं होत्या वेद राशी ॥ शिकतां असंख्य मानवांसी ॥ ह्मणोनि लोकोपका
राशी ॥ ऐसा केला विस्तार ॥ ६९ ॥ शाखाभेद येणें परी ॥ विस्तार केला प्रकारीं ॥ जित
के यती उच्चारी ॥ तितुके शिकों ह्मणोनी ॥ ७० ॥ येणें परी विस्तारी ॥ सांगे व्यास परिकरी ॥

६

वैशंपायन अवधारी ॥ विनवीतसे त्याजु वेळीं ॥ ७१ ॥ यजुर्वेद विस्तारेसी ॥ निरो
पिला आम्हासी ॥ शाखाभेद क्रमेशी ॥ वेगळाले करोनी ॥ ७२ ॥ संदेह होता आ
म्हासी ॥ मूळ शाखा कोण कैसी ॥ विस्तारोनि प्रीतिशी ॥ निरोपावें स्वामिया ॥ ७३
व्यास म्हणे शिष्यासी ॥ बरवें पुसिलें आम्हासी ॥ या यजुर्वेदासी ॥ मूळ तुम्हा सांगेन
७४ ॥ मंत्र ब्राम्हण संहिता ॥ मिळोनि पढतां मिश्रिता ॥ तोचि मूळ विख्याता ॥ य
जुर्वेद जाणिजे ॥ ७५ ॥ आणीक असे एक खुण ॥ संहिता मिळोनि ब्राम्हण ॥ तोचि य
जुर्वेद मूळ जाण ॥ वरकड शाखापल्लव ॥ ७६ ॥ यज्ञादिक कर्मक्रियेसी ॥ हें मूळ गा पारि

गु० च०

७

अ०

२६

येसी॥ अभ्यास करी गा निश्चयेसी॥ म्हणे व्यास शिष्याते॥ ७७॥ ऐकोनि यां व्यास वचन
वैशंपायन म्हणे करजोडून॥ यजुर्वेद मूळ विस्तारोन॥ निरोपावे स्वामियां॥ ७८॥ व्या
स म्हणे शिष्यासी॥ सांगेन ऐक विस्तारेसी॥ ग्रंथत्रय असती ज्यासी॥ अभ्यास क
री म्हणतसे॥ ७९॥ सप्त अष्टक संहितेसी॥ एकाएकाचे विस्तारेसी॥ सांगेन तुज
भरंवसी॥ म्हणे व्यास शिष्याते॥ ८०॥ प्रथम मड्ड घेत्वा प्रश्नासी॥ अनुवाक जाण चतु
र्दशी॥ आठ अधिक विसांसी॥ पन्नासा असती॥ ८१॥ आपठं दंतु प्रश्नासी॥ अनु
वाक असती चतुर्दशी॥ चारी अधिक तिसांसी॥ पन्नासा तुम्ही जाणावा॥ ८२॥ दे

७

वस्यत्वाप्रश्नासी ॥ अनुवाक असती एकादशी ॥ एक अधिक तिसांसी ॥ पन्नासा असती
८३ ॥ आददे नावाचा प्रश्न चतुर्थ ॥ षट् चत्वारिंशत् अनुवाक ख्यात ॥ पन्नासा जाणा त
यांत ॥ वेदाधिक पन्नास ॥ ८४ ॥ देवासुरा नामक प्रश्नासी ॥ अनुवाक असती एकादशी
असती एकावन्न पन्नासा ॥ पंचम प्रश्नांत अवधारा ॥ ८५ ॥ संत्वासिंचामिइति प्रश्न ॥ द्वा
दश अनुधाक असती पूर्ण ॥ पन्नासा असती एकावन्न ॥ असती साहावे प्रश्नासी ॥ ८६ ॥ पा
कयज्ञ नामक प्रश्न ॥ त्रयोदश अनुवाकीं सपन्न ॥ पन्नासा असती एकावन्न ॥ सप्तम प्र
श्नविस्तार ॥ ८७ ॥ अनुमत्य इति प्रश्नासी ॥ अनुवाक जाण द्वाविशती ॥ द्विचत्वारिशत प

न्नासा असती ॥ प्रथम अष्टकयणे परी ॥ ८८ ॥ प्रथम अष्टकी परि येसी ॥ संख्या सांगेन
संहितेसी ॥ अनुवाक असती ख्यातीसी ॥ एकचित्तें परि येसा ॥ ८९ ॥ एकशत आणि चत्वा
री शतवरी ॥ अधिक त्यावरी तीन निर्धारी ॥ अनुवाक असती परिकरी ॥ अंतःकरणी धरावे
९० ॥ पन्नासा असती त्यांसी ॥ त्रिंशता अधिक वेचाळिसी ॥ प्रथम अष्टकी परि येसी ॥ म्ह
णोनि सांगे व्याससमुनी ॥ ९१ ॥ द्वितीय अष्टकाचा विस्तार ॥ सांगेन तो परिकर ॥ प्रथम प्र
श्नाचे नाम थोर ॥ वायव्य असे म्हणावे ॥ ९२ ॥ प्रथम प्रश्नांत विशेष ॥ अनुवाक जाण एका
दश ॥ पंचषष्ठी असती पन्नास ॥ एकचित्तें परि येसा ॥ ९३ ॥ पुढें असे द्वितीय प्रश्ना ॥ ना

म असे प्रजापती गहन ॥ द्वादश अनुवाक असती जाण ॥ एक सप्तती पन्नासा ॥ १४ ॥ आदि
त्यनामक प्रश्नास ॥ अनुवाक जाण चतुर्दशा ॥ षट् अधिक पंचाशत ॥ पन्नासा तुम्ही पढा
आ ॥ १५ ॥ पुढील प्रश्न देवा मनुष्या ॥ अनुवाकां जाण चतुर्दशा ॥ अष्ट अधिक चत्वारिंश
ता ॥ पन्नासा तुवां जाणिजे ॥ १६ ॥ म्हणतां जाय महापाप ॥ प्रश्न असे विश्वरूप ॥ द्वादश अ
नुवाक स्वरूप ॥ चारी अधिक सप्तती पन्नासा ॥ १७ ॥ समिधनाम प्रश्नास ॥ निरूने अनु
वाक द्वादश ॥ सप्तति पन्नासा ॥ असती त्यास ॥ एकैं चित्ते परियेसा ॥ १८ ॥ ऐसे द्वितीय अ
ष्टकासी ॥ षष्ठ प्रश्न परियेसी ॥ पांच अधिक सप्ततिसी ॥ अनुवाक तुम्ही जाणावे ॥ १९ ॥

पन्नासांचीगणना ॥ सांगेनतुज विस्तारेंन ॥ तीनशतांवरी अशीति जाण ॥ अष्ट
अधिक परियेसा ॥ १०० ॥ तिसरा अष्टक सविस्तार ॥ सांगेन तुम्हा परिकर ॥ वैशंपाय
न शिष्य थोर ॥ गुरुमुखे ऐकतसे ॥ १ ॥ तिसऱ्या अष्टकाचा प्रथम प्रश्न ॥ नाम प्रजा
पतीरकाम ॥ अनुवाकत्या एकादशोत्तम ॥ द्विचत्वारिंशत् पन्नासा त्यासी ॥ २ ॥ दुस
रे प्रश्नास असे जाण ॥ नाम यो वै पवमान ॥ एकादश अनुवाक जाण ॥ षट्चत्वारिं
शत् पन्नासा त्यासी ॥ ३ ॥ तृतीय प्रश्ना बरवियासी ॥ नाम असे अग्ने तेजस्वी ॥ अ
नुवाकांची एकादशी ॥ षट्त्रिंशत् पन्नासा त्यासी ॥ ४ ॥ चौथा प्रश्न विवासांत ॥ ए

९

कादशा अनुवाक ख्यात ॥ षट्चत्वारिंशत् पन्नासा त्यांत ॥ एकचित्तें पतियेसा ॥ ५ ॥ पु
ढें असे प्रश्न पंचम ॥ म्हणावे नाम पूर्ण प्रथम ॥ अनुवाक अकरा उत्तम ॥ षट्त्रिं
शत् पन्नासा त्यांसी ॥ ६ ॥ ऐसे तृतीयाष्टकासी ॥ अनुवाक पंचपंचाशत् त्यासी ॥
द्विशत साहा अधिक त्यासी ॥ पन्नासा असती अवधारा ॥ ७ ॥ चौथ्या अष्टकाचा
प्रथम प्रश्न ॥ नामे असे युंजान ॥ एकादश अनुवाक खूण ॥ षट् चत्वारिशत पन्ना
सा ॥ ८ ॥ प्रश्नास संज्ञा विष्णोः क्रम ऐसी ॥ एकादश अनुवाक परियेसी ॥ अष्ट
अधिक चत्वारिशतीशी ॥ पन्नासा त्यांत विस्तारा ॥ ९ ॥ तिसरे प्रश्ना उत्तम ॥ जाणा

तुम्ही आपांत्वा नाम ॥ त्रयोदश अनुवाक उत्तम ॥ षट्त्रिंशत् पन्नासा त्यासी ॥ १० ॥
चौथा प्रश्न रश्मिरसी ॥ अनुवाक असती द्वादशी ॥ सप्ताधिक त्रिंशत् त्यासी ॥ पन्ना
सा असती तुम्ही जाणा ॥ ११ ॥ नमस्ते रुद्र उत्तम ॥ प्रश्न हा जाण पंचम ॥ एकादश अ
नुवाक जाणा ॥ सप्ताधिक वीस पन्नासा ॥ १२ ॥ अश्मनूर्जं प्रश्नास ॥ नव अनुवाक प
रियेसा ॥ षट्चत्वारिंशत् पन्नासा त्यास ॥ एकचित्ते परियेसा ॥ १३ ॥ प्रश्न अग्नावि
ष्णूसी ॥ अनुवाकांची जाणा पंचदशी ॥ एकन्यून चाळिसांसी ॥ पन्नासा त्यासी
विस्तारे ॥ १४ ॥ ऐसे चतुर्थ अष्टकासी ॥ सप्त प्रश्न परियेसी ॥ अनुवाक असती व्या

यशी ॥ द्विशतावर एकुण्याअशीति पन्नासा ॥ १५ ॥ पंचमाष्टका प्रथम प्रश्न ॥ ना
मे सावित्राणि जाण ॥ पन्नासा षष्टी एकाउण ॥ एकादश अनुवाक ख्याती ॥ १६
विष्णुमुखा प्रश्नासी ॥ अनुवाक असती द्वादशी ॥ चतुःषष्टी पन्नासा त्यासी ॥
श्रीगुरु म्हणती द्विजाते ॥ १७ ॥ तिसरा प्रश्न उत्सन्नयज्ञा ॥ अनुवाक द्वादश धरा
खुण ॥ पन्नासांसी द्वयन्यून ॥ पन्नासा अती परियेसी ॥ १८ ॥ चौथा प्रश्न देवासुरा
अनुवाक असती बारा ॥ षष्टी तदोन उण्याकरा ॥ पन्नासा असती परियेसा ॥ १९ ॥
येदेके नामे प्रश्न ॥ चतुर्विंशति अनुवाक खुण ॥ दोन अधिक षष्टि जाण ॥ पन्नासा

११ असतीपरियेसा॥२०॥हिरण्यवर्णाषष्ठप्रश्न॥त्रयोविशतिअनुवाकजाण॥षष्ठिम
ध्येंसाहान्यून॥पन्नासाअसतीपरियेसा॥२१॥योवाअययानामेप्रश्न॥षड्विंशा
तिअनुवाकजाण॥षष्ठिमध्येद्वयन्यून॥पन्नासाअसतीपरियेसा॥२२॥पंचमाष्ट
कसंहितेसी॥सप्तप्रश्नपरियेसी॥अनुवाकएकशतत्यासी॥वीसअधिकविस्तारे
२३॥त्रीणीअधिकचतुःशत॥पन्नासाअसतीजाणविख्यात॥मनकरूनिसावचित्त
एकाम्हणतीतयेवेळी॥२४॥षष्ठमाष्टकसंहितेसी॥प्रथमप्रश्नपरियेसी॥प्राचीनवं ११
शनामत्यासी॥एकादशअनुवाकजाणा॥२५॥अधिकसाहासप्ततीसी॥पन्नासासा

सिपरियेसी॥ विस्तार करू निशि ब्यासी॥ सांगतसे व्यासदेव॥ २६॥ यदुभोनाम प्रश्ना
सी॥ अनुवाक जाणा एकादशी॥ एक ऊणी षष्ठीसी॥ पन्नासा असती परियेसा॥ २७॥
तिसरा प्रश्न चाल्वाल॥ एकादश अनुवाकी माळ॥ पन्नासा षष्ठीवरी द्वय स्थूळा॥ तिस
रा प्रश्न परियेसी॥ २८॥ चवथा प्रश्न यज्ञेन॥ एकादश अनुवाक जाण॥ पन्नासा ए
क अधिक पंचाशत पूर्ण॥ एक चित्तें परियेसा॥ २९॥ इंद्रो वृत्र नाम प्रश्न॥ एकादश
अनुवाक जाण॥ द्विचत्वारिंशतू पन्नासा खूण॥ पंचम प्रश्नी परियेसा॥ ३०॥ स्रुव
र्गयनाम प्रश्नासी॥ अनुवाक असती एकादशी॥ त्रीणि अधिक चत्वारिंशती॥ पन्नासा

असतीपरियेसा ॥ ३१ ॥ साहावेअष्टकीं परिपूर्ण ॥ त्यासी साहा अधिक असती पूर्ण ॥ ष
ष्ठीअनुवाकअसतीजाण ॥ त्रयस्त्रिंशत् अधिक त्रिशत पन्नासा ॥ ३२ ॥ सप्तमाष्टका
चा प्रथम प्रश्न ॥ नामे असे प्रजनन ॥ अनुवाक वीस असती खुण ॥ द्विपंचाशत् पन्ना
सा त्यास ॥ ३३ ॥ साध्या म्हणती जो द्वितीय प्रश्न ॥ विशाति अनुवाक असती जाण ॥ प
न्नासा पन्नास परिपूर्ण ॥ एकत्रिंतें परियेसा ॥ ३४ ॥ प्रजंववाना मप्रश्नासी ॥ अनुवाक
वीस परियेसी ॥ द्विचत्वारिशत पन्नासा त्यासी ॥ श्रीगुरु म्हणती द्विजांसी ॥ ३५ ॥ बृह
स्पतिनामक प्रश्न ॥ द्वाविंशति अनुवाक जाण ॥ त्रीणि अधिक पन्नासा खूण ॥ पन्नासा

असतीअवधारा ॥ ३६ ॥ प्रश्नअसे पांचवाजाण ॥ गावोवानामेउत्तम ॥ पंचविशाति अनुवा
कपूर्ण ॥ चतुःपंचाशतपंन्नासात्यासी ॥ ३७ ॥ सप्तमाष्टकसंहितेसी ॥ अनुवाकअसतीप
तियेसी ॥ एकशतसत्यासी ॥ अनुवाकअसतीविस्तार ॥ ३८ ॥ द्विशतावरीअधिकेसी
एकावन्नअसतीपनाशी ॥ सप्तमाष्टकअसेसुरसी ॥ एकचित्तेपरियेसा ॥ ३९ ॥ सप्तमा
ष्टकसंहितेसी ॥ षट्शताधिकअष्टचत्वारिंशानीसी ॥ मुख्यप्रश्नचतुःश्चत्वारिंवसीं
अनुवाकेअसतीविस्तारे ॥ ४० ॥ द्विउणेशतद्वयसहस्रदोनी ॥ पन्नासातूंजाणमनी
पठणकराम्हणोनी ॥ व्याससांगेशिष्यासी ॥ ४१ ॥ तीनअष्टकब्राम्हणांत ॥ असतीजे

जाण विख्यात ॥ सांगेन ऐक एकचित्तें ॥ म्हणे व्यास शिष्यांसी ॥ ४२ ॥ प्रथमाष्टकांत
ब्राम्हणासी ॥ प्रश्न आठ परियेसी ॥ नामें त्यांची एकाऐसीं ॥ एकचित्ते परियेसा ॥ ४३ ॥
प्रथम प्रश्न ब्रम्हसंधत ॥ नाम असे विख्यात ॥ अनुवाक दाहा विस्तृत ॥ अशीतिदश
कदश मनोहर ॥ ४४ ॥ उद्धन्यमान दुसरा प्रश्न ॥ साहा अनुवाक दशक पन्नास जाण
वाजपेय अनुसंधान ॥ देवासुरा प्रश्न तिसरा ॥ ४५ ॥ त्यासी दश अनुवाक जाण ॥ पां
चे अधिक षष्ठि दशक जाण ॥ चौथा उभयेनाम प्रश्न ॥ दश अनुवाक मनोहर ॥ ४६ ॥
संवत्सर गणित साहा अधिकां ॥ त्यासी जाणा तुम्ही दशकां ॥ पांचवा नामे अग्नेः कृति

का॥ प्रश्न असे अवधारा॥ त्यासी अनुवाक द्वादश॥ सांगेन ऐकादशका॥ दोन अधि
क षष्ठि विशेष॥ एकचित्ते परियेसा॥ ४८॥ साहावा प्रश्न अनुपत्य॥ अनुवाक दाहा
प्रख्यात॥ पांच अधिक सप्ततिका॥ दशक त्यासी अवधारा॥ ४९॥ सप्तम प्रश्नाधेरा
खुण॥ नाम त्या एतद्वा ब्राम्हण॥ दश अनुवाक आहेति जाण॥ चतुःषष्ठी दशक
त्यासी॥ ५०॥ अठवा वरुणास्य नाम प्रश्न॥ अनुवाक त्यासी दाहा जाण॥ सप्ताधिक
तीसखुण॥ दशक त्यासी मनोहर॥ ५१॥ प्रथम अष्टक ब्रम्हणासी॥ प्रश्न आठ प
रियेसा॥ अष्ट सप्तति अनुवाक त्यासी॥ एका त्यासी॥ एकचित्ते परियेसा॥ ५२॥ ए

गु. च०
१४

कठणे पाचशात ॥ दशक आहेति विख्यान ॥ वैशंपायन ऐकत ॥ गुरूमुखे करोनी ॥ ५३ ॥
दुसरा अष्टक ब्राम्हणास ॥ प्रथम प्रश्न अंगिरस ॥ अनुवाक जाण एकादश ॥ साठी द-
शक मनोहर ॥ ५४ ॥ प्रजापतीर कांड ॥ प्रश्न दुसरा हा गोड ॥ एकादश अनुवाक दृढ
त्रिसप्तति दशक त्यासी ॥ ५५ ॥ कांड ब्रम्हवादिन ॥ एकादश अनुवाक जाण ॥ दशक
आहेति त्यापन्नास पूर्ण ॥ एकचित्ते परियेसा ॥ ५६ ॥ जुष्टो नाम प्रश्न एक ॥ त्यासी अनु-
वाके अष्टदशक ॥ वैशंपायन निष्टंक ॥ गुरुमुखे ऐकतसे ॥ ५७ ॥ प्रश्न प्राणो रक्षतु
अष्ट अनुवाक त्यासी ख्याती ॥ पंच अधिक चत्वारिशती ॥ दशक तुम्ही ओळखिजे ॥

अ०
२६

१४
५८

स्वाद्धीचा नामे षष्ठम ॥ प्रश्न असे उत्तम ॥ अनुवाक असती वीस खुण ॥ षट् अधिक अशी
ति दशकत्यासी ॥ पंचम सप्तम प्रश्न त्रिरतास ॥ अनुवाक असती अष्टादश ॥ साहा अधिक
षष्ठीस ॥ दशकत्यासी मनोहर ॥ ६० ॥ अष्टम प्रश्न पीवोना ॥ अनुवाक नउ असती जाण
अशीतीसी एकउणा ॥ दशकत्यासी मनोहर ॥ ६१ ॥ द्वितीय अष्टक ब्राम्हणासी ॥ आठ
प्रश्न परियेसी ॥ वेद उणे शतकुत्यासी ॥ अनुवाक असती मनोहर ॥ ६२ ॥ चार शतं उ
परी ॥ तीन उणे सप्तति निर्धारी ॥ दशक आहुति विस्तारी ॥ एकचित्ते परियेसा ॥ ६३ ॥
तृतीयाष्टक ब्राम्हणासी ॥ प्रश्न असती द्वादशी ॥ नामे त्याची परियेसी ॥ एकचित्ते अवधो

रा॥ ६४॥ प्रथम प्रश्ना विख्यात॥ नाम अग्निर्नः पातु॥ साहा अनुवाक विख्यात॥ ए
क अधिक षष्ठि दशक॥ ६५॥ तृतीयस्या द्वितीय प्रश्न॥ अनुवाक असती दाहा
जाण॥ पंचाशीतिक दशक खुण॥ एकचित्ते परियेसा॥ ६६॥ तिसरा प्रश्न प्रत्युष्ट
अनुवाक असती एकादश॥ एक उणे ऐशी दशक॥ एकचित्ते अवधारा॥ ६७
चौथा प्रश्न ब्रह्म पोसी॥ अनुवाक एक परियेसीं॥ एक उणे विसांशी॥ दशक त्यासी
मनोहर॥ ६८॥ पंचम प्रश्ना नाम सत्य॥ चतुर्दश अनुवाक विख्यात॥ एक उणेती
स दशक॥ एकचित्ते परियेसा॥ ६९॥ साहावा प्रश्न अजंती॥ पंचदश अनुवाक ख्या

ती ॥ सात आधिक त्रिंशती ॥ दशक त्यासी जाणावे ॥ ७० ॥ अछिद्र सर्वान्वा नाम प्रश्न
चतुर्दश अनुवाक जाण ॥ तीस अधिक शत खुण ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ७१ ॥ प्र
श्न अश्वमेधासी ॥ सांप्रहण्य रम्या तीसी ॥ अनुवाक असती त्रयोशा विंति ॥ एक्यं
पाव दशक ॥ ७२ ॥ प्रजापतीर काम ॥ अश्वमेध उत्तम ॥ त्रयोविंशती अनुवाक ने
म ॥ चारी अधिक अशीति दशक त्यासी ॥ ७३ ॥ संज्ञान म्हणती जे काटक ॥ अ
नुवाक दार्हशी एक अधिक ॥ एकाउणे पन्[illegible]स दशक ॥ एक चित्तें परिये सा ॥ ७४
दुसरा लोको सि काटक ॥ दश अनुवाक अस[illegible]ी एक ॥ दोनी आधिक षष्टि दशकं ॥

मास म्हणे त्रिष्यांसी ।। ७५ ।। द्वादश प्रश्न तु भ्यासी ।। अनुवाक नव परियेसी ।। साहा अधि
कपन्नासासी ।। दशक त्यासी मनोहर ।। ७६ ।। तिसरे अष्टक ब्राम्हणासी ।। सप्तचत्वारिंशत
एक शत अनुवाकांसी ।। सात शत छ्यशीति दशकांसी ।। विस्तार असे परियेसा ।। ७७ ।।
त्रीणि अष्टक ब्राम्हणाशी ।। प्रश्न सांगेन परियेसी ।। अष्ट अधिक विसासी ।। एकचित्तें
अवधारा ।। ७८ ।। त्रीणि शत विसांसी ।। एक अधिक परियेसी ।। अनुवाक आहेति विस्ता
रेंसी ।। परत ब्राम्हणासी परियेसा ।। ७९ ।। दशक संख्या विस्तार ।। शप्तशत अधिक सहस्र
अष्टचत्वारिंशती उत्तर ।। अधिक असती परियेसा ।। ८० ।। आतां सांगेन अरण ।। त्यासी अ

सतीदाहा प्रश्न ॥ विस्तारोनि यांसांगेन ॥ एक चित्तें अवधारा ॥ ८१ ॥ अरणाचा भद्रनाम प्र
थम प्रश्न ॥ द्वात्रिंशत अनुवाक असे खुण ॥ एक शत कतीस जाण ॥ दशाकत्यासी मनोहर
८२ ॥ स्वाध्याय ब्राम्हणासी ॥ अनुबाक वीस परियेसी ॥ चतुर्विंशती दशाकत्यासी ॥ एके
चित्तें परियेसा ॥ ८३ ॥ चित्ती म्हणिजे प्रश्नासी ॥ अनुवाक जाणा एकविंशतीसी ॥ दोन अ
धिक पन्नासांसी ॥ दशाकत्यासी विस्तार ॥ ८४ ॥ ऐसा थोर चवथा प्रश्न ॥ नाम तयामंत्र ब्रा
म्हण ॥ द्विचत्वारिंशत् अनुवाक जाण ॥ द्विषष्टी दशाकत्यासी ॥ ८५ ॥ श्रेष्ट ब्राम्हण प्रश्नासी
अनुवाक जाणा द्वादशी ॥ आठ अधिक शताशी ॥ दशाक तुम्ही जाणावे ॥ ८६ ॥ पितृमेध असे

प्रश्न ॥ द्वादश अनुवाक परिपूर्ण ॥ सप्तविंशती दशक जाण ॥ एकचित्ते परियेसा ॥ ८७ ॥
शिक्षा नाम प्रश्नासी ॥ अनुवाक असती द्वादशी ॥ तिनि अधिक विसांसी ॥ दशक त्यासी म
नोहर ॥ ८८ ॥ ब्रम्हविद्या असे प्रश्न ॥ अनुवाक त्यासी नव जाण ॥ दशक चतुर्दश असे खुण
व्यास म्हणे शिष्यांसी ॥ ८९ ॥ भृगवै असे प्रश्न ॥ अनुवाक त्यासी दाहा जाण ॥ पंचदश दश
क जाण ॥ एकचित्तें परियेसा ॥ ९० ॥ दशम प्रश्न नारायण ॥ अनुवाक तीस असती खुण
एकशत वेद जाण ॥ दशक त्यासी परियेसा ॥ ९१ ॥ दाहा प्रश्न अरणासी ॥ अनुवाक जा
ण परियेसी ॥ दोनी पूर्ण द्विशतासी ॥ संख्या असे परियेसा ॥ ९२ ॥ पंचशतां उपरी ॥ नव पं

चाशतविस्तारी ॥ दशक जाण मनोहरी ॥ म्हणे व्यास शिष्यांतें ॥ १३ ॥

ऐसे ग्रंथत्रयासी ॥ प्रश्न असती व्यायशी ॥ नवषष्टि अधिक एकशतसहस्रासी ॥ अनुवाक जाण मनोहर ॥ १४ ॥

पन्नाशी दशकविस्तार ॥ सांगेन तुम्हा मकर ॥ द्वयशत दोनी सहस्र ॥ द्वयऊणे पन्नास जाण ॥ १५ ॥

द्वयसहस्र त्रयशत ॥ सप्त अधिक उन्नत ॥ दशकीं जाण विख्यात ॥ ग्रंथत्रय परिपूर्ण ॥ १६ ॥

ऐसी या यजुर्वेदासी ॥ भेद असती शायसी ॥ त्यात एक भेदासी ॥ एवढा असे विस्तार ॥ १७ ॥

येणे परी व्यासमुनी ॥ वैशंपायना विस्तारोनि ॥ सांगता झाला म्हणोनी ॥ श्रीगुरु म्हणती द्विजासी ॥ १८ ॥

तिसरा शिष्य जयमिनी ॥ त्यास सांगे व्यासमुनी ॥

१८ सामवेदविस्तारोनी॥ निरोपितोंअवधारा॥ १९॥ उपवेद गांधर्वअत्र॥ कश्यपाचें
असे गोत्र॥ विष्णुदेवता परमपवित्र॥ जगतीछंद म्हणावा॥ २०॥ नित्यस्त्रगवीछंद
जाणा॥ शुचिवस्त्र प्रावर्णा॥ क्षोमिदंती चर्मधारण॥ दंडधारी असे रूप॥ १॥ आ
कर्णनयन वर्ण कांचन॥ सूर्यासारिखे किरण॥ षट अरत्नी दीर्घ जाण॥ सामवेद
रूप असे॥ २॥ याच्याभेदां नाहीमिती॥ अखिल सहस्त्र बोलती॥ ऐसी कोणा असे
शक्ती॥ सकळांशी शिसूं म्हणावया॥ ३॥ एका नारायणावांचोनी॥ समस्त भेद नेणे १८
कोणी॥ एक शिष्या जेमिनी॥ सांगेन तुज किंचित॥ ४॥ प्रथमआस्कसयपीया॥

दुसरे वास्करायणीया ॥ वार्तातेयाव्हा म्हणोनियां ॥ तिसरा भेद परियेसा ॥ ५ ॥ प्रांजली
असे भेद एक ॥ ऋग्विधा प्रांतरेय ऐका ॥ आणि प्राचीन योग्यशाखा ॥ असे साहावा
परियेसा ॥ ६ ॥ ज्ञानयोग्य सप्तम ॥ आरायणीया असे ज्या नाम ॥ यासि भेद दश जाण
आहेत ऐका एकचित्तें ॥ आराणायणीय सांख्मायनीय ॥ तिसरा शाठ्या म्हणोनी ॥ मुद्ग
ल नामक जाणोनी ॥ चौथा भेद परियेसा ॥ ८ ॥ खल्वला महाखल्वला ॥ सप्तम नामे
लांगला ॥ अष्ट भेद कोमुथा ॥ गोतमा म्हणे परियेसा ॥ ९ ॥ दशम शाखा जैमिनी ॥ ऐसे
भेद विस्तारोनी ॥ सांगितले व्यासमुनी ॥ श्रीगुरू म्हणती द्विजासी ॥ १० ॥ पूर्ण साम

वेदासी ॥ कोण जाणे क्षितीसी ॥ तीन वेदीत्स पविसी ॥ मदोन्मत्त होवोनिया ॥ ११ ॥ सूत म्ह
णो शिष्यांसी ॥ सांगे व्यास अतिहर्षी ॥ अथर्वणवेदासी ॥ निरोपिल्ने परियेसा ॥ १२ ॥
अथर्वणवेदासी ॥ उपवेद असे परियेसी ॥ मंत्रशास्त्र निश्चयेसी ॥ वैजान असे गो
त्र ॥ १३ ॥ अधिदैवत इंद्र त्यासी ॥ अनुष्टुप छंदेसी ॥ तीक्ष्ण चंड क्रूरेसी ॥ कृष्णावर्ण
असे जाण ॥ १४ ॥ कामरूपी क्षुद्रकर्म ॥ सदार असे त्यासी नाम ॥ विश्वसृजक साध्य
कर्म ॥ गलमूर्धी मालवर ॥ १५ ॥ ऐसे रूप तयासी ॥ भेद नव परियेसी ॥ सुमंतु नामा शि
ष्यासी ॥ सांगत असे श्रीव्यास ॥ १६ ॥ पेपल्लभेद प्रथम ॥ दुसरा भेद दत्त नाम ॥ प्रदांत भेद

सूक्ष्म ॥ चौथा स्तोता जाण ॥ १७ ॥ औतानाम असे ऐका । ब्रसदबलद शाखा ॥ सातवी
शाखा ऐका ॥ सौनकी म्हणती ॥ १८ ॥ अष्टम शौनक देवक शाखेसी ॥ चरणविद्यान
वमेसी ॥ पांचकल्प परियेसी ॥ सांगेन ऐका एकचित्ते ॥ १९ ॥ ऐसे चौघा शिष्यांस ॥ सांग
त असे देवव्यास ॥ प्रकाश केला क्षितीस ॥ भरत खंडी परियेसा ॥ २० ॥ या भरत खंडांतु
पूर्वी होते पुण्य बहुत ॥ वर्णाश्रमधर्म आचरचत ॥ होते लोक परियेसा ॥ २१ ॥ या कलि
युगाभीतरी ॥ कर्म सांडिलें द्विजवरी ॥ लोपले वेद निर्धारी ॥ गुप्त झाला क्षितीसी ॥ २२ ॥
कर्मभ्रिष्ट झाले द्विज ॥ म्लिंछांसागती वेदबीज ॥ सत्व गेले संहज ॥ मंदमती झाले जाण ।

पूर्वीहोते महत्व ॥ ब्राम्हणासीदेवत्व ॥ वेदबळे नित्यत्व ॥ भूसुर म्हणतीत्याकाजा ॥ २४
पूर्वीराजेयाचिकारणी ॥ पूजाकरितीविप्रचरणीं ॥ सर्वदेतोदक्षिणादानी ॥ तेअंगिका
रकरितीना ॥ २५ ॥ वेदबळे विप्रासी ॥ त्रिमूर्तिहोतेवशत्यांसी ॥ इंद्रादिसुरवरांसी ॥ भ
यहोतेविप्राचें ॥ २६ ॥ कामधेनुकल्पतरु ॥ विप्रवाक्येहोयथोरु ॥ पर्वतकरितीतृणा
कारु ॥ तृणापर्वतपरत्वे ॥ २७ ॥ विष्णुआपणपरियेसी ॥ पूजाकरीविप्रासी ॥ आपुले
देवतम्हणेत्यासी ॥ वेदसत्वेकरोनियां ॥ २८ ॥ श्लोक ॥ देवाधीनेजगत्सर्व ॥ मंत्राधी
नेंचदैवतम् ॥ तेमंत्रा ब्राम्हणाधीना ॥ ब्राम्हणोममदैवतम् ॥ २९ ॥ ऐसेमहत्वद्वि

जासी ॥ पूर्वी होते परियेसी ॥ वेदमार्ग त्यजोन स्फुरसी ॥ अज्ञान मार्गें राहाटती ॥ ३० ॥ हीन
याती ॥ पुढें ऐका ॥ वेद म्हणती मूर्ख दिखा ॥ त्यांचा पाहून येमुखा ॥ ब्रह्मराक्षस होतो ती ॥
३१ ॥ तेणे सत्व भंगले ॥ हीन याती तेशें विलें ॥ अर्थी पिविक्रिय करिती मोलें ॥ वेदभ्र
ष्ट करिताती ॥ ३२ ॥ ऐशा चारी वेदांसी ॥ शाखा असती परियेसी ॥ कोणे जाणावे क्षिती
सी ॥ सकळ गोप्य होवोनि गेलें ॥ ३३ ॥ चतुर्वेदी म्हणविसी ॥ लोकांसवें चर्चा करि ॥
सी ॥ काय जाणसी वेदांसी ॥ अखिल वेद आहेत जाण ॥ ३४ ॥ ऐशा मध्ये काय लाभ
घेऊं न ये द्विजक्षोभा ॥ कोणी केला तुते वाध ॥ जाई म्हणती येथूनी ॥ ३५ ॥ आपुली अ

गु० च०

अ०

२१ पणस्कती करिसी ॥ जयपत्रे दाखविसी ॥ त्रिविक्रमयती पासी ॥ पत्र मागसी लिहूनी २६
३६ ॥ आमुचे बोल ऐकोनी ॥ जावें तुवां परतोनी ॥ वायां गर्वें श्रमोनी ॥ प्राण आपे
लादेऊं नको ॥ ३७ ॥ ऐसे श्रीगुरु विप्रासी सांगती बुद्धी हितासी ॥ न ऐके विप्र तामसी
म्हणे चर्चा करीन ॥ ३८ ॥ चर्चा जरी न करी येथे ॥ हारी दिसेल आम्हांते ॥ सांगती लोक
राजयाते ॥ महत्त्व आमुचे उरे केवी ॥ ३९ ॥ सिद्ध म्हणे नामांकिता ॥ ऐसे विप्र मदोन्मतो
ने पाती आपुले हिता ॥ त्यासी मृत्यु जवळी आला ॥ ४० ॥ गंगाधराचा नंदनु ॥ सांगे गु २१
रुचरित्र कामधेनु ॥ वेदविवरण ऐकता साधनु ॥ होय समान श्रोतेजना ॥ ४१ ॥ इति

श्रीगुरुचरित्रामृत ॥ चारी वेदांचा मथितार्थ ॥ ऊकलो निद्रा विलाय यथार्थ
म्हणे सरस्वती गंगाधर ॥ ४२ ॥ इति श्रीन्रसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धना
मधारकसंवादे वेदविवरणं भेदाभेदनिरूपणं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६
श्रीगुरुदत्तात्रेयार्पमस्तु ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

रा०-च०

२२

अ०

२६

२२

श्रीगणेशायनमः॥ नामधारकशिष्यंराणा॥ लागेसिद्धाचियाचरणा॥ विनवीतसेंव
चंना॥ ऐकाश्रोते एकचित्ते॥१॥ जयजयाजीसिद्धयोगी॥ तूंतारूक आम्हाजगी
ज्ञानप्रकाशकरणेलागी॥ दिलेदर्शनचरणाचे॥२॥ चतुर्वेदविस्तारेसीं॥ श्रीगुरूनि
रोपितीविप्रांसीं॥ पुढेकथावर्तलीकैसी॥ विस्तारावेदातारा॥३॥ शिष्यवचनऐको
नि॥ सांगताझालाविप्रमुनी॥ ऐकशिष्यानामकरणी॥ अनुपम्यगुणमहिमा॥४॥ कि
तीप्रकारेविप्रांसी॥ श्रीगुरुसांगेहिताशी॥ नऐकतीद्विजतामसी॥ म्हणतीवादकां
पत्रंदेणें॥५॥ ऐसेउत्तरऐकोनिकानी॥ कोपकरितीश्रीगुरुमुनी॥ ज्याचेजैसेअंतःकरणी

१

तैसे सिद्धि पाववूं म्हणती ॥ ६ ॥ सर्पाचे पेटाऱ्यासी ॥ कोरूं जातां मूषकासी ॥ जैसा पतंग दीपासी
करी आपुला घात ॥ ७ ॥ तैसे विप्र मंदमती ॥ श्रीगुरुमूर्ति नोळखती ॥ वळे आपुले प्राण देती
दिवांधव तूं द्विज देखा ॥ ८ ॥ इतुकें वर्ततां तेअवसरीं ॥ श्रीगुरू देखती नराशी दूरी ॥ शिष्यां
सी म्हणती पाचारीं ॥ कवण जातो मार्गस्थ ॥ ९ ॥ श्रीगुरुवचन ऐकोनी ॥ गेले सेवक धां
वोनी ॥ त्या नराते पाचारोनी ॥ आणिला गुरूसन्मुख ॥ १० ॥ गुरू पुसती त्यासी ॥ जन्म कवण जा
तिसी ॥ तोदत्नां त सांग मजसीं ॥ म्हणे तो निपुसतीत येवेळी ॥ ११ ॥ श्रीगुरुवचन ऐकोन ॥ सांगे १
आपण जातिहीन ॥ मातंगवर्ण जोण ॥ सांगे स्थान बहिर्ग्रामीं ॥ १२ ॥ तूं कृपाळू गुरुमूर्ती ॥ म्ह

णोनि पाचारिले त्रीती ॥ आपण झालों उद्धार गती ॥ म्हणोनि दंडवत नमन करी ॥ १३ ॥
ऐसे कृपाळू परम पुरुष ॥ दृष्टीने केले सुधारस ॥ लोखंडासी लॉ परिस ॥ सुवर्ण हो वी
तों काय वेळ ॥ १४ ॥ तैसे तया पतितावरी ॥ कृपा करिशी नरहरी ॥ दंड देवोनि शिष्यां
करी ॥ रेखा सप्त काढिल्या ॥ १५ ॥ श्रीगुरू म्हणती त्यासी ॥ एक रेखा लघिरे ऐसी ॥
आला नर वाक्यासरसी ॥ झालें ज्ञान अधिक त्यासी ॥ १६ ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥
कवणे कुसी जन्मलासी ॥ पतित म्हणे किरात वंशी ॥ नाम आपुले वचन सखा ॥ १७
दुसरी रेखा लंघितां ॥ त्यासि ज्ञान झाले तत्वतां ॥ बोलूं लागला अनेक वार्ता ॥ विस्म

यकरितीतयेवेळी ॥ १८ ॥ तिसरीरेषालंघितां म्हणती ॥ त्यासिझालीज्ञातिस्मृती
म्हणेगंगापुत्रनिश्चिती ॥ वासतटीगगेचा ॥ १९ ॥ लंघितांरेषाचवथी ॥ म्हणेआप
णशूद्रजाती ॥ जातहोतोआपलेवृत्ती ॥ स्वामीमातेतारिले ॥ २० ॥ लंघितांरे
षापांचवेसी ॥ झालेज्ञानतयासी ॥ जन्मझालावैश्यवंशी ॥ नामआपुलेसोम
दत्त ॥ २१ ॥ सावीरेषालंघितां ॥ म्हणेआपणक्षत्रियख्याता ॥ नामआपलेविख्या
ता ॥ गोदावरीम्हणोनी ॥ २२ ॥ सातवीरेषालंघितांक्षण ॥ अग्रजातीविप्रआ
पण ॥ वेदशास्त्रादिआकर्ण ॥ अध्यापकनामआपलें ॥ २३ ॥ श्रीगुरूम्हणतीत

यासी ॥ वेदशास्त्री अभ्यास म्हणसी ॥ आले विप्र चर्चेसी ॥ वाद करीं त्यांसवे ॥ २४
अभिमंत्रोनि विभूती ॥ त्याचे सर्वांगी प्रोक्षिती ॥ प्रकाशली ज्ञानज्योती ॥ त्यानरा
सी परियेसा ॥ २५ ॥ जैसे मानससरोवरास ॥ वायस जातां होती हंस ॥ तैसा गुरुहस्त
स्पर्शा ॥ पतित झाला ज्ञानराशी ॥ २६ ॥ नरसिंहसरस्वती जगद्गुरू ॥ त्रयमूर्तीचा
अवतारू ॥ अस्तानी लोक म्हणती नरू ॥ तेचि जाती अधःपाती ॥ २७ ॥ तेणे पुरि
पतितासी ॥ ज्ञान झाले परियेसी ॥ वेदशास्त्र सांगावयासी ॥ म्हणो लागला ते
येवेळी ॥ २८ ॥ जे आले चर्चेस विप्र ॥ भयभीत झाले फार ॥ जिव्हा तुटोनि झाले

बधिर ॥ हृदयशिळावत झाले ॥ २९ ॥ विमथरथराकांपती ॥ श्रीगुरुचरणी लोक
ती ॥ आपली आतां काय गती ॥ जगज्योती स्वामियां ॥ ३० ॥ श्रीगुरुद्रोही झालें आण
धिःकारिले ब्राह्मण ॥ तूं अवतार गौरीरमण ॥ क्षमा करणे स्वामियां ॥ ३१ ॥ वेष्टोनि
यां माया पाशी ॥ झालो महा तामसी ॥ निरेखावे कृपेसी ॥ क्षमा करणे स्वामियां ॥ ३२
तूं रूपपाळ सर्वभूती ॥ आमुचे दोषनाणी चित्ती ॥ आम्हां घावी उद्धारगती ॥ म्हणो
नि चरणी लागती ॥ ३३ ॥ एरवादे समयी लीलेसी ॥ पर्वत करिशि तृणासरसी ॥ प
र्वत पहाता कोपेसी ॥ भस्म करिसी निर्धार हा ॥ ३४ ॥ तूं त्विसृष्टी स्थापिसी ॥ तूं त्विस

र्वचि पोषण करिसी ॥ तूंचि कर्ता प्रळयासी ॥ त्रिमूर्ति जगद्गुरू ॥ २५ ॥ तव महिमा
वर्णावयासी ॥ मती नाही आम्हासी ॥ उद्धारावें दीनासी ॥ शरण्यां गतां वरप्रदा ॥ २६ ॥
ऐसें विप्र विनवीती ॥ श्रीगुरू त्यासी निरोप देती ॥ तुम्ही क्षोभविला भारती ॥ त्रि
विक्रम महामुनी ॥ २७ ॥ आणीक असा बहुत दोषी ॥ निंदिले सर्व विप्रासी ॥ पावा
ल जन्म राक्षसी ॥ आपली जोडी भोगावी ॥ २८ ॥ आपले अर्जित आपणासी ॥ भो
गिजे पुण्य पापासी ॥ निष्कृती नव्हतां क्रियमाणासी ॥ मती नाही परियेसा ॥ २९ ॥
श्रीगुरूवचन ऐकोनी ॥ लागती विप्र दोघे चरणी ॥ केवी उद्धरो भवार्णवी ॥ म्हणो

निघां विनविती ॥ ४० ॥ श्रीगुरुनाथ कृपामूर्ती ॥ त्या विप्राते निरोप देती ॥ ब्रह्मराक्षस
होवोनि ख्याती ॥ कर्मभोग द्वादशाब्द ॥ ४१ ॥ अनुतप्त झालिया कारण ॥ शुद्धातिरूप
असाल जाण ॥ जो कां शुकनारायण ॥ प्रथम वाक्य म्हणतसे ॥ ४२ ॥ तुमचे पापक्ष
य होतां ॥ विद्वज्जन येतील अवचितां ॥ पुढील वाक्य तुम्हा सांगतां ॥ उद्धार गती होई
ल ॥ ४३ ॥ आतां जावे गंगेसी ॥ स्थान बरवे बेसावयासी ॥ म्हणोनि निरोपिती त्यासी ॥ गे
ले विप्र त्यावेळी ॥ ४४ ॥ निघता ग्रामाबाहेरी ॥ हृदयशूळे अपरंपरी ॥ जातां क्षण
न लागतां नदीतीरी ॥ विप्र पंचत्व पावला ॥ ४५ ॥ आपणे केल्या कर्मासी ॥ प्रयत्न

नाहि आणि कासी ॥ ऐसे विप्र तामसी ॥ आत्मघात कीं तेचि जाणा ॥ ४६ ॥ श्रीगुरु व
चनें जेणें परी ॥ अन्यथा नव्हे निर्धारी ॥ झाले राक्षस द्विजवरी ॥ बारा वर्षी गती पाव
ले ॥ ४७ ॥ विप्र पाठविले गंगेसी ॥ मागे कथा वर्तली कैसी ॥ नामधारक शिष्यासी
सिद्ध सांगे अवधारा ॥ ४८ ॥ पतित झाला महाज्ञानी ॥ जातिस्मरण सप्तजन्मी ॥ पू
र्वी पार विप्र म्हणोनि ॥ निर्धार केला मनांत ॥ ४९ ॥ नमन करूनि श्रीगुरूसी ॥ विन
वी पतित भक्तीसी ॥ अज्ञान मायातिमिरासी ॥ ज्योतिरूप जगद्गुरु ॥ ५० ॥ विप्र हो
तो पूर्वी आपण ॥ केवी झालो जातिहीन ॥ सांगा केजी विस्तारोन ॥ त्रिकाळज्ञान अंतरसा

क्षी॥५१॥ जन्मांतरीचे अशेष॥ काय केले असती महादोष॥ की द्वेषिला आपण महे
श॥ नृसिंहसरस्वती सांग पां॥५२॥ ऐसे वचन ऐकोनी॥ सांगती गुरु प्रकाशुनी॥ म्ह
णोनि सांगती सिद्धमुनी॥ नामधारक शिष्यासी॥५३॥ म्हणोनि सरस्वती गंगाधर॥
सांगे गुरुचरित्र विस्तार॥ पुढील कथा ऐकतां नर॥ पतित होय ब्रम्हज्ञानी॥५४॥ ऐ
सी पुण्य पावन कथा॥ ऐकतां उद्धार अनाथा॥ पावे चतुर्विधपुरुषार्था॥ निश्चये
सी जाण पा॥५५॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधा
रकसंवादे पतितोद्धरणं नाम सप्तविंशोऽध्यायः॥२७॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु

श्रीगणेशायनमः ॥ नामधारक म्हणे सिद्धासी ॥ पुढील कथा सांगआम्हसी ॥ उल्हास माझे मानसी ॥ गुरुचरित्र अति गोड ॥ १ ॥ सिद्ध म्हणे नामधारका ॥ कथा असे अलौकिका ॥ दोष जातील देखा ॥ ज्ञानज्योती प्रकाशे ॥ २ ॥ श्रीगुरु म्हणती पतितासी ॥ आपलें पूर्वजन्म पुससी ॥ सांगेन ऐक परियेसी ॥ चांडाळजन्म होणार मती ॥ ३ ॥ पुण्य पापाची गती ॥ आपले अर्जित भोगिती ॥ कर्मविपाकी असे ख्याती ॥ नीच श्रेष्ठ कर्मानुसारी ॥ ४ विप्र क्षत्रिय वैश्य शूद्र वर्ण ॥ यांचे पासून चांडाळ वर्ण ॥ उपजला असतां श्रेष्ठहीन जातीविभाग कर्मापरी ॥ ५ ॥ विप्रास्त्रियेपासि ऐका ॥ शूद्र जाय व्यभिचारिका ॥ पिउ

पजे तो चांडाळि का ॥ सोब्ळावी जाती ॥ ६ हे मूळ्ळऽसतीचे लक्षण ॥ नानादोषांचे आ
चरण ॥ तेणे हीनजन्म घेणे ॥ विप्रादि चारी वर्णासी ॥ ७ ॥ त्या दोषाचा विस्तार ॥ सांगतो
कीस विस्तर ॥ विप्र करिता अनाचार ॥ जन्म हीनजातीसी ॥ ८ ॥ गुरू अथवा मातापिता
साजेनि जायतत्वता ॥ चांडाळ जन्म होय निरुता ॥ सोडितां कुलस्त्रियेसी ॥ ९ ॥ कुळदे
वता सोडेनि निका ॥ पूजा करी आणिका ॥ तो चांडाळ देखा ॥ सदो अन्टत वदतां ॥
१० ॥ सदा जीवहिंसा करी ॥ कन्याविक्रय मनोहरी ॥ लटिके आपण प्रमाण करी ॥ चां
डाळ तोहि जाणा ॥ ११ ॥ शूद्रहस्ते करी भोजन ॥ अश्व विक्रय करी ब्राह्मण ॥ तो वि

चांडाळहोयजाण॥सदाशूद्रसंपर्के॥१२॥शूद्रस्त्रियेचाकरीसंग॥नित्यअसतांदा
सीभोग॥गृहभांडीविकूनत्याग॥देवपितृकर्मत्यागी॥१३॥तोपावेहीनजाती॥कोणि
अग्निरानीघालिती॥गायवासरासीबिघडकरिती॥वेगळीकरितीस्वआगे॥१४॥
सोडिआपल्माजननीते॥आणिपितालेकराते॥वेगळीकरितीआपुल्याहस्तें॥
तोहिजनीचांडाळ॥१५॥बैलावरीविप्रबैसे॥शूद्रांन्नजेवीहर्षे॥चांडाळहोयभ
रवसे॥ऐसेम्हणतीश्रीगुरु॥१६॥विप्रतीर्थासजावोना॥श्राद्धतोनकरीचजाण
परान्नप्रतिग्रहादारुण॥करीतोहोयचांडाळ॥१७॥षट्कर्मेरहितविप्रदेखा॥क

पिलागायीचेदुग्धएका ॥ नकरितांअभिषेका ॥ क्षीरपानजोकरी ॥ १८ ॥ तोहिपावेचां
डाळयोनी ॥ तुळसीपत्रेओरपोनी ॥ पूजाकरीदेवालागोनी ॥ शालिग्रामभूद्रेभजलि
या ॥ १९ ॥ नसेवीचमातापिता ॥ त्यजित्यासिप्रतिपाळितां ॥ चांडाळहोवोनिजन्मतां ॥
सहस्रजन्मीकृमीहोय ॥ २० ॥ पहिलीएकस्त्रीअसतां ॥ दुजीकरूनितिसीत्यजितां ॥ हो
यजन्मत्यासिपतिता ॥ आणिकसांगेनएकनूवल ॥ २१ ॥ श्रमोनितआलाअसे
तां ॥ वेदम्हणऊनीअन्नघालितां ॥ जन्मपावेतत्वतां ॥ चांडाळहोया ॥ २२ ॥ यो
ग्यविप्रासिनिंदिती ॥ आणिकजातीपूजिती ॥ चांडाळयोनिजाती ॥ वृत्तिलोपके

लिया ॥ २३ ॥ तळी विहिरी फोडी मोडी ॥ शिवालयी पूजा तोडी ॥ ब्राह्मणाची घरे मोडी
तो हि जन्मे पतिताकुळी ॥ २४ ॥ स्वामिगुरुस्त्रियेसी ॥ शत्रुमित्रविश्वासस्त्रीसी ॥
जो करी मभिचारासी ॥ तो हि जन्मे पतितगृहीं ॥ २५ ॥ सोघी स्त्रियात्जयासी ॥ त्यांत दे
विप्रपंक्चेसी ॥ अतिथी आलिया अस्तमानासी ॥ ग्रास न दे तो पतित ॥ २६ ॥ त्रिसंध्या
समग्री देखा ॥ जो विप्र जेवी अविवेका ॥ भाक देऊनी फिरे निका ॥ तो जन्मे पतित ॥
२७ ॥ राजे देती भूमिदान ॥ आपण घेती हिरोन ॥ संध्याकाळी करी शयन ॥ तो हि हो
य पतित ॥ २८ ॥ वैश्वदेवकाळी अतिथीसी ॥ जो करी दुष्टोत्तरेसी ॥ अन्न न देतां त्यो

३ सी॥ जन्म दुष्ट तो पावे॥ २९॥ गंगातीर्थाची निंदा करी॥ येकादशी भोजन करी॥ स्वामी स.
मोडी समरी॥ चांडाळ योनीत याजन्म॥ ३०॥ स्त्रीसंभोग पर्वणीसी॥ अथवा श्रीहरी
दिवसी॥ वेदाशिक वीभ्रष्ट्रासी॥ चांडाळ योनी जन्म पावे॥ ३१॥ मृत्यु दिवसी न करी श्रा
द्धा॥ केले पुण्य सागे प्रसिद्धा॥ वाटे करासि करी भेदा॥ चांडाळ योनि जन्म पावे॥ ३२॥ श्री ॐ
ष्य काळी उन्हाळ्यांत॥ पोई घाली अरण्यांत॥ तेथे विघ्न जो करित॥ तो जन्मे चांडा
ळ योनी॥ ३३॥ नाडी न कळता वैद्य की॥ जाणोनि औषधी आणिकी॥ तो होय महा ३
पातकी॥ चांडाळ योनीत संभवे॥ ३४॥ जारण मारण मोहनादी॥ मंत्र जपती कुबुद्धी

जन्मा चांडाळ होय त्रिशुद्धी ॥ वेदमार्ग त्यजितां विप्र ॥ ३५ ॥ श्रीगुरूसी नर म्हणे कोण ॥ ह
रिहराते निंदिता जाण ॥ अन्य देवताचे पूजन करून ॥ तो नर पतित होय ॥ ३६ ॥ ब्राम्ह
ण क्षत्रिय वैश्य शूद्र ॥ आपले कर्म त्यजुनि नरेंद्र ॥ आणिक कर्म आचरी दरिंद्र ॥ तो हि
होय चांडाळ ॥ ३७ ॥ शूद्रापासोनि मंत्र शिके ॥ त्यासि पडतील सर्व पातके ॥ गमोद
कक्षीरोदके ॥ श्वान चर्मी घातले परी ॥ ३८ ॥ विधवा स्त्रीशी संग करी ॥ शिव्यादे उ
निजेऊं घाली ॥ श्राद्ध दिनी पिंड न घाली ॥ चांडाळ योनी तो जन्मे ॥ ३९ ॥ माता पि
ता गुरु द्वेषी ॥ तो जन्मे चांडाळ योनिसी ॥ आणिक जन्म पावे वेश्योदरासी ॥ उपजे

हीन परियेसी ॥ ४० ॥ गुरूची निंदा करी हर्षी ॥ करी विप्र विद्वेषासी ॥ वेद चर्चा गर्वेसी ॥ तो
होय ब्रम्हराक्षस ॥ ४१ ॥ भजन करी गुरु देवतां ॥ दुजे देवा निंदितां ॥ होय अपस्मारी त
त्वतां ॥ दरिद्र रूपे पीडा भोगी ॥ ४२ ॥ माता पिता गुरु वर्जुन ॥ वेगळा होय घेउन स्त्री आ
पणा ॥ वेरडाचे पोटी उपजोन ॥ रोगी होऊन राहातसे ॥ ४३ ॥ सदा वेद दोषी आपण ॥
अवमानीत ब्राम्हण ॥ कर्मभ्रष्ट होय आपण ॥ मूत्रकृच्छ्र रोगी होय ॥ ४४ ॥ लोका
चे वर्म काढी आपणा ॥ सदा करी उपार्जन ॥ हृदय रोगी होय जाण ॥ महा कष्ट भोगित
से ॥ ४५ ॥ गर्भपात करी स्त्रियेसी ॥ वांझ होउनी उपजे परियेसी ॥ पुत्र म्रालिया मर

तीत्वरेसी ॥ गर्भपात करूनये ॥ ४६ ॥ धर्मशास्त्रादि पुराण ॥ सांगतां नायके जाण ॥ अधि
क जेवितां द्वेषी भाषण ॥ बहिराढ होवोनि उपजे ॥ ४७ ॥ पतितासी करीत ढा ॥ मर्दभज
न्मे तत्वता ॥ यवनापासी औषध घेतां ॥ मृग योनी जन्मे तो ॥ ४८ ॥ ब्रह्महत्या केल्या
जरी ॥ क्षयरोगी तो निर्धारी ॥ सुरापानी ओकखापरी ॥ श्यामदंत उपजेल ॥ ४९ ॥ सुव
र्ण चोरी केल्यासी ॥ विरूपी तो निश्चयेसी ॥ दृष्टी करी गुरुस्त्रीसी ॥ कुष्टी होय तो नर ॥
५० ॥ अश्ववध गोवध करितां ॥ वांझ होईल निश्चितां ॥ सदा पावे अनुतप्तता ॥ दोषका
हीनाहीयासी ॥ ५१ ॥ विश्वासघातकी परियेसी ॥ जन्म होय एसा त्यासी ॥ अन्न न देता

आणि कासी ॥ पडे तयासी अरुची ॥ ५२ ॥ सेवक एकाचा चालवोन ॥ घेवोनि जाती
जे जन ॥ त्यासी होय जाण बंधन ॥ कारागृही भोगितसे ॥ ५३ ॥ सर्प मारितो जो नर ॥ तो स
र्प होवोनि पडे निर्धार ॥ ऐसे दोष अपार ॥ आतां चोरी सांगेन ॥ ५४ ॥ स्त्रियांते चोरूनी
जाय ॥ मतिहीन जन्म होय ॥ सदा क्लेशी आपण होय ॥ अंती जाय नरकासी ॥ ५५ ॥ सुवर्ण
चोरी नर ॥ परम व्याधिष्ठ निर्धार ॥ पुस्तक चोरिता निर्धार ॥ नेत्र जातील तयाचे ॥
५६ ॥ वस्त्र चोरी करी जरी ॥ रोगी होय निर्धारी ॥ गाणद्रव्य चोरी करी ॥ गंडमाळा होती
तया ॥ ५७ ॥ श्वासोश्वासी असे नर ॥ त्याची वस्तु आणि चोर ॥ सदा सेवी वंधन घोर ॥

ब्रह्मांड पुराणी लिहिले असे ॥ ५८ ॥ परद्रव्यापहार देखा ॥ परदत्तापहार विशेषा ॥ पर
द्वेषी नर ऐका ॥ अपुत्री होवोनि ऊपजे ॥ ५९ ॥ अन्नचोरी केलिया देखा ॥ गुल्म व्याधि
होय ऐका ॥ धान्य नेईल तस्करिका ॥ दुर्गंधि रक्त शरीर ॥ ६० ॥ करी एकादा तेलचोरी
तो दुर्गंधि पावे शरीरी ॥ परस्त्री ब्रह्मस्व अपहारी ॥ ब्रह्मराक्षस जन्म पावे ॥ ६१ ॥
मोती माणिकरल देखा ॥ चोरी करी नर ऐका ॥ हीनजातीसी जन्मा निका ॥ पावे नर अ
वधारा ॥ ६२ ॥ पत्र शाखवादि फळे चोरी ॥ खरुज होय अपरंपरी ॥ रक्त पाणी निर्धारी
गोचीड होय तो नर ॥ ६३ ॥ कांस्य लोह कापूस लवण ॥ तस्करिता नर जाण ॥ श्वेतकुष्ठी

६

होयपूर्ण॥ विचारावेधर्मशास्त्री॥ ६४॥ देवद्रव्यापहारी देखा॥ देवकार्यनाशी अभक्षि
का॥ पंडुरोगी तोनिका॥ फळचोर विद्रुपापरी॥ ६५॥ निक्षेपचोरी देखा॥ करिताहोयस
दाशोका॥ धनतस्कर उद्धरेका॥ जन्मपावेतो अवधारा॥ ६६॥ फळेचोर होय वनेचर॥
जळचोर होय लांडगाथोर॥ ग्रहोपकरणेतस्कर॥ काकजन्म तो पावे॥ ६७॥ मधुतस्कर
अवधारी॥ जन्मपावे होयबारी॥ रंगरसकरी चोरी॥ कुष्टी होय पर्येसा॥ ६८॥ गुरुम्ह
णतीपतितासी॥ जन्मपावे ऐसा यांदोषी॥ आतां व्यभिचारिणीसी॥ शांतिपर्वी बोलिले॥
६९॥ परस्त्री आलिंगिली यादेखा॥ शतजन्म श्वाननिका॥ पुढे सर्पजन्म निःशंका॥ पा

६

वेभोगीअवधारा ॥ ७० ॥ परयोनी पाहे दृष्टीने ॥ जन्मे तो अधत्वव्यापणे ॥ बंधुभार्या
सपर्क करणे ॥ गर्दभजन्म तो पावे ॥ तो हि जन्म सोडोनी ॥ निघोनि जाय सर्पयोनी ॥ पु
न्हा नरका जावोनी ॥ नाना कष्ट भोगितसे ॥ ७२ ॥ सखा भार्या सवे ऐका ॥ मातुळस्त्री
असे विशेखा ॥ येखादा करी संपर्का ॥ श्वानयोनी जन्म पावे ॥ ७३ ॥ परस्त्रियाचे वद
न ॥ न करावे अवलोकन ॥ कुबुद्धी करिता निरीक्षणु ॥ चक्षुरोगी इह जन्मी ॥ ७४ ॥ आ
पणा असे शूद्रजाती ॥ विप्रस्त्रीसी भोगी रती ॥ ती दोघे हि कृमी होती ॥ विष्टेमाजी अ
वधारा ॥ ७५ ॥ सदां शूद्रसंपर्क करी ॥ ते चि स्त्री व्यभिचारी ॥ जन्म पावे होईल कुतरी

महादोष वोलिलासे ॥ ७६ ॥ ऐसे तया पतिताप्रती ॥ श्रीगुरू आपण निरोपिती ॥ ऐकता
होय त्रिविक्रमभारती ॥ प्रसन्न केला श्रीगुरूसी ॥ ७७ ॥ स्वामी निरोपिले धर्म सकळ
ऐकता होय मन निर्मळ ॥ जरी घडले एकवेळ ॥ पाप जाय कवणापरी ॥ ७८ ॥ श्रीगु
रू म्हणती त्रिविक्रमासी ॥ प्रायश्चित्त असे पापासी ॥ पश्चात्ताप होय ज्यासी ॥ पाप
नाही सर्वथा ॥ ७९ ॥ पाप असे थोर केले ॥ अंतःकरणी असे खोचले ॥ त्यासी प्राय
श्चित्त भैले ॥ कर्मविपाकी बोलिले ॥ ८० ॥ प्रायश्चित्ताची विधाने ॥ सांगेन ऐका स्थी
र मने ॥ अनेक ऋषीच्या वचने ॥ ती सागेन ऐका तुम्ही ॥ ८१ ॥ प्रथम घावा ब्रम्हदंड ॥

म्हणे होय पापखडा। गोदाने सालं कृत अखडा। अशक्त तरी द्रव्य घावे। ८२। निष्क अथवा धनिष्क। सूक्ष्म पापा पावनिष्क। स्थूळ सूक्ष्म पापशुद्धी। तेणे विधी द्रव्य द्यावे। ८३। अज्ञानकृत पापासी। पश्चात्तापे शुद्ध परियेसी। गुरुसेवा तत्परसी। केलिया गुरू निवारी। ८४। नेणता पाप केलियासी। प्रायश्चित्त परियेसी। प्राणायाम द्विशत तेसी। पुण्यतीर्थी दाहा स्नाने। ८५। तीन गुजा सुवर्ण घावे। नदीतीर दोन गावे। सौम्यपतक याची भावे। जाती पापे परियेसी। ८६। स्त्रीपुरुष दोघान। एक पाप करितां निश्चित। दोघे हि पडती दोषात। दोघानी प्रायश्चित्त आचरावे। ८७। आणि कर एक अ

सेप्रकार ॥ जेणे पाप होय दूर ॥ गायत्री जप दाहा सहस्त्र ॥ करावा तेणे वेद मंत्रे ॥ ८८
याचे नाव गायत्री कृच्छ्र ॥ महादोषी करी पवित्र ॥ सकळ कामना सिद्धि होत ॥ श्रीगुरु सां
गती त्रिविक्रमासी ॥ ८९ ॥ प्राजापत्य कृच्छ्र देखा ॥ ऐसे असती विशेषो ॥ भोजन करा
वे भुक्त एका ॥ अथवा अयाचित भिक्षा ॥ ९० ॥ उपवास तीन दिवस ॥ स्मरावे गुरुचर
णासा ॥ येणे जाती सौम्य दोषा ॥ जे आपणा सामान्या ॥ ९१ ॥ अतिकृच्छ्र असे एका ॥ ए
कविन्ते मुनी एका ॥ दोष असती सामान्यक ॥ अज्ञाने विकेलिया ॥ ९२ ॥ अन्न घ्यावे
ग्रास सप्तविंशती ॥ बारा रात्री निश्चिती ॥ दोनी ग्रास तया प्रती ॥ अयाचित अन्न घ्या

वे ॥ ९३ ॥ ऐसे सौम्य पातकासी ॥ जे विधी असती परियेसी ॥ मास एक नेमेसी ॥ अंजुली
एक जेवावे ॥ ९४ ॥ उपवास तीन करावे देखा ॥ प्रकार सांगेन आणिका ॥ तीन दिन उपो
षका ॥ एत पारणे करावे ॥ ९५ ॥ तीन दिवस घृत घेवोनी ॥ क्षीर घ्यावे दिवस तीनी ॥ तीन
दिवस वायुभक्षोनी ॥ पुन्हा क्षीर एकवीस दिवस ॥ ९६ ॥ एकादा जो अशक्त ॥ तयासी हे
चिव्रत ॥ तीळ गूळ कला त्या पीठे ॥ उपवास करावा ॥ ९७ ॥ पूर्णकृछ्र करा ऐसा ॥ पूर्णो
दक घ्यावे प्रति दिवसा ॥ करावे तितके उपवासा ॥ पश्चात्तापे प्राशन कीजे ॥ जांभुळबि
ल्व अश्वत्थ कुशोदक बिंदु नित्य ॥ पान करावे सत्य ॥ पूर्णकृछ्र परियेसा ॥ ९८ ॥ आणि

क एक प्रकारा॥ करी चांद्रायण आचरा॥ कुकुट अंड प्रमाण आहारा॥ ग्रास ध्यावा क्षय वृद्धी॥ १००॥ अमावास्येसि एक ग्रास॥ पोणिमेसी पंचदशा॥ कृष्ण पक्षी उतरतां हर्षे दुजे दिनी हविष्यान्न॥ १॥ आधले पाप प्रगटूना॥ उच्चारावे भाव धरूना॥ पश्चात्तापें जकोन॥ पाप जाय अवधारा॥ २॥ आतां सांगेन तीर्थकृछ्र॥ यात्रा करावी पवित्र॥ वाराणसी श्वेतपर्वता॥ स्नान मात्रें पापें जाती॥ ३॥ वरकुंड तीर्थ गलियासी॥ गायत्री जप सहस्त्रेसी॥ पाप जाय त्वरितेसी॥ कृतघ्नादि पातके॥ ४॥ समुद्र श्वेत वंधेसी॥ जप करणे गायत्रीसी॥ भ्रूणहत्या पापनाशी॥ अगस्तीच्या वचने॥ ५॥ विधिपूर्वक शुचीसी॥ समु

द्वी श्वेतबंधासी ॥ ब्रह्महत्या पापे नासी ॥ एक त्रिविक्रमा निश्चितपे ॥ ६ ॥ लक्ष गायत्रीज
प केलिया ॥ सुरापान जायलया ॥ स्वर्ण चोरि केलिया ॥ सात लक्ष जपावे ॥ ७ ॥ अष्टल
क्ष जपासी ॥ सर्व पापाते नासी ॥ आतां सांगेन परियेसी ॥ वेदाक्षरे पाप दूर ॥ ८ ॥ पवमा
न सूक्त चत्वारी ॥ पठण करितां ब्रह्महत्या दूरी ॥ इंद्रमित्र निर्धारी ॥ एक मास जपावे ॥
९ ॥ सुरापानादि पातके ॥ जातील येणे विशेषे ॥ पठण केलिया पातके ॥ गुरुतल्पादि
प हरती ॥ १० ॥ पावमान अन्नसूक्ते ॥ शुनःशेपनावाते ॥ मास एक पठणाते ॥ स्वर्ण
चोरी पाप जाय ॥ ११ ॥ पंच मासकी साहा मास ॥ मिता हा करुनी पुरुष ॥ पूरुषसूक्ते

१०

कर्मनाश॥ पंचमहापापेनासती॥१२॥ त्रिमधूमणि जे मंत्रसूक्ते॥ सुपर्णा त्रीणि मंत्रे॥ समस्तपापा प्रायश्चित्ते॥ नांचिकीर्तजपावे॥१३॥ नारायणपन्नदेखा॥ जपावे भक्तिपूर्वकां॥ नासीपंच महापातका॥ प्रीतिपूर्वक जपावे॥१४॥ त्रिपदा नाम गायत्रीसी॥ जपतीजे भक्तीसी॥ तद्विष्णोः अघमर्षणोसी॥ सप्तजन्म पापजाय॥१५॥ अपामेध्यपन्नासी॥ तद्विष्णोनाम सूक्तेसी॥ जपतीजन भक्तीसी॥ सप्तजन्मापापजाय॥१६॥ आणिकअसेविधान देखा॥ अज्ञानकृतदोषादिकां॥ अनुनप्रहोवोनि विशेषा॥ पंचगव्यप्राशन कीजे॥१७॥ गोमूत्र गोमयक्षीर॥ दधि घृतकुशसार॥ विधिमंत्रे घ्यावे निर्धार॥ पहिले

१०

दिनी उपवास ॥ १८ ॥ नील वर्णीचे गोमत्र ॥ कृष्णा गोमय पवित्र ॥ ताम्र गायत्रीचे क्षीर ॥ श्वे
त धेनूचे दधी घ्यावे ॥ १९ ॥ कपिलागायीचे तूप घ्यावे ॥ ऐसे पंचगव्य प्राशन करावे ॥ येके
काचे कूल स्वभावे ॥ सांगेन सर्व अवधारा ॥ २० ॥ गोमूत्र घ्यावे पावशेर ॥ अगुष्ठपर्व गो
मय सर्वी ॥ क्षीर पावणे दोन शेरा ॥ दधि तीन पाव घ्यावे ॥ २१ ॥ घृत घ्यावे पावशेर ॥ ति
तके चि मिळवावे कुशानीरा ॥ घेतां मंत्र उच्चारा ॥ विस्तारोन सांगेन ॥ २२ ॥ कुशा सहित सा
हारसे ॥ एकेकासी मंत्र पृथकू असे ॥ प्रथम मंत्र इरावती असे ॥ इदं विष्णु दुजा देखा
२३ ॥ मानस्तोक मंत्र तिसरा ॥ प्रजापती चतुर्थ अवधारा ॥ पंचम गायत्री उच्चारा ॥

११

साहावीव्याहृती प्रणवपूर्वक ॥२४॥ ऐसे मंत्रोनि पंचगव्य ॥ घ्यावे अनुत्तमूरएकभा
वे ॥ अस्थिगतं चर्मगत अपूर्वे ॥ पापे जाती अवधारा ॥२५॥ गायी न मिळता इतके जिन
सी ॥ कपिला मुख्य परियेसी ॥ दर्शनिच दोष नासी ॥ कपिला गायी उत्तमू ॥२६॥ महा
पातक नावे ॥ ब्रम्हहत्या सुरापान जाणावे ॥ स्वर्णस्तेय गुरुतल्पक जाणावे ॥ पांचवा
त्यासवे मिळाला ॥२७॥ चौघे पातकी देखा ॥ पांचवा तया मिळता देखा ॥ त्यांसहि
पंच पातका ॥ आहे तो पापी ॥२८॥ सुरापानी ब्रम्ह घातकी ॥ स्वर्णस्तेय गुरुतल्पकी
पांचवा महापातकी ॥ जो सानुकूळ मिळे तो ॥२९॥ ऐसे पातक घडे त्यासी ॥ प्रायश्चित्त

११

परियेसी ॥ श्रीगुरु संतोषी ॥ अनुग्रह हे पुनीत ॥ ३० ॥ ऐसे श्रीगुरू त्रिविक्रमासी ॥ प्राय
श्चित्त सांगती परियेसी ॥ सकळ विप्र संतोषी ॥ ज्ञान प्रकाश होती ॥ ३१ ॥ एखादा मि
केल शास्त्रज्ञ ॥ स्वधर्माचारे अभिज्ञ ॥ त्याचा अनुग्रह पापघ्न ॥ पुनीत होय अवधारा
३२ ॥ श्रीगुरु म्हणती पतितासी ॥ पूर्वी तू विप्र होतासी ॥ मातापिता गुरु द्वेषी ॥ तेणे दोषे
चांडाळ जन्म ॥ ३३ ॥ आता सांगतो एक ॥ स्नान संगमी मास एक ॥ कल्प दोष जाती नि:
शंक ॥ पुन्हा विप्रजन्मासी ॥ ३४ ॥ पतित म्हणे स्वामीसी ॥ तव दर्शने आम्हासी ॥ काव[illegible]
ळजातां मानसासी ॥ राजहंस तो होतसे ॥ ३५ ॥ तैसें तव दर्शनमात्रें ॥ पवित्र झाली सक

ळगात्रें ॥ नारावे आनां सुपात्रें ॥ शरणांगतासी ॥ ३६ ॥ परिस लागतां लोखंडासी ॥ सु
वर्ण होय तत्क्षणेसी ॥ सुवर्ण मागुती लोहकेसी ॥ केवी मिळे स्वामिया ॥ ३७ ॥ तव दर्श
न सुधारसी ॥ आपणा झाली ज्ञानराशी ॥ अभिमंत्रोनि आम्हासी ॥ विप्रामध्ये मिळ
वावें ॥ ३८ ॥ ऐकोनि तयाचे वचन ॥ गुरु बोलती हांसोन ॥ तव देह जातिहीन ॥ विप्र
केवी म्हणतील ॥ ३९ ॥ पतित त्याच्या गृहासी ॥ उपजोनि तूं वाढलासी ॥ ब्रम्हत्व केवी
पावसी ॥ विप्र निंदा करतील ॥ ४० ॥ पूर्वी ऐसा विश्वामित्र ॥ क्षत्रियवंशी गाधिपुत्र
तपोबलें म्हणवी पवित्र ॥ म्हणे तो विप्र आपणा ॥ ४१ ॥ ब्रम्हयाची शतवर्षे ॥ तपके

ळेमहाक्लेशो॥ करोनिबळेम्हणवीतसे॥ ब्रह्मऋषीआपणा॥ ४२॥ इंद्रादिसुरवरांसी
विनविताझाला परियेसी॥ आपणातेंब्रम्हऋषी॥ म्हणोनिबोलाम्हणतसे॥ ४३॥
देवम्हणतीत्यासी॥ आम्हागुरुवशिष्टऋषी॥ जरीबोलेब्रम्हऋषी॥ तरीआम्ही
अंगिकारूं॥ ४४॥ मगत्यावसिष्टासी॥ विनवीविश्वामित्रऋषी॥ विप्रम्हणाआपणा
सी॥ केलेतपबहुकाळ॥ ४५॥ वशिष्टम्हणेविश्वामित्रा॥ क्षत्रियतापसअपात्र॥ दे
हटांकोनिमगपवित्रा॥ विप्रकुळीजन्मावे॥ ४६॥ मगतुझाहोईलव्रतबंध॥ होईल
गायत्रीप्रबोधा॥ तधीतुवांहोसीशुद्ध॥ ब्रम्हऋषीनामतुझे॥ ४७॥ कांहीकेलियान

म्हणे विप्र ॥ मग कोपला विश्वामित्र ॥ वसिष्ठाचे शत पुत्र ॥ मारिता झाला तये काळी ॥ ४८ ॥
ब्रह्मज्ञानी वशिष्ट ऋषी ॥ न के कदा तामसी ॥ अथवा न म्हणे ब्रह्मऋषी ॥ तया विश्वामि
त्रासी ॥ ४९ ॥ तंव तो एके दिवसी ॥ विश्वामित्र कोपासी ॥ हाती घेवोनि पर्वतासी ॥ घालो आ
ला वसिष्ठावरी ॥ ५० ॥ बिचार करीत मागुती मनी ॥ जरी वधी न वसिष्ठ मुनी ॥ आपणाते
न म्हणती कोणी ॥ ब्रह्मऋषी म्हणोनिया ॥ ५१ ॥ इंद्रादि देव सह ऋषी ॥ म्हणती वसिष्ठ
वा वेयु सरसी ॥ आपण म्हणो ब्रह्मऋषी ॥ अन्यथा नाही म्हणोनिया ॥ ५२ ॥ ऐसा वसि
ष्ठ मुनीस ॥ मारितां यासी फार दोष ॥ म्हणोनि टांकी गिरिवरास ॥ भूमिवरी परियेसा ॥ ५३ ॥

अनुतप्त झाला अतःकरणी ॥ वसिष्टा ते ओळखोनि ॥ ब्रम्हऋषी म्हणोनि ॥ पा
चारिले तये वेळी ॥ ५४ ॥ सतोषोनि विश्वामित्र ॥ म्हणे वोले बोलिला पवित्र
म्हणे माझे घरि अन्न मात्र ॥ तुम्ही घ्यावे स्वामिया ॥ ५५ ॥ सतोषोनि वासिष्ट ॥
तया लागी बोलत ॥ म्हणे शरीर होनि भ्रात ॥ सूर्यकिरणी पचवावे ॥ ५६ ॥ वि
श्वामित्रे आगि कारिले ॥ सूर्यकिरणे देह जाळिले ॥ सूर्यकिरणी तापले
देह सर्वभस्म झाला ॥ ५७ ॥ विश्वामित्र महामुनी ॥ अति सामर्थ्य अनुष्ठानी ॥
पहिला देह जाळोनी ॥ नूतन देह धारियेला ॥ ५८ ॥ ब्रम्हर्षी तिथोन ॥ विश्वामि

त्र झाला जाण ॥ सकळांसि मान्य ॥ महाराज ॥ ५९ ॥ मग म्हणती सकळ मुनी
विश्वामित्र ब्रम्हज्ञानी ॥ ब्रम्हर्षि म्हणोनी ॥ झाला त्रिभुवनी प्रख्यात ॥ ६० ॥ याका
रणे तवदेह ॥ विसर्जावा जुनेइह ॥ अनुलक्षतयभाव ॥ ब्रम्हकुळ भाविसी ॥
६१ ॥ ऐसे त्यां पतितासी ॥ बोधितो गुरु परियेसी ॥ ला घले स्मरवल्यासी ॥ त्यास्वा
मेनासी न ये काही ॥ ६२ ॥ निधान सापडे दरिद्र्यासी ॥ तो घरी जीवेशी ॥ अमृत
सांपड तो रोग्यासी ॥ का सांडील जीवित्वा ॥ ६३ ॥ ये खादे ढोर उपवासी ॥ पावे तृ
ण विराडासी ॥ तेथोनि जावया त्यासी ॥ मन न कै सर्वथा ॥ ६४ ॥ तैसे त्या पतितासी

लागले ध्यान गुरूसी ॥ न जाय आपल्या मंदिरासी ॥ विप्र आपण म्हणतसे ॥ ६५ ॥ इतके
होतां ते अवसरीं ॥ आली त्याची पुत्रनारी ॥ म्हणो लागली अपस्मारी ॥ याकारणे झाली
की ॥ ६६ ॥ जवळ येतां स्त्रियेसी ॥ स्पर्शो न को म्हणे त्वरेसी ॥ कोपे करुनि मारावयासी
जात असे तो पतित ॥ ६७ ॥ दुःख करी त्याची भार्या ॥ दुरूनि नमी गुरुपायां ॥ पती मा
ते सोडोनिया ॥ जातो आतां काय करूं ॥ ६८ ॥ कन्यापुत्र मज बहुत ॥ तया कोण पाळि
त ॥ आम्हा सांडोनि जातोसि किमर्थ ॥ सांगा तयासी स्वामिया ॥ ६९ ॥ जरी न सांगाल
स्वामि त्यासी ॥ त्यजीन प्राण पुत्रासरसी ॥ येरवी आपणाते कोण पोसी ॥ अनाथ मी

स्वामियां ॥ ७० ॥ ऐकोनि तियेचे वचन ॥ गुरू बोलती हासोन ॥ त्यानराते बोलावो
न ॥ सांगता तिपरियेसा ॥ ७१ ॥ गुरु म्हणती पतितासी ॥ जावे आप त्याघरासी
पुत्र कलत्रक्षोभतां दोषी ॥ तूं तेकेवी गति होय ॥ ७२ ॥ यासंसारी जन्मोनियां ॥ सं
तोषवावे इंद्रियां ॥ मग पावे धर्म काया ॥ नाहीतरी गति नसे ॥ ७३ ॥ याकारणे
पूर्वीचि जाण ॥ नकरावी आपण अंगना ॥ करोनि त्यागितां पतना ॥ होय निश्च
त परियेसा ॥ ७४ ॥ सूर्यभूमी साक्षीसी ॥ तुवां वरिले स्त्रियेसी ॥ तीसत्यागितां
महादोषी ॥ तूं तेव केगती जाण ॥ ७५ ॥ श्रीगुरुवचन ऐकोनी ॥ विनवीतसे कर

जोडोनी ॥ केवी होवूं जातिहीन ॥ स्नान होवोनी मागुती ॥ ७६ ॥ गुरू मनी विचारिती
याचे अंगि असे विभुती ॥ प्रक्षालितां लुब्धा होती ॥ अज्ञाने लपावेल ॥ ७७ ॥ ऐसि
मनी विचारूनी ॥ सांगती शिष्याला गोनी ॥ एका लुब्धा पाचारोनी ॥ आणा अ
याम करावि धीनी ॥ ब्रम्हचारी गृहस्थानी ॥ पंचांगुळीधरा परमेष्ठी ॥ ६७ ॥ वान
प्रस्थ संन्यासीयती ॥ अनामिका कनिष्ठिकां गुष्ठेसी ॥ ओंकारादिवायुपुरती ॥
दक्षिणनासापुटें चढवावे ॥ ६८ ॥ उत्तरद्वारे विसर्जोनी ॥ करा प्राणायाम तीन्ही ॥ येपो

त्रिविधी करा मुनी ॥ त्रिकाळ संध्याकर्मे ॥ ६९ ॥ आतां करा मार्जनासी ॥ सांगेन ऐका स
मस्त ऋषी ॥ जैसें असे स्मृतिचंद्रिकेसी ॥ ते पैं विधी सांगतो ॥ ७० ॥ आपोदेवता सूर्य
स्य ॥ सिंधुद्वीप ऋषी गायत्री छंद ॥ आपोदेवता मार्जनें विनियोग ॥ आपोहिष्ठाम
योभुव ॥ ७१ ॥ येणें मंत्रें म्हणोनी ॥ कुशापवित्रें करा मार्जन ॥ यस्यक्षया मंत्र जाण ॥
आपलें पाद प्रोक्षाकावे ॥ ७२ ॥ आपोजन ऐसे मंत्रेसी ॥ प्रोक्षावे आपल्या शरी
रासी ॥ सूर्यश्चेति मंत्रेसी ॥ उदक प्राशन करावें ॥ ७३ ॥ हिरण्यवर्णसूक्तेसी ॥ मार्ज
न करावे परियेसी ॥ द्रुपदादिवेति मंत्रेसी ॥ घ्राणोनि उदकें सोडवे ॥ ७४ ॥ आचमनें

करोनि दोन ॥ मार्जन विधान सांगेन ॥ वाम हस्ते पात्र धरोन ॥ मार्जन कराविशेषी ॥ ७५
औदुंबर रक्त वर्ण रजत ॥ दारु काष्ट असे पवित्र ॥ ऐसें पात्र न मिळे यत्र ॥ वाम हस्ती उ
दक घ्यावे ॥ ७६ ॥ मृन्मय पात्र अथवा द्विमुख पात्र ॥ भिन्न भांडे त्याज्य अपवित्र
ते अग्राह्य देव पितरां ॥ श्रीगुरू म्हणती ब्राम्हणासी ॥ ७७ ॥ मार्जन संख्या सांगेन
ऐका ॥ शिरसी अष्ट पादे नव का ॥ यस्य क्षयाय स्थान भूमिका ॥ येणे परी मार्जन ॥ ७८ ॥
आपः पुनंतु मंत्रे सी ॥ प्राशनोदक मध्यान्हे सी ॥ अग्निश्चेति मंत्रे सी ॥ सायंसध्या
करावी ॥ ७९ ॥ प्राशनांती तुल्सी ऐका ॥ द्विराचमन करा निका ॥ अघ्राप्य करोनि

सांडिजे ऐका ॥ एक आचमन करावें ॥ ८० ॥ अर्घ्य द्यावयाचें विधान ॥ सांगेन ऐका त्र
षीजन ॥ गोश्रृंगा इतके उंच करोन ॥ अर्घ्य द्यावें अवधारा ॥ ८१ ॥ गायत्री मंत्र जपोन
सायं प्रातर्द्यावे तिन्ही ॥ हंसः शुचिषेति मंत्र माध्यान्ही ॥ अर्घ्य द्यावे मंनो भावे ॥ ८२
प्रातर्माध्यान्ही उभे बरवे ॥ सायं अर्घ्य बैसोनि द्यावे ॥ आचमन त्रिवार करावें
करी प्रदक्षिणा असावादित्य ॥ ८३ ॥ अर्घ्य द्यावयाचे कारण ॥ सागेन विधी विस्ता
रोन ॥ राक्षस महादारुण ॥ तीस कोटी आहेति देखा ॥ ८४ ॥ सूर्यासवें युद्धासी ॥ नि
त्य येती परियेसी ॥ संदेह पडे देवांसी ॥ सूर्या होईल अपजय ॥ ८५ ॥ अपजय होतां

सूर्यासी ॥ उदयास्तमान नव्हे परियेसी ॥ कर्मै न चालती ब्राम्हणासी ॥ स्वधास्वाहा
कार न चाले ॥ ८६ ॥ स्वहा स्वधाकार राहाती ॥ समस्त देवांस उपवास होती ॥ सृष्टी
राहिली नहोय उसती ॥ म्हणोनि उपाय रचियेला ॥ ८७ ॥ याचि कारणें अर्घ्यदे
ती ॥ तीचि वज्रायुधे होती ॥ जावोनि दैत्यांसी लागती ॥ पराभविती प्रतिदिवसी
॥ ८८ ॥ दैत्य असती ब्रम्हवंशी ॥ त्यांसि वधिलिया घडे दोषी ॥ प्रदक्षिणा करितां जा
ती दोष ॥ असावादित्य म्हणोनिया ॥ ८९ ॥ ब्रम्हहत्येचिया पातकासी ॥ भूमी प्रद
क्षिणा दोष नासी ॥ चार पावले फिरतां कोसी ॥ भूमी प्रदक्षिणा पुण्य असे ॥ ९० ॥

गु० च०

२५

संध्या करावयाचे स्थान ॥ सांगेन ऐका सकळविधान ॥ घरी करितां प्रतिदिन ॥ ए
कचि फळ अवधारा ॥ ११ ॥ दश फळ ग्रामा बाहेर देखा ॥ नदीस केलिया शताधि
का ॥ पुष्करतीर्थी सुहस्र ऐका ॥ गंगा सुरनदी कोटि फळ ॥ १२ ॥ सुरापान दिवामै
थुन ॥ अनृतादि वाक्ये पापें जाण ॥ संध्या बाहेर करितां क्षण ॥ जळती दोष तात्का
ळी ॥ १३ ॥ स्थानें असती तीन्जप करावयासी ॥ विस्तार सांगेन तुम्हासी ॥ श्रीगुरु म्ह
णती ब्राम्हणासी ॥ एकचित्ते परियेसा ॥ १४ ॥ जप केलिया घरी ऐका ॥ एकचि फ
ळ असे देखा ॥ बाहेर द्विगुण फळ अधिका ॥ नदीतिरी त्रिगुण फळ ॥ १५ ॥ गोस्थ

अ०

३६

२५

ळवंदावन देखा ॥ दशगुण फळ अधिका ॥ अग्निहोत्रस्थानीं निका ॥ शतगुणे अधिक फळ असे ॥ १६ ॥ तीर्थदेवता संन्निधानीं ॥ सहस्त्र फळ असे निर्गुणी ॥ शतकोटी फळ असे हरिसंन्निधानीं ॥ ईश्वरसंन्निधानीं अनंत फळ ॥ १७ ॥ जप करितां आसनासी ॥ विधिनिषेध आहे परियेसी ॥ सांगेन ऐका तातासर्येसी ॥ पुण्यपाप बोलिले असे ॥ १८ ॥ काष्ठावरी बैसोनि जरी ॥ जप करितां मनोहरी ॥ दुःखभोगी निरंतरी ॥ अभागी पुरुष तो होय ॥ १९ ॥ पल्लवशाखा शिवसेतां ॥ सदा होय दुश्चिंता ॥ वस्त्रासनीं दरिद्रता ॥ पाषाणासनीं व्याधि होय ॥ २० ॥ भस्मासनीं

व्याधिनाशा ॥ कंबळासनी सुखविशेषा ॥ कृष्णांजिनी ज्ञानप्रकाशा ॥ व्याघ्रचर्मी मोक्षश्रिया ॥ १ ॥ कुशासनी वशीकरण ॥ सर्वरोगाचे अपहरण ॥ पापे जाती पळोन ॥ आयुःप्रजा अधिक होय ॥ २ ॥ ओंमित्येकाक्षर मंत्र ॥ जपावा तुम्ही पवित्र ॥ ध्यान करावे गायत्री मंत्र ॥ समस्त पापे हरती देखा ॥ ३ ॥ गायत्रीचे स्वरूप आता ॥ अभिनव असे वर्णितां ॥ रक्तांगी वस्त्र रक्ता ॥ हंसवाहन असे देखा ॥ ४ ॥ अकार ब्रह्म अधिदेवता ॥ चतुर्भुजा चतुर्वक्त्रा ॥ कमंडलु अक्षसूत्रा ॥ चाटू धरिला असे करी ॥ ५ ॥ ऋग्वेद असे समागमी ॥ अग्निहोत्रे

फळआवाहयामी ॥ मगआयातुवरदादेवी ॥ म्हणावेऐकाब्राम्हणाने ॥ ६ ॥ त्यामंत्रासी
ऋषीदेवता ॥ गायत्रीसादृश्यअसेख्याता ॥ प्रातःसंध्यातुम्हीकरितां ॥ विधीतुम्हा
सांगेन ॥ ७ ॥ गायत्रीदेवताअनुष्टुप् छंद ॥ ओंआदित्यदेवताहेप्रातः ॥ संध्या
म्हणतांगायत्रीदेवता ॥ गायत्रीछंद ॥ ८ ॥ गायत्रीआवाहनेविनियोग ॥ हीमा
ध्यान्हसंध्याम्हणावी ॥ सवितृदेवतागायत्रीछंद ॥ सरस्वतीआवाहनेविनियो
ग ॥ ९ ॥ प्रातःसंध्येचेंध्यान ॥ सांगेनऐकातुम्हीगहन ॥ रक्तंगीरक्तवसन ॥ हंसा
सनीआरूढअसे ॥ १० ॥ ऐसेंध्यानकरोनी ॥ मगम्हणावेअक्षरज्ञानी ॥ एकचि

तेंकराध्यानी ॥ श्रीगुरू म्हणाती ब्राम्हणासी ॥ ११ ॥ ओम्कारशिखामावाहयामि
छेदऋषीमावाहयामि ॥ श्रीयमावाहयामि ॥ बलमावाहयामि ॥ १२ ॥ ऐसे म्हणो
नि प्रातःकाळी ॥ संध्या करोनि सुवेळी ॥ आतां सांगेन माध्यान्हवेळी ॥ ध्यान आ
वाहनपूर्वक ॥ १३ ॥ अभिभूरोंसावित्रीयोवनस्थ ॥ माध्यांन्हसंध्या ध्यान सां
गेन ऐका ऋषीजन ॥ एकचित्ते परियेसा ॥ १४ ॥ श्वेतागी श्वेतवस्त्र ॥ वाहन
वृषभ असे पवित्र ॥ उकार रुद्रगणादैवत ॥ पंचमुखा असे देखा ॥ १५ ॥ वरद
अभयहस्त देखा ॥ रुद्राक्षमाळा त्रिशूळधारका ॥ यजुर्वेदसंहिता ॥ आग्ने

ष्टोम फळ जाणा ॥ १६ ॥ ओंकारशिखामावाहयामि ॥ छंद ऋषीनावाहयामि ॥ श्रीय
मावाहयामि ॥ ह्रियमावाहयामि ॥ १७ ॥ आतां सायंसंध्याध्यान ॥ सांगेन ऐकाविधा
न ॥ एकचित्ते ऐका वचन ॥ ध्यानपूर्वक सांगेन ॥ १८ ॥ अभिभूरो सरस्वती वृद्धा ॥ जा
णावी तुम्ही सायंसंध्या ॥ कृष्णांगी कृष्णावस्त्रपरिधाना ॥ गरुड वाहन असे दे
खा ॥ १९ ॥ मकार विष्णु देवता ॥ चतुर्भुज शंखचक्रधृता ॥ गदापद्मधारण हस्ता ॥ सा
मवेद संहिता जाणा ॥ २० ॥ वाजपेय यज्ञ जाणा ॥ सायंसंध्या असे ध्याना ॥ करावे
से का तुम्ही ब्राम्हण ॥ म्हणोनि सांगे श्रीगुरू ॥ २१ ॥ ओंकारशिखामावाहयामि

छंद ऋषीमावाहयामि ॥ श्रीयमावाहयामि ॥ बलमावाहयामि ॥ २२ ॥ पंचशीर्षो
पनायने विनियोग ॥ प्रणवस्य परब्रह्म ऋषी ॥ परमात्मा देवता ॥ गायत्री छंद ॥
२३ ॥ उदातास्वरः ॥ अग्निर्वायुः सूर्य ऋषयः ॥ गायत्री त्रिष्टुपूजगती छंदः ॥ ब्र
ह्मा विष्णू महेश्वरो देवता ॥ ऋग्यजुः ॥ सामानी स्वरूपिणी ॥ २४ ॥ आहवनीया
ग्नि गार्हपत्ये ॥ दक्षिणाग्नि उपस्थानानी ॥ पृथ्वी अंतरिक्ष द्योस्तत्वानी ॥ उदा
त्त अनुदात्त स्वरितु स्वराः ॥ २५ ॥ पीत विद्यु श्वेतवर्णा ॥ प्रातर्मध्यान्हत्तृती
य सवनानी ॥ विश्वतेज समाप्त स्वरूपिणी ॥ जागृतीस्वप्नसुषुप्त्यवस्था ॥ २६

ऐसे त्रिपदा गायत्रीसी ॥ सांगितले त्रिविधध्यानासी ॥ आतां विधान जपासी ॥ सां
गेन ऐका एकचित्तें ॥ २७ ॥ ममोपात्तकृदुरितक्षयद्वारा ॥ श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं जपे
विनियोगः ॥ ओं अं नाभौ ॥ वं हृदये मं कंठे ॥ २८ ॥ भूः अक्षर मंत्रासी ॥ गायत्रीअ
से छंदेसी ॥ अग्निदेवता परियेसी ॥ विश्वामित्र ऋषी देखा ॥ २९ ॥ षट्जस्वर श्वेतवर्ण
पादस्पर्शउच्चारोन ॥ प्राणायामविनियोगोन ॥ दुसरी व्याहृती म्हणोनी ॥ ३० ॥
भुवः अक्षर मंत्रासी ॥ उष्णिक् नाम छंदासी ॥ वायुदेवता परियेसी ॥ भृगुऋषी
असे जाणा ॥ ३१ असेरूप श्यामवर्ण ॥ पादस्पर्शरूप उच्चारोन ॥ करा तुम्ही ऐसे

ध्यान ॥ जानु मध्ये न्यासावे ॥ ३२ ॥ प्राणायामे विनियोग म्हणोनी ॥ न्यास करावे भक्तिभा
वनी ॥ स्रुवः व्याहृती म्हणोनी ॥ ध्यान करा भक्तीने ॥ ३३ ॥ स्रुवः व्याहृती मंत्रासी ॥ म्हणा
अनुष्टुप्छंदासी ॥ सविता देवता परियेसी ॥ भारद्वाज ऋषी जाणा ॥ ३४ ॥ स्वर गांधा
र पीतवर्ण ॥ कंठी स्पर्शोनि मंत्र म्हणा ॥ प्राणायामे विनियोग जाणा ॥ तृतीय व्या
हृती मंत्रासी ॥ ३५ ॥ ओं मह मंत्रासी ॥ बृहती छंदासी ॥ बृहस्पती देवता परिये
सी ॥ वसिष्ठ ऋषी निर्धार ॥ ३६ ॥ मध्यम स्वर पिशंग वर्ण ॥ ऐसे करा तुम्ही ध्यान ॥ नाभि
स्पर्शोन वेगे म्हणा ॥ प्राणायामे विनियोग ॥ ३७ ॥ जनः मंत्र उच्चारासी ॥ म्हणा पंङ्

त्रिछंद्रासी ॥ वरुणदेवतागोतमऋषी ॥ पंचमस्वर असे जाणा ॥ ३८ ॥ रूप असे नीळवर्णे
करान्यास हृदयस्थान ॥ प्राणायामेविनियोगेन ॥ जनः पंचन्यास ऐसे ॥ ३९ ॥ तपः मंत्रमा
सासी ॥ त्रिष्टुप्छंद परियेसी ॥ ईश्वरदेवताकश्यपऋषी ॥ धैवतस्वर परियेसा ॥ ४० ॥
असे आपण लोहवर्ण ॥ स्पर्श करावे कंठस्थान ॥ प्राणायामेविनियोगेन ॥ न्यास क
रावा ब्राम्हणहो ॥ ४१ ॥ सत्य म्हणतसे मंत्रासी ॥ करावे जगती छंदासी ॥ विश्वेदेव
आंगिरस ऋषी ॥ निषाद स्वर जाणावा ॥ ४२ ॥ रूप असे कनकवर्ण ॥ भ्रुवो लला
ट स्पर्शेन ॥ प्राणायामेविनियोगेन ॥ न्यास कराभक्तीनें ॥ ४३ ॥ इतके न्यास करोनी

हस्तठेवा शिर स्थानी ॥ ध्यान करा विधानी ॥ सांगेन एका ब्राम्हणा हो ॥ ४४ ॥ शिर स्थान
स्पर्शासी ॥ म्हणा अनुष्टुप छंदासी ॥ उच्चारा प्रजापति ऋषी ॥ परमात्मा देव जाणा
॥ ४५ ॥ प्राणायामे वियोगोन ॥ मग करावे गायत्री ध्यान ॥ ओं आपोज्योति म्हणोन ॥ मं
त्र म्हणा भक्तीने ॥ ४६ ॥ ओं आपोज्योतिरसोमृत ॥ ब्रम्हभूर्भुवःस्वरो ॥ शिरसी येणे
विधी ॥ अंगन्यास करावे ॥ ४७ ॥ चोवीस अक्षरे मंत्रासी ॥ न्यास सांगेन एक एकासी
एकचित्ते परियेसी ॥ म्हणे पराशर ऋषी तो ॥ ४८ ॥ या त्रिपदा गायत्रीसी ॥ असे वि
श्वामित्र ऋषी ॥ देवी गायत्री छंदेसी ॥ वर्णदेवता सांगेन ॥ ४९ ॥ ऐसे त्रिपदा गाय

त्रीमंत्रासी ॥ चौवीसअक्षरे परियेसी ॥ पृथकन्यास परियेसी ॥ सांगेन ऐका द्विजोत्त
मा ॥ ५० ॥ तवर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ अग्निदेवता परियेसी ॥
गायत्री छंद म्हणावा ॥ ५१ ॥ अतसीपुष्पे वर्णे जिसी ॥ तद्रूप वर्ण असे परियेसी
वायव्यकोण स्थान त्यासी ॥ गुल्फन्यास करावा ॥ ५२ ॥ सिवर्णाक्षर मंत्रासी ॥
असे विश्वामित्र ऋषी ॥ वायुदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ५३
जंघास्थानी असे न्यास ॥ सौम्यरूपे पिवळे सुरस ॥ सर्वपापे दहनी परियेस
त्सवर्णाचे लक्षण ॥ ५४ ॥ विवर्ण नाम अक्षरासी ॥ जाणा निश्वामित्र ऋषी

सोमदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ५८ ॥ न्यास करावया जानुस्थान इंद्रनीळ
३१ विद्युद्वर्ण ॥ ऐसैं असे अक्षविधान ॥ मळारोग हरती देखा ॥ ५९ ॥ तुवर्ण नाम अक्षरासी ॥ अ
से विश्वामित्र ऋषी ॥ विद्युद्देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ६० ॥
न्यास करू जानुस्थानी ॥ दीप्ती असे जे सावन्ही ॥ रूप असे सोम्यपणी ॥ भ्रूणहत्यापा
पनाशी ॥ ६१ ॥ र्ववर्ण नाम अक्षरासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ सोमदेवता परियेसी ३१
देवी गायत्री छंद देखा ॥ ६२ ॥ स्रूवर्ण स्फटिकाकांती ॥ गुह्यस्थानी न्यास बोलती
समस्त अघौघ नासती ॥ रूप वर्णस्या नउजम ॥ ६३ ॥ रेवर्ण नाम अक्षर मंत्रासी

असेविश्वामित्रऋषी॥ वरुणदेवतापरियेसी॥ देवीगायत्रीछंददेखा॥ ६४॥ णीका
र वृषणस्थानजाणा॥ विद्युत्प्रकाशरूपधारणा॥ बार्हस्पत्यनामखुणा॥ अभक्ष्य
पापक्षाळण॥ ६५॥ णिवर्णाक्षरमंत्रासी॥ जाणावाविश्वामित्रऋषी॥ बृहस्पतीदे
वतापरियेसी॥ देवीगायत्रीछंदजाणा॥ ६६॥ यंकटिस्थानशांनारकावर्ण॥ देव
हत्यापापज्वलन॥ न्यासकरावेसगुण॥ विद्वजनब्राह्मणी॥ ६७॥ यंअक्षराम्हणा
वेयासी॥ असेविश्वामित्रऋषी॥ नारकादैवतपरियेसी॥ देवीगायत्रीछंदअसे
६८॥ भकारानाभिकरान्यास॥ कृष्णामेघवर्णस्फुरस॥ पर्जन्यदेवशंकाशा॥ गुरुहत्यापा

३२

पनाशी ॥ ६९ ॥ भवर्णनामअक्षरासी ॥ असेविश्वामित्रऋषी ॥ पर्जन्यदेवतापरियेसी ॥ दे
वीगायत्रीछंदजाणा ॥ ७० ॥ गोंअक्षररुद्ररन्मास ॥ ध्यानरक्तवर्णस्फुरस ॥ इंद्रदेवताप
रियेस ॥ गोहत्येचपापजाय ॥ ७१ ॥ गोंवर्णनामअक्षरासी ॥ जाणावाविश्वामित्रऋषी ॥
इंद्रदेवतापरियेसी ॥ देवीगायत्रीछंदजाणा ॥ ७२ ॥ देकारन्यासस्तनीयासी ॥ गंधर्ववा
मदेवपरियेसी ॥ स्त्रीहत्यापापनाशी ॥ येकचित्तेपरियेसा ॥ ७३ ॥ देवर्णनामअक्षरासी
जाणाविश्वामित्रऋषी ॥ गंधर्वदेवतापरियेसी ॥ देवीगायत्रीछंददेखा ॥ ७४ ॥ वका
रहृदयस्थानन्मास ॥ शुक्लवर्णरूपपरियेस ॥ पूषादेवताअसेयास ॥ वाणिजातपापनाशी ॥ ७५ ॥

३२

ववर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणावा विश्वामित्र ऋषी ॥ रुद्र देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा
७६ ॥ स्य अक्षरा कंठन्यास ॥ कांचनवर्ण रूपस्करस ॥ मित्र देवता परियेस ॥ मार्जार कुक्कुट पा
पजाय ॥ ७७ ॥ स्यवर्ण अक्षर मंत्रासी ॥ ब्रम्हा विश्वामित्र ऋषी ॥ मित्र देवता परियेसी
देवी गायत्री छंद जाणा ॥ ७८ ॥ धीकाराक्षरे मंत्रा दंती न्यास ॥ शुक्लकुमुदसंकाश ॥ त्व
ष्टा देवता परियेस ॥ पितृहत्या पापजाय ॥ ७९ ॥ धीवर्णनाम अक्षरासी ॥ जाणा विश्वा
मित्र ऋषी ॥ विष्णु देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८० ॥ मकारन्यास तालु
स्थान ॥ पद्म तेजोमय जाणा ॥ वासुदेव असे खुण ॥ सर्वजन्म पापजाय ॥ ८१ ॥ मकारवर्णा

।गुण-च०

३३

क्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ वामदेव देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८२
हिकारान्नासिकीं करान्यास ॥ शंखवर्णरूप असे त्यास ॥ वामदेव देवता परियेस ॥ सर्वपाप
हरेण होय ॥ ८३ ॥ हिवर्णनाम मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्रा ऋषी ॥ मेरूदेवता परियेसी ॥ दे
वी गायत्री छंद जाणा ॥ ८४ ॥ धिकाराने त्रस्थानी न्यास ॥ पांडुरभाससंकाशा ॥ सोमदेव
ता परियेस ॥ पाणिग्रहणपापनासी ॥ ८५ ॥ धिवर्णनाम अक्षरासी ॥ तो विविश्वामित्र ऋ
षी ॥ सोमदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८६ ॥ योकारक्षर मंत्रासी ॥ भुवो
र्मम ध्येन्यासिजे त्यासी ॥ रक्त गोरवर्ण रूपे सी ॥ प्राणिवध पाप जाय ॥ ८७ ॥ योकाक्ष

अ०

३६

३३

रुना माक्षरासी जाणा विश्वामित्र ऋषी ॥ यमदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ५५
योकारा ललाटस्थानी न्यास ॥ रूप लक्माभ संकाश ॥ सर्व पाप होय नाश ॥ भक्तिपूर्वक न्यासा
वें ८९ ॥ योवर्णाक्षर मंत्रासी ॥ नोचि विश्वामित्र ऋषी ॥ विश्वेदेव देवता परियेसी ॥ देवी
गायत्री छंद जाणा ॥ १० ॥ नकरा उदित प्रागमुखा ॥ सूर्यासमान तेज देखा ॥ अश्विनौ दे
वता असे निका ॥ विराजमान परियेसा ॥ ११ ॥ नकाराक्षर वर्णासी ॥ जोणा विश्वामित्र
ऋषी ॥ अश्विनौ देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ १२ ॥ प्रकाराक्षर न्यास करो
नि दक्षिणे ॥ रूप असे नीळवर्ण ॥ प्रजापती देवता जाण ॥ विष्णुसायुज्य पाविजे ॥ १३ ॥

प्रवर्णाक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ प्रजापति देवता परियेसी ॥ देवी गायत्री छं
द जाणा ॥ १४ ॥ चोकाराक्षर मंत्रासी ॥ न्यासिजे नयापश्चिमभागासी ॥ कुंकुमरूप वर्णसा
सी ॥ सर्वदेवपदवी पाविजे ॥ १५ ॥ चोकारवर्ण मंत्राक्षरासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ स
र्वदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ १६ ॥ दकाराक्षराचा उत्तरे न्यास ॥ शुक्लव
र्णरूप स्फुरस ॥ करावे तुम्ही ऐसे न्यास ॥ कैलासपद पाविजे ॥ १७ ॥ दकाराक्षर मंत्रासी
जाणा विश्वामित्र ऋषी ॥ रुद्रदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ १८ ॥ याकारा मू
र्ध्निस्थानी न्यास ॥ स्फुवर्णरूप स्फुरस ॥ ब्रह्मस्थानी होय वास ॥ श्रीगुरू म्हणती ब्राह्मणा

सी ॥ २१ ॥ या वर्णाक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ ब्रम्ह देवता परियेसी ॥ देवीगा
यत्री छंद जाणा ॥ ४०० ॥ तकारन्यास शिखास्थानी ॥ निरूपम वैष्णव भुवनी ॥ विष्णु
रूप धरोनी ॥ वैकुंठ वास होय जाणा ॥ १ ॥ नकार वर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋ
षी ॥ विष्णु देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ २ ॥ ऐसे चोवीस अक्षर मंत्रा
सी ॥ न्यास करावे विधीसी ॥ हस्त ठेऊनियां शिरसी ॥ आणीकन्यास करावे ॥ ३ ॥ शिर
स्थानी न्यासासी ॥ म्हणावे अनुष्टुप छंदासी ॥ ख्याती प्रजापति ऋषी ॥ परमात्मा दे
वता जाणा ॥ ४ ॥ प्राणायामे विनियोग म्हणोनी ॥ ओं आयस्तनयस्पर्शेनी ॥ ज्यो

तिर्नेत्रस्पर्शोनी ॥ रसोजिव्हान्यासावें ॥ ५ ॥ अमृतेनीललाटदेसी ॥ मूर्ध्निस्पर्शोनी ऐसी ॥ ब्रम्ह
भूर्भुवस्वरोमासी ॥ न्यासकरायेणेविधी ॥ ६ ॥ इतुकेन्यासकरोनी ॥ गायत्रीत्रिवारम्हणो
नी ॥ व्यापकन्यासकरोनी ॥ करशुद्धीकरातीनवेळा ॥ ७ ॥ भूर्भुवःस्वःविन्यस्य ॥ गायत्रीच्या
दशपदानी ॥ दशांगुळीन्यासोनी ॥ पादप्रमाणकरावें ॥ ८ ॥ अंगुष्ठमूळधरोनी ॥ कनिष्ठि
काग्रस्पर्शोनी ॥ उभयहस्तन्यासोनी ॥ दशपादांगुळीन्यासावें ॥ ९ ॥ चोवीसअक्षरमंत्रां ३५
सी ॥ अगुलीन्यासकराहेषी ॥ तर्जनीमूळदारभ्येसी ॥ कनिष्ठिकापर्यंत ॥ १० ॥ द्वादशाक्ष
री एकैकहस्त ॥ करावेन्यासकनिष्ठितें ॥ षडंगन्याससमस्त ॥ प्रणवासहितकरावे ॥ ११

ओं भूः हिरण्यात्मने ॥ अंगुष्ठाभ्यां नमः ॥ ओं भुवः प्रजापत्यात्मने ॥ तर्जनीभ्यां नमः
१२ ॥ ओं स्वः सूर्यात्मने मध्यमाभ्यां नमः ॥ ओं महः ब्रम्हात्मने अनामिकाभ्यां नमः ॥ ओं
जनः ओं तपः सत्यं कनिष्ठिकाय वौषट् ॥ प्रचोदयात् करतलकरपृष्ठ अस्त्राय
फट् ॥ १३ ॥ ओं तत्सवितुः अंगुष्ठाभ्यां हृदयाय नमः ॥ वरेण्यं तर्जनीभ्यां शिरसे स्वा
हा ॥ भर्गो देवस्य मध्यमाभ्यां शिखाय वौषट् ॥ धीमहि अनामिकाभ्यां कवचाय हुं
१४ ॥ धियो यो नः कनिष्ठिकाभ्यां नेत्रत्रयाय वषट् ॥ प्रचोदयात् करतलकरपृष्ठा
भ्यां नमः अस्त्राय फट् ॥ उभयहस्तांगुलीन्यासं कुर्यात् ॥ अथ षडंगन्यासः ॥ १५ ॥

ओं भूः हिरण्यात्मने हृदयाय नमः ॥ ओं भुवः प्रजापत्यात्मने शिरसे स्वाहा ॥ ओं स्वः
सूर्यात्मने शिखायै वषट् ॥ ओं महः ब्रम्हात्मने कवचाय हुं ॥ १६ ॥ ओं जनः ओं तपः
ओं सत्यं सूर्यात्मने नेत्रत्रयायै वुषट् ॥ प्रचोदयात् सर्वात्मने अस्त्राय फट् ॥ ओं
तत्सवितुर्हृदयाय नमः ॥ १७ ॥ ओं वरेण्यं शिरसे स्वाहा ॥ भर्गोदस्य शिखायै व
षट् ॥ धीमहि कवचाय हुं ॥ धियो यो नः नेत्रत्रयायै वषट् ॥ १८ ॥ प्रचोदयात् अ
स्त्राय फट् ॥ इति दिग्बंधः ॥ अंगन्यास दश स्थानी ॥ त्यांचीं नावें सांगेन कानी
एकचित्तें अवधारा ॥ १९ ॥ पाद जानु कटि स्थानी ॥ नाभि हृदय कंठ भुवनी ॥ ता

३६

त्रुनेत्रस्य शोर्नी ॥ ललाट शिरी दक्ष स्थान ॥ २० ॥ गायत्री मंत्राचा दाहा पदांसी ॥ दश
स्थान अंगन्यासी ॥ तत्सवितुर्वरिण्येसी ॥ भर्गोदेवस्य पंचम स्थान ॥ २१ ॥ धीमहि म्हणि
जे षष्ठ स्थान ॥ धियो सप्तम स्थान जाण ॥ योकाराष्टम अंगन्यास पूर्ण ॥ श्रीगुरु
म्हणती ब्राम्हणांसी ॥ २२ ॥ नकार नव मंत्र स्थान ॥ प्रचोदयात् दाहावें जाण ॥ अं
गन्यास येणे गुण ॥ करा तुम्ही द्विजोत्तमा ॥ २३ ॥ चतुविंशती अक्षरासी ॥ करावें
अंगन्यासासी ॥ पादांगुष्ठ स्पर्शे हर्षी ॥ शिखादारभ्य न्यासावे ॥ २४ ॥ तं अंगुष्ठां
भ्यां नमः ॥ संगुल्फयोर्नमः ॥ विं जंघयोर्नमः ॥ तुं जानुभ्यां नमः ॥ २५ ॥ वं ऊरुभ्यां

नमः॥ रें गुह्यायनमः॥ ण्यं वृषणायनमः॥ यं कटिभ्यां नमः॥ २६॥ भं नाभ्यो नमः॥ गों
उदरायनमः॥ दें स्तनयोर्नमः॥ वं हृदयायनमः॥ २७॥ स्यं कंठायनमः॥ धिं दंते
भ्यो नमः॥ मं तालवेनमः॥ हिं नासिकायै नमः॥ २८॥ धिं नेत्राभ्यां नमः॥ यो भ्रु
वोर्मध्यायनमः॥ योंललाटायनमः॥ नः प्राङ्मुखायनमः॥ २९॥ प्रं दक्षिणमु
खायनमः॥ चों पश्चिममुखायनमः॥ दं उत्तरमुखायनमः॥ यां मूर्ध्ने नमः॥
तूं शिखायै वषट्॥ ३०॥ ऐसे न्यास करोनी॥ पुनः पादांगुष्ठ धरोनी॥ कटीपर्यंत
न्यासोनी॥ ऊर्ध्वे न्यास करावे॥ ३१॥ नकारांत गुह्यस्थान॥ स्फकारा गुल्फ असे स्था

न ॥ विकाराजंघास्थान ॥ ऐकाब्रा म्हणम्हणती गुरू ॥ ३२ ॥ नुकार जानु र कार उरु ॥ वका
र गुह्यपूर्वक स्पर्शा ॥ णिकारा वृषणस्थान बरवें ॥ यकार कटिस्थानमास ॥ ३३ ॥ शि
खाधरोनि पाद पर्यैत ॥ करावेन्यास उतरत ॥ त्यातें सांगेन आदि अंतें ॥ एकचित्तें परि
येसा ॥ ३४ ॥ तं मनः शिखायै विन्मस्य ॥ यां नमः मूर्ध्नि विन्यस्य ॥ दं नमः उत्तरशिखा
यां न्यस्य ॥ चों नमः पश्चिमशिखाया ॥ ३५ ॥ मेंनमः दक्षिणशिखायां ॥ नः नमः भ्राऊ
मुखे ॥ यों नमः ललाटे ॥ यों नमः भ्रुवोर्मध्ये ॥ ३६ ॥ धिं नमः नेत्रत्रये ॥ हिं नमः नासि
कयोः ॥ मं नमः तालौ ॥ धिं नमः दंतेषु ॥ ३७ ॥ स्यं नमः कंठे ॥ वं नमः हृदये ॥ दें नमः स्तनयोः ॥

गौंनमः उदरे ॥ ३८ ॥ भंनमः नाभौ ॥ प्रणवादिनमोंतेन्यासमकरावे ॥ अकारनाभीऊका
रहृदय ॥ मकारमुखे ॥ नकारललाटे ॥ मकारशिरशी हस्तेनमस्कृत्वा ॥ ३९ ॥ अथमु
द्रासंपुट प्रकारी ॥ चतुर्विंशति अवधारी ॥ सांगेनत्यांचाविस्तारपरी ॥ एका ब्राम्ह
णे एकचित्ते ॥ ४० ॥ श्लोक ॥ सुमुखंसंपुटंचैवविततंविस्तृतंतथा ॥ द्विमुखंत्रि
मुखंचैव चतुःपंचमुखंतथा ॥ ४१ ॥ षण्मुखाधोमुखंचैवव्यापकंजलिकंत
था ॥ शकटंयमपाशंच ग्रथितंचोल्मकोल्मुकं ॥ ४२ ॥ प्रलंबंमुष्टिकंचैवम
त्सकूर्मोवाराहकम् ॥ सिंहाक्रांतंमहाक्रांतंमुद्गरेपल्लवेतथा ॥ ४३ ॥ एतामु

द्रान्जानातिगायत्रीनिष्फलाभवेत् ॥ एतामुद्रासुकर्तव्यागायत्रीसुप्रतिष्ठिता
म् ॥ ४४ ॥ अस्यार्थः ॥ सुमुखं १ ॥ संपुटं २ ॥ विततं ३ ॥ विस्तृतं ४ ॥ द्विमुखं ५ ॥
त्रिमुखं ६ ॥ चतुर्मुखं ७ ॥ पंचमुखं ८ ॥ षण्मुखं ९ ॥ अधोमुखं १० ॥ व्यापकां
जलिकं ११ ॥ शकटं १२ ॥ यमपाशं च १३ ॥ ग्रंथितं १४ ॥ चोल्मुकोल्मुकं १५ ॥
प्रलंबं १६ ॥ मुष्टिकं १७ ॥ मत्स्यः १८ ॥ कूर्मः १९ ॥ वराहः २० ॥ सिंहाक्रांतं ॥
२१ ॥ महाक्रांतं ॥ २२ ॥ मुद्गरं ॥ २३ ॥ पल्लवं ॥ २४ ॥ मुद्राविणे गायत्री मंत्र ॥ जपक
रितां सर्वव्यर्थ ॥ याकारणे करावे पात्र ॥ मुद्रापूर्वकि जपकरावा ॥ ४५ ॥ गोप्यक

रावामुद्राजप॥ प्राणायाम करावा निश्चित॥ समस्त पापक्षयार्थ॥ म्हणोनी अष्टोत्तरी
यसंकल्पावे॥ ४६॥ या गायत्री प्रथम पादासी॥ म्हणा ऋग्वेद असे ऋषी॥ भूमितत्वपरि
येसी॥ ब्रम्ह देवतो त्रिष्टुप छंद॥ ४७॥ द्वितीयपाद गायत्रीसी॥ यजुर्वेद असे ऋषी
रुद्र देवता प्राणापाने आनतत्वेसी॥ जगती म्हणा अहर्निशी॥ ४८॥ गायत्री तृतीय
पादासी॥ ऋग्यजुः सामतत्वपरियेसी॥ विष्णु देवता त्रिष्टुप छंदेसी॥ समस्त पाप
क्षयार्थ विनियोग॥ ४९॥ भूमिस्तंभ परियेसी॥ गायत्री छंदासी॥ म्हणावे ब्रम्हप
दासी॥ ब्रम्हा देवत जाणावें॥ ५०॥ गायत्रीचे ध्यान॥ सांगेन तुम्हा विधाने॥ एकचित्ते

करा पठण ॥ श्रीगुरू म्हणती ब्राह्मणासी ॥ ५१ ॥ मुक्ताविद्रुमहेमनिलधवलछायेर्मु
खैस्तीक्षणैर्युक्तामिंदुकलानिबद्धमुकटांतत्वार्थवर्णात्मिकाम् ॥ गायत्रीवर
दाभयांकुशकुशांशुभ्रंकपालंगुणशंखंचक्रमथारविंदयुगुलंहस्तैर्वहंतीभजे
तू ॥ ५२ ॥ ऐसे ध्यान करोनी ॥ जप करावा नासिकाग्रनयनी ॥ अंती षडंग मासो
नी ॥ जप करायूणे परी ॥ ५३ ॥ गायत्रीमंत्राची प्रशंसा ॥ एकचित्तें परियेसा ॥ मंत्र
नाम असे विशेषा ॥ अक्षर दोनी पापहर ॥ ५४ ॥ मकार म्हणिजे आपुले मन ॥ त्र
कार नाम आपला प्राण ॥ मन प्राण एकवटोन ॥ जप करावा एकेचित्तो ॥ ५५ ॥ जप म्ह

४० म्हणिजे अक्षरे दोनी ॥ प्रख्यात असती त्रिभुवनी ॥ जकार जन्म विच्छे दोनी ॥ पकारें ज
न्मं पापहरी ॥ ५६ ॥ चारी वेदां समूळ एक ॥ गायत्री नाम नाशि पातक ॥ याचि कार
णे जप करावा निका ॥ वेदपठणाचें फळ असे ॥ ५७ ॥ ऐसा मंत्र न जपे नर ॥ वृथा जन्म
जेसा भूकर ॥ जप करा हो निर्धार ॥ चिंतिलें फळ पाविजे ॥ ५८ ॥ न करावा उदकीं
बैसोन ॥ त्वरित होय प्रज्ञाहीन ॥ याचि कारणे सांगेन विस्तारोन ॥ अग्नि तीन वि ४०
प्रमुखीं ॥ ५९ ॥ आहवनीय गार्हपत्य ॥ दक्षिणाग्नि असे विख्यात ॥ अग्नि उदकसंप
र्कें त्वरित ॥ तेज त्वजाय अग्नीचें ॥ ६० ॥ या कारणे उदक वर्जोनी ॥ बैसी जे उत्तम

आसनी ॥ हस्तस्पर्शोनाभिस्थानी ॥ जपावा माळा धरोनियां ॥ ६१ ॥ उभेनीज पा
वा प्रातःकाळी ॥ बैसोनि कीजे माध्यान्हकाळी ॥ अथवा उभा ठाकोनी ॥
उभय पक्षी करावा ॥ ६२ ॥ माध्यान्ही हृदयस्थानी ॥ जपावा माळा धरोनी ॥
हस्त मुखे स्पर्शोनी ॥ सायंकाळी जपावा ॥ ६३ ॥ बैसोनि जप सायंकाळी ॥ पाह
वा वृक्षा निर्मळी ॥ जरी वृक्ष न सेजवळी ॥ नासाग्रनयनी जपावा ॥ ६४ ॥ ब्र
ह्मचारी गृहस्थासी ॥ जप नेमिला अष्टोत्तरेसी ॥ वानप्रस्थ संन्यासियासी
सहस्त्रमुख केरावा ॥ ६५ ॥ संधिविग्रह होय जरी ॥ अष्टाविंशति तरी करी ॥

अशक्त होय जरी ॥ आठ वेळ जपावा ॥ ६६ ॥ उत्तम पक्ष मानसीं ॥ मध्यम गोप्येंस
मुखेंसी ॥ अक्षरें न कटवाक्येंसी ॥ कनिष्ठ प्रकार परियेसा ॥ ६७ ॥ त्रिपदा असे गा
यत्री ॥ मिळोनि न म्हणावी परियेसी ॥ म्हणतां होय महादोषी ॥ महानरक अवधा
रा ॥ ६८ ॥ गायत्री मंत्र उच्चार ॥ ओंतत् ० पृथक् करोनि त्रिपादासीं ॥ जपावा मंत्र
अतिहर्षी ॥ ब्रम्हहत्यादि पापे नासी ॥ अनंत पुण्य लाधिजे ॥ ६९ ॥ अंगुष्ठ जपें
एक पुण्य ॥ पर्वांगुलीनें दशगुण ॥ शंखमाणिनें होय शतगुण ॥ प्रवाळमाळा
सेहस्र फळ ॥ ७० ॥ स्फटिकमणी दाहासहस्र ॥ मौक्तिकें पुण्य लक्षाधिक ॥ प

द्राक्षीं निर्गुण्य जप ॥ दशलक्षपुण्य असे ॥ ७१ ॥ कोटिगुणे सुवर्णमाळा ॥ कुश रुद्राक्ष
अनंत फळा ॥ जप करावा नित्यकाळ ॥ गोप्यमाळा धरोनियां ॥ ७२ ॥ गोप्य माळा कर
कमळीं ॥ जप करा निजनिश्चळी ॥ सोख्य पावे अनंत फळी ॥ श्रीगुरु म्हणती ब्रा
ह्मणातें ॥ ७३ ॥ जप करितां नुलंघिजे मेरु ॥ उलंघितां पापें बोलिले अपारु ॥
प्राणायाम केलिया त्रिवार ॥ मेरु लंघन पाप जाय ॥ ७४ ॥ गायत्री जपती नरदि
वस ॥ नत्यहि करावा एकादश ॥ सर्वपातके होती नाश ॥ त्रिरात्रीचें पाप जाय ॥ ७५ ॥
अष्टोत्तरशत जप करितां ॥ अघोर पातक जाय त्वरिता ॥ करोनि सहस्त्र जप एकाग्र

गु० च०

४२

ता॥ उपपातकें नासती ॥ ७६ ॥ महांपातकादि दोषासी ॥ कोटि जप करावा परि ये
सी ॥ जें जें कार्य इछिसी ॥ त्वरित होय अवधारा ॥ ७७ ॥ जप करावा मन दृढें ॥ न
पाहावें मागें पुढें ॥ शूद्रादिक यातीं कडे ॥ संभाषण न करावें ॥ ७८ ॥ द्रव्य घेवोनि
एकापासीं ॥ जपतां होय अनंत दोषी ॥ चांडाळ योनींत भरवसी ॥ जन्म पावे परि
येसा ॥ ७९ ॥ कंडूयनूं न ये देह आपला ॥ नेणतां जरी इतुके घडेलें ॥ श्रोत्राच
मन करावहिलें ॥ दोष नाहीं अवधारा ॥ ८० ॥ ब्राम्हणाचे दक्षिण कानीं ॥ दश
देवता एका निर्गुणी ॥ स्पर्श करितां न लक्षणी ॥ पापें जाती परियेसा ॥ ८१ ॥ दे

अ०
३६

४२

ष्टी पडताचांडाळासी ॥ द्विराचमनें शुद्ध होसी ॥ संभाषण झालिया पतितासी ॥ आ
चमन स्नान करावें ॥ ८२ ॥ जपतां निद्रा येई जरी ॥ अधोवायू जाभयी आलिया
वरी ॥ क्रोधरूपें जपतां जरी ॥ पापरूप अवधारा ॥ ८३ ॥ मौन्य करावे हें उत्तम
अगत्ये बोलिजे संधिविषम ॥ तद्विष्णो मंत्र जपतां कूर्म ॥ पापे जाती सेकळि
क ॥ ८४ ॥ नेणतां घडे इतुकें जरी ॥ आचमन करावे श्रोत्री ॥ अग्निसूर्ये धेनु द
र्शन करी ॥ विष्णुमंत्र जपावा ॥ ८५ ॥ ऐसा जप करावा विधीने ॥ मनकामना होय पू
र्ण ॥ ऐकती समस्त ऋषिजन ॥ म्हणोनि सांगे पराशर ॥ ८६ ॥ गायत्री जपावी ऐ

सी ॥ प्रातःकाळी मित्रस्य ऋषी ॥ उदित्य मंत्र माध्यान्हेसी ॥ इ मंमेवह्मण सायंकाळी
८७ ॥ शाखापरत्वे मंत्र असती ॥ ह्मणांवे विधी जैसे असती ॥ गोत्र प्रवर ह्मणा भ
क्ती ॥ स्वइछाचाराप्रमाणे ॥ ८८ ॥ चारी दिशा नमोनी ॥ प्रदक्षिणा करावी सेगुणी
गोत्र प्रवर उच्चारोनी ॥ नमस्कार करावे परियेसा ॥ ८९ ॥ ऐसी संध्या करोनी ॥ म
ग करावे औपासन ॥ सांगेन त्याचें विधान ॥ श्रीगुरू ह्मणती ब्राह्मणासी ॥ ९०
सायंप्रातर्वेळा दोन्हीं ॥ औपास करावे सगुणी ॥ मिळोनि न करावे द्विजजनी
सर्वानि पृथकू काळ हेचि जाणा ॥ ९१ ॥ न करावे वेळणी अकंद्यात ॥ भूमीवरी

करा नित्य ॥ स्थंडिली करावे विहित ॥ अथवा उदकें सारवावें ॥ १२ ॥ कुंड स्थापोनि अग्नीसी क
रावें नित्य उपासनेसी ॥ वारा घालूं नये त्यासी ॥ हातें पर्णी आणि स्रुपें ॥ १३ ॥ व्याधिष्ठ होय प
र्णवातें ॥ स्रुपें दरिद्र धनक्षय ॥ मुखें फुंकिलिया आयुष्य जाय ॥ हस्त मुकी होय मृत्यु ॥ १४
फुंकणी अथवा विझण्यासी ॥ वायू घालावा अग्नीसी ॥ काष्ठें समृद्धी परियेसी ॥ ज्वलि
त असावा अग्नि देखा ॥ १५ ॥ ज्वाळा निघती जये स्थानी ॥ आहुती घालावी तया वदनी ॥
समिधा आणाव्या ब्राह्मणी ॥ शूद्रहस्तें घेऊं नये ॥ १६ ॥ समिधा पुष्पें दूर्वादि खी ॥ आणू
नये शूद्रादिकी ॥ होमद्रव्यें होती विशेषी ॥ सांगेन नावें परियेसा ॥ १७ ॥ साळी सावे नीवार ॥ तांदु

लअसतीमनोहर॥गोधूमजवनिर्धार॥यावनाकमुरव्यअसे॥९८॥साठीदाणेंमिति
प्रमाण॥आहुतीमुरव्यकारण॥अधिकनविजेअथवान्यून॥घृतसंपर्कपैकीजे॥९९॥
घृतनसेलसमयासी॥तीळपवित्रहोमासी॥तिळांचेतेलपरियेसी॥तेंहीपवित्रअसेदे
रवा॥५००॥ओपासनाकेलियावरी॥ब्रम्हयज्ञतर्पणाचियेपरी॥सांगेनविधीअव
धारी॥श्रीगुरुम्हणतीब्राम्हणासी॥१॥मुरव्यसकळमाध्यान्हीं॥ब्रम्हयज्ञकरावाब्रा
म्हणी॥उपासनादिकर्मकरोनी॥मगकरावाब्रम्हयज्ञ॥२॥उदकसंन्निधमुरव्यस्था
नी॥करावेंतर्पणब्रम्हयज्ञी॥प्राणायामतीनकरोनी॥विद्युदसीमंत्रजपावा॥३॥दू

र्वा घेवोनि दक्षिणकरीं ॥ पूर्वमुख अथवा उत्तरीं ॥ बसावें वामपादावरी ॥ दक्षिण पाद
ठेवोनी ॥ ४ ॥ उभयहस्त संपुटेसी ॥ ठेवावे दक्षिणजानुवांसी ॥ म्हणावे तीन प्रणवांसी ॥
मग म्हणावें ऋचाक्षर ॥ ५ ॥ भूर्भुवः स्वः म्हणोनी ॥ त्रिपदा गायत्री म्हणोनी ॥ तत्स
वितुर्वरेण्यं म्हणोनी ॥ मग जपाची दशवेळें ॥ ६ ॥ स्वाध्याय दिवसासी ॥ म्हणावा वे
द यथाशक्तीसी ॥ अनध्या होय ज्यादिवसीं ॥ एक ऋचा म्हणा पन्नास ॥ ७ ॥ तें हीन
येये स्वाध्यासी ॥ मंत्र म्हणावा विशेषी ॥ नमो ब्रम्हणे मंत्रासी ॥ तीन वेळा जपावा ॥ ८
वृष्टिरसि म्हणोनि मंत्रासी ॥ जपूनि स्पर्श किउदकासी ॥ तर्पण करावे पतियेसी ॥ ऐका ब्रा

म्हण एकचित्तें ॥ ९ ॥ ब्रम्हयज्ञ करावयासी ॥ द्रव्यदर्भ परियेसी ॥ वसुरुद्र आदित्यांसी ॥ तृ
प्त समस्त देवपितर ॥ १० ॥ ऐखादे दिवसी नु घडे जरीं ॥ अथवा होय समय रात्री ॥ जपक
रावा गायत्री ॥ वेदपठण फळ असे ॥ ११ ॥ देवतर्पण कुशाग्रेसी ॥ मध्यस्थानानें तृऋ
षी ॥ मुळानें पितृवर्गासी ॥ तर्पण करावें परियेसी ॥ १२ ॥ न करावें तर्पण पात्रांत ॥ न घ्यावें
आपण उदकांत ॥ भूमीवरी घरीं नित्य ॥ निषिद्ध असे करूनये ॥ १३ ॥ दर्भ टेउनी भू
मीवरी ॥ तर्पण करावें अवधारी ॥ विधियुक्त भक्तिपुरस्सरी ॥ श्रीगुरु म्हणती ब्राम्ह
णासी ॥ १४ ॥ तीळ धरूनि आपल्या करी ॥ तर्पण करावें अवधारी ॥ टेऊनये शिळेवरी

त

र्पण करावें अवधातीं ॥ ढेकुन ये शिळेवरी ॥ भूमि काष्ठ पात्री देखा ॥ १५ ॥ रोमकूपादि
स्थानी देखा ॥ तीळ देवितां पावती दुःखा ॥ तीळ होती कृमी ऐका ॥ निषिद्ध बोलिजे
स्थानें पांच ॥ १६ ॥ घरीं तर्पण करावयासी ॥ तीळ अग्राह्य परियेसी ॥ करावे आपण
उदकासी ॥ ऐका समस्त ऋषिजन ॥ १७ ॥ श्वेत तीळ देवासी ॥ धूम्रवर्ण ऋषिजनां
सी ॥ कृष्णवर्ण पितरांसी ॥ तीळ तर्पण करावें ॥ १८ ॥ यज्ञोपवीती सव्य देवासी ॥
उंपवीती करावी ऋषीसी ॥ अपसव्य पितरांसी ॥ तर्पण करावें येणेतिती ॥ १९ ॥ देवां
सीं अंजुळी एक ॥ प्रत्येक ऋषीसी अंजुळी द्वय ॥ पितरांसी अंजुळी त्रिक तर्पण ऐसे क

पु० च०

अ०

३६

४६ रावें ॥ २० ॥ स्त्रियांसी अंजुळी एक देखा ॥ अतिरिक्त माता बंधूसी ऐका ॥ सापत्नी आवा
ये पत्नी नामिका ॥ द्वयांजुळी करावे ॥ २१ ॥ देव ब्रह्म ऋषेश्वरांसी ॥ अक्षता मुख्य तर्पणा
सी ॥ कृष्णा तीळ तर्पण पितरांसी ॥ अनंत पुण्य परियेसा ॥ २२ ॥ आदित्य शुक्र वारेंसी
प्रतिपदा मघा नक्षत्रासी ॥ षष्ठी नवमी एकादशीसी ॥ तीळ तर्पण करूं नये ॥ २३ ॥ अ
थवा विवाह उपनयनासी ॥ जन्मनक्षत्र जन्मदिवसी ॥ आपल्या घरी शुभदिवसीं ॥ ४६
तीळ तर्पण करू नये ॥ २४ ॥ जरीं करावे तर्पण ॥ उदके मुख्य आपण ॥ मुद्रिका हस्ती
असे स्वर्ण ॥ दर्भपवित्रे करावें ॥ २५ ॥ पायन धुतां मंगळस्नान ॥ तिळेवीण करितां

तर्पण ॥ श्राद्ध करी दक्षिणेविण ॥ निष्फळ असे अवधारीं ॥ २६ ॥ निषिद्ध बोलिले ज्या दि
वसी ॥ तर्पण न करावे परियेसी ॥ दीपवाळीची चतुर्दसी ॥ करावे तर्पण परियेसा ॥ २७
अंगारक कृष्ण चतुर्दशी ॥ करावें तर्पण विशेषी ॥ यमाचे नामें संतोषी ॥ यज्ञोपवी
त सव्यानें ॥ २८ ॥ एकैक तीळ घेवोनी ॥ त्रिवार अंजुळी देवोनी ॥ यमाचे नाम उ
च्चारोनी ॥ तर्पण करा भक्तीने ॥ २९ ॥ यमाची नावे त्रयोदश ॥ सांगेन ऐका विस्ता
रास ॥ यम धर्मराजा नामे परियेस ॥ मृत्यु अंतक चौथा जाणा ॥ ३० ॥ वैवस्वत काळ
देखा ॥ सर्वभूतक्षय ऐका ॥ आठवा औदुंबर नासिका ॥ नीलय परमेष्टी दाहा जा

४७

णा ॥ ३१ ॥ वृकोदर चित्ररेखा ॥ चित्रगुप्त त्रयोदशिका ॥ प्रत्येक नामें म्हणोनि ति
का ॥ नदीत द्यावे परियेसा ॥ ३२ ॥ समस्त पातके नासती ॥ रोग राई न पीडिती ॥ अ
पमृत्यु कधी न येती ॥ ग्रह पीडा न बाधे ॥ ३३ ॥ शुक्ल पक्षी माघ मासी ॥ तर्पण करा
वे अष्टमीसी ॥ भीष्म नामे परियेसी ॥ वर्षपातके परिहरती ॥ ३४ ॥ ऐसे तर्पण करोनी
सूर्यनामें अर्घ्यो तिन्ही ॥ द्यावी समस्त द्विजजनी ॥ म्हणे नृसिंहसरस्वती ॥ ३५ ॥
सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ कृपामूर्ती स्वामी विधिवर्मासी ॥ सांगता झाला ब्रा
म्हणासी ॥ येणे परी विहिताचार ॥ ३६ ॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ ऐसा ब्राम्हणा

४७

चा आचार ॥ वर्ततां होय मनोहर ॥ सर्वाभीष्टे साधतील ॥ ३७ ॥ इति श्रीगुरुचरित्रें
मृत ॥ नामधारकशिष्यसंवाद ॥ वेदोपनिषद्मथितार्थ ॥ आचारनिरोपणो
ऽध्याय हा ॥ ३८ ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्यनें ॥ सिद्धनामधारक
संवादे कर्ममार्ग आचारनिरूपणं नाम षटत्रिंशातितमोऽध्यायः ॥ ३६ ॥
श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ श्रीकृष्णाचेरणारविंद ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥
॥ ओव्यासंख्या ॥ ५३८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी शिष्यासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ श्रीगु
रू सांगती विस्तारेंसी ॥ काय निरोपिलें यानंतर ॥ १ ॥ ऐकें नामधारका सगुणा ॥ जा
णे सर्व आचार खुणा ॥ श्रीगुरु अवतार नारायणा ॥ सांगतसे रूपेसी ॥ २ ॥ त्रैमूर्ति
चा अवतारास ॥ आचार सांगतां काय प्रयास ॥ ज्ञान देऊनी पतितास ॥ वेद म्हण
विलें कवणेपरी ॥ ३ ॥ ऐसा गुरुमूर्ती दातारु ॥ भक्तजन कल्पतरू ॥ सांगते ज्ञाले
आचारु ॥ कृपा करोनि विप्रासी ॥ ४ ॥ श्रीगुरु म्हणती ब्राम्हणासी ॥ गृहरक्ष
णार्थ कारणासी ॥ अग्निमंथन काष्ठासी ॥ संपादावें कृष्णाजिनें ॥ ५ ॥ श्रीखंड

१ दिनामें घ्यतें ॥ तीळकृष्णांजिनछागवस्त्रें ॥ इतुकी असावी पवित्रे ॥ दुरितें बाधा
करूं न शकती ॥ ६ ॥ शुक्लपक्षीमारसांसी ॥ असावें घरी परियेसी ॥ समस्तपापवि
नासी ॥ धेनु असावी आपले घरी ॥ ७ ॥ देवपूजेचे विधान ॥ सांगेन ऐका एकम
न ॥ गृहाबरवे संमार्जन ॥ देवगृह असावें ॥ ८ ॥ हिरण्यरौप्यताम्रेसी ॥ अथवा
मृत्तिकापात्रेसी ॥ संमार्जन करावें विधीसी ॥ निषिद्ध पात्रें सांगेन ॥ ९ ॥ कां
स्यपात्रीं कन्यकाहस्ती ॥ नोवरी अथवा शूद्रजाती ॥ न करावें वस्त्र धरूनि १
हाती ॥ दक्षिणहस्तीं सारवावें ॥ १० ॥ प्रारंभ केरावा नेऋत्यकोनी ॥ रात्रीं न क

रावें उदक घेऊनी ॥ अगत्य घडे करणे जनी ॥ भस्मे करोनि सारवावें ॥ ११ ॥ रंग
माळिका घालोनी ॥ निर्मळ असावे देवताभुवनी ॥ मग बैसोनि सिंहास
नी ॥ देवपूजा करावी ॥ १२ ॥ जैसी संध्या ब्राम्हणासी ॥ देवपूजा करावी तैसी ॥
त्रिकाळ करावे अर्चनासी ॥ एकचित्तें मनोभावें ॥ १३ ॥ त्रिकाळ न घडे ज्यासी
प्रातःकाळी करावी हर्षी ॥ ते हि न साधे परियेसी ॥ मध्यान्हकाळी करावे ॥ १४ ॥
सायंकाळ मंत्रेसी ॥ पुष्पें वाहोनि भक्तीसी ॥ ऐसं न साधे जयासी ॥ भोजन
काळी करावें ॥ १५ ॥ देवपूजा न करी नर ॥ पावे त्वरित यमपुर ॥ नरकभोगी नि

२ रंतर ॥ ऐका ब्राह्मण एकचित्ते ॥ १६ ॥ विप्रकुळीं जन्म जयासी ॥ पूजा न करितां जेवी
हर्षी ॥ तोचि होय यमग्रासी ॥ वैश्वदेव न करीनर ॥ १७ ॥ देवपूजा करावयासी ॥ सा
हा प्रकार परियेसी ॥ उदकीं नारायण विशेषी ॥ पूजितां लक्षी जगन्नाथ ॥ १८ ॥ दु
सरा प्रकार सांगेन ऐका ॥ अग्निदेवता पूजा अधिका ॥ मानें पूजा अतिविशेषा स
क ऐचितें परियेसा ॥ १९ ॥ सूर्यपूजा करितां जाण ॥ संतुष्ट होय नारायण ॥ समा
मपक्षे स्थंडिलें जाण ॥ प्रतिमा पूजा स्वल्पबुद्धी ॥ २० ॥ ज्ञोता असेल बुद्धिमंत २
यज्ञ पूजा करावी त्वरित ॥ स्वर्गापवर्गद पूजा घेत ॥ यज्ञपुरुष पूजा मुख्य जाण ॥

॥२१॥ अथवा पूजावे धेनूसी ॥ ब्राम्हण पूजा विशेषी ॥ गुरु पूजा मनोभावेसी ॥ प्रत्य
क्षतु हे गुरु मूर्ती ॥ २२॥ गुरु त्रैमूर्ति म्हणोनी ॥ बोलती समस्त वचनी ॥ सकळाभी
ष्टे तया पासुनी ॥ पाविजे चारी पुरुषार्थ ॥ २३॥ कळि प्रवेश होतां नर ॥ न करिती
अंतःकरण स्थीर ॥ उत्पती केली शारंगधर ॥ समस्त लोक उद्धरावया ॥ २४॥ शा
ळिग्राम चक्रांकितासी ॥ प्रकाश केला हृषीकेशी ॥ तीर्थ घेतां परियेसी ॥ समस्त
पापे नासती ॥ २५॥ आज्ञा घेउनी श्रीगुरुची ॥ पूजा करावी प्रतिमेची ॥ वेदोक्त
मंत्रें करोनि वाची ॥ विधिपूर्वक पूजावें ॥ २६॥ स्त्रीजनादि शूद्रासी ॥ न म्हणावे मं

३

त्रेसी ॥ आगमोक्त मार्गेसी ॥ गुरुनिरोपें करावें ॥ २७ ॥ श्रीगुरूच्या निरोपाने ॥ पूजी
जे काष्टपाषाणे ॥ तेचि होवो निदेव जाणे ॥ होती प्रसन्न परियेसा ॥ २८ ॥ सुची आस
नी बैसोनी ॥ करावे प्राणायाम तिन्ही ॥ येभ्यो माता म्हणोनी ॥ चेतवा परमात्मा ॥ २९ ॥
प्रणवमंत्रोनि द्वादशा ॥ उदक प्रोक्षावें आपुल्या शिरसा ॥ संकल्प करोनि अंगमा
स ॥ कलशपूजा करावी ॥ ३० ॥ देवाच्या दक्षिणभागेसी ॥ कलश ठेवावा परियेसी
पूजा करोनि भक्तीसी ॥ शंखपूजा करावी ॥ ३१ ॥ निर्माल्य काटनि विनयेसी ॥ टा
कावे तेथूनि नैर्मल्येसी ॥ धौतवस्त्र हातराहर्षी ॥ दीप प्रज्वलित करावा ॥ ३२ ॥

३

धरावें मनी श्रीगुरूसी ॥ मनसा वाचा कायेसी ॥ अर्चन करावें पीठासी ॥ विधिपू
र्वक अवधारा ॥ ३३ ॥ ध्यारी द्वारे पुजोनी ॥ दिशा पूजा ध्या अर्चोनी ॥ शांताकारे
करा ध्याऊनी ॥ मग आवाहना वेमंत्रोक्त ॥ ३४ ॥ सहस्रशीर्षा आवाहनी ॥ पुरु
ष एवेद आसन मनी ॥ एतावानस्य म्हणोनी ॥ पाद्य द्यावें अवधारा ॥ ३५ ॥ मं
त्र म्हणोनि त्रिपादूर्ध्व स्या ॥ अर्घ्य द्यावें परियेसा ॥ तस्माद्विराळ म्हणा ऐसा ॥
देवासी आचमनु सिमपावि ॥ ३६ ॥ यत्पुरुषेण इति मंत्रेसी ॥ स्नपन करावे देवासी
पंचामृतासी दुग्धेसी ॥ स्नपन पूजा करावी ॥ ३७ ॥ पुरुषसूक्तादि रुद्रेंसी ॥ श्रु

४ ति मार्गे करोनि न्यासासी ॥ स्नपन करावें परियेसी ॥ एकचित्तें अवधारा ॥ ३८ ॥ स्नपन
करूनि देवासी ॥ बैसवावे शुभ आसनेसी ॥ तं यज्ञेति मंत्रेसी ॥ वस्त्रें द्यावीं परियेसा ॥ ३९
तस्माद्यज्ञेति मंत्रेसी ॥ यज्ञोपवीत्र द्यावे देवासी ॥ येनेच्चि मंत्रे गंधाक्षतेसी ॥ वाहा
वे मंत्रे भक्तीने ॥ ४० ॥ तस्मादश्वा अजायंत ॥ ऐसा तुम्ही मंत्र म्हणता ॥ पुष्पें वाहावी
एकचित्त ॥ मनःपूर्वक देवासी ॥ ४१ ॥ पुष्पे वहाव याचें विधान ॥ सांगेन ऐको क्र ४
पीजन ॥ आपण म्रेतिली कुसुमें सगुण ॥ उत्तम पक्ष परियेसी ॥ ४२ ॥ पुष्पें असती
अरण्यांत ॥ तीं मध्यमः प्रःकार बोलिजेत ॥ क्रय करोनि घेतां विकत ॥ अधम पुष्पे

जाणिजे ॥ ४३ ॥ उत्तम मन मिळतां घ्यावी विकृत ॥ उत्तम पक्षपुष्प श्वेत ॥ रक्त मध्यम अ
धम पीत ॥ कृष्ण चित्र अधमाधम ॥ ४४ ॥ वर्जावे शिळे पुष्प देख ॥ सछिद्र अथवा
कृमिभक्षित ॥ भूमीवरी पडी आपोआप ॥ पुष्प त्यजावें देवासी ॥ ४५ ॥ शिळें न व्हे सछि
द्र जाणा ॥ बिल्वपत्रें तुळसी आपण ॥ सहस्रपत्रें कमळें जाण ॥ सदा ग्राह्य देवासी
४६ ॥ शतपत्रे बकुल चंपकासी ॥ पाठलें कमळें पुनागेसी ॥ गह्लिकार्जुन करविरा
सी ॥ कल्हारपुष्पें अर्पावीं ॥ ४७ ॥ विष्णुपूजा करावयासी ॥ वर्जावीं पुष्पें तुम्ही
ऐसी ॥ धत्तूर अर्क कंचन विह्वारेसी ॥ रक्त करवीरें त्यजावीं ॥ ४८ ॥ गिरिकर्णी कानि

५

गंडिंसी ॥ सेवगा कपित्थ करंजेसी ॥ आमर पत्र कूष्मांड हर्षी ॥ पुष्पें विष्णूसी वर्ज्यावीं
॥ ४९ ॥ हीं वाहिलिया होय दोषी ॥ सांगेन ऐका समस्त ऋषी ॥ पूजा करितां विष्णूसी ॥ य
जावी याचि कारणें ॥ ५० ॥ अर्कपुष्प वाहिलेसी ॥ विनाश होय आपणासी ॥ धत्तूर पु
ष्पें पुण्य नासी ॥ कोविदारे दरिद्रता ॥ ५१ ॥ श्रीकर्णिका पुष्पें वाहत ॥ कुळक्षय होय
त्वरित ॥ कंदकारी पुष्पें वाहात ॥ शोक होय परियेसा ॥ ५२ ॥ कुंद जे पुष्पें होय दुःख
शालमृली पुष्पें होय रोग ॥ त्याचि कारणें विवेकें ॥ पुष्पें वाहाती विष्णूसी ॥ ५३ ॥ वर्ज्या
पुष्पें ईश्वरासी ॥ सांगेन नावें परियेसी ॥ कपित्थ केतकी शशांकेसी ॥ शामपुष्प वर्जावें

५

५४ ॥ कृष्णपिंगळकरंजदेखा ॥ बकुळदाडिंबकेतका ॥ धातकीनिंबादिपंचका ॥ मा
धवीपुष्पें वर्जावीं ॥ ५५ ॥ चूतकुंदयुथिकजाती ॥ रक्तपुष्पें वर्जानिगुती ॥ ईश्वरार्चने
दोष घडती ॥ श्वेतपुष्पें निर्दोष ॥ ५६ ॥ पूजा करितां गणेशाची ॥ वर्ज करा तुम्ही तुळ
सी ॥ नित्य पूजा करा दूर्वेसी ॥ दूर्वा वर्ज्य शक्तिदेवीतें ॥ ५७ ॥ येणे विधी पुष्पें वाहातां ॥
काम्य होईल तुम्हां त्वरितां ॥ चतुर्विधपुरुषार्था ॥ लाधाल तुम्ही अवधारा ॥ ५८
यत्पुरुषेति मंत्रेसी ॥ स्रगंधधुपावा पतियेसी ॥ मंत्र म्हणावा ब्राम्हणेसी ॥ एकाति
क्य करावी ॥ ५९ ॥ चंद्रमामेति मंत्रेसी ॥ नैवेद्य अर्पावा देवासी ॥ तांबूल अर्पितां म्ह

गु॰ च॰

अ॰ ३७

६ ण्या मंत्रासी ॥ नाभ्या आसीदेति ऐसा ॥ ६० ॥ सुवर्णपुष्पेंनीरांजन ॥ सप्तास्येति मंत्रें करूनं
पुष्पांजली घेवोन ॥ देवाह्यज्ञेति मंत्रें अर्पावी ॥ ६१ ॥ धाता पुरस्तात् मंत्रेसी ॥ नम
स्कार करावा देवासी ॥ ओतिसंन्निध एए देवासी ॥ गर्भगृही करूनये ॥ ६२ ॥ नमस्का
राचें विधान ॥ सांगेन एका विद्वज्जना ॥ सव्यदेवप्रदक्षिण ॥ केलुनि नमन करावें ॥ ६३ ॥
आपला गुरू माता पिता ॥ सन्मुख जावें बाहेरुनी येतां ॥ अथवा उत्तम द्विज देखतां ॥
सन्मुख जावोनि वंदावें ॥ ६४ ॥ सभा असले द्विजांची ॥ नमस्कार करा तुम्ही एक वि ६
त्तेची ॥ देवार्चना तेसेची ॥ नमस्कार पावे समस्ता ॥ ६५ ॥ माता पिता श्रीगुरूरूपी ॥

नमस्काराचीरिती ऐसी ॥ उभयहस्तें कर्णस्पर्शी ॥ एकभावें वंदावें ॥ ६६ ॥ सव्यपादावरी
देखा ॥ सव्यहस्तस्पर्शोनि निका ॥ वामहस्तीं वामपादुका ॥ धरूनि नमन करावें ॥ ६७ ॥
गुरुस्थानाचें आनावें ॥ सांगेन ऐका एकभावें ॥ विचारोनियां बरवें ॥ नमस्कारावे
येणें विधी ॥ ६८ ॥ मातामह गुरू मातापिता ॥ भयहर्ता अन्नदाता ॥ व्रतबंधके
ला पुरोहिता ॥ सहपत्नी ते गुरुस्थान ॥ ६९ ॥ ज्येष्ठभ्राता अथवा चुलता ॥ साप
त्न असेले ज्यासी माता ॥ वयभाधिक इष्टमित्रा ॥ नमस्कारावे परियेसी ॥ ७० ॥ नि
षिद्ध स्थानें नमावयासी ॥ सांगेन निषेध परियेसी ॥ उणें असेल वय ज्यासी नमून ये

७

विद्वज्जनी ॥ ७१ ॥ अग्निसमिधापुष्पेंकुशा ॥ धरिलेंअसेलअक्षताकाशा ॥ स्वहस्ती
परहस्तीअसतांदोषा ॥ अशस्त्रहोइजेनमस्कारितां ॥ ७२ ॥ जपअथवाहोमकरि
तां ॥ दूरदेखिलाद्विजयेतां ॥ स्नानकरितांजवळीअसतां ॥ नमनकरितांदोषघडे
॥ ७३ ॥ एखादाविप्रअसतांधांवत ॥ नेणतांअथवाधनगर्वित ॥ क्रोधवंतकिंवाम
गळस्नानकरित ॥ नमस्कारकरूनये ॥ ७४ ॥ एकहस्तेंब्राह्मणासी ॥ नमूनयेप
रियेसी ॥ कृतकियामूर्खजनासी ॥ करूनयेनमस्कार ॥ ७५ ॥ गीतेवाद्यादिनृत्येसी
संतुष्टकरावेदेवासी ॥ प्रार्थनाकरावीभक्तीसी ॥ मगअर्चावेसनकादिक ॥ ७६ ॥

७

पूजा अर्पूनि देवासी ॥ हस्त ठेऊनी पीठेसी ॥ उत्तर पूजा करावी हर्षीं ॥ मग करावे उद्वा
सन ॥ ७७ ॥ ऐसे परी देवपूजा ॥ करावी भक्तीने एक द्विजा ॥ संस्कृत अन्न व्हावया
काजा ॥ वैश्वदेव करावा ॥ ७८ ॥ अग्नि अळंकार करूनी ॥ मग आहुती द्या आहवनी
घृत संमिश्रित करूनी ॥ पंचभाग करावे ॥ ७९ ॥ एक भागाच्यासी हा आहुती ॥ दु
सरा भाग बळिहरणें ख्याती ॥ अग्निदान तिसरा करिती ॥ चवथा भाग पितृयज्ञ ॥ ८०
मनुष्ययज्ञ पांचवासी ॥ वैश्वदेव करावा मंत्रेसी ॥ अन्न नाहीं ज्या दिवसी ॥ तंडुळानी
करावा ॥ ८१ ॥ वैश्वदेव समयासी ॥ अतिथी आलिया घरासी ॥ चोर चांडाळ हे वेह

८ र्षी॥ पूजा करावी मनोभावें॥ ८२॥ यम सांगे दूतांसी॥ वैश्वदेव करितां नरासी॥ जा
ऊन कां तयापासी॥ विष्णु आज्ञा असी असे॥ ८३॥ माता पिता घातकी यासी॥ शु
नीश्वपच परियेसी॥ अतिथी आलिया समयासी॥ अन्न द्यावे परियेसा॥ ८४॥
न विचारावे गोत्र कुळ॥ अन्न घालावें तात्काळ॥ विन्मुख व्ह्यालिया वर्षे सोळा
पितर न येती घरासी॥ ८५॥ प्रवासी असेल आपण जरी॥ औषधी घृत दधि ८
क्षीरी॥ कंदमुळे फळें तरी॥ देवयज्ञ करावा॥ ८६॥ अन्नदानाविणे ग्रहण॥ क
रूं नये साधुजन॥ पंचमहायज्ञ न करी ब्राम्हण॥ चांद्रायण आचरावें॥ ८७॥

न होतां वैश्वदेव आपल्या घरीं ॥ भिक्षेसी आला नर जरी ॥ भिक्षा घालितां पाप
दुरी ॥ वैश्वदेव फळ असे ॥ ८८ ॥ बळिहरण घालोनि काढी आपणा ॥ त्याणे आ
चरावें चांद्रायण ॥ आपण काढितां दोष जाण ॥ आणिका करवी काढावे ॥ ८९ ॥ ब
ळिहरण न काढितां जेवी जरी ॥ साहा प्राणायाम त्वरित करी । तेणे होय पापदुरी
श्रीगुरू म्हणती ब्राम्हणासी ॥ ९० ॥ ग्रहपूजा करूनी देखा ॥ गोग्रास घ्यावा वि
शेषा ॥ नित्यश्राद्ध करणे एका करूनि अन्न समर्पावें । ९१ ॥ स्वधाकार पिंडदा
न करू नये अग्नौकरण ॥ ब्रम्हचारियासी तांबूलदान ॥ दक्षिणा वर्ज पतियेसा

१२॥ वैश्वदेव झालियावरी ॥ उभाराहोनि आपल्या द्वारीं ॥ अतिथी मार्ग पाहावा निर्धा
री ॥ आलिया पूजन करावें ॥ १३ ॥ श्रमोनि आलिया अतिथीसी ॥ पूजा करावी भक्ती
सी ॥ अथवा अस्तमान समयासी ॥ आलिया पूजन करावे ॥ १४ ॥ वर्णानां ब्राम्हणो गु
रु ॥ ऐसें बोलती वेदशास्त्र ॥ अतिथी जाणा सर्वगुरु ॥ वैश्वदेव समयासी ॥ १५ ॥ वैश्वदे
व समयी अतिथीसी ॥ पूजा करितो परियेसी ॥ ती पावे देवासी ॥ तुष्टे ब्रम्हा इंद्र वन्ही
१६ ॥ वायुगण अर्यमा देव ॥ तृप्ति पावे सदाशिव ॥ पूजा करावी एकभावे ॥ सर्व देव
तां संतुष्ट ॥ १७ ॥ अतिथी पाद प्रक्षालिती ॥ पितर सकळ तृप्त होती ॥ अन्नदाने ब्र

म्हत्त्ही ॥ विष्णु महेश्वरा अवधारा ॥ ९८ ॥ यतीश्वरादि ब्रम्हचारी ॥ जे समयीं येती आपु
ल्या घरीं ॥ अन्न द्यावे निर्धारी ॥ महापुण्य असे देखा ॥ ९९ ॥ ग्रास मात्र दिधला एक ॥
मेरु समान पुण्य अधिक ॥ वरवें द्यावें त्यासी उदक ॥ समुद्रासमान दान असे ॥ १०० ॥
अतिथी आलिया ल्लिया घरासी ॥ जेवीं आपण त्यजोनि त्यासी ॥ श्वानयोनी पावे ह
वीं ॥ गर्धभ होवोनि पुढे उपजे ॥ १ ॥ ऐसें अतिथी पूजोनी ॥ मग करावें भोजन आपे
ण ॥ सर्वथा न करावें अन्न भिन्ना ॥ प्रपंच करितां दोष असे ॥ २ ॥ सायं प्रातर्गृहस्था
सी ॥ भोजन करणे संतोषी ॥ प्रक्षालन करोनि पादासी ॥ ओलेपाई असावें ॥ ३ ॥

१० ओली असावी पांच स्थाने ॥ हस्त पाद उभय जाणे ॥ मुख ओलें पंचम स्थान ॥
शतायुषी पुरुष होय ॥ ४ ॥ पूर्वाभिमुख बैसोन ॥ भोजन समयी धरा मौन्य ॥ पा
द उभय जोडोन ॥ बैसावें एकीएकचित्तें ॥ ५ ॥ मंडळ करावें चतुष्कोणी ॥ वरी भु
स्म प्रोक्षोनी ॥ क्षत्रिया मंडळ त्रिकोणी ॥ वर्तुळ वैश्यासी पतियेसी ॥ ६ ॥ शूद्रे
अर्धचंद्राकार ॥ मंडळ करावे परिकर ॥ आवाहनावे सुरवर ॥ आदित्य वसु १०
रुद्र ब्रह्मा ॥ ७ ॥ पितामहादि देवता ॥ तया मंडळी उपजीविता ॥ याचि कारणे
करा त्वरिता ॥ मंडळाविणे जेऊं नये ॥ ८ ॥ न करी तो मंडळ जेवी जरी ॥ अन्नरसंने

तीनि शाचरी ॥ पिशाच्चे असुर राक्षसवती ॥ अन्न रसनेती अवधारा ९ ॥ उत्तम पूर्वा
भिमुखी देखा ॥ पश्चिम मध्यम म ऐका ॥ पित्रकार्या उत्तर मुखा ॥ सदा दक्षिणाभि
मुख बैसावें ॥ १० ॥ जेवितां पात्र धरावें ॥ सुवर्ण रजत ताम्रपात्रे ॥ पद्म पत्र पाला
श पात्रें पुण्य परियेसा ॥ ११ ॥ वर्जावें गृहस्थानी ताम्रपात्र ॥ यतीनी सुवर्णर
जत ॥ ताम्रशुक्ती शंखज पात्र ॥ स्फटीक पाषाण युतीसी ॥ १२ ॥ कर्दळी गर्भ
पत्रेसी ॥ पद्म पत्र जळे स्पर्शी ॥ वह्ली पालाश पत्रेसी ॥ जेवितां चांद्रायण
आचरावे ॥ १३ ॥ वट अश्वत्थ अर्क पटोळ ॥ कदंब कोविदार पर्णे कोमळ ॥ भो

[illegible]वं०

अ०
३७

११ जनकरितांतात्काळ॥ चांद्रायणआचरावें॥१४॥ लोहपात्रआपुलेकरी॥ नाम्रमृन्म
यछ्छपर्णावरी॥ कार्पासपत्रींवस्त्रावरी॥ जेवितांनरकाप्रतीजाय॥१५॥ कांस्यपात्रींजेवि
त्यासी॥ यशबळप्रज्ञाआयुष्यासी॥ वाटेनित्यआदिकेसी॥ गृहस्थासीमुख्यकांस्यपात्र
१६॥ असावेंपात्रपांचशेर॥ नसावेंउणेअधिकथोर॥ उत्तमोत्तमषट्शेर॥ सुवर्णपात्रासमा
नदेखा॥१७॥ कांस्यपात्रींचेभोजन॥ तांबूळसहितअभ्यंगन॥ येतीब्रम्हचारीजाण॥ ११
विधवास्त्रियांनीवर्जावें॥१८॥ श्वानाच्याचेमर्हनी॥ निषेधअसेयेरंडपानी॥ निषिद्धअ
धिकत्याहूनी॥ आणीकजेविल्याभिन्नताटीं॥१९॥ फुटकेकांस्यपात्रेसी॥ जेवितांहोयम

हा दोषी ॥ संध्याकाळी जेवितां हर्षीं ॥ महापातकी होय जाणा ॥ २० ॥ जवळी असतां प
तीत जरीं ॥ जेऊ नये अवधारीं ॥ शूद्र जेवित्या शेषावरी ॥ जेऊ नये ब्राम्हणानें ॥ २१ ॥
सवें घेऊनी बाळासी ॥ जेऊ नये श्राद्धदिवसीं ॥ आसन आपलें आपणासी ॥ घा
लूं नये ब्राम्हणो ॥ २२ ॥ आपोशन आपुले हातीं ॥ घेऊं नये मंदमती ॥ तैल घालू
नि स्वहस्तीं ॥ आपण अभ्यंग करूं नये ॥ २३ ॥ भोजनकाळीं मंडळ देखा ॥ करून
ये स्वहस्तिका ॥ आयुष्यक्षय पुत्रघाता ॥ म्हणावें नामत यासी ॥ २४ ॥ नमस्क
रावें वाढितां अन्न ॥ अभिघारावें पहिलेंचि जाण ॥ प्राणाहुती घेतां क्षण ॥ धृतन

घ्यावें स्वहस्तानें ॥ २५ ॥ उदक घेउनी [illegible] व्याहृती मंत्रीं ॥ प्रोक्षोनि अन्न करापवि
त्री ॥ परिषिंचावें तीच्चिरि ॥ मगून मावें चित्रगुप्ता ॥ २६ ॥ बळी घालुनी चित्रगु
प्तासी ॥ काटवावें सर्वेंच्चि परियेसी ॥ वामहस्तें करोनि सरसी ॥ पात्र दृढ धरावें ॥
२७ ॥ अंगुष्ठ तर्जनी मध्यमांगुळीसी ॥ धरावें पात्र वामहस्तेसी ॥ आपोशन करा
वें सप्रकारेसी ॥ आणिका करवीं घालावें ॥ २८ ॥ आपोशन उदक सोडोनि जरी ॥ औ
णीक घेती उदक तरी ॥ श्वानमूत्र घेतल्यापरी ॥ एकचित्तें परियेसा ॥ २९ ॥ धरिलें
आपोशन ब्राह्मणासी ॥ नमस्कारितां महादोषी ॥ आशिर्वाद घेऊं नये तयापासी

उभयतां दोष घडती देखा ॥ ३० ॥ मौनी असावें ब्राम्हणें देख ॥ बोलूं नये शब्दादिक ॥ आ
पोशन घ्यावें मंत्रपूर्वक ॥ मग घ्याव्या प्राणाहुती ॥ ३१ ॥ आपोशनावीण भोजन करी ॥ पाप
विमोचन करावें तरी ॥ अष्टोत्तरशत मंत्रें गायत्री ॥ जपतां दोष परिहारे ॥ ३२ ॥ प्राणा
हुतीचें विधान ॥ सांगोन ऐकिजे ब्राम्हणे ॥ प्राणाग्निहोत्र करणें ॥ समस्त पापें जाती
देखा ॥ ३३ ॥ जैसा कार्पास राशिसी ॥ अग्नि लागतां परियेसी ॥ जळोनि जाय त्वरितेसी
तैसी पापें दहन होती ॥ ३४ ॥ प्राणाहुतीचे लक्षण ॥ चतुर्विध पुरुषार्थ जाण ॥ अन्नस
शांति मंत्र म्हण ॥ गीता श्लोक प्रख्यात ॥ ३५ ॥ श्लोक ॥ अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां

१३ देहमाश्रितः॥ प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नंचतुर्विधम्॥३६॥ अन्नब्रम्हरसोवि
ष्णुः॥ भोक्तादेवोमहेश्वरः॥ ऐसातुम्ही मंत्र म्हणा॥ अग्निरस्मिजपावा॥३७॥ म
गघ्यावया प्राणाहुती॥ आहेती पंचमंत्रख्याती॥ तर्जनीमध्यमअंगुष्ठघ्यती॥
प्राणाहुती पैघ्यावया॥३८॥ मध्यमअनामिकाअंगुष्ठेसी॥ अपानायस्वाहा
म्हणाहवी॥ व्यानायस्वाहाम्हणायासी॥ कनिष्ठिकानामिकाअंगुष्ठेकाअंगु १३
ष्ठेसी॥३९॥ अंगुष्ठतर्जनीकनिष्ठेसी॥ उदानायस्वाहाम्हणाहवी॥ पंचांगुली
नेपुरियेसी॥ समानायस्वाहाम्हणावें॥४०॥ प्राणाहुती घेतल्याअन्ना॥ देतांस

शौंनयेजाण ॥ जिव्हेंगिळावेंतत्क्षण ॥ मगधरावेंमौनदेखा ॥ ४१ ॥ मौनधरावयाची
स्थाने ॥ सांगेनऐकाअतिउत्तमे ॥ स्नानसमयीधरानिर्गुणि ॥ नधरितांफळअसे
ना ॥ ४२ ॥ होमकरितांनधरीमौन ॥ लक्ष्मीजायतत्क्षण ॥ जेवितांमौननधरितांआ
पण ॥ अपमृत्युघडेत्यासी ॥ ४३ ॥ अशक्यअसेलमौन्यासिजरी ॥ प्राणाहुतीघे
ईतववरी ॥ मौनेधरावेंअवधारी ॥ श्रीगुरूम्हणतीब्राम्हणासी ॥ ४४ ॥ पिताजिवं
तअसेज्यासी ॥ जेष्ठबंधुपरियेसी ॥ धरूनयेमौन्यासी ॥ श्राद्धान्नजेवितांधरावें ॥
४५ ॥ पंचप्राणाहुतीघेतां ॥ सर्वांसीमौन्यग्राह्यतां ॥ असेलपितावडीलभ्राता ॥ मो

नधरित्या अधःपात ॥ ४६ ॥ जेवितां प्रथम मधुरान्न ॥ भोजन करावें नरें जाण ॥ भक्षू
न येकोद्रवांन्न ॥ कठिणाशं परियेसा ॥ ४७ ॥ भोजनांतीं व्यासमयासी ॥ जेऊं नये द्र
वांन्नासी ॥ वक्र जाय परियेसी ॥ शीघ्र भोजन करावें ॥ ४८ ॥ धेनूसी उदक द्यावयासी
जितुका वेळ लागेल त्यासी ॥ भोजन करावें परियेसी ॥ शीघ्र भोजनें सुखी जाणा
४९ ॥ भोजन करावयाची स्थिती ॥ सांगेन एका मती ॥ संन्यासी मुनीश्वर यती ॥ अ
ष्ट ग्रास घ्यावे जाणा ॥ ५० ॥ षोडश ग्रास अरण्यवासी ॥ द्वात्रिंशत् गृहस्यासी ॥ मि
ती नाहीं ब्रह्मचार्यासी ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५१ ॥ जितुका मावेल आपल्या मुखीं ॥

तिळका ग्रास घ्यावा विशेषी ॥ अधिकु घेतां ग्रास मुखी ॥ उच्छिष्ट भक्षिले फळ दे
खा ॥ ५२ ॥ अर्धा ग्रास भक्षूनी ॥ उरले टेविती आपुल्या पानी ॥ चांद्रायण आच
रावे त्याणी ॥ उच्छिष्ट भोजन न तयानाव ॥ ५३ ॥ न बैसावे सहभोजनासी ॥ इष्ट सोय
रे इत्यादिकांसी ॥ व्रतबंधनाविणे पुत्रासी ॥ कंन्याकुमारीसी दोष नाही ॥ ५४ ॥ भो
जन संपेपर्यंत ॥ पात्री धरावा वामहस्त ॥ जरी सोडील अजाणत ॥ अन्न वर्जो
नी उठावे ॥ ५५ ॥ सांडो न ये अन्न देखा ॥ घृतपायस विशेष एका ॥ सांडावे थो
डे ग्रास एका ॥ जे फन ये सर्व अन्न ॥ ५६ ॥ याकारणे द्विजे जाणा ॥ सोडू न ये पात्र

१५ जाणा ॥ अथवा न धरावें पूर्वींच आपणा ॥ दोष नाहीं परियेसा ॥ ५७ ॥ वस्त्रगु
डाळोनि डोयीसी ॥ अथवा सन्मुख दक्षिणेसी ॥ वाम पादावरी हस्तेसी ॥ जेवितां
अन्तरस राक्षसनेसी ॥ ५८ ॥ वाम हस्त भूमीवरी ॥ टेकुनी नर भोजन करी ॥ रोग
होय शरीरीं ॥ अगुली मोडुनी जेऊं नये ॥ ५९ ॥ अगुली मोडूनि जेविजरी ॥ दोष
गोमांसभक्षिल्या परी ॥ दोष असती नाना परी ॥ स्थानें असती भोजनासी ॥
६० ॥ अश्व गजारूढ होउनी ॥ अथवा बैसुनी श्मशानी ॥ देवालयीं शयनस्था
नी ॥ जेऊं नये परियेसा ॥ ६१ ॥ निषिद्ध जेवण करपात्रेसी ॥ ओलें नेसुनी आ १५

द्रकेंशी ॥ बहिर्हस्त बाहिः केंशी ॥ जेवितां दोष परियेसी ॥ ६२ ॥ यज्ञोपवीताव्याउपवी
तीसी ॥ भोजन केरावे परियेसी ॥ जेवितां आपुल्या सन्मुखेंसी ॥ पादरक्षा असूंनये
६३ ॥ ग्लामसउदक कंदमूळ ॥ इक्षुदंडादिकेवळ ॥ भक्षोनि पात्रीं टेवितां सकळ ॥
उंच्छिष्ट नोहे अवधारा ॥ ६४ ॥ भोजन करी वैश्वदेवाविण ॥ न करितां होम जेवी
कवण ॥ अन्न न व्हे क्रिमि जाण ॥ म्हणे पराशर ऋषी ॥ ६५ ॥ पर्ण पृष्ठावेरी रात्री
सी ॥ दीपाविण जेविल्यासी ॥ महादोष असे तयासी ॥ क्रिमि भक्षिल्या समान हो
य ॥ ६६ ॥ दीप जाय भोजन करितां ॥ पात्र धरावें स्मरोनि सविता ॥ पुनरपि आणो

व०
१६

अ०
२७

निळावितां॥ मगभोजनकरावें॥ ६७॥ पात्रींअसेलजितुकेंअन्न॥ तितुकेंचिजेवा
वेंपरिपूर्ण॥ आणीकघेतांदोषजाण॥ गुरुम्हणतीब्राम्हणासी॥ ६८॥ सर्शोंनयेजे
वितांकेश॥ कथासांगतांमहादोष॥ दिसूनयेव्योमआकाश॥ अंधःकारींजेऊन
ये॥ ६९॥ नटेवितांशेषस्त्रियेसी॥ जेवितांहोयअत्यंतदोषी॥ ठेविलेंनजेवितां
स्त्रियादोषी॥ महापातकेंघडतीजाणा॥ ७०॥ शून्यदेवदेवालयी॥ देवस्थान
आपुलेंगृहीं॥ जेळसमीपसंध्यासमयीं॥ जेऊनयेपरियेसा॥ ७१॥ पात्रेंठेऊ
निदगडावरी॥ जेऊनयेअवधारीं॥ अवलोकूंनयेमुखावरी॥ स्त्रीजनांचेपरिये

१६

सी॥७२॥ न करावें सह भोजन॥ जेवितां उच्छिष्ट भक्षिले पण॥ कुलस्त्रियेसी करितां
भोजन॥ निर्दोष असे परियेसा॥७३॥ प्राशन शेष उदकासी॥ घेऊं नये परियेसी॥ अ
गस्त्य घडे संधीसी॥ किंचिन् सांडनि घेईजे॥७४॥ वस्त्रोदक घेतल्यासी॥ अपार दोष
घडतीं त्यासी॥ जन्म पावे श्वानयोनीसी॥ पडे मागुती नरकांत॥७५॥ शब्द होय उदक
पितां॥ अथवा क्षीर घृत जेविती॥ आपोशनोदक प्राशितां॥ सुरापान समान असे॥७६॥
महाजळीं रिघोन॥ उदक घेती मुखाने॥ अथवा जे घेती उभ्याने॥ सुरापा
नसमान जाणा॥७७॥ द्वय हस्तांगुली करूनी॥ घेऊं नये उदक पानी॥ घ्यावे

एकहस्तें करूनी ॥ वामहस्त लाऊं नये ॥ ७८ ॥ सभा बैसोनि एकासनी ॥ अथवा आपु
लेहातुरणी ॥ प्राशन करूं नये पाणी ॥ महादोष असे परियेसा ॥ ७९ ॥ वाढावें भि
न्न पात्रेंसी ॥ पाहूं नये आणीक यातीसी ॥ रजस्वला स्त्रियांसी ॥ चंडाल स्वान
पाहूं नये ॥ ८० ॥ दृष्टी पाहे इतुकीयांसी ॥ जरी ध्वनी ऐकिजे कर्णेसी ॥ त्यजावे
अन्न त्वरितेसी ॥ जेविता दोष परियेसी ॥ ८१ ॥ कलहशब्द कांडणे दळणे ॥
ऐकतां जेऊं नये अन्न ॥ अपशब्द स्पष्टास्पष्ट जाण ॥ त्यजावें अन्न परियेसा
८२ ॥ नेणते लोकपंक्तीसी ॥ घेऊं नये परियेसी ॥ अगत्य घडे संधीसी ॥ उदकभ

स्मेंकरापृथक ॥ ८३ ॥ अथवास्तंभ असेल मध्यें ॥ द्वारमार्ग असेल शुद्ध ॥ उद
क घालितां आपुल्या परिघा ॥ दोषनाही परियेसा ॥ ८४ ॥ कृष्णावस्त्रनेसो
नि आपण ॥ जेवितां दोष अपार जाण ॥ स्त्रीजन वाढिती कांसेविण ॥ उच्छि
ष्ट अन्न परियेसा ॥ ८५ ॥ ऐसा विचार करूनि भोजन ॥ करावे जाणा द्विज
जनी ॥ विकिरिदं विलोहित म्हणोनी ॥ अभिमंत्रावें शेष अन्न ॥ ८६ ॥ विकि
रिदे ती मंत्रासी ॥ म्हणावा अघोर ऋषी ॥ रुद्र देवता परियेसी ॥ अन्नाभि
मंत्रेण विनियोगः ॥ ८७ ॥ ऐसा मंत्र जपोन ॥ हातीं घ्यावें शेष अन्न ॥ यमाच्या

नावें बळि घालोन ॥ उत्तरापोशन मग घ्यावें ॥ ८ ॥ उच्छिष्ट सर्व पात्रींचें ॥ घे
ऊनि हाती म्हणावा चे ॥ रौरव मंत्र असे त्याचा ॥ पात्राजवळी ठेवावें ॥ ९ ॥ उठोनि
जावे प्रक्षालणासी ॥ गंडूष करोनि हस्त स्पर्शी ॥ न करितां गंडूष प्रक्षाली हस्ता
सी ॥ आत्मघात तया नावें ॥ १० ॥ मुख प्रक्षालितां परियेसी ॥ मध्यमांगुलीं दांत घा
सी ॥ तर्जनी अंगुष्ठ महादोषी ॥ रौरव नरक परियेसा ॥ ११ ॥ बरवे हस्त प्रक्षालोन ॥
करावें दंतशोधन ॥ हातीचे पवित्र सोडुन टाकावें दंतकाष्ठ ॥ १२ ॥ अंगुष्ठमात्रपु
रुषा ॥ म्हणावा मंत्र परियेसा ॥ हस्त घांसोनि चक्षुषा ॥ उदक घालावे अवधारा ॥ १३

ऐसे जरी न म्हणे मंत्र ॥ चक्षुरोगी होय निगुत ॥ याकारणे होऊनि यथास्थित ॥ हस्तोद
कें आरोग्यता ॥ १४ ॥ द्विराचमन करोनी ॥ आयेगो मंत्र म्हणोनी ॥ द्रुपदादिवेन्मुमुचा
म्हणोनी ॥ पादप्रक्षालन करावें ॥ १५ ॥ ऐसा तुम्ही मंत्र जपतां ॥ भोजन दाई जाउनी बै
सतां ॥ द्विराचमन करोनी निरुतें ॥ नाभिस्पर्श मग करावा ॥ १६ ॥ स्मरावें मग अगस्त्यासी
कुंभकर्णवडवाग्नीसी ॥ वृकोदर शनीश भीशासी ॥ इल्वल वातापि जीर्ण म्हणावें ॥ १७ ॥
हस्त दाखवावे आग्नीसी ॥ आणीक सांगेन परियेसी ॥ बंधुवर्ग असती जयांसी ॥ पुसून
येवस्त्रें कर ॥ १८ ॥ मग स्मरावें श्रीगुरूसी ॥ आणीक स्मरावे कुळदेवतेसी ॥ येणेपरी विधी

सी॥ भोजन करावें द्विजोत्तमे॥ ९९॥ विप्र विनवी श्रीगुरूसी॥ भोजन प्रकार सांगितला
आम्हासी॥ वेध निषिद्ध अन्नें केसी॥ निरोपावें दातारा॥ २००॥ विप्रवचन ऐकोनी॥
निरोपिती गुरू संतोषी॥ ऐक ब्राम्हणा म्हणोनी॥ अतिप्रेमे निरोपिती॥ १॥ म्हणे सरस्व
ती गंगाधरा॥ ब्राम्हणपणाचा आचार॥ निरोपिला गुरुनाथें समग्र॥ म्हणोनि विनवी
संतोषेंसी॥ २॥ वैश्वदेवाविणे अन्न॥ अथवा गणिकांन परिपूर्ण॥ घातलें असेल बहु
लवण॥ बहुमिश्रितांन्न जे कुनये॥ ३॥ लशुन गाजर कंद मूळ॥ वृंताक श्वेत वर्तुळ
जो असेल भोपळा॥ छत्राक शाखा सकळ॥ वर्जावा तुम्ही परियेसा॥ ४॥ धेनु आ

ज्य महिषीक्षीर॥ प्रसूतीचें वर्जावें दशरात्र॥ नूतनोदक पर्जन्यपुर॥ त्रिरात्रीचें वर्जावें॥ प
कूष्मांड डोरली पडवळेसी॥ मुळा बेल आवळेसी॥ न भक्षावे प्रतिपदेसी॥ भक्षितां
पाप परियेसीं॥ ६॥ स्वर्गापवर्गचाड ज्यासी॥ अष्टमी वर्जावि ओदुंबरांसी॥ आमफ
ळ रात्रीसी॥ वर्जावे भानुसप्तमी॥ ७॥ बेलफळ वर्जे शुक्रवारीं॥ शामीफळ मंदवारीं॥
भक्षिता लक्ष्मी जाईल दुरी॥ वर्जाविं ते दिवसीं परियेसा॥ ८॥ धात्रीफळ रात्रीसी॥ भ
क्षितां हानी प्रज्ञेसी॥ नाश करी वीर्यासी॥ धात्रीफळ वर्जावें॥ ९॥ नखकेश पडिलि
या अन्नी॥ स्पर्श केलिया मार्जर जाणा॥ वायस घारी कुकुटे जाणा॥ स्पर्श केलिया अ

२०

न्न त्यजावें ॥ १० ॥ धेनु मूषक मुखस्पर्शें ॥ अथवा स्पर्शें अधःकेशें ॥ त्यजावें अन्न भरवसें
असेल उच्छिष्ट अन्ना जवळी ॥ ११ ॥ एक हातीं वाढिलें अन्न ॥ शिळें असेल शीतजा
ण ॥ वर्जावें तुम्ही ब्राह्मण ॥ निषिध्ध बोलिजे आचारीं ॥ १२ ॥ घृत तैल मिश्रित ॥ शि
ळें अन्न पवित्र ॥ तळिलें असेल सर्वत्र ॥ शिळें न व्हे परियेसा ॥ १३ ॥ विप्र विकिती गोरस ॥
घृत क्षीर परियेस ॥ घेतां घडती महादोष ॥ साक्षांत विप्र घेजेऊं नये ॥ १४ ॥ माषा
न्नाचें वटक देखा ॥ शिळें न होती कधीं ऐका ॥ जे मेला ह्या पीठ देखा ॥ शिळें न व्हे
परियेसा ॥ १५ ॥ कंद मूळादि मस्करांन्न ॥ जेवांचें असेल परमान्न ॥ गुडयुक्त असेल ले

वण ॥ शिळें नखे परियेसा ॥ १६ ॥ ऐशा शिळ्या अन्नासी ॥ दोष नाही परियेसी ॥ विटाळ हे
तों महादोषी ॥ सुचिस्थानी असावें ॥ १७ ॥ भोजन केलिया नंतर ॥ तांबूल घ्यावें परि
कर ॥ क्रमुक पर्ण चूर्ण सत्वर ॥ द्यावें ध्यावें ब्राम्हणासी ॥ १८ ॥ तिळमिश्रित भक्ष्या
रियेसीं ॥ उत्पन्न झाला वष्ठि गोत्रासी ॥ भृगुकन्या दीक्षा नारी ॥ ४७ ॥ तेचि झाली सु
मंतूची भार्या ॥ पतिव्रता औदार्या ॥ कन्या तिसी झाली सुतनया ॥ नाम तिचें सुशीला ॥
४८ ॥ शिला कन्या सुमंतु घरीं ॥ नित्य भक्ती सदाचारी ॥ करीतसे विचित्रपरी ॥ सर्व मं
गळस्वरूपें ॥ ४९ ॥ गृह शोभा करी बहुत ॥ नाना पत्रें तोरणें करित ॥ पंचवर्ण चूर्ण
युक्त ॥ रंगमाळिका सहीत देखा ॥ ५० ॥ स्वस्तिकादि शंख पद्म ॥ चक्र गदादि उत्त
म ॥ नमस्कारादि मनोधर्म ॥ देवतार्चन सोपस्करीं ॥ ५१ ॥ वर्ततां ऐसें एके दिवसीं ॥

झाली प्राप्ती दैववशी ॥ ऋमंतु पत्नी पंचत्वा पामी ॥ पावती झाली तये वेळीं ॥ ५२ ॥ ऋमंतू
शी भार्याहीनत्व झालें ॥ समस्त कर्म राहिलें ॥ पुनः संधान पाहिजे केलें ॥ म्हणोनि
नारी आणीक केली ॥ ५३ ॥ तिचें नाव असे कर्केशा ॥ दुःशीला आचरणी परियेसा ॥ नि
त्यकलह करी बहुवसा ॥ कंन्यापतीस वैंदखा ॥ ५४ ॥ ऋशीला कन्या उपवर झा
ली ॥ ऋमंतु चिंती वेळोवेळीं ॥ इशी एखादा वर मिळेल जरी ॥ कंन्यादान करीन म्ह
णे ॥ ५५ ॥ ऐसें चिंतितां एके दिवसीं ॥ तेथें आला कौंडिण्य ऋषी ॥ विचारितां कन्ये
सी ॥ ऋमंतुने अंगिकारिलें ॥ ५६ ॥ कंन्यादान गृह्योक्तेंशी ॥ देता झाला कौंडिण्या

री॥ मिळोनि होती दोनी मासीं॥ आषाढ आणि श्रावण॥ ५७॥ मानाकरी कंमेशी वै
र॥ सापत्नेयाचा हाचि विचार॥ कौंडिण्य पुसे एक मंता विचार॥ जाकं आश्रमा आ
पीक ठाया॥ ५८॥ एक मंतु बहु दुःखकरी॥ म्हणे स्त्री न के माझी वैरी॥ कंन्या झाली
आतां दुरी॥ के ची पापिणी वर्तिली मी॥ ५९॥ शेंत न पत्नी नाहीं जा घरीं॥ त्यासी अ
रंण्य नाहीं दुरी॥ एकु स्वामी त्रिपुरारी॥ संसारसागरीं बुडालों॥ ६०॥ न चले मा
झें कर्म तापस॥ नायके बोल ही कर्कशा॥ कंन्या असतां संतोषा॥ नित्य दर्शन जा
माता॥ ६१॥ ऐसा एक मंतू चिंता करी॥ कौंडिण्य ऋषी त्यासि वारी॥ दोघे तापसी एके

घरीं॥ असूं नये धर्महानी॥ हरि॥ जाऊं आह्मी आणीक स्थाना॥ तप करोनि अनु
ष्ठाना॥ भेटी होईल पुनः पुना॥ जवळीच करूं आश्रमा॥ ६३॥ स्कं॥ मंतु म्हणे को
डिण्यास॥ आणीक राहावें बारा दिवस॥ सर्वा सिद्ध त्रयोदशीस॥ प्रस्थान तुम्ही
करावें॥ ६४॥ स्क॥ मंतूची विनंती एकोन॥ आणीक राहिले तेरा दिन॥ स्क॥ मुहूर्त बरु
वा पाहोन॥ येरे दिवसीं निघाला॥ ६५॥ स्क॥ मंतु म्हणे कर्कशीसी॥ कन्या जाईल
पतीसरसी॥ भोजन न घालावें जामातासी॥ व्रीहि गोधूम दे म्हणे॥ ६६॥ पतीने
सांगतां काय करी॥ धांवत गेली घराभीतरी॥ कवाड घाली दृढ टाविकी॥ पाषाण

लावी द्वारवटा ॥ ६७ ॥ कांहीं केलियानउ घडी द्वार ॥ क्षमंतु विनवी आपटी शीर ॥ ऋ
शीला काम धरी केर ॥ म्हणे जाऊं तें सींची ॥ ६८ ॥ पाहूं गेला स्वयंपाक घरा ॥ हो
तां कोंउ गोधूम करा ॥ देतो झाला कन्यावरा ॥ निरोप दिधला दोघांसी ॥ ६९ ॥ दोघें
बेसोनि रथावरी ॥ निघाला कोंडिण्य संतोषकरी ॥ मध्यान्ह काळीं नदी तीरीं ॥ अ
नुष्ठानालागीं उतरले ॥ ७० ॥ ऋषी बेसला अनुष्ठाना ॥ ऋशीला होती तयेस्था
ना ॥ तीरीं पाहातसे रम्यवना ॥ स्त्री समुदाय बहु असे ॥ ७१ ॥ रक्तांबर वस्त्रेंसी
परिधान केले त्या बहुवशी ॥ व्रत म्हणती चतुर्दशी ॥ कलशपूजा पृथक पृथकू

७ ७२॥ पाहोनि सुशीला हळहळा॥ गेली तयां सुवासिनी जवळा॥ पुसती झाली वेल्हा
ळा॥ काय व्रत करितां तुम्ही॥ ७३॥ स्त्रिया म्हणती सुशीलेसी॥ अनंतव्रत आहे परि
येसी॥ पूजितां होय तात्काळेंसी॥ सकळाभीष्ट पावती॥ ७४॥ सुशीला म्हणे ना
रींसी॥ कवण विधान सांगा मजसी॥ कृपा करोनि विस्तारेसी॥ निरोपावें अहो मा
तें॥ ७५॥ समस्त नारी मिळोनी॥ सांगताती विस्तारोनी॥ ऐक सुशीले बैस म्हणो ७
नी॥ व्रत आद्यंतें निरोपिती॥ ७६॥ भाद्रपद शुक्ल चतुर्दशीसी॥ व्रत करावें प
रियेसी॥ सांगू तुज विस्तारेंसी॥ ऐक सुशीले म्हणताती॥ ७७॥ रक्तपट सूत्रेंसी॥

अनंतकरावापतियेसी ॥ घेऊनिजावेंनदीशी ॥ स्नानकरावेंविधीनें ॥ ७८ ॥ दिव्यांब
रपरिधानुनी ॥ हळदीकुंकुमलाउनी ॥ आणावेकलशनूतनदोनी ॥ गंगायमुनाम्ह
णोनियां ॥ ७९ ॥ उदकभरोनितयांत ॥ पंचपल्लवरत्नसहित ॥ घालोनिपुजावेंत्वरि
त ॥ षोडशोपचारेंकरूनी ॥ ८० ॥ नानाप्रकारें आरती ॥ करावागंगायमुनांप्रती ॥
मगपूजावादर्भग्रंथी ॥ शेषशायीं करोनियां ॥ ८१ ॥ दोनीकलशांवरीदेखा ॥ दोनी
वस्त्रेंढऊनिनिका ॥ पत्र्यालिहूनिअष्टदलिका ॥ कलशावरूनिठेवावें ॥ ८२ ॥ तया
कलशापुढेंदेखा ॥ पंचवर्णेंचूर्णेंदेखा ॥ शंखपद्मादिअनेका ॥ रंगमालिकाघाला

मा ॥ ८३ ॥ शेषपुजा वा दर्भाची ॥ षोडशोपचारी वरवासाची ॥ ध्यानी ध्यास विष्णू
चा ॥ शेषशायी म्हणोनियां ॥ ८४ ॥ सप्तफणी शेषासी ॥ सदा विष्णू त्यापासीं ॥ याचि
कारणे नाम तयासी ॥ अनंत ऐसें करावें ध्यान ॥ ८५ ॥ पिंगलाक्ष चतुर्भुजेसी ॥ शंख
पद्म सव्य करेंशी ॥ चक्र गदा वामहस्तेंसी ॥ ऐसी मूर्ती तुवां ध्यावी ॥ ८६ ॥ ओं न
मो भगवते मंत्रेसी ॥ षोडशोपचारें दर्भग्रंथीसी ॥ आणोनि नव्या दोरकासी ॥
ध्यान करावें मग तेथें ॥ ८७ ॥ अनंतगुणरत्नाय मंत्रेंसी ॥ नवे दोरक ठेवा
वे कलशासी ॥ पूजा करावी पुरुषसूक्तेसी ॥ अनादि देवमंत्र सहितेसी ॥ ८८ ॥ पो

षोडशोपचारें सुजोन ॥ संसारें ती मंत्रें दक्षिण करीं बांधोन ॥ नमस्ते वासुदेव मं
त्रें करून ॥ जीर्णदोरक विसर्जावा ॥ ८ ॥ दाता च विष्णुर्भगवान म्हणत ॥ वा
यन द्यावें गोधूम घृत ॥ प्रस्थ गोधूमांचें सघृत ॥ फळांस हु वायन द्यावें ॥
१० ॥ अपूपादिणयससी ॥ सदक्षिणा तांबूलेंसी ॥ अर्घ्य द्यावें ब्राह्मणासी
अर्धें आपण भक्षावें ॥ ११ ॥ ऐसे चौदा वर्षें दरुवा ॥ व्रत आचरावें विशेषा ॥ उ
द्यापन करावें निका ॥ चतुर्दशा कलश द्यावे ॥ १२ ॥ ब्राह्मणाभोजन करोन ।
भक्ती करवें उद्यापन ॥ कामना होईल संपूर्ण ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ १३ ॥ ऐसें

सांगती सुशीलेसी ॥ व्रत आचरावें त्वरितेंसी ॥ आजचि असे चतुर्दशी ॥ व्रत करीं आ
म्हासवें ॥ १४ ॥ समस्त नारी मिळोनि तिसी ॥ तंतू देती अनंतासी ॥ ग्रंथी बांधोनि च
तुर्दशी ॥ पूजा करविती आपणासवें ॥ १५ ॥ कोंडा होता गोधूमांचा ॥ आणोनि दे
त अर्धसाचा ॥ वाणें देऊनी सुपाहीं ॥ निरोप स्त्रियांचा घेतला ॥ १६ ॥ समस्त स्त्रि
यां वंदिलें ॥ आली आपले रथाजवळी ॥ अनुष्ठान सारूनि ऋषी तये वेळीं ॥
आला आपले स्त्रियेपासीं ॥ १७ ॥ चला म्हणोनि पुढें जाती ॥ दोघें बैसोनि गु
रथीं ॥ जातां पुढें देखती ॥ अमरावती ऐसें नगर ॥ १८ ॥ नगरलोक सामोरे येती

चला स्वामी ऐसे म्हणती॥ तुम्ही या नगराचे अधिपती॥ तपोनिधी ऐसें म्हण
ती॥१४॥ नाना समारंभें देखा॥ नगर प्रवेशले दंपती ऐका॥ ऐश्वर्ये भोगि
लें बहु सुखा॥ श्रीमदनंत प्रसादें॥१००॥ ऐसें कितीदिवसांवरी॥ होता कौंडि
ण्य सह नारी॥ बैसले असतां संतोषें करीं॥ देखता झाला अनंत॥१॥ ऋषी पु
सती स्त्रियेसी॥ काय बांधिले हस्तासी॥ वशीकरणें आम्हासी॥ रक्तदोरा बां
धिला॥२॥ स्त्री शीला बोले भ्रतारासी॥ अनंत देव परियेसी॥ याचिया प्रसा
दें तुम्हासी॥ अष्टैश्वर्य प्राप्त झाले॥३॥ म्या जे दिवसीं व्रत केलें॥ तेणें करोनि

१० देव तुम्हा आलें ॥ पाहा अनंत दैवत प्रसन्न झालें ॥ म्हणोनि सांगितलें तुम्हा
सी ॥ ४ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ ऋषी कोपला बहु मनी ॥ दोरक घेवोनि हिरोनि ॥ अ
ग्नि मध्यें टाकियेला ॥ ५ ॥ मग म्हणे कैचा अनंत ॥ आपण केले असे तप बहुत
तेणें करोनि ऐश्वर्य बहुत ॥ प्राप्त झालें आम्हासी ॥ ६ ॥ वशीकरण केलें आम्हा
सी ॥ दोरा बांधिला अनंत म्हणसी ॥ रागें भरोनि कौंडिण्य त्यासी ॥ हिरोनि अग्नी १०
त टाकिला ॥ ७ ॥ हाहाक्र शीला म्हणोनि ॥ अग्नि भीतरी जाऊनी ॥ तात्काळ काढो
नि स्नपनी ॥ केली पूजा अनंताची ॥ ८ ॥ अनंत टाकिला अग्नीसी ॥ हानी झाली रे

श्वर्यासी ॥ दरिद्री झाला पतियेसीं ॥ कौडिण्य तत्क्षणी द्विजवर ॥ ९ ॥ नगरीं आले सर्वश
त्रु ॥ गोधनादि आभरणवस्तु ॥ समस्त नेते झाले तस्करें ॥ दरिद्र आलें तात्काळ ॥
१० ॥ गृह दग्ध झालें देख ॥ अवघे पाहोतां मदनंता ॥ उरलें नाहीं वस्त्र एक ॥ सर्व
गेलें तत्क्षणी ॥ ११ ॥ मग विचारी मानसीं ॥ म्हणे अनंता रुसलासी ॥ वायां घात
लें अग्नीसी ॥ मदांधकारें मी वेष्टिलों ॥ १२ ॥ आतां करीन नेम एक ॥ जंव भेटे ल
क्ष्मीनायक ॥ श्रीमदनंतदर्शनमुख ॥ अन्नोदक न घेईं ॥ १३ ॥ म्हणोनि निर्वाण
करोन ॥ निघता झाला अरण्यभुवन ॥ भार्येसहित कौंडिण्य ॥ निघता झाला परि

ये सा ॥ १४ ॥ हा हा अनंत म्हणत ॥ जात असे अरंण्यांत ॥ तंव देखिला चूत वृक्ष ॥
पुष्पीं फळीं भरला असे ॥ १५ ॥ कीटकादि पक्षिजाती ॥ कोणी त्यासी नातळती ॥ कों
डिण्य पुसे तयाप्रती ॥ अनंतासी देखिलें ॥ १६ ॥ वृक्ष म्हणे ब्राह्मणासी ॥ दृष्टीन
पडेचि आम्हासी ॥ तुवां जरी देखिलासी ॥ आम्हा निमित्त सांगावें ॥ १७ ॥ ऐसें को
निपुढें जात ॥ धेनू देखिली वत्सासहित ॥ हिंडत असे तृणांत ॥ तोडा न ये भक्षा
वया ॥ १८ ॥ द्विज म्हणे तियेसी ॥ जरी तुवां अनंत देखिलासी ॥ कृपा करी वो आम्हा
सी ॥ धेनु म्हणे तयालागीं ॥ १९ ॥ नाहीं देखिलें अनंतासी ॥ तुम्ही भेटलां जरी तयासी

मज विषयीं सांगा त्यासी॥ धेनु म्हणे तयासी॥ २०॥ ऐसें ऐकोनि द्विजवर॥ पुढें जा
तां देखिला वृषभ थोर॥ तयातें पुसे द्विजवर॥ अनंतातें देखिलें कीं सांग॥ २१॥ वृ
षभ म्हणे तयासी॥ नेणों आम्ही अनंतासी॥ जरी तुम्ही देखिला त्यासी॥ आम्हां वि
षयीं विनवावें॥ २२॥ पुढें जातां देखे कौंडिण्य॥ सरोवरें देखे नेत्रे दोन॥ उदकामि
ळालें अन्योन्य॥ हंसादि पक्षीन सेविती॥ २३॥ कमळ कौमुदादि पुष्पेंसी॥ मिरवि
ती सरोवरें ऐसी॥ द्विज पुसे तयांसी॥ अनंतातें देखिलें॥ २४॥ सरोवर म्हणती
तयासी॥ नेणों कैंचा अनंतासी॥ भेटी होईल जरी तुम्हासी॥ आम्हां विषयीं

सागावें ॥ २५ ॥ पुटें जातां द्विजवर ॥ देखिला गर्धभ कुंजर ॥ पुसत से तयां विचार ॥ तेन
बोलती तयासी ॥ २६ ॥ निर्वाण झाला तो ब्राम्हण ॥ त्यजूं पाहे आपला प्राण ॥ अ
नंत अनंत म्हणोन ॥ धरणीवरी पडियेला ॥ २७ ॥ इतुकिया अवसरीं ॥ वृद्ध ब्रा
म्हण वेषधारी ॥ जवळी येऊनि हाका मारी ॥ उठीं उठीं म्हणतसे ॥ २८ ॥ काय
विप्रा काय पुससी ॥ मूदनंत कोटें असे विचारिसी ॥ दाखवीन चाल आम्हासरसी
म्हणोनि धरिलें उजवे करीं ॥ २९ ॥ उठऊनि यां कौडिण्यासी ॥ घेऊनि जातां अरं
ण्यासी ॥ नगरी पाहे अपूर्व तिसी ॥ महदाश्वर्य पाहातसे ॥ ३० ॥ घेऊनि गेला नगरांत ॥

सिंहासन रत्नखचित ॥ नेऊनि तेथे बैसवित ॥ आपण दाखवी निजरूप ॥ ३१ ॥ रूप दे
खोनि तो कौंडिण्य ॥ स्तोत्र करी अति गहन ॥ चरणावरी माथा टेऊन ॥ विनवीतसे
कर जोडूनी ॥ ३२ ॥ नमो नमस्ते गोविंदा ॥ श्रीवत्सलक्ष सच्चिदानंदा ॥ तुझे दर्शनमा
त्रें दुःख मुद्दा ॥ हरोनि जाती सर्व पापें ॥ ३३ ॥ तूं वरेण्य यज्ञपुरुष ॥ ब्रम्हा विष्णू
महेश ॥ तुझे दर्शनमात्रें समस्त ॥ हरोनि जाती तालकाळीं ॥ ३४ ॥ नमो नमुस्तु वैकुंठ
वासी ॥ नारायणा लक्ष्मीविलासी ॥ जगद्व्यापी प्रतिपाळिसी ॥ अनंतकोटी ब्रम्हां
डनायका ॥ ३५ ॥ पापी आपण पापकर्मी ॥ नेणो तुझी भक्तिधर्मी ॥ पापात्मा पापसंभव

१३

म्हणोनी॥ क्षमा करीं गा देवराया॥ ३६॥ तुज वांचोनि आपण॥ अन्य देव आतां नेणें॥ या
चि कारणें धरिले चरण॥ शरणागत मी तुम्हांसी॥ ३७॥ आजि माझा जन्म सफळ॥ ध
न्य माझें जिणें सफळ॥ तुझे देखिलें चरणकमळ॥ भ्रमर होऊं निवास घेतों॥ ३८॥ ऐसें
स्तविलें कौंडिण्यानें॥ ऐकोनि प्रसन्न झाला तत्क्षणें॥ भक्तजनचिंतामणी॥ वरत्रय
देता झाला॥ ३९॥ धर्मबुद्धि दरिद्रनाशन॥ शाश्वत वैकुंठभुवन॥ असें दिधलें नारा
यणें॥ ऐकू युधिष्ठिरा म्हणे कृष्ण॥ ४०॥ पुनरपी द्विजा विनवीनिका॥ म्या देखिलें आ
श्चर्य एक॥ अरण्यांत वृक्ष एक॥ महाफळीत आम्र देखिला॥ ४१॥ याची फळें पक्षि

१३

जाती ॥ कोपी त्यासी नातळती ॥ पढें येतां मागुती ॥ देखिली धेनु वत्सेंसी ॥ ४२ ॥ तृण
असे तेथें सबळ ॥ तिचे तोड न ये कवळ ॥ आणीक देखिलीं निर्मळ ॥ सरोवरें दोनी
तेथें ॥ ४३ ॥ अन्योन्यें एकामेका ॥ मिळालें होतें तेथें उदका ॥ पुढें पाहें अपूर्व एका
वृषभ एक माहाथोर ॥ ४४ ॥ त्याचे मुखा न ये ग्रासा ॥ सर्वकाळीं उपवास ॥ पुढें दे
खिला सरस ॥ कुंजर एक मदोन्मत्त ॥ ४५ ॥ सवेंचि एका गर्दभासी ॥ देखिलें स्वा
मी मार्गेसी ॥ पुढें येतां संबंधेंसी ॥ देखिला वृद्ध ब्राम्हण ॥ ४६ ॥ नकळे याचा अभि
प्राया ॥ विस्तारोनि मज सांगावा ॥ जगन्नाथा केशवा ॥ म्हणोनि चरणी लागला ॥ ४७

कृपानिधी नारायण ॥ सांगतसे विस्तारोन ॥ ऐके भक्त कौंडिण्य ॥ वृक्ष तुवां देखिला ॥
४८ ॥ पूर्वी होता द्विजवर ॥ तयासी येती वेदशास्त्र ॥ उन्मत्तपणे गर्वे थोर ॥ शिष्यव
र्गा न सांगेची ॥ ४९ ॥ तेणें पापें वृक्ष झाला ॥ तुवां देखिलें धेनुवत्साला ॥ पूर्वी भूमी
धेनु निष्फळा ॥ दिली होती ब्राह्मणासी ॥ ५० ॥ देखिला तुवां वृषभ एक ॥ पूर्वी वि
प्र माहाधनिक ॥ केलैं नोहीं दानादिक ॥ तेणें पापें ऐसी गती ॥ ५१ ॥ सरोवरी तुवां दो
नी ॥ म्हणसी देखिलीं म्हणोनी ॥ पूर्वी होत्या दोघी बोह्मणी ॥ घेतलें दान आपआप
णांत ॥ ५२ ॥ खर म्हणिजे तुझा क्रोध ॥ कुंजर तो जाण मदांध ॥ झालें तुझें मन शुद्ध ॥ भे

टळें ब्राह्मण आपणाची ॥ ५३ ॥ जे जें तुवां देखिलें ॥ त्या त्या सस्तातें मुक्त केलें
अखिल ऐश्वैर्य भोगीं वद्धिलें ॥ अंती जाय स्वर्गासी ॥ ५४ ॥ तुवां करावा तेथें वास
नक्षत्रा माजी पुनर्वसु ॥ ऐसा वर देतां हर्ष जाहाला तया कौंडिण्या ॥ ५५ ॥ ऐसा
वर लाधोनी ॥ राज्य केले बहु दिनी ॥ अंती गेला स्वर्गभुवनी ॥ ऐके राया युधिष्ठि
रा ॥ ५६ ॥ ऐसी कथा धर्मासी ॥ सांगता झाला हृषीकेशी ॥ आचरिलें भक्तीसी ॥ अनं
त व्रत ते येवेळीं ॥ ५७ ॥ युधिष्ठिरें पत्येंसीं ॥ व्रत आचरला भक्तीसी ॥ श्रीमदनं
त प्रसादें त्वरितेंसी ॥ पांडव राज्यपद पावले ॥ ५८ ॥ आणीक हेचि भूमीवरी ॥ व्रत

गु० चै० अ० ४३

१५

केलें ऋषेश्वरीं आचरावें नरनारी ॥ लाधे चारी पुरुषार्थी ॥ ५९ ॥ व्रतामध्यें उत्तम व्रत
प्रख्यात असे अनंत ॥ तुवां बोधावें सतत ॥ तुझे ज्येष्ठ सुतासी ॥ ६० ॥ व्रत कौंडिण्य आ
चरला ॥ अखिल सौख्य लाधला ॥ आचरावें तुम्हीं वहिलें ॥ या अनंत व्रतासी
६१ ॥ अनंत व्रत माहा पुण्य ॥ आमुचे निरोपें करणे ॥ व्रत करा एकभावें ॥ भावभक्ती
करोनियां ॥ ६२ ॥ आमुचें गोत्र कौंडिण्य ॥ करितां जोडे बहु पुण्य ॥ निरोपीं आमु
च्या कारण ॥ व्रत तुम्हीं करावें ॥ ६३ ॥ ऐसें गुरु निरोपेंसी ॥ व्रत केलें संतोषीं ॥ पूजा
केली श्रीगुरूसी ॥ नाना परी अवधारा ॥ ६४ ॥ नीरांजन बहु वसीं ॥ गीत नृत्य वाद्यें

१५

सी ॥ पूजा करिती श्रीगुरूसी ॥ भक्तिभावें करूनियां ॥ ६५ ॥ समाराधना ब्राम्हणांसी भोजन करिती श्रीगुरूसी ॥ आनंद झाला बहुवसी ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषें ॥ ६६ ॥ येणेपरी श्रीगुरूसी ॥ आराधोनि संतोषी ॥ गेले आपुले ग्रामासी ॥ एक शिष्यो एकचित्तें ॥ ६७ ॥ विप्र जो कां सायंदेव ॥ कलत्रपुत्रातें पाववोनि ठाव ॥ मागुतीं आला असे भावें ॥ श्रीगुरुचरणसेवेसी ॥ ६८ ॥ राहोनियां गुरूपासीं ॥ सेवा केली बहुवसी ॥ ऐसे तुझे पूर्वजासी ॥ प्रसन्न झाले श्रीगुरु ॥ ६९ ॥ सिद्ध म्हणे शिष्यासी ॥ येणेपरी तुम्हासी ॥ निधान लाधलें पतियेसीं ॥ श्रीनरसिंहसरस्वती ॥ ७० ॥ म्हणोनि सर

१६

स्वतीगंगाधर ॥ सांगे गुरुचरित्रविस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ लाधे चारी पुरु
षार्थ ॥ ७१ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ अनंतव्रतकथा विख्यात ॥ नामधारका
सांगत ॥ त्रिचत्वारिंशोऽध्याय हा ॥ ७२ ॥ इति नृसिंहसरस्वत्योपाख्याने सि
द्धनामधारकसंवादे अनंतकथामहिमानिरूपणं नाम त्रिचत्वारिंशोऽ
ध्यायः ॥ ४३ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ओव्यासंख्या ॥ १७२ ॥ छ ॥ छ ॥

१६

श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक म्हणे सिद्धासी ॥ पुढें चरित्रें झाली कैसी ॥ विस्ता
रावें आम्हासी ॥ कृपा करीं गा दातारा ॥ १ ॥ समस्त भक्त सेवा करिती ॥ त्यांत र
कविण करतंती ॥ अत्यंत करितसे भक्ती ॥ नित्य सेऊनी नमस्कारी ॥ २ ॥ तीने
प्रहर संसार यात्रा ॥ करूनि येतसे पवित्रा ॥ राजा आगण झाडी विचित्रा
नमस्कारी दुरूनी ॥ ३ ॥ ऐसे किती दिवस क्रमिळे ॥ शिवरात्री व्रत आलें ॥
समस्त यात्रेसी निघाले ॥ मातापिता तंतुकाचे ॥ ४ ॥ यासी बोलाविती यात्रेसी
तो म्हणे तयांसी ॥ तुम्ही मूर्ख असा पिसीं ॥ माझा श्रीपर्वत येथेचि असे ॥ ५ ॥ श्रीगु

१

रू माश्रा मल्लिकार्जुन॥ पर्वत म्हणि जे श्रीगुरूभुवन॥ आपण न येयेथुन॥ चर
णसोडुनी गुरूचे॥ ६॥ समस्त लोक त्यासी म्हणती॥ पिसे लागलें तयासी म्हण
ती॥ चुला जाऊं म्हणोनि निघती॥ भ्राता माता पिता त्याचे॥ ७॥ नगर लोक स
मस्त गेला॥ आपण एकला राहिला॥ श्रीगुरूचे मठासी आला॥ पुसतू ताती
तयासी॥ ८॥ श्रीगुरू म्हणती तयासी॥ कां गा यात्रेसी न जासी॥ तूतुकू म्हणे स्वा
मियासी॥ माझि यात्रा तुमचे चरण॥ ९॥ नाना तीर्थ यात्रा देखा॥ तुमचे चरणी
असे निका॥ वायां जाती मूर्ख देखा॥ पाषाण दर्शन करावया॥ १०॥ ऐसे म्ह

१

पोनि तंनुक ॥ नमस्कारी नित्य नित्स ॥ तंव पावली शिवरात्रि एकु ॥ माघवद्य चतुर्दशी ॥
११ ॥ श्रीगुरू होते संगमासी ॥ दोनी प्रहर होता संगमेसी ॥ आपण गेले स्नानासी ॥ उप
वास असे शिवरात्रीचा ॥ १२ ॥ संगमीं स्नान करोनि ॥ श्रीगुरूतें नमस्कारूनी ॥ उभा ठेला
करजोडूनी ॥ भक्तिपूर्वक एकभावें ॥ १३ ॥ श्रीगुरू म्हणतीत यासी ॥ तुझे समस्त गेले
यात्रेसी ॥ तूं एकला चिराहिलासी ॥ पाहातोसि विनोद श्रीपर्वताचा ॥ १४ ॥ पुसिले क
धीं आहे देखिलेंसी ॥ म्हणे स्वामी नेणों कैसी ॥ तुमचे चरण आम्हांसी ॥ पर्वत
यात्रा सदां असती ॥ १५ ॥ त्याचा भाव पाहोनी ॥ जवळ बोलाविती श्रीगुरूमुनी ॥ बै

सम्हणतीकृपाकरूनि॥ म्हणतीदाखऊश्रीपर्वत॥१६॥ नयनझांकूनिपादुकेसी॥ दृढध
रीं गावेगेसीं॥ ऐसें म्हणोनितयांसी॥ मनोवेगेंघेऊनीगेले॥१७॥ क्षणनलगतोश्रीगिरिसी
घेउनीगेलेभक्तासी॥ तीरींबैसलेपाताळगंगेसी॥ नयनउघडीं म्हणतीतया॥१८॥ क्षा
णएकत्यासी निद्रावस्था॥ म्हणतांझालाजागृता॥ अवलोकीतांश्रीपर्वतसहिता॥
म्हणेस्वप्नकिंवासत्य॥१९॥ श्रीगुरुनिरोपितीतयासी॥ कांगाभ्रांतपणेपाहासी॥ वे
गींजायदर्शनासी॥ स्नानक्षौरकरोनियां॥२०॥ श्रीगुरुनिरोपदेतां॥ शीघ्रगेलास्नाना
करितां॥ तेथेंदेखिलेमातापिता॥ भ्राताग्रामलोकसकळ॥२१॥ तेपुसतीतयासी॥

२

कवणे मार्गें आलासी ॥ आमुचे भेटी कां गा न येसी ॥ लपून येणें कोण धर्म ॥ २२ ॥ विनवीत
से मातापितयांसी ॥ आम्ही निघालों आजि दोन प्रहरेंसी ॥ एक घटिका लागली वाटेसी ॥
आतां आलों गुरुसमागमें ॥ २३ ॥ एक हांसती मिथ्या म्हणतां ॥ आम्हासवेंचि आल्हा लप
त ॥ एसें बडिवार बोलत ॥ लब्धप्रतिष्ठा म्हणती त्यासी ॥ २४ ॥ तो कोणासवें न बोले ॥
शी घे स्नान क्षौर केलें ॥ पुष्पें अक्षता बिल्वदळें ॥ घेउनि गेला पुजेसी ॥ २५ ॥ पुजा
करितां लिंगस्थानीं ॥ देखता झाला श्रीगुरुमुनी ॥ अति विस्मय करोनी ॥ पूजा केली म
नोभावें ॥ २६ ॥ समस्त लोक पूजा करी ॥ श्रीगुरु सर्व पुजा घेती ॥ तंतुकार म्हणतसे चित्तीं ॥

श्रीगुरुमूर्ति आपण शंकर ॥ २७ ॥ असा निर्धार करोन ॥ म्हणे पाहिजे प्रसाद खूण
घेऊनि गेला गुरुसन्निधान ॥ एकचित्तें परियेसा ॥ २८ ॥ श्रीगुरु पुसती तयासी ॥
एव्हां राहासी किंवा जासी ॥ तंतुकार विनवी स्वामियासी ॥ एक देखिलें नवल आ
जी ॥ २९ ॥ समस्त लोक जाऊनी ॥ देवालयाभीतरी वसोनी ॥ पूजा करिती तुमचे चरणी
लिंग न देखें तुम्हीच तेथें ॥ ३० ॥ श्रीगुरु जवळी असतां ॥ इतुके दूरी कां कष्टतां ॥ लो
कु येताती बहुतां ॥ काय कारण या स्थानासी ॥ ३१ ॥ तूं तरी केवळ परमेश्वर ॥ दिसतो
सि आम्हां नर ॥ न कळे तुझा महिमा अपार ॥ गोप्यरूपी गुरुनाथ ॥ ३२ ॥ सर्वजन मू

ट होऊन ॥ नेणती तुझें महिमान ॥ कां येती या स्थानी ॥ विस्तारोनि सांगा मज ॥ ३३ ॥ श्रीगुरु म्ह
णती एक भक्ता ॥ सर्वत्र ईश्वर पर्वता ॥ स्थान महिमा असे ख्याता ॥ जे भग म्या त्रिभुवनी ॥ ३४
तंतुक म्हणे स्वामियासी ॥ तूं पूर्णब्रह्म होसी ॥ हे स्थान महिमा वानिसी ॥ विस्तारोनि सां
गा आम्हा ॥ ३५ ॥ श्रीगुरु निरोपिती भक्तीसी ॥ येथील महिमा पुससी ॥ सांगेन एक वि
स्तारेंसी ॥ स्कंदपुराणी असे कथा ॥ ३६ ॥ माधवद्य चतुर्दशी ॥ अपार महिमा पर्वतासी
सांगेन एक नसरतेसी ॥ म्हणोनि श्रीगुरु सांगतसे ॥ ३७ ॥ पूर्वी ख्यातु किरात ईशीं ॥ विम
र्षण राजा परियेसी ॥ शूर असे पराक्रमेंसी ॥ समस्त शत्रु जिंकिले तेणें ॥ ३८ ॥ आपणीक

त्या बुद्धि असे ॥ पारधी करी बहुवसें ॥ बलाढ्य शूर बहु असे ॥ चंचळ सकळ
स्त्रीरत ॥ ३९ ॥ सर्व मांसभक्षण करी ॥ ग्राह्य अग्राह्य न विचारी ॥ ऐसा वर्ते दुराचारी
ईश्वर पूजी भक्तिभावें ॥ ४० ॥ नित्य पूजा करी अपार ॥ शिवरात्र आलिया हर्षनिर्भर ॥
गीत नृत्य वाद्य परिकर ॥ भक्तिपूर्वक करी पूजा ॥ ४१ ॥ आचार नरीं बरवा नेमे ॥ शिवपू
जा करी बहुवसें ॥ पत्नी एक त्यासि असे ॥ सुलक्षणा नाम असे तिशी ॥ ४२ ॥ सुशी
ल सगुणी पतिव्रता ॥ मनीं करी बहु चिंता ॥ पुरुष आपला परद्वाररत ॥ ईश्वरभक्ती क
रीतसे ॥ ४३ ॥ ऐसें क्रमितां एके दिवसी ॥ पुसों लागली स्त्री पुरुषासी ॥ म्हणे प्राणेश्व

रा परियेसीं ॥ विनंती माझी एक असे ॥ ४४ ॥ क्षमा करावे माझे बोल ॥ विस्तारूनियां
सकळ ॥ तूं दुराचारी भक्षिसी सबळ ॥ परहानी निरंतर ॥ ४५ ॥ तुज या ईश्वरावरी
भक्ति उपजली कवणे परी ॥ सांगावें आतां विस्तारीं ॥ कोपन धरीं प्राणनाथा ॥ ४६ ॥
राजा म्हणे स्त्रियेसी ॥ बरवें पुसिलें तुवां आम्हासी ॥ ज्ञान झालें आतां मानसी
पूर्वजन्म माझा सांगेन ॥ ४७ ॥ पूर्वी धनगराघरीं आपण श्वानयोनी माजी जाण
होतों तेथें काळक्रमोन ॥ शिवरात्री आली एके दिवसीं ॥ ४८ ॥ त्या नगरीं होते एक
शिवालया ॥ समस्त लोक आले पूजावया ॥ आपण हिंडत गेलों स्वभावें ॥ भक्षण

५

कांहीं मिळेल म्हणोनि ॥ ४९ ॥ उत्साहें लोक पूजा करिती ॥ नाना वाद्यें वाजविती ॥ गंभी
र लोक प्रदक्षणा करिती ॥ धरूनि ओरती हीसकळिक ॥ ५० ॥ आपण गेलों द्वारांत ॥ वि
नोदें पाहीन म्हणत ॥ मज देखोनि आले धांवत ॥ काष्ठपाषाण घेऊनी ॥ ५१ ॥ आप
ण पोळीमध्यें होतों ॥ द्वारपाळ पातले मारूं म्हणत ॥ धरा धरा अवघे म्हणत ॥ मारूं
लागले पाषाणी ॥ ५२ ॥ वाट नाहीं बाहेर जावयासी ॥ पळतसे देवालयासी ॥ सां
भिलाष असे जिवासी ॥ मार्ग नाहीं कोठें देखा ॥ ५३ ॥ बाहेर जाईन म्हणत ॥ द्वारा
कडे मागुती येत ॥ सर्व लोक पाठी लागत ॥ सव्य प्रदक्षणा पळतसें ॥ ५४ ॥ लपाव

५

याटावनाहींदेखा ॥ वेष्टिलापोलिमार्गसारिखा ॥ पाटीलागलेसकळिका ॥ पुन्हा
पळेतेसाची ॥ ५५ ॥ उच्छिष्टमिकेलम्हणोनि ॥ देउळांतगेलोंभामिनी ॥ काकुळती
बहुमनी ॥ प्राणवाचवीतम्हणतसें ॥ ५६ ॥ ऐसातीन्हीवेळापळालों ॥ मारितीलम्ह
णोनिभ्यालों ॥ अंतरगटहीं निघालों ॥ पूजादेखिलीशिवाची ॥ ५७ ॥ द्वारघेरोनिस
मस्तलोक ॥ शस्त्रेंमारितीमजअनेक ॥ ओढूनीटाकिलीसकळिक ॥ शिवालया
बाहेरी ॥ ५८ ॥ मजपुण्यघडिलेंप्रदक्षिणी ॥ पूजादेखिलीनयनी ॥ तेणेंपुण्येंरा
जाहोउनी ॥ उपजलोंएकप्राणेश्वरी ॥ ५९ ॥ शिवरात्रीहोतीतेदिवसीं ॥ नामिळे

उच्छिष्टभक्षावयासी ॥ प्राण त्यजिला उपवासी ॥ तेणें पुण्य मज घडलें ॥ ६० ॥ आणीक ए
क पुण्य घडलें ॥ दीपमाळा होती उजळली ॥ ती म्यां डोळ्यानें देखिली ॥ प्राण त्यजिला शिव
द्वारीं ॥ ६१ ॥ तेणें पुण्यें झालें ज्ञान ॥ एक शिवरात्रीचें महिमान ॥ म्हणशी दुराचारी आपण ॥ त्या
चा संदेह सांगेन ॥ ६२ ॥ पूर्वजन्म माझा श्वान ॥ त्याचा स्वभाव सर्व भक्षण ॥ सर्वांठाईं घे वा
सना ॥ तेचि स्वभाव मज असती ॥ ६३ ॥ ऐसें स्त्रियेसी सांगितलें ॥ पुन्हा प्रश्न तिणें केले
म्हणे स्वामी जें सांगितलें ॥ आपला जन्म पुरातन ॥ ६४ ॥ तूं अससी सर्वज्ञानी ॥ माझा जन्म
सांग विस्तारोनि ॥ म्हणोनि लागतसे चरणीं ॥ कृपा करी गा प्राणेश्वरा ॥ ६५ ॥ ऐकें वधू ज्ञानस

ती ॥ तुस्मा पूर्वजनमा कपोती ॥ करीत होतीस उदरपुर्ती ॥ एकेदिवसी अवधातीं ॥ ६६ ॥ पडिला
होता मांस गोळा ॥ तो तुवां चोचीं धरियेला ॥ उडून होतीस आकाशमंडळा ॥ तो देखिला
घारीनें ॥ ६७ ॥ कवळ घेईन म्हणोनी ॥ घार आली धांवोनी ॥ तूं गेलीस पळोनी ॥ महा
अरण्यक्रमित एक ॥ ६८ ॥ पाठीला गलीते घारी ॥ मागेंपुढें न विचारी ॥ तूं पळत प
ळतवनांतरीं ॥ श्रीगिरिपर्वतावरी गेलीस ॥ ६९ ॥ सवेंचि आलीते घारी ॥ तूं गेलीस
वोदेवालय शिखरीं ॥ भोंवोंला गलीस प्रदक्षिणा करी ॥ श्रम झाला बहुत ॥ ७० ॥ हुसति
आलीस धांवत ॥ प्राण होता कंठगत ॥ श्रमोनि तूं शिखरी बैसत ॥ घारिनें येउनी मारिलें

चोंवी ॥ ७१ ॥ घेऊनि गेली मांसगोळा ॥ तुझा देह पंचत्व पावला ॥ प्रदक्षिणा पुण्यफळा
झाली सवो राजपत्नी ॥ ७२ ॥ इतुकिया अवसरीं ॥ पुन्हा पतीसी प्रश्न करी ॥ आतां तुझे नि
रोपावरी ॥ ईश्वरपूजा करीन ॥ ७३ ॥ पुढें माझें काय होईल ॥ तुम्ही कवणे स्थानी असा
ला ॥ तें भविष्य सांगा सकळ ॥ प्राणप्रिया राजेंद्रा ॥ ७४ ॥ राजा सांगे सतीसी ॥ पुढील जन्म
मूज पुससी ॥ आपण राजा सिंधुदेशीं ॥ जन्म पावेन अवधारीं ॥ ७५ ॥ माझी भार्या तूंचि हो
सी ॥ जन्म होईल संजयदेशी ॥ तेथील राजा पवित्रवंशी ॥ त्याची कन्या होसील ॥ ७६ ॥
तिसरा जन्म आपणासी ॥ राजा होईन सौराष्ट्रदेशीं ॥ तूं उपजशील कलिंगराजवंशी ॥

माझी पत्नी होशील ॥ ७७ ॥ चवथा जन्म आपणासी ॥ राजा होईल गांधार देशीं ॥ तूं उपजशील मगधकुळेंसी ॥ तैं माझी होशील प्राणेश्वरी ॥ ७८ ॥ पांचवा जन्म आपणासी ॥ राजा होईन अवंति देशीं ॥ तूं दशार्णराजकुळीं जन्मसी ॥ माझी भार्या होशील तूं ॥ ७९ ॥ साहावा जन्म आपणासी ॥ अनंत नाम राजा परियेसी ॥ ययाती राजकन्या होसी ॥ तैं माझी प्राणेश्वरी ॥ ८० ॥ सातवा जन्म आपणासी ॥ राजा होईन पांड्य देशीं ॥ रूप लावण्यें मज सरसी ॥ न देखे कवण संसारीं ॥ ८१ ॥ ज्ञानी सर्वगुणी होईन ॥ सूर्यकांति चंद्रवदन ॥ जैसा रूपें असे मदन ॥ नाम माझें पद्मवर्ण ॥ ८२ ॥ तूं जन्मशील वैदर्भकुळीं ॥ रूपें सो

दयैंआगळी॥जैसीसुवर्णाचीपुतळी॥चंद्रवदनमुखकमळा॥८३॥सुमतिअसेंनाम
पावसी॥तुजवरीनसैंवरेंसी॥दमयंतीनळाजैसी॥सैंवरहोईलतुजमज॥८४॥राज्यक
रीनबहुवसी॥यज्ञकरीनसहस्त्रेंसी॥जिंकीनसर्वदेवांसी॥मंत्रशास्त्रशिकेनबहुत॥
८५॥देवद्विजार्चनकरीन॥नानाअग्रहारेंदानदेईन॥ऐसेंवार्धक्यपावोन॥राज्यींस्था
पीनपुत्रासी॥८६॥मगआपणआश्रमघेईन॥अगस्त्यऋषीपासीजाईन॥ब्रम्हज्ञानो
पदेशशिकेन॥अंतकाळहोयतैंव॥८७॥देहावसानसमययेतां॥तुजघेइसांगातां॥दिव्य
विमानीबैसोनितत्वतां॥स्वर्गाप्रतीजाऊंमग॥८८॥ईश्वरपूजेचीमहिमा॥शिवरात्री

व्रत उत्तमा ॥ श्रीशैल पर्वताची महिमा ॥ विशेष पुण्य कोण वर्णी ॥ ९ ॥ यापरी सांगो नित्रि
येतें ॥ आतां पाहूं श्रीशैल पर्वतातें ॥ म्हणो राजा घेउनी स्त्रीतें ॥ यात्रा करी शिवरात्री ॥ १० ॥
श्रीगुरू म्हणती तंतुकासी ॥ शिवरात्री श्रीपर्वत महिमा आहे ऐसी ॥ ऐसा तो राजा राणी
परियेसीं ॥ सप्त जन्म राज्य पावलीं ॥ ११ ॥ अंती पावलो स्वर्गलोक ॥ पर्वत महिमा यापरी
एका तुज झालें गुरूमुखा ॥ ईश्वरी पूजा करीं बरवी ॥ १२ ॥ गाणगाग्रामीं भीमातिरा ॥ तेथें
असे कल्लेश्वरा ॥ पूजा करीं निरंतरा ॥ मल्लिकार्जुनासमान ॥ १३ ॥ मग संगमेश्वर संगमेसी
पूजा करीं अहर्निशी ॥ मल्लिकार्जुन तोचि परियेसीं ॥ न धरी संदेह मानसीं ॥ १४ ॥ तंतुक म्ह

णे स्वामियासी ॥ किमर्थ मातें चाळविसी ॥ पूजेशी गेलों मल्लिकार्जुनासी ॥ लिंगस्थानीं तुम्हा
देखिलें ॥ १५ ॥ सर्वांठाईं तूंचि एक ॥ झाला अससी व्यापक ॥ कल्लेश्वर संगमनायक ॥ एकै
के सांगशी मजपुढें ॥ १६ ॥ ऐकोनि श्रीगुरू हांसती ॥ मग पादुका धरीं म्हणती ॥ नयन तया
चे झांकिती ॥ संगमा आले तात्काळीं ॥ १७ ॥ इतुकिया अवसरीं ॥ मागे भक्तगण गाणगापु
रीं ॥ श्रीगुरूसी पाहाती गंगातिरीं ॥ कोठें गेले म्हणोनी ॥ १८ ॥ एक म्हणती संगमी होते ॥
एक म्हणती नाहीं तेथें ॥ कोठें गेले पहा म्हणात ॥ चुकूर होती भक्तजन ॥ १९ ॥ श्रीगुरु आ
ले संगमासी ॥ तंतुका पाठविलें मठासी ॥ बोलवावया शिष्यांसी ॥ आपण राहिले संगमी ॥

१०० ॥ तंतुक आला गांवांत ॥ लोक समस्त पाहात ॥ कां रे क्षौर केलें म्हणत ॥ तो म्हणे श्रीपर्वतासि
गेलों होतों ॥१॥ देव पा प्रसाद विभूती ॥ नाना परीचे हार लोकां प्रती ॥ लोक देतो विस्मय करिती
म्हणती दोन महरीं घरीं होता ॥२॥ एक म्हणती सत्य मिथ्या ॥ त्यासि म्हणती सांग सत्य ॥ तंतु
क म्हणे सवें गुरुनाथा ॥ गेलों होतों वायुवेगें ॥३॥ श्रीगुरु आले संगमासी ॥ मज पाठविलें म
ठासी ॥ बोलाविलें शिष्यांसी ॥ राहुं म्हणती आज संगमीं ॥४॥ एक म्हणती होईल सत्य ॥
मूर्ख म्हणती नव्हे मिथ्या ॥ तंतुक गेला त्वरित ॥ शिष्यवर्गा जाणविलें ॥५॥ सांगितला सर्व
वृत्तांत ॥ समस्त गेले संगमा त्वरित ॥ पूजा झाली संगमीं बहुत ॥ सिद्ध म्हणे नामधारका ॥६॥

मिथ्या म्हणती जे जे लोक ॥ त्यांसी होई महापातक ॥ पंध्रा दिवसीं यात्रिका ॥ लोक आले ग्रा
मासी ॥ ७ ॥ मग पुसती तयांसी ॥ तिहीं सांगितलें तथ्येसी ॥ आनंद झाला भक्तासी ॥ म्हणे
सरस्वती गंगाधरा ॥ ८ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ जें मी सांगतसें परियेसीं ॥ श्री
गुरू महिमा अपरेंसी ॥ अमृत सेवितां निरंतर ॥ ९ ॥ यापरी सरस्वती गंगाधर ॥ सां
गे गुरुचरित्र विस्तार ॥ भावें ऐके जो नर ॥ अमृत निरंतर सेवीतसे ॥ १० ॥ इति श्री गु
रुचरित्रामृत ॥ कथा वर्णिली अद्भुत ॥ सिद्ध नामधारका सांगत ॥ श्रीशैलगमन म
हिमाऽध्याय हा ॥ ११ ॥ इति श्री नृसिंह सरस्वत्योपाख्याने सिद्धनामधारक सं

वादे श्रीशैलशिवरात्रिमहिमानाम चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४४ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ श्रीरामकृष्ण ॥ श्रीभवानीशंकर ॥ छ ॥ छ ॥

॥ ओव्यासंख्या ॥ ११२ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक म्हणे सिद्धासी ॥ गुरुचरित्र देखिलें दृष्टीसी ॥ तुम्हचें
भाग्य काय वर्णावयासी ॥ परब्रम्ह देखिलें असे ॥ १ ॥ तुम्हचेनी प्रसादें सी ॥ अमृत
पान झालें आम्हासी ॥ आतां कष्ट आम्हा कासयासी ॥ सकलाभीष्ट लाधलों ॥ २ ॥
तूं भेटलासी मज तारका ॥ दैन्य गेलें सकळिक ॥ सर्वाभीष्ट लाधलें सुखा ॥ गुरुचरि
त्र एकतां ॥ ३ ॥ मागिं कथानक सांगितलें ॥ श्रीगुरु संगमीं राहिले ॥ पुढें काय वर्तलें ॥
तें सांगावें दातारा ॥ ४ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ एक वत्सा परियेसी ॥ विचित्र झा
लें येरें दिवसीं ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५ ॥ नंदी नामा एक ब्राम्हण ॥ सर्वांगीं कुष्ठ श्वेत

१ वर्ण ॥ अंबा तुळजापुरा जाऊन ॥ वर्षें तीन आराधिली ॥ ६ ॥ संवत्सर तीन उपवास ॥ द्विज
कष्टला बहु वस ॥ निरोप झाला सप्रयास ॥ जाय चंद्रला परमेश्वरीसी ॥ ७ ॥ जगदंबे
चा निरोप घेऊनी ॥ आला चंद्रला परमेश्वरी स्थानी ॥ मास सात पुरश्चरणी ॥ पुनर
पिकले उपवास ॥ ८ ॥ नाना परी कष्टत ॥ स्वप्न झालें अवचित ॥ तुवां जावें त्वरित ॥
गाणगाग्रामास्थानासी ॥ ९ ॥ तेथें अश्री जगद्गुरु ॥ त्रयमूर्तिचा अवतारु ॥ वेषधारी से १
ला असे नरु ॥ तेथें होशी तुतमांगी ॥ १० ॥ ऐसा निरोप झाला ॥ विप्र म्हणे भलें झा
लें ॥ साहा मास कां कष्टविलें ॥ जरी तुझे हाती नोहे ची ॥ ११ ॥ जगन्माता तुळजाभवा

नी॥ तिचा निरोप घेऊनी॥ आलों तुजपासीं टाकोनि॥ तूं दैवत म्हणोनियां॥१२॥ देव
त्व म्हणे टाउके झालें॥ आम्हांसी निरोप दिधलें॥ मनुष्यापासीं जा म्हणितलें॥ तुझे
निनो हे काहींच॥१३॥ तूं दैवत जगदंबा म्हणविसी॥ आम्हां मनुष्यापासीं पाठविसी
नाव झालें दैव तुपणासी॥ भाग्य माझें म्हणतसे॥१४॥ मनुष्यापासीं जा म्हणावया
सी॥ लाज न ये केसी तुम्हासी॥ वळखिलें देवपणासी॥ मातें सात उपवास॥१५॥
पहिलेंच जरी निरोप देतां॥ इतुके कष्ट आम्हां नवते॥ दुराशा केली परमेश्वरी तें॥
म्हणतां दुःखें स्फुंदतसे॥१६॥ ऐसें अनेक प्रकारें कष्टोन॥ दुःख करीतसे ब्राह्मण॥ पु

नरपी मागुती पुरश्चरण ॥ करीन म्हणे तो द्विजा ॥१७॥ म्हणे मज बरवे होणं ॥ अथवा
आपुला प्राण देणे ॥ ऐसें बोलोनि निर्वाणी ॥ विप्र धरणें बैसला ॥१८॥ पुनरपी स्व
प्न तयासी ॥ तैसें चि होय परियेसीं ॥ आणीक समस्त भोपियांसी ॥ तेणें चि परी निरो
प होय ॥१९॥ समस्त भोपें म्हणती तयासी ॥ आजि स्वप्न झालें आम्हासी ॥ छळकत्व
न केरीं गा देवासी ॥ निरोपासरिसा जाय वेगेंसी ॥२०॥ तूं जरीं आतां न जासी ॥ आम्हा
आज्ञा झाली ऐसी ॥ बाहेर घालूं तुजसी ॥ देवालयांत येऊं न देऊं ॥२१॥ इतुकें झा
लियावरी ॥ पारणें केले द्विजवरीं ॥ पूजा करूनि नानापरी ॥ निरोप घेऊनि निघाला ॥

२२॥ गाणगाग्रामासी आला ॥ मठांत पुसूं लागला ॥ भक्तजने सांगितला ॥ संगमी
आहेती श्रीगुरु ॥ २३ ॥ भक्त म्हणती तयासी ॥ श्रीगुरु येतील पारणेसी ॥ कालशि
वरात्रीं उपवासी ॥ आतां येतील परियेसा ॥ २४ ॥ इतुकिया अवसरीं ॥ श्रीगुरु आ
ले साक्षात्कारी ॥ ग्रामलोक द्विजातें वारी ॥ दूर राहे सन्मुख ॥ २५ ॥ श्रीगुरु आले
मठांत ॥ द्विज उभा होता चिंतित ॥ भक्तजन सांगती मात ॥ विप्र एक आला असे ॥ २६ ॥
सर्वांग कुष्ठ असे श्वेत ॥ स्वामीदर्शना आलों म्हणत ॥ श्रीगुरू म्हणती आपण जाव
त ॥ संदेहरूपें आला असे ॥ २७ ॥ म्हणती बोलावा मठांत ॥ भक्त गेला धांवत ॥ त

२

या द्विजातें पाचारित ॥ आला विप्र आंगणांत ॥ २८ ॥ दुरोनि देखिलें श्रीगुरूसी ॥ नम
स्कारी नलोळे भूमीसी ॥ श्रीगुरू म्हणती तयासी ॥ संदेहरूप आलासि कां ॥ २९ ॥ देवी
पासीं कां गेलासी ॥ मनुष्यापासीं येणे कायसी ॥ संदेह धरितां मानसीं ॥ काय होय का
र्यसिद्धी ॥ ३० ॥ एसें वचन एकोनी ॥ आपुले मनींचे बोल जाणोनी ॥ क्षमा करणे स्वा
मी म्हणोनी ॥ लोटांगणे येतसे ॥ ३१ ॥ म्हणे स्वामि आपणा तमांध ॥ स्वामीचे दर्श
ने झालों शुद्ध ॥ अज्ञानवेष्टिलों होतों मंद ॥ नेणो सोय परब्रम्ह ॥ ३२ ॥ तूं साक्षात व
स्तु म्हणोनी ॥ नेणो आपण तमोगुणी ॥ आजि दिवस माझा सुदिनी ॥ दर्शनि झालों पुनी

३

ता॥३३॥ पापकर्में पापी आपण॥ पापात्माने पें खुण॥ पापें संभवलों निर्गुणा॥ शरण आ
लों तुज पासीं॥३४॥ तूं भक्तजनाचा आधार॥ शरणांगता वज्रपंजर॥ ब्रिरदु वानि
ती सचराचर॥ हे नृसिंहसरस्वती॥३५॥ आजन्म माझें कर्म गेलों॥ परब्रम्हचरण देखि
ले॥ मनोरथ माझे पुरले॥ कृपासागरा यतिराया॥३६॥ तूं भक्तजनां कामधेनू॥ म
नुष्यदेहीं आलासि अवतारू॥ तुझा पार जाणे कवण॥ त्रैमूर्ति तूंचि होसी॥३७
जैसी सगराकारणें गंगा॥ पावन करावया आली जगा॥ तैसे भक्तसेवकवर्गा
तारावया अवतरलासी॥३८॥ कां अहिल्या पाषाण॥ दिव्य देहि झाली लागतां

४

चरण ॥ तैसें मज आजी निर्गुणा ॥ झालों स्वामी गुरुनाथा ॥ ३९ ॥ व्रतबंध विवाह झालि
यावरी ॥ उद्भवली व्याधी आपुले शरिरीं ॥ स्त्री राहिली माहेरीं ॥ स्पर्शूं न ये शरीर म्हणू ॥
४० ॥ आपुले असती मातापिता ॥ सकळ म्हणती जाई परता ॥ दुःख झालें अपरिमिता ॥ संसा
र त्यजूनि निघालें ॥ ४१ ॥ गेलों होतों तुळजापुरा ॥ उपवास केले अपार ॥ माता म्हणे पाप
भार फार ॥ नव्हे बरवें तुज आतां ॥ ४२ ॥ निरोप दे जाय संन्निधी ॥ जेथें चंदला परमेश्वरी
वसती ॥ तेथें होईल पापनिवृत्ती ॥ जाईल रोग म्हणोनियां ॥ ४३ ॥ तेथें कष्ट केलें बहुत ॥
नव्हेचि कोहीं उबगात ॥ निरोप झाला जा म्हणत ॥ कृपामूर्ति तुजपासीं ॥ ४४ ॥ ऐसें मातें दे

४

वहीन॥ उबगताती देव आपण॥ म्हज देखोनि निर्वाण॥ बाहेर घाला म्हणताती॥ ४५॥
देवे मातें उबगती॥ मनुष्य कैसें देखताती॥ निर्वाणी आलीं तुम्हाप्रती॥ निधार किला
मरणासी॥ ४६॥ ऐसा पापी असोनि आपण॥ आतां काय करावें अंगहीन॥ तोंड न पाहा
ती कुष्ठी म्हणोन॥ मरण बरवें यापरतें॥ ४७॥ आतां असे एक विनंती॥ होय अथवा न हो
य निश्चिती॥ शीघ्र निरोपावें स्वामी यती॥ आशापाशीं न गोविजे॥ ४८॥ मज चाड ना
हीं या देहाची॥ प्राण देईन साक्ष तुमची॥ तूं रक्षक माउली शरणांगताची॥ निरोपावें
दातारा॥ ४९॥ जैसें देवी चाळविलें॥ आशाबद्ध तें गोविलें॥ निदानी मज सोडिलें॥ तैसें

५

नकरीं दातारा ॥ ५० ॥ ऐसें कह्मणावचन ऐकोन ॥ गुरु बोलती हांसोन ॥ बोलावि
ला सोमनाथ ब्राह्मण ॥ निरोप देती यातें न्या संगमासी ॥ ५१ ॥ वरैनें संकल्प सांगो
नि ॥ स्नान करवावें पुष्करभुवनीं ॥ अश्वत्थ प्रदक्षिणा करवोनी ॥ वस्त्रें टांका
दूर याचीं ॥ ५२ ॥ नवें वस्त्र द्यावें यासी ॥ शीघ्र आणा पारुणीसी ॥ ऐसा निरो
प देती त्यासी ॥ दोघे गेले झडकरी ॥ ५३ ॥ स्नान करोनि बाहेर आला ॥ शरीरव
र्ण पालटला ॥ अश्वत्थ प्रदक्षिणा केला ॥ सुवर्ण झालें सर्वांग ॥ ५४ ॥ वस्त्रें दे
ती ब्राह्मणासी ॥ जीर्णवस्त्र टाकिती दूरदेशीं ॥ जेथें टाकिती भूमीसी ॥ क्षारभूमी

५

ती होय त्वरित ॥ ५५ ॥ सांगातें घेऊनि द्विजासी ॥ सोमनाथ आला मठासी ॥ चर
णावरी घातलें तयासी ॥ लोक सर्व विस्मित ॥ ५६ ॥ नंदिनामें केला नमस्कार ॥
सें तोषें स्तोत्र करी अपार ॥ हर्षे निर्भर झाला असे फार ॥ लोक्त असे पादुकां
वरी ॥ ५७ ॥ श्रीगुरु पुसती तयासी ॥ तुझी मनकामना झाली परियेसी ॥ सर्वां
ग कैसें आहे त्यासी ॥ अवलोकुनी पाहें म्हणती ॥ ५८ ॥ सर्वांग पाहातां बरवें
झालें ॥ तावन्मात्र जंघेसी राहिलें ॥ पाहातां मन त्याचें भ्यालें ॥ म्हणे स्वामी असे कीं
थोडें ॥ ५९ ॥ तुझी कृपा दृष्टी झाली असतां ॥ थोडें राहिलें केवीं म्हणतां ॥ करीतसे दंड

वत॥ कृपा करीं परमात्मा॥६०॥ गुरुमूर्त्ति निरोपिती त्यासी॥ तूं संशय धरोनि आला
सी॥ मनुष्य काय देईल म्हणसी॥ तेणे गुणें राहिलें शेष॥६१॥ यासि असे एक प्रतीका
र॥ नवांक विल्व करावें अपार॥ आमुची स्तुती करीं निरंतर॥ जाईल त्वरित निश्च
यें॥६२॥ नंदिनामा म्हणे स्वामियांसी॥ लिखित नेणें वाचावयासी॥ केसें करूं क
वित्वासी॥ मंदमती आपण॥६३॥ काय जाणे कवित्व गती॥ नाहीं मज काव्याविस
ती॥ स्वामी ऐसा निरोप देती॥ म्हणोनि चरणी लागला॥६४॥ श्रीगुरु म्हणती त्या
द्विजासी॥ मुख उघडीं काढीं जिव्हेसी॥ विभुती शिपितां तयासी॥ ज्ञान उपजलें ब्रा

म्हणातें ॥ ६५ ॥ चरणावरी ठेविला माथा ॥ उभा देला स्तोत्रा करितां ॥ म्हणे स्वामी
मी नेणता ॥ शेवेशीं योग्यता न व्हे ॥ ६६ ॥ माया पाशें वेष्टोनी ॥ बुडत होतों संसा
र गहनी ॥ स्वामि आठवण न करीं कधीं मनी ॥ तुझे चरण विसरलों ॥ ६७ ॥ संसा
र सागर माया जाळ ॥ योनि जन्मोनि चोऱ्याशी कुळ ॥ आठवलें नाहीं तुझें ना
म केवळ ॥ मंद मती झाली मज ॥ ६८ ॥ स्वेद अंडज उद्भिज ऐसीं ॥ जन्म पावलों प
शु योनिसी ॥ ज्ञान केंचें आम्हासी ॥ स्थावर जंगम जै होतों ॥ ६९ ॥ नाना योनींत
मनुष्य विशेष ॥ शूद्रादि याति बहुवस ॥ जरी होतों सा जन्मास ॥ काय जाणे तुझी सोय ॥

७ ७०॥ समस्तजन्मामध्यें एक॥ ब्राम्हणाचा जन्म विशेषा॥ काय करावें होऊनी मूर्ख
गुरु सोय नेणता नर॥ ७१॥ मातेचें शोणित पित्याचें रेत॥ संपर्क झाला जननी गर्भी
त॥ जैसें सुवर्ण असे कढत॥ दिवस पांच बुद्बुदाकार॥ ७२॥ पंध्रा दिवस होय थोर
एक रस होऊनी निर्धार॥ तधीं मी काय जाणें पामर॥ पंचतत्वें झालीं मग॥ ७३॥ मा
सा एका पिंड होय॥ द्वय मासां शिर पाद हूय॥ तीन मासां सर्व अवयव॥ नवद्वारें सा ७
लीं मग॥ ७४॥ पंचतत्वें होती एक॥ पृथ्वी आप वायु तेज एक॥ प्राण आला तात्का
ळिक॥ तदीं स्मरण कैंचें मज॥ ७५॥ पंच मासां त्वचा रोम॥ साहावे मासीं उश्वास स्तो

मा॥ सातवे मासीं श्रोत्र जिव्हा शरीर धाम॥ मेद मज्जा दाटले॥ ७६॥ ऐसे नव
मास कष्टता॥ होतों जननी गर्भांति॥ रुधिर विष्ठा मूत्रांत॥ कष्टलों फार स्वामि
या॥ ७७॥ माता भक्षी उष्ण क्षार॥ कटु तीक्ष्ण असे अपार॥ तेणें पोळेलों कें अ
नेक प्रकार॥ दुःख कोणा सांगों तेव्हां॥ ७८॥ मनास आलें तें भक्षण करी॥ दुः
ख होय मज अपारी॥ ऐसें नव मासावरी॥ माता गर्भी कष्टलों॥ ७९॥ तधीं कैंचें तु
झें स्मरण॥ वोष्टिलों होतों मायें करून॥ देखिले नाहीं तुझे चरण॥ मग योनि
द्वारें जन्मलो॥ ८०॥ उपजतांची आपणासी॥ आयुष्या लिहिलें ललाटेंसी॥ अ

र्धगेलें व्यथा निद्रेशी ॥ रात्रीनिद्रा मानवा ॥ ८१ ॥ उरल्या आयुष्यांत देखा ॥ तीन भा
ग गेले विशेषा ॥ बाळयौवनवार्धक्यता ॥ निर्माण केलेत येवेळीं ॥ ८२ ॥ बाळ
पणे आपणासी ॥ कष्ट झाले असमसहासी ॥ मज घालिती पाळण्यासी ॥ मळ
मूत्रांत लोळतसें ॥ ८३ ॥ बाळपणीचे कष्ट आटविता ॥ कष्ट होय अपरिमिता
काय सांगूं गुरुनाथा ॥ नाना आपदा भोगिल्या ॥ ८४ ॥ शयनस्थळीं मळमूत्र ॥
तेथें निरंतर असें लोळत ॥ आपली विष्ठा आपण खात ॥ अज्ञानतिमिरें वेष्टि
लों ॥ ८५ ॥ एकादे समयीं आपणासी ॥ पोटदुखे बहुवशी ॥ रुदन करितां परियेसी ॥

स्तनपान करवीत ॥ ८६ ॥ क्षुधाक्रांत होय बहुत ॥ मग म्हणती याचे पोट दुखत ॥
अंगुली घालूनियां मुखांत ॥ औषध मज पाजिती ॥ ८७ ॥ ऐसें क्षुधनें पीडित ब
हुत ॥ मज घालिती पाळण्यांत ॥ हालविती पर्यंदे गात ॥ क्षुधाक्रांत रुदन करीं ॥ ८८
म्हणती रुदन करितें बाळ ॥ मुखीं सिंपिती कानी तेल ॥ रक्षा बांधिती मंत्रऊनी
केवळ ॥ नेणें माताभूक माजी ॥ ८९ ॥ पाळण्या घालिती कौतुक ॥ प्रावरणांत अस
तां वृश्चिक ॥ मारीत सेपाटी सिडंख ॥ प्रलाप असें मी करित ॥ ९० ॥ आणी कपाळ
ण्या घालिती ॥ राहें राहे गा म्हणती ॥ स्तनपान करीं म्हणती ॥ वृश्चिकवीष नेणतां

७

११ ॥ तेणें दुःखें स्तनपान न करीं ॥ मागुतीं घालिती पाळण्याभीतरीं ॥ वृश्चिक म
ज डंख मारी ॥ प्राणांतिक मज होय ॥ १२ ॥ माता खाय आम्ल तीक्ष्ण क्षार ॥ स्तनपा
न करविती मज अपार ॥ क्षीर आंबट आणि मधुर ॥ आपण खोकें सार्वकाळीं
नाना औषधें मज देती ॥ तेणें माझे डोळे दुखती ॥ कुंकु लवण क्षार घालिती ॥
डोळे आले म्हणोनी ॥ १४ ॥ ऐसे कष्ट धुरंधर ॥ बाळपणीं साहिले अपार ॥
वाढलों कष्टें करितां फार ॥ वर्षें बारा लोटलीं ॥ १५ ॥ तधीं केंचें तुझें चरणस्मरण
मज केंचें गा देवराणा ॥ कष्टलों मी याचि गुणें ॥ पूर्वजन्म नाठवेची ॥ १६ ॥ दोन भा

७

गउरले आयुष्यासी ॥ मदने आपिलें शरिरासी ॥ जैसा पतंग दीपासी ॥ भ्रमितु
तैसा उमत ॥ ९७ ॥ नेणे गुरू माता पिता ॥ समस्ता तें निंदा करितां ॥ मदनें नाठवेतु
झे चरणु चिन्ता ॥ कुळ अकुळ न विचारीं ॥ ९८ ॥ ब्राम्हणांचीं निंदा करीं ॥ दुष्टी
सवें विनोद करीं ॥ जारकर्मीयांची संगत भारी ॥ मदनें नाठवें तुझे चरण ॥
९९ ॥ मांसाचे कुवळा कारणें ॥ मत्स्य जाय जेवीं प्राणें ॥ तैसा आपण मदनबा
णें ॥ वश्य झालों इंद्रियांसी ॥ १०० ॥ नानावर्ण स्त्रियांतें अंगिकारिलें ॥ परद्र
व्य अपहारिलें ॥ सिद्ध महंत निंदिले ॥ दृष्टी न दिसे माझे कांहीं ॥ १ ॥ ऐसा मदनें

व्यापुनी॥ पुढें मागें न पाहें नयनी॥ पतंग जाय धांवोनी॥ दीपावरी पडे जैसा॥२
ऐसा वेष्टोनि मदनबाणीं॥ नायके बुद्धी श्रवणीं॥ सोय न धरीं तुझे चरणीं
यौवनपण ऐसें गेलें॥३॥ वृद्धाप्यकाळ झालिया शरिरासी॥ उबग होय
स्त्रीपुत्रांसी॥ श्वासोश्वास कफेंसी॥ सदां खोकला होय मज॥४॥ अवयव
सर्वकां पती॥ कृष्णकेश पांढरे होती॥ दंतहीन भक्ष्यें न चावती॥ श्रवणीं
नायके दृष्टी नाहीं॥५॥ ऐसा नानापरी कष्टतां॥ तुमची सेवा न कधीं घडे
आतां॥ स्वामी तारका गुरुनाथा॥ संसारसागराचे कडे लावीं॥६॥ ऐसे मं

दमतीनें आपण ॥ न ओळखवें चि तुझे चरण ॥ तूं चि केवळ नारायण ॥ अवतार श्रीगुरु
मूर्ती ॥ ७ ॥ तूं चि विश्वाचा तारक ॥ धरोनियां नरवेष देख ॥ त्रै मूर्ति तूं चि एक ॥ परब्रह्म
गुरुनाथा ॥ ८ ॥ दिवांध नेणती तुज लोक ॥ तूं चि विश्वाचा पाळक ॥ मी किंकर तुझा
सेवक ॥ संसार सागरीं तारीं मज ॥ ९ ॥ ऐसें नाना परी स्तोत्र ॥ करीतसे नंदी नामा पवित्र
जन पाहाती विचित्र ॥ त्यांसी म्हणे नंदिनामा ॥ १० ॥ ऐका हो जन समस्त ॥ श्रीगु
रु परब्रह्म वस्त ॥ आपण पाप केलें बहुत ॥ दर्शन मात्रें सर्व गेलें ॥ ११ ॥ जैसें तृण पा
चे वन विसी ॥ अग्नि पडतां होय कैसी ॥ गुरुकृपा होय जयासी ॥ पाप जळे येणें परी ॥

११ १२॥ चरणं पवित्रं विततं पुराणं॥ ऐसें बोले वेद आपण॥ सेवा करणे हो गुरुचरण
गुरुवेगळा देव नाहीं॥ १३॥ ब्रह्मदेव आपण देखा॥ दुष्टाक्षरें कपाळीं लिहीए
का॥ ती कष्टाक्षरावळी होय निका॥ श्रीगुरुचरण लागतां॥ १४॥ जवळी अस
तां निधान॥ कां न ओळखा तुह्मि जन॥ नरसिंहसरस्वती कामधेनु॥ भजा
भजा हो ह्मणतसे॥ १५॥ इहसौख्यदाता अनेक॥ अंतीं पावे वैकुंठलोक॥ ११
संदेह नाहीं होईल सुख॥ सत्य सत्य बोल माझे॥ १६॥ नांदिनामा स्तोत्र करि
त॥ श्रीगुरु संतोषती अत्यंत॥ भक्तातें ऐसा निरोप देत॥ कवीश्वर म्हणावें यासी॥

१७ ॥ कवी बसवा नाम यासी ॥ निर्धार केला भरवसीं ॥ ऐसें कृपेने बोलती त्यासी ॥
ऐकोनि चरणी लागला ॥ १८ ॥ शेष होतें जंघेवरी ॥ तें तात्काळ गेलें दुरी ॥ नंदी ना
मा आनंद करी ॥ राहिला सेवा करित देखा ॥ १९ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ गु
रुचरित्र असें परियेसीं ॥ कथा कवी बसवराची ऐसी ॥ तो हि राहिला गुरुशावें ॥ २० ॥
नामधारक म्हणे सिद्ध मुनी ॥ दुसरा करीन्द्र सिंह म्हणोनी ॥ केवीं झाला श्रीगुरु
भुवनी ॥ कैवेश्वर भक्त जाहाला ॥ २१ ॥ तें विस्तारोनि आम्हासी ॥ सांगा स्वामी कृ
पेसी ॥ वांछा असे मानसीं ॥ गुरुचरित्र ऐकावया ॥ २२ ॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥

पुटीलकथेचाविस्तार॥ ऐकतांहोयमनोहर॥ नामस्मरण कामधेनु॥२३॥ इतिश्री
१२ गुरुचरित्रामृत॥ सिद्धमुनीशिष्यसंवादत॥ कवेश्वराख्यानयेथ॥ निरोपिलेंप्रे
मळ॥२४॥ इतिश्रीगुरुचरित्रामृतेनृसिंहसरस्वत्योपाख्यानेसिद्धनामधार
कसंवादेद्विजकुष्ठपरिहारोनामपंचचत्वारिंशोऽध्यायः॥४५॥ श्रीगुरुदत्ता
त्रयार्पणमस्तु॥ शुभंभवतु॥ ओव्यासंख्या॥१२४॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ १२

श्रीगणेशायनमः॥ नामधारक विनवी सिद्धासी॥ मागें कथा निरोपिली सी॥ नंदिनामा
कवी ऐसी॥ दुसरा कवि आला म्हणोनि॥ १॥ कवण परी झाला शिष्य॥ तें सांगावें जी
आम्हस॥ विस्तारावें आदिपुरुसा॥ कृपा करोनि दातारा॥ २॥ सिद्ध म्हणे नाधारका॥
सांगेन ऐक कथानका॥ आश्चर्य झालें ऐका॥ श्रीगुरुचरित्र लौकिक॥ ३॥ गाण
गापुरीं असतां गुरु॥ ख्याती झाली अपारु॥ लोक येती थोरथोरु॥ भक्तजन बहु
झाले॥ ४॥ नंदीनामा कवी होता॥ कवित्व केलें अपरिमिता॥ समस्त लोकाशि कतां॥
प्रकाश झाले सोराष्ट्री॥ ५॥ असें असतां एके दिवसीं देखा॥ श्रीगुरु नेलें भक्तें एका

१ आपले घरीं शोभनदायका ॥ म्हणोनि नेलें आपुले ग्रामा ॥६॥ हिपरगें ग्रामासी ॥ नेलें आ
पुले गुरूसी ॥ पूजा केली बहुवसीं ॥ समारंभ थोर झाला ॥७॥ तया ग्रामीं शिवालय एक ॥
नाम कल्लेश्वर ऐका ॥ ग्रामांत प्रख्यात असे निका ॥ तेथें एक द्विज सेवा करी ॥८॥ तया ना
म नरकेसरी ॥ भावें सेवा पूजा करी ॥ नित्य पांच कवित्वें करी ॥ आणीक न वी निरंतर ॥९॥
कल्लेश्वरावांचून जाण ॥ आणीक नेणे काहीं वचन ॥ एकचित्तें एकमनें करून ॥ शिं १
वसेवा करी तसे ॥१०॥ समस्त लोक तयासी म्हणती ॥ तुझे कवित्वाची असे ख्याती ॥ श्री
गुरूसी कवित्वावरी प्रीति ॥ गुरुस्मरण करीं एक ॥११॥ तयासी म्हणे तो नर ॥ कल्लेश्वरा

सीविकिलेंजिव्हारा ॥ अन्य[illegible]देवअपारा ॥ नरस्तुतीनकरीं म्हणे ॥१२॥ ऐसेंबोलूनियांआ
पणा ॥ गेलादेवपुजेकारणा ॥ पूजाकरितांतत्क्षणु ॥ निद्राआलीतयाद्विजा ॥१३॥ नि
त्यपूजाकरोनिआपण ॥ कुविल्वकरीशिवस्मरण ॥ तैंदिवसींसर्वविसरूनं ॥ निद्रा
आलीतयाद्विजा ॥१४॥ निद्राकेलीदेवालयांत ॥ देखतअसेस्वप्नांत ॥ लिंगावरी
श्रीगुरूबैसतां ॥ आपणपूजाकरीतसे ॥१५॥ लिंगनदिसेश्रीगुरूचिअसे ॥ आपण
तयासीपुसतीहर्षें ॥ नरावितुझेंकविल्वनअसे ॥ कांगाआमुंतेपूजितोसी ॥१६॥ षो
डशोपचारेंशीं आपण ॥ पूजाकरीस्थीरमनें ॥ ऐसेंदेखोनियांस्वप्ना ॥ जागतझालातोद्वि

गु०च०

अ०
४६

२ जा ॥ १७ ॥ विस्मय करी आपुले मनी ॥ नरसिंहसरस्वती शिवमुनी ॥ आला असे अवतरो
नि ॥ आपण पूजा त्याची केली ॥ १८ ॥ हाचि होय श्रीजगद्गुरू ॥ त्रयमूर्तिचा अवतारु ॥
भेट घ्यावी हा निर्धारू ॥ धरूनि आला गुरुपासीं ॥ १९ ॥ आला विप्र लोटांगणेसी ॥ येउनी
लागला चरणासी ॥ कृपा करीं गा अज्ञानेसी ॥ नेणों तुझें स्वरूप आपण ॥ २० ॥ प्रपं
च मायेने वेष्टोन ॥ न वोळखूं आपण अज्ञान ॥ तूंचि साक्षात शिवमुनी ॥ निर्धार झा २
ला आजि मुज ॥ २१ ॥ कल्लेश्वरु केपूर गोल ॥ तूंचि होसी जगद्गुरू ॥ माझें मन झालें स्थीर
तुझे चरणी विनटलों ॥ २२ ॥ तूंचि विश्वाचा आधार ॥ शरणागता वज्रपंजर ॥ चरण

कमळवास भ्रमर ॥ टंकोनि आलों अमृत घ्यावया ॥ २३ ॥ जवळी असतां निधान ॥ कां
हिंडावें रानोरान ॥ घरा आलिया कामधेनु ॥ दैन्य काय आम्हासी ॥ २४ ॥ पूर्वी समस्त
ऋषी देखा ॥ तप करिती नसे लेखा ॥ तूं न पावसी तयां सन्मुख ॥ अनेक तपें कष्ट करि
तों ॥ २५ ॥ न करितां तप अनुष्ठान ॥ आम्हां भेटलासी निधान ॥ झाली आमुची मनका
मना ॥ कल्लेश्वर प्रसन्न झाला ॥ २६ ॥ तूंचि सत्य कल्लेश्वर ॥ ऐसा माझे मनी निर्धार
हे पा करी गा जगद्गुरू ॥ म्हणोनि चरणी लागला ॥ २७ ॥ श्रीगुरू म्हणती तयासी ॥
नित्य आमुची निंदा करिसी ॥ आजि केसें तुझे मानसीं ॥ भक्ति उपजोनि आलासी ॥

३

२८ ॥ विप्र म्हणे स्वामियासी ॥ अज्ञान अंधःकारीं आम्हांसी ॥ कैसा भेटलासी परियेसीं
ज्योतिर्मय आनंदमूर्ती ॥ २९ ॥ म्या कल्लेश्वराची पूजा केली ॥ तेणें पुण्यें तुम्हा भेटी झाली
आजि आपण पूजा केली ॥ लिंगस्थानीं तुम्हा देखिलें ॥ ३० ॥ स्वग्राममध्यें लिंगस्थानी
आपण ॥ प्रत्यक्ष देखिले तुझे चरण ॥ स्थीर झालें अंतःकरण ॥ मिळवावें शिष्यव
र्गांत ॥ ३१ ॥ ऐसें विनवी द्विजवर ॥ स्तोत्र करीतसे अपार ॥ स्वामीची पूजा षोडशोपचा
र ॥ तैसें कवित्व केलें देखा ॥ ३२ ॥ मानसपूजेचें विधान ॥ पूजा व्यक्त केली त्याणें ॥ श्रीगु
रू म्हणती तत्क्षण ॥ आइका स्वप्नलोकांसी ॥ ३३ ॥ प्रत्यक्ष आम्हीं असतां देखा ॥

३

स्वप्न अवस्थे कवित्व ऐका ॥ याणें केले वरकड निका ॥ स्वामी भेटलो म्हणोनी ॥ ३४ ॥ ऐसें
सांगोनि समस्तांसी ॥ वस्त्रें देवविती त्या कवीसी ॥ लागला श्रीगुरुचरणासी ॥ म्हणे आप
ण शिष्य होईन ॥ ३५ ॥ श्रीगुरू म्हणती तयासी ॥ कल्लेश्वर श्रेष्ठ आम्हासी ॥ पूजा करीं गा
नित्य त्यासी ॥ आम्ही तेथें सदा वसों ॥ ३६ ॥ विप्र म्हणे तयांसी ॥ प्रत्यक्ष सांडोनि तुम्हासी
काय पूजा कल्लेश्वरासी ॥ तेथें तुम्हासी म्या देखिलें ॥ ३७ ॥ तूंचि स्वामी कल्लेश्वर ॥ त्रैयमू
र्तिचा अवतार ॥ हाचि माझा सत्य निर्धार ॥ न सोडीं आतां तुझे चरण ॥ ३८ ॥ ऐसें विनवी स्वा
मियासी ॥ आला सवें गाणगापुरासी ॥ कवित्व केलें बहु वसी ॥ सेवा करीत राहिला ॥ ३९ ॥

सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ कवेश्वरशिष्य दुसरा गुरुपासीं ॥ आला येजो रितीसी ॥ भक्तीक
री बहुत ॥ ४० ॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ ज्यासी प्रसन्न होय गुरु ॥ तयाचे घरीं कल्पतरु ॥
चिंतिलें फळ देतसें ॥ ४१ ॥ कथा कवेश्वराची ऐसी ॥ सिद्ध सांगे नामधारकासी ॥ पुढील क
था विस्तारेंसी ॥ एकचित्तीं परियेसा ॥ ४२ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृतना ॥ सिद्धमुनीसंवाद ब
हुत ॥ भक्तस्तानी परिसोत ॥ नरहरीकवित्वकथा ॥ ४२ ॥ इति श्रीगुरुचरित्रांमृते नृसिंहस
रस्वत्योपाख्याने सिद्धनामधारकसंवादे कल्लेश्वरमहिमा नाम षड्चत्वारिंशोऽध्या
यः ॥ ४६ ॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु ॥ ओवा ॥ ४३ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ नामधारक म्हणे सिद्धासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारावें आम्हासी
कृपा करोनि दातारा ॥ १ ॥ नामधारका श्रीमंता ॥ ऐकेन म्हणशी गुरुचरित्रा ॥ तुज होतील
पुत्र पौत्रा ॥ सदा श्रियायुक्त होसी ॥ २ ॥ सांगेन कथा एक विचित्रा ॥ जेणें होती पतीत पवित्र ॥
ऐसें गुरुचरित्र ॥ तत्परेंसी परियेसा ॥ ३ ॥ गाणगापुरीं असतां गुरु ॥ सण दिपवाळी आला
थोरु ॥ शिष्य आले पाचारुं ॥ आपले घरीं भिक्षेसी ॥ ४ ॥ समस्त शिष्य बोलाविती ॥ एकाहूनी
एक प्रीती ॥ सातही जण पायां पडती ॥ यावें आपुल्या घराशी म्हणोनी ॥ ५ ॥ एकेक ग्रामीं ए
कासी ॥ श्रीगुरु म्हणती तयांसी ॥ समस्तां घरीं यावें कैसें ॥ तुम्ही आपणचि विचारा ॥ ६ ॥ तुम्ही वां

१ टा आपणात ॥ कोटें आधी यावें निरोपांत ॥ तेथें जाऊं निश्चित ॥ शिष्या आधीन आम्ही अ-
सों ॥ ७ ॥ आपणांत आपण पुसती ॥ समस्त आधी नेऊं म्हणती ॥ एकमेका झगडती ॥ आपुला
स्वामी म्हणोनियां ॥ ८ ॥ श्रीगुरू वारिती तयांसी ॥ तुम्ही भांडतां कासयासी ॥ आम्ही गुरुसा-
नांसी ॥ एका घरीं येऊं आम्हीं ॥ ९ ॥ ऐसें वचन ऐकोनि ॥ समस्त विनविती करजोडुनी ॥ स्वा-
मी प्रपंच पहा नयनी ॥ समर्थ दुर्बळ म्हणूनये ॥ १० ॥ समस्तांसी पहावें समान ॥ न विचारावें
मूनपण ॥ उपेक्षिसी दुर्बळ म्हणोनी ॥ गंगाप्रवेश करूं आम्ही ॥ ११ ॥ विदुराचिया घरासी १
कृष्ण जाय भक्तीसी ॥ कौरवराज मंदिरासी ॥ न जाय भक्तवत्सल ॥ १२ ॥ आम्ही समस्त तुझे

दास ॥ कोणासी न करावें उदास ॥ जो निरोप द्याल आम्हास ॥ तोचि करूं आपण म्हणती ॥ १३ ॥
ऐसें म्हणोनि यां समस्त ॥ करिती साष्टांग दंडवत ॥ समस्त आम्हा पाहाहो म्हणतो ॥ विनविती
श्रीगुरूसी ॥ १४ ॥ श्रीगुरू म्हणती समस्तांसी ॥ येऊं तुमचे घरासी ॥ चिंता न धरा हो मानसीं
भाक आमुची घ्या म्हणती ॥ १५ ॥ ऐसें ऐकोनि गुरुवचन ॥ विनविताती सातै जण ॥ समस्तां
शी म्हणता येईन ॥ कोणी करावा भरवसा ॥ १६ ॥ श्रीगुरू मनी विचारिती ॥ अज्ञान लोक हें
नेणती ॥ आतां सांगूं येकांती ॥ एक एकातें बोलाउन ॥ १७ ॥ जवळी बोलाऊनी एकासी
कानी सांगती तयासी ॥ आम्ही येतो तुझे ग्रामासी ॥ कवणा जवळी न सांगावें ॥ १८ ॥ ऐसी

२ भाकसासी देती ॥ रात्रीं येऊं तव गृहा म्हणती ॥ त्या भक्ता तें पाठऊंनी दुसऱ्याते म्हणती ॥
येऊं तुम्हा ग्रामासी ॥ १९ ॥ ऐसें सांगोनि तयांसी ॥ पाठविलें ग्रामासी ॥ बोलाविती तिसऱ्या
सी ॥ येणेंचि रिती सांगितलें ॥ २० ॥ ऐसे साते जणां देख ॥ समजाऊनी गुरु नायक ॥ पाठवि
लें तुम्ही ऐका ॥ महत् आश्चिर्य वर्तलें ॥ २१ ॥ एकमेकां न सांगत ॥ श्रीगुरु आले मठां
त ॥ अतिविनोदें वर्तत ॥ गेले भक्त साते जण ॥ २२ ॥ ग्रामींतील भक्तजन ॥ ही व्यवस्था
ऐकोन ॥ विनविताती कर जोडून ॥ आम्हा सांडोनि जातां स्वामी ॥ २३ ॥ तयांसि म्हणती २
गुरुनाथ ॥ राहू आम्ही नाहीं जात ॥ न करा चिंता मनांत ॥ आम्ही येथेंचि असों देखा ॥ २४ ॥

ऐशासंधीस श्रीगुरूसी ॥ होउनी आली जवळी निशी ॥ दीपावळीची त्रयोदशी ॥ रात्रीं मगल
स्नान करावें ॥ २५ ॥ आट रूप झाला आपण ॥ अपार महिमा नारायण ॥ सातां त्याही ग्रामा
सी गेले जाण ॥ गाणगापुरीं हि होते ची ॥ २६ ॥ ऐसी दिपवाळी झाली ॥ समस्तांठाईं पूजा घे
तली ॥ पुन्हा एकचि मूर्ति देखीली ॥ गोप्यरूपें कोणी नेणे ॥ २७ ॥ कार्तीक मासीं पौर्णिमेसी ॥ कराव
यादीपाराधनेसी ॥ समस्त आले परियेसीं ॥ गाणगापुरीं गुरुजवळी ॥ २८ ॥ समस्तांहि नम
स्कार करिती ॥ भेटतां दाहावे दिवसीं म्हणती ॥ एकमेकांने झगती ॥ म्हणती आपुले घरीं गु
रु होते ॥ २९ ॥ एक सत्य मिथ्या म्हणत ॥ समस्ताहि शिष्य खुणा दाखवित ॥ आपणा दिल्हें ते

३

दीवस्त्र ॥ श्रीगुरूजवळी असे ॥ ३० ॥ समस्त हि राहिले तटस्थ ॥ ग्रामस्थ लोक असत्य म्हण
ती ॥ आम्हाजवळी गुरू होते सत्यःदि ॥ पवाळी येथें चि केली ॥ ३१ ॥ विसमय करिती सकळही ज
न ॥ म्हणती त्रैमूर्ति हाचि आपण ॥ अपार महिमा नारायण ॥ अवतार असे श्रीगुरूचा ॥ ३२
ऐसें म्हणोनि भक्ती समस्ती ॥ नाना परी स्तोत्रें करिती ॥ न कळे महिमा तुमचा म्हणती ॥ वे
दमूर्ती गुरुनाथा ॥ ३३ ॥ तूंचि विश्वव्यापक होसी ॥ महिमा न कळे आम्हासी ॥ काय वर्णू
चरणासी ॥ त्रैमूर्ति तूंचि एक ॥ ३४ ॥ नाना परी स्तुति करिती ॥ दीपाराधना अति प्रीति ॥
ब्राम्हण भोजन अति भक्ति ॥ करिते झाले भक्तजन ॥ ३५ ॥ श्रीगुरू महिमा ऐसी ख्याती ॥ सि

३

द्ध सांगे नामधारका प्रती ॥ भूमंडळीं झाली ख्याती ॥ गुरुनरसिंहसरस्वतीची ॥ ३६ ॥ म्हणे सर
स्वती गंगाधरू ॥ जवळी असतां कल्पतरू ॥ न ओळखती अंध बधिरू ॥ वायां कष्टती दैव
योगें ॥ ३७ ॥ भजा भजा हो श्रीगुरूसी ॥ जें जें काम्य तुम्हचे मानसीं ॥ सिद्ध होईल खरि नेंसी ॥ आ
म्हा प्रचिति झाली असे ॥ ३८ ॥ अमृत मिळतां पानासी ॥ क्षार कडु आवडे मूर्खासी ॥ ज्ञानवंत
भक्तजनांसी ॥ नामामृत गुरूचें ॥ ३९ ॥ श्रीगुरुसेवा हो तुम्ही करा ॥ ऐसा पिटीतसे डांगोरा ॥ सं
मत असे वेदशास्त्रां ॥ गुरु तोचि श्रीगुरुमूर्ती ॥ ४० ॥ गुरुवेगळी गती नाहीं ॥ जे निंदिती नरदेहीं
वेदशास्त्रें बोलती पाहीं ॥ शूकरयोनीत जन्मती ॥ ४१ ॥ तुम्ही म्हणाल मज ऐसें ॥ आपुले इच्छे

४ लिहिलें कसें ॥ वेदशास्त्रीं सांगीतलें ऐसें ॥ असेल तरीं अगिकारा ॥ ४२ ॥ संसारसागर धुरंधरा ॥
उतरावया पैलपारा ॥ गुरुविणें निर्धार ॥ तारक कोण त्रिजगतीं ॥ ४३ ॥ निर्जळ संसार अरण्यांत ॥ पं
वई घातलें असे अमृत ॥ शिवाशिवा हो तुम्ही समस्त ॥ अमरत्व तुम्हा होईल ॥ ४४ ॥ श्रीगुरू नरसिं
हसरस्वती ॥ अवतार असे त्रिमूर्ती ॥ गाणगाग्रामी असे ख्याती ॥ आतां असे प्रत्यक्ष ॥ ४५ ॥ जे जा
तीत यास्थाना ॥ तात्काळ होती मनकामना ॥ कांहीं न करा हो अनमाना ॥ प्रत्यक्ष देव तेथें असे ॥ ४६ ॥
आम्ही सांगतों तुम्हा हित ॥ प्रशस्त झालिया तुमचें चित्त ॥ गाणगापुरीं जावें त्वरित ॥ म्हणे सर ४
स्वती गंगाधर ॥ ४७ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्धमुनीसंवादत ॥ अष्टरूपें श्रीगुरुध

रित ॥ सप्तचंत्वारिंशोऽध्याय हा ॥ ४८ ॥ इति श्री नृसिं० अष्टरूप महिमा नाम स
प्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥ श्रीगुरुदत्तात्रयापणमस्तु ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥

॥ ओव्यासंख्या ॥ ४८ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ अपूर्व झालें एक परियेसीं ॥ गुरुचरि
त्रविस्तारेंसी ॥ सांगतां संतोष होतसे ॥ भगाणगापुरीं असतां गुरु ॥ ख्याती झाली अ
परंपारु ॥ भक्त होता एक शूद्र ॥ तयाची कथा एकपां ॥ २ ॥ श्रीगुरु नित्य संगमासी ॥ जा
त असतां अनुष्ठानासी ॥ मार्गीनितो शूद्र परियेसीं ॥ आपले शेतीं उभा असे ॥ ३ ॥ श्रीगु
रूतें नित्य देखोनी ॥ धांवत येऊनि शेतांतुनी ॥ आपण साष्टांग नमोनी ॥ पुनरपी जा
य आपले स्थाना ॥ ४ ॥ माध्यान्हकाळीं मठासी येतां ॥ पुनरपी चरणी ठेवी मा
था ॥ ऐसे किती दिवस होतां ॥ शूद्राची भक्ती वाटली ॥ ५ ॥ श्रीगुरुरूत यासी न बोलती ॥

१ नमनकेलियाउगेचिबैसती ॥ येणेविधीबहुकाळक्रमिती ॥ आलाशूद्रनमस्कारा ॥
नमस्कारकरितांशूद्रासी ॥ श्रीगुरुपुसतीसंतोषी ॥ कांगानित्यकष्टतोसी ॥ येवोनिआडप
डतोशिकां ॥ ७ ॥ तुझेमनीकायवासना ॥ सांगेत्वरितविस्तारोन ॥ शूद्रविनवीकरजोडुन ॥
शेतआपुलेंपिकावे ॥ ८ ॥ गुरुपुसतीतयास ॥ कायपेरिलेंशेतांत ॥ शूद्रम्हणेयावना
ळबहुत ॥ पीकव्हावेंतुझेधर्मी ॥ ९ ॥ नमस्कारितांतुम्हानित्य ॥ पीकआलेंअसेअत्यं १
त ॥ पोटरीसआलेंअसेत्वरित ॥ आतांतुझेनिधर्मेंजिऊं ॥ १० ॥ स्वामीयावेंशेतापासीं ॥
पाहावेंअमृतदृष्टीसी ॥ तूंसमस्तांमतीपाळिसी ॥ शूद्रम्हणोनिनउपेक्षावें ॥ ११ ॥ श्रीगुरु

गेले शेतापासीं ॥ पाहून म्हणती त्या शूद्रासी ॥ सांगेन तें जरी एकशी ॥ विश्वास होईल बो
लाचा ॥ १२ ॥ जें सांगेन मी तुजसी ॥ जरी भक्तीनें अंगिकारिसी ॥ तरीच सांगूं परियेसी ॥
एकाभावें त्वां करावें ॥ १३ ॥ शूद्र विनवी स्वामियासी ॥ गुरुवाक्य कारण आम्हासी ॥ दुस
रा भाव आम्हापासीं ॥ नाहीं स्वामी म्हणतो ॥ १४ ॥ मग निरोपिती श्रीगुरु तयासी ॥ आम्ही
जातों संगमासी ॥ परतोनि येऊं माध्यान्हेसी ॥ तंव कापावें सर्व पिक ॥ १५ ॥ ऐसें सांगोनि शू
द्रासी ॥ श्रीगुरु गेले संगमासी ॥ शूद्र विचारी मानसीं ॥ गुरुवाक्य आपणा कारण ॥ १६ ॥
शीग्र आला ग्रामांत ॥ अधिकारियासी विनवित ॥ रखोनि द्यावें मळाशेत ॥ गतसंवे

२ त्सराप्रमाणें धान्य देईना ॥ १७ ॥ अधिकारी म्हणती तयासी ॥ पीक झालें असे शेतासी ॥ याका
रणें गुनकें मागसी ॥ अंगिकार न करिती ॥ १८ ॥ नाना प्रकारें विनवी त्यांसी ॥ द्विगुण देईन गत
संवत्सरेंसी ॥ अंगिकारिलें संतोषीं ॥ वचनपत्र लिहून घेती ॥ १९ ॥ आपण अभयपत्र घेउनी
लोक मिळवोनि तत्क्षणीं ॥ गेला शेतांत संतोषोनी ॥ म्हणे कापीन वेगेंशी ॥ २० ॥ कापूं ला
गतां शेतासी ॥ स्त्रीपुत्र वर्जिती तयासी ॥ पाषाण घेऊनि त्लियेसी ॥ मारूं आला तो शू
द्र ॥ २१ ॥ पुत्रातें मारीयेणे परी ॥ पळत आले गावांभीतरी ॥ आड पडती राजद्वारीं ॥ पिसें २
लागलें पतीसी ॥ २२ ॥ पीक असे बहुवशी ॥ इतुक्यांत कापितो मूर्ख राशी ॥ वर्जितां पाहा

आम्हासी ॥ पाषाण घाई मारिलें ॥ २३ ॥ संन्याशाचे माहात्म्य वाचे बोले ॥ पीक सर्व कोम
व्कापिलें ॥ आमचें जीवित्व भाजन गेलें ॥ आणीक भक्षितों एक मास आम्हीं ॥ २४ ॥ अ
धिकारी म्हणतीत यांसी ॥ कापून कापू आपुल्याशे तासी ॥ पत्र असे आम्हासी ॥ गतसं
वत्सराद्दिगुण धान्य घ्यावें ॥ २५ ॥ कर्जोविया मापासें पाठविती ॥ शूद्र न ऐके केवणे गती ॥
शूद्र म्हणे अधिकारि भिती ॥ पेवींचे कुण आतां देइना ॥ २६ ॥ जाउनी सांगती अधिकारि
यासी ॥ आम्ही सांगितलें शूद्रासी ॥ सांगूनि पाठविलें तुम्हासी ॥ विनोद असे परियेसा ॥
२७ ॥ जरी भितील अधिकारी ॥ तरी देईन आतां घरी ॥ गुरें बांधीन तयांचे द्वारीं ॥ पत्र

३ आपणा दिलें असे ॥ २८ ॥ दूत सांगती ऐशा रिती ॥ पुढें वर्तैल कायस्थिती ॥ राजा अधिकारीत
यां प्रती ॥ काय उत्तर बोलतसे ॥ २९ ॥ अधिकारी म्हणती तयासी ॥ आम्हां चिंता कायसी ॥
पेवें ठाउक आहेत आम्हासी ॥ धान्य आहे अपार ॥ ३० ॥ इतुकें होतां भूद्र देखा ॥ पीक कापि
लें मनःपूर्वका ॥ उभा असे मार्गी एका ॥ श्रीगुरु आले परतोनी ॥ ३१ ॥ नमन करूनि गुरू
सी ॥ शेत दाविलें कापिलें ऐसी ॥ गुरुनाथ म्हणती तयासी ॥ वायां कापिलें म्हणोनी ॥ ३
३२ ॥ विनोदें तुज सांगितलें ॥ तुवां निर्धारें कोपिलें ॥ म्हणे तुमचें वाक्य भलें ॥ तेंचि मज
कामंधेनु ॥ ३३ ॥ ऐसें ऐकोनि श्रीगुरु म्हणती ॥ निर्धार असे तुझे चित्तीं ॥ होईल अत्यंत

फळोसत्ती ॥ चिंता न करीं म्हणोनियां ॥ ३४ ॥ ऐसें सांगोनि गुरुनाथ ॥ आले आपण ग्रामांत ॥ स
वें शूद्र असे येत ॥ आपुले घरा प्रती गेला ॥ ३५ ॥ पुसावया येती समस्त लोक ॥ नयाचे घरीं
होते आकांत ॥ स्त्रीपुत्र रुदन करित ॥ म्हणती आपुला ग्रास गेला ॥ ३६ ॥ शूद्र समस्तातें
संबोधी ॥ नका करूं चिंता राहा सुखी ॥ गुरु सोय नेणा मूर्खी ॥ कामधेनु वाक्य नयाचें ॥ ३७
एकैकाचे सहस्र गुण ॥ अधिक लाभेल तुम्हा जाण ॥ स्थीर करा अंतःकरण ॥ हाणि नव्हे
निर्धार जाणा ॥ ३८ ॥ गुरुकृपा होय ज्यासी ॥ दैन्य कैचें होय त्यासी ॥ निधान जोडलें आम्हा
सी ॥ म्हणोनि शूद्र सांगतसे ॥ ३९ ॥ नर म्हणतां तुम्ही त्यासी ॥ शिवमुनी जाणा भरवसी ॥ असे का

४

रणपुटें आम्हासी ॥ म्हणोनि निरोपिलें असे मज ॥ ४० ॥ नानापरी स्त्रियेसी ॥ संबोधित
से शूद्र अतिहर्षी ॥ दुष्टजन बंधुवर्गासी ॥ येणेंचि रीती सांगतसे ॥ ४१ ॥ समस्त राहिले नि
वांत ॥ ऐसे आठ दिवस क्रमित ॥ वायु झाला अतिशीत ॥ समस्त पिकें नासली ॥ ४२ ॥ सम
स्त ग्रामिंचीं पिकें देखा ॥ शीतें नासलीं सकळिका ॥ पर्जन्य पडिला अकाळिका ॥ मूळनक्ष
त्रीं पतियेसा ॥ ४३ ॥ ग्राम राहिला पिकाविणें ॥ शूद्रशेत वाढलें शतगुणें ॥ वाटलें यावना
ळ सगुणें ॥ येकेका अठरा फडगरेसी ॥ ४४ ॥ ती शूद्रस्त्री संतोषोनी ॥ शेता आली पुजा
घेउनी ॥ अवलोकितसे आपुले नयनीं ॥ महा आनंद करितसे ॥ ४५ ॥ पीक झालें अत्यंत ॥

४

देखोनियां समस्त ॥ येऊनि जन समस्त तेथु ॥ महदाश्चर्य करिती देखा ॥ ४६ ॥ येऊनी लागे
पतीचरणी ॥ विनवीतसे कर जोडूनी ॥ बोले मधुर करुणा वचनी ॥ क्षमा करीं म्हणतसे ।
४७ ॥ अज्ञानमदें अतिवेष्टिलें ॥ नेणतां तुम्हां निंदिलें ॥ श्रीगुरु केचा काय म्हणितलें
क्षमा करणें प्राणनाथा ॥ ४८ ॥ ऐसें पतीसीं सबोधोनी ॥ श्वेताचा देव पुजोनी ॥ विचार करि
नी दोघें जणें ॥ गुरुदर्शनी आईजे ॥ ४९ ॥ म्हणोनि सांगोनि येसी ॥ पूजां आली श्रीगुरुसी
स्वामी पुसती तयांसी ॥ काय वर्तमान म्हणोनी ॥ ५० ॥ चरणी लागली तेव्हां दोन्ही ॥ हस्त
द्वय जोडोनी ॥ स्वामीदर्शनें उल्हासूनी ॥ उभी ठाकली सन्मुख ॥ ५१ ॥ दोघें जणे स्तोत्र करि

५ सी ॥ स्वामी पुसती तयांसी ॥ काय वर्तमान म्हणोनी ॥ ५० ॥ चरणी लागली तेव्हां दोन्ही ॥ ह
स्त द्वय जोडोनी ॥ स्वामी दर्शनें उल्हासूनी ॥ उभीं ठाकलीं सन्मुख ॥ ५१ ॥ दोघें जणें स्तोत्र क
रिती ॥ जय जयाजी श्रीगुरुमूर्ती ॥ कामधेनु कुळदैवत तूं चित्ती ॥ तूंचि आमुचा गुरुदे
वत ॥ ५२ ॥ तुझें अमृतवचन आम्हां ॥ चिंतामणि प्रकार महिमा ॥ पूर्ण झाली आमुची काम
ना ॥ शरण आलों तुज आम्ही ॥ ५३ ॥ भक्तवत्सल ब्रीद ख्याती ॥ जैसें जगीं तुज वानिती ॥ आ ५
म्ही देखिलें दृष्टांती ॥ म्हणोनि चरणी लागला ॥ ५४ ॥ नाना प्रकारें पूजा आरती ॥ शूद्र स्त्री
करिते सभक्ती ॥ श्रीगुरु बोलती अति प्रीती ॥ लक्ष्मी अखंड तुझे घरीं ॥ ५५ ॥ निरोप घेउनी दोघे

जपें॥ गेलीं आपुले आश्रमीं जाणा॥ कितीतों मास काळक्रमण॥ पीक झालें अपार॥ ५६॥ गत
संवत्सराहूनी देखा॥ शतगुणी झालें धान्य अधिका॥ शूद्र म्हणतसे ऐका॥ अधिकारिया
तें बोलाउनी॥ ५७॥ शूद्र म्हणे अधिकारियासी॥ पीक गेलें सर्वा गावांसी॥ वोस दिसे कोठारा
सी॥ आपण द्यावा अर्धभाग॥ ५८॥ गतवर्षीं द्विगुण तुम्हांसी॥ अंगिकारिलें मी परियेसी
धान्य झालें बहु वसी॥ शताधिक गुणी देखा॥ ५९॥ परी देईन अर्ध संतोषीं॥ संदेह न करा हो
मानसीं॥ अधिकारी म्हणती तयासी॥ धर्महानी केवी करूं॥ ६०॥ गुरुकृपा होतां तुजवरी॥ पीक झा
लें बहुतें परी॥ नेऊनि यां आपुले घरीं॥ राज्य करीं म्हणती तयासी॥ ६१॥ संतोषोनि शूद्र देखा॥

६

वि प्रावांढीधान्यअनेका॥ घेऊनिगेलासकळिका॥ राज्यधान्यदेऊनी॥ ६२॥ सिद्धम्हा
णेनामधारकासी॥ श्रीगुरुचरित्रमहिमापतियेसीं॥ दृढभक्तिअसेज्यासी॥ दैन्यकैचैंत
याघरीं॥ ६३॥ सकळाभीष्टेत्यासीहोती॥ लक्ष्मीराहेअखंडिती॥ गुरुसेवाहोतनिश्चिती
म्हणेसरस्वतीगंगाधर॥ ६४॥ इतिश्रीगुरुचरित्रांमृते। गुरुशिष्यसंवादविस्मात॥
भक्ताभीष्टवरप्राप्त॥ अष्टाचत्वारिंशोध्यायहा॥ ६५॥ इतिश्रीनरसिंहसरस्वत्योपाख्या
नेंसिद्धनामधारकसंवादेश्रुद्रोत्कृष्टधान्यमहिमानामअष्टाचत्वारिंशोऽध्यायः
४८॥ श्रीगुरुदत्तात्रयार्पणमस्तु॥ ओवी॥ ६५॥

६

श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागेसिद्धाचियारणा ॥ विनवीतसे करजोडुन ॥ भक्तिभावें करूनिया ॥ १ ॥ त्रैमूर्तिचा अवतार ॥ वेषधारी झाला नर ॥ राहिला श्रीतीगाणगापुर ॥ कवण क्षेत्र म्हणोनिया ॥ २ ॥ भूमीवरी प्रख्यात ॥ तीर्थे असती असंख्यात ॥ समस्त सोडुनियां येथ ॥ काय कारण वास केला ॥ ३ ॥ यास्थानाचें महिमान ॥ सांगा स्वामी विस्तारून ॥ म्हणोनि धरी सिद्धाचे चरण ॥ नामधारक तयेवेळी ॥ ४ ॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ सिद्ध मुनी सांगे सतोषोन ॥ ऐका श्रोते सावधान ॥ नामधारकादि करूनी ॥ ५ ॥ अश्विनवद्य चतुर्दशीसी ॥ दिपवाळी पर्वणीसी ॥ श्रीगुरू म्हणती शिष्यांसी ॥ स्नान करावें त्रिस्थळी

गु० च०

अ०
४९

१ चें॥ ६॥ गया प्रयाग वाराणसीसी॥ चला यात्रे कलत्रेंसी॥ विप्र म्हणती श्रीगुरूसी॥ आईतीं कर
णे म्हणोनियां॥ ७॥ ऐकोनि श्रीगुरू हांसती॥ ग्रामा जवळी तीर्थें असती॥ करणें न लगे तुम्हां अ
इती॥ चला नेईन तुम्हांसी॥ ८॥ ऐसें म्हणोनि भक्तांसी॥ गेले अमरजासंगमासी॥ स्नान के
लें महाहर्षी॥ शिष्यांसहित श्रीगुरूनी॥ ९॥ गुरु म्हणती शिष्यांसी॥ महिमा अपार संगमासी
प्रयागासमान परियेसी॥ षट्कुळामध्यें स्नान करणें॥ १०॥ विशेष नदी भीमातीरा॥ अमरजा
संगमी महिमा थोर॥ गंगा यमुना वाहे निधार॥ तीर्थ बरवें परियेसा॥ ११॥ विशेष आपण उत्तरवा १
हे॥ याचें पुण्य अपार आहे॥ शताधिक पुण्य होय॥ काशीहूनी परियेसा॥ १२॥ आणीक अष्टती

र्थ असती ॥ तयांची महिमा असे ख्याती ॥ सांगेन ऐका एकचित्तीं ॥ श्रीगुरु म्हणती शिष्यांसी ॥ १३ ॥
ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ विनविता तो भक्तजन ॥ अमरजा नदी नाम कोण ॥ कोणापासोनि उत्पत्ती ॥
१४ ॥ श्रीगुरु म्हणती भक्तांसी ॥ बरवें पुशिलें आम्हांसी ॥ जालंधर पुराणासी ॥ असे कथा प्रख्यात ॥
१५ ॥ जालंधर नामें निशाचरु ॥ समस्त जिंतिले त्याणें सुरवर ॥ आपुलें केलें इंद्रपुर ॥ समूस्त देव
पळालें ॥ १६ ॥ देवां दैत्यां झालें युद्ध ॥ सुरवर मारिले बहुविध ॥ इंद्र जावोनि प्रबोध ॥ ईश्वराप्र
ती सांगितला ॥ १७ ॥ इंद्र म्हणे ऐका शिवा ॥ दैत्यें मारिलें असे देवां ॥ शीघ्र प्रतिकार करावा ॥ म्ह
णोनि चरणी लागला ॥ १८ ॥ आम्ही मारितों दैत्यांसी ॥ रक्त पडतें भूमीसी ॥ अखिल राक्षस बहु

गुव०

अ०

२ वशी॥ अधिक उपजती भूमीवरी॥१९॥ स्वर्गमर्त्यकपाताळ॥ सर्वत्र भरिलें दैत्यकुळ॥ मारिले आमुचे ४९
देव सकळ॥ म्हणोनि आलों तुम्हापासीं॥२०॥ ऐसें वचन ऐकोनी॥ तो ईश्वर प्रज्वाळला मनीं॥ निघा
ला नदीं आरूढ होवोनी॥ दैत्यनिर्दाळणा करावया॥२१॥ इंद्र विनवी ईश्वरासी॥ वधावया दैत्यां
सी॥ जीव आणावा देवासी॥ ऐसा प्रतिकार करावा॥२२॥ संतोषोनि गिरिजारमण॥ अमृत मंत्रें
उद्धोरोन॥ घट दीधला तत्क्षण॥ संजीवनी उदक देखा॥२३॥ तें उदक घेऊनि इंद्रावा॥ शिंपोनि
यां समस्त देव॥ उठोनियां अमर सर्व॥ स्वर्गास जातां तयेवेळीं॥२५॥ उरलें अमृत घटीं होतें॥ घे २
ऊनि जातां अमरनाथें॥ पडिलें भूमीं अवचितें॥ प्रवाह झाला क्षितीवरी॥२५॥ तें संजीवनी नाम

नदी ॥ उद्भवली भूमी प्रसिद्धी ॥ अमरनाम याचि विधी ॥ प्रख्यात झाली अवधारा ॥ २६ ॥ याका
रणे या नदीसी ॥ जे स्नान करिती विधीसी ॥ काळमृत्यु हरे त्यासी ॥ अपमृत्यक घडे केवीं ॥ २७ ॥
शतायुषी पुरुष होती ॥ रोगराई न पीडिती ॥ अपस्मारादि रोग जाती ॥ ब्रम्हहत्यादि पातकें ॥ २८ ॥
अमृत नदी नाम तियेसी ॥ संगम झाला भीमरथीसी ॥ तीर्थ झालें प्रयागासारिसी ॥ त्रिवेणीचा
संगम ॥ २९ ॥ कार्तिकादि माघमासासीं ॥ स्नान करिती भक्तीसी ॥ इह सौख्य परलोकासी ॥ मोक्षस्था
न पावती ॥ ३० ॥ सोम सूर्य ग्रहणेसी ॥ संक्रमपा सोमअमावास्येसी ॥ पुण्यतिथी एकादशीसी
स्नान करावें अनंत पुण्य ॥ ३१ ॥ साधितां दिवस जरी ॥ सदां करावें मनोहरी ॥ समस्त दोष जा

ती जरी॥ शतायुषी श्रियायुक्त होय॥३२॥ ऐसा संगम महिमा ऐका॥ पुढें सांगतसें तीर्थविशेषा॥ दि
से अश्वत्थ सन्मुखा॥ मनोहर तीर्थ असे॥३३॥ या तीर्थी स्नान केलिया॥ मनोहर पाविजे काया॥ कल्प
वृक्षस्थानी अनुपम्या॥ स्नान केलिया फळ पाविजे॥३४॥ अश्वत्थ नव्हे कल्पतरु जांणावें तुम्ही
निर्धारें॥ जें जें चिंतील मनी नरु॥ पावती काम्यें अवधारा॥३५॥ ऐसें मनोहर तीर्थ॥ ठावें असे
मख्यात॥ सन्मुख असे अश्वत्थ॥ सदा वसती याचिया गुणें॥३६॥ जे जन येवोनि सेवा करिती॥
तयांचे मनोरथ पुरती॥ न धरावा संदेहु आतां चित्तीं॥ ऐसें म्हणती श्रीगुरुनाथ॥३७॥ आम्ही व
सतों सदां येथें॥ ऐसें जाणा तुम्ही निरुतें॥ दृष्टी पडती सद्गुरुनाथ॥ खूण तुम्हा सांगेन॥३८॥

कल्पवृक्षातेंपूजोनी ॥ मगजावेंशंकरभुवनी ॥ संगमीशंकरअसेत्रिनयनी ॥ जपकरावामनोभावें
३९ जैसापर्वतीमल्लिकार्जुन ॥ तैसासंगमीरुद्रआपण ॥ भक्तिपूर्वकप्रदक्षिणा ॥ करावीतुम्ही
अवधारा ॥ ४० ॥ नंदिकेश्वरातेंनमोनी ॥ जाऊनिनमावेंचंडस्थानी ॥ पुन्हानंदीसव्यकरोनी ॥ म
गजावेंसोमसूत्राशी ॥ ४१ ॥ सवेंचिपरतोनिवृषभासी ॥ नमोनिजावेंचंडासी ॥ पुढेंजावेंसोमसू
त्रासी ॥ येणेविधीप्रदक्षिणा ॥ ४२ ॥ ऐसीप्रदक्षिणेचीमहिमा ॥ तीनवेळाकरोनिनेमा ॥ वृषभस्था
नीघेवोनिया ॥ अवलोकावेंशिवासी ॥ ४३ ॥ वामहस्तींवृषणधरोनी ॥ तर्जनीअंगुष्ठशृंगीठेऊ
नी ॥ पूजापाहावीसमलोचनी ॥ इंद्रासमानहोयनर ॥ ४४ ॥ धनधान्यादिसंपत्ती ॥ लक्ष्मीराहेअ

४

खंडिती ॥ पुत्रपौत्र त्यासी होती ॥ संगमेश्वर पूजिलिया ॥ ४५ ॥ पुढें तीर्थ वाराणसी ॥ अर्धक्रो
श परियेसीं ॥ ग्राम असे नागेशी ॥ तेथूनि उद्भव असे जाणा ॥ ४६ ॥ याचें असे आख्यान ॥ क
थ्यान क्षेत्र यक्ष जाण ॥ होता एक ब्राम्हण ॥ भारद्वाजगोत्राचा ॥ ४७ ॥ विरक्त असे ईश्वरभक्त
सर्वसंगत्याग करिता ॥ आपण रत अनुष्ठानांत ॥ सदा ध्याय शिवासी ॥ ४८ ॥ प्रसन्न झाला
चंद्रमौळी ॥ सदां दिसें वक्षस्थळीं ॥ विप्र आल्हाद सर्वकाळीं ॥ देह विसरोनि हिंडतसे ॥
४९ ॥ लोक म्हणती पिसा त्यासी ॥ निंदा करिती बहुवसी ॥ दोघे बंधु असती तयासी ॥ नामे
त्यांचीं अवधारा ॥ ५० ॥ एका नाम असे ईश्वर ॥ दुसरा नामें असे परमेश्वर ॥ बंधु एकला क

४

रोनि अव्हेर ॥ आपणानि घाले काशीसी ॥ ५१ ॥ कोनि यां सर्व आइतीं ॥ समर्पी संर्वनि घाले
त्वरिती ॥ तया पिशातें पाचारिती ॥ चला जाऊं म्हणोनि यां ॥ ५२ ॥ ब्रम्हज्ञानी द्विजनिका
पिसा म्हणती मूर्खलोका ॥ बधूसी म्हणे द्विज ऐका ॥ न का जाऊं काशीसी ॥ ५३ ॥ विश्वे
श्वर असे मज वळी ॥ दावीन तुम्हां तात्काळीं ॥ आश्चर्य करिती सकळी ॥ दावी म्हणती
बंधूजन ॥ ५४ ॥ काशीस जावें अति प्रयासें ॥ येथें भेटे तरीं जावें कासयास ॥ म्हणोनि
बोलेनाति हर्षे ॥ तये वेळीं अवधारा ॥ ५५ ॥ इतुकिया अवसरीं ॥ विप्र गंगास्नान करी
ध्यानस्थ होतां साक्षात्कारी ॥ ईश्वर होता तयाजवळी ॥ ५६ ॥ विनवीत सो शिवासी ॥ आम्हा

नित्यपाहिजेकाशी॥दर्शनहोयविश्वेश्वरासी॥म्हणोनिचरणीलगला॥५७॥ईश्वरभोळाच
क्रवर्ती॥प्रसन्नझाला॥अतिप्रीती॥दिसेतीचकाशीखरिनी॥मणिकर्णिकाकुंडझालें॥५८॥विश्वे
श्वराचीमूर्तिएका॥निघालीकुंडींविशेष॥नदीऊनरेदिसेनिका॥एकबाणप्रमाणअसे॥५९॥उ
दकनिघालेंकुंडांतुन॥जैसेंभागीरथीजीवन॥जाजाअसतिकाशीतखुणा॥समस्तदिसती
तयांसी॥६०॥संगमझालानदीभीमा॥तीर्थअसेकाशीउत्तमा॥आचारकरितीसप्रेमा॥बंधू
स्नानीम्हणतीमग॥६१॥म्हणेब्राह्मणबंधूंसी॥काशीसनजावेंआमुचेवंशी॥समस्तेंआच
रावीहीचकाशी॥आम्हांशंकरेंसांगितलें॥६२॥आपुलेंनामएसेंजाणा॥गोसावीनामनि

धीरी खुणा ॥ तुम्ही बंधु दोघे जण ॥ आराधा ऐसें निरोपिलें ॥ ६३ ॥ दोघीं जावें पंदरपुरा ॥ तेथे अ
से पुंडलीक वरा ॥ सदा तुम्ही पूजा करा ॥ आराध्य नामें विख्यात ॥ ६४ ॥ प्रतिवर्षी काशीसी ॥ ये
थें यावें निर्धारिंसी ॥ तीर्थ असे विशेषीं ॥ ऐसें म्हणे तो ब्राम्हण ॥ ६५ ॥ श्रीगुरू म्हणती भक्तांसी
काशीतीर्थ प्रकटलें ऐसी ॥ न धरावा संशय तुम्हीयासी ॥ वाराणसी प्रत्यक्ष ही ॥ ६६ ॥ ऐकोनि
समस्त द्विजवर ॥ करिती स्नान आचार ॥ तेथूनि पुढें येती गुरु ॥ सिद्ध सांगे नामधारका ॥ ६७ ॥
श्रीगुरु म्हणती सकळिकांसी ॥ तीर्थ दाविती पापनाशी ॥ स्नानमात्रें पापराशी ॥ जेसा तृणा
अग्नि लागे ॥ ६८ ॥ आपुले भगिनी रत्नाई सी ॥ दोष असे बहु वसी ॥ बोलऊनी त्या समयासी ॥

गु०च०

अ०
६९

६ उसतातीश्रीगुरुमुनी ॥ ६९ ॥ ऐकपूर्वदेहभागिनी ॥ तूं आलीस आमुचे दर्शनी ॥ पापतुझें अ
सेगहनी ॥ आठवण करी मनामध्यें ॥ ७० ॥ ऐकोनि श्रीगुरुचें वचन ॥ पायां पडे वेळोवेळां ॥ अ
ज्ञान आपण मूढ केवळ ॥ इतुकें कैचें ज्ञान मज ॥ ७१ ॥ तूं जगदात्मा विश्वव्यापक ॥ तूंचि ज्ञा
नज्योतीदीपक ॥ सर्वज्ञाणसी तूंचि एक ॥ विस्तारोनि सांग मज ॥ ७२ ॥ श्रीगुरु म्हणती तिये
सी ॥ आपुलें पाप मज पुससी ॥ वधिलें पांच मार्जरांसी ॥ नेणसी खूण घरीं आपुली ॥
७३ ॥ होती मार्जारी गर्भिणी ॥ प्रसूत झाली भांड्या मधुनी ॥ न पाहातां उदक घालुनी ६
झांकोनि ठेविलीं अग्निवरी ॥ ७४ ॥ पांच मांजरांचा घात ॥ झाले आपणीक दोष बहुत ॥

ऐसें ऐकोनियां त्वरित ॥ श्वेतकुष्ठ झालें परी ॥ ७५ ॥ देखोनियां भयभीत झाली ॥ श्रीगुरु
चरणा येवोनि लागली ॥ विनवीतसे करुणा बहाळी ॥ कृपा करीं गा गुरुमूर्ती ॥ ७६ ॥
समस्त पापें करोनि राशी ॥ तीर्थी जातां तीं वाराणसी ॥ मी आल्ये तुझे दर्शनासी ॥ पा
पावेगळी होईन म्हणोनी ॥ ७७ ॥ श्रीगुरु पुसती तियेसी ॥ तुज असे पापराशी ॥ पुढी
ले जन्मीं भोगिसी ॥ तरी कुष्ठ जाईल आता ॥ ७८ ॥ रत्नाबाई विनवी स्वामियासी ॥
उबगले बहुत जन्मासी ॥ याचि कारणे तुझे दर्शनिसी ॥ अलित होऊ म्हणतसें ॥ ७९ ॥
आतां पुरे जन्म आपणा ॥ म्हणोनि धरिले तुझे चरण ॥ याचि जन्मीं करीन भोगणे ॥

७

पापांचें आपण म्हणतसे ॥८०॥ इतुकें ऐकोनि गुरुमूर्ती ॥ रत्नाबाई सनिरोप देती ॥ पापवि
नाशतीर्थी जाय त्वरिती ॥ स्नानमात्रें जाईल कुष्ठ ॥८१॥ नित्य करीं होय येथें स्नान ॥ सप्तजनी
चे दोष भग्न ॥ संदेह न करितां हो अनुमान ॥ म्हणोनि सांगती श्रीगुरु ॥८२॥ सिद्ध म्हणे नामधा
रकासी ॥ आम्ही देखिलें दृष्टीसी ॥ स्नान करितां त्रिरात्रीसी ॥ कुष्ठ तिचें परिहरलें ॥८३॥ ऐ
सें प्रख्यात तीर्थ देखा ॥ नाम पापविनाशी ऐका ॥ जे करिती स्नान भक्ती ऐका ॥ सप्तजन्मींची
पापें जाती ॥८४॥ तीर्थमहिमा देखोन ॥ रत्नाबाई संतोषोन ॥ राहिली मठ बांधोन ॥ तीर्थसन्नि
ध अवधारा ॥८५॥ पुढें कोटितीर्थ देखा ॥ श्रीगुरु दाविती सकळिकां ॥ स्नानमात्रें होय निका ॥

७

याचें आख्यान बहुवसें ॥ ६ ॥ जंबुद्वीपीं जितकीं तीर्थें ॥ एकैका महिमा अपरिमितें ॥ इतुकियां
वास कोटि तीर्थें ॥ विस्तार असे सांगतां ॥ ७ ॥ सोमसूर्यग्रहणासी अथवा संक्रांतिपर्वणीसी
अमावास्या पोर्णिमा प्रतिपदेसी ॥ स्नान तेथें करावें ॥ ८ ॥ प्रतिसंवत्सरीं देखा ॥ सालंकृत करूनि
धेनु निका ॥ दान द्यावेंजी द्विजांनिका ॥ एकैक दान कोटी सरिसें ॥ ९ ॥ दान फळ ऐसें असे
॥ तीर्थमहिमा आहे कैसी ॥ स्नान केलिया अनंत फळ पावसी ॥ दान तीर्थी करावें ॥ १० ॥ पुढें
तीर्थ रुद्रपद ॥ कथा असे अतिविनोद ॥ गयातीर्थ सप्तपद ॥ येथें असे अवधारा ॥ ११ ॥ जे जे आचार
गयेसी ॥ करावे ते येथें परियेसीं ॥ पुजा करा रुद्रपदासी ॥ कोटि जन्मीचीं पापें जाती ॥

०च०

अ०
४९

॥१२॥ पुढें असे चक्रतीर्थ ॥ अति विशेष पवित्र ॥ केशवदेव सन्निध तत्र ॥ पुण्यराशी स्थान असे ॥ १३
तया तीर्थी स्नान करितां ॥ पतित होती ज्ञानवंत ॥ अस्थि होती चक्रांकित ॥ द्वारावतीसमान
॥१४॥ या तीर्थी स्नान करूनि ॥ पूजा करावी केशवचरणी ॥ द्वारावतीचतुर्गुणी ॥ पुण्य असे अव
धारा ॥१५॥ ऐकोनि श्रीगुरूचे वचन ॥ समस्त करिती स्नानदान ॥ पुढें सांगितलें मन्मथ
गहन ॥ तीर्थ सांगती श्रीगुरू ॥१६॥ ग्रामपूर्वभागेंसी ॥ कल्लेश्वरदेव परियेसी ॥ जैसी गो
कर्ण महाबळासी ॥ मान क्षेत्र परियेसा ॥१७॥ मन्मथतीर्थी स्नान करावें ॥ कल्लेश्वरातें
पुजावें ॥ प्रजावृद्धी सहबरवे ॥ अष्टैश्वर्यें पाविजे ॥१८॥ अखंड श्रावणमासी ॥ अभिषेक

करावादेवासी॥ दीपाअराधनाकार्तिकेंसी॥ अनंतपुण्यअवधारा॥ ९९॥ ऐसीअष्टती
र्थमहिमा॥ सांगतीश्रीगुरुपुरुषोत्तमा॥ संतोषझालाभक्तप्रेमा॥ अतिउल्हासकरिता
ती॥ १००॥ म्हणतीसमस्तभक्तजन॥ नेणोंतीर्थांचीमहिमा॥ स्वामिनींनिरोपिलेंकृ
पेनें॥ पुनीतकेलेआम्हासी॥ १॥ जवळीअसतांसमस्ततीर्थें॥ कांजावेंदुरयात्रेतें॥
स्थानअसेहेंपवित्रयेथें॥ म्हणोनिसमस्तआचरती॥ २॥ अष्टतीर्थेंसांगत॥ श्रीगु
रुगेलेमठांत॥ समाराधनाकरितीभक्त॥ महानंदप्रवर्तला॥ ३॥ सिद्धम्हणेनाम
धारकासी॥ तीर्थमहिमाआहेऐसी॥ श्रीगुरुसांगतीआम्हासी॥ म्हणोनितुजनि

रोपिलें ॥ ४ ॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ क्षेत्र थोर गाणगापुर ॥ तीर्थें असती अपरंपार आचरा तुम्ही भक्तीनें ॥ ५ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्धमुनी शिष्यसंवाद बहुत गाणगापुर माहात्म्य विख्यात ॥ एकुणपन्नासाव्यांत निरोपिलें ॥ १०६ ॥ ❀ ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्योपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अमरजासंगम गाणगापुर क्षेत्रमहिमानाम एकोनपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ४९ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ ❀ ॥ ❀ ॥ ॥ ओव्यासंख्या ॥ १०६ ॥ ❀ ॥ ❀ ॥ ❀ ॥ ❀ ❀ ❀ ❀ ॥

श्रीगणेशायनमः ॥ सिद्धह्मणेनामधारका ॥ पुढेंअपूर्वझालेंऐका ॥ पूर्वींसिवाकरीरजका ॥ तू
तेंआपणनिरोपिलें ॥१॥ तयानेमागितलावर ॥ राज्यपदधुरंधर ॥ प्रसन्नझालेतयासीगुरु ॥ दि
धलावरपरियेसा ॥२॥ उपजलाआपणम्लेंछजाती ॥ वेदुरीनगरींराज्यकरिती ॥ पुत्रपौत्री
अनेकरीती ॥ माहानंदेंपरियेसा ॥३॥ ऐसाराजातोयवन ॥ होताआपणसंतोषोन ॥ अश्वग
जअपारधन ॥ पायभारांमितीनाहीं ॥४॥ आपणतरींयातिहीन ॥ पुण्येवसेअंतःकरण ॥
दानधर्मकरीजाण ॥ समस्तयातींएकभावें ॥५॥ विशेषभक्तीविप्रांवरी ॥ तीअसेपूर्वसंस्का
री ॥ असतीदेवालयेंभूमीवरी ॥ उपद्रवनेदीतयांसी ॥६॥ तयाचेघरचेपुरोहित ॥ तयाराया

१ तेंत्रीकवित ॥ आपणाहोऊनि म्लेंछजात ॥ देवद्विजनिंदावे ॥ ७ ॥ तयाचीतुम्हीसेवाकरित
त्याणेहोयअपारपातक ॥ जातीधर्मकरणेमुख्य ॥ अनंतपुण्यअसेजाणा ॥ ८ ॥ मंदमती
द्विजजाती ॥ देखापाषाणपूजाकरिती ॥ समस्तांतेंदेवम्हणती ॥ काष्ठवृक्षपाषाणांसी ॥
९ ॥ धेनूसीम्हणतीदेवताहोय ॥ पृथ्वीसोमअग्निसूर्य ॥ तीर्थयात्रानदीतोय ॥ समस्तदे
वम्हणताती ॥ १० ॥ ऐसेविप्रमंदमती ॥ निराकारासाकारम्हणती ॥ तयातेंम्लेंछेभजे
ती ॥ तेपावतीअधःपात ॥ ११ ॥ राजाप्रतीऐसेंपुरोहित ॥ तयापुढेंसांगतीहित ॥ ऐकोनि १
राजाउत्तरदेत ॥ कोपेंकरोनिपरियेसा ॥ १२ ॥ राजाम्हणेपुरोहितांसी ॥ निरोपिलेंतुम्ही

आम्हासी॥ अणुरेणुरूपकाष्ठेंसी॥ सर्वेश्वर पूर्ण असे॥१३॥ समस्त सृष्टी ईश्वराची॥ स्थावर जंग
म रचिलें साची॥ सर्वत्र देव असे एकची॥ नर्क भेद असंख्या॥१४॥ समस्त जातीची उत्पत्ति॥
जाणावी तुम्ही पंचभूतीं॥ पृथ्वी आप तेज वायू निगुती॥ आकाशापासाव परियेसा॥१५॥ सम म
स्तांसी पृथ्वी एक॥ आणि ती मृत्तिका कुलालोका॥ नाना परीचीं करिती एक॥ भांडीं भेद परोप
री॥१६॥ नाना परीच्या धेनु असती॥ क्षीर असे एकचि रीती॥ सुवर्ण जाणा तेचि रीती॥ परोप
रीचे अळंकार॥१७॥ तैसे देह भिन्न जाणा॥ परमात्मा एकचि पूर्ण॥ जैसा चंद्र एकचि गग
ना॥ नाना घटीं दिसतसे॥१८॥ दीप असे एका घरीं॥ वाती लाविता सहस्र चारी॥ समस्तेह

तीदीपापरी ॥ भिन्नभावकोठेंअसो ॥ १९ ॥ एकचिसूत्रआणोनी ॥ नानापरीच्चेओविती मणी ॥ सू
त्रएकचिजाणोनी ॥ नपाविजेभावभिन्ना ॥ २० ॥ तैशाजातीनानापरी ॥ असतातीननूंपरी ॥ सम
स्तांसीएकचिहारी ॥ भिन्नभावकरूंनये ॥ २१ ॥ आणीकतुम्हीम्हणालऐसें ॥ पूजितीपाषाणदेव
केसे ॥ सर्वांठाईंपूर्णभासे ॥ जोविश्वात्माआहेची ॥ २२ ॥ प्रतिमापुजास्वल्पबुद्धी ॥ म्हणोनिसां
गतीप्रसिद्धी ॥ आत्मारामपूजितोविधी ॥ त्यांच्चेमतींऐसेंअसे ॥ २३ ॥ स्थीरनव्हेअंतःकरण ॥ म्ह
णोनिकरितीप्रतिमाखुण ॥ नामदेऊनीनारायण ॥ तयानामेंपुजिताती ॥ २४ ॥ तयांतेंतुम्हीनि
दाकरीतां ॥ तरीसर्वांठाईपरिपूर्णकांम्हणतां ॥ प्रतिष्ठाव्याआपुलेमता ॥ द्वेषआम्हीनकरावा ॥ २५ ॥

याकारणेज्ञानवंतीं॥करूनयेनिंदासक्ती॥असतीनानापरीजाती॥आपलेराहाटींराहाटती॥
२६॥ऐशापरीपुरोहितासी॥सांगेराजाविस्तारेंसी॥करीपुण्यबहुवसी॥विश्वासदेवद्विजांवरी॥
२७॥राजादेखायेणेपरी॥होनातयाकेहुरीनगरीं॥पुढेंत्याचेमाडीवुरी॥स्फोटएकउद्भवला॥
२८॥नानापरीचेवैद्ययेती॥तयांस्फोटकाशीलेपकरिती॥शमन्हेकवणेरीती॥महादुःखक
रितसे॥२९॥ऐसेंवर्ततांवर्तमानी॥श्रीगुरूअसतांगाॅभुवनी॥विचारकरितीआपुलेमनी णग
राजायेईलम्हणोनियां॥३०॥येथेंयेतीम्लेंछलोक॥होईलद्विजांउपबाधक॥प्रगटजा
लोंआतांएक॥आम्हीएथेंअसूनये॥३१॥प्रगटझालियामहिमाख्याती॥पाहावयायेती

३

म्लेछजाती ॥ आतां राहावें आम्ही गुप्तगती ॥ लौकिकार्थ परियेसा ॥ ३२ ॥ आला ईश्वर संवत्सरु
सिंव्हासि आला असे गुरु ॥ गौतमी तीर्थ असे थोरु ॥ यात्राप्रसंगें जावें आतां ॥ ३३ ॥ म्हणती समस्त
शिष्यांसी ॥ उठा वा करा आइती वेगेंसी ॥ येतो राजा बोलावावयासी ॥ जावें त्वरित गंगेसी ॥
ऐसें ऐकोनि शिष्यजन ॥ विचार करिती आपणांत आपण ॥ जरी येईल राजा यवन ॥ केवीं
होईल म्हणताती ॥ ३५ ॥ ऐसा मनीं विचार करिती ॥ काय होईल पाहा म्हणती ॥ असे नर
सिंहसरस्वती ॥ तोचि रक्षील आपणातें ॥ ३६ ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ असतां गाणगापुरीं
ख्याती ॥ राजा यवना झाली मती ॥ पूर्वसंस्कारीं परियेसा ॥ ३७ ॥ स्फोटकाचे दुःखें राजा ॥

३

अपार कष्टला सहजा ॥ नाना परी औषधें वोजा ॥ करितां न व्हे तया बरवें ॥ ३८ ॥ मग मनीं वि
चार करी ॥ स्फोटकें व्यापिलें अपरंपारी ॥ वैद्याचेनि नोहे हुरी ॥ काय करावें म्हणत असे ॥
३९ ॥ बोलाऊनि विप्रांसी ॥ पुसे काय उपाय यासी ॥ विप्र म्हणती रायासी ॥ सांगेन एकाए
कचित्तें ॥ ४० ॥ पूर्वजन्मीं पापें करिती ॥ व्याधिरूपें होऊनी पीडिती ॥ दान धर्में तीर्थीं दैवतीं ॥
व्याधि जाय परियेसा ॥ ४१ ॥ अथवा भल्या सत्पुरुषासी ॥ शरण जाऊनि भजावें भावेंसी ॥
तयाचे दृष्टी सुधारसीं ॥ बरवें होईल परियेसा ॥ ४२ ॥ सत्पुरुषाचे कृपादृष्टी ॥ पापें जाती
जन्मसांटी ॥ मग रोग केंवा पोटीं ॥ स्फोटकादि त्वरित जाय ॥ ४३ ॥ ऐकोनियां विप्रवचन ॥ रा

४ जाकरितसेनमन ॥ मातेंतुम्हीनम्हणायवन ॥ दासआपणविप्रांचा ॥ ४४ ॥ पूर्वजन्मीआपण
केलीसेवागुरुचरण ॥ पापास्तवझालोंजाण ॥ यवनाचेकुळींदेखा ॥ ४५ ॥ ऐसाहापूर्ववृत्तांत
मातेंनिरोपावात्वरित ॥ महानुभावदर्शनहोतां ॥ कवणाचारोगगेलाअसे ॥ ४६ ॥ रायाचेंस्व
नऐकोनी ॥ विचारकरितीविप्रमनी ॥ सांगूंनयेयास्थानी ॥ एकांतस्थळपाहिजे ॥ ४७ ॥ तुम्ही
रावम्लेंछजाती ॥ समस्ततुम्हानिंदाकरिती ॥ आम्हीअसोंद्विजजाती ॥ केवींकरावेंम्हणती ४
ती ॥ ४८ ॥ विप्रवचनऐकोन ॥ विनवीतअसेतोयवन ॥ चाडनाहींजातीविण ॥ आपणासतुम्ही
उद्धरावें ॥ ४९ ॥ ऐसेंरायाचेंअंतःकरण ॥ अनुतप्तझालेंअसेजाण ॥ मगनिरोपितीब्राम्ह

ण ॥ त यारायातें परियेसा ॥ ५० ॥ विप्र म्हणती रायासी ॥ स्थान बरवें पापविनाशी ॥ जावें तुम्ही
सहजेंसी ॥ विनोदार्थ परियेसा ॥ ५१ ॥ तेथें असे स्थळ बरवें ॥ एकांत स्थान पाहावें ॥ स्नान करो
नि मनोभावें ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५२ ॥ ऐकोनियां विप्रवचन ॥ संतोषला राजा आपण ॥ नि
घाला त्वरित तेथून ॥ आला पापविनाशतीर्थासी ॥ ५३ ॥ समस्तातें राहाउनी ॥ एकला गे
ला तया स्थानी ॥ स्नान करितां तये क्षणी ॥ आला एक यती तेथें ॥ ५४ ॥ राजा देखोनि यती
सी ॥ नमन करी भावेंसी ॥ दावीतसे स्फोटकासी ॥ म्हणे उपशम केवीं य ॥ ५५ ॥ ऐकोनि तयाचें
वचन ॥ यती सांगती विस्तारोन ॥ महानुभावाच्या दर्शनि ॥ तूं तें बरवें होय जाण ॥ ५६ ॥ पूर्वीं

याचें आख्यान। सांगेन एक विस्तारोन॥ एक चित्तें करोनि मन॥ ऐक म्हणती तये वेळीं॥ ५७॥
अवंती म्हणिजे थोर नगरी॥ तेथें होता एक दुराचारी॥ जन्मोनियां विप्रउदरीं॥ अन्योन्य
राहाटी राहाट तसे॥ ५८॥ आपण असे मदोन्मत्त॥ समः स्त्रियांपासीं रमत॥ स्नान संध्या
केली त्यक्त॥ अन्य मार्गें राहाटत असे॥ ५९॥ ऐसें दुराचारीपणें॥ राहाटत असे तो ब्राम्हण॥
पिंगला म्हणोनि वेश्या जाण॥ तियेसवें वर्तत असे॥ ६०॥ न करी कर्म संध्या स्नान॥ रात्रंदिव
स करी वेश्यागमन॥ तिचे घरीं भक्षी अन्न॥ तिचे संगें क्रीडत असे॥ ६१॥ ऐसे असतां वर्तमानी
ब्राम्हण होता वेश्यासदनी॥ तेथें आला एक मुनी॥ ऋषभ नामा माहायोगी॥ ६२॥ तया दे

खोनि दोघें जणें ॥ करिती साष्टांग नमनें ॥ भक्तिभावें करोन ॥ घेऊनि आली मंदिरांत ॥ ६३ ॥ बै
सवोनियां पीठावरी ॥ पूजा करिती षोडशोपचारी ॥ अर्घ्यपाद्य देऊनियां पुढारी ॥ गंधाक्षता
लाविती ॥ ६४ ॥ नाना परिमळ पुष्पजाती ॥ तया योगियासी पूजिती ॥ परिमळ द्रव्यें अने
करीती ॥ वाहिलीं तया योगीश्वरा ॥ ६५ ॥ चरणतीर्थ घेऊन ॥ पान करिती दोघें जणे ॥ त्यांतें
करविती भोजन ॥ नाना परी पक्कान्नेसी ॥ ६६ ॥ करऊनियां भोजन ॥ केलें हस्तप्रक्षालन
बरवें पाणी आणून ॥ देती तया योगियासी ॥ ६७ ॥ तया मंचकी निजवून ॥ तांबूल देती
आणून ॥ करिती पादसंबाहन ॥ भक्तिभावें दोघेही ॥ ६८ ॥ निद्रिस्थ झाला योगेश्वर ॥ दो

६

घेंकरितीनमस्कार॥ उभेराहोनिचारीप्रहर॥ सेवाकेलीभावेंसी॥ ६९॥ उदयजाहालादिन
करासी॥ संतोषलातोतापसी॥ निरोपघेऊनिसंतोषी॥ गेलाआपुल्यास्वस्थाना॥ ७०॥ ऐ
सेंविप्रवेंतूयाघरीं॥ क्रमितांकिंचित्दिवसांवरी॥ तारुण्यजाऊनिशरीरीं॥ वार्द्धक्यपात
लेतयासी॥ ७१॥ पुढेंतयाविप्रासी॥ आणिपिंगलावेश्येसी॥ मरणयेतांपरियेसीं॥ दोघे
पंचत्वपावलीं॥ ७२॥ पूर्वकर्मानुबंधेंसी॥ जन्मझालाराजवंशीं॥ दशार्णवाधिपति
चेवंशीं॥ वज्रबाहुवनिताउदरांत॥ ७३॥ तयावज्रबाहूचीपत्नी॥ नाममतिचेंअसेसु
मती॥ जन्मआलातिचेपोटीं॥ तोचिविप्रपरियेसा॥ ७४॥ तयावज्रबाहूसी॥ ज्येष्ठराणी

६

चा गर्भेसी ॥ उद्भव झाला विप्रपतियेसीं ॥ राजा समारंभ करीतसे ॥ ७५ ॥ देखोनि तिचे सवती ॥
सी ॥ क्रोध आला बहु मानसीं ॥ गर्भ झाला से पत्नीसी ॥ म्हणोनि द्वेष मनी धरी ॥ ७६ ॥ सर्प
गरळ आणोनी ॥ दिल्हें सवतीस नाना युक्ती ॥ गरळें भेदिलें अति गहनी ॥ तया राया ज्येष्ठ
स्त्रियेसी ॥ ७७ ॥ दैवयोगें न ये मरण ॥ सर्व शरीर झालें जीर्ण ॥ वीष असे अति गहन ॥ महा
कष्ट भोगीतसे ॥ ७८ ॥ ऐसापरी राजयुवती ॥ कष्टें झाली प्रसूती ॥ उपजतां बाळका मात्ते
प्रती ॥ सर्वांगीं वर्ण फुटले ॥ ७९ ॥ महाक्लेशें शी रडत ॥ सर्वांगी स्फोट वाहात ॥ रात्रंदिवस आक्रं
दत ॥ कष्ट होती परियेसा ॥ ८० ॥ विषें व्यापिलीं सर्वांगीं ॥ म्हणोनि आक्रंदती निशिदिनी ॥

७ दुःखकरी राजा बहुमनी ॥ म्हणे काय करूं आतां ॥४१॥ देशोदेशींचा वैद्यांसी ॥ बोलाविती
चिकित्सेसी ॥ वेंचिती द्रव्य अपारेंसी ॥ कांहीं केलिया नोहे बरवें ॥४२॥ तिये माता बाळकासी
वर्ण झाले बहुवशी ॥ निद्रा नाहीं दिवारात्रीसी ॥ सर्वांगी कृमी पडिले असती ॥४३॥ त्यां
ते देखोनि रायासी ॥ दुःख झालें बहुवसी ॥ निद्रा नाहीं दिवानिशी ॥ त्यांचे कष्ट देखोनि
यां ॥४४॥ पथें करोनि मातासुत ॥ अन्न उदक न वेचे किंचित ॥ शरीर सर्व कृश होत ॥ क्षी ७
ण झालें येणें परी ॥४५॥ राजा येऊनी एके दिवसीं ॥ पाहे आपुले स्त्रीसुतासी ॥ देखोनि
यां माहा क्लेशी ॥ दुःख करी तसे पतियेसा ॥४६॥ म्हणे आतां काय करूं ॥ केवीं करणे प्रति

कारू ॥ नाना औषधें विचारू ॥ करितां स्वस्थ न केची ॥ ८७ ॥ स्त्रीपुत्राची ऐसी गती ॥ जिवंत शव झा
ळीं असती ॥ यांच्या रोगासी न होय शांती ॥ केवीं पाहूं म्हणातसे ॥ ८८ ॥ आतां यांतें पाहावयासी ॥
कंटाळा येतो आम्हासी ॥ बरवें न व्हे सत्य यांसी ॥ काय कारण म्हणतसे ॥ ८९ ॥ यांतें देखतां आम्हा
सी ॥ वर्ण लागतील देहासी ॥ हे असती महादोषी ॥ यांतें त्यजूं म्हणतसे ॥ ९० ॥ जे असती पापीजन
त्यांतें जीवन अथवा मरण ॥ भोगल्यावांचूनि सूटन व्हे जाण ॥ आपुले आपण भोगिजे ॥ ९१ ॥ विचा
र करोनि मानसीं ॥ बोलाविलें कोळियासी ॥ सांगतसे विस्तारेंसी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ९२ ॥ रा
जा म्हणे सूतासी ॥ माझ्या बोलें परियेसी ॥ नेऊनि आपुले स्त्रियेसी ॥ अरण्यांत ठेवावें ॥ ९३ ॥

नसे माणसांचा संचार ॥ जेथें नसे लविचार ॥ तेथें ठेवी वेगवक्र ॥ म्हणे राणी स्रुतासी ॥ ९४ ॥ येणेप
रीसूतासी ॥ राजा सांगे विस्तारेंसी ॥ रथ दिधला संजोगेंसी ॥ घेऊनि गेला झडकरी ॥ ९५ ॥ तिचे दा
स दासी सकळा ॥ दुःख करिती महा प्रबळा ॥ मातापिता बंधू सकळ ॥ समस्त प्रलाप करिताती ॥ ९६ ॥
दुःख करिती नरनारी ॥ हाहा पापी दुराचारी ॥ स्त्री स्रुतासी केसे परी ॥ केवीं यातें मारवितों ॥ ९७ ॥
रथावरी बैसोनी ॥ घेऊनि गेला महारानी ॥ जेथें नसती मनुष्य कोणी ॥ तेथें ठेविली परियेसा ॥ ९८ ॥
सूत आला परतोनी ॥ सांगे राया विस्तारोनि ॥ महा अरण्य दुर्गम वनी ॥ तेथें ठेविलीं म्हणतसे ॥ ९९ ॥
ऐकोनि राजा संतोषला ॥ दुसरे स्त्रियेसी विचार सांगितला ॥ दोघांसी आनंद झाला ॥ वनी राहिली

मातास्कृत ॥ १०० ॥ मातापुत्र दोघां जणा ॥ पीडा करितसे महावर्ण ॥ कष्टती अन्न उदकाविण ॥
माहा अघोर वनांत ॥ १ ॥ उभयतां रोगी दोघे जणें ॥ जातील वनी मरोन ॥ कष्टीं कष्टतां शीघ्र प्राण
तयांचा निघेल वाटतें ॥ २ ॥ राजपत्नी स्कुमार ॥ तयावरी रोग थोर ॥ चालूं न शके वन घोर ॥ महा
कंटक भूमीवरी ॥ ३ ॥ कडिये घेऊनि बाळकासी ॥ जायती मंदगमनेसी ॥ आठवी आपुले कर्मा
सी ॥ म्हणे आता काय करूं ॥ ४ ॥ तया वनी मृगजाती ॥ व्याघ्र सिंहादिक असती ॥ सर्प थोरे अपर
मिती ॥ हिंडताती वनांत ॥ ५ ॥ मातें जरीं या प्रमारी ॥ पापापासून होइन दुरी ॥ पुरे आतां जन्म सं
सारीं ॥ वांचोनि कायस्वर्थ जिणें ॥ ६ ॥ म्हणोनि जाय पुढें रडत ॥ क्षणोक्षणी असे पडत ॥ पुत्रासहि

तचिंताकरित ॥ जात असे वनांत ॥ ७ ॥ उदकाविणे तृषाक्रांत ॥ देहवर्णअसे पीडित ॥ व्याघ्रसर्पा
दि देखत ॥ भयें चकित होतसे ॥ ८ ॥ देखे वेताळ ब्रम्हराक्षस ॥ वन गज भालुका बहुवस ॥ केंश मो
कळे पायांस ॥ कांटे धोंडे लागताती ॥ ९ ॥ ऐसें महाअरण्यांत ॥ राजस्त्री असे हिंडत ॥ पुढें जातां
देखिलें वनांत ॥ गुरे चरती बाणियाचीं ॥ १० ॥ तयांपासीं जावोनी ॥ पुसतसे करुणावचनीं ॥ गोर
क्षकातें विनवोनी ॥ मागे उदककुमर काशी ॥ ११ ॥ गोरक्ष म्हणती तियेसी ॥ जावें तुवां मंदिरासी
तेथें उदक बहुवसी ॥ अन्न तूतें मिळेल ॥ १२ ॥ म्हणोनि मार्ग दाखविती ॥ हळुहळु जाय म्हण
ती ॥ राजपत्नी मार्ग क्रमिती ॥ गेली नयाग्रामांत ॥ १३ ॥ तया ग्रामीं नर नारी ॥ दिसताती अपरंपरी ॥

देखोनि आली मनोहरी ॥ पुसेत यां स्त्रियासी ॥ १४ ॥ म्हणे कवण ये थें राजा ॥ संतोषी दिसे सम
स्त प्रजा ॥ ऐकोनि सांगती वैश्य राजा ॥ महाधनी कृपुण्यात्मा ॥ १५ ॥ यास्चें नाव पद्माकर ॥ पु
ण्यवंत पवित्र नर ॥ तूं तें रक्षील साचार ॥ म्हणोनि सांगती तियेसी ॥ १६ ॥ इतुकिया अवसरीं ॥
तया वैश्याचे घरीं ॥ दाशियां होत्या मनोहरी ॥ त्याहि आल्या तियेजवळी ॥ १७ ॥ येऊनि पुसती वृ
त्तांत ॥ घेऊनि गेल्या मंदिरांत ॥ आपुल्या स्वामीसी सांगत ॥ आद्यंतेसी विस्तारें ॥ १८ ॥ तीस देखो
नियां वैश्यनाथ ॥ कृपा करी अत्यंत ॥ नेऊनियां मंदिरांत ॥ दिल्हें एक गृह तीसी ॥ १९ ॥ पुसोनि
यां वृत्तांत ॥ वाणी होय कृपावंत ॥ दिल्हें अन्नवस्त्र बहुत ॥ नित्य तीसी रक्षितसे ॥ २० ॥ ऐसी त

गु॰च॰

१०

अ॰
५०

यावैश्याघरीं ॥ होती रायाचीअंतुरी ॥ वर्धतअसे पीडाभारी ॥ व्रणनवचे परियेसा ॥ २१ ॥ ये
णेपरी राजपत्नी ॥ होती तयावैश्याचे घरीं ॥ वाढलेंवर्ण तयासी बहुती ॥ प्राणांतिक होतसे ॥ २२ ॥
वर्ततां ऐसें एकेदिवसीं ॥ प्राणगेला कुमरकासी ॥ प्रलाप करी बहुवसीं ॥ राजपत्नी परि
येसा ॥ २३ ॥ मूर्छायेवोनि तयेक्षणी ॥ राजपत्नी पडे धरणी ॥ आपुलें कर्म आढवोनि ॥ महा
शोक करी तसे ॥ २४ ॥ त्यावाणियाच्या स्त्रिया देखा ॥ संबोधिताती बाळिका ॥ कोण्या परीती
चे दुःखा ॥ शमनोहे परियेसा ॥ २५ ॥ नाना परीचें दुःख करी ॥ आढवीत तसे पूर्वापारी ॥ म्हणे ताता
माझामोरी ॥ कोठें गेलासी बाळका ॥ २६ ॥ राजकुमरा पूर्णचंद्रा ॥ माझ्या आनंदसमुद्रा ॥ मातें

१०

धरिसी मौनमुद्रा ॥ तूतें काय वरवें असे ॥ २७ ॥ मातापिता बंधुजन ॥ सोडुनि आलें सकळजन ॥
तुझा भरंवसा होता जाण ॥ मातें रक्षिसी म्हणोनियां ॥ २८ ॥ मातें अनाथ केरूनी ॥ तूं जातोसि सो
डूनी ॥ मज रक्षिता नसे कोणी ॥ प्राण त्यजीन म्हणतसे ॥ २९ ॥ येणे परी राजपत्नी ॥ दीर्घस्वरें रू
वती दन करी ॥ देखोनियाँ नरनारी ॥ दुःख करिती परियेसा ॥ ३० ॥ समस्त ही दुःखाहुनी ॥ पुत्रशोके
केवळ वन्ही ॥ मातापितरातें दाहोनी ॥ भस्म करी परियेसा ॥ ३१ ॥ येणे परी दुःख करितां ॥ ऋ
षभ योगी आला त्वरिता ॥ पूर्वजन्मीच्या उपकारार्था ॥ पातला तेथें महाज्ञानी ॥ ३२ ॥ योगि
यातें देखोनी ॥ वंदिता झाला तो वाणी ॥ अर्घ्यपाद्य देवोनी ॥ उत्तमासनी बैसविला ॥ ३३ ॥ योगी

ऐसेत्याअवसरी॥ रुदनकरीकोणनारी॥ शोककरीतसेअपरंपारीं॥ कायअसेम्हणतसे॥
३४॥ विस्तारेंवाणीयोगियातें॥ सांगताझालावृत्तांतातें॥ योगेश्वरेंरूपावंते॥ येऊनियातिये
जवळी॥ ३५॥ म्हणेयोगीतियेसी॥ मूढपणेंकांदुःखकरिसी॥ कवणजन्मलाभूमीसी॥ क
वणमेलासांगमज॥ ३६॥ देहम्हणिजेविनाशीजाणा॥ जैसागंगेतदिसेफेण॥ अव्यक्तासअ
व्यक्तअसेचीहोणे॥ जळेंबुद्बुदापरीपतियेसीं॥ ३७॥ पृथ्वीतेजवायुआप॥ आकाशमि
ळोनशरीरआप॥ पंचगोठलींशरीररूप॥ दिसतअसेपतियेसा॥ ३८॥ पंचभूतेंपांचाठा
ई॥ निघोनिजातांशून्यपाहीं॥ दुःखकरितांअवकाशनाहीं॥ वृथाकांतूंदुःखकरिशी॥ ३९

गुणापासावउसनी ॥ निजकर्मेंहोयनिरुती ॥ काळनाचवीदृष्टिविकृती ॥ वासनातयापरीजाणा ॥ ४०
मायेपासोनिमायाउपजे ॥ होयगुणेसत्वरजे ॥ तमोगुणेथेंसहजें ॥ देहलक्षणयेणेपरी ॥ ४१ ॥ या
तीनगुणांपासाव ॥ उपजतातीमनुष्यभाव ॥ सत्वगुणेअसतीदेव ॥ रजोगुणमनुष्यांचा ॥ ४२ ॥ ता
मसतोचिराक्षस ॥ जैसागुणअसेत्यास ॥ तैसाजनोपिंडाभास ॥ कधींस्थीरनव्हेचि ॥ ४३ ॥ यासंसारव
र्तमानी ॥ उपजतीनरकर्मानुगुणी ॥ जैसेंआर्जनअसेपूर्वपुंण्यी ॥ सुखदुःखेंतैसीघडतीदेखा ॥ ४४
कल्पकोटीवर्षावरी ॥ जीवंतअसतीसुरजरी ॥ तेहीनराहातीस्थीरी ॥ मनुष्यांचाकायपाड ॥ ४५ ॥
याकारणेज्ञानीजनें ॥ उपजतांचसंतोषनकरणें ॥ जरीमेलियादुःखकरणे ॥ स्थीरनव्हेदेहजाणा ॥ ४६

गर्भसंभवे त्याचि काळीं ॥ विनाशी म्हणोनि जाणती सकळी ॥ कोणी मरती यौवनकाळीं ॥ केचि
द्वार्धक्यपणें जाणा ॥ ४८ ॥ जैसें कर्म पूर्वार्जित ॥ तेणें परी असे घडत ॥ माया मोहें पितासुत ॥
म्हणती देखा नरदेही ॥ जैसें लिहिले ललाटेंसी ॥ ब्रम्हदेवानें जाण परियेसी ॥ काळकर्म उ
लंघावयासी ॥ शक्ती नहोय कवणा जाणा ॥ ४९ ॥ ऐसें अनित्य देहासी ॥ कावो मातू दुःख करि
शी ॥ तुझीं पूर्वकर्में कैसी ॥ सांग आम्हा म्हणतसे ॥ ५० ॥ तूं जन्मांतरीं कोठें जाण ॥ कवणा होतीस
अंगना ॥ तुझ्या पोटीं झालें जनन ॥ कवण कवणांचें सांग मज ॥ ५१ ॥ ऐसें जाणोनि मानसीं ॥
वायां का हो दुःख करिसी ॥ जरीं बरवें तूं इच्छिसी ॥ शरण जाई शंकरा ॥ ५२ ॥ ऐसें ऐकोनि रा

जसुवती ॥ करी ऋषभयोगियाविनंती ॥ आपणासी झाली ऐसी गती ॥ राजभ्रष्ट होऊनि आल्यें ॥
५३ ॥ मातापिता बंधुजन ॥ सोडूनि प्रवेशल्ये वन गहन ॥ पुत्र होता माझा प्राण ॥ भरंवसा मज न याचा
५४ ॥ तयाची झाली ऐसी गती ॥ आपणा वांचूनि काय भीती ॥ मरण यावें मज निश्चिती ॥ म्हणोनि चरणी
लागली ॥ ५५ ॥ ऐसें निर्वाण देखोनि ॥ कृपा उपजली योगिया मनी ॥ पूर्व उपकार स्मरोनी ॥ प्रसंन्न झा
ला तये वेळीं ॥ ५६ ॥ भस्म काढोनि तया काळीं ॥ लाविलें प्रेताचे कपाळीं ॥ घाली तयाचे मुखक
मळीं ॥ प्राण आला परियेसा ॥ ५७ ॥ बाळ बैसला उठोनी ॥ सर्वांग झालें सुवर्ण वर्णी ॥ मातेचे व
र्ही तेचि क्षणी ॥ जाते झाले नाकाळ ॥ ५८ ॥ राजपत्नी पुत्रासहित ॥ करी योगियासी दंडवत ॥

ऋषभयोगीकृपावंत॥आणीकुभस्मेंप्रोक्षीतसे॥५९॥तात्काळनयादोघांसी॥शरीरहोयसुव
र्णसंकाशी॥शोभायमानदिसेकैसी॥दिव्यदेहउभयवर्गी॥६०॥प्रसन्नझालायोगेश्वर॥न
येवेकींदिल्हावर॥तुह्मानोहेजराज्वर॥तारुण्यरूपचिरंजीवी॥६१॥तुझासुतभद्रायुष॥की
र्तिकरीलपतियेसा॥राज्यकरीलबहुवस॥पित्याहूनिअधिकजाण॥६२॥ऐसाप्रसन्नहोवोनी
योगीगेलातयेक्षणी॥ऐकरायाएकमनी॥सत्पुरुषाचेंमहिमान॥६३॥सत्पुरुषाचीसेवाक
रितां॥तुझास्फोटकजाईलत्वरिता॥तुवांनकरावीकांहींचिंता॥दृढधरींभावएक॥६४
राजावचनऐकोनी॥नमनकरीतयेक्षणी॥विनवीतसेकरजोडुनी॥कोटेंअसेसत्पुरुष॥६५

२३

मातें निरोपावें आतां ॥ जाईन आपण तेथें तत्वता ॥ मजला त्याचें दर्शन होतां ॥ होईल बरवें म्हण
तसे ॥ ६६ ॥ ऐकोनि राजा त्याचें वचन ॥ सांगतसे मुनी आपण ॥ भीमातिरीं गाणगाभुवन ॥ असे तेथें प
रमपुरुष ॥ ६७ ॥ तयापासीं तुवां जावें ॥ दर्शनमात्रें होईल बरवें ॥ ऐकोनि राजा एकभावें ॥ निघ
ता झाला तये वेळीं ॥ ६८ ॥ ऐक्यभावें राजा आपण ॥ निघाला श्रीगुरूचा दर्शनां ॥ प्रयाणावरी
करी प्रयाण ॥ आला गाणगापुरासी ॥ ६९ ॥ ग्रामीं पुसे सकळिकांसी ॥ कोण येथें एक तापसी
रूप धरिलें संन्यासी ॥ कोठें असे म्हणतसे ॥ ७० ॥ भयभीत झाले सकळिक ॥ म्हणती आतां
न व्हे निके ॥ श्रीगुरूसी पुसतो ऐका ॥ काय करील नकळे म्हणत ॥ ७१ ॥ कोणी न बोलती तयासी

राजा कोपला बला बहु वशी ॥ म्हणे आलों भेटीसी ॥ दाखवा आपणासी म्हणतसे ॥ ७२ ॥ म
ग म्हणती समस्त लोक ॥ अनुष्ठानस्थानी असे निका ॥ अमरजासंगमी माध्यान्हिका ॥ करो
नि येती ग्रामातें ॥ ७३ ॥ ऐसें ऐकोनि म्लेंछ देख ॥ समस्तां वर्जुनी आपण एक ॥ बैसोनि यां
आंदोलिकीं ॥ गेला तया स्थानासी ॥ ७४ ॥ दुरोनि देखतां श्रीगुरूसी ॥ चरणी चाले म्लेंछप
तियेसी ॥ जवळी गेला पहावयासी ॥ नमन करीन उभा राहे ॥ ७५ ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥
कारें रजका कोठें असशी ॥ बहुत दिवसां भेटलासी ॥ आमुचा दास होवोनियां ॥ ७६ ॥ ऐसें
वचन ऐकोनी ॥ म्लेंछ झाला महाज्ञानी ॥ पूर्वजन्म स्मरला मनी ॥ करी साष्टांग नमस्कार ॥ ७७

पादुकांवरी लोळे आपणा ॥ सद्गदीत झालें अंतःकरण ॥ आंगीं रोमांच उठोन ॥ आनंदवाष्पे रुद
न करी ॥ ७८ ॥ पूर्वजन्म आठवोनि देखा ॥ रुदन करी अति दुःखा ॥ करजोडोनि विनवी एका ॥ ना
नापरी स्तुती करी ॥ ७९ ॥ राजा म्हणे श्रीगुरूसी ॥ कां उपेक्षिलें आम्हासी ॥ झालों आपण परदेसी
चरणावेगळें केलें मज ॥ ८० ॥ अंधःकार सागरांत ॥ घातलें ढकलूनि मजकूपांत ॥ तेणें
होऊनी मदोन्मत्त ॥ विसरलों चरण तुझे ॥ ८१ ॥ संसारसागर मायाजाळीं ॥ बुडालों आप
ण दुर्मती केवळी ॥ सेवा न करीं चरणकमळीं ॥ दिवांध आपण झालो ॥ ८२ ॥ होतासी तूं जवळी
निधान ॥ न ओळखें आपण मतिहीन ॥ मदांधकारीं वेष्टून ॥ तुझे चरण विसरलों ॥ ८३ ॥ तू

भक्तजनरानुपेक्षिसी ॥ निर्धार होता माझे मानसीं ॥ अज्ञानसागरीं आम्हासी ॥ कां
घातलें स्वामियां ॥ ८४ ॥ उद्धरावें आतां मज ॥ आलों आपण हेंचि काज ॥ होवोनु
झेचरणरज ॥ असेन आतां राज्यपुरे ॥ ८५ ॥ ऐसें नाना परी देखा ॥ स्तुती करी राजा
ऐका ॥ श्रीगुरु म्हणती भक्तनिका ॥ तुझ्या वासना पुरतील ॥ ८६ ॥ राजा म्हणे श्री
गुरूसी ॥ झाला स्फोटक आपणासी ॥ व्यथा होतसे त्रयासीं ॥ कृपादृष्टी पाहावें ॥ ८७ ॥
ऐसें वचन ऐकोन ॥ श्रीगुरु करिती हास्यवदन ॥ स्फोटक नाहीं दावीं म्हणोन ॥ पुसता
तीयवनासी ॥ ८८ ॥ राजा पाहे स्फोटकासी ॥ न दिसे स्फोटक अंगासी ॥ विस्मय करीत सेमा

नसीं ॥ पुनरपी चरणी माथा देवी ॥ ८९ ॥ राजा म्हणे स्वामियासी ॥ तुझे प्रसन्नत्वें आम्हासी ॥ रा
ज्य पावलों संतोषी ॥ अष्टैश्वर्य भोगिलें ॥ ९० ॥ पुत्र पौत्र देखिले नयनी ॥ पूर्ण निवालों अंतःक
रणी ॥ संकल्प असे माझे मनी ॥ अष्टैश्वर्य माझें अवलोकावें ॥ ९१ ॥ भक्तवत्सल श्रीदत्तु सेंवास
ना अर्थ पुरवी माझे ॥ इंद्रिय संसार उतरीं ओझें ॥ लीन होईन तुझे चरणी ॥ ९२ ॥ श्रीगुरू म्हण
तीन यासी ॥ आम्ही नापसी संन्यासी ॥ येऊन ये तुझे नगरासी ॥ माहांपातकें होती तेथें ॥ ९३ ॥ नग
रीं नित्य धेनुहत्या ॥ यवनजाती करिती अहत्या ॥ जीवहिंसा मघपी हत्या ॥ वर्जावें आतां निर्धा
रें ॥ ९४ ॥ सर्व अंगिकार करूनी ॥ राजा लागे दोन्ही चरणी ॥ म्हणे मी दास पुरातनी ॥ पूर्वापारी द

१६

ष्टी देणे ॥ ९५ ॥ पूर्वीं माझा जन्म रजक ॥ स्वामीचा मी निज सेवक ॥ राज्य पावोनि देखिलें सुख ॥
उपें एक म्लेंछजाती ॥ ९६ ॥ दर्शन होतां तुझे चरण ॥ संतुष्ट झालें अंतःकरण ॥ पुत्रपोत्रीं दृष्टी
पाहाणें ॥ मग मी राहीन तुझे सेवे ॥ ९७ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ राजा विनवी विशेषा ॥ पायां पडे क्षणाक्ष
णिका ॥ अति काकुळती येतसे ॥ ९८ ॥ श्रीगुरु मनीं विचार करिती ॥ पुढें होणार ऐसी गती ॥ कलि
युग असे दुर्जनजाती ॥ गौप्य असतां पुढें बरवें ॥ ९९ ॥ सहज जावें सिंव्हस्थासी ॥ महातीर्थ गौत
मीसी ॥ जावें आतां हे भरवसीं ॥ आतां आम्ही गुप्त व्हावें ॥ २०० ॥ ऐसें मनीं विचारूनी ॥ श्रीगुरु नि
घाले संगमाहुनी ॥ राजा आपुले सुखासनीं ॥ बैसवी प्रीति करोनियां ॥ १ ॥ पादुका घेतल्याआ

१६

पुल्याकरीं ॥ सांगातें येतसे चरण चाली ॥ गुरु म्हणती आरोहण करीं ॥ लोकनिंदा तुज करि
ती ॥ २ ॥ राष्ट्राधिपती तुज म्हणती ॥ जन्मतु झाम्लेंछ जाती ॥ ब्राम्हण सेवे तुज हांसती ॥ जाति दू
षण करतील ॥ ३ ॥ राजा म्हणे स्वामी ऐका ॥ कैंचा राजा मी रजक ॥ तुझे दृष्टी असे निका ॥ लोहसु
वर्ण होतसे ॥ ४ ॥ मी राजा समस्त लोकांत ॥ परी रजक तुझा भक्त ॥ पूर्ण झाले मनोरथ ॥ तुझें
दर्शन झालें मज ॥ ५ ॥ इतुकिया अवसरीं ॥ समस्त मिळाले भारी ॥ मदोन्मत्त अति कुंजरी ॥ अ
श्वावरी कित्तेक ॥ ६ ॥ उभा राहोनि राजा देखा ॥ समस्त दाखवी सैन्यका ॥ संतोष मनी अति हर्षा
आपलें ऐश्वर्य दावितसे ॥ ७ ॥ श्रीगुरु निरोपिती यवनासी ॥ आरोहण करी वारुवेंसी ॥ दूर जा

१७ णे असे नगरासी ॥ निरोप आमुचा न कोमोडूं ॥ ८ ॥ श्रीगुरुवचन ऐकोन ॥ समस्तां शिष्यांतें आरोहण
देता झाला तो यवन ॥ आपण वाजी आरूढला ॥ ९ ॥ आनंद बहु यवनाचे मनीं ॥ हर्षनिर्भर न
माय गगनीं ॥ श्रीगुरु भेटी झाली म्हणोनी ॥ अति उल्हास करीतसे ॥ १० ॥ गुरुमूर्ति बोलाविती
यवनासी ॥ म्हणती झालों अति संतोषी ॥ तूं भक्त केवळ गुणराशी ॥ संतुष्ट झालों आपण आजी
११ ॥ आम्ही संन्यासी यतीतापसी ॥ नित्य करावें अनुष्ठानासी ॥ आम्हां समागमे मार्गासी ॥ न घडे १७
वेळीं संध्यासमय ॥ १२ ॥ यासी उपाय सांगेन ॥ अंगिकारी तूं स्वस्थान ॥ पुढें जाऊं आम्ही त्वरेनें ॥
स्थीर यावें तुम्ही मागें ॥ १३ ॥ पापविनाश तीर्थासी ॥ भेटी होईल तुम्हासी ॥ ऐसें म्हणोनि रायासी ॥

अदृश्य झाले गुरुमूर्ती ॥ १४ ॥ समस्त शिष्यांसहित ॥ श्रीगुरु गोप्त झाले त्वरित ॥ मनोवेगें मा
र्गक्रमित ॥ गेले वैदुरपुरासी ॥ १५ ॥ पापविनाश तीर्थासी ॥ श्रीगुरु पातले त्वरितेंसी ॥ राहिले
तेथे अनुष्ठानासी ॥ समस्त येती भेटावया ॥ १६ ॥ साकरे सायंदेवाचा स्कुत ॥ आला तेथें नाग
नाथ ॥ नानापरी पूजा करित ॥ समाराधना आरंभिली ॥ १७ ॥ श्रीगुरु नेऊनि आपुले घरा
पूजा केली षोडशोपचारा ॥ आरती केली एकसहस्त्रा ॥ समाराधना केली बहुत ॥ १८ ॥ इतु
के होतां झाली निशी ॥ श्रीगुरु म्हणती नागनाथासी ॥ सांगोनि आलों म्लेछजातीसी ॥ पाप
नाशी भेटूं म्हणूनी ॥ १९ ॥ जाऊं आतां तया स्थानासी ॥ येथें राहातां राजा यवन येईल परि ये

१८ सीं॥ उपद्रव होइल ब्राम्हणांसी॥ विप्र घरा म्लेंछ येती॥ २०॥ ऐसें सांगोनि आपण॥ गेले पापवि अ०
नाशीला गोना॥ शुभासनीं बैसोना॥ अनुष्ठान करीत होते॥ २१॥ इतुकिया अवसरीं॥ राजा म ५०
नीं विचार करी॥ गुरुनाथ न दिसती दळ भारीं॥ मनीं चिंता बहुत वर्तली॥ २२॥ म्हणे कटकटा का
य झालें॥ गुरुनाथें मज उपेक्षिलें॥ काय माझें अंतर पडलें॥ मग गेले निघोनियां॥ २३॥ मागु
ती मनीं विचारी॥ पुढें जातों म्हणोनि त्वरी॥ पापविनाशितीर्थातिरीं॥ भेटी देतो म्हणितलें॥ २४॥
न कळे महिमान श्रीगुरुचें॥ कवण पाहे महात्म्य याचें॥ देव बरवें होते आमुचें॥ दर्शन झालें १८
चरणाचें॥ २५॥ राज्यस्फोट होता मज॥ आलों होतों याचि काजा॥ कृपानिधी श्रीगुरुराजा॥ भेटी

झाली पुण्य माझें ॥ २६ ॥ पुढें गेलें हें निश्चित ॥ म्हणोनि निघाला त्वरित ॥ दिव्य वारु आरूढोनि त्वरित ॥ निघाला राजा परियेसा ॥ २७ ॥ चतुश्चत्वारींशतू क्रोश देखा ॥ राजा पातला दिवसें एका ॥ पापविनाशतीर्थी दिखा ॥ अवलोकितसे श्रीगुरूसी ॥ २८ ॥ विस्मय करी आतिमानसीं ॥ येऊनि लागला चरणांसी ॥ विनवीतसे भक्तीसी ॥ गृहा प्रती यावें म्हणतसे ॥ २९ ॥ नगर सर्व श्रृंगारिलें ॥ प्रवाळ मोतियां तोरण केलें ॥ गुढिया मखरें बांधिलीं ॥ समारंभ थोर नगरांत ॥ ३० ॥ बैसऊनियां पाळखीत ॥ आपण चरणचाली येत ॥ नवरत्नें असे ओवाळित ॥ नगरलोक आरत्या आणिती ॥ ३१ ॥ ऐसा समारंभें राजा देखा ॥ घेऊनि गेला गुरुनायका ॥ विस्मय झाला सकळ लोकां ॥ महदाश्चर्य म्हणताती

८० अ०

अ०
५०

१० ३२ ॥ लोक म्हणती म्लेंछजाती ॥ पाहा हो विप्र पूजा करिती ॥ राजा अनाचारी म्हणती ॥ जातिधर्म
सांडिला आजी ३३ याचें पाहूं नये मुख ॥ त्याचे सेवे करिती हर्ष ॥ राजा नष्ट म्हणोनी सकळिक
म्लेंछजाती बोलती ३४ ॥ विप्रकूल समस्त देखा ॥ संतोष कोरिती अति कौतुका ॥ राजा झाला वि
प्र सेवका ॥ आतां बरवें राज्यासी ३५ ॥ ऐसा हा राव असतां ॥ महाराष्ट्रधर्मीं तत्वतां ॥ आपला द्वे
षतत्वतां ॥ न करील कीं जाणपां ३५ ॥ ऐसा राजा असतां बरवें ॥ ज्ञानवंत असे स्वभावें ॥ ब्रम्ह
द्वेषी न व्हे पाहा हें ॥ पुण्यश्लोक म्हणती ऐसा ॥ ३७ ॥ नगरलोक पहावया येती ॥ गुरूसी नमस्का १०
र करिती ॥ राजेश्वर पाचालियेती ॥ लोक म्हणती आश्चर्या ३८ ॥ एक म्हणती हा होय देवा ॥ म्ह

प्पो निभज तो म्लेंछरावा ॥ या कलियुगीं अभिन्नवा ॥ देखिलें म्हणनातीसकळिका ॥ ३९ ॥ सवें वाजंत्रां
चे गजर ॥ बंदीजन वाखाणिती अपार ॥ राजा हर्षे निर्भर ॥ घेऊनि जातो गुरूसी ॥ ४० ॥ नानापरी
चीं दिव्य वस्त्रें ॥ ओवाळिती अमित द्रव्यें ॥ टाकीतसे राजा तेथे ॥ भिक्षुक तुष्टले बहुत देखा ॥ ४१ ॥
ऐसा समारंभ देखा ॥ घेऊनि गेला राजा एका ॥ महाद्वारीं पातले सकळा ॥ पाय घड्या आंथरती ॥ ४२
नानापरीचीं दिव्यांबरें ॥ मार्गी आंथरती पवित्रें ॥ वाजती भेरी वाजंत्रें ॥ राजगृहा पातले ॥ ४३ ॥ महा
सिंहासनस्थानी ॥ श्रृंगार केला अतिगहनी ॥ जगद्गुरूतें नेऊनी ॥ सिंहासनी बैसविलें ॥ ४४
समस्त लोक बाहेर ठेऊन ॥ श्रीगुरु होते येकले आपण ॥ सवें शिष्य चौघे जण ॥ जवळी होते पारि

येसा ॥ ४५ ॥ अंतःपुरींचे कुलस्त्रियासी ॥ पुत्रपौत्रींसहोदरासी ॥ भेटविलें सकळांसी ॥ साष्टांग नम
स्कार करीती ॥ ४६ ॥ राजा विनवी स्वामियांसी ॥ पोष्यें देखिले चरणासी ॥ न्याहाळावें कृपादृष्टी
सी ॥ साष्टांग नमस्कार करीती ॥ ४७ ॥ संतोषले श्रीगुरुमूर्ति ॥ तयांसी आशिर्वाद देती ॥ राजयातें बो
लाविती ॥ पुसताती गृहवार्ता ॥ ४८ ॥ श्रीगुरु म्हणतीत यासी ॥ संतुष्ट झालासि कीं मानसीं ॥ अजूनि
हवें हें इछिसी ॥ विस्तारोनि सांग म्हणती ॥ ४९ ॥ राजा विनवी स्वामियासी ॥ अंतर पडतें चरणासी
राज्य केलें बहुवसी ॥ आतां घावी चरणसेवा ॥ ५० ॥ ऐसे ऐकोनि श्रीगुरु म्हणती ॥ आमुची भेटी
श्रीपार्वतीं ॥ तुझे पुत्र राज्य करिती ॥ तुवां यावें भेटीसी ॥ ५१ ॥ ऐसा निरोप देऊनी ॥ श्रीगुरु निघाले

तेथुनी॥ राजा विनवी चरण धरूनी॥ स्नान मजल्ला असावें॥ ५२॥ कृपासिंधु गुरुनाथ॥ स्नान हो
ईल ऐसे म्हणता॥ आपणनिघाले त्वरित॥ गेले गौतमी यात्रेसी॥ ५३॥ स्नान करोनि गोतमीसी॥
आले गाणगापुरासी॥ आनंद झाला समस्तांसी॥ श्रीगुरुचरणदर्शनें॥ ५४॥ संतोषी झाले सम
स्त लोक॥ पाहावया येती कौतुका॥ वंदिताती सकळिका॥ आरती करिती मनोभावें॥ ५५॥ समस्त
शिष्या तें बोलाविती॥ श्रीगुरु त्यांसी निरोपिती॥ प्रकट झाली बहु ख्याती॥ आतां राहावें गु
प्तरूपें॥ ५६॥ यात्रा असे श्रीपर्वतासी॥ निघावें आतां परियेसी॥ प्रकट बोलेंचि स्वभावेंसी॥ गु
प्तरूपें राहू येथें॥ ५७॥ स्थान आपुलें गाणगापुरीं॥ येथूनि नवचे निर्धारी॥ लौकिकमतें अवधारी॥

२१

अ० ५०

बोल करितां श्रीशैल यात्रा ॥ ५८ ॥ प्रकट निघोनि यात्रेसी ॥ वास निरंतर गाणगाभुवनासी
भक्तजन तारावयासी ॥ राहूं येथें निर्धार ॥ ५९ ॥ कठीण दिवस युगधर्म ॥ म्लेंछ राजा क्रूर
अधर्म ॥ प्रकटरूपें असता धर्म ॥ समस्त म्लेंछ येथें येती ॥ ६० ॥ राजा आला म्हणोनी ॥ स
मस्त यवन ऐकोनी ॥ सकळ येती मनकामनी ॥ म्हणोनि गुप्त असावें ॥ ६१ ॥ ऐसें म्हणोनि
शिष्यांतें सांगीतलें श्रीगुरुनाथें ॥ सिद्ध सांगे नामधारकातें ॥ चरित्र ऐसें श्रीगुरूचे ॥ ६२
पुढे येतील दुर्दिन ॥ कारण असे राज्य यवना ॥ अनाचारी विषयासक्त जन ॥ म्हणोनि गु
प्त राहिले ॥ ६३ ॥ लौकिकार्थ दाखवावयासी ॥ निघाले आपण श्रीशैल्यासी ॥ कथा असे

२१

विशेषीं ॥ सिद्ध म्हणे नामधारका ॥ ६४ ॥ गंगाधराचा सुत ॥ सरस्वती असे विनवीत ॥
प्रत्यक्ष असे श्रीगुरुनाथ ॥ देखिला दृष्टांत गाणगापुरीं ॥ ६५ ॥ सद्भावें भजतील भक्तजन ॥ त्यांची कामना होईल पूर्ण ॥ संदेह न धरीं अनुमान ॥ त्वरित सिद्धी असे जाण ॥ ६६ ॥
न लागतां कष्ट सायास ॥ कामना पुरती गाणगापुरास ॥ कल्पवृक्ष असे तेथ ॥ संदेह
धरितां कार्य नासे ॥ ६७ ॥ जें जें कल्पिलें उत्तम फळ ॥ त्वरित पावती तें सकळ ॥ धन
धान्यादिक सकळ ॥ पुत्र पोत्रादि शीघ्र होतील ॥ ६८ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥
हें गुरुचरित्र दिनिनिशी ॥ मनोंभावें वाचनेसी ॥ सकळ कामना पुरतील ॥ ६९ ॥ इति

२२

श्रीगुरुचरित्रामृत। सिद्धनामधारका सांगत। यवनाचा उद्धार येथ। तुम्हाकारणें सांगी
तला॥ ७०॥ इतिश्रीगुरुचरित्रामृतेसिद्धनामधारकसंवादे सार्वभौमजस्फोटक
शमनऐश्वर्यावलोकनोवेदुराप्रवेशनोनाम पंचाशत्तमोऽध्यायः॥ ५०॥ श्रीगुरुद
त्तात्रयार्पणमस्तु॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

२२

श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ मागील अध्यायीं सांगितलें आम्हासी ॥
म्लेंच्छ राजानें श्रीगुरूसी ॥ नगराशी नेलें होतें ॥ १ ॥ तेथूनि आले गाणगाभुवना ॥ पुढील
वर्तल्या निरोपणा ॥ सांगा स्वामी कृपाघना ॥ गुरुचरित्र आम्हासी ॥ २ ॥ राजाची भेट घेऊनी
श्रीगुरु आले गाणगाभुवनी ॥ योजना करिती आपुल्या मनी ॥ गुप्त राहावें लोकोपचा
री ॥ ३ ॥ सिद्ध म्हणे ऐक वत्सा ॥ कथा असे अति विशेषा ॥ ऐकतां चि सकळ दोषा ॥ नाश्रू
निइच्छित पाविजे ॥ ४ ॥ प्रकट झाले बहुवसी ॥ राजा आला भेटीसी ॥ उपजली भक्ति म्लें
च्छासी ॥ नानाजाती येतील ॥ ५ ॥ म्हणोनि आतां गुप्त व्हावें ॥ लोक मतोनि धावें ॥ पर्वतया

१ त्रेशी म्हणोनि जावें ॥ श्रीगुरु निघाले परियेसीं ॥ ध्रु ॥ गुप्त राहिले गाणगापुरी ॥ प्रकट दाखविलें
लोकाचारी ॥ निघाले स्वामी पर्वतागिरी ॥ शिष्यां सहित अवधारा ॥ ७ ॥ भक्तजन बोलाविती
बहुत जन चिंता करिता ॥ श्रीगुरु समोर येऊनि समस्त ॥ राहाविती अति प्रीती ॥ ८ ॥ दुःख करिती
सकळ जन ॥ धरिती श्रीगुरुचरण ॥ स्वामी आम्हासी सोडुना ॥ केवीं जातां यात्रेसी ॥ ९ ॥ भक्त
जनांची तूं कामधेनू ॥ आम्ही बाळक अज्ञानु ॥ होतासि आम्हा निधानु ॥ सोडूनी जातां श्रीगु
रू ॥ १० ॥ नित्य तुझें करितां दर्शन ॥ दुरितें जातीं निरसून ॥ जीजी कामना इच्छी मन ॥ त्वरित १
पावे स्वामियां ॥ ११ ॥ बाळकातें केवी आतां ॥ अव्हेरूनि जाय माता पिता ॥ तूंचि आम्हा मातापि

ता॥ नको अव्हेरू म्हणताती॥१२॥ नानापरी विनवीती॥ हंसते झाले श्रीगुरुमूर्ती॥ संबोधिती अ
ति प्रीती॥ न करा चिंता म्हणोनी॥१३॥ आम्ही असतों याचिया ग्रामी॥ नित्य स्नान अमरजासंगमी
वसों मध्यान्ही मठधामी॥ गुप्तरूपें अवधारा॥१४॥ जे असती माझ्या प्रेमी॥ त्यांते प्रत्यक्ष दिसे
न नयनी॥ लौकिकमतें अविद्याधर्मी॥ जातों श्रीशैल्ययात्रेसी॥१५॥ प्रातःस्नान कृष्णातीरीं
पुंण्यवृक्ष औदुंबरीं॥ अनुष्ठाना बिंदुक्षेत्रीं॥ माध्यान्हिकाये तो भीमातटीं॥१६॥ अमरजासंग
मी स्नान करोनी॥ पूजा घेऊं मठीं निर्गुणी॥ चिंता न करा अंतःकरणी॥ म्हणोनि सांगती श्रीगुरू॥
१७॥ ऐसें सांगती समस्तांसी॥ संदेह न धरावा मानसीं॥ गाणगाभुवनी अहर्निशी॥ असों आम्ही

त्रिकाळ ॥ १८ ॥ जेजे जन भक्ती करिती ॥ त्यांसी येईल आमची प्रचिती ॥ मनकामना पावती त्वरि
ती ॥ निश्चयवाक्य असे आमचें ॥ १९ ॥ अश्वत्थ न्हे कल्पवृक्षा ॥ संगमीं असे प्रत्यक्षा ॥ तुमचा मनीं
जें अपेक्षा ॥ त्वरित होय पूजितां ॥ २० ॥ कल्पवृक्षा तें पुजोनी ॥ मग यावें आमुचे स्थानीं ॥ पादुका ठेवि
तों निर्गुणी ॥ पूजा करा मनोभावें ॥ २१ ॥ विघ्नहर चिंतामणी ॥ त्यातें पूजितां एकमनीं ॥ चिंतिलें फ
ळ त्याचक्षणी ॥ लाभे तुम्हा अवधारा ॥ २२ ॥ समस्त विघ्नांचा अंतक ॥ पुजा तुम्ही विनायक
अष्ट तीर्थे असती विशेष ॥ आचरावीं मनोभावें ॥ २३ ॥ संतोषकारक आम्हा प्रती ॥ त्रिकाळ
करावी आरती ॥ भक्तजन जे इच्छिती ॥ त्वरित होय अवधारा ॥ २४ ॥ ऐसें सांगोनि तयांसी ॥

निघाले स्वामी पर्वतासी ॥ भक्त परतोनि मठासी ॥ आले चिंतीत मनांत ॥ २५ ॥ चिंतीत पातले
मठांत ॥ तेथें दिसती गुरुनाथ ॥ लोक झाले विस्मित ॥ म्हणती त्रैमूर्ती श्रीगुरु ॥ २६ ॥ यासी मह्मण
ती जे नर ॥ ते पावती यमपुर ॥ सत्य बोलिले निर्धार ॥ न कळे महिमा आम्हासी ॥ २७ ॥ सवेंचि पाहा
तां न दिसे कोणी ॥ प्रेमळ भक्त देखती नयनीं ॥ यापरी गुप्तरूप धरोनी ॥ राहिले श्रीगुरु मठीं
त ॥ २८ ॥ दृष्टांत दाखविला भक्तांसी ॥ पातले आपण पर्वतासी ॥ पाताळगंगातीर वासी ॥
राहिले स्वामी परियेसा ॥ २९ ॥ शिष्यातें निरोपिती अवधारा ॥ पुष्पांचें आसन त्वरित करा ॥
जाणें असे पैलतीरा ॥ ऐक्य होऊं मल्लिकार्जुनीं ॥ ३० ॥ निरोप देतां श्रीगुरुमूर्ति ॥ आणिली

३ पुष्पें सेवंतीं ॥ कुमुदें कल्हारें मालती ॥ कर्दळी पर्णे वेष्टोनी ॥ ३१ ॥ आसन केलें अति विचित्र ॥
घातलें गंगे मध्यें पवित्र ॥ शिष्यां सांगती वेगवक्त्र ॥ जावें तुम्ही गृहासी ॥ ३२ ॥ दुःख करिती
जन सकळी ॥ सांगती श्रीगुरु त्यां चंद्रमोळी ॥ गाणगाग्रामीं असों जवळी ॥ भावें न धरा दुजा
तुम्ही ॥ ३३ ॥ लौकिकमतें आम्ही जातों ॥ ऐसा अभाविकांसी दिसतों ॥ भक्तजनाघरीं असतो
निर्धार धरा मानसीं ॥ ३४ ॥ ऐसें भक्त ऐकोनी ॥ ठेविती माथा श्रीगुरुचरणीं ॥ कृपादृष्टी पाहि
लें नयनीं ॥ निरोप देती आशीर्वाद ॥ ३५ ॥ उठले गुरु तेथोनी ॥ पुष्पक विमानीं बैसोनी ॥ आ २
नंदोनि आपुल्या मनीं ॥ कल्याण सांगती सकळिकां ॥ ३६ ॥ कल्मागतीं बृहस्पती ॥ बहु

धान्यसंवत्सरीं ख्याती ॥ सूर्य चाले उत्तरागती ॥ संक्रांति कुंभ पातियेसा ॥ ३७ ॥ शशिरऋतु माघमासीं ॥ असितपक्ष प्रतिपदेसी ॥ शुक्रवारीं पुण्यदिवसीं ॥ श्रीगुरु बैसले निजानंदीं ॥ ३८ ॥ श्रीगुरु म्हणती शिष्यांसी ॥ जातो आम्ही निजमठासी ॥ पावती खूण तुम्हांसी ॥ प्रसाद पुष्पें पाठवितों ॥ ३९ ॥ येतील पुष्पें जाती शेवंती ॥ घ्यावा प्रसाद तुम्ही भक्ती ॥ पुजा करावी अखंडरीती ॥ लक्ष्मी वसो तुम्हा घरीं ॥ ४० ॥ आणीक सांगेन एक खुण ॥ गायन करी जो माझें स्मरण ॥ त्यांचे घरीं असे जाण ॥ गायन प्रीती आम्हासी ॥ ४१ ॥ नित्य जे जन गायन करिती ॥ त्यांवरी माझी अति प्रीती ॥ तयांचे घरीं अखंडिती ॥ आपण असों अवधारा ॥ ४२ ॥

४ व्याधी नहोय त्यांचे घरीं ॥ दरिद्र जाय त्वरित दूरी ॥ पुत्रपौत्रश्रियाकरीं ॥ शतायुषी नांद
तील ॥ ४३ ॥ एक तील चरित्र माझें जरीं ॥ वांचतील नर निरंतरी ॥ लक्ष्मी राहे त्यांचे घरीं ॥
संदेह न धरावा मनांत ॥ ४४ ॥ ऐसे सांगोनि भक्तांस ॥ श्रीगुरु आले अदृश्य ॥ चिंता ला
